## चर्च ऑफ दी नॅझरीन

# बंधारण पुस्तक

२०१७ - २०२१

Church of the Nazarene Manual
(Marathi)

# चर्च ऑफ दी नॅझरीन

# बंधारण पुस्तक

२०१७-२०२१

इतिहास

घटना

शासन

संस्कार व विधी

कॉपिराईट २०१९
दिनांक २५-२९ जुन २०१७ ला इंडियानापोलिस, इंडियाना, युएसए येथे पार पडलेल्या एकोणतिसाव्या प्रमुख परिषदेच्या अधिकारान्वये प्रकाशित

**संपादकिय समिती**
डिन जी. ब्लेव्हिंग्स
स्टॅनली जे. रोड्स
टेरी एस. स्वोडेन
जेम्स डब्ल्यु. स्पिअर
डेव्हिड पी. विल्सन

**अनुवादः**
रेव्ह. राजिव ए. यंगड
रेव्ह. संतोष एस. डोंगरदिवे
रेव्ह. विक्रांत लोंढे
रेव्ह. प्रितम कसबे
रेव्ह. अद्वैत हिडदुगिकर
मा. विनोद तोडे

**मुद्रितवाचकः**
रेव्ह. संतोष एस. डोंगरदिवे
रेव्ह. राजिव ए. यंगड

मुद्रक:
मंडळीची घटना आणि ख्रिस्ती आचरणाचा करार
(१-९९ मालिका)
स्थानिक शासन
(१०० मालिका)
प्रांतिक शासन
(२०० मालिका)
प्रमुख शासन
(३०० मालिका)
उच्च शिक्षण
(४०० मालिका)
मिनिस्ट्री व ख्रिस्ती सेवा
(५०० मालिका)
न्यायदान व्यवस्था
(६०० मालिका)
संस्कार व विधि
(७०० मालिका)
नॅझरीन युथ इंटरॅशनल (युवक संघ)
नॅझरीन मिशन इंटरनॅशनल (ख्रिस्तवार्ता संघ)
संडेस्कुल अँड डिसायपलशिप मिनिस्ट्रीज इंटरनॅशनल (शाब्बाथ शाळा व शिष्यत्व)
(८०० मालिका)
प्रपत्र
(८०० मालिका)
परिशिष्ट
(९०० मालिका)

CHURCH OF THE NAZARENE MANUAL - MARATHI
Copyrights 2018
Church of the Nazarene
Published by the authority of the Twentyninth General Assembly held in Indianapolis, Indiana, USA, 25-29 June 2017

Edition 2017-2021

Copies 200

Editing Committee
DEAN G. BLEVINS
STANLEY J. RODES
TERRY S. SOWDEN
JAMES W. SPEAR
DAVID P. WILSON

Published by
Nazarene Holiness Literature
#3,4th Cross, 2nd Main
Horamavu Main Road
Dodda Banswadi
BANGALORE -560043
Email: holinessliterature@nazareneindia.org

Literature Coordinator
Vinod Jaykumar Tode
16, Natraj Housing Society
Behind Rainbow Market
Gorewada, Nagpur- 440 013
Email: vtode@nazareneindia.org
Mobile: 7620486514, 9326211064

Printed and bound in India by
GS Media, Secunderabad 500 067
E-mail: printing@ombooks.org

# अनुक्रमणिका


प्रस्तावना

भाग १ला . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 11

ऐतिहासिक निवेदन

भाग २रा. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 21

मंडळीची घटना

भाग ३ रा . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 37

खिस्ती वर्तनुकीचा करार

भाग ४था . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 55

मंडळीची शासन व्यवस्था

भाग ५ वा . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 179

उच्च शिक्षण

भाग ६वा . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 185

पाळकीय सेवाकार्य आणि ख्रिस्ती सेवाकार्य

भाग ६वा . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 239

न्यायदान व्यवस्था

भाग ८वा . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 255

संस्कार आणि विधी

भाग ९वा . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 279

घोषणापत्र आणि सेवाकार्य योजना/घटना/नियम

भाग १०वा . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 281

प्रपत्र

भाग ११वा . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 287

परिशिष्ट

# प्रस्तावना

*राष्ट्रांमध्ये ख्रिस्तसदृष्य शिष्य बनविणे* हे चर्च ऑफ दी नॅझरीनचे *मिशन विधान* आहे.

आम्ही *ख्रिस्ती, पवित्रीकरणाकरिता पाचारलेले व सेवेकरिता पाचारलेले* लोक आहोत ही चर्च ऑफ दी नॅझरीनची *मुलतत्वे* आहेत.

चर्च ऑफ दी नॅझरीनचे *सात गुणवैशिष्ट्ये* म्हणजे, *अर्थपूर्ण भक्ती, तर्कसंगत ईश्वरविज्ञान, आवेशाने सुवार्ता गाजविणे, हेतूपुरस्सर शिष्यत्व, मंडळीचा विकास, परिवर्तनशील पुढारीपण, उद्देशपूर्ण कळवळा.*

चर्च ऑफ दी नॅझरीनचे प्राथमिक उद्दिष्ट म्हणजे पवित्रशास्त्रामध्ये जाहीर केलेले ख्रिस्ती पावित्र्य टिकवून ठेवण्याद्वारे आणि त्याचा प्रचार करण्याद्वारे देवाचे राज्य वाढविणे.

चर्च ऑफ दी नॅझरीनचे निर्णायक उद्दिष्ट म्हणजे "पवित्र ख्रिस्ती सहभागीता, पाप्यांचे परिवर्तन, विश्वासणाऱ्यांचे  संपूर्ण पवित्रीकरण, त्यांची पवित्रतेमध्ये, प्रारंभिक नवीन कराराच्या मंडळीमध्ये व्यक्त केलेल्या साधेपणात व आध्यात्मिक सामर्थ्यात, संपूर्ण मानवजातिला सुवार्ता गाजविण्यासहित वाढ करणे."

चर्च ऑफ दी नॅझरीन हे संपूर्ण जगभरामध्ये सुवार्ता गाजविण्याद्वारे आणि त्याच्या शिक्षणाद्वारे देवराज्य वाढविण्याकरिता एक साधन म्हणून अस्तित्वात आहे. आमचे सुपरिभाषित कार्य म्हणजे पाप्यांचे परिवर्तन, पतिताचे पुनर्वसन आणि विश्वासणाऱ्यांचे संपूर्ण पवित्रीकरण ह्याद्वारे पवित्रशास्त्रामध्ये जाहीर केलेल्या ख्रिस्ती पवित्रतेला टिकवून ठेऊन त्याचा प्रसार करणे हे आहे.

"जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा" (मत्तय २८:१९; योहान २०:२१; मार्क १६:१५) ह्या देवाच्या महान आज्ञेला प्रतिसाद म्हणून सुवार्ताप्रसार करणे हे आमचे आध्यात्मिक उद्दिष्ट आहे. आमचा असा विश्वास आहे की ह्या उद्दिष्टाची पूर्ती संम्मत धोरणे व प्रक्रिया, विश्वासाची सिध्दांतप्रणाली आणि काळ परिक्षित नैतिकता व जीवनशैलीचे मानदंड ह्याद्वारे होऊ शकते.

ह्या २०१७-२०२१च्या बंधारणपुस्तकाच्या आवृत्तीमध्ये पुढील बाबी समाविष्ट आहेत: मंडळीची घटना, जी आमचे विश्वास कलमे, आमची मंडळीबाबतची समज, पवित्र जीवन जगण्याकरिता ख्रिस्ती आचरणाचा करार, संस्थेची तत्व व शासन परिभाषित करते; ख्रिस्ती आचरणाचा करार जी वर्तमान समाजाच्या महत्वाच्या मुद्द्यांना आणि स्थानिक, प्रांतिक आणि प्रमुख संस्थेशी संबंधित मंडळीच्या शासनाच्या धोरणांना संबोधते.

प्रमुख परिषद हे चर्च ऑफ दी नॅझरीनचे सर्वोच्च सिध्दांत व नियम गठित करणारे मंडळ आहे. बंधारण पुस्तकामध्ये दिनांक २५-२९ जुन २०१७ ला इंडियानापोलिस, इंडियाना, युएसए येथे पार पडलेल्या एकोणतिसाव्या प्रमुख परिषदेतील सेवकीय व सामान्य प्रतिनिधिंचे निर्णय आणि निकाल समाविष्ट असून ते कृतींकरिता अधिकृत मार्गदर्शक आहेत. हे मंडळीच्या विश्वास व व्यवहाराचे अधिकृत विधान असून पवित्र शास्त्राच्या शिकवणिंशी सुसंगत असल्यामुळे आम्ही आमच्या जगभरातील लोकांनी ह्यामधील पवित्र जीवन जगण्यासाठी पुरविलेली सैध्दांतिक तत्वे, मार्गदर्शन व मदत स्वीकारावी अशी अपेक्षा करतो. चर्च ऑफ दी नॅझरीनचे सभासद्त्व स्वीकारल्यावर तसे करण्यास अपयशी ठरल्यास, मंडळीच्या साक्षीला इजा पोहोंचते, तिचा विवेक भंगतो आणि नॅझरीन असे संबोधल्या जाणाऱ्यांची सहभागीता उधळली जाते.

चर्च ऑफ दी नॅझरीनचे शासन विशिष्ट आहे. तिची प्रशासन पध्दती प्रातिनिधित्मक आहे-ती धर्मप्रमुखात्मकही नाही आणि धर्मसभात्मकही नाही. सामान्यांना व सेवकांना मंडळीच्या विमर्शकारी व नियम गठित करणाऱ्या मंडळामध्ये समान अधिकार प्राप्त असल्याने अधिकारामध्ये इष्ट व परिणामकारक समतोल आहे. आम्ही ह्याकडे केवळ मंडळीच्या सेवेमध्ये सहभागी होण्याची संधी एवढ्याच दृष्टिकोणातून नव्हे तर सामान्यांचे व सेवकांचे एक कर्तव्य ह्या दृष्टिने सुध्दा बघतो.

समर्पण व स्पष्ट उद्देश महत्वाचे आहेत. परंतु बुध्दीमान आणि ज्ञानी लोक जेव्हां सामान्यत: सर्व संम्मत व्यवहार व प्रक्रियांचे पालन करतात तेव्हां देवराज्य वेगाने वाढते व त्यांची ख्रिस्तासाठी साक्ष परिणामकारक होते. म्हणून आमच्या सभासदांनी आदर्श नॅझरीनचा इतिहास, सिध्दांत व नैतिक व्यवहार समाविष्ट असणाऱ्या चर्च ऑफ दी नॅझरीनच्या बंधारण पुस्तकाशी परिचित होणे अत्यावश्यक आहे. ह्या पुस्तकाच्या पृष्ठांवरील आदेशांना चिकटून राहण्याद्वारे आमच्या देवासोबतच्या व मंडळीसोबतच्या एकनिष्ठतेचे व प्रामाणिकतेचे संगोपन होईल आणि आमच्या आध्यात्मिक प्रयत्नांची परिणामकारकता व क्षमता वाढवेल.

पवित्र शास्त्र हे आमचे सर्वोच्च मार्गदर्शक, पवित्र आत्म्याद्वारे प्रज्वलक आणि बंधारण पुस्तक हे आमचे सर्वसंम्मत विश्वास, व्यवहार व प्रशासनपध्दतीचे विधान असे असल्यामुळे आम्ही पुढील नवीन चतुर्वर्षाकडे येशू ख्रिस्तामधील आनंद व अढळ विश्वासाने बघत आहोत.

**प्रमुखाध्यक्ष मंडळ**

युजिनिओ आर. डुआर्ते
डेव्हिड डब्ल्यु. ग्रेव्हज
डेव्हिड ए. ब्युझिक
गुस्ताव्हो ए. क्रॉकर
फिलिमाओ एम. चँबो
कार्ला डी. सनबर्ग

# भाग १ला

# ऐतिहासिक निवेदन

## ऐतिहासिक निवेदन

चर्च ऑफ दी नॅझरीन स्वत:ला ख्रिस्ताच्या, “एक, पवित्र, जागतिक, आणि प्रेषितिय” मंडळीची शाखा म्हणून घोषित करते, आणि जुन्या व नवीन करारात नमूद केलेला देवाच्या लोकांचा इतिहास आणि त्यांचा आजतागायतपर्यंतचा इतिहास, ख्रिस्ताच्या मंडळीच्या सर्व अभिव्यक्तींसह ती स्वत:चा असा गणते. आमची मंडळी पहिल्या पाच ख्रिस्ती शतकांची सैध्दांतिक तत्वे ही स्वत:च्या विश्वासाच्या अभिव्यक्ती ह्या नात्याने प्राप्त करते. आम्ही स्वत:ला ऐतिहासिक मंडळीशी पुढील बाबतीत समरूप मानतो, पवित्रशास्त्रोक्त उपदेश, संस्कारांची अंमलबजावनी करणे, प्रेषितिय विश्वास व व्यवहारांच्या सेवांचे सुव्यवस्थापन करणे, ख्रिस्तसादृष्य जीवन व सेवेची शिस्त बिंबविणे. आमची मंडळी पवित्र आणि देवाला संपूर्णत: समर्पित जीवन जगण्याच्या पवित्र शास्त्रोक्त पाचारणाची दखल घेते व संपूर्ण पवित्रीकरणाच्या इश्वरविज्ञानाद्वारे ते गाजविते.

आमचा ख्रिस्ती वारसा हा १६व्या शतकातील धर्मसुधारणा आणि १८व्या शतकातील वेस्लीय संजीवन ह्यांच्या माध्यमातून आलेला आहे. जॉन आणि चार्ल्स वेस्ली यांच्या उपदेशांद्वारे इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड, आणि वेल्स देशांमधील लोक पापांपासून फिरले आणि ख्रिस्ती सेवेकरिता समर्थ झाले. या संजीवनाची वैशिष्ट्ये म्हणजे, सामान्यांचे

उपदेश, साक्षी, शिस्त आणि “सोसायटिज,” “क्लासेस,” आणि “बँड्स” या नावाने ओळखल्या जाणाऱ्या आस्थेवाईक शिष्यांचे समुह. वेस्लीय संजीवनाचे ईश्वरविज्ञानात्मक चिन्ह म्हणजे: कृपेने विश्वासाद्वारे न्यायीकरण; तसेच कृपेने विश्वासाद्वारे पवित्रीकरण किंवा ख्रिस्ती परिपूर्णता; आणि कृपेचे आश्वासन देणारी पवित्र आत्म्याची साक्ष. जॉन वेस्लिच्या वैशिष्ट्यपूर्ण सहभागामध्ये ख्रिस्ती जीवनाकरिता देवाची कृपाळू देणगी म्हणून संपूर्ण पवित्रीकरणावर दिलेला जोर समाविष्ट आहे. हा जोर जगभर पसरला. उत्तर अमेरीकेत १७८४ मध्ये “ह्यां खंडाची सुधारणा करण्याकरिता, आणि पवित्रशास्त्रोक्त पवित्रतेचा ह्या देशांमध्ये प्रसार करण्याकरिता” मेथॉडिस्ट एपिस्कोपल मंडळीची स्थापना झाली.

१९व्या शतकाच्या मध्यावर ख्रिस्ती पवित्रतेवरचा जोर नव्याने विकसित झाला. तिमथी मेरीट या “गाईड टू ख्रिश्चन परफेक्शन” मासिकाच्या संपादकाने फार प्रोत्साहन दिले. न्युयॉर्क सिटी, न्युयॉर्क, युएसए येथील फिबी पामर यांनी पवित्रीकरणाच्या प्रसाराकरिता मंगळवारच्या सभा चालविल्या आणि त्या एक सतत मागणी असलेल्या उत्तम उपदेशक, लेखक व संपादीका बनल्या. १९६७ मध्ये मेथॉडिस्ट उपदेशक जे. ए. वुड, जॉन इन्स्किप व इतर यांनी वाईनलँड, न्युजर्सी, युएसए येथे पवित्रतेच्या शिबिरांची पहिली मालिका सुरू केली ज्यामुळे पवित्रीकरणाकरिता वेस्लीय भूकेचे जागतिक स्तरावर नुतनीकरण झाले. वेस्लीय मेथॉडिस्ट, फ्री मेथॉडिस्ट, काही विशिष्ट मेननाईट, ब्रदरन आणि क्वेकर या सर्वांनी ख्रिस्ती पवित्रीकरणावर जोर दिला. सुवार्तिक लोक ही चळवळ जर्मनी, युनायटेड किंगडम, स्कँडेनाव्हिया, भारत आणि ऑस्ट्रेलिया या ठिकाणांवर घेऊन गेले. पवित्रीकरणावर जोर देणाऱ्या नवीन मंडळ्या अस्तित्वात आल्या त्यामध्ये चर्च ऑफ गॉड (अँडरसन, इंडियाना, युएसए) चा सुध्दा समावेश आहे. या प्रयत्नांमधून पवित्रतेवर भर देणाऱ्या मंडळ्या, शहरी मिशन कार्ये आणि मिशन संस्थांची वाढ झाली. या सर्व मंडळ्यांना एका पवित्रतेवर जोर देणाऱ्या मंडळीमध्ये एकत्र करावे ह्या प्रेरणेमधून चर्च ऑफ दी नॅझरीनचा जन्म झाला.

## पवित्रतेत एकता

१८८७ मध्ये फ्रेड हिलरी यांनी दी पिपल्स इव्हँजेलिकल चर्च (प्रॉव्हिडन्स, र्होर्ड आयलंड, युएसए) ची स्थापना केली. पुढच्या वर्षी १८८८ मध्ये दी मिशन चर्च (लिन, मॅसाच्युसेट्स, युएसए) ची स्थापना झाली. १८९० मध्ये त्यांनी व इतर आठ न्यु इंगलडच्या मंडळ्यांनी

सेंट्रल इव्हँजेलिकल होलीनेस असोसिएशनची स्थापना केली. ॲना एस. हॅन्सकॉम यांची १८९२ साली दिक्षा झाली. नॅझरीनच्या वंशावळीत दिक्षा झालेली ती प्रथम स्त्री सेविका. १८९४-९५ मध्ये विल्यम हॉवर्ड हुपले यांनी ब्रुकलिन, न्यु यॉर्क, युएसए येथे पवित्रतेवर जोर देणाऱ्या तीन मंडळ्या स्थापन केल्या त्याचेच असोसिएशन ऑफ पेंटेकॉस्टल चर्चेस ऑफ अमेरीका बनले. त्यांच्याकरिता व इतर नॅझरीन संस्थापकांकरिता "पेंटेकॉस्टल" हा "पवित्रता" या करिता प्रतिशब्द होता. हिलरी आणि हुपले हे गट १९९६ मध्ये विलीन झाले आणि त्यांनी १८९९ मध्ये भारतात आणि १९०१ मध्ये केप वर्दे या ठिकाणी कार्य सुरू केले. १९०२ मध्ये त्यांचे मिशन एक्झेक्युटिव्ह हिराम रेनॉल्ड यांनी कॅनडा मध्ये मंडळ्यांची स्थापना केली. हा गट कॅनडामधील नोव्हा स्कॉटिया पासून आयोवा, युएसए इथपर्यंत १९०७ पर्यंत पोहोंचला.

रॉबर्ट ली हॅरिस यांनी १८९४ मध्ये मिलान, टेनेसी, युएसए येथे न्यु टेस्टामेंट चर्च ऑफ ख्राईस्ट ची स्थापना केली. त्यांची विधवा पत्नि मेरी लि गेल यांनी १८९५ मध्ये ते दक्षिण टेक्सास, युएसए इथपर्यंत पसरविले. १९०१ मध्ये सी. बी. जेर्निगन यांनी व्हॅन अलस्टिन, टेक्सास, युएसए इथे पहिले इनडिपेंडेंट होलिनेस चर्च स्थापन केले. १९०४ मध्ये या मंडळ्या रायझिंग स्टार, टेक्सास, युएसए इथे होलिनेस चर्च ऑफ ख्राईस्ट या नावाने विलीन झाल्या. १९०८ पर्यंत जॉर्जिया, युएसए पासून तर न्यु मेक्सिको, युएसए पर्यंत पसरून त्या उपेक्षित व गरजूंची सेवा करत, अनाथ व अविवाहित मातांना साह्य करत आणि भारत व जपान मधील सेवकांसोबत सुध्दा सेवा करत.

फिनेहास एफ. ब्रिझी आणि जोसेफ पी. विडनी यांनी इतर १०० लोकांसह लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया येथे दी चर्च ऑफ दी नॅझरीन ची स्थापना केली. त्यांचा असा विश्वास होता की, विश्वासाने पवित्रीकरण झालेल्या ख्रिस्ती लोकांनी ख्रिस्तानुवर्तन करून गरिबांना सुवार्ता सांगावी. आपला पैसा आत्म्यांच्या तारणाकरिता आणि गरजूंच्या मदतीकरिता ख्रिस्तसादृष्य सेवासंस्थांना द्यावा असे त्यांचे ठाम मत होते. चर्च ऑफ दी नॅझरीन प्रामुख्याने अमेरिकेच्या पश्चिम किनारपट्टीलगत आणि रॉकी माऊंटन्स च्या पूर्वेला इलिनॉईस, युएसए पर्यंत वाढले. ते कोलकाता येथील एका स्थानिक सेवेला साह्य करीत असत.

आक्टोबर १९०७ मध्ये दी असोसिएशन ऑफ पेंटेकॉस्टल चर्चेस ऑफ अमेरिका आणि दी चर्च ऑफ दी नॅझरीन यांची शिकागो, इलिनॉईस येथे अध्यक्ष व मंडळी यांच्यात समतोल राखणारे मंडळीचे प्रशासन आखणे या उद्देशाने एकत्र महासभा भरली.

प्रांताध्यक्षांकडे प्रस्थापित मंडळ्यांची जोपासना करून काळजी पुरविणे, नवीन मंडळ्या स्थापण्याकरिता उत्तेजन देऊन त्या स्थापने करणे हे कार्य होते. परंतु, प्रस्थापित मंडळीच्या स्वतंत्र कृतींमध्ये त्यांना हस्तक्षेप करण्यास मज्जाव होता. या महासभेमध्ये होलिनेस चर्चेस ऑफ ख्राईस्टच्या प्रतिनिंधिंनी सुध्दा भाग घेतला. पहिल्या प्रमुख परिषदेने दोन्ही संस्थांच्या नावांवरून पेंटेकॉस्टल चर्च ऑफ दी नॅझरीन हे नाव ग्रहण केले. ब्रिझी आणि रेनॉल्ड्स यांची प्रमुखाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

सप्टेंबर १९०७ मध्ये, होलिनेस ख्रिश्चन चर्च ची पेनसिल्वेनिया कॉन्फरंस ही एच. जी ट्रमबावर ह्यांच्या नेतृत्वामध्ये पेंटेकॉस्टल नॅझरिनमध्ये विलीन झाली.

ऑक्टोबरमध्ये पायलट पॉईंट, टेक्सास, यु एस ए येथे दुसरी प्रमुख परिषद सुरू झाली. जनरल चर्च ऑफ दी होलिनेस चर्च ऑफ ख्राईस्ट हे सुध्दा त्यामध्ये समाविष्ट झाले. मंगळवारी सकाळी, दी. १३ आक्टोबर ला आर. बी. मिचम ह्यांनी सुचना केली आणि सि. डब्ल्यु. रूथ यांनी अनुमोदन दिले की, “ह्या दोन मंडळ्यांच्या विलिनिकरणाची पूर्ती करण्यात यावी.” हे होण्याकरिता ब्रिझी यांनी सातत्याने प्रयत्न केले आणि सकाळी १०:३० ला हा प्रस्ताव अतिशय उत्साहाने हात वर करून सर्वानुमते स्वीकारण्यात आला.

१८९८ साली जे. ओ. मॅक्लर्कन यांच्या नेतृत्वामध्ये टेनेसी व त्यालगत च्या राज्यांमधील पवित्रतेवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांना एकत्र करून नॅशव्हिल, टेनेसी, यु एस ए इथे पेंटेकॉस्टल मिशनची स्थापना झाली. त्यांनी काही पाळक व शिक्षकांना क्युबा, ग्वाटेमाला, मेक्सिको आणि भारतात पाठविले. १९०६ मध्ये ग्लासगो, स्कॉटलंड येथील पार्कहेड काँग्रिगेशनल चर्च ने जॉर्ज शार्प यांना ख्रिस्ती पवित्रतेचा वेस्लीयमतानुसारी उपदेश देण्याच्या कारणावरून काढून टाकले. पार्कहेड चर्चची स्थापना झाली, मंडळ्या स्थापन झाल्या आणि पेंटेकॉस्टल चर्च ऑफ स्कॉटलंड १९०९ मध्ये स्थापन झाले. १९१५ मध्ये पेंटेकॉस्टल मिशन आणि पेंटेकॉस्टल चर्च ऑफ स्कॉटलंड हे पेंटेकॉस्टल नॅझरीनमध्ये विलीन झाले.

१९१९ मध्ये संस्थेचे अधिकृत नाव चर्च ऑफ दी नॅझरीन असे बदलण्यात आले कारण “पेंटेकॉस्टल” ह्या शब्दाशी नवीन अर्थ सलग्न झालेले होते.

## जागतिक मंडळी

चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मूलभूत चारित्र्याची जडणघडण १९१५ मध्ये संयुक्त झालेल्या पालक मंडळ्यांद्वारे झालेली होती. ह्या चारित्र्याला आंतरराष्ट्रीय पैलू होते. युनायटेड स्टेट्स

ऑफ अमेरीका, भारत, केप वर्दे, क्युबा, कॅनडा, मेक्सिको, ग्वाटेमाला, जपान, अर्जेंटिना, युनायटेड किंगडम, स्वाझीलँड, चायना आणि पेरू ह्या देशांमधील स्थापित मंडळ्यांना संस्थेने साहाय्य केले. १९३० पर्यंत संस्था दक्षिण आफ्रिका, सिरया, पॅलेस्टाईन, मोझँबिक, बार्बाडोस आणि त्रिनिदाद पर्यंत पोहोंचली. प्रांताध्यक्ष व्ही. जी. सँटिन (मेक्सिको), हिरोशी किटागावा (जपान) आणि सॅम्युएल भुजबळ (भारत) ह्यांच्या सारखे राष्ट्रीय पुढारी ह्या प्रक्रियेकरिता अत्यावश्यक होते. ह्या आंतरराष्ट्रीय चारित्र्याचे मजबुतीकरण अधिक संयुक्तिकरणांद्वारे करण्यात आले.

१९२२ मध्ये जे. जी. मॅरिसन यांनी लेमॅन्स होलिनेस असोसिएशन चे अनेक कार्यकर्ते व १००० पेक्षा जास्त सभासदांना डेकोटा, यु एस ए, मिनिसोटा, यु एस ए आणि मोन्टॅना, यु एस ए इथे नॅझरीन मध्ये आणले. १९३० मध्ये रॉबर्ट चुंग ह्यांनी कोरीयन पाळकांचे आणि मंडळ्यांचे एक जाळे नॅझरीनमध्ये आणले. १९४५ साली ऑस्ट्रेलियामधील काही मंडळ्या ए. ए. ई. बर्ग यांच्या नेतृत्वात नॅझरीन मध्ये विलीन झाल्या. १९४८ मध्ये अल्फ्रेडो डेल रोसो यांच्या नेतृत्वात इटली येथील मंडळ्या संस्थेत आल्या. १९५० च्या सुमारास, हेफझिबा फेथ मिशनरी असोसिएशनचे दक्षिण आफ्रिकी कार्य आणि त्याचे टाबोर, आयोवा, यु एस ए येथील प्रमुख केंद्र हे सुध्दा नॅझरीनसोबत संयुक्त झाले.

१९०७ साली डेव्हिड थॉमस यांनी लंडन, इंग्लंड येथे स्थापन केलेल्या आंतरराष्ट्रीय होलिनेस मिशनाने डेव्हिड जोन्स यांच्या नेतृत्वात दक्षिण आफ्रिकेमध्ये व्यापक कार्य विकसित केले. १९५२ मध्ये त्यांच्या इंग्लंडमधील मंडळ्या व आफ्रिकेतील कार्य जे. बी. मॅक्लॅगन यांच्या नेतृत्वात नॅझरीनशी सलंग्न झाले. १९३४ मध्ये मेनार्ड जेम्स आणि जॅक फोर्ड यांनी ब्रिटन मध्ये कॅलवरी होलिनेस चर्चची स्थापना केली आणि १९५५ मध्ये ते नॅझरीनशी सलग्न झाले. फ्रँक गोफ यांनी १९१८ मध्ये ओंटारियो, कॅनडा येथे दी गॉस्पल वर्कर्स चर्च स्थापन केले आणि ते १९५८ मध्ये चर्च ऑफ दी नॅझरीनशी संयुक्त झाले. नायजेरियनांनी १९४० मध्ये स्वदेशी चर्च ऑफ दी नॅझरीन स्थापन केले आणि १९८८ मध्ये जेरेमायाह यु. एकायडेमच्या नेतृत्वामध्ये ते आंतरराष्ट्रीय मंडळीशी सलग्न झाले.

नॅझरीनांनी जाणीवपूर्वकरित्या मंडळीचे असे स्वरूप विकसित केले आहे की जे प्रोटेस्टंट मानदंडापेक्षा निराळे आहे. १९७६ साली नॅझरीन मंडळीच्या भविष्यात्म स्वरूपाचे परिक्षण करण्याच्या हेतूने एक अभ्यास आयोग गठित करण्यात आला होता. १९८० मध्ये आपला अहवाल देतांना ह्या आयोगाने दोन तत्वांच्या आधारे नॅझरीन

मंडळीच्या आंतरराष्ट्रियीकरणाची शिफारस केली. पहिले म्हणजे त्यांनी हे लक्षात घेतले की नॅझरीन मंडळ्या व प्रांत हे जागतिक स्तरावर "विश्वासणाऱ्यांची एक अशी वैश्विक सहभागीता आहे की त्यात त्यांच्या सांस्कृतीक संदर्भामध्ये स्विकृती अस्तित्वात आहे" असे प्रस्थापित झाले आहेत. दुसरे म्हणजे, "नॅझरीनच्या ओळखीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अपरिवर्तनिय गाभ्याचा प्रमुख घटक असलेल्या पवित्र शास्त्रोक्त पवित्रेचा प्रसार करणे" ह्या "चर्च ऑफ दी नॅझरीनच्या विशिष्ट मिशन" बाबत सार्वजनिक वचनबध्दता असल्याचे त्यांनी हे ओळखले.

१९८० मध्ये प्रमुख परिषदेने विश्वास कलमांबाबत, "आंतरराष्ट्रीय ईश्वरविज्ञानात्मक एकरूपता" स्वीकारली. सर्व सेवकांच्या ईश्वरविज्ञानात्मक प्रशिक्षणाला पुष्टी दिली आणि प्रत्येक जागतिक विभागातील ईश्वरविज्ञानात्मक शिक्षण संस्थांना योग्य साह्य करण्यास आमंत्रण दिले. ह्या परिषदेने नॅझरिनांना अशा एकाच संबंधाच्या चौकटीतील आंतरराष्ट्रीय पवित्रेबाबत सख्य जोपासणाऱ्या परिपक्वतेप्रति आवाहन केले ज्यामध्ये लोकांचे व राष्ट्रांचे "सबळ आणि दुर्बळ, देणगीदार आणि प्राप्तकर्ता" अशा प्रकारे मूल्यमापन करणारी वसाहतित्मक मनोवृत्ती अशा विचाराला मार्ग करून देईल की ज्यात "जगाकडे बघण्याचा संपूर्णत: नवीन दृष्टिकोण गृहित धरता येईल आणि ज्यामध्ये सर्वच भागिदारांच्या क्षमता व समानता लक्षात घेतल्या जातील."

टीप: जर्नल ऑफ दी ट्वेंटियथ जनरल असेंब्ली, चर्च ऑफ दी नॅझरीन, (१९८०): २३२. फ्रँकलिन कुक, दी इंटरनॅशनल डायमेंन्शन (१९८४): ४९

प्रोटेस्टंटांमध्ये चर्च ऑफ दी नॅझरीनकडे वाढीचा अनन्य नमुना आहे. १९९८ पर्यंत अर्धे नॅझरीन हे युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरीका आणि कॅनडा मध्येच वास्तव्य करणारे राहिले नाही, आणि २००१ च्या प्रमुख परिषदेला आलेल्या प्रतिनिधिंपैकी ४१ टक्के हे एकतर इंग्रजी ही दुय्यम भाषा म्हणून बोलणारे होते किंवा आजिबात बोलतच नव्हते. २००९ मध्ये, युजिनिओ डुआर्ते हे केप वर्दे ह्या ठिकाणचे आफ्रिकन, चर्चचे एक प्रमुख अध्यक्ष म्हणून निवडून आले. २०१३ मध्ये ग्वाटेमालाचे गुस्टाव्हो क्रॉकर हे सेंट्रल अमेरीकन प्रमुखाध्यक्ष म्हणून निवडून आले. २०१७ मध्ये मुळ मोझँबिकचे, आफ्रिकन प्रमुखाध्यक्ष म्हणून निवडून आले आणि प्रथमच प्रमुख अध्यक्षांच्या मंडळाचे अर्धे सभासद हे नॉर्थ अमेरिकेच्या बाहेर जन्मलेले व वाढलेले असे आहेत.

२०१७ मध्ये, नॅझरीन चर्च चे २.५ दशलक्ष सभासद ४७१ प्रांत आणि १६० पेक्षा अधिक जागतिक क्षेत्रांमध्ये होते. जवळपास २८% नॅझरीन आफ्रिकन होते, २९%

लॅटिन अमेरीका आणि करेबियन मध्ये वास्तव्यास होते, तर एक चतुर्थांश युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि कॅनडा मध्ये वास्तव्यास होते. नॅझरीनच्या प्रस्थापित युरोपियन प्रांतांनी पूर्व युरोपात नवीन सेवाकार्याला साह्य केले आणि आशियातली मंडळी ही इतर ठिकाणांसह कोरीया, जपान आणि भारत ह्या पारंपारीक केंद्रांमधून दक्षिण आशियात पोहोंचली. २०१७ पर्यंत तीन सर्वात मोठे प्रांत आशिया आणि आफ्रिकेत होते, आणि तीन सर्वात मोठ्या मंडळ्या दक्षिण अमेरीका आणि करेबियनमध्ये होत्या.

## आंतरराष्ट्रीय सेवाकार्याची वैशिष्ट्ये

नॅझरीनची योजनाबध्द सेवाकार्ये ऐतिहासिकरित्या सुवार्ताप्रसार, सामाजिक कार्य, आणि शिक्षण सेवा ह्या भोवती केंद्रित आहेत.

परस्पर सहकार्य असणाऱ्या आणि त्यांच्या स्वत:च्या संस्कृतीअंतर्गत असणाऱ्या स्वदेशी वेस्लीय तत्वे असणाऱ्या आंतरसांस्कृतीक सेवक आणि हजारो स्थानिक सेवक आणि सामान्य कार्यकर्त्यांद्वारे हे कार्य समृध्दी पावते.

**सुवार्ताप्रसारकार्य.** हिराम एफ. रेनॉल्ड्स हे एक आंतरसांस्कृतिक नॅझरीन सेवाकार्य प्रस्थापित करणाची दूरदृष्टी असणारे व्यक्तीमत्व होते. प्रमुखाध्यक्ष ह्या नात्याने त्यांच्या २५ वर्षाच्या सेवाकालामध्ये त्यांच्या सातत्याच्या पुरस्काराने मिशन सेवाकार्याकाला संस्थात्मक प्राधान्याप्रती उंचाविण्यास मदत झाली. १९१५ पासून, जागतिक ख्रिस्तवार्ता संघाने (मुळात स्त्रियांची मिशन सेवाकार्य संस्था) निधी उभारला आणि मिशन शिक्षणाचा प्रसार जगभरातील मंडळ्यांमध्ये केला. उत्तर अमेरिकन सुवार्ता प्रसाराचा प्रमुख भाग जरी गृह मिशन कार्य होता तरी जॉन डियाझ (केप वर्दे), सॅन्टोस एलिझोन्डो (मेक्सिको), सॅम्युएल क्रिकोरियन (पॅलेस्ताईन), जे. आय. नागामात्सु (जपान), आणि रॉबर्ट चुंग (कोरीया) हे आद्य राष्ट्रीय पुढारी होते.

दुसऱ्या महायुध्दानंतर “आत्म्यांकरिता मध्य-शतकिय चळवळ” जागतिक सुवार्ताप्रसाराकरिता नवीन चैतन्य निर्माण करून गेली. गृह मिशन कार्य उत्तर अमेरिकेत पसरले. नवीन खंडांमध्ये नवीन क्षेत्रे उघडी झाली. १९७० मध्ये शहरी सुवार्ताप्रसार कार्याने शहरांना सेवाकार्याचा प्राथमिक बिंदूमार्ग म्हणून लक्षात घेण्यास मंडळीला भाग पाडले. शहरी सेवाकार्याचे नवीन प्रकार विकसित झाले आणि १९८० मध्ये मंडळीने “शहरांवर भार” हा नवीन आंतरराष्ट्रीय जोर स्वीकारला. १९९० मध्ये पौर्वात्य युरोपात मंडळीने प्रवेश केला. नॅझरीन पूर्व आफ्रिकन संजीवनामध्ये भाग घेतात आणि बांगलादेश

सारख्या वैविध्यपूर्ण देशांमध्ये सेवा करतात, जेथे २४ मार्च २०१० रोजी एकाच सभेमध्ये १९३ सेवकांची सेवाकार्याकरिता दिक्षा झाली-ख्रिस्तीत्वाच्या इतिहासामधील ही एक लक्षणीय घटना आहे.

**दयार्थ सेवा.** सुरूवातीच्या नॅझरीनांनी भारतामध्ये दुष्काळग्रस्तांना साह्य करणे, अनाथालये स्थापन करणे, अविवाहित मुली व स्त्रियांसाठी प्रसुतिगृहे उभारणे आणि शहरी सेवाकार्याद्वारे व्यसनाधिन आणि बेवारसांची सेवा करून देवाच्या कृपेची साक्ष दिली. १९२० मध्ये मंडळीचे सामाजिक सेवा प्राधान्य औषधाकडे वळले कारण चायना आणि स्वाझिलँडमध्ये दवाखाने बांधल्या गेली व नंतर भारत आणि पापुआ न्युगिनी मध्ये सुध्दा दवाखाने बांधण्यात आली. नॅझरीन वैद्यकिय तज्ञांनी आजाऱ्यांची काळजी घेतली, शस्त्रक्रिया केल्या, परिचारिकांना प्रशिक्षित केले आणि जगातल्या सर्वात जास्त गरीब लोकांकरिता फिरते रूग्णालय प्रायोजित केले. आफ्रिकेतील कुष्ठरोग चिकित्सालयासारखी विशेष चिकित्सालये प्रस्थापित केली. १९८० मध्ये निर्मित नॅझरीन दयार्थ सेवाकार्यामुळे सामाजिक सेवांच्या विस्तृत पल्ल्याला परवानगी मिळाली, जी आजही टिकून आहेत. त्यापैकीच काही म्हणजे बाल प्रायोजकता, नैसर्गिक आपत्ती निवारण, एड्स बाबत शिक्षण, अनाथांना साहाय्य, पाणी प्रकल्प आणि अन्न वितरण.

**शिक्षण सेवा.** नॅझरीन रविवारची शास्त्रशिक्षण शाळा आणि शास्त्राभ्यास वर्ग हे मंडळी जीवनाचा नेहमीच भाग राहिलेले आहेत आणि ख्रिस्तसादृष्य शिष्य बनविण्यामध्ये फारच महत्वाची भुमिका निभावतात. मंडळीने, प्राथमिक शिक्षण आणि साक्षरता कार्यात १९०५ मध्ये प्रस्थापित कलकत्याच्या होप स्कुल ऑफ गर्ल्स च्या सुरूवातीच्या काळापासूनच गुंतवणूक केलेली आहे. जगभरातील नॅझरीन शाळा लोकांना सामाजिक, आर्थिक, आणि धार्मिक जीवनामध्ये संपूर्णत: सहभागी होण्यासाठी तयार करतात. अमेरिकेतील बहुतांश सुरूवातीच्या नॅझरीन महाविद्यालयांमध्ये २०व्या शतकाच्या मध्यापर्यंत प्राथमिक व माध्यमिक शाळा जोडलेल्या होत्या. नॅझरीनच्या जनकांनी उच्च शिक्षणामध्ये महत्वपूर्ण गुंतवणूक केली. त्यांचा असा विश्वास होता की हे शिक्षण पाळकांच्या आणि इतर ख्रिस्ती कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाकरिता आणि सामान्य सभासदांना घडविण्याकरिता आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाकडे जगभरातील ५३ नॅझरीन उच्च शिक्षण संस्थांची सुची आहे. ह्यामध्ये, आफ्रिका, कॅनडा, कोरीया, स्वाझीलँड, त्रिनिदाद, आणि युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरीकेतील कला महाविद्यालये आणि विद्यापिठे, ३० बायबल कॉलेज आणि शाळा, भारत आणि पॉपुआ

न्युगिनी येथील नर्सिंग कॉलेजेस, ऑस्ट्रेलिया, कोस्टारिका, इंग्लंड, फिलिपाईन्स, आणि अमेरिकेतील ईश्वरविज्ञान महाविद्यालये, सुध्दा आहेत.

गत वर्षांमध्ये चर्च ऑफ दी नॅझरीन हे जागतिक उपस्थिती असणाऱ्या मंडळीपासून विश्वासणाऱ्यांचा जागतिक समूह बनलेला आहे. वेस्लीय परंपरेमध्ये मुळावलेले असे नॅझरीन स्वत:ला ख्रिस्ती, पवित्रतेवर विश्वास ठेवणारे आणि सुवार्ताप्रसारकीय असे समजतात व त्यांनी "राष्ट्रांमध्ये ख्रिस्तसादृष्य शिष्य तयार करणे" हे आपले मिशन विधान म्हणून स्वीकारलेले आहे.

## मंडळीचे शासन संस्थात्मक तक्ता (तपशिलासह)

जागतिक चर्च ऑफ दी नॅझरीन
घटणा आणि शासन नियमावली - बंधारण पुस्तक परिच्छेद २२-२७

### चतुर्वार्षिक प्रमुख परिषद

जागभरातील प्रांतांमधून सैध्दांतिक आणि वैधानिक अधिकारयुक्त प्रतिनिधी
परिच्छेद २५-२५.८

### प्रमुख शासन

परिच्छेद ३००

### प्रांतिक शासन

परिच्छेद २००

### स्थानिक शासन

परिच्छेद २२.३, २३, १००

### प्रमुख मंडळ

परिच्छेद ३३५
(प्रमुख परिषदांमधील कालावधीतील जागतिक मंडळीच्या सेवाकार्य धोरण व विश्वस्थ प्रकरणांकरिता प्रमुख परिषदेच्या प्रतिनिधिंद्वारे निवडून दिलेले संस्था मंडळ )

## प्रमुख अध्यक्ष

परिच्छेद ३०६-३०७.१६ (जागतिक मंडळीचे सेवाकार्य चालविण्याकरिता; प्रमुख मंडळ व प्रांतिक परिषदांचे अध्यक्षपद भुषविण्याकरिता; सेवाकार्याच्या उद्दिष्टांना पुढारीपण देण्याकरिता प्रमुख परिषदेने निवडून दिलेले)

## प्रांतिक परिषद

परिच्छेद २४, २००

(सेवकांच्या दिक्षा करण्याकरिता, प्रांताध्यक्ष, अधिकारी, आणि विविध मंडळांची निवड करण्याकरिता स्थानिक मंडळ्यांच्या प्रतिनिधिंनी वार्षिकरित्या एकत्र भेटणे)

## स्थानिक मंडळी

परिच्छेद २३, १०० (पाळक व स्थानिक पंचमंडळ निवडणे)

## प्रांताध्यक्ष

परिच्छेद २२.२, २०८, २११-२१३.१

(प्रांतिक परिषदेद्वारे आध्यात्मिक, आर्थिक आणि पाळकीय प्रकरणांमध्ये पुढारीपण देण्याकरिता प्रांतिक परिषदेने निवडलेला)

## प्रांतिक मंडळे

परिच्छेद २२४

(सल्लागार, सेवकीय परवाना, सेवकीय अभ्यास व इतर प्रांतिक मंडळे आणि अधिकारी)

## स्थानिक पंच मंडळ

परिच्छेद १२७-१२७.१, १२९-१३०

(स्थानिक मंडळीच्या पैशांचे व्यवस्थापन करण्याकरिता आणि स्थानिक मंडळीच्या जीवन व कार्याशी संबंधित सर्व इतर प्रकरणांचा कार्यभार सांभाळण्याकरिता स्थानिक मंडळीने निवडून दिलेले)

## पाळक

परिच्छेद ११५, ५१४-५२२ (स्थानिक मंडळीची देखरेख करण्याकरिता स्थानिक मंडळीने निवडलेला, पंच मंडळाने सुचविलेला आणि प्रांताध्यक्षांद्वारे मान्य केलेला)

# भाग २रा

# मंडळीची घटना

**प्रास्ताविक सिध्दांतकलमे मंडळी**
**संस्थेचे नियम आणि शासन दुरूस्ती**

## मंडळीच्या घटनेचे प्रास्ताविक

आम्हाला आमचा ईश्वरदत्त वारसा म्हणजेच पवित्र जनांना एकदाच सोपवून दिलेला विश्वास, विशेषत: संपूर्ण पवित्रीकरणाचा सिध्दान्त व अनुभव म्हणजे कृपेचे दुसरे कार्य जतन करता यावे आणि देवराज्य वाढिच्या कार्यात येशू ख्रिस्ताच्या मंडळीच्या इतर शाखांबरोबर परिणामकारकपणे सहकार्य करता यावे याकरिता आम्ही, चर्च आफ दी नॅझरीनचा सेवकवर्ग आणि सामान्य सभासद, आम्हांमध्ये प्रस्थापित केलेल्या घटनात्मक कायद्याच्या तत्वानुसार चर्च आफ दी नॅझरीनचा मूलभूत कायदा अथवा घटना म्हणून विश्वासाची सिध्दांतकलमे, ख्रिस्ती चरित्राचा करार आणि संस्थेचे नियम व शासन लावून देतो, मंजूर करतो व जाहीर करतो ती येणेप्रमाणे:

## विश्वासाची सिध्दांतकलमे

टिप- पवित्रशास्त्र संदर्भ हे विश्वासाच्या सिध्दांतकलमांना पूरक असून १९७६ च्या प्रमुख परिषदेने केलेल्या ठरावानुसार येथे नमूद केलेली आहेत परंतु त्यांना घटनेच्या मजकुराचा भाग समजण्यात येत नाही.

### १. त्र्येक देव

देव एकच अनादि, अनंत, अमर्याद, विश्वाचा उत्पन्नकर्ता व नियंता असून तो स्वभाव गुण व हेतू यासंबंधाने पवित्र आहे. देव हा पवित्र-प्रीती आणि प्रकाश आहे व त्याचे मुलभूत व्यक्तीत्व त्र्येक असून पिता, पुत्र व पवित्र आत्मा असे प्रकट झाले आहे, असा आम्ही विश्वास ठेवतो.

(उत्पत्ती १, लेवीय १९:२; अनुवाद ६:४-५; यशया ५:१६; ६:१-७; ४०:१८-३१; मत्तय ३:१६-१७; २८:१९-२०; योहान १४:६-२७; १ करिंथ ८:६; २ करिंथ १३:१४; गलती ४:४-६; इफिस २:१३-१८; १ योहान १:५; ४:८)

### २. येशू ख्रिस्त

येशू ख्रिस्त, जो ईश्वरी त्र्येकातील दुसरी व्यक्ती आहे, तो अनादिकालापासून देवपित्याबरोबर एक होता, तो पवित्र आत्म्याने देहधारी झाला व कुमारी मरीयेच्या उदरी जन्मास आला, अशा प्रकारे दोन समग्र आणि परिपूर्ण स्वभाव म्हणजेच देवत्व आणि मनुष्यत्व एकाच व्यक्तीमध्ये संयुक्त झाले असून तो प्रत्यक्ष देव व प्रत्यक्ष मानव, देव-मानव आहे, असा आम्ही विश्वास ठेवतो.

येशू ख्रिस्त आमच्या पापांसाठी मरण पावला, तो खरोखर मरणातून जिवंत झाला आणि त्याने आपला स्वत:चा देह पुन्हा धारण केला, त्याबरोबरच मानवी स्वभाव सकल परिपूर्ण होण्यास आवश्यक ते सर्व गुणही त्याने पुन्हा धारण केले आणि या सर्वांसह त्याने स्वर्गात आरोहण केले व तेथे तो आमच्यासाठी मध्यस्थीचे कार्य करीत आहे, असा आम्ही विश्वास ठेवतो.

(मत्तय १:२०-२५; १६:१५-१६; लूक १:२६-३५; योहान १:१-१८; प्रेषित २:२२-३६; रोम ८:३, ३२-३४; गलती ४:४-५; फिलिप्पै २:५-११; कलस्सै १:१२-२२; १ तीमथ्य ६:१४-१६; इब्री १:१-५; ७:२२-२८; ९:२४-२८; १ योहान १:१-३; ४:२-३, १५)

## ३. पवित्र आत्मा

पवित्र आत्मा, जो ईश्वरी त्र्येकातील तिसरी व्यक्ती आहे, तो ख्रिस्ताच्या मंडळीमध्ये व मंडळीबरोबर उपस्थित राहून प्रभावीरित्या कार्यशील आहे. तो पापासंबंधाने जगाची खात्री पटवतो. पश्चाताप करून विश्वास ठेवणाऱ्यांना तो नवा जन्म देतो, विश्वासणाऱ्यांचे पवित्रीकरण करतो आणि त्यांना येशूमध्ये असलेल्या सर्व सत्यामध्ये चालवतो, असा आम्ही विश्वास ठेवतो.

(योहान ७:३९; १४:१५-१८; १६:७-१५; प्रेषित २:३३; १५:८-९; रोम ८:१-२७; गलती ३:१-१४; ४:६; इफिस ३:१४-२१; १ थेस्सल ४:७-८; २ थेस्सल २:१३; १ पेत्र १:२; १ योहान ३:२४; ४:१३)

## ४. पवित्र शास्त्रलेख

पवित्र शास्त्रलेखांच्या पूर्ण दैवी प्रेरणेवर आमचा विश्वास आहे. यावरून आम्हाला कळते की जुन्या व नवीन करारातील एकूण ६६ पुस्तके दैवी प्रेरणेने देण्यात आली असून त्यामध्ये आमच्या तारणासंबंधी आवश्यक अशा सर्व गोष्टींबाबत देवाची इच्छा अचूकपणे प्रकट केली आहे, असा आमचा विश्वास आहे. म्हणून त्यामध्ये जे दिलेले नाही ते विश्वासाचे सिध्दांत कलम म्हणून बंधनकारक ठेवता येणार नाही.

(लूक २४:४४-४७; योहान १०:३५; १ करिंथ १५:३-४; २ तीमथ्य ३:१५-१७; १ पेत्र १:१-१२; २ पेत्र १:२०-२१)

## ५. मूळ पाप व व्यक्तीगत पाप

आमचे आद्य मातापिता ह्यांनी केलेल्या आज्ञाभंगामुळे पाप या जगामध्ये आले आणि पापामुळे मरण आले. पाप दोन प्रकारचे आहे. (१) मूळ पाप किंवा भ्रष्टता आणि (२) प्रत्यक्ष किंवा व्यक्तीगत पाप, असा आमचा विश्वास आहे.

**५.१.** मूळ पाप किंवा भ्रष्टता म्हणजे आदामाच्या सर्व संततीचा स्वभावधर्म बिघडल्याचे लक्षण होय. आमचे आद्य मातापिता घडले गेले तेव्हा त्यांची जी शुध्द अवस्था होती किंवा मूळचे नीतिमत्व होते, त्यापासून प्रत्येक जण दुरावला आहे. परिणामी प्रत्येकाने ईश्वराकडे पाठ फिरवली आहे. प्रत्येकाचे आध्यात्मिक जीवन संपुष्टात आले आहे आणि प्रत्येकाचाच कल सातत्याने पापाकडे आहे, असा आमचा विश्वास आहे. नव्याने जन्म झालेल्यांच्या

नवीन जीवनातही मूळ पाप अस्तितत्वात असते व पुढे पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याने त्याचे निर्मूलन होते, असाही आमचा विश्वास आहे.

**५.२.** मूळ पाप व प्रत्यक्ष व्यक्तीगत पापकृती यामध्ये भिन्नता आहे. मूळ पापामुळे प्रत्यक्ष पाप करण्याची वृत्ती ही वारशानेच आलेली आहे. या पापाचा परिहार व्हावा म्हणून देवाने योजिलेल्या उपायाकडे दुर्लक्ष केले किंवा तो फेटाळून लावला, तर मात्र या पापाचा जाब द्यावा लागतो असा आमचा विश्वास आहे.

**५.३.** प्रत्यक्ष अथवा व्यक्तीगत पाप म्हणजे नैतिक दृष्ट्या जबाबदार अशा व्यक्तीने देवाच्या माहीत असलेल्या नियमांचे स्वेच्छेने केलेले उल्लंघन होय, असा आमचा विश्वास आहे. अजाणतेने, अपरिहार्य न्युनता, अशक्तपणा, दोष, चुका, अपयश किंवा परिपूर्ण वर्तनाच्या प्रमाणापासून विचलित होणे, हे सर्व पतनाचे अवशिष्ट परिणाम आहेत. तथापि अशा अजाणतेपणे घडलेल्या गोष्टींचा संबंध ख्रिस्ताच्या आत्म्याविरूध्द असणाऱ्या कृतिंशी आणि विचारांशी नाही. ख्रिस्ताच्या आत्म्याविरूध्द असणाऱ्या कृती आणि विचार ह्यांना आत्मिक पापे असे म्हणता येईल. व्यक्तीगत पाप मूळत: व तत्वत: प्रीतीच्या नियमाचे उल्लंघन आहे आणि ख्रिस्ताच्या संदर्भात पाप म्हणजे अविश्वास अशी व्याख्या करता येईल. असा आमचा विश्वास आहे.

(**मुळ पाप:** उत्पत्ती ३; ६:५; ईयोब १५:१४; स्तोत्र ५१:५; यिर्मया १७:९-१०; मार्क ७:२१-२३; रोम १:१८-२५; ५:१२-१४; ७:१-८:९; १ करिंथ ३:१-४; गलती ५:१६-२५; १ योहान १:७-८;

**व्यक्तीगत पाप:** मत्तय २२:३६-४०(१ योहान ३:४ सोबत); योहान ८:३४-३६; १६:८-९; रोम ३:२३; ६:१५-२३; ८:१८-२४; १४:२३; १ योहान १:९-२:४; ३:७-१०)

## ६. प्रायश्चित्त

येशू ख्रिस्ताने दु:ख सहन, स्वत:चे रक्त सांडणे आणि वधस्तंभावरील मरण ह्याद्वारे अखिल मानवजातीच्या पापाचे पूर्ण प्रायश्चित्त केले. हे प्रायश्चित्त हा तारणाचा एकमेव आधार आहे. तसेच ते आदामाच्या वंशातील प्रत्येकास पुरेसे आहे. असा आमचा विश्वास आहे. ज्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव नाही आणि जी बालके अजाण आहेत त्यांच्या तारणासाठी हे प्रायश्चित्त कृपेने परिणामकारक ठरते, परंतु बरेवाईट समजण्याच्या

वयात आलेल्या व्यक्तींनी पश्चाताप करून विश्वास ठेवल्यावरच हे प्रायश्चित्त कृपेने परिणामकारक ठरते असा आमचा विश्वास आहे.

(यशया ५३:५-६; मार्क १०:४५; लूक २४:४६-४८; योहान १:२९; ३:१४-१७; प्रेषित ४:१-१२; रोम ३:२१-२६; ४:१७-२५; ५:६-२१; १ करिंथ ६:२०; २ करिंथ ५:१४-२१; गलती १:३-४; ३:१३-१४; कलस्सै १:१९-२३; १ तीमथ्य २:३-६; तीत २:११-१४; इब्री २:९; ९:११-१४; १३:१२; १ पेत्र १:१८-२१; २:१९-२५; १ योहान २:१-२)

## ७. पूर्वापारची कृपा

आमचा असा विश्वास आहे की, येशू ख्रिस्ताच्या द्वारे देवाची कृपा सर्व मानवांना विनामुल्य बहाल केली आहे. या कृपेमुळे पापापासून माघारे वळून नीतीने जगू इच्छिणाऱ्या प्रत्येकाला शक्ति मिळते. परिणामी पापक्षमा व पापशुध्दी या साठी येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवता येतो आणि त्याच्या दृष्टीने योग्य व त्याला संतोष देणारी अशी चांगली कामे हातून घडतात. मानवाला देवाच्या प्रतिरूपाचे असे निर्माण केले, तेव्हा त्याला बरेवाईट ओळखण्याची शक्तीही मिळाली, म्हणजेच त्याच्यावर नैतिक जबाबदारी आली. आदामाच्या पतनामुळे तो भ्रष्ट झाला. आता त्याच्या अंगी स्वत:च्या शक्तीने व कृतीने माघारे वळून विश्वासाने देवाचा धावा करण्याचे त्राण उरलेले नाही असा आमचा विश्वास आहे.

(**देवसदृष्यता व नैतिक जबाबदारी:** उत्पत्ती १:२६-२७; २:१६-१७; अनुवाद २८:१-२; ३०:१९; यहोशवा २४:१५; स्तोत्र ८:३-५, यशया १:८-१०; यिर्मया ३१:२९-३०; यहेज्केल १८:१-४; मीखा ६:८; रोम १:१९-२०; २:१-६; १४:७-१२; गलती ६:७-८;

**स्वाभाविक दुर्बलता:** ईयोब १४:४; १५;१४; स्तोत्र १४:१-४; ५१:५; योहान ३:६अ; रोम ३:१०-१२; ५:१२-१४, २०अ; ७:१४-२५

**विनामूल्य कृपा व विश्वासाची कृती:** यहेज्केल १८:२५-२६; योहान १:१२-१३; ३:६ब; प्रेषित ५:३१; रोम ५:६-८,१८; ६:१५-१६,२३; १०:६-८; ११:२२; १ करिंथ २:९-१४; १०:१-१२; २ करिंथ ५:१८-१९; गलती ५:६; इफिस २:८-१०; फिलिप्पै २:१२-१३; कलस्सै १:२१-२३; २ तीमथ्य ४:१०अ;

तीत २:११-१४; इब्री २:१-३; ३:१२-१५; ६:४-६; १०:२६-३०; याकोब २:१८-२२; २ पेत्र १:१०-११; २:२०-२२)

## ८. पश्चाताप

पश्चाताप करणाऱ्यांना देवाचा आत्मा कृपेने अंतःकरणात अनुताप व दयेची आशा देऊन साहाय्य करतो जेणेकरून पापक्षमा मिळविण्यासाठी, आध्यात्मिक जीवन जगण्यासाठी ते विश्वास ठेवतील. पश्चाताप म्हणजे पापाकडे होणाऱ्या सहजप्रवृत्तीचा मनापासून त्याग करणे. यात स्वतःच्या पापदोषाची जाणीव होणे आणि स्वेच्छेने पापापासून माघारे वळणे यांचा समावेश आहे. जे कोणी कृतीने हेतुपूर्वक देवाविरूध्द पाप करून पापी बनले आहेत अशा सर्वांनी पश्चाताप केलाच पाहिजे. असा आमचा विश्वास आहे.

सर्व लोक देवाच्या कृपेपासून ढळून भ्रष्ट होऊ शकतात आणि आपल्या पापाचा पश्चाताप न केल्यास ते सर्वकालच्या नाशाप्रत जातात त्यांना कसलीच आशा नाही. नवा जन्म झालेल्यांनी पुन्हा पापाकडे वळण्याची गरज नाही परंतु ते आपल्यात वस्ती करून आपण देवाची लेकरे आहोत अशी साक्ष देणाऱ्या पवित्र आत्म्याच्या साहाय्याने देवाशी अखंड सहभागीतेत जीवन जगू शकतात. आमचा असा विश्वास आहे

(२ इति. ७:१४; स्तोत्र ३२:५-६; ५१:१-१७; यशया ५५:६-७; यिर्मया ३:१२-१४; यहेज्केल १८:२०-३२; ३३:१४-१६; मार्क १:१४-१५; लूक ३:१-१४; १२:१-५; १८:९-१४; प्रेषित २:३८; ३:१९; ५:३१; १७:३०-३१; २६:१६-१८; रोम २:४; २ करिंथ ७:८-११; १ थेस्सल १:९; २ पेत्र ३:९)

## ९. न्यायीकरण, पुनरूज्जिवन व दत्तकपण

न्यायीकरण ही देवाच्या कृपेची व न्यायीपणाची कृती आहे. जिच्याद्वारे ख्रिस्तावर विश्वास ठेऊन त्याला प्रभू व तारणारा म्हणून स्वीकारणाऱ्याला देव त्याच्या सर्व अपराधांची क्षमा करतो आणि केलेल्या पापांच्या शिक्षेपासून पूर्णपणे मुक्त करून नीतिमान म्हणून स्वीकारतो.

**९.१.** पुनरूज्जिवन किंवा नवा जन्म हे देवाच्या कृपेचे कार्य आहे. याद्वारे पश्चाताप करून विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तीचा नैतिक स्वभाव आध्यात्मिकरित्या चेतवण्यात येतो आणि तिला विश्वास, प्रीती आणि आज्ञापालन हे सर्व करण्यास समर्थ असे आध्यात्मिक जीवन देण्यात येते. असा आमचा विश्वास आहे.

**९.२.** दत्तकपण देवाच्या कृपेनेच प्राप्त होते. या कृतीने नीतिमान ठरवलेला आणि नव्याने जन्मलेला विश्वासणारा देवाचे मूल या संज्ञेस पात्र होतो असा आमचा विश्वास आहे.

**९.३.** न्यायीकरण, पुनरूज्जीवन आणि दत्तकपण लाभणे यांचा अनुभव देवाचा शोध करणाऱ्यांना एकाच वेळी येतो. हा अनुभव येण्यासाठी विश्वास आवश्यक आहे व विश्वासापूर्वी पश्चाताप होणे गरजेचे आहे. या कृपेच्या कार्याला व स्थितिला पवित्र आत्मा साक्षी आहे. असा आमचा विश्वास आहे.

(लूक १८:१४; योहान १:१२-१३; ३:३-८; ५:२४; प्रेषित १३:३९; रोम १:१७; ३:२१-२६,२८; ४:५-९, १७-२५; ५:१,१६-१९; ६:४; ७:६; ८:१, १५-१७; १ करिंथ १:३०; ६:११; २ करिंथ ५:१७-२१; गलती २:१६-२१; ३:१-१४,२६; ४:४-७; इफिस १:६-७; २:१,४-५; फिलिप्पै ३:३-९; कलस्सै २:१३; तीत ३:४-७; १ पेत्र १:२३; १ योहान १:९; ३:१-२,९; ४:७; ५:१,९-१३,१८)

## १०. ख्रिस्ती पवित्रता आणि संपूर्ण पवित्रीकरण

पवित्रीकरण हे देवाचे असे कार्य आहे जे विश्वासणाऱ्याला ख्रिस्तसदृष्यतेत परिवर्तित करते. हे देवाच्या कृपेने पवित्र आत्म्याद्वारे प्राथमिक पवित्रीकरणात किंवा पुनरूज्जीवनात (न्यायीकरणासोबतच घडणारे), संपूर्ण पवित्रीकरणात आणि पवित्र आत्म्याच्या सततच्या परिपूर्ण करण्याच्या कृतीने गौरवीकरणात कळस गाठून घडते. गौरवीकरणात आपण देवाच्या पुत्राच्या प्रतिमेशी पूर्णत: समरूप होतो. असा आमचा विश्वास आहे.

पवित्रीकरण देवाची अशी कृती आहे जी पुनरूज्जीवनानंतर होते व त्याद्वारे विश्वासणारे मुळ पापापासून किंवा भ्रष्टते पासून मुक्त होतात आणि देवाला संपूर्णत: समर्पित स्थितीत आणि परिपूर्ण बनविलेल्या प्रीतीच्या पवित्र आज्ञापालनात आणली जातात.

हे पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याद्वारे किंवा त्याच्या भरण्याद्वारे घडते. ह्यामध्ये दोन अनुभव सामावलेले आहेत: पापापासून अंत:करण धुतल्या जाणे आणि आपल्यामध्ये पवित्र आत्म्याची वस्ती होणे. संपूर्ण पवित्रीकरण विश्वासणाऱ्याला जीवन जगण्यासाठी व सेवेसाठी समर्थ करते. संपूर्ण पवित्रीकरण येशू ख्रिस्ताच्या रक्ताद्वारे पुरविले गेले आहे, आणि ते विश्वासाद्वारे कृपेने क्षणार्धात घडते, ते संपूर्ण समर्पणानंतर होते व ह्या कार्याबाबत आणि कृपेच्या स्थितीबाबत पवित्र आत्मा साक्ष देतो.

या अनुभवाला दिलेल्या वेगवेगळ्या नावावरून त्याची विविध अंगे व्यक्त होतात. काही नावे अशी - " ख्रिस्ती परिपूर्णता," "परिपूर्ण प्रीती," "अंत:करणाची शुध्दता," "पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा किंवा पवित्र आत्म्याद्वारे भरणे," "आशीर्वादांची परिपूर्ती," आणि "ख्रिस्ती पवित्रता."

**१०.१.** शुध्द अंत:करण आणि परिपक्व चारित्र्य यात स्पष्ट फरक आहे. शुध्द अंत:करण हे क्षणार्धात लाभते. तो संपूर्ण पवित्रीकरणाचा परिणाम आहे. परिपक्व चारित्र्य लाभणे हा कृपेत वाढ होण्याचा परिणाम आहे. असा आमचा विश्वास आहे.

संपूर्ण पवित्रीकरणाच्या कृपेमध्ये ख्रिस्तसदृष्य शिष्य म्हणून वाढण्याकरिता आवश्यक दैवी प्रेरणा सामावलेली आहे. तथापि या प्रेरणेची जाणीवपूर्वक जोपासना केली पाहिजे आणि आध्यात्मिक विकासासाठी आवश्यक गोष्टींकडे काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे व आध्यात्मिक विकासाची प्रक्रिया, चारित्र्य व व्यक्तीत्व सुधारून ते ख्रिस्तसदृष्य होत आहे याकडेही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. अशा प्रकारे जाणीवपूर्वक प्रयत्न न केले तर एखाद्याच्या साक्षीवर त्याचा विपरीत परिणाम होऊन कृपाही विफल होऊन अखेर नाहीशी होईल.

कृपेच्या साधनांमध्ये विशेषत: मंडळीची सहभागीता, शिस्त आणि संस्कार ह्याद्वारे विश्वासणारा कृपेत व देवावरील आणि शेजाऱ्यावरील अंत:करणाच्या पूर्ण प्रीतीत वाढत जातो.

(यिर्मया ३१:३१-३४; यहेज्केल ३६:२५-२७; मलाखी ३:२-३; मत्तय ३:११-१२; लूक ३:१६-१७; योहान ७:३७-३९; १४:१५-२९; १७:६-२०; प्रेषित १:५; २:१-४; १५:८-९; रोम ६:११-१३, १९; ८:१-४,८-१४; १२:१-२; २ करिंथ ६:१४-७:१; गलती २:२०; ५:१६-२५; इफिस ३:१४-२१; ५:१७-१८, २५-२७; फिलिप्पै ३:१०-१५; कलस्सै ३:१-१७; १ थेस्सल ५:२३-२४; इब्री ४:९-११; १०:१०-१७; १२:१-२; १३:१२; १ योहान १:७,९).

(" ख्रिस्ती परिपूर्णता," "परिपूर्ण प्रीती,": अनुवाद ३०:६; मत्तय ५:४३-४८; २२:३७-४०; रोम १२:९-२१; १३:८-१०; १ करिंथ १३; फिलिप्पै ३:१०-१५; इब्री ६:१; १ योहान ४:१७-१८

"अंत:करणाची शुध्दता,": मत्तय ५:८; प्रेषित १५:८-९; १ पेत्र १:२२; १ योहान ३:३

"पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा," यिर्मया ३१:३१-३४; यहेज्केल ३६:२५-२७; मलाखी ३:२-३; मत्तय ३:११-२२; लूक ३:१६-१७; प्रेषित १:५; २:१-४; १५:८-९

"आशीर्वादांची परिपूर्ती,": रोम १५:२९;

"ख्रिस्ती पवित्रता,": मत्तय ५:१-७:२९; योहान १५:१-११; रोम १२:१-१५:३; २ करिंथ ७:१; इफिस ४:१७-५:२०; फिलिप्पै १:९-११; ३:१२-१५; कलस्सै २:२०-३:१७; १ थेस्सल ३:१३; ४:७-८; ५:२३; २ तीमथ्य २:१९-२०; इब्री १०:१९-२५; १२:१७; १३:२०-२१; १ पेत्र १:१५-१६; २ पेत्र १:१-११; ३:१८; यहूदाचे पत्र २०-२१)

**११. मंडळी**

आम्ही मंडळीवर विश्वास विश्वास ठेवतो. मंडळी म्हणजे येशू ख्रिस्त प्रभू आहे असे मान्य करणाऱ्या लोकांचा समूह. ख्रिस्तामध्ये नवे केलेले, देवाच्या कराराचे, वचनाच्या द्वारे पवित्र आत्म्याने एकत्र पाचारण केलेले ख्रिस्ताचे शरीर.

देवाने मंडळीला पाचारण केले आहे ते यासाठी की तिने तिचे जीवन ऐक्यात आणि आत्म्याच्या सहभागीतेमध्ये; देवाच्या वचनाचा उपदेश, संस्कारांचे पालन आणि त्याच्या नावातील सेवाकार्य याद्वारे झालेल्या उपासनेत जीवन व्यतीत करावे. ते ख्रिस्ताचे आज्ञापालन, पवित्र जीवन व परस्परांसबंधीची जबाबदारी ह्याद्वारे व्यक्त होते.

जगामध्ये मंडळीचे उद्दीष्ट हे की आत्म्याच्या सामर्थ्यामध्ये ख्रिस्ताच्या उध्दारकार्यात आणि समेटाच्या सेवेमध्ये सहभागी होणे आहे. मंडळी ह्या उद्दीष्टाची पूर्ती सुवार्ताप्रसार, शिक्षण, दया व्यक्त करणे, न्यायासाठी कार्य करणे आणि देवराज्याची साक्ष गाजवणे ह्या द्वारे शिष्य बनवून करते.

मंडळी ही ऐतिहासिक वास्तविकता आहे, ती संस्कृतींशी निगडीत अशा रूपात संघटीत होते - स्थानिक उपकासकांचा समुह आणि विश्वव्यापी संघटना अशी ती आहे. देवाने विशिष्ट सेवाकार्यासाठी पाचारण केलेल्या व्यक्तींना ती वेगळे करते. आमचा प्रभू येशू येईल तेव्हा सर्वच पूर्णतेस जाईल या आशेने देवाच्या अधिकाराखाली राहण्यास मंडळीला पाचारण झालेले आहे.

(निर्गम १९:३; यिर्मया ३१:३३; मत्तय ८:११; १०:७; १६:१३-१९,२४; १८:१५-२०; २८:१९-२०; योहान १७:१४-२६; २०:२१-२३; प्रेषित १:७-८; २:३२-४७; ६:१-२; १३:१; १४:२३; रोम २:२८-२९; ४:१६; १०:९-१५;

११:१३-३२; १२:१-८; १५:१-३; १ करिंथ ३:५-९; ७:१७; ११:१, १७-३३; १२:३, १२-३१; १४:२६-४०; २ करिंथ ५;११-६:१; गलती ५:६, १३-१४; ६:१-५, १५; इफिस ४:१-१७; ५:२५-२७; फिलिप्पै २:१६; १ थेस्सल ४:१-१२; १ तीमथ्य ४:१३; इब्री १०:१९-२५; १ पेत्र १:१-२, १३; २:४-१२,२१; ४:१-२,१०-११; १ योहान ४;१७; यहूदा २४; प्रकटी ५:९-१०)

## १२. बाप्तिस्मा

आमच्या प्रभूने आज्ञापूर्वक नेमून दिलेला ख्रिस्ती बाप्तिस्मा हा एक संस्कार आहे. येशू ख्रिस्ताने केलेल्या प्रायश्चित्ताच्या लाभाचा स्वीकार करणे आणि आपले ख्रिस्ताच्या शरीराशी सहभागी होणे हे त्याद्वारे सुचित होते. बाप्तिस्मा हे कृपेचे साधन असून त्याद्वारे येशू ख्रिस्तावरील विश्वास जाहीर होतो. पवित्रतेने व धार्मिकतेने आज्ञापालन करण्याचा हेतू जे जाहीर करतात त्या विश्वासणाऱ्यांसाठी हा संस्कार-विधी आहे. बाप्तिस्मा नव्या कराराचे सहभागीपण दाखविण्यासाठी लहान मुलांचा व नैतिक दृष्ट्या निरागस असणाऱ्यांचा बाप्तिस्मा त्यांचे आईवडील किंवा पालक यांच्या विनंतीवरून करण्यात यावा व त्यांना योग्य ख्रिस्ती शिक्षण देण्याचे आश्वासन मंडळीने द्यावे. बाप्तिस्म्याचा संस्कार-विधी पाणी शिंपडून, ओतून किंवा पाण्यात संपूर्ण बुडवून करण्यात येऊ शकतो.

(मत्तय ३:१-७; २८:१६-२०; प्रेषित २:३७-४१; ८:३५-३९; १०:४४-४८; १६:२९-३४; १९:१-६; रोम ६:३-४; गलती ३:२६-२८; कलस्सै २:१२; १ पेत्र ३:१८-२२)

## १३. प्रभू भोजन

आमचा प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त याने नेमून आज्ञापिलेला हा संस्कार आहे. येशू ख्रिस्ताचे जीवन, दुःखसहन, त्यागपूर्ण मरण, पुनरूत्थान, व त्याची पुन्हा येण्याची आशा हे या संस्काराद्वारे घोषित केल्या जाते. प्रभूभोजन हे कृपेचे एक साधन आहे ज्यामध्ये आत्म्याद्वारे ख्रिस्त उपस्थित असतो. प्रभू येशूवरील विश्वासाने जीवन, तारण आणि मंडळीतील एकता यामध्ये नवीन होण्यासाठी या संस्कारामध्ये सहभागी होण्याचे सर्वांना आमंत्रण आहे. या संस्काराचे महत्व आदरयुक्तरित्या स्वीकारण्यासाठी आणि प्रभू येशूचे मरण तो येईपर्यंत व्यक्त करण्यासाठी सर्वांनी ह्यामध्ये सहभागी व्हावे. ज्यांचा ख्रिस्तावर विश्वास आहे आणि त्याच्या पवित्र जनांवर प्रीती आहे त्या सर्वांना या संस्कारामध्ये शक्य

असेल तितक्या वेळेस सहभागी होण्यास ख्रिस्त आमंत्रण देतो. असा आमचा विश्वास आहे.

(निर्गम १२:१-१४; मत्तय २६:२६-३९; मार्क १४:२२-२५; लूक २२:१७-२०; योहान ६:२८-५८; १ करिंथ १०:१४-२१; ११:२३-३२)

## १४. देवाच्या सामर्थ्याने रोगनिवारण

देवाच्या सामर्थ्याने रोगनिवारण होते या पवित्र शास्त्रातील सिध्दांत तत्वावर आमचा विश्वास आहे आणि रोगी बरे व्हावेत म्हणून विश्वासाने प्रार्थना करावी असे आम्ही आमच्या लोकांना आग्रहाने आमंत्रण करतो. देव वैद्यकिय उपचारांद्वारे सुध्दा रोगनिवारण करतो असा आमचा विश्वास आहे.

(२ राजे ५:१-१९; स्तोत्र १०३:१-५; मत्तय ४:२३-२४; ९:१८-३५; योहान ४:४६-५४; प्रेषित ५:१२-१६; ९:३२-४२; १४:८-१५; १ करिंथ १२:४-११; २ करिंथ १२:७-१०; याकोब ५:१३-१६)

## १५. ख्रिस्ताचे दुसरे येणे

प्रभू येशू ख्रिस्त पुन्हा येणार आहे असा आमचा विश्वास आहे. त्याच्या आगमणसमयी जे ख्रिस्त येशूमध्ये महाणीद्रा घेत आहेत त्यांच्या पुढे आम्ही जाणार नाही. तरी जर आम्ही ख्रिस्तामध्ये असू तर उठवलेल्या पवित्र जनांबरोबर प्रभूला सामोरे जाण्यासाठी आम्ही वर अंतराळात घेतले जाऊ. आणि सदासर्वदा प्रभूजवळ राहू.

(मत्तय २५:३१-४६; योहान १४:१-३; प्रेषित १:१-११; फिलिप्पै ३:२०-२१; १ थेस्सल ४:१३-१८; तीत २:११-१४; इब्री ९:२६-२८; २ पेत्र ३:३-१५; प्रकटी १:७-८; २२:७-२०)

## १६. पुनरूत्थान, न्यायनिवाडा व भवितव्य

मृतांचे पुनरूत्थान होईल आणि धार्मिक व अधार्मिक अशा दोघांचेही देह सजिव उठवून त्यांच्या आत्म्यांबरोबर संयुक्त करण्यात येतील असा आमचा विश्वास आहे, ज्यांनी सत्कर्मे केली ते जीवनाच्या पुनरूत्थानासाठी आणि ज्यांनी दुष्कर्मे केली ते न्यायाच्या पुनरूत्थानासाठी बाहेर येतील.

**१६.१.** भाविकाळात न्यायनिवाडा होईल त्यावेळी प्रत्येक मनुष्य आपआपल्या जीवनातील कर्मानुसार न्यायनिवाडा व्हावा म्हणून देवासमोर उभा राही असा आमचा विश्वास आहे.

**१६.२.** आमचा प्रभू येशू ख्रिस्त याच्यावर तारणासाठी विश्वास ठेऊन जे त्याला आज्ञाशीलतेने अनुसरतात त्या सर्वांना गौरवी सार्वकालिक जीवनाचे आश्वासन दिले आहे, आणि जे अखेरपर्यंत पश्चाताप करणार नाहीत ते सर्व नरकात सदासर्वदा यातना भोगतील असा आमचा विश्वास आहे.

(उत्पत्ती १८:२५; १ शमुवेल २:१०; स्तोत्र ५०:६; यशया २६:१०; दानीएल १२:२-३; मत्तय २५:३१-४६; मार्क ९:४३-४८; लूक १६:१९-३१; २०:२७-३८; योहान ३:१६-१८; ५:२५-२९; ११:२१-२७; प्रेषित १७:३०३१; रोम २:१-१६; १४:७-१२; १ करिंथ १५:१२-१८; २ करिंथ ५:१०; २ थेस्सल १:५-१०; प्रकटी २०:११-१५; २२:१-१५)

## कलम २. स्थानिक मंडळ्या

**२३.** ज्यांना मंडळी स्थापन करण्याचा अधिकार आहे, अशांनी संघटीत केलेल्या सर्व व्यक्ती स्थानिक मंडळीच्या सभासद असतील. तसेच योग्य अधिकार असणाऱ्या व्यक्तींकडून या सभासदांचा जाहीरपणे स्वीकार झालेला असावा. याप्रमाणे सभासदत्व मिळविण्यापूर्वी या व्यक्तींनी आपल्या तारणाचा अनुभव, आमच्या सिध्दांतांवरील विश्वास आणि आमच्या शासनव्यवस्थेच्या अधीन राहाण्याची इच्छा सुध्दा जाहीर केलेली असावी. (१००-१०७).

## कलम ३. प्रांतिक परिषद

**२४. प्रमुख परिषद,** मंडळीच्या सभासदांना प्रांतिक परिषदेत संघटीत करील. प्रमुख परिषदेला योग्य व रास्त वाटेल त्याप्रमाणे प्रांतिक परिषदेमध्ये सामान्य सभासद व दिक्षित वर्ग ह्यांना प्रतिनिधीत्व देण्यात येईल. या प्रतिनिधींची पात्रता प्रमुख परिषद ठरवेल. मात्र सर्व नेमलेले दिक्षित सेवक हे प्रांतिक परिषदेचे सभासद राहतील. प्रमुख परिषद, प्रांतिक परिषदेचे अधिकार व कर्तव्य नेमून देईल (२००-२०७.६).

## कलम ४. प्रमुख परिषद

**२५. रचना.** प्रांतिक परिषदेने दिक्षित व सामान्य सभासदांमधून समप्रमानात निवडून दिलेले प्रतिनिधी, प्रमुख परिषदेने वेळोवेळी सूचित केल्याप्रमाणे नियुक्त होणारे पदसिध्द सभासद आणि चर्च ऑफ दी नॅझरीनच्या जागतिक सेवाकार्य समितीच्या व्यवस्थापनाखाली

कार्यरत प्रांतातील असे प्रतिनिधी जे प्रमुख परिषदेने नेमून दिलेले आहेत या सर्वांची मिळून प्रमुख परिषद संघटीत केली जाईल.

**२५.१. प्रतिनिधींची निवड.** प्रमुख परिषदेने तरतूद केल्याप्रमाणे प्रमुख परिषदेच्या अधिवेशनाच्या पूर्वी १६ महिन्यांच्या आत किंवा जिथे प्रवासासाठी प्रवेश परवाना वगैरे असाधारण तयारीची गरज आहे तेथे २४ महिन्यांचे आत प्रांतिक परिषदा प्रमुख परिषदेसाठी सेवकीय प्रतिनिधी व सामान्य प्रतिनिधी यांची समप्रमाणात संख्याधिक्य मताने निवड करतील. सेवकीय प्रतिनिधी हे चर्च ऑफ दि नॅझरीनच्या मंडळीचे नियुक्त दिक्षित सेवक असतील. प्रत्येक तिसऱ्या चरणातील प्रांतिक परिषदेला कमीत कमी एक दिक्षित व एक समान्य प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क असेल. याखेरीज प्रमुख परिषदेने प्रतिनिधीत्वाच्या ठरविलेल्या नियमांनुसार सभासदसंख्येच्या आधारे प्रांतिक परिषदेला आणखीही प्रतिनिधी निवडता येतील. प्रत्येक प्रांतिक परिषदेने उपप्रतिनिधी निवडावेत. प्रमुख प्रतिनिधींच्या संख्येच्या दुप्पटीपेक्षा जास्त उपप्रतिनिधी निवडता येणार नाहीत. ज्या परिस्थितीमध्ये प्रवासी प्रवेश परवान्यांची समस्या निर्माण होते तेथे प्रांतिक परिषद प्रांतिक सल्लागार मंडळाला जास्तीचे उपप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार देऊ शकते (२०५.२३, ३०१-३-१.१).

**२५.२. अधिकारपत्रे.** प्रमुख परिषदेसाठी जे जे प्रतिनिधी व उपप्रतिनिधी निवडण्यात आलेले आहेत, त्या प्रत्येकाला प्रत्येक प्रांतिक परिषदेचे सचिव निवड झाल्याचे प्रमाणपत्र देतील. तसेच प्रांतिक परिषदेची सभा समाप्त होताच, लागलीच अशी निवड झाल्याची प्रमाणपत्रे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सरचिटणिसांकडे पाठवावीत.

**२५.३. गणसंख्या.** प्रमुख परिषदेकरिता निवडलेल्या एकूण प्रतिनिधींच्या संख्येपेक्षा निम्म्याहून अधिक प्रतिनिधी परिषद स्थळी प्रमुख परिषदेच्या अधिकार समितीजवळ नोंदणीकृत झालेले असतील तर ती आवश्यक गणसंख्या आहे. एकदा गणसंख्येची पूर्ती झाली की, मग गणसंख्येपेक्षा कमी प्रतिनिधीसुध्दा अद्याप मंजूर न झालेले कार्यवृत्त मंजूर करून सभा तहकूब करू शकते.

**२४.४. प्रमुख अध्यक्ष.** प्रमुख परिषद चर्च ऑफ दी नॅझरीनच्या दिक्षित वडिलांमधून सहा प्रमुख अध्यक्ष मतपत्रिकेद्वारे निवडतील, आणि ह्या निवडून आलेल्या सहा प्रमुखाध्यक्षांचे मिळून प्रमुखाध्यक्ष मंडळ बनेल. प्रमुख परिषदेच्या दोन अधिवेशनांदरम्यानच्या काळात

प्रमुखाध्यक्षाचे पद रिक्त झाल्यास ते चर्च ऑफ दी नॅझरीनच्या प्रमुखमंडळाच्या दोन तृतियांश मताने भरता येईल. (३०५.२, ३१६)

**२५.५. परिषदेचा अध्यक्ष.** प्रमुखाध्यक्ष मंडळाने नेमलेला प्रमुख अध्यक्ष परिषदेच्या दैनंदिन बैठकींचे संचालन करील. परंतु याप्रमाणे कोणी प्रमुख अध्यक्ष नेमलेला नसेल किंवा उपस्थित नसेल, तर मग प्रमुख परिषद आपल्या सभासदांमधून एकाला तात्पुरता अध्यक्ष म्हणून निवडू शकेल. (३००.१)

**२५.६. कामकाज पध्दत.** प्रमुख परिषद आपली संघटना पध्दती, कार्यव्यवस्था, समित्या व इतर सर्व काम सुरळीत चालावे यासाठी आवश्यक ते नियम तयार करून स्वीकारील. प्रमुख परिषदेला तिच्या सभासदांच्या निवडणूका व पात्रतांबाबत निवाडा देण्याचा अधिकार असेल. (३००.२-३००.३)

**२५.७. प्रमुख न्यायमंडळ.** प्रमुख परिषद चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सभासदांमधून प्रमुख न्यायमंडळ निवडून नेमील व त्याची कार्यकक्षा आणि अधिकार ठरवून देईल. (३०५.७)

**२५.८. अधिकार व मर्यादा.**

(१) प्रमुख परिषदेला चर्च ऑफ दी नॅझरीनसाठी नियम-उपनियम करण्याचा अधिकार असेल. तसेच ह्या मंडळीशी संबंधीत असणाऱ्या किंवा कोणत्याही रीतीने आनुषंगिक असलेल्या विभागांसाठी नियम व पोटनियम करण्याचा अधिकार या परिषदेला आहे. मात्र असे नियम प्रस्तुत घटनेच्या विरूध्द असणार नाहीत. (३००, ३०५-३०५.८)

(२) आपला स्वत:चा पाळक निवडण्याचा स्थानिक मंडळीचा हक्क काढून घेतला जाणार नाही. मात्र यासाठी प्रमुख परिषदेने ठरवल्याप्रमाणे तिची मान्यता आवश्यक आहे. (११५)

(३) सर्व स्थानिक मंडळ्या, अधिकारी, सेवक व समान्य सभासद यांना नेहमीच रास्त व सुव्यवस्थित चौकशीचा व दाद मागण्याचा हक्क राहील

## दुरूस्त्या

**२६.** प्रमुख परिषदेच्या उपस्थित व मतदान करणाऱ्या सभासदांच्या दोन तृतियांश मताने आणि चर्च ऑफ दी नॅझरीनच्या दुसऱ्या व तिसऱ्या चरणातील दोन तृतियांश प्रांतिक परिषदांनी सहमती दिल्यास या घटनेतील तरतुदी रद्द करता येतील किंवा त्यामध्ये दुरूस्ती

करता येईल. घटनेतील प्रत्येक दुरूस्तीच्या मुद्द्यावर तिसऱ्या चरणातील किंवा दुसऱ्या चरणातील प्रांतिक परिषदेचे दोन तृतियांश मत आवश्यक आहे. प्रमुख परिषद किंवा कुठलीही तिसऱ्या किंवा दुसऱ्या चरणातील प्रांतिक परिषद असल्या दुरूस्त्या सुचविण्याबाबत पुढाकार घेऊ शकते. येथील तरतुदीप्रमाणे दुरूस्ती किंवा फेरफार मंजूर झाल्यानंतर मतदानाचा परिणाम प्रमुखाध्यक्ष मंडळ जाहीर करेल व लगेचच असे फेरफार व दुरूस्त्या पूर्णपणे अधिकृत ठरून अंमलात येतील.

**२७.** प्रमुख परिषद विश्वास कलमांमधील (परिच्छेद १-१६.२) दुरूस्त्यांच्या ठरावांची शिफारस प्रमुखाध्यक्ष मंडळाकडे अभ्यास समितीच्या परिक्षणाकरिता करेल. त्यात आपल्या मंडळीचा जागतिक स्वभाव व्यक्त करणाऱ्या, प्रमुखाध्यक्ष मंडळाने नियुक्त केलेल्या ईश्वरविज्ञानकार व दिक्षित सेवकांचा समावेश असेल. ही समिती प्रमुखाध्यक्ष मंडळाला त्यांच्या शिफारसी व ठराव सादर करतील व त्यांनंतर प्रमुखाध्यक्ष मंडळ हे प्रमुख परिषदेला त्यांचा अहवाल सादर करेल.

# भाग ३ रा

# ख्रिस्ती वर्तनुकीचा करार

**ख्रिस्ती जीवन**
**मानवी जीवनाचे पावित्र्य**
**मानवी लैंगिकता आणि विवाह**
**ख्रिस्ती कारभारीपण**
**मंडळीतील अधिकारी**
**कारभाराचे नियम**
**ख्रिस्ती वर्तनाकरिता करारनाम्यामधील दुरुस्त्या**

## A. ख्रिस्ती जीवन

**२८.** आमची सर्व पापांपासून सुटका होऊन आम्हांला ख्रिस्तामध्ये नवीन जीवन प्राप्त होते या सुवार्तेची, मंडळी अत्यानंदाने घोषणा करते. आम्ही ख्रिस्ती लोकांनी देवाच्या कृपेने "जुने ते सोडून द्यावयाचे आहे" म्हणजेच जुने आचार, विचार आणि देहाला वश असलेले जुने मन यांचा त्याग करून "नवे ते परिधान करायचे आहे"- म्हणजेच जीवन आचरणाचा नवा पवित्र मार्ग आणि ख्रिस्ताची मनोवृत्ती धारण करायची आहे. [इफिस.४:१७-२४]

**२८.१.** मंडळीचे सिद्धान्त आणि नियम अनेक देशांमध्ये, विविध संस्कृतींमध्ये सर्वांना जाहीर व्हावे, समजावे या हेतूने पवित्र शास्त्रातील सनातन तत्त्वे समकालीन समाजास यथार्थपणे लागू करावी असा चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळीचा विचार आहे. नव्या करारामध्ये पुन्हा सांगितल्याप्रमाणे दहा आज्ञा ख्रिस्ती नैतिकतेचा मूलाधार आहे व या आज्ञांचे सर्वस्वी पालन झाले पाहिजे हे आमचे ठाम मत आहे.

**२८.२.** पवित्र आत्म्याकडून प्रकाशित व मार्गदर्शित अशा सामूहिक ख्रिस्ती विवेकभावाच्या संकल्पनेचा निश्चित अर्थ व उपयोग आहे हे आम्हांला मान्य आहे. ख्रिस्तशरीराचा आंतरराष्ट्रीय आविष्कार या नात्याने चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळीवर ख्रिस्ती जीवन पवित्र नैतिकतेकडे जावे यासाठी योग्य ते सर्व करण्याची जबाबदारी आहे हे आम्ही मान्य करतो. मंडळीच्या इतिहासात आढळून येणारे नैतिक मानदंड पुढील बाबींच्याद्वारे थोडक्यात विशद केलेले आहेत. पवित्र जीवन जगण्यास ते साहायकारी व मार्गदर्शक आहेत म्हणून त्यांचे जाणीवपूर्वक, अचूकपणे पालन करण्याकडे लक्ष दिले पाहिजे. मंडळीच्या विवेकभावाचे उल्लंघन करणारे स्वतःवर आपत्ती ओढवून घेतात, तसेच मंडळीच्या साक्षीला बाधा आणतात. संस्कृती भेदानुसार व परिस्थितीनुसार यात काही फेरबदल केल्यास तसे नमूद करण्यात येईल व प्रमुख अध्यक्षमंडळाकडून अशा बदलांना मान्यता घेतली जाईल.

**२८.३.** चर्च ऑफ द नॅंझरीन, अशा नवीन आणि पवित्र जीवनाच्या मार्गावर विश्वास ठेवते की ज्यामध्ये, चालीरीती टाळून आपल्या शेजाऱ्यांचे आत्मे, मने, आणि शरीरांना पापांपासून सुटका मिळवून देण्याचे ध्येय प्रीतीच्या कार्यांद्वारे साध्य केले जाणे ह्या बाबी समाविष्ट आहेत, अंतर्भूत आहेत. पापांपासून सुटका देणाऱ्या एकाप्रकारच्या प्रीतीच्या रिंगणामध्ये प्रभु येशू ख्रिस्ताचे विशेषप्रकारचे नाते जगातील गरीबांसोबत होते आणि त्याने तसेच नाते जोपासण्याची शिष्यांना सुध्दा आज्ञा दिली होती, म्हणजे, प्रथमतः त्याच्या मंडळीने स्वतःला साधे किंवा सामान्य ठेवून संपत्ती आणि ऊधळपट्टीला महत्व देण्यापासून दूर ठेवावे आणि दुसरे म्हणजें, मंडळीने गरीब व उपेक्षिताना अन्न, वस्त्र व निवारा पुरवून त्यांची काळजी घेण्याकरिता समर्पित करावे. संपूर्ण पवित्र-शास्त्रामध्ये आणि प्रभु येशूच्या जीवन आणि उदाहरणा मध्ये परमेश्वर गरीब, सोशित, आणि जे लोक स्वतःच्या हक्कांबद्दल कसल्याचप्रकारे बोलू शकत नव्हते अशा लोकांशी स्वत:ला समरूप करण्यात व त्यांना सहाय्य करताना दिसतो. त्याचप्रमाणे, आम्ही देखील गरिबांसोबत स्वत:ला समरूप करून त्यांच्याशी एकतेमध्ये प्रवेश करावा ह्या करिता आम्हाला पाचारण केलेले आहे.

आमचा असा विश्वास आहे की, गरिबांसाठीच्या दयार्थ सेवेमध्ये उदारपणाच्या कृत्यांबरोबरच, संधी, समानता आणि न्याय ऊपलब्ध करून देण्याकरिता संघर्ष सुध्दा समाविष्ट आहे. आम्ही असाही विश्वास ठेवतो की, गरिबांची जबाबदारी स्वीकारणे, ही प्रीतीद्वारे कार्य करणाऱ्या विश्वासाचा शोध घेणाऱ्या प्रत्येक ख्रिस्ती विश्वासणाऱ्याच्या जीवनाचा अत्यावश्यक भाग आहे.

आम्ही हा विश्वास ठेवतो की ख्रिस्ती पवित्रता ही गरीब लोकांच्या सेवेपासून विभक्त केल्या जाऊ  शकत नाही. ह्यामध्ये, विश्वासणारा हा त्याच्या वैयक्तीक परिपूर्णतेच्या पलीकडे जाऊन अधिक रास्त व न्याय्य समाज आणि जगाच्या निर्मीतीकडे ओढला जातो. पवित्रता, ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांना ह्या जगातील असाध्य आर्थिक गरजा असणाऱ्या लोकांपासून स्वत:ला दूर ठेवण्याऐवजी स्वत:च्या ईच्छांबाबत तडजोड करून आपल्या जवळ असलेल्या साधनांद्वारे इतरांच्या गरजा भागविण्यासाठी आणि इतरांच्या गरजेनुसार आपल्या ईच्छा समायोजित करण्याकरिता आम्हाला प्रवृत्त करते.

(निर्गम २३:११; अनुवाद १५:७,स्तोत्र ४१:१, नीतिसूत्रे १९:१७;२१:१३; २२:९; यिर्मया२२:१६; मत्तय ९:२१; लूक १२:३३; प्रेषितांची कृत्ये २०:३५; २ करिंथ.९:६; गलती.२:१०)

**२८.४.** कोणकोणत्या गोष्टी, चालीरीती टाळाव्यात याची यादी देतांना ती कतीहि सर्वसमावेशक करण्याचा प्रयत्न केला, तरी तो अपुराच ठरणार हे आम्ही जाणतो. कारण जगामध्ये दुराचाराचे असंख्य प्रकार आहेत. नियमांच्या अक्षरापलीकडेही जाणाऱ्या दुष्टतेची जाणीव व्हावी यासाठी आमच्या लोकांनी मनोभावे पवित्र आत्म्याचे साहाय्य मागणे अगत्याचे आहे. त्याचबरोबर पुढील वचनातील बोध लक्षात ठेवून त्याप्रमाणे आचरण ठेवावे, “सर्व गोष्टींची पारख करा; चांगले ते बळकट धरा; वाइटाच्या प्रत्येक प्रकारापासून दूर राहा” (१थेस्सल ५.२१-२२).

**२८.५.** आमची नियतकालिके, आमची पुलपिटे यांच्याद्वारे आमचे पुढारी व पाळक ह्यांनी बऱ्यावाईटाची पारख करण्यास सज्ज करणाऱ्या पवित्र शास्त्रातील मूलभूत सत्यावर जोर द्यावा व लोकांची मनोभूमी तयारी करावी.

**२८.६.** समाजाचे सामाजिक व आध्यात्मिक आरोग्य तंदुरूस्त राखण्यासाठी शिक्षण हे सर्वात महत्वाचे आहे. चर्च ऑफ दी नॅझरीनच्या शाब्बाथशाळा, शाळा, बाल निगा केंद्र, प्रौढ निगा केंद्र, महाविद्यालये, ईश्वरविज्ञान शिक्षण संस्था, वगैरे शिक्षणसंस्थांनी आमचे सिध्दांत जाहीर होतील अशा प्रकारे मुले, तरूण व प्रौढ अशा सर्वांना पवित्रशास्त्रातील

तत्वे व नीतीचे मानदंड यथार्थपणे शिकवावे अशी अपेक्षा आहे. ही तत्वे सामाजिक शिक्षणाऐवजी अथवा या शिक्षणाला जोड म्हणून शिकवली जावीत. सार्वजनिक संस्थांतून मिळणाऱ्या शिक्षणाला पवित्रतेच्या शिक्षणाची घरामध्ये जोड दिली पाहिजे. ख्रिस्ती लोकांनी अशा सार्वजनिक शिक्षणसंस्थात काम करावे, तेथे आपली साक्ष द्यावी आणि या संस्थांवर देवराज्याचा प्रभाव पाडावा यासाठी त्यांना उत्तेजन दिले पाहिजे.

(मत्तय ५:१३-१४).

**२९.** पुढील प्रघात विशेषेकरून टाळावेत असे आमचे स्पष्ट मत आहे:

**२९.१. ख्रिस्ती नीतीतत्वांना बाधा आणणारे करमणुकीचे प्रकार.** आमच्या लोकांनी या तीन तत्वांनुसार आपले आचरण ठेवावे. पहिले तत्व असे - फुरसतीच्या वेळेचे ख्रिस्ती कारभारीपण. दुसरे तत्व - ख्रिस्ती कुटुंबांमध्ये उच्च कोटीच्या नीतीचे पालन करण्याची ख्रिस्ती जबाबदारी ओळखणे. कारण आम्ही भयंकर नैतिक संभ्रमाच्या दिवसामध्ये जगत आहोत ज्यामध्ये विविध माध्यमांतून वाईट गोष्टी आमच्या कुटुंबावर आक्रमण करीत आहेत. सध्याचे वाङ्मय, रेडिओ, दूरदर्शन, वैयक्तिक संगणक आणि इंटरनेट. आमच्या कुटुंबांना ऐहिक आणि जगिक बनण्यापासून राखण्याकरिता आम्ही कडक प्रतिबंध पाळणे अगत्याचे आहे. तथापि, आमचे असे स्पष्ट मत आहे की, पवित्र जीवन जगण्याकरिता मान्यता व प्रोत्साहन देणारी, पवित्रशास्त्रोक्त मुल्य गाजविणारी, विवाहाच्या प्रतीज्ञेचे पावित्र्य आणि विवाहाच्या कराराची मर्यादितता ह्यांना साहाय्य करणारी जी करमणूक आहे तिची पुष्टी करावी आणि तिला उत्तेजन देण्यात यावे. आम्ही विशेषकरून आमच्या तरुणांनी त्यांच्यामध्ये असलेल्या कला आणि प्रसार-माध्यमांसंबंधीच्या दानांचा ऊपयोग संस्कृतीच्या ह्या व्यापक भागाला सकारात्मकरित्या प्रभावित करण्यासाठी करावा म्हणून विशेष प्रोत्साहन देतो. तिसरे तत्व असे - देवाला क्षुल्लक किंवा निंदनीय ठरविणाऱ्या त्याचप्रमाणे हिंसाचार, भोगासक्ती, अश्लिलता, असभ्य-अपवित्र भाषा आणि गुढ विद्या-जादु, यासारख्या व्यावसाईक करमणकींच्या उद्योगाद्वारे त्यांच्या अनेक प्रकारामधून चित्रित केल्या जाणाऱ्या सामाजिक दुष्ट गोष्टींविरूध्द साक्ष देण्याचे बंधन आणि त्याचप्रमाणे ह्या प्रकारचे मनोरंजन पुरविणारे म्हणून ओळख असलेल्या व्यवसायांचा अंत करण्याचा प्रयत्न करणे. यामध्ये त्या सर्व मनोरंजन प्रकार व प्रसारमाध्यम निर्मिती टाळण्याचा सामावेश होतो ज्या हिंसाचार, कामुकता किंवा अश्लिलता, लैंगिकता, असभ्य-अपवित्र शब्द, आणि गुढविद्या-जादु ह्या गोष्टीं निर्मितात किंवा त्यांचा प्रसार करतात, किंवा ज्या ऐहिकता, कामुकता आणि

भौतिकवाद ह्या जगिक तत्वज्ञानाला दाखवून आकर्षक बनवितात आणि देवाच्या जीवन व हृदयाच्या पवित्रतेसंबंधीचे मानदंड कमी लेखतात अशा सर्व गोष्टींचा सामावेष होतो.

ह्यामुळे खिस्ती जीवन जगण्याच्या नैतिक मानदंडांचे शिक्षण देणे व त्यांसंबंधीचे ऊपदेश करणे अत्यावश्यक बनते आणि आमच्या लोकांना सातत्याने पवित्र जीवन जगण्याचा महामार्ग निवडण्यासाठी प्रार्थनापूर्वक विवेकाचा उपयोग करणे शिकविले गेले पाहिजे.

म्हणून आम्ही आमचे पुढारी व पाळकांना आमची नियतकालिके, आमची पुलपिटे यांच्याद्वारे अशा मूलभूत सत्यावर जोर देण्यास आमंत्रण देतो की ज्या द्वारे लोकांना ह्या माध्यमांमध्ये सापडणाऱ्या बऱ्यावाईटाची पारख करणारी तत्वे विकसित होतील.

आम्ही असे सुचवितो की, जॉन वेस्लींच्या आईने त्यांना दिलेला मानदंड, "जे काही तुमच्या तर्काला कमकुवत बनविते, तुमच्या सदसदविवेक-बुध्दीच्या कोमलतेला खराब करते, देवाप्रतीच्या भावाला अंधुक बनविते, किंवा आध्यात्मिक बाबींमधील आनंद काढून टाकते, जे काही आपल्या बुद्धीवरील शरीराचा अधिकार वाढविते, ती गोष्ट तुमच्याकरिता पाप आहे" ह्या बऱ्यावाईटाची पारख करणाऱ्या शिक्षणाचा पाया बनावा. (२८.२-२८.४, ९२६-९३१)

(रोमकरांस पत्र १४:७-१३; पहिले करिंथ १०:३१-३३; इफिस ५:१-१८; फिलिपै. ४:८-९; पहिले पेत्र १:१३-१७; दुसरे पेत्र १:३-११)

**२९.२.** लॉटरी आणि जुगाराचे ईतर सर्व प्रकार, मग ते कायदेशीर असोत वा बेकायदेशीर असोत या प्रकारांचा अंतिम परिणाम व्यक्ती व समाज दोघांनाही अतिशय कारक असतो असे मंडळीचे ठाम मत आहे.

(मत्तय ६:२४-३४; २ थेस्सल. ३:६-१३; १ तीमथ्य ६:६-११; इब्री. १३:५-६; १ योहान २:१५-१७)

**२९.३.** आणभाक करून प्रवेश देणाऱ्या रहस्यमय प्रकारच्या संस्थांत किंवा फक्त फिमेसनरी ह्या संघटने सारख्या पण तिच्यापूर्ती मर्यादीत नसणाऱ्या संघटनांचे सभासदत्व. अशाप्रकारच्या संघटनांचे स्वरूप अर्धवट धर्मपालनाचे असते, परिणामी त्यातील सहभागाने ख्रिस्ती व्यक्तीच्या समर्पणाला बाधा येते आणि गुप्ततेची शपथ घेतल्याने ख्रिस्ती व्यक्तीच्या उघड साक्ष देण्यावर बंधन येते. ११२.१ ह्या मंडळीच्या सभासदत्वाबाबतच्या कलमासोबत ह्या विषयी विचार केल्या जाईल.

(१ करिंथ १:२६-३१; २ करिंथ ६:१४-७; इफिस. ५:११-१६; याकोब. ४:४; १ योहान २:१५-१७)

**२९.४.** नृत्याचे असे सर्व प्रकार ज्यामुळे आध्यात्मिक वाढ खुंटते आणि योग्य नैतिक मर्यादा व निर्बंध तुटतात.

(मत्तय २२:३६-३९; रोम १२:१-२; १ करिंथ १०:३१-३३; फिलिपै. १:९-११; कलस्सै. ३:१-१७)

**२९.५.** मादक द्रव्याचा पेय म्हणून वापर, किंवा त्यांची तस्करी, किंवा असल्या द्रव्यांची विक्रिकेंद्रे उघडण्यास परवाना देणे किंवा त्याकरिता आपला प्रभाव किंवा मत देणे, अवैध औषधांचा वापर किंवा त्यांची तस्करी करणे, तंबाखूचा कुठल्याही स्वरूपातील ऊपयोग करणे किंवा त्याची तस्करी करणे.

पवित्र वचनच्या प्रकाशामध्ये आणि पेय म्हणून उपयोगात आणल्या जाणाऱ्या मद्यपानाच्या हाणीकारक दुष्परिणामांबाबत मानवांच्या अनुभवांच्या प्रकाशात, त्याचप्रमाणे शरीर व मनावर मद्यपान व तंबाखुच्या होणाऱ्या हाणीकारक परिणामांबाबत वैद्यकीय विज्ञानाच्या निष्कर्षांच्या प्रकाशात, एक विश्वासणारा आणि पवित्र जीवन अनुसरण्यास समर्पित समाज ह्या नात्याने आमचा विश्वास व व्यवहार हा नियंत्रणाऐवजी वर्जनाचा आहे.

पवित्र शास्त्र शिकविते की आमचे शरीर हे पवित्र आत्म्याचे मंदिर आहे. स्वतःबद्दल आणि इतरांबद्दल असणाऱ्या प्रेमपूर्वक आदरास्तव, आम्ही आमच्या लोकांना सर्व प्रकारच्या मादक पदार्थापासून पूर्णपणे दूर राहण्याकरिता सांगतो. शिवाय, आमची ख्रिस्ती-सामाजिक जबाबदारी आम्हाला इतरांना मद्यपान आणि तंबाखुची उपलब्धता कमी करण्याकरिता कोणत्याही योग्य आणि कायदेशीर मार्गाचा उपयोग करण्याकरिता आमंत्रण देते. आपल्या जगातील मादक द्रव्यांच्या गैरवापराचा व्यापक प्रादुर्भाव आमच्या मताला प्रत्यक्षात आणून इतरांकरिता साक्षीदार म्हणून उभे करण्याची मागणी करते. (९२९-९३१).

(नीतिसूत्रे २०:१; २३:२९-२४:२; होशेय ४:१०-११; हबक्कूक २:५; रोमकरांस पत्र १३:८; १४:१५-२१; १५:१-२; १ करिंथ ३:१६-१७; ६:९-१२, १९-२०; १०:३१-३३; गलती. ५:१३-१४,२१; इफिस. ५:१८)

(प्रभुभोजनाच्या संस्कारामध्ये फक्त न आंबवलेल्या द्राक्षारसाचाच वापर करावा)

**२९.६. योग्य वैद्यकीय काळजी आणि मार्गदर्शनाशिवाय ऊत्तेजक, शामक, संवेदनाभ्रमजनक व इतर मादक औषधांचा वापर.**

असल्या पदार्थांपासून असलेल्या धोक्यांबाबत वैद्यकिय पुराव्यांनी दिलेल्या रूपरेषेच्या प्रकाशात, आणि त्या सोबतच आम्ही आमचे शरीर व मन ह्यांना नियंत्रणात ठेवावे ह्या आमच्या जबाबदारीबाबत पवित्रशास्त्राच्या सूचनेच्या प्रकाशात आम्ही योग्य वैद्यकीय काळजी आणि मार्गदर्शनाबाहेर जाऊन मादक, ऊत्तेजक, शामक, संवेदनाभ्रमजनक औषधांचा वापर वर्ज करण्याचे निवडतो, मग त्या पदार्थांची कितीहि उपलब्धी असो किंवा ते कितीही कायदेशीर असोत.

(मत्तय २२:३७-३९,२७:३४; रोम. १२:१-२; १ करिंथ १६:१९-२०, ९:२४-२७)

## B. मानवी जीवनाचे पावित्र्य

**३०.** चर्च ऑफ दी नॅझरीन मानवी जीवनाच्या पवित्र्यावर विश्वास ठेवते आणि गर्भपात, गर्भ मूळ पेशींवर संशोधन, स्वेच्छा मरण, आणि अपंग किंवा वृध्दांना वाजवी वैद्यकीय सेवा देण्यास नकार देणे ह्या बाबींचा विरोध करण्यास झटते.

**३०.१. जाणूनबुजून गर्भपात.** मानवी जीवनाची पवित्रता निर्माणकर्त्या देवाने प्रस्थापित केलेली आहे आणि असले पावित्र्य हे गर्भातील बाळालासुद्धा लागू होते असा चर्च ऑफ दी नॅझरीनचा ठाम विश्वास आहे.

गर्भामध्ये वाढणाऱ्या जीवासहीत संपूर्ण मानवी जीवन हे देवाने त्याच्या प्रतीमेमध्ये निर्माण केलेले आहे आणि म्हणून त्याचे संगोपन, समर्थन आणि संरक्षण केले गेले पाहिजे. गर्भधारणेच्या क्षणापासूनच, मुल हे मानवी जीवनाच्या विकसित होणाऱ्या सर्व गुणधर्मांसहित मानव प्राणी आहे आणि हा जीव त्याच्या सततच्या विकासाकरिता मातेवर अवलंबून आहे. त्यामुळे, मानवी जीवनाला सन्मान आणि संरक्षण हे गर्भधारणेच्या क्षणापासूनच दिले पाहिजे असा आम्ही विश्वास ठेवतो. वैयक्तिक सुविधेकरिता किंवा लोकसंख्या नियंत्रणाच्या कारणास्तव कुठल्याही प्रकारच्या जाणूनबुजून केल्या जाणाऱ्या गर्भपाताला आम्ही विरोध करतो. गर्भपाताला अनुमती देणाऱ्या कायद्यांचा आम्ही विरोध करतो. हे लक्षात घेता की काही दुर्मिळ परंतु वास्तविक वैद्यकीय परिस्थितिंमध्ये आई किंवा गर्भातील बाळ किंवा दोघेही गरोदरपणात जगु शकत नाहीत, तेंव्हा गर्भधारणा

संपुष्टात आणण्याची प्रक्रिया परिपूर्ण वैद्यकीय आणि खिस्ती समुपदेशनानंतरच पूर्ण केली गेली पाहिजे.

गर्भपाताला जबाबदारीने विरोध करायचा, तर माता व मुले यांची काळजी घेण्यासाठी योग्य योजना तयार करणे व त्या अंमलात आणण्यास आपण स्वत:ला बांधून घेणे जरूरीचे आहे. अवांछित गर्भधारणेमुळे उत्पन्न होणाऱ्या बिकट पेचप्रसंगात विश्वासणाऱ्यांच्या समूहाने (यात ज्यांना या बिकट प्रसंगाची पूर्ण जाणीव आहे असेच लोक असावे) प्रीती, प्रार्थना व समुपदेशन भरपूर प्रमाणात पुरवणे जरुरीचे आहे. अशा प्रसंगांमध्ये व्यक्तींच्या साहाय्यासाठी समुपदेशन केंद्रे, गर्भवती मातांसाठी निवारागृहे आणि दत्तक देण्याची व्यवस्था करणाऱ्या ख्रिस्ती संस्थांची स्थापना किंवा मदत घेणे या सर्वांद्वारे सहकार्य आकार घेऊ शकते. लैंगिक संबंधातील जबाबदारीची ख्रिस्ती तत्त्वे नजरेआड केल्याने अवांछित गर्भधारणा समाप्त करण्यासाठी गर्भपात या साधनाचा अवलंब होतो ह्याची चर्च ऑफ दी नॅझरीनला जाणीव आहे. म्हणून मंडळीचे असे आवाहन आहे की, सभासदांनी मानवी लैंगिकतेच्या संबंधात नव्या करारातील नीतीतत्त्वांचे कठोरपणे पालन करावे आणि गर्भपाताच्या प्रश्नाचा नैतिक निर्णय घेण्यास मार्गदर्शन करणाऱ्या पवित्र शास्त्रातील व्यापक तत्त्वानुसार विचार करावा.

(ऊत्पत्ती २:७,९:६; निर्गम २०:१३, २१:१२-१६; ईयोब ३१:१५; स्तोत्र. २२:९; १३९:३-१६; यशया ४४:२, २४; ४९:५; लूक. १:२३-२५, ३६-४५; रोम. १२:१-२; १ करिंथ. ६:१६; ७:१ पुढे; १ थेस्सल. ४:३-६)

चर्च ऑफ दी नॅझरीनला जाणीव आहे की, गर्भपाताच्या शोकांतीकेचा अनेकांवर परिणाम झालेला आहे. प्रत्येक स्थानिक मंडळीला आणि प्रत्येक विश्वासणाऱ्याला असे आर्जव केल्या जाते की त्यांनी गर्भपात झालेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी देवाच्या क्षमेचा संदेश सादर करावा.

गर्भावस्था हेतुपुरस्सररित्या संपुष्टात आणल्यामुळे शारीरिक, भावनीक आणि आध्यात्मिकरित्या त्रासात असणाऱ्यांकरिता आमच्या स्थानिक मंडळया ह्या उध्दाराचा व आशेचा समुदाय असल्या पाहिजे.

(रोम. ३:२२-२४; गलती. ६:१)

## ३०.२. अनुवांशिक अभियांत्रिकी आणि जनुक उपचार.

जनुक उपचार साध्य करण्याकरिता अनुवांशिक अभियांत्रिकी पध्दतीच्या उपयोगाचे चर्च ऑफ दी नॅझरीन समर्थन करते. जनुक उपचार पध्दतीद्वारे रोगमुक्ती आणि रोग

प्रतीबंधही करता येऊ शकतो, आणि शारीरिक आणि मानसिक रोगमुक्ती व रोगप्रतिबंध केल्या जाऊ शकतो ह्याची आम्हाला जाणीव आहे. सामाजिक अन्यायांना प्रोत्साहन, व्यक्तीच्या सन्मानाकडे दुर्लक्ष किंवा इतरांवर वांशिक, बौध्दीक किंवा सामाजिक वर्चस्व (सुप्रजाजनन) प्राप्तिच्या प्रयत्नांसाठी अनुवांशिक अभियांत्रिकीच्या उपयोगाला आमचा विरोध आहे.

आम्ही डी एन ए चा असा अभ्यास सुरू करण्यास विरोध करतो की ज्याचा परीणाम जिवंत जन्माच्या संज्ञेला पर्याय म्हणून मानवी गर्भपाताला प्रोत्साहन किंवा समर्थन देते. या सर्व प्रकरणांमध्ये नम्रता, मानवी जीवनाच्या आदरनिय प्रतिष्ठेला सन्मान, देवासमोर मानवी समानता, दया आणि न्यायाला समर्पण यांनी अभियांत्रीकी आणि जनुक उपचार पध्दती चालविली जावी.

**३०.३. गर्भ मूळ पेशींवर संशोधन आणि गर्भधारणेनंतर मानवी जीवन नष्ट करणारे इतर वैद्यकीय/ वैज्ञानिक प्रयत्न.**

चर्च ऑफ दी नॅझरीन हे वैज्ञानिक समुदायांना प्रोत्साहन देते की त्यांनी प्रौढ मानवी ऊती, गर्भवेष्टण, नाळेचे रक्त, प्राण्यांचे स्रोत आणि अमानवीय गर्भस्रोत यांचा उपयोग करून मूळ पेशी तंत्रज्ञानामध्ये प्रगती करावी. ह्यामध्ये मानवी जीवनाच्या पावित्र्याचा भंग न करता अनेकांना रोगमुक्त करण्याचा हा नीतिमान अंत गाठता येतो. मानवीय गर्भ मूळ पेशी संशोधनाविषयी आमची भुमिका मानवी गर्भ म्हणजे परमेश्वराच्या प्रतीमेमध्ये एक व्यक्तीच आहे ह्या खात्रीच्या आधारे आहे. आणि म्हणून मानवीय गर्भातून निर्माण झालेल्या मूळ पेशीं संशोधनाकरिता, उपचारात्मक हस्तक्षेपांकरिता, किंवा इतर कुठल्याही कारणास्तव वापरण्याला आम्ही विरोध करतो.

जस जसे भविष्यातील वैज्ञानिक प्रगती नवीन तंत्रज्ञान उपलब्ध करून देते, तेंव्हा ते मानवी जीवनाचे पावित्र्य किंवा इतर नैतिक, आणि पवित्रशास्त्रोक्त कायद्यांचे उल्लंघन करीत नसल्यास आम्ही त्या संशोधनांचे जोरदार समर्थन करतो. तथापि, कोणत्याही उद्देशाने गर्भधारनेनंतर मानवीय जीव घेणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या संशोधनाकरिता मानवीय गर्भाला नष्ट करण्यास आम्ही विरोध करतो. ह्या दृष्टिकोणाशी सुसंगत, कोणत्याही कारणास्तव, गर्भपात झालेल्या मानवीय गर्भातुन प्राप्त ऊतींच्या वापरास आम्ही विरोध करतो.

**३०.४. मानवी क्लोनिंग.** आम्ही एखाद्या व्यक्तीच्या क्लोनिंगला विरोध करतो. देवाकरिता मानवजात अमुल्य आहे, त्याने आपल्याला त्याच्या प्रतिमेमध्ये निर्माण केलेले

आहे. आणि एखाद्या व्यक्तीचे क्लोनिंग हे त्या व्यक्तीला एक वस्तु म्हणून वागणूक देते आणि त्यामुळे आमच्या निर्मात्याने आम्हाला बहाल केलेली प्रतिष्ठा व किंमत नाकारल्या जाते.

**३०.५. स्वेच्छा मरण (वैद्याच्या सहाय्यादवारे केलेल्या आत्महत्येसहीत).** आमचा असा विश्वास आहे की स्वेच्छा मरण (जिवघेणा आजार झालेल्या व्यक्तीचे किंवा एखाद्या व्यक्तीस दुर्बळ करणारा आणि असाध्य रोग असला तरी त्याला त्वरीत जीवाचा धोकाही नाही अशा व्यक्तीचे आयुष्य हेतुपुरस्सरपणे संपविणे) हे ख्रिस्ती विश्वासाशी विसंगत आहे. हे तेव्हां लागू होते जेंव्हा जिवघेणा आजार झालेल्या व्यक्तीने स्वेच्छा मरणाची विनंती केली असेल किंवा त्याला त्याची संम्मती देण्यात येत असेल (ऐच्छिक स्वेच्छामरण) किंवा जेव्हां जिवघेणा आजार झालेला व्यक्ती मानसिकरित्या संम्मती देण्यास असक्षम असेल (अनैच्छीक स्वेच्छामरण).

आम्ही विश्वास आहे की, ख्रिस्ती मंडळीचा स्वेच्छामरणाबाबतचा ऐतिहासीक नकार हा पवित्रशास्त्राआधारे प्राप्त ख्रिस्ती विश्वासांद्वारे खात्री झालेला असून तो विश्वास मंडळीच्या येशू ख्रिस्त हा प्रभू आहे ह्या कबुलीच्या केंद्रस्थानी आहे. स्वेच्छामरण स्वत:करिता सार्वभौमत्वाचा दावा करून देवाचे मानवीय जीवनावरील सार्वभौमत्व ह्या बाबतचा ख्रिस्ती आत्मविश्वास उल्लंघतो; ते आमचे देवासमोर कारभारी म्हणून असलेल्या भुमिकेचे उल्लंघन करते; ते मानवी जीवनाला पवित्रशास्त्र जे मुल्य देते त्यांची झिज करण्यास योगदान देते; ते त्रास संपविण्याला जास्त महत्व जोडते; आणि ते कपाळू सार्वभौम देवासमोर मानवीय उध्दटपणा परावर्तित करते. आम्ही आमच्या लोकांना असे विनवितो की त्यांनी स्वेच्छा मरणाला कायदेशीर बनविण्याच्या सर्व प्रयत्नांना विरोध करावा.

**३०.६. मरण्याची परवानगी देणे.** जेंव्हा मानवी मरण निश्चितप्राय असते, तेंव्हा आमचा असा विश्वास आहे की, कृत्रीम जीवन समर्थन यंत्रणा थांबविणे किंवा तिचा वापर न करण्याला ख्रिस्ती विश्वास आणि व्यवहाराच्या कक्षेत परवानगी आहे. ही स्थिती अशा व्यक्तींना लागू होते की ज्या कायम अचेतन अवस्थेत असून ज्यांना जीवनकाळ वाढविणाऱ्या विशेष साधनांचे लागूकरण हे स्वास्थ पुनर्स्थापित होण्याची कुठलीच संयुक्तिक आशा पुरवित नाही.

आमचा असा विश्वास आहे की, जेंव्हा मरण निश्चितप्राय आहे तेव्हा ख्रिस्ती विश्वासामध्ये असे काहीच नाही की जे मरणाच्या प्रक्रियेला कृत्रिमरित्या लांबविण्याची मागणी करते.

ख्रिस्ती म्हणून आम्ही देवाच्या विश्वासूपणावर भरवसा ठेवतो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाची आशा आहे. ह्यामुळे ख्रिस्ती लोकांना मरण हे त्या ख्रिस्तावरील विश्वासाचा एक अविर्भाव म्हणून स्वीकारणे शक्य होते, कि ज्या ख्रिस्ताने आमच्या वतीने मरणावर मात करून मरणापासून विजय लुटून घेतला.

## C. मानवी लैंगिकता आणि विवाह.

**३१.** निर्माणकर्त्या देवाने आपल्या सृष्टीसाठी नेमलेल्या पवित्रतेचा व सौंदर्याचा एक आविष्कार या दृष्टीने चर्च ऑढ दी नॅझरीन मानवी लैंगिकतेकडे पाहते. कारण सर्व मानव हे देवाच्या प्रतिमेमध्ये निर्माण केलेले प्राणी असल्यामुळे, त्यांना प्रचंड मुल्य आणि किम्मत आहे. परिणामी आमचा असा विश्वास आहे की मानवी लैंगिकतेमध्ये ही लैंगिक अनुभवापेक्षा फार जास्त अर्थ सामाविष्ट असून, ती देवाकडून प्राप्त भेट आहे आणि तिची रचना आमच्या सर्वांगीण शारीरिक आणि सांबंधिक निर्मितिला परावर्तित करण्याकरिता केलेली आहे.

देवाचे पवित्र लोक या नात्याने, चर्च ऑफ दी नॅझरीन असा विश्वास बाळगते की अशी मानवी शरीर देवाकरिता महत्वाचे आहे. ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांना आपल्या शरीरामध्ये आणि

शरीरादवारे पवित्र आत्म्याच्या परीवर्तनकारी आणि पवित्रीकरण करणाऱ्या कार्याद्वारे देवाचे गौरव करण्यासाठी पाचारलेले आणि सक्षम केलेले आहे. आमची ज्ञानेंद्रिये, आमची लैंगिक वासना, आमची आनंद अनुभविण्याची क्षमता आणि इतरांसोबत जुळण्याची इच्छा ही देवाच्या स्वत:च्या चरित्रातून आकारान्वित झालेली आहेत. आमची शरीरे चांगली आहेत, खूप चांगली आहेत.

आम्ही अशा देवावर विश्वास ठेवतो की ज्याची निर्मिती ही प्रीतीचे कार्य आहे. देवाला एक पवित्र प्रीती म्हणून अनुभविल्यावर, आम्ही त्रैक्याला पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांमध्ये असलेली प्रीतीची एकता म्हणून समजून घेतो. म्हणून, आमच्या अस्तित्वाचा गाभ्यातच आम्ही इतरांशी जुळण्याच्या तलमळीसहित घडलेले आहोत. ही जेंव्हा आम्ही देवासोबत, निर्मितिसोबत, आणि आपल्या शेजाऱ्यावर आपल्यासारखीच प्रीती करण्याच्या कराराच्या नात्यात राहतो, तेंव्हा ही तळमळ पूर्ण होते. आमच्यातील इतरांशी जुळण्याची क्षमता आणि तसे करण्याची इच्छा ह्या मध्ये आम्ही देवाच्या प्रतिमेला परावर्तित करतो. देवाचे लोक हे ख्रिस्तामध्ये एक, प्रीती व कृपेचा एक संप्पन्न समाज म्हणून निर्मिलेले आहेत.

ह्या समाजामध्ये, विश्वासणाऱ्यांना ख्रिस्ताच्या शरीराचे विश्वासु सदस्य म्हणून पाचारलेले आहे. देवाच्या लोकांमधील एकटेपणाला मंडळीमधील समृध्द सहभागीता आणि संतांच्या एकत्र येण्याद्वारे मुल्य देऊन सांभाळले पाहिजे. एकटी व्यक्ती म्हणून जगणे म्हणजे, येशूने केल्याप्रमाणे, समाजाशी घनिष्ठतेमध्ये, मित्रांशी वेढलेले, जेवाणावळींसाठी इतरांचे स्वागत करणे व इतरांद्वारे स्वागत केल्या जाणे, विश्वासाच्या साक्ष व्यक्त करणे, या बाबींमध्ये समाविष्ट असणे आहे.

त्याचप्रमाणे आमची अशी खात्री आहे की या समाजामध्ये काही विश्वासणारे विवाहासाठी पाचारलेले आहेत. उत्पत्तीमध्ये परिभाषित केल्याप्रमाणे, "ह्यास्तव पुरुष आपल्या आईबापांना सोडून आपल्या स्त्रीशी जडून राहील; ती दोघे एकदेह होतील."(उत्पत्ती २:२४). विवाहाचा करार हा परमेश्वर आणि परमेश्वराचे लोक यांच्यामधील कराराचे परावर्तन आहे, हे एक अनन्य लैंगिक निष्ठा, निःस्वार्थ सेवा आणि सामाजिक साक्ष आहे. परमेश्वर ज्या प्रकारे प्रेम करतो त्याविषयी साक्ष देण्याकरिता एक पुरुष आणि एक स्त्री स्वतःला एकमेकांना वाहून घेतात. वैवाहीक घनिष्ठ संबंध हे प्रभू येशू ख्रिस्त आणि मंडळी ह्यांच्यातील ऐक्य, कृपेचे गुढ परावर्तित करण्याकरिता आहेत. देवाचा असाही हेतू आहे की, ह्या धार्मिक संस्कारात्मक एकतेमध्ये स्त्री आणि पुरूषाने लैंगिक घनिष्टतेचा आनंद व सुख अनुभवावे आणि ह्या घनिष्ट प्रीतीच्या कृतीतून एका नव्या जीवाने जगात आणि कराराच्या समाजाच्या काळजीमध्ये प्रवेश करावा. ख्रिस्त केंद्रीत घराणे आध्यात्मिक जडणघडणीचे प्राथमिक ठिकाण म्हणून कार्य केले पाहिजे. विवाहपूर्व समुपदेशन आणि विवाहाचे पावित्र्य दाखवणारे शिक्षण ह्याद्वारे विवाहाची रचना करण्याबाबत मंडळीला फार काळजी घ्यायची आहे.

परंतु, पवित्र शास्त्रोक्त कथेमध्ये, पतनामुळे मानवी इच्छेला तडा पडल्याच्या दु:खद, वाईट अध्यायाचाही समावेश आहे. त्याचा परिणाम स्वत:चे सार्वभौमत्व उंचाविण्याऱ्या वागणूकींमध्ये, इतरांना हानी पोहोंचवून त्यांना कमी लेखने आणि मानवी इच्छांचा मार्ग अंधकारमय होण्यामध्ये झाला आहे. पतित मानव ह्या नात्याने आम्ही ही दुष्टता वैयक्तिक व सामाजिक अशा प्रत्येक स्तरावर अनुभवली आहे.

पतित जगाच्या अधिपती आणि शक्तिंनी आमच्या लैंगिकतेविषयीच्या लबाड्यांनी आम्हाला व्यापून टाकले आहे. पापाने आमच्या इच्छांना पिळवटून टाकले असून आम्ही आतमध्ये स्वतःकडेच वळविले गेले आहोत. आम्ही परमेश्वराच्या प्रेमाचे उल्लंघन आणि परमेशराव्यतिरिक्त स्वतःच्या अटीनुसार जगणे ह्याबाबत स्वेच्छेने केलेल्या निवडीद्वारे निर्मितिला तडा घालण्यास हातभार लाविला आहे.

लैंगिकतेच्या क्षेत्रातील आपली भग्नता अनेक रूप धारण करते, काही आपल्या स्वतःच्या निवडीमुळे आणि काही भग्न झालेल्या जगाद्वारे. तथापि, आपल्या जीवनात खात्री, परिवर्तन आणि पवित्रीकरण आणण्याकरिता, आमच्या अशक्तपणात देवाची कृपा पुरेशी आहे. म्हणूनच, पापाच्या भग्नतेत भर घालण्यास विरोध करण्याकरिता आणि आमच्या शरीरांकरिता देवाच्या पावित्र उद्देशांचे सौंदर्य आणि अनन्यत्व आम्ही असा विश्वास बाळगतो की पवित्र आत्म्याने सक्षम बनविलेल्या ख्रिस्ताच्या शरीराच्या सभासदांनी पुढील गोष्टींपासून परावृत्त व्हावे:

**विवाहपूर्व लैंगिक समागम आणि लैंगिक संबंधांचे इतर अनुचित प्रकार.** कारण आमचा असा विश्वास आहे की, आमची लैंगिकता ही एक स्त्री आणि पुरुष यांच्यातील करारात्मक ऐक्यादवारे जगली जावी असा परमेश्वराचा आमच्या लेंगीकतेविषयी असलेला उद्देश आहे. आमचा असा विश्वास आहे की असले व्यवहार अनेकदा नात्यातील दुसऱ्या व्यक्तीला कमी लेखण्यास प्रवृत्त करतात. त्याच्या सर्व प्रकारांमध्ये, आमच्या ख्रिस्ती विवाहाच्या सौंदर्यात आणि पावित्र्यात संपूर्ण व्यक्ती ह्या नात्याने प्रवेश करण्याच्या क्षमतेला हानी पोहोचते.

- **समान लिंगाच्या व्यक्तींमधील लैंगिक क्रिया.** आमची लैंगिकता ही एक स्त्री व एक पुरूष यांच्या करारात्मक एकत्र येण्यामध्ये जगली जावी अशी देवाची इच्छा असल्याकारणाने समान लिंगाच्या व्यक्तींमधील लैंगिक घनिष्ठता ही देवाच्या मानवीय लैंगिकतेबाबत असलेल्या इच्छेच्या विरूध्द आहे असा आमचा विश्वास आहे. जरी एखाद्या व्यक्तीच्या समलैंगिक किंवा दुलैंगिक आकर्षणाचे मुळ किचकट आणि भिन्न असु शकते आणि लैंगिक शुध्दतेकरिता असलेल्या पाचारणाचा परिणाम महाग आहे तरी ह्या पाचारणाकरिता देवाची कृपा पुरेशी आहे. स्वागतार्ह, क्षमाशीलता आणि प्रीतीपूर्ण समाज बनून तिथे आतिथ्यप्रियता, प्रोत्साहन, परिवर्तन आणि जबाबदारपण उपलब्ध करून देणे हे ख्रिस्ताच्या शरीराची सामाईक जबाबदारी आहे हे आम्ही जाणतो.
- **विवाहबाह्य लैंगिक संबंध.** कारण आम्ही असे मानतो की हे वर्तन परमेश्वरासमोर दिलेल्या वचनांचे आणि ख्रिस्ताच्या शरीरांतर्गत असलेल्या कराराचे उल्लंघन आहे, व्यभिचार ही एक स्वार्थी कृती, कुटूंब विध्वंसक निवड आणि ज्याने आपल्यावर शुध्द आणि निष्ठेने प्रीती केली त्या देवाविरूध्द अपराध आहे.
- **घटस्फोट.** विवाह ही आजीवन असणारी वचनबध्दता असल्यामुळे, वैवाहिक कराराचा भंग, मग तो वैयक्तिकपणे आरंभिलेला असो किंवा जोडीदाराच्या

निवडीने झालेला असो, परमेश्वराच्या उत्तम हेतुंसमोर तोकडा पडतो. विवाह-बंधनांना जपण्यासाठी मंडळीने आवश्यक आणि शक्य तितकी काळजी घेतलीच पाहिजे आणि घटस्फोटाने जखमी झालेल्यांना समुपदेशन व कृपा प्रदान केली पाहिजे.

- **बहुपत्नित्व किंवा बहुपतित्व यांसारख्या प्रथा.** कारण आम्ही असा विश्वास ठेवतो की, देवाचा करारात्मक विश्वासुपणा हा पती आणि पत्नीचे एकपतित्व किंवा एकपत्नित्वातुन परावर्तित होतो, परंतु ह्या प्रथा विवाहामध्ये संकल्पित असलेली विलक्षण व अनन्य निष्ठा हिरावुन घेतात.

लैंगिक पाप आणि भग्नता केवळ वैयक्तिक नसून ती जगाची यंत्रणा व रचना व्यापून टाकणारी आहे. मंडळी ही देवाच्या पवित्र हेतुंचे सौंदर्य आणि अनन्यत्व ह्या वास्तविकतांची साक्षी असल्या कारणाने, आम्ही असाही विश्वास ठेवतो की, मंडळीने खालील बाबींपासून स्वतःला परावृत्त करून त्याविरोधात वकिली केली पाहिजे:

- **सर्व प्रकारची अश्लिलता म्हणजेच बिघडलेली इच्छा.** हे स्वार्थी लैंगिक समाधानासाठी लोकांना ते जणू काही वस्तुच आहेत अशा दृष्टीने कमी लेखून त्यांचा वापर करणे आहे. ही सवय आमच्या निःस्वार्थ प्रीती करण्याच्या क्षमतेला नष्ट करते.
- **बलात्कार, लैंगिक हमला, लैंगिक दंडेली, द्वेषयुक्त भाषण, वैवाहिक अत्याचार, अविवाह्य लैंगिक संबंध, लैंगिक तस्करी, सक्ती विवाह, स्त्री- जननेंद्रिय च्छेदन, अमानुषता, लैंगिक छळणूक आणि अल्पवयीन आणि इतर असुरक्षितांवर अत्याचार ह्या सहित सर्व प्रकारचा लैंगिक हिंसाचार.** लैंगिक हिंसाचाराची कृत्ये करणारे सर्व लोक आणि यंत्रणा या आपल्या शेजाऱ्यावर प्रीती करणे आणि त्यांचे संरक्षण करण्याच्या आज्ञेचे उल्लंघन आहे. लैंगिक हिंसाचाराने जे होत आहेत, प्रभावित झालेत, आणि जे सतत प्रभावित होत राहतात त्यांच्याकरिता मंडळी नेहमीच न्याय, संरक्षण आणि उपचारांचे ठिकाण असले पाहिजे. अल्पवयीन व्यक्तीची व्याख्या १८ वर्षाखालील कुठलीही व्यक्ती अशी केली जाते, जोपर्यंत एखाद्या राज्याच्या किंवा देशाच्या स्थानिक कायद्यानुसार वयस्काचे वय त्यापेक्षा मोठे ठरविलेले नाही.

म्हणून आम्ही असा विश्वास बाळगतो की:

- **जिथे पाप वाढते तिथे कृपेचे वैपुल्य सुध्दा येते.** पापाचे परिणाम जागतिक आणि सर्वांगिण असले तरी कृपेची गुणकारिता देखील जागतिक आणि सर्वांगिण आहे. ख्रिस्तामध्ये, पवित्र आत्म्याद्वारे, आमच्या जीवनांना नवीन उत्पत्ती असे घडविणे ही

जरी क्रमश: होणारी प्रक्रिया असेल तरी मानव जातिच्या लैंगिक क्षेत्रातील भग्नतेला हाताळण्यामध्ये देवाचा उपचार परिणामकारक आहे.

- **मानवी शरीर हे पवित्र आत्म्याचे मंदिर आहे.** आपली लैंगिकतेची इच्छा ही देवाच्या इच्छेशी सुसंगत असणे गरजेचे आहे अशी आम्ही पुष्टी करतो. आमची शरीरे आपली स्वत:ची नाहीत तर ती किंमत मोजून विकत घेतलेली आहेत. म्हणून, आम्ही आज्ञापालनास समर्पित जीवनांद्वारे, आमच्या शरीरांमध्ये देवाचे गौरव करण्यास पाचारलेले आहोत.
- **देवाच्या लोकांवर पवित्र प्रीतीचा ठसा आहे.** आम्ही असा ठाम विश्वास बाळगतो की सर्व गुणांपेक्षा वर, देवाच्या लोकांनी स्वत:ला प्रीतीच्या वस्त्रांनी आच्छादले पाहिजे. देवाच्या लोकांनी आपल्या सहभागीतांमध्ये भग्न झालेल्या लोकांचे नेहमीच स्वागत केलेले आहे. असले ख्रिस्ती आदरातिथ्य वैयक्तिक उल्लंघनाचे निमित्तही नाही आणि भग्नतेचा स्रोत समजून घेण्यात सहभागी होण्यास नकारही नाही. मानवांना येशूच्या प्रतिरुपात पुनर्स्थापित करण्यासाठी कबुली, क्षमा, जडणघडणात्मक व्यवहार, पवित्रीकरण, आणि दैवी सल्ला हे आवश्यक आहेत - परंतु ह्या सर्वांपेक्षा महत्वाचे म्हणजे ह्यामध्ये अशा प्रीतीपूर्ण स्वागताचा समावेश आहे जे भग्न लोकांना मंडळी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कृपेच्या वर्तुळात आमंत्रित करते. जर आपण प्रामाणिकपणे पाप आणि भग्नतेचा सामना करण्यास अयशस्वी ठरलो तर आपण प्रीती केली नाही. आम्ही प्रीती करण्यास अयशस्वी झाल्यास, भग्नतेला देव देतो त्या उपचारात आम्ही सहभागी होऊ शकत नाही. जागतिक मंडळी जगातील लोकांचा स्वीकार करून त्यांची सेवा करत असता मंडळ्या हया नात्याने ह्या विधानांची पुर्ती करणे किचकट आहे आणि म्हणून काळजीपूर्वक, नम्रतेने, धैर्याने आणि विवेकबुध्दिने ते चालविले पाहिजे.

## D. ख्रिस्ती कारभारीपणा

**३२. कारभाराचा अर्थ.** पवित्र शास्त्र शिकवते की सर्व वस्तु व सर्व व्यक्ती देवाच्या मालकीच्या आहेत. जीवन व मालमत्ता यांचे देवाच्या वतीने मानव कारभारी आहेत. देवाची मालकी आणि माणसाचे कारभारीपण हे सर्वस्वी मान्य केलेच पाहिजे, कारण कारभारीपणाचा हिशेब देवाला देण्यास आम्ही बांधलेले आहोत. देवाने, त्याच्या सर्व बाबतीत यंत्रणा व व्यवस्थेचा देव म्हणून “देण्याची व्यवस्थाही” प्रस्थापित केलेली ती मानव संसाधन आणि नातेसंबंधांवर देवाचा मालकी हक्क मान्य करते. हे लक्षात घेऊन

त्याच्या सर्व लेकरांनी सुवार्तेच्या साहाय्यासाठी विश्वासाने दशांश आणि अर्पणे सादर करावीत. (१४०)

(मलाखी ३:८-१२; मत्तय ६:२४-३४; २५:३१-४६; मार्क १०:१७-३१; लूक १२:१३-२४; १९:११-२७; योहान १५:१-१७; रोम. १२: १-१३; १ करिंथ. ९:७-१४; २ करिंथ. ८:१-१५; ९:६-१५; १ तीमथ्य ६:६-१९; इब्री. ७:८; याकोब १:२७; १ योहान १:१६-१८)

**३२.१. दशांश भांडारामध्ये जमा करणे.** व्यक्तीने ती ज्या मंडळिचा सभासद असेल त्या मंडळीच्या भांडारामध्ये विश्वासुरित्या व नियमीतपणे आपला दशांश टाकणे ही पवित्रशास्त्रोक्त व व्यवहारीक कामगिरी आहे. म्हणून, मंडळीचा वित्तपुरवठा हा भांडारात जमा होणाऱ्या दशांश योजनेवर आधारीत असेल आणि चर्च ऑफ दी नॅझरीनची स्थानिक मंडळी हिच दशांशाचे भांडार आहे असे त्या मंडळीचे सर्व लोक गृहित धरतील. चर्च ऑफ दी नॅझरीनचा भाग असणाऱ्या सर्वांनी आपल्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा हा किमान बंधन म्हणून देवाला आणि ह्याव्यतिरिक्त देवाने त्यांना दिलेल्या समृध्दीच्या आधारे स्थानिक मंडळी, प्रांत, शिक्षणसंस्था आणि इतर साहाय्याकरिता असे स्वेच्छा दान द्यावे.

**३२.२. निधी उभारणी आणि वितरण.** दशांश देणे, सुवार्ता कार्यासाठी साहाय्य आणि भक्तिमंदीरांच्या उभारणीकरिता दानार्पण देणे ह्याबाबत पवित्रशास्त्रोक्त शिक्षणाच्या प्रकाशात कुठल्याही नॅझरीन मंडळीने निधी उभारणीच्या अशा कुठल्याच पध्दतीमध्ये सहभागी होऊ नये की ज्यामुळे या तत्वांचे महत्व कमी होईल, शुभवर्तमान प्रसारास अडखळण येईल, मंडळीच्या नावाला कलंक लागेल.

स्थानिक मंडळी, प्रांत, शैक्षणिक संस्था व चर्च ऑफ दी नॅझरीनच्या प्रमुख मंडळाच्या कार्यक्रमांच्या अपेक्षापुर्तीप्रती वितरण करतांना, स्थानिक मंडळीने आर्थिक संविभाजन योजना तयार करून ते व्यवहारात आणावे आणि प्रमुख, शैक्षणिक व प्रांतिक कार्यासाठी नेमून दिलेली रक्कम दरमहा पाठवावी, असे मंडळ्यांना कळकळीचे आवाहन आहे. (१३०, १५३, १५४-१५४.२, ५१६.१३)

**३२.३. सेवाकार्याकरिता साहाय्य.** “त्याचप्रमाणे प्रभूने नेमले आहे की, जे सुवार्ता सांगतात त्यांनी सुवार्तेवर आपली उपजीविका करावी” (१ करिंथ. ९:१४). ज्यांना देवाने पाचारण केले आहे, आणि ज्यांनी मंडळीच्या निर्देशांतर्गत स्वत:ला सेवाकार्याकरिता संर्वस्वी वाहून घेतले आहे अशा सेवकांना साहाय्य करण्यास मंडळी बांधलेली आहे.

म्हणून आम्ही मंडळीच्या सभासदांना कळकळीचे आवाहन करतो की त्यांनी सेवाकार्याचा खर्च चालविणे ह्या पवित्र कार्यासाठी दर आठवड्यास पैसे गोळा करण्याच्या कामी स्वत:ला स्वेच्छेने बांधून घ्यावे आणि पाळकांना दर आढवड्यास नियमीतपणे त्यांचे वेतन द्यावे. (११५.४, ११५.६, १२९.८)

**३२.४. वर्षासने व मृत्यूपत्रान्वये देणग्या देणे.** ख्रिस्ती कारभारीपण चालवताना आपली मालमत्ता व शिल्लक पैसा यांची व्यवस्था कशी लावावी याचाही काळजीपूर्वक विचार केला पाहिजे, कारण देवाने ख्रिस्ती व्यक्तीला त्याच्या जीवनामध्ये ह्यावरही कारभारी म्हणून नेमलेले असते. ह्या जीवनातील विश्वासू कारभारीपणाची गरज ओळखून आणि भविष्याकरिता वारसा ठेवण्याबाबत देवाने दिलेल्या दृष्टांतानुसार, चर्च ऑफ दी नॅझरीनने विश्वासू कारभारीपण वाढविण्याच्या दृष्टीने योजनाबध्द मृत्यूपत्रान्वये देणग्या देण्याकरिता चर्च ऑफ दी नॅझरीन फाऊंडेशनची स्थापना केलेली आहे. देवाला गौरविणाऱ्या पध्दतीने मालमत्तेची विल्हेवाट लावण्यास मुलकी कायदा नेहमीच साहाय्यक ठरत नाही. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने तिचे मृत्युपत्र काळजीपूर्वक व कायद्यानुसार तयार करण्याबाबत लक्ष द्यावे, आणि ह्या संदर्भात चर्च ऑफ दी नॅझरीन तिची विविध सेवाकार्ये, सुवार्ताप्रसार, शिक्षण, दयार्थ कार्ये - स्थानिक, प्रांतिक, शैक्षणिक आणि प्रमुख मंडळाद्वारे केल्या जाणारी कामे - ह्यांचा विचार करण्याची शिफारस करते.

**३२.५. चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सेवाकार्याकरिता सामायिक जबाबदारी.** चर्च ऑफ दी नॅझरीनची प्रशासन पध्दती ही प्रातिनिधित्मक आहे. जागतिक सुवार्ताप्रसार, शिक्षण, सेवकीय साहाय्य आणि प्रांतिक सेवाकार्याकरिता प्रमुख परिषदेने परिभाषित केलेले आणि प्रमुखाध्यक्ष मंडळाच्या पुढारीपणाद्वारे लागू केलेले समग्र ध्येय्य ह्याला प्रत्येक स्थानिक मंडळी साहाय्य करते.

जागतिक सुवार्ताप्रसार निधी उभारणीची योजना विकसित करून, तिचे पुनर्मुल्यमापन करणे व तिचा प्रतिपाळ करणे आणि प्रांतांमधील स्थानिक मंडळ्यांकरिता हा निधी उभारणीचे उद्दीष्ट व जबाबदारी प्रस्थापित करण्याकरिता प्रमुखाध्यक्ष मंडळ व प्रमुख मंडळाला परवानगी अधिकार देण्यात आलेले आहेत.

परिच्छेद ३३७.१ नुसार राष्ट्रीय मंडळे आणि विभागिय सल्लागार समित्यांना त्यांच्या विभागावर सेवकीय निवृत्तीवेतन बचत योजना प्रस्थापित करण्यास परवानगी व अधिकार आहे. असल्या योजनांचे अहवाल परिच्छेद ३३७.२ नुसार सादर केले जातील. परिच्छेद ३२.५ ची तरतूद सेवानिवृत्ती व हित मंडळ यु एस ए ला लागू होणार नाही.

राष्ट्रीय मंडळे आणि विभागिय सल्लागार समित्यांना त्यांच्या विभागावर शैक्षणिक संस्थांकरिता साहाय्य प्रस्थापित करण्यास सुध्दा परवानगी व अधिकार आहे.

प्रत्येक प्रांताला, प्रांतिक सेवाकार्य साहाय्यासाठी, प्रांतिक अर्थ समितीद्वारे प्रत्येक मंडळीकरता विशिष्ट निधींचे ध्येय्य व जबाबदारी प्रस्थापित करण्याची परवानगी व अधिकार आहे. (२३८.१, ३१७.१०, ३४५, ३४६.३)

## E. मंडळीचे पदाधिकारी

**३३.** जे स्थानिक मंडळीचे सक्रिय सभासद आहेत, संपूर्ण पवित्रीकरणाचा अनुभव असल्याची जाहीर कबुली देतात, आणि ज्यांचे जीवन पवित्र जीवन जगण्यास पाचारण करणाऱ्या देवाच्या कृपेची सार्वजनिक साक्ष बाळगतात; जे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सिध्दांत, कारभारपध्दती आणि परंपरांशी सुसंगत आहेत, आणि जे स्थानिक मंडळीला उपस्थिती, सक्रिय सेवा, दशांश व दानार्पणांद्वारे विश्वासुरित्या साहाय्य करतात अशांनाच मंडळीचे पदाधिकारी म्हणून निवडण्याचे निर्देश आम्ही स्थानिक मंडळ्यांना देतो. मंडळीचे पदाधिकारी हे “राष्ट्रांमध्ये ख्रिस्तसादृष्य शिष्य तयार करणे” ह्या कार्यामध्ये सर्वस्वी सहभागी असावेत. (११३.११, १२७, १४५-४७)

## F. कारभाराचे नियम

**३४.** लागू होणारा कायदा आणि या बंधारण पुस्तकामध्ये दिलेली संस्थापनेची कलमे व व्यवस्थापनासंबंधीचे उपनियम यांना अधीन राहून, चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सभासदांच्या स्थानिक, प्रांतिक व प्रमुख परिषदा तसेच समित्यांच्या बैठका व कामकाज हे सर्व लोकसभेच्या कारभारासंबंधाने रॉबर्ट्स रूल्स ऑफ ऑर्डर न्युली रिव्हाईज्ड (नवीनतम आवृत्ती) मध्ये दिल्याप्रमाणे नियमीत व नियंत्रित केल्या जातील. (११३, २०५, ३००.३)

## G. ख्रिस्ती वर्तनाच्या करारामध्ये दुरूस्ती

**३५.** प्रमुख परिषदेच्या कोणत्याही अधिवेशनामध्ये, उपस्थित सर्व सभासदांच्या दोन तृतियांश एवढ्या बहुमताने ख्रिस्ती वर्तनाच्या करारामधील तरतुदी बदलता किंवा रद्द करता येतील.

# भाग ४था

# मंडळीची शासन व्यवस्था

**प्रस्ताविक**
**स्थानिक मंडळीची शासन व्यवस्था**
**प्रांतिक शासन व्यवस्था**
**प्रमुख जागतिक शासन व्यवस्था**

## प्रस्तावना/ प्रस्ताविक

येशू ख्रिस्तामध्ये मिळणारी पापक्षमा आणि अंतःकरणाची शुद्धता ह्या द्वारे देवाच्या परिवर्तनकारी कृपेची सर्व लोकांना ओळख करून देणे हे चर्च ऑफ द नॅझरीनचे कार्य आहे. आपले आद्य व प्रमुख सेवाकार्य म्हणजे, “राष्ट्रांमध्ये ख्रिस्त साहृश्य शिष्य तयार करणे”, तसेच विश्वासणाऱ्यांना मंडळीच्या सहभागीतेत व सभासदत्वात आणून, जे विश्वासाद्वारे प्रतिसाद देतात त्यांना सेवाकार्याकरिता तयार करणे हे आहे. विश्वासणाऱ्यांच्या समूहाचा सर्वोच्च उद्देश हाच आहे की, शेवटल्या दिवशी प्रत्येकाला ख्रिस्तामध्ये परिपूर्ण असे सादर करणे. (कलस्सै १:२८).

स्थानिक मंडळी मध्ये तारण, परिपूर्णता, शिक्षण व देवाच्या कार्यासाठी पाठविणे या बाबी घडून येतात. स्थानिक मंडळी, ख्रिस्ताचे शरीर हे आपला विश्वास व सेवाकार्य

यांचे दर्शक आहे. व्यवस्थापनाच्या दृष्टीने अशा मंडळ्यांना एकत्र करून त्यांचे प्रांत व विभाग तयार केले जातात.

चर्च ऑफ द नॅझरीनच्या बंधारण पुस्तकात व्यक्त विश्वास निवेदन, कारभारपध्दती, व्याख्या व प्रक्रिया या बाबी चर्च ऑफ द नॅझरीनच्या एकतेचा आधार आहेत.

या ऐक्याचा गाभा बंधारण पुस्तकातील विश्वास निवेदनात जाहीर केलेला आहे. सर्व विभागांमधील आणि भाषांमधील मंडळ्यांना आम्ही असे प्रोत्साहन देतो की त्यांनी या विश्वास निवेदनाचे भाषांतर करून, विस्तृत वितरण करून आपापल्या क्षेत्रामध्ये ते शिकवावेत. हा एक असा सोनेरी धागा आहे की जो नॅझरीन लोक म्हणून आमची ओळख व कार्याच्या रचनेमध्ये गुंफल्या गेलेला आहे.

या एकतेचे दृश्य रूप म्हणजे प्रमुख परिषद. ही प्रमुख परिषद चर्च ऑफ द नॅझरीनची सिद्धांत तयार करणारी, नियम तयार करणारी, आणि निवड करणारी सर्वोच्च अधिकार असलेली सभा आहे.

दुसरे रूप म्हणजे आंतरराष्ट्रीय प्रमुख मंडळ. जे संपूर्ण जागतिक मंडळीचे प्रतिनिधित्व करते.

तिसरे रूप म्हणजे प्रमुखाध्यक्ष मंडळ. हे मंडळ बंधारण पुस्तकाचे अर्थविवरण करणे, संस्कृती नुसार योग्य बदल करून त्याला संमती देणे व सेवेसाठी दीक्षा देणे ही कामे करते.

चर्च ऑफ दी नॅझरीनची प्रशासन पध्दती ही प्रातिनिधित्मक आहे. त्यामुळे एकतर मंडळींच्या प्रमुखांच्या अधिकाराची अतिशयोक्ती आणि दुसरे म्हणजे मंडळीची निरंकुश सत्ता ही सुध्दा टाळल्या जाते.

मंडळीच्या सेवा क्षेत्रामध्ये येणाऱ्या विविध जागतिक विभागांमध्ये सांस्कृतिक व राजकीय फरकामुळे, बंधारण पुस्तकातील भाग चार, परिशिष्ट १००, २००, व ३०० यामध्ये समाविष्ट केलेल्या मंडळीच्या स्थानिक, प्रांतिक व विभागिय प्रशासन प्रक्रियांमध्ये आवश्यक बदल स्वीकारता येतील. अशाप्रकारे बदल करण्यासंबंधीचे सर्व प्रस्ताव प्रमुखाध्यक्ष मंडळाकडे लेखी स्वरूपात सादर करून मान्यता प्राप्त केली पाहिजे. (३००)

# I. स्थानिक शासन व्यवस्था

## A. स्थापना, नाव, संस्थापन, मालमत्ता, निर्बंध, विलिनीकरण, विसर्जन

**१००. स्थापना:** प्रांताध्यक्ष किंवा त्या विभागाचे अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष किंवा दोघांपैकी कोणा एकाने नियुक्त केलेला दिक्षीत सेवक यांना स्थानिक मंडळ्यांची स्थापना करता येईल. नव्या मंडळ्यांचे अहवाल अख्त्यारी कार्यालयाद्वारे प्रमुख सचिवाच्या कार्यालयांमध्ये सादर करावेत. (२३, १०७, २११.१, ५३८.१५)

**१००.१. मंडळीसमान सेवाकार्य केंद्र (Church Type Mission)**
नवीन उपासकांचे गट जे अजून परिशिष्ट १०० नुसार स्थापना झालेले नसतील अशा ठिकाणांची नोंद प्रमुख सचिवाच्या कार्यालयांमध्ये मंडळीसमान सेवाकार्य केंद्र या नावाने केल्या जाऊ शकते. अर्थात त्यासाठी प्रांताध्यक्षांची शिफारस किंवा संमती आवश्यक आहे. त्याठिकाणी पाळक म्हणून सेवा करणाऱ्या पाळकाला किंवा सहाय्यक पाळकाला प्रांताध्यक्षांच्या संमतीने नियुक्त सेवक समज येईल. मंडळी समान सेवाकार्य केंद्राचे परिशिष्ट १०२ नुसार संघटन करता येते व ते सभासदांचा स्वीकार करून त्या सभासदांचा अहवाल सादर करू शकतात. (१००.२, १०७.२, १३८.१, १५९, २११.६)

**१००.२. बहुभाषिक मंडळी:** स्थापित स्थानिक मंडळ्याना विविध भाषांतील पवित्र शास्त्र शिक्षण वर्ग चालवून आपल्या सेवा कार्याचा विस्तार करता येईल. त्यासाठी या गटांना या मंडळ्यातील सुविधांचे सहाय्य घेता येईल. या पवित्र शास्त्र शिक्षण वर्गातून पुढे मंडळी समान सेवाकार्य केंद्रे  अथवा पूर्ण स्थापित मंडळ्या विकसित होतील. परिणामी, प्रांताध्यक्षांच्या मान्यतेने एकाहून अधिक उपासक समूहांचे एकाच नावाखाली अस्तित्व असू शकेल. अशा बहुभाषिक मंडळींमध्ये जेव्हा प्रत्येक उपासक समूह स्थापित नसेल तेव्हा प्रांतिक सल्लागार मंडळ, प्रांताध्यक्ष आणि अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष यांच्या संमतीने अशा उपासक गटांना स्थापित मंडळीचे अधिकार व हक्क बहाल करतील. मात्र त्यासाठी पुढील अटी असतील:

१. असे उपासक गट स्थापित मंडळी पासून वेगळे असे स्थापन करता येणार नाहीत.

२. असे उपासक गट स्थानिक मंडळी पासून वेगळे अशी स्वतःच्या मालकिची मालमत्ता धारण करू शकणार नाहीत.

३. असे उपासक गट, प्रांताध्यक्ष, स्थापित मंडळीचे पंचमंडळ आणि प्रांतिक सल्लागार मंडळ यांच्या मान्यतेशिवाय कर्ज काढणार नाहीत.

४. अशा कोणत्याही उपासक गटाला स्थापित मंडळी पासून वेगळे होता येणार नाही, व मंडळी सोबतचे संबंध तोडता येणार नाहीत. त्यांना विभक्त व्हायचेच असेल तर स्थानिक मंडळीच्या पाळकांच्या व प्रांताध्यक्षाकडून तशी परवानगी प्राप्त करणे आवश्यक आहे.

**१०१. नाव:** नव्याने स्थापित झालेल्या मंडळीचे नाव प्रांताध्यक्षा बरोबर विचार विनिमय करुन आणि प्रांतिक सल्लागार मंडळाच्या संमतीने स्थानिक मंडळी कडून निश्चित केले जाईल. (१०२.४)

**१०१.१. नावात बदल:** चर्च ऑफ द नॅझरीनच्या स्थानिक मंडळीला आपल्या नावामध्ये खालील प्रक्रियेद्वारे बदल करता येईल:

१. स्थानिक मंडळीचे पंचमंडळ प्रस्तावित बदल प्रांताध्यक्षाकडे पाठवेल, व प्रांताध्यक्ष प्रांतिक सल्लागार मंडळाकडून त्याची लेखी मान्यता घेतील.

२. स्थानिक मंडळीच्या सभासदांची वार्षिक सभा किंवा विशेष बोलावलेल्या सभेमध्ये मतपत्रिकेद्वारे बहुमताने हा प्रस्ताव संमत केला जाईल.

३. प्रांतिक सल्लागार मंडळ या बदलाचा अहवाल प्रांतिक परिषदेला सादर करेल व प्रांतिक परिषद या बदलाला मतदानाने मान्यता देईल.

**१०२. संस्थापना:** जेथे-जेथे कायद्याची मान्यता आहे, अशा सर्व ठिकाणी विश्वस्त मंडळ मंडळीची संस्थापना करतील आणि सदर विश्वस्त व त्यांचे उत्तराधिकारी सदर संस्थेचे विश्वस्त असतील. जेथे स्थानिक कायद्यांना बाधा येत नसेल तेथे संस्थापन नियमावली संस्थेचे अधिकार नमूद करेल व ही संस्था (स्थानिक मंडळी) चर्च ऑफ दी नॅझरीन च्या शासनास पात्र व अधीन असेल अशी तरतूद करण्यात येईल. चर्च ऑफ द नॅझरीनचे शासन वेळोवेळी सदर मंडळीच्या प्रमुख परिषदेने अधिकृतपणे बंधारण पुस्तकांमध्ये जाहीर केल्याप्रमाणे असेल. या संस्थेच्या सर्व मालमत्तेच्या कारभारावर विश्वस्तांचे नियंत्रण असेल व हे विश्वस्त स्थानिक मंडळीच्या मान्यतेनुसार कारभार चालवतील.

**१०२.१.** प्रांतिक सल्लागार मंडळाने स्थानिक मंडळीसाठी किंवा नवीन मंडळी साठी स्थावर मालमत्ता विकत घेऊन त्यावर इमारती बांधल्या असतील आणि नंतर स्थानिक मंडळीने प्रांतिक सल्लागार मंडळाने गुंतवलेला सर्व पैसा परत केला असेल तर प्रांतिक

सल्लागार मंडळाने अशी मालमत्ता स्थानिक मंडळीच्या नावे हस्तांतरीत करावी अशी शिफारस करण्यात येते.

**१०२.२.** स्थानिक मंडळीची स्थापना झाली म्हणजे जेथे, जेव्हा शक्य असेल तेथे, तेव्हा संपादित केलेली सर्व स्थावर, जंगम मालमत्ता त्या मंडळीच्या स्थापित नावाने थेट खतपत्र करून देण्यात येईल.

**१०२.३.** मंडळीची संस्थापना झाली असो व नसो पाळक व पंचमंडळाचे सचिव हे अनुक्रमे मंडळीचे अध्यक्ष व सचिव राहतील. ते स्थावर मिळकतीची खरेदी/विक्री खतपत्रे, गहाणखते, गहाण सोडविल्याचे पत्र, करार व मंडळीच्या कामाकाजासंबंधिच्या इतर कायदेशीर कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या करतील. ते हे बंधारण पुस्तकामध्ये ह्या व्यतिरिक्त वेगळी तरतूद केलेली नसेल तर आणि १०४-१०४.३ ह्या परिच्छेदांमध्ये दिलेल्या निर्बंधांच्या अधीन राहून असे करू शकतील.

**१०२.४.** प्रत्येक मंडळीच्या संस्थापना नियमावलीमध्ये (घटना) पुढील कलमांचा अंतर्भाव केलेला असेल:

१. संस्थेच्या नावामध्ये "चर्च ऑफ दी नॅझरीन" हे शब्द असतील.

२. "चर्च ऑफ दी नॅझरीनचे बंधारण पुस्तक" हेच संस्थेचे उपनियम असतील.

३. संस्थापन नियमावलीमध्ये त्या विभागातील मंडळ्यांना उपलब्ध असणाऱ्या कोणत्याही सरकारी कर सवलतीस बाधा येईल अशी कसलिही तरतूद नसेल.

४. संस्था विसर्जित झाल्यावर संस्थेची सर्व मालमत्ता प्रांतिक सल्लागार मंडळाला वितरीत करण्यात येईल.

संस्थापन नियमावलीमध्ये स्थानिक कायद्यांना अनुसरूण यथार्थ असे आणखी नियम अंतर्भुत होण्यास हरतक नाही. परंतु, ज्या योगे स्थानिक मंडळीची स्थावर व जंगम मालमत्ता चर्च ऑफ दी नॅझरीन पासून दुसरीकडे वळविली जाईल अशा प्रकारचा कुठलाही नियम त्यात समाविष्ट केला जाऊ नये. (१०१-१०१.१, १०४.३, १०६.१-१०६.३)

**१०२.५.** ज्या बहुभाषिक उपासकसमुह मंडळ्यांमध्ये एकापेक्षा अधिक संघटित मंडळ्या एकाच इमारतीचा वाटर करीत असतील तेथे स्थानिक सरकारी कायद्यांना अनुसरून भागिदारीत संस्थापना करता येईल.

**१०२.६.** ज्या ठिकाणांवर संस्थापन शक्य नाही तेथे मंडळीच्या नावामध्ये “चर्च ऑफ दी नॅझरीन” हे शब्द सर्व कायदेशीर कागदपत्रांमध्ये समाविष्ट असतील, परंतु, हे मालमत्ता खते किंवा न्यास खतांपुर्ते मर्यादित नाही.

**१०३. स्थावर मालमत्ता.** एखाद्या स्थानिक मंडळीला स्थावर जमीन विकत घ्यायची असेल, ख्रिस्तमंदिरे किंवा मंडळीशी संबंधित इमारती बांधावयाच्या असतील, असलेल्या इमारतींची पुनर्रचना करायची असेल किंवा कोणत्याही कारणाने स्थावर मालमत्ता भाडेपट्ट्याने द्यावयाची असेल, तर यासंबंधातील प्रस्ताव मंडळीने प्रांताध्यक्षाकडे आणि प्रांतिक स्थावर मालमत्तामंडळ यांच्याकडे त्यांच्या मार्गदर्शनार्थ व मान्यतेसाठी पाठवावा. प्रांताध्यक्ष व प्रांतिक स्थावर मालमत्तामंडळ यांच्या लेखी मान्यतेशिवाय स्थावर मिळतक विकत घेणे, इमारती बांधणे अगर पुनर्बांधणी करणे यासाठी कर्ज काढणे, मिळकत गहाण टाकणे, हे किंवा असे करता येणार नाही. स्थानिक मंडळी ह्या मंडळाला बांधकाम प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्रैमासिक आर्थिक व स्थितीदर्शक अहवाल पाठवेल. (२३६-२३७-५)

**१०३.१.** पंचमंडळ, प्रांताध्यक्ष व प्रांतिक स्थावर मालमत्ता मंडळ यांच्यामध्ये एखाद्या प्रश्नासंबंधाने एकमत होत नसेल तर तो प्रश्न निर्णयासाठी अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांकडे पाठवावा. या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी मंडळीने अगर प्रांताध्यक्षाने प्रमुखाध्यक्ष मंडळाकडे विनंती करून अंतिम निर्णयाची मागणी करता येईल. या प्रकारच्या सर्व विनंत्या, फेरसुनावणीचे खंडन किंवा त्या संबंधातील युक्तिवाद, हे सर्व लेखी स्वरूपात अख्त्यारी प्रमुखाध्यक्षाकडे किंवा प्रमुखाध्यक्ष मंडळाकडे पाठवले पाहिजे. पुनर्विचाराची विनंती, फेरसुनावणे खंडन किंवा त्या संबंधातील युक्तिवाद यांची एक प्रत पंच मंडळाने किंवा प्रांताध्यक्षाने प्रतिवादीकडे पाठवली पाहिजे. पंचमंडळाच्या अपिलाच्या कार्यवृत्ताच्या नोंदीमध्ये अपिलाचा ठराव, अपिलाचा पाठपुरावा करणारे युक्तिवाद आणि मतांची नोंद एवढ्या गोष्टी नोंदलेल्या असतील.

**१०४. प्रतिबंध.** स्थनिक मंडळीला स्थावर मालमत्ता विकत घेणे किंवा भाडेपट्ट्याने देणे, कर्जाचे वाढलेल्या व्याजाच्या रकमेसहित पुनर्वित्त करणे, विकणे, गहाण टाकणे, अदलाबदली करणे किंवा अन्य तर्‍हेने स्थावर मालमत्तेला बोजाग्रस्त करणे किंवा स्थावर मिळकतिची विल्हेवाट लावणे या किंवा यातील कोणतीही गोष्ट करायची असेल, तर त्यासाठी वार्षिक सभेत किंवा यासाठी बोलावलेल्या खास सभेत उपस्थित असलेल्यांचे दोन तृतियांश मत असणे आवश्यक आहे. जर मंडळी अस्तित्वात असलेल्या कर्जाचे

पुनर्वित्तीकरण करत असेल, आणि पुनर्वित्तीकरणाची व्यवस्था मंडळीचे कर्ज वाढवत नसेल आणि मंडळीच्या स्थावर मालमत्तेला अधिक बोजाग्रस्त करीत नसेल तर पुनर्वित्तिकरणास मंडळाच्या दोन तृतियांश मतांनी मंडळीच्या सभासदांच्या मतदानाविना मान्यता देता येईल. स्थानिक मंडळीला अर्थ साहाय्य पुरविण्याच्या निश्चित उद्देशाने अनुदानित मालमत्तेची विल्हेवाट लावण्याबाबतच्या निर्णयाला उपस्थित व मतदान करणाऱ्या पंच मंडळ सभासदांच्या दोन तृतियांश मतांनी मान्यता देता येईल. वरील प्रत्येक बाबीकरिता प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक मालमत्ता मंडळ यांची लेखी अनुमती मिळवणे आवश्यक आहे. अशा मान्यतेविना स्थावर मिळकतीचा कोणताही व्यवहार करता येणार नाही. (११३.३-११३.४, ११३.७-११३.८, २३७.३-२३७.४)

**१०४.१.** चालू खर्च भागविण्याकरिता स्थानिक मंडळीची स्थावर मालमत्ता गहाण टाकण्यात येणार नाही.

**१०४.२.** जी स्थानिक मंडळी स्थावर मालमत्ता गहाण टाकते किंवा विकते, किंवा स्थावर मालमत्तेवर विम्याचा दावा करते, ती उत्पन्नाचा उपयोग स्थावर मालमत्तेच्या विकत घेण्याकरिता किंवा स्थावर मालमत्तेची भांडवल सुधारणा करण्याकरिता किंवा इतर स्थावर मालमत्तेवरील कर्ज कमी करणे ह्या कारणांकरिताच केवळ करू शकते. फक्त प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार मंडळाच्या अनुमतीनेच उत्पन्नाचा विनियोग इतर कुठल्या उद्देशासाठी केल्या जाऊ शकेल.

**१०४.३.** विश्वस्त आणि/किंवा स्थानिक मंडळी ह्यांना चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळीच्या कार्यासाठी असलेल्या स्थावर जंगम मालमत्तेचा उपयोग इतर कामी करता येणार नाही. (११३-११३.१)

**१०४.४ मंडळ्यांचे बाहेर पडणे.** कोणत्याही स्थानिक मंडळीला संस्था या नात्याने चर्च ऑफ दी नॅझरीनमधून बाजूस होता येणार नाही किंवा आपले तिच्याशी असलेले संबंध तोडता येणार नाहीत. मात्र प्रमुख परिषदेने तरतूद केल्याप्रमाणे ठरवलेल्या अटी व योजनांप्रमाणे चर्च ऑफ दी नॅझरीनमधून बाहेर पडता येईल. (१०६.२-१०६.३)

**१०५. विलीनीकरण.** दोन अगर अधिक मंडळ्या या कामासाठी खास बोलावलेल्या संबंधित मंडळ्यांच्या बैठकीत उपस्थित असणाऱ्या मतदार सभासदांच्या मतपत्रिकांद्वारे झालेल्या मतदानाच्या अनुकूल दोन तृतीयांश बहुमताने विलीन होऊ शकतील. मात्र यासाठी हे झाले पाहिजे: संबंधित पंचमंडळांच्या सर्व सभासदांनी विलीनीकरणास

मतपत्रिकांद्वारे बहुमताने मान्यता दिली पाहिजे, आणि प्रांताध्यक्ष, प्रांतिक सल्लागार मंडळ व अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष ह्यांनी त्यास लेखी मान्यता दिलेली असावी.

ह्या नव्या उपासक समुहाची खास बैठक मंडळीच्या अधिकाऱ्यांची निवड व पाळकांची व्यवस्था करण्याकरिता बोलावून या विलीनीकरणावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात येईल. या बैठकिच्या अध्यक्षस्थानी प्रांताध्यक्ष किंवा त्यांनी नियुक्त केलेले ज्येष्ठ सेवक (वडील) असतील.

या प्रमाणे निर्माण केलेल्या मंडळीमध्ये पूर्वीच्या मंडळ्यांमधील सर्व सभासद, या मंडळ्यांच्या सर्व विभागांचे सर्व सभासद एकत्र करण्यात येतील आणि या सर्व मंडळ्यांच्या मालमत्ता व देणी यांचेही अंशत: अथवा पूर्णत: एकत्रीकरण करता येईल. मात्र यासाठी प्रांताध्यक्ष, प्रांतिक सल्लागार मंडळ आणि अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष यांची मान्यता मिळणे आवश्यक आहे. ह्या विलीनीकरणामध्ये मंडळीद्वारे प्रमुख, शैक्षणिक आणि प्रांताला देण्यात येणाऱ्या आर्थिक वाट्यांचा सुध्दा समावेश असेल.

प्रांताध्यक्षांकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर चर्च ऑफ दी नॅझरीनचे प्रमुख चिटणिस ह्यांना मंडळ्यांच्या नामपटलावरून निष्क्रीय मंडळ्यांची नावे काढून टाकण्याचा अधिकार प्राप्त होईल.

## १०६. मंडळ्यांना निष्क्रिय किंवा विसर्जित म्हणून घोषित करणे:

प्रांतिक सल्लागार मंडळाच्या कृतीनुसार मंडळ्यांना अधिकृतपणे विसर्जित, सक्रिय किंवा पुन:स्थापित केल्या जाण्यापूर्वी संक्रमण कालावधीपुरते निष्क्रिय घोषित केल्या जाऊ शकतात.

**१०६.१.** स्थानिक मंडळी खालील प्रमाणे विसर्जित केल्या जाऊ शकते :

**१.** प्रांताध्यक्षाची शिफारस

**२.** अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांचा संमतीदर्शक प्रतिसाद.

**३.** प्रांतिक सल्लागार मंडळाचे दोन-तृतीयांश मत.

**१०६.२.** एखादी स्थानिक मंडळी निष्क्रिय झाली असेल किंवा विसर्जित झाली असेल अथवा ज्या वेळी चर्च ऑफ दी नॅझरीन पासून अलिप्त होण्याची वेळ आली असेल किंवा तसा प्रयत्न होत असेल (व या गोष्टींना प्रांतिक सल्लागार मंडळाने पुष्टी दिली असेल) तर अशा मंडळीची स्थावर मिळकत ज्या प्रांतांमध्ये असेल तेथे तिचा उपयोग दुसऱ्या

कोणत्याही उद्देशाने करू नये. आणि स्थावर मिळकतीचा मालकीहक्क प्रांताचे प्रतिनिधी म्हणून अंतर्भूत असलेल्या त्या प्रांताच्या प्रांतिक सल्लागार मंडळाकडे, किंवा इतर अधिकृत प्रतिनिधीकडे प्रांतिक परिषदेच्या निर्देशानुसार मोठ्या प्रमाणात चर्च ऑफ दी नॅझरीनच्या उपयोगासाठी जाईल. विसर्जित मंडळीची स्थावर मालमत्ता निष्क्रिय किंवा विसर्जित मंडळीचे विश्‍वस्त हे प्रांतिक सल्लागार मंडळ किंवा प्रांतिक परिषदेने नियुक्त केलेला प्रतिनिधी यांच्या मार्गदर्शनाखाली व हुकुमान्वये आणि अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष ह्यांच्या लेखी मान्यतेने विकतील किंवा त्याची विल्हेवाट लावतील. तसेच प्रांतिक परिषद किंवा प्रांतिक सल्लागार मंडळ यांच्या आदेशानुसार सदर मालमत्ता हस्तांतरीत करण्यात येईल किंवा विकून आलेले पैसे स्वाधीन करण्यात येतील. (१०४.४, १०६, २२५.२३)

**१०६.३.** निष्क्रिय मंडळी, विसर्जित मंडळी किंवा जी मंडळी चर्च ऑफ दी नॅझरीन मधून बाहेर पडली असेल किंवा तसा प्रयत्न होत असेल अशा मंडळीचा विश्वस्त किंवा विश्वस्त मंडळ यांनी स्थावर मालमत्तेचा उपयोग चर्च ऑफ दी नॅझरीनच्या कार्याशिवाय इतर कोणत्याही कामासाठी करू नये. (१०४.४, १४१-१४४, २२५.२३)

**१०६.४.** फक्त अधिकृतपणे विसर्जित झालेल्या मंडळ्यांचीच नावे प्रमुख सेक्रेटरीच्या नोंद पुस्तकातून काढून टाकण्यात यावी.

**१०६.५.** एखादी स्थानिक मंडळी निष्क्रिय घोषित केल्यावर आर्थिक किंवा संरक्षक खात्याचे स्वाक्षरी धारकांनी सर्व उत्पन्न प्रांतिक सल्लागार मंडळाच्या ताब्यात द्यावे. हे करण्यासाठी जर नकार देण्यात आला तर प्रांतिक सल्लागार मंडळ आपल्या बैठकीमध्ये प्रस्ताव पास करून सर्व पैशाची खाते बंद करू शकतात व मंडळीची मालमत्ता कायद्यानुसार ताब्यात घेऊ शकतात.

## B. स्थानिक मंडळीचे सभासदत्व

**१०७. पूर्ण सभासदत्व:** ज्यांना मंडळी स्थापन करण्याचा अधिकार दिला आहे अशांनी स्थानिक मंडळींमध्ये संघटित केलेली सर्व व्यक्ती स्थानिक मंडळीचे पूर्ण सभासद होतील, परंतु प्रथम पाळक, प्रांताध्यक्ष किंवा प्रमुखाध्यक्ष यांच्याकडून त्यांचा जाहीरपणे स्वीकार होणे आवश्यक आहे. सभासद म्हणून पात्र ठरून स्वीकार होण्यासाठी या सर्व व्यक्तींनी आपल्या तारणाचा व्यक्तीगत अनुभव, चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सिद्धांतावरचा विश्वास आणि मंडळीच्या शासन व्यवस्थेच्या अधीन राहण्याची इच्छा जाहीरपणे प्रगट केलेली असावी. प्रत्येक सभासदाला सेवा, काळजी आणि साहाय्य पुरविल्या जाईल याबाबत

मंडळीचे पुढारी प्रयत्नशील असतील. (२३, १०७.२, १११, ११३.१, ५१६.१, ५२०, ५३२.८, ५३८.८-५३८.९)

**१०७.१** मंडळीमध्ये सभासद होऊ इच्छिणाऱ्यांना पाळकाने मंडळीच्या सभासदत्वाचे विशेषाधिकार व जबाबदाऱ्या, विश्वास निवेदने (विश्वास सिद्धांत कलमे), ख्रिस्ती चारीत्र्याच्या कराराच्या अपेक्षा, ख्रिस्ती वर्तणुकीचा करार आणि चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळीचा उद्देश आणि सेवाध्येय हे सर्व समजून सांगावे.

सुवार्ताप्रसार व सभासदत्व समितीबरोबर विचारविनिमय केल्यावर पाळक पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना जाहीर उपासनेच्या समयी मंडळींमध्ये सभासद म्हणून स्वीकारतील. अशावेळी सभासदांचा स्वीकार करण्यासाठी मान्यताप्राप्त पद्धतीचा वापर करावा. (२१, २८-३३, ११०-११०.४, २२८, ७०४)

**१०७.२. मंडळी समान सेवा केंद्रांचे सभासद.** जिथे स्थानिक मंडळीची अजून स्थापना झालेली नाही, तिथे मंडळी समान सेवा केंद्रात (सि.टि.एम.- चर्च टाईप मिशन) कलम १०७ आणि १०७.१ नुसार सभासदांचा स्वीकार करून सभासदांची संख्या वार्षिक अहवालामधील आकडेवारीत सादर करता येईल.

**१०७.३. मतदान व अधिकाराची पदे.** जे स्थानिक मंडळीचे पूर्ण सभासद आहेत व ज्यांचा पंधरावा वाढदिवस झाला आहे आणि स्थानिक कायदा अनुमती देतो ते मंडळीत अधिकारपदे भुषवू शकतात, तसेच मंडळीच्या वार्षिक किंवा विशेष सभेमध्ये मतदान करू शकतात, किंवा प्रांतिक परिषदेकरिता मंडळीचे प्रतिनिधी असू शकतात.

**१०८. सह सभासदत्व.** जेथे प्रांताकडून तरतूद झाली असेल तेथे स्थानिक मंडळीला सहसभासद /सहभागीता-सभासद स्वीकारता येतील. या सभासदांना मंडळींमध्ये सभासदत्वाचे सर्व विशेषाधिकार असतील परंतु त्यांना मतदानाचा आणि अधिकारपद स्वीकारण्याचा अधिकार राहणार नाही. (२०५.२४)

**१०८.१.** पाळक व सुवार्ताप्रसार व सभासदत्व समिती यांच्या निर्णयानुसार सहसभासदांना कोणत्याही वेळी पूर्ण सभासद करून घेण्यात येऊ शकते किंवा त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात येऊ शकते.

**१०९. निष्क्रिय सभासदत्व.** कलम १०९.१ व १०९.२ मधील नमुद कारणांस्तव स्थानिक मंडळी व्यक्तींना ‘निष्क्रिय सभासद’ म्हणून निर्देशित करू शकते. (११२.३, १३३)

**१०९.१.** स्थानिक मंडळीचा एखादा सभासद स्थलांतर करून दुसरीकडे गेला असेल व आपल्या मंडळीत सक्रिय नसेल तर त्याला किंवा तिला त्या ठिकाणच्या नॅझरीन मंडळीत उपस्थित राहाण्यास, आणि त्या मंडळीत सभासदत्व प्राप्त करण्यकरिता बदलीपत्र घेण्याकरिता विनंती करण्यास प्रोत्साहन द्यावे.

**१०९.२.** मंडळीचा एखादा सभासद सर्व धार्मिक उपासनेस सतत सहा महिने गैरहजर राहिला असेल व त्याने आपल्या गैरहजेरीचे पंचमंडळास पटेल असे कारण दिले नसेल, त्याला शक्य असेल तेव्हा पुन्हा सक्रिय व्हावे यासाठी उत्तेजन देण्याचे प्रयत्न केलेले असतील, तर सुवार्ता प्रसार व सभासदत्व समितीच्या शिफारशीने पंच मंडळाने ठराव करून त्याचे सभासदत्व निष्क्रिय म्हणून जाहीर करावे. पंचमंडळाने असा ठराव केल्यावर सात दिवसाचे आत त्या सभासदाला विमोचन पत्र पाठवून माहिती देतील. पंचमंडळाने असा ठराव केल्यावर पाळक सभासद-नोंद पुस्तकामध्ये या सभासदाच्या नावापुढे पंचमंडळाच्या ठरावानुसार (तारीख) ‘निष्क्रिय सभासदांच्या यादीमध्ये समाविष्ट’ असा शेरा लिहीतील.

**१०९.३.** स्थानिक मंडळीच्या पूर्ण सभासदांच्या यादीमध्ये क्रियाशील सभासदांबरोबर निष्क्रिय सभासदांचीही नोंद असावी. प्रांतिक परिषदेला सभासदांची माहिती (१) क्रियाशील सभासद व (२) निष्क्रिय सभासद अशी वर्गवारी करून कळवावी.

**१०९.४.** निष्क्रिय सभासदांना स्थानिक मंडळीमध्ये कोणतेही पद धारण करता येणार नाही अथवा त्यांना मंडळीच्या वार्षिक किंवा खास सभेमध्ये मतदान करता येणार नाही.

**१०९.५.** निष्क्रिय सभासद आपले नाव पुन्हा मंडळीच्या ‘क्रियाशील सभासदाच्या’ यादीमध्ये लिहावे अशी पंचमंडळाला लेखी विनंती करू शकेल. या विनंती बरोबरच सदर पत्रामध्ये सभासदाने सभासदत्वाचा शपथवचनांचा पुनरुच्चार केलेला असावा, आणि स्थानिक मंडळीच्या उपासनेमध्ये पुन्हा नव्याने सक्रिय सहभागी होण्याचे आश्वासन नमूद केलेले असावे. या विनंतिला पंचमंडळाने साठ दिवसाचे आत उत्तर द्यावे. सुवार्ता प्रसार व सभासदत्व समितीच्या शिफारशीवरून पंचमंडळाला ठराव करून अशा निष्क्रिय व्यक्तीला पुन्हा पूर्ण सभासदत्व देता येईल.

## C. स्थानिक मंडळीची सुवार्ताप्रसार व सभासदत्व समिती

**११०.** पंचमंडळ कमीत कमी तीन व्यक्तींची सुवार्ताप्रसार व सभासदत्व समिती नेमतील, ही समिती पाळकाला सल्ला देण्याचे काम करेल, आणि पाळक या समितीचे अध्यक्ष राहातील (१३८.३). समितीची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील:

**११०.१.** स्थानिक मंडळी मध्ये सुवार्ता प्रसारास चालना देणे व सुवार्ता प्रसाराची फलप्राप्ती टिकवून ठेवणे (१०७-१०७.१, १२९.२४)

**११०.२.** मंडळीच्या एकंदर जीवनकार्यामध्ये सुवार्ता प्रसारावर भर असावा यासाठी अभ्यास करून पंचमंडळ व मंडळीचे विभाग यांना सुवार्ता प्रसाराच्या पध्दतिंची शिफारस करणे.

**११०.३.** सुवार्ता प्रसारासाठी चर्च ऑफ दी नॅझरीनने ठरविलेले प्रमुख व प्रांतिक सुवार्ताप्रसार कार्यक्रमांची अमलबजावणी करणारी स्थानिक समिती म्हणून काम करणे.

**११०.४.** नव्याने ख्रिस्ताकडे आलेल्या व्यक्तींना मंडळीचे सभासद होण्याकरिता पात्र होण्यास सातत्याने भक्तिमय जीवन जगण्यास, पवित्र शास्त्र व बंधारण पुस्तकाचा व्यक्तीगत किंवा पाळकांनी चालविलेल्या सभासदत्व शिक्षण वर्गांमध्ये अभ्यास करण्यास, आणि विश्वासाच्या अंगीकाराने स्वीकारलेले सभासद सुवार्ता प्रसाराचे फळ टिकविण्यास सहाय्यभूत होतात हे नेहमी ध्यानात ठेवण्यास उत्तेजन देणे. (२०-२१)

**११०.५.** मंडळीच्या पूर्ण सहभागीतेमध्ये व सेवेमध्ये नवीन सभासद आणण्यासाठी झटून प्रयत्न करणे.

**११०.६.** नवीन सभासदांना अध्यात्मिक मार्गदर्शन मिळावे यासाठी पाळकांच्या सहकार्याने निरंतर शिक्षण वर्गाची व्यवस्था करणे.

**११०.७.** पाळकाने शिफारस केल्याप्रमाणे स्थानिक सुवार्ता प्रसार मोहिमेसाठी सुवार्तिकांची नावे पंचमंडळाला कळविणे. नियुक्त, अधिकृत व नोंदणीकृत सुवार्तिकाच्या सहाय्याने दरवर्षी एक तरी सुवार्ता मोहीम पार पाडावी अशी शिफारस करण्यात येते.

**११०.८.** कोणाही व्यक्तीला, स्थानिक मंडळीचे पूर्ण सभासदत्व देण्यासंबंधी, पाळकाने सुवार्ता प्रसार व सभासदत्व समिती बरोबर त्या व्यक्तीच्या स्वीकाराबाबत विचारविनिमय केल्याशिवाय, सभासद्त्व देता येणार नाही. (१०७.१)

## D. स्थानिक मंडळीच्या सभासदत्वात बदल

**१११. बदली.** एखाद्या सभासदाच्या विनंतीवरून पाळकाने त्याला सभासदत्वाचे बदली पत्र द्यावे. (८१७ मधील नमुना पहा). बदलीपत्र सभासदाच्या इच्छेप्रमाणे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या कोणत्याही स्थानिक मंडळीसाठी असू शकेल. पत्रामध्ये मंडळीचा नामोल्लेख असावा. हे बदलीपत्र तीन महिन्यांसाठी वैध असेल. निर्देशित स्थानिक मंडळीने अशा सभासदाचा स्वीकार केल्याचे सूचनापत्र पूर्वीच्या स्थानिक मंडळीला मिळाल्यावर त्या व्यक्तीचे पूर्वीचे सभासदत्व संपुष्टात येईल. (८१८)

**१११.१ निरवणी दाखला.** एखाद्या सभासदाने मंडळीतून आपले नाव काढून घेण्याची विनंती केली तर पाळक कोणत्याही सुवार्ताप्रसारकीय मंडळीच्या नावाने निरवणीचा दाखला देईल (८१५ मधील नमुना पहा). त्यानंतर दाखला देणाऱ्या मंडळीतील, त्या व्यक्तीचे सभासदत्व ताबडतोब समाप्त होईल. (८१५, ११२.२, ५३९.५)

## E. मंडळीच्या सभासदत्वाची समाप्ती

**११२. सेवक.** एखादा सनदी किंवा दीक्षित सेवक चर्च ऑफ दी नॅझरीन व्यतिरिक्त दुसऱ्या मंडळीत किंवा सेवासंस्थेमध्ये सभासद झाला तर तो सेवक ज्या स्थानिक मंडळीचा सभासद आहे त्या मंडळीचा पाळक ही बाब ताबडतोब प्रांतिक परवाना मंडळाला किंवा प्रांतिक सेवकीय मंडळाला कळवील. प्रांतिक परवाना मंडळाला किंवा प्रांतिक सेवकीय मंडळ सेवकवर्गाच्या त्या सेवकाच्या सभासदत्वाची चौकशी करून खात्री करून घेतील. जर प्रांतिक परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवक मंडळ यांनी त्या सेवकाचे नाव सेवकीय नामावलीमधून कमी करावे असा निर्णय घेतला तर मंडळीचे पाळकही त्या सेवकाचे नाव स्थानिक मंडळीच्या सभासद-नोंद पुस्तकातून कमी करतील व “दुसऱ्या मंडळीला, संप्रदायाला किंवा सेवेला जाऊन मिळाल्यामुळे कमी केले” असा शेरा लिहितील. (५३२.९, ५३८.१०, ५३८.१३-५३८.१४)

**११२.१. सामान्य सभासद.** स्थानिक मंडळीच्या कोणत्याही सभासदाने दुसऱ्या कोणत्याही धर्म संस्थेचे सभासदत्व स्वीकारले, उपदेशकाची सनद अथवा दीक्षा प्राप्त केली किंवा तो स्वतंत्रपणे मिशनरी कार्य किंवा एखाद्या मंडळीचे सेवाकार्य करू लागला तर या कारणांमुळे त्या व्यक्तीचे स्थानिक मंडळीतील सभासदत्व ताबडतोब रद्द होईल. तथापि अशी व्यक्ती ती जेथे सभासद आहे त्या स्थानिक मंडळीच्या पंचमंडळाकडून एक

व त्या प्रांताच्या प्रांतिक सल्लागार मंडळाकडून दुसरे अशी प्रतिवर्षी दोन मान्यता पत्रे प्राप्त करील तर तो सभासद वरील नियमाला अपवाद असेल.

**११२.२. सभासदत्व रद्द करणे.** एखाद्या सभासदाने विनंती केली तर पाळक त्याला सभासदत्व रद्द केल्याचे पत्र देतील (कलम ८१६). या नंतर या व्यक्तीचे मंडळीतील सभासदत्व ताबडतोब समाप्त होते. (१११.१, ११२)

**११२.३.** एखाद्या व्यक्तीला 'निष्क्रिय सभासद' म्हणून घोषित केल्यावर त्या तारखेपासून दोन वर्षानंतर पंचमंडळाच्या ठरावाने त्याचे नाव मंडळीच्या सभासद नोंद पुस्तकातुन काढून टाकण्यात येईल. पंच मंडळाने असा ठराव केल्यावर पाळक सदर सभासदाच्या नावापुढे 'पंचमंडळाने नाव कमी केले' (दिनांक) असा शेरा लिहीतील. (१०९, १३३)

## F. स्थानिक मंडळीच्या कामकाजाच्या बैठकी

**११३.** विचारविनिमय व कामकाज करण्यासाठी स्थानिक मंडळीच्या सभासदांनी एकत्र येणे याला मंडळीची बैठक असे म्हटले आहे. लागू होणारा कायदा, संस्थापनेचे नियम, बंधारण पुस्तकातील शासनाचे नियम, यांना अनुसरुन मंडळीच्या सभासदांनी कामकाज करावे. ही बाब स्थानिक मंडळी, प्रांत व प्रमुख मंडळी (नॅझरीन मंडळी) यांना लागू आहे. सर्व समित्यांचे कामकाज "रॉबर्ट रुल्स ऑफ ऑर्डर" (नवीन प्रत) या नुसार चालेल. (३४, १०४, ११३.७-११३.८, ११५, ५१८)

**११३.१.** ज्या व्यक्ती मंडळीच्या पूर्ण व सक्रिय सभासद आहेत आणि पूर्ण १५ वर्षे वयाच्या असतील त्यांनाच मंडळीच्या बैठकीत मतदान करता येईल. (१०७.३, १०९-१०९.४)

**११३.२.** मंडळीच्या बैठकांमध्ये अनुपस्थित मतदानाची तरतूद नाही.

**११३.३. कामकाज.** मंडळीचा आत्मा व व्यवस्थापन पध्दती यांना अनुरुप असे निवडणुकीसह इतर कामकाज व ज्याची तरतूद इतरत्र केलेली नाही असे काम मंडळीच्या कोणत्याही बैठकीत करता येईल.

**११३.४. मुलकी कायदा पाळणे.** मंडळीची बैठक बोलावणे व कामकाज करणे यासंबंधात मुलकी कायद्यानुसार विशिष्ट पद्धतींचा अवलंब करणे जरूर असेल तर ती पद्धत तंतोतंत पाळावी. (१४२)

**११३.५. बैठकीचा अध्यक्ष.** पाळक, जे स्थानिक मंडळीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात, ते किंवा प्रांताध्यक्ष, अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष, किंवा प्रांताध्यक्ष वा प्रमुखाध्यक्ष यांनी नेमलेली कोणीही व्यक्ती मंडळीच्या वार्षिक अथवा खास बैठकीच्या अध्यक्षपदी असेल. (२१३.१, ३०७.१०, ५१६.१५)

**११३.६. चिटणीस.** पंचमंडळाचा चिटणीस हाच मंडळीच्या सर्व बैठकांचा चिटणीस असेल. त्यांच्या अनुपस्थितीत दुसऱ्या व्यक्तीची तात्पुरता चिटणीस म्हणून निवड करावी. (१३५.४)

**११३.७. वार्षिक सभा.** प्रांतिक परिषद भरण्याच्या अगोदर, ९० (नव्वद) दिवसांच्या आत स्थानिक मंडळीची वार्षिक सभा होईल. वार्षिक सभा भरण्यापूर्वी कमीत कमी दोन रविवारी त्यासंबंधीची जाहीर सूचना व्यासपीठावरून दिली पाहिजे. पंच मंडळाच्या संमतीनुसार ही वार्षिक बैठक एकापेक्षा अधिक दिवस अथवा एकापेक्षा अधिक सत्रामध्ये चालवता येईल.

**११३.८. विशेष सभा**. मंडळीची विशेष सभा पाळक कधीही बोलावू शकतील. पंचमंडळ सुध्दा ही सभा कधीही बोलावू शकतील परंतु त्याकरिता त्यांनी पाळक, किंवा प्रांताध्यक्ष किंवा अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष यांची परवागी घेतलेली असावी. (१०४, ११३.१, ११५-११५.१, १२३-१२३.७, १३७, १३९, १४२.१, १४४)

**११३.९. अहवाल.** मंडळीच्या कामकाजाच्या वार्षिक सभेमध्ये पुढील अधिकारी आपापले अहवाल सादर करतील: पाळक, संडेस्कुल अध्यक्ष, नॅझरीन युवक संघाध्यक्ष, ख्रिस्तवार्ता संघाध्यक्ष, सेविका, स्थानिक सेवक, चिटणीस आणि पंचमंडळाचा खजिनदार. (१३५.२, १३६.५, १४६.६, १५२.२, ५०८, ५१६.७, ५३१.१)

**११३.१०. नामसूचक समिती.** नामसूचक समितीचा उपयोग मंडळीचे अधिकारी, मंडळे व प्रांतिक परिषदेचे प्रतिनिधी ह्याकरिता अशांची नावे सुचवण्याकरिता केला जाईल की ज्यांची नावे इतत्र कुठे सुचविलेली नाहीत.

नामसूचक समितीमध्ये मंडळीच्या पाळकांसह तीनपेक्षा कमी व सातहून अधिक सभासद नसतील. या समितीच्या सभासदांची नावे पाळकांनी सुचवलेली व पंचमंडळाने मान्य केलेली असतील किंवा प्रांताध्यक्ष त्यांची नेमणूक करतील. पाळक या समितीचे अध्यक्ष राहतील. या समितीने नामसूचना केलेल्या सर्व व्यक्ती, कलम ३३ मध्ये

दिल्याप्रमाणे मंडळीच्या अधिकारी होण्यास आवश्यक त्या अटी आपण पूर्ण करतो असे ठामपणे कबूल करतील.

**११३.११. निवडणूक.** मंडळीच्या वार्षिक कामकाजाच्या सभेमध्ये पुढील व्यक्तींची गुप्त मतदान पत्रीका पद्धतीने निवड होईल. कारभारी, विश्वस्त, जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा आणि शिष्यत्व सेवा संघाध्यक्ष (एस डी एम आय), आणि एस डी एम आय मंडळाचे सभासद, अशा प्रकारे निवडून आलेल्या व्यक्ती मंडळीच्या येणाऱ्या वर्षभराकरिता आणि त्यांच्या जागी दुसऱ्या व्यक्ती निवडून येऊन रूजू होईपर्यंत काम करतील. जिथे कायद्याची मान्यता असेल आणि मंडळीच्या उपस्थित सभासदांनी बहुमताने मान्य केल्यास निवडून आलेल्या व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीकरिता सेवा करू शकतील. मंडळीचे अधिकारी म्हणून निवड झालेल्या सर्व व्यक्ती चर्च ऑफ दी नॅझरीनच्या त्याच स्थानिक मंडळीचे सभासद असतील.

आम्ही स्थानिक मंडळ्यांना असा निर्देश देतो की त्यांनी मंडळीकरिता असे अधिकारी निवडावेत की जे स्थानिक मंडळीचे सक्रिय सभासद आहेत, संपूर्ण पवित्रीकरणाचा अनुभव असल्याची जाहीर कबुली देतात, आणि ज्यांचे जीवन पवित्र जीवन जगण्यास पाचारण करणाऱ्या देवाच्या कृपेची सार्वजनिक साक्ष बाळगतात; जे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सिध्दांत, कारभारपध्दती आणि परंपरांशी सुसंगत आहेत, आणि जे स्थानिक मंडळीला उपस्थिती, सक्रिय सेवा, दशांश व दानार्पणांद्वारे विश्वासुरित्या साहाय्य करतात. मंडळीचे पदाधिकारी हे "राष्ट्रांमध्ये ख्रिस्तसादृष्य शिष्य तयार करणे" ह्या कार्यामध्ये सर्वस्वी सहभागी असावेत. (३३, १२७, १३७, १४१, १४२, १४५-४७)

**११३.१२** जेथे कायद्याची मान्यता असेल व जेथे ही पद्धत व निवडून दयावयाच्या व्यक्तींची संख्या ह्यांना मंडळीच्या उपस्थित सभासदांच्या बहुमताने मान्यता मिळाली असेल अशा ठिकाणी पंचमंडळाची प्रथम निवड करावी आणि नंतर कलम १३७ व १४१ यांना सुसंगत अशा रीतीने निवडलेल्या व्यक्तींमधून योग्य त्या प्रमाणात कारभारी व विश्वस्त नेमावेत. जेव्हां पंचमंडळाची निवड ह्या प्रकारे होते, तेथे पंचमंडळ आपल्यावर सोपवलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी स्वत:ला विविध समित्यांमध्ये संघटीत करू शकते. जर मंडळीने कलम १४५ नुसार पंचमंडळांमध्ये शिक्षण समितीची निवड केली असेल तर ती समिती या पंचमंडळाची शिक्षण समिती असेल. स्थानिक मंडळी स्वत:ला सेवा आणि सेवाकार्याकरिता संघटीत करण्यासाठी पर्यायी मंडळे व समित्यांची व्यवस्था

करू शकते. अर्थात त्यासाठी प्रांताध्यक्ष व प्रांतिक सल्लागार मंडळ यांची लेखी संमती पाहिजे व ही व्यवस्था मुलकी गरजांशी सुसंगत असावी. (१४५–१४५.१०)

**११३.१३** कायद्याची मान्यता असल्यास व योग्य प्रकारे बोलावलेल्या मंडळीच्या वार्षिक बैठकीत उपस्थित असणाऱ्या मंडळीच्या सभासदांच्या बहुमताने मान्यता दिल्यास व प्रांताध्यक्षांची संमती असल्यास मंडळीला आपल्या पंच मंडळातील निम्मे सभासद दोन वर्षासाठी किंवा एक त्रितीयांश सभासद तीन वर्षासाठी निवडता येतील. ह्यातील कुठलीही पध्दत स्वीकारलेली असो समान संख्या प्रतिवर्षी निवडण्यासाठी नेमण्यात येईल. ज्यावेळी अशाप्रकारे निवड होईल तेव्हा कारभारी व विश्वस्तांची संख्या कलम १३७ व १४१ शी सुसंगत असली पाहिजे.

**११३.१४** मंडळीच्या वार्षिक सभेमध्ये प्रांतिक परिषदेच्या प्रतिनिधिंची निवड मतपत्रिके द्वारे होईल, किंवा जर वार्षिक सभेत मंडळीच्या सभासदांनी बहुमताने मान्य केले तर पाळकांच्या शिफारशीने व पंचमंडळाच्या मान्यतेने हे प्रतिनिधी निवडल्या जातील. हे कलम २०१–२०१.२ अन्वये प्रमुख परिषदेने ठरविलेल्या प्रतिनिधींच्या संख्येच्या आधारे असेल. हे सर्व निवडलेले प्रतिनिधी त्याच मंडळीचे सक्रिय सभासद असतील. (१०७.३, ११३.११)

**११३.१५.** कलम ३३, २०१.१ आणि २०१.२ नुसार मंडळी सद्दश्य सेवा गट (CTM) यामधून त्या गटाचा पाळक प्रतिनिधींची नियुक्ती करील. जागतिक तरुण संघ (NYI) जागतिक ख्रिस्तवार्ता संघ (NMI) व जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ (SDMI)चे प्रांतिक अधिवेशनांकरिता प्रतिनिधींची नावे सुध्दा त्यांच्या CTM गटाचे पाळक सुचवितील. (१००.१, ८१०, ८११, ८१२)

## G. स्थानिक मंडळीचे वर्ष

**११४.** मंडळीच्या कामकाजाची वर्षे हे मंडळीच्या आकडेवारीच्या वर्षासोबतच चालेल व हेच मंडळीचे वर्ष म्हणून ओळखल्या जाईल.

**११४.१.** प्रांतिक परिषद सुरू होण्याच्या अगोदर ९० दिवसाच्या आत मंडळीचे आकडेवारीचे वर्ष संपेल. जुने वर्ष संपल्यानंतरच्या पहिल्या दिवशी नवीन आकडेवारीचे वर्ष सुरू होईल. प्रांतिक सल्लागार मंडळ या चौकटीत आकडेवारी - वर्षारंभ व वर्ष समाप्ती यांच्या तारखा निश्चित ठरवून देईल. (२२५.१)

## H. पाळकाचे पाचारण

**११५.** एखादा दीक्षित किंवा सनदी सेवक (elder track) यांना मंडळीचे पाळक म्हणून काम करण्यास पाचारण करता येईल. मंडळीच्या योग्यप्रकारे बोलावलेल्या वार्षिक अथवा विशेष सभेमध्ये मंडळीच्या मतदानास पात्र अशा उपस्थित सभासदांच्या दोन तृतीयांश अनुकूल मतांनी पाळकाला पाचारण होईल. हे पाचारण करण्याअगोदर खालील बाबी झालेल्या असाव्यात:

१. पाळकीय उमेदवाराच्या नामसूचनेला प्रांताध्यक्षाची पूर्वमान्यता असावी.

२. जर पाळकीय उमेदवार त्याच मंडळीचा सभासद असेल किंवा त्या मंडळींचा पगारी किंवा पगारी सहाय्यक असेल तर त्याला प्रांतिक सल्लागार मंडळाची मान्यता आवश्यक आहे, आणि

३. मंडळीला हे नाव पंचमंडळाच्या संपूर्ण सभासदांच्या दोन-तृतीयांश गुप्त मतदान पध्दतीद्वारे झालेल्या मतांनी मान्य करून सुचविलेले पाहिजे. ह्या पाचारणाचा पुनर्विचार करणे व ते पुढे चालू ठेवणे यासंबंधीच्या तरतूदी पुढे दिलेल्या आहेत. (११९, १२२-१२५.२, १२९.२, १५९.८, २११.१०, २२५.१६, ५१४, ५३२, ५३३.४, ५३४.३)

**११५.१.** पाळकीय सेवेसंबंधी मंडळीने दिलेल्या पाचारणाबाबत स्वीकार हा संबंधित सेवकाने, ह्या पाचारणाबाबत मतदान झालेल्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत मंडळीला कळवावे.

**११५.२.** पंचमंडळ आणि पाळक यांनी आपल्या अपेक्षा व ध्येये याविषयी परस्परांना निश्चित व स्पष्टपणे लेखी कळविणे जरूरी आहे. (१२२, १२९.३–१२९.४)

**११५.३.** पाळकाने आपल्या सेवेला आरंभ केल्यावर लवकरात लवकर पाळक व मंडळी ह्यांनी नेमणूकीच्या किंवा संबंध प्रतिष्ठापनेच्या उपासनेत सहभागी व्हावे. देवाच्या इच्छेसंबंधी मार्गदर्शन व ऐक्य साजरे करणे हा या उपासनेचा हेतू असेल. शक्य असेल तेथे प्रांताध्यक्षांनी उपासनेचे नेतृत्व करावे.

**११५.४.** पाळकाला पाचारणपत्र देतांनाच त्यांच्या वेतनाची प्रस्तावित रक्कम स्थानिक मंडळीने पत्रामध्ये नमूद करावी. वेतनाची रक्कम ही पंचमंडळ ठरवेल. मंडळी किंवा पंचमंडळ आणि पाळक यांच्यामध्ये ह्या वेतना संबंधी सहमती करार झाल्यावर पाळकाला त्याचे पूर्ण वेतन देणे ही मंडळीची नैतिक जबाबदारी असेल. तरी अशाप्रकारे निश्चित

केलेले वेतन देत राहाण्यास मंडळी असमर्थ झाली, तर मंडळींची ही असमर्थता अथवा विफलता पाळकाला मंडळीवर दिवाणी दावा करण्यास सबळ कारण आहे असे समजले जाणार नाही.

पाळकाच्या प्रत्यक्ष सेवेच्या काळात उभारलेल्या व इतर कार्यासाठी न नेमलेल्या निधीं पेक्षा अधिक रकमेला मंडळी किंवा प्रांतिक सल्लागार मंडळ कायदेशीरपणे कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. असे असताना मंडळी किंवा प्रांतिक सल्लागार मंडळ यावर वर्तमान पाळकाने किंवा त्या आधीच्या पाळकाने कायदेशीर कारवाई केली तर त्या पाळकाचे सेवक पत्र (दीक्षा किंवा सनद) ताब्यात घेण्यासाठी प्रांत योग्य ती पावले उचलेल आणि त्यानंतर त्याचे नाव सेवकीय यादीतून काढून टाकेल.

स्थानिक मंडळीने पाळकाचा प्रवास व बिर्‍हाड हलविणे या खर्चाची सुध्दा तरतूद करावी. (३२-३२.३,१२८.८-१२९.९)

**११५.५.** पहिल्या रविवारच्या अधिकृत उपासने पूर्वी येणाऱ्या सोमवार पासून पाळकाचे वेतन देण्यात येईल.

**११५.६.** पाळकीय व्यवस्था होण्यासाठी सर्व मंडळ्यांनी आपापल्या प्रांताच्या सहकार्याने पर्यायी योजना आखण्याचाही विचार करू शकतात. (३२.३, १२९.८)

**११६.** कुटुंबाचे मुल्य आणि पाळकाने घालून द्यावयाच्या शांतीमय व ऐक्यतापूर्ण जीवनाचा कित्ता ह्याचे महत्व लक्षात घेऊन, मंडळ्यांनी पाळक व साहाय्यक सेवकांना प्रसूती रजा आणि पितृत्व रजा देण्याबाबत विचार करावा. प्रांताध्यक्षांनी आपापल्या प्रांतातील मंडळ्यांना प्रसूती व पितृत्व रजा धोरणे स्वीकारण्यास उत्तेजन द्यावे आणि त्याच्या विकासासाठी तरतूद करावी. या प्रकारच्या धोरणांमध्ये खालील बाबी समाविष्ट असतील:

१. अपेक्षीत अपत्यजन्माच्या अगोदर किंवा अपत्य दत्तक घेण्याअगोदर पाळक व पंचमंडळ यांच्यामध्ये प्रसूती रजा किंवा पितृत्व रजा या बाबतची वेळ व कालावधी या बाबतीत परस्पर करार होणे आवश्यक आहे.

२. प्रसूती रजा व पितृत्व रजा ह्यांचा विचार सुटीच्या दिवसांव्यतिरिक्त वेगळा करण्यात यावा.

३. प्रसूती रजा व पितृत्व रजांच्या काळात पाळकीय व्यवस्था करण्यासाठी मंडळीने पाळक व प्रांताध्यक्ष यांच्याबरोबर विचारविनिमय करणे गरजेचे आहे.

४. वरील प्रसूती रजा व पितृत्व रजा यांच्या काळात पाळकांचा पगार व इतर लाभ चालूच असावेत. या काळात दुसरी काही व्यवस्था केलेली असेल तर त्याचा तपशील पाळक, पंचमंडळाचे चिटणीस व प्रांताध्यक्ष यांच्या सह्यानिशी लेखी स्वरुपात ठेवलेला असावा.

**११७.** ज्या स्थानिक मंडळीला स्थापन होऊन पाच वर्षापेक्षा कमी काळ झालेला असेल किंवा ज्या मंडळीच्या मागील वार्षिक सभेला ३५ पेक्षा कमी सभासद मतदान करण्यास उपस्थित असतील किंवा ज्या मंडळीच्या पाळकाला प्रांताकडून नियमीत पैशाची मदत मिळत असेल त्या पाळकाची नियुक्ती किंवा पुनर्नियुक्ती प्रांताध्यक्ष हे प्रांतिक सल्लागार मंडळाच्या संमतीने करू शकतील. (२११.१७)

**११७.१** ज्या मंडळीच्या मतदान करणाऱ्या सभासदांची संख्या ३५ पेक्षा जास्त आहे किंवा ज्या मंडळीच्या स्थापनेला कमीत कमी पाच वर्ष पूर्ण झालेली आहेत व ज्या मंडळीच्या पाळकाने नियुक्त पाळक म्हणून दोन वर्षाची सेवा पूर्ण केलेली आहे, त्या पाळकाची "नियुक्त दर्जा" काढून टाकण्याची प्रक्रिया सुरू केली जाऊ शकते. ह्या प्रक्रियेमध्ये पाळक व मंडळीच्या संबंधाचे परीक्षण, पंचमंडळाच्या उपस्थित सभासदांचे बहुमत, प्रांताध्यक्षांची मान्यता व प्रांतिक सल्लागार मंडळाची मान्यता असणे या बाबी समाविष्ट आहेत. भविष्यातील चार वर्षांनंतर येणाऱ्या पाळक व मंडळीच्या संबंधाची परिक्षण तारीख ही अंतिम मान्यतेची तारीख राहील.

**११८.** पाळकीय व्यवस्थेसंबंधी पंचमंडळ व प्रांताध्यक्ष यांच्या मध्ये मतभेद झाले तर पंचमंडळ किंवा प्रांताध्यक्ष हा विषय निर्णयासाठी अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांकडे पाठवितील. या निर्णयासंबंधाने पंचमंडळ किंवा प्रांताध्यक्ष या कोणालाही प्रमुखाध्यक्ष मंडळाकडे फेरविचारासाठी विनंती करता येईल. अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांकडे किंवा प्रमुखाध्यक्ष मंडळाकडे पाठविल्या जाणाऱ्या या प्रकारच्या सर्व विनंत्या, फेरविनंत्या किंवा त्यासंबंधीचे युक्तीवाद, हे सर्व लेखी स्वरूपात असाव्यात. ह्या विनंत्या, फेरविनंत्या किंवा त्यासंबंधीचे युक्तिवाद यांची एक प्रत पंचमंडळ किंवा प्रांताध्यक्ष यांच्यापैकी एकाने संबंधित प्रतिपक्षाला पाठवावी. पंचमंडळाच्या विनंती संबंधातील कार्यवृत्तामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल: विनंतीसंबंधाचा ठाराव, ठरावाला पोषक युक्तिवाद, मतप्रदर्शन, या ठरावावर घेतलेल्या मतदानाचा तपशील ज्याचा विचार पाळकीय व्यवस्थेसंबंधी चालू असेल त्या सेवकाने आपले नाव मागे घेतल्यास किंवा पाळकीय सेवेसाठी विचार केल्या

जाणारा उमेदवार उपलब्ध नसेल तर विनंतिची प्रक्रिया ताबडतोब थांबवावी आणि प्रांताध्यक्ष व पंचमंडळ पूर्वीप्रमाणे पाळकीय सेवाव्यवस्था पुढे चालू ठेवतील.

**११९.** सनदी सेवक (elder track) असणाऱ्याला दिलेले पाचारण त्या सेवकाच्या सनदीचे नुतनीकरण केले नाही, तर प्रांतिक परिषदेच्या अखेरीस समाप्त होईल.

**१२०.** ज्या पाळकीय सेवकाला आपल्या पाळकीय पदाचा राजीनामा द्यावयाचा आहे त्याने खाली बाबींची पुर्तता करावी:

१. प्रांताध्यक्षा बरोबर विचारविनिमय करावा;

२. पाळकपद सोडण्यापूर्वी ३० दिवस अगोदर आपला राजीनामा पाळकाने पंच मंडळाला सादर करावा; आणि

३. या राजीनाम्याची एक प्रत प्रांताध्यक्षांना सादर करावी.

राजीनाम्याची प्रत पंचमंडळाला मिळाल्यावर व त्यावर मान्यतेसाठी प्रांताध्यक्षांची स्वाक्षरी असेल तर पाळकीय सेवा समाप्तीची तारीख ३० दिवसांच्या आत निश्चित करावी.

**१२०.१** राजीनामा देणारे पाळक यांनी पंचमंडळाचे चिटणीस यांच्या सहकार्याने सभासदांची यादी त्यांच्या वर्तमान पत्त्यासह तयार करावी. ही यादी संख्येच्या दृष्टीने मागील वर्षाच्या प्रांतिक परिषदेच्या कार्य वृत्तातील यादीशी जुळणारी असावी. त्यात चालू वर्षातील सभासद कमी झाल्याने किंवा अधिक झाल्याने पडेल तेवढाच फरक असेल.

**१२१.** पंचमंडळाच्या शिफारशीने व प्रांताध्यक्षांच्या लेखी मान्यतेने, मंडळी सह-पाळकांची सेवेकरिता निवड करेल. त्यासाठी खालील अटींचा लागू राहतील:

१. सहपाळक पंच मंडळाबरोबर प्रांताध्यक्षाच्या मार्गदर्शनात काम करून सामायिक जबाबदारी व अधिकार याबाबत योजना तयार करेल.

२. पाळकीय सेवा यादृष्टीने सह-पाळकांचा दर्जा सारखाच असेल. कायद्याची अपेक्षा असेल तर पंचमंडळ एका व्यक्तीची पंचमंडळाचा व मंडळीचा संस्थापनेचाही अध्यक्ष म्हणून सेवा करण्यास नियुक्त करू शकेल.

३. मंडळी व पाळक संबंधाच्या परीक्षणाची प्रक्रिया कलम १२३–१२३.७ नुसार आयोजित केल्या जाईल.

४. ज्या मंडळीच्या पाळकाची नियुक्ती झालेली नाही आणि पाळकाच्या सेवेला कमीत कमी दोन वर्ष झाले असतील ती मंडळी कलम ११५ नुसार एक किंवा अधिक सेवकांची सह-पाळक म्हणून भर घालू शकते. प्रांताध्यक्षांच्या

मान्यतेनुसार व पंचमंडळाच्या दोन तृतियांश मतांनी, सह पाळकाची भर घालावी की नाही हे ठरविण्याकरिता मतदान करेल. सह-पाळक उमेदवाराला मंडळीचा सह-पाळक म्हणून कार्य करण्यासाठी मान्यता प्राप्त होण्याकरिता मंडळीच्या दोन तृतीयांश मतांची आवश्यकता आहे.

५. जर दोन-तृतीयांश मते मिळाली तर त्याच तारखेपासून दोन वर्षाचा सेवा कालावधी प्रत्येक सह-पाळकासाठी सुरू होईल. पाळकीय सेवेच्या दुसरे वर्ष समाप्तिच्या तारखेच्या ६० दिवस अगोदरपर्यंत कुठल्याही दिवशी मंडळी व पाळक संबंधाचे परिक्षण केले जाईल. (११५, १२३-१२३.७)

**१२१.१.** सह-पाळकाने राजीनामा दिला किंवा त्यांची सेवा समाप्त झाली, तर त्यानंतर ६० दिवसाच्या आत प्रांताध्यक्ष किंवा त्यांनी पाठविलेला प्रतिनिधी कलम १२३-१२३.७ नुसार मंडळी व पाळक संबंधाचे परिक्षणाचे आयोजन करतील. पंचमंडळ जर सह-पाळकाला पाचारण न करण्याचा निर्णय घेत असेल तर अशा निर्णयाला प्रांताध्यक्षाची मान्यता व मंडळीच्या दोन तृतियांश मतांची आवश्यक्ता आहे.

### I. मंडळी व पाळक यांचे संबंध

**१२२.** प्रत्येक वर्षी पाळक व पंचमंडळ योजना सत्राचे आयोजन करून मंडळी व पाळक यांच्या अपेक्षा आणि ध्येय्यांचे नुतनीकरण करतील. मंडळी व पाळक यांच्यामध्ये ध्येय्य, अपेक्षा आणि उद्दीष्टे यांच्याबाबत झालेल्या लेखी कराराला सुध्दा अद्ययावत करावे. ह्या कराराची लेखी प्रत प्रांताध्यक्षाला सादर करावी. (११५.२, १२९.४)

**१२२.१** पाळक व मंडळ्या परस्परांच्या अपेक्षा स्पष्ट शब्दांत मांडून समजून घेण्याचा आणि काही मतभेद असल्यास ते मत्तय १८:१५-२० व गलती ६:१-५ यामध्ये दिलेल्या तत्त्वांच्या आधारे सोडविण्याचा प्रयत्न करतील. मंडळीमध्ये सहकार्य व समेटाच्या आत्म्याने खालील तत्वांचा उपयोग केल्या जाईल:

१. मंडळीचा एक किंवा अधिक सभासद पाळकाबरोबर किंवा पंचमंडळाच्या सभासदाबरोबर समोरासमोर बसून चर्चा करून मतभेद दूर करतील. एखादा सभासद किंवा पंचमंडळाचे सर्व सभासद पाळकांसोबत समोरासमोर बसून चर्चा करून मतभेद दूर करण्याचा प्रयत्न करतील.

२. समोरासमोर बसून चर्चा करुन मतभेद दूर करण्याचे हे दोन्ही प्रकार अपयशी होत असतील, तर तक्रारकर्त्याने मंडळीच्या किंवा पंचमंडळाच्या

अध्यात्मिक दृष्टीने परिपक्व असलेल्या एक किंवा दोन व्यक्तींना बरोबर घेऊन मतभेद सोडविण्याचा प्रयत्न करावा.

३. प्रयत्न करणाऱ्या लघूगटात समाविष्ट व्यक्तींनी हे मतभेद पंचमंडळासमोर तेव्हांच आणावेत जेव्हां समोरासमोर बसून केलेली चर्चा आणि लघूगटाचे प्रयत्न अपयशी झालेले असतील. असे झाल्यास, पंचमंडळाने प्रीती, स्वीकार व क्षमेच्या आत्म्याने आणि मंडळीच्या शिस्तीला अनुसरून मतभेद मिटविण्याचे कार्य करावे. (१२३-१२६-२, १२९.१)

## J. मंडळी व पाळक संबंधाचे नुतनीकरण

## १२३. मंडळी-पाळक यांच्या संबंधांचे नियमीत परीक्षण:

मंडळी व पाळक ह्यांच्या संबंधाचे परीक्षण पंचमंडळ, प्रांताध्यक्ष किंवा प्रांताध्यक्षाने नेमलेले दीक्षित सेवक किंवा सामान्य सभासद यांच्याशी बैठक करून करेल. पाळकीय सेवेचे दुसरे वर्ष पूर्ण होण्याअगोदरच्या ६० दिवसाच्या आत व त्यानंतर दर चार वर्षांनी हे परीक्षण केल्या जाईल. ह्या परिक्षण बैठकीमध्ये मंडळी व पाळक हे संबंध पुढे चालू ठेवावे किंवा नाही या प्रश्नावर चर्चा होईल. पंचमंडळाचे औपचारीक मतदान घेण्याशिवाय एकमत प्राप्त होते की नाही हे शोधून काढणे हा यामागचा उद्देश आहे.

**१२३.१.** प्रांताध्यक्ष किंवा त्याने नेमून दिलेला दीक्षित सेवक किंवा सामान्य सभासद पंचमंडळा बरोबरच्या बैठकीचा वेळ ठरवून परिक्षण पूर्ण करण्यास जबाबदार असेल. यासाठी कोणत्या परीक्षण पद्धतीचा उपयोग करावा हे प्रांताध्यक्ष ठरवील. पाळकाबरोबर विचारविनिमय ह्या बैठकीची वेळ ठरविली जाईल. पंचमंडळाच्या कार्यकारी बैठकीत ही परीक्षण बैठक घेतली जाईल. बैठकीत पाळक उपस्थित असेल. प्रांताध्यक्षांच्या इच्छेनुसार परीक्षणाचे काही कामकाज पाळकाच्या अनुपस्थितीत केले जाईल. पाळकाची पत्नी जर पंचमंडळाची निवडलेली सभासद असेल तर ती ह्या बैठकीत सहभागी होऊ शकणार नाही. तसेच पाळकाचे जवळचे नातेवाईक मंडळात असतील तर त्यांनीही प्रांताध्यक्षाच्या किंवा त्यांनी नेमून दिलेल्या प्रतिनिधीच्या विनंतीनुसार बैठकीत उपस्थित असू नये.

**१२३.२.** पाळकीय सेवेच्या परीक्षणाच्या या बैठकीचा उद्देश स्पष्ट करणारी सार्वजनिक किंवा लेखी स्वरुपातील जाहिरात, बैठकीच्या अगोदर येणाऱ्या रविवारी मंडळीला देण्यात यावी.

**१२३.३.** मंडळी व पाळक यांचे संबंध सुरू राहाण्याबाबतचा प्रश्न मंडळीसमोर ठेवण्यात येऊ नये असे मत जर पंचमंडळ देत असेल तर मंडळी व पाळक हा संबंध तसाच पुढे चालू राहील.

**१२३.४.** पंचमंडळ, पाळकांना मंडळीवर सेवा करण्यास दिलेल्या पाचारणाबाबतचा प्रश्न मंडळीच्या सभासदांसमोर मांडण्याबाबत मतदान करू शकते. पंचमंडळाचे मतदान गुप्त मतपत्रिकेद्वारे घेण्यात येईल व ते मतदानास उपस्थित पंचमंडळाच्या सभासदांच्या दोन-तृतीयांश मतांनी मान्य होईल.

**१२३.५.** पंचमंडळाने, मंडळी व पाळक हे संबंध पुढे सुरू राहण्याबाबतच्या प्रश्नाला मंडळीच्या सभासदांसमोर मांडण्याबाबत मतदान केल्यास, तर असे मतदान झालेल्या दिवसापासून ३० दिवसांच्या आत रीतसर रित्या मंडळीची खास सभा बोलावून हा प्रश्न मंडळीसमोर सादर केल्या जाईल. "मंडळी व पाळक हा संबंध पुढे चालू ठेवावा की नाही?" असा प्रश्न मंडळीसमोर मांडण्यात येईल, यावर मतपत्रिकाद्वारे मतदान घेण्यात येईल. मंडळी व पाळक हा संबंध पुढे चालू ठेवण्यासाठी, जिथे मुलकी कायदा किंवा राष्ट्र जर काही वेगळी अपेक्षा मांडत नसेल, तर मंडळीचे दोन तृतीयांश मत आवश्यकता राहील.

**१२३.६.** मंडळी व पाळक हे संबंध पुढे चालू ठेवावेत असे मत जर मंडळीने दिले तर जणू काय मतदान घेण्यातच आले नाही असे समजून मंडळी व पाळक हे संबंध पुढे चालू राहतील. आणि मंडळी व पाळक संबंध पुढे चालू ठेऊ नयेत असे मतदान झाल्यास पाळकाची त्या मंडळीवरील सेवा, मतदान झाल्यापासून ३० दिवसांनंतर आणि १८० दिवसांच्या आत, प्रांताध्यक्षाने ठरवलेल्या तारखेला संपुष्टात येईल. मंडळीने केलेल्या मतदानानुसार न करण्याचे किंवा त्यांचे मत न स्वीकारण्याचे पाळकाने ठरविले तर पाळक आपला राजीनामा सादर करतील. असे झाल्यास पाळकाने मंडळीने केलेल्या मतदानानुसार न करण्याचे किंवा मंडळीचे मत न स्वीकारण्याचा निर्णय केल्यापासून ३० दिवसांनंतर आणि १८० दिवसांच्या आत, पाळकाची त्या मंडळीवरील सेवा, प्रांताध्यक्षाने ठरवलेल्या तारखेला संपुष्टात येईल. (१२०)

**१२३.७.** मंडळी व पाळक संबंधाच्या नियमीत परीक्षणाचा भाग म्हणून, पाळक व पंचमंडळ, मंडळीचे सेवाकार्य, दृष्टांत व मंडळीची मूलभूत मुल्ये यांच्या पूर्तीप्रती मंडळीची प्रगती कशी आहे यासंबंधी आपला अहवाल प्रांताध्यक्षाला सादर करतील.

**१२४.** मतमोजणी मंडळाचे अध्यक्ष मतपत्रिका द्वारे प्राप्त झालेला निर्णय मंडळी मध्ये जाहीर करण्याअगोदर पाळकाला वैयक्तिक रीतीने सांगतील.

**१२५. मंडळी व पाळक संबंधाचे विशेष परीक्षण.** मंडळी व पाळक संबंधाच्या नियमीत परीक्षण काळादरम्यान स्थानिक पंचमंडळाची बैठक ही अधिकृतरित्या विशेष परीक्षण सभा होईल. त्याकरिता निवडून आलेल्या पंचमंडळाच्या संपूर्ण सभासदांच्या बहुमताने प्रांताध्यक्ष किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधींच्या अध्यक्षतेत हे होईल.

**१२५.१.** ही मंडळी व पाळक संबंधाची विशेष परीक्षण सभा कार्यकारी सत्रात (पाळकासहीत पंचमंडळ) आयोजीत करण्यात येईल. प्रांताध्यक्षाच्या इच्छेनुसार परीक्षण सभेचे काही कामकाज पाळकाच्या अनुपस्थितीत करता येईल. जर पाळकाची पत्नी ही पंचमंडळाची निवडून आलेली सभासद असेल तर तिला ह्या परिक्षण सभेमध्ये उपस्थित राहाता येणार नाही. ह्या व्यतिरिक्त प्रांताध्यक्ष किंवा त्यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी हे पाळकाच्या जवळच्या नातेवाईकाला ह्या परीक्षण सभेत उपस्थित न राहण्यास सांगू शकतात.

**१२५.२.** जर प्रांताध्यक्ष व पंचमंडळ अशा मताचे आहे की मंडळी व पाळक हे संबंध पुढे चालू राहावेत की नाही हा प्रश्न मंडळीसमोर मांडल्या जावा तर, जिथे मुलकी कायदा किंवा राष्ट्र काही वेगळी अपेक्षा मांडत नसेल तिथे, प्रांताध्यक्ष आणि स्थानिक पंचमंडळ, सर्व उपस्थित सभासदांच्या दोन तृतीयांश मताने हा प्रश्न मंडळीसमोर मांडण्याचा आदेश देऊ शकते. “मंडळी व पाळक हा संबंध पुढे चालू ठेवावा की नाही?” असा प्रश्न मंडळीसमोर मांडण्यात येईल.

**१२५.३.** मतदानास आवश्यक वयपूर्ती झालेले व मतदान करणाऱ्या उपस्थित मंडळीच्या मतपत्रिकेद्वारे दिलेल्या दोन तृतियांश मताने, जिथे मुलकी कायदा किंवा राष्ट्र काही वेगळी अपेक्षा मांडत नसेल तिथे, जर मंडळी ही मंडळी व पाळक संबंध हे पुढे चालू असू द्यावेत असा निर्णय घेते तर मंडळी व पाळक हे संबंध जणू काही हे मतदान घेण्यातच आले नाही असे पाळकीय सेवेचा कालवधी पूर्ण होईपर्यंत चालू राहतील.

**१२५.४.** परंतु, मतदानाद्वारे, मंडळी व पाळक हे संबंध पुढे चालू राहावेत असा निर्णय करण्यास मंडळी अपयशी ठरल्यास असे मतदान झाल्यापासून १८० दिवसाच्या आत प्रांताध्यक्षाने ठरविलेल्या तारखेस पाळकाचे त्या मंडळीवरील पाळकत्व संपुष्टात येईल.

**१२५.५.** मंडळीने केलेल्या मतदानानुसार न करण्याचे किंवा त्यांचे मत न स्वीकारण्याचे पाळकाने ठरविले तर पाळक आपला राजीनामा सादर करतील. असे झाल्यास पाळकाने मंडळीने केलेल्या मतदानानुसार न करण्याचे किंवा मंडळीचे मत न स्वीकारण्याचा निर्णय केल्यापासून ३० दिवसांनंतर आणि १८० दिवसांच्या आत, पाळकाची त्या मंडळीवरील सेवा, प्रांताध्यक्षाने ठरवलेल्या तारखेला संपुष्टात येईल. (११३.८, १२३-१२४)

**१२६. स्थानिक मंडळीवरील संकट**. एखाद्या मंडळीवर आणीबाणीच्या परिस्थितीत किंवा पेचप्रसंगातून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे असे कळल्यास प्रांताध्यक्षांना प्रांतिक सल्लागार मंडळाच्या मान्यतेने परिस्थितीचे परीक्षण करण्यास व मंडळीवरील हे संकट टाळण्याकरिता आवश्यक प्रक्रिया अंमलात आणण्यासाठी एका समितीची स्थापना करण्याचा अधिकार असेल. या समितीत प्रांतिक सल्लागार मंडळातील दोन दिक्षीत सेवक व दोन सामान्य सभासद असतील, आणि प्रांताध्यक्ष या समितीचे अध्यक्ष असतील. (२११.३)

**१२६.१.** जेव्हां प्रांताध्यक्ष व प्रांतिक सल्लागार मंडळाने स्थानिक मंडळीला आर्थिक, नैतिक किंवा इतर प्रकारच्या संकटात आहे असे जाहीर केलेले आहे आणि त्यांच्या मते हे संकट मंडळीच्या भविष्यावर आणि स्थैर्यावर गंभिर परिणाम करणारे आहे, तेव्हां, खालील बाबी करण्यात येतील :

अ. मंडळी व पाळक हे संबंध पुढे चालू ठेवावे किंवा नाही हा प्रश्न प्रांताध्यक्ष किंवा त्यांनी नेमून दिलेला प्रांतिक सल्लागार मंडळाचा एखादा सदस्य स्थानिक मंडळी पुढे ठेवील. जणू काय पंचमंडळानेच कलम १२३-१२३.७ नुसार ह्याबाबत मतदान व्हावे अशी विनंती केलेली आहे असे समजून हे करण्यात येईल.

ब. अख्त्यारी प्रमुखाध्यक्षाच्या मान्यतेवरुन आणि प्रांतिक सल्लागार मंडळाच्या बहुमताने पाळक आणि/किंवा पंचमंडळ यांची सेवाकालावधी समाप्त करता येईल. ज्या मंडळीला ती संकटात आहे असे जाहीर करण्यात आले आहे करिता प्रांताध्यक्ष हे प्रांतिक सल्लागार मंडळाच्या संमतीने पंचमंडळाच्या सभासदांची नेमणूक करतील. प्रांतिक सल्लागार मंडळाच्या ह्या कृतिची माहिती अख्त्यारी प्रमुखाध्यक्षाला ३० दिवसाच्या आत पाठविली जाईल. (२११.३)

**१२६.२.** जेव्हां प्रांताध्यक्षाच्या मते संकटात आहे असे जाहीर केलेली स्थानिक मंडळी कलम १२६.१ मध्ये दिलेल्या तरतूदीनुसार केलेल्या मध्यस्थिची पूर्ती करते व आणि सामान्य परिस्थितीमध्ये ती आपली सेवा पुन्हा सुरू करण्यास तयार आहे तेव्हां सल्लागार

मंडळाच्या बहुमताने त्या मंडळीला संकटातून बाहेर आलेली असे जाहीर करता येईल. प्रांतिक सल्लागार मंडळाच्या ह्या कृतिची माहिती अख्त्यारी प्रमुखाध्यक्षाला ३० दिवसाच्या आत पाठविली जाईल. (२११.४)

## K. स्थानिक पंचमंडळ

**१२७. सभासदत्व.** प्रत्येक स्थानिक मंडळींमध्ये पंचमंडळ असेल. त्यामध्ये स्थानिक मंडळीचे पाळक, जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाध्यक्ष (एस डी एम आय), जागतिक नॅझरीन युवक संघाध्यक्ष (एन वाय आय), जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघाध्यक्ष (एन एम आय), स्थानिक मंडळीचे कारभारी, आणि विश्वस्त व मंडळीने वार्षिकसभेमध्ये शिक्षण समिती म्हणून निवडून दिलेले एस डी एम आय मंडळाचे सदस्य, हे सभासद असतील. पाळकीय सेवकाची पत्नी किंवा पती ख्रिस्त वार्ता संघाचा अध्यक्ष असेल आणि ती पंचमंडळाची सदस्य म्हणून काम न करण्याचे निवडत असेल तर, त्यांच्या जागी उपाध्यक्ष हे पंचमंडळाचे सदस्य असू शकतील; परंतु, जर ते पंचमंडळाचे सभासद म्हणून काम करू इच्छित असतील तर मंडळी व पाळक संबंध परीक्षण सभेत ते सहभाग घेऊ शकणार नाहीत.

पंचमंडळात पंचविस (२५) पेक्षा जास्त सभासद नसावेत. मंडळीचे पाळक व प्रांताध्यक्षांनी मान्यता न दिलेले दीक्षित सेवक आणि सनदी सेवक, पाळक व प्रांताध्यक्षांची मान्यता असलेल्यांचा अपवाद वगळून, आणि मंडळीकडून पगार प्राप्त करणाऱ्या व्यक्ती पंच मंडळाचे सभासद राहणार नाहीत. ज्या सनदी सेवकांना कोणतेही नेमून दिलेले कार्य नाही आणि जे आवश्यक अभ्यासक्रम पूर्ण करत असतील किंवा नॅझरीनच्या संस्थेमध्ये उच्च शिक्षण घेत असतील त्यांना पाळक व पंचमंडळ यांच्या शिफारशीने प्रांताध्यक्ष 'अपवाद' म्हणून गणतील. असल्या सेवकांना प्रांतिक परिषदेत प्रांतिक सनदीचे नुतनीकरण करण्याबाबत शिफारस देण्याच्या पंचमंडळाच्या कृतीमध्ये भाग घेता येणार नाही.

जे स्थानिक मंडळीचे सक्रिय सभासद आहेत, संपूर्ण पवित्रीकरणाचा अनुभव असल्याची जाहीर कबुली देतात, आणि ज्यांचे जीवन पवित्र जीवन जगण्यास पाचारण करणाऱ्या देवाच्या कृपेची सार्वजनिक साक्ष बाळगतात; जे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सिध्दांत, कारभारपध्दती आणि परंपरांशी सुसंगत आहेत, आणि जे स्थानिक मंडळीला उपस्थिती, सक्रिय सेवा, दशांश व दानार्पणांद्वारे विश्वासुरित्या साहाय्य करतात अशांनाच

मंडळीचे पदाधिकारी म्हणून निवडण्याचे निर्देश आम्ही स्थानिक मंडळ्यांना देतो. मंडळीचे पदाधिकारी हे "राष्ट्रांमध्ये ख्रिस्तसादृष्य शिष्य तयार करणे" ह्या कार्यामध्ये सर्वस्वी सहभागी असावेत. (३३, ११३.११, १३७, १४१, १४५-१४७, १५२.२, १५९.४)

**१२७.१.** पाळकीय स्थित्यंतराच्या काळात जर मंडळीची वार्षिक सभा येत असेल तर त्यावेळी खालील प्रस्ताव करण्यात येऊ शकेल :

प्रांताध्यक्षाच्या अध्यक्षतेखाली तयार झालेली नामसुचक समिती, प्रांताध्यक्षाच्या संमतीने मंडळी समोर सध्याचे पंचमंडळ हेच पुढील एक वर्षासाठी पंचमंडळ म्हणून काम करेल असा ठराव मांडेल. हा ठराव मंडळीची वार्षिक सभा बोलावण्याच्या ३० दिवस अगोदर मंडळी समोर ठेवावा. हा ठराव मंडळीच्या योग्य रीतीने बोलावण्यात आलेल्या खास सभेमध्ये उपस्थित असलेल्या व मतदानास पात्र असलेल्या सभासदांनी बहुमताने स्वीकारलेला असावा परंतु या खास सभेत ह्या ठारावाचा स्वीकार झाला नाही, तर येणाऱ्या मंडळीच्या वार्षिक बैठकीत नेहमीप्रमाणे पंच मंडळाची निवड होईल.

**१२८. सभा.** मंडळीच्या कामकाजाच्या वर्षारंभी पंचमंडळ आपल्या कार्याला सुरुवात करेल व कमीतकमी दोन महिन्यातून एकदा पाळक किंवा प्रांताध्यक्ष यांनी बोलावल्या नुसार कामकाजाच्या बैठका होतील. पंचमंडळाचा चिटणीस पाळकाच्या मान्यतेने व जेथे पाळक नसेल तेथे प्रांताध्यक्ष यांच्या मान्यतेने पंचमंडळाची बैठक बोलावू शकतो. पंचमंडळाच्या सभा किंवा मतदान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने घेतल्या जाऊ शकते. पंचमंडळाच्या सभेकरिता एका खोलीत बसून मतदान घेतल्यावर त्याला जेवढे महत्त्व किंवा वजन असते तेवढेच महत्व इलेक्ट्रॉनिक सभांना व मतदानाला असेल. मंडळीची वार्षिक सभा आणि मंडळीचे कामकाजाचे वर्षारंभ यांच्या दरम्यानच्या काळात नव्याने निवडून आलेले पंचमंडळ स्वत:ला संघटीत करण्यासंबंधाने सभा घेऊ शकेल व त्यावेळी तरतुदीनुसार मंडळाचे चिटणीस आणि खजिनदार व ज्यांना निवडण्याची जबाबदारी पंचमंडळावर आहे असे मंडळीचे इतर अधिकारी यांची निवड त्या बैठकीत होईल. (१२९.१९-१३०)

**१२९. कामकाज. पंमंडळाचे कामकाज** पुढील प्रमाणे असेल:

**१२९.१.** स्थानिक मंडळीतील ज्या कामाची अन्य प्रकारे व्यवस्था झाली नसेल त्या कामांची व मंडळीच्या हिताची पाळकाच्या सहमतीने काळजी घेणे. (१५५, ५१८)

**१२९.२.** एखादा दीक्षित किंवा सनदी सेवक मंडळीचा पाळक होण्यास योग्य आहे असे वाटल्यास मंडळी समोर त्याचे नाव निवडीसाठी ठेवणे. मात्र हे नाव मंडळी समोर ठेवण्या अगोदर त्यासाठी कलम ११५ नुसार प्रांताध्यक्षांची मान्यता असावी. (१५९.८, २११.१०, २२५.१६)

**१२९.३.** मंडळीच्या पाळकपदावर येणाऱ्या पाळकाला सहकार्य करून ध्येये व अपेक्षा यांचा लेखी स्वरूपातील मसुदा तयार करणे. (११५.२)

**१२९.४.** वर्षातून एकदा पाळकांच्या बरोबर विचार करून अपेक्षा, ध्येये, योजना व उद्दिष्टे याबद्दल स्पष्ट लेखी समज अद्ययावत करण्याच्या उद्देशाने एक योजना सत्र आयोजित करणे. (१२२)

**१२९.५.** पाळकाला रीतसर पाचारण करून त्याची नियमीत नेमणूक करी पर्यंतच्या काळात प्रांताध्यक्षाच्या मान्यतेने पाळकीय सेवेसाठी तात्पुरत्या पाळकाची व्यवस्था करणे. (२१२, ५२४)

**१२९.६.** मंडळी, मंडळीच्या सहाय्यक संस्था (एन एम आय, एन वाय आय, एस डि एम आय), बालवाडी, आठवडी शाळा इत्यादीसाठी उत्पन्न व खर्चाचा तपशील दर्शविणारी अर्थव्यवस्था तयार करणे.

**१२९.७.** पंचमंडळातून अशा समितीची स्थापना करणे की जिच्या जबाबदारीमध्ये खालील बाबी समाविष्ट असतील: (अ) मंडळीच्या अर्थव्यवस्थेवर नियंत्रण ठेवून लक्ष देणे, (ब) मंडळीची आर्थिक स्थिती व काळज्यांचा पंचमंडळाला अहवाल सादर करणे.

**१२९.८.** पाळकाला मिळणाऱ्या वेतन, आर्थिक फायदे व निवृत्ती-लाभ यांच्या रक्कमा निश्चित करून प्रतिवर्षी त्याबद्दल एकदातरी पुनर्विचार करणे. (३२.३, ११५.४, ११५.६, १२३-१२३.७)

**१२९.९.** पाळक, तात्पुरते पाळक व मंडळीचे इतर पगारी सेवक यांच्या वेतनाची तरतूद करण्यास, अर्थव्यवस्थेची साधने व मार्गांची तरतूद करणे व तसेच योजना व अर्थसंकल्प करून पाळक व मंडळीचे इतर सेवक यांच्या निरंतर शिक्षण समर्पणाला प्रोत्साहन देऊन साहाय्य करणे. (११५.४)

**१२९.१०.** पाळकाची पाळकीय सेवा सुदृढ राहण्यासाठी व त्यांचे आध्यात्मिक जीवन बलवान होण्यास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने पंचमंडळाने प्रांताध्यक्ष यांच्या सल्ल्याने पाळकाला त्यांच्या एका मंडळीवरील सततच्या सात वर्षाच्या सेवेनंतर सुट्टीची तरतूद

करावी. ह्या सुट्टीचा वेळ व कालमर्यादा पाळक, पंचमंडळ व प्रांताध्यक्ष यांच्या सल्ल्याने ठरवावा. हे अगदी प्रखरतेने सांगण्यात येते की या काळात पाळकाचे पूर्ण वेतन दिले जावे व त्या काळात पंचमंडळाने संदेश वाहकाची व्यवस्था करावी. प्रथम दोन वर्षाने व पुढे सहाव्या वर्षी मंडळी व पाळक संबंधाचे परीक्षण येते तेव्हां पाळकाची मंडळीवरील सेवा पुढे चालू राहण्याचे ठरल्यावर, या परीक्षण प्रक्रियेचा भाग म्हणून प्रांताध्यक्षाने ह्या बाबतीत पंचमंडळाला संबोधून बोलावे. स्थानिक मंडळ्यांनी पाळकांच्या ह्या सातव्या वर्षाच्या सुट्टी बाबतची धोरणे व प्रक्रिया प्रस्थापित करून लागू करण्याबाबत मार्गदर्शन करण्याकरिता जागतिक सेवकीय विकास कार्यालय साहीत्य तयार करून त्याचे वितरण स्थानिक मंडळ्यांना करेल. ह्या सप्तवार्षिक सुट्टीसंबंधीचे धोरणे उपयोग होईल. पंचमंडळाच्या इच्छेनुसार याच तत्वाचे व धोरणांचे लागूकरण पाळकाचे मदतनीस यांना देखील करण्यात येईल.

**१२९.११.** मंडळीच्या सुवार्तिकाचे वेतन व घर-भत्ता ठरविणे व मंडळीने अशा व्यक्तीला पाचारण करण्याच्या वेळी त्याला त्या बद्दल माहिती देणे.

**१२९.१२.** पाळकाने शिफारस केलेल्या एखाद्या व्यक्तीला (अ) स्थानिक सेवक, किंवा (ब) सामान्य सेवक म्हणून सनद प्रदान करणे किंवा त्या सनदीचे नुतनीकरण करणे. (५०३.३-५०३.५, ५३१.१-५३१.३, ८१३)

**१२९.१३.** योग्य वाटणाऱ्या व पाळकाने नाव सुचविलेल्या कोणाही व्यक्तीला सेवाकार्यातील भूमिका पार पाडण्यासाठी प्रमाणपत्र द्यावे अशी शिफारस करणे. यामध्ये स्थानिक मंडळीच्या बाहेर सेवा करण्यास पात्र समजण्यास इच्छुक अशा सामान्य व सेवकीय उमेदवाराचा समावेश असेल. मात्र बंधारण पुस्तकातील तरतुदीनुसार अशी शिफारस देणे आवश्यक असेल तरच ती द्यावी.

**१२९.१४.** योग्य वाटणाऱ्या व पाळकाने नाव सुचविलेल्या कोणाही व्यक्तीला सनदी सेवक म्हणून सनद देण्यात यावी किंवा सनदपत्राचे नुतनीकरण करण्यात यावे अशी शिफारस प्रांतिक परिषदेकडे करणे. (५३१.५, ५३२.१)

**१२९.१५.** योग्य वाटणाऱ्या व पाळकाने नाव सुचविलेल्या सनदी सेविकेच्या सनदपत्राचे नुतनीकरण करण्यासाठी कलम ५०८ नुसार प्रांतिक परिषदेला शिफारस करणे.

**१२९.१६.** पाळकाने मान्यता दिल्यावर जागतिक शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाच्या मंडळाने (एस डी एम आय) सुचविल्या नुसार लेकरांची सेवा-संचालक व प्रौढ शिक्षण संचालक निवडणे. (१४५.६)

**१२९.१७.** जागतिक नॅझरीन युवक संघाच्या घटनेप्रमाणे स्थानिक मंडळीतील युवक संघाने निवडलेल्या अध्यक्षाला मान्यता देणे.

**१२९.१८.** बालवाडी ते सेकंडरी स्कूल पर्यंत (जन्मापासून सेकंडरी स्कूल पर्यंत) च्या ज्या शाळा आहेत त्यांच्या व्यवस्थापकांची केलेली निवड मान्य करणे. (१५१, १५९.१, २११.१३, ५१६.१०)

**१२९.१९.** कलम ३३ नुसार मंडळीच्या सभासदांमधून जी व्यक्ती मंडळीचा अधिकारी होण्यास आवश्यक पात्रतांची पूर्ती करतो तिची मंडळीचा चिटणीस म्हणून निवड करणे. ही निवड नवीन पंचमंडळाच्या पहिल्याच बैठकीत होईल. चिटणीसाची ही सेवा मंडळीचे येणारे कामकाजाचे वर्ष संपेपर्यंत आणि त्याच्या जागेवर दुसऱ्याची निवड होऊन ती व्यक्ती रुजु होई पर्यंत चालू राहील. त्या व्यक्तीची, योग्यरीतीने बोलावलेल्या स्थानिक मंडळीच्या सभेत पंचमंडळाचा सभासद म्हणून निवड झालेली असेल तरच तिला मतदान करण्याचा हक्क राहील. (३३, ११३.६-११३.८, ११३.११, १२८, १३५.१-१३५.७)

**१२९.२०.** कलम ३३ नुसार मंडळीच्या सभासदांमधून जी व्यक्ती मंडळीचा अधिकारी होण्यास आवश्यक पात्रतांची पूर्ती करतो तिची मंडळीचा खजिनदार म्हणून निवड करणे. ही निवड पंचमंडळाच्या पहिल्याच बैठकीत होईल. खजीनदाराची ही सेवा मंडळाचे येणारे वर्ष संपेपर्यंत आणि त्याच्या जागेवर दुसऱ्याची निवड होऊन ही व्यक्ती कामावर रुजू होईपर्यंत चालू राहील. त्या व्यक्तीची, योग्यरीतीने बोलावलेल्या स्थानिक मंडळीच्या सभेत पंचमंडळाचा सभासद म्हणून निवड झालेली असेल तरच तिला मतदान करण्याचा हक्क राहील. खजिनदाराच्या या पदावर पाळकाच्या तत्काळ कुटुंबातील सदस्य, प्रांताध्यक्ष व प्रांतिक सल्लागार मंडळ यांच्या मान्यतेशिवाय काम करू शकणार नाही. तत्काळ कुटुंबातील सदस्य म्हणजे पती-पत्नी, लेकरे, बहीण-भावंडे किंवा आई-वडील यापैकी कोणीही असू शकते. (३३, ११३.७-११३.८, ११३.११, १२८, १३६.१-१३६.६)

**१२९.२१.** मंडळीला मिळालेल्या व मंडळीने खर्च केलेल्या सर्व पैशांचा हिशोब काळजीपूर्वक लिहून ठेवण्याची व्यवस्था करणे. यामध्ये सर्व शाळा (जन्मापासून सेकंडरी स्कूल पर्यंत) जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघ (एन.एम.आय.), जागतिक नॅझरीन

युवक संघ (एन.वाय.आय.), जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ (एस.डी.एम.आय.) यांचा समावेश आहे. या हिशोबाचा अहवाल पंचमंडळाच्या नियमीत मासिक बैठकीत मंडळीच्या वार्षिक सभेत सादर करणे. (१३६.३-१३६.५)

**१२९.२२.** कमीत कमी दोन सभासदांची अशी समिती नेमणे की जी समिती मंडळीला मिळालेले सर्व पैसे नीट मोजून त्याचा हिशोब ठेवील.

**१२९.२३.** हिशोब तपासणी मंडळ नेमणे किंवा स्वतंत्र परिक्षकांची समिती नेमणे, किंवा अशा पात्रता असणाऱ्या व्यक्तींची समिती नेमणे की जे मंडळीच्या पैशांचा हिशोब तपासतील. लागू असल्यास, देश किंवा राज्याचा हिशोबाच्या बाबतीत असलेला कायद्यानुसार किमान मानदंड, किंवा इतर प्रचलित धंदेवाईक मानदंडांनुसार मंडळीच्या खजिनदाराची पुस्तके, जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघ (एन.एम.आय.), जागतिक नॅझरीन युवक संघ (एन.वाय.आय.), जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ (एस.डी.एम.आय.), सर्व शाळा (जन्मापासून सेकंडरी स्कूल पर्यंत) यांची व इतर सर्व आर्थिक नोंदी असलेली पुस्तके या सर्वांचा हिशोब तपासण्यात येईल. स्थानिक मंडळीची सर्व नोंद पुस्तके बघण्याचा पाळकाला अधिकार असेल.

**१२९.२४.** कमीत कमी तीन व्यक्तींची स्थानिक मंडळीची सुवार्ताप्रसार व सभासदत्व समिती नेमणे. (११०)

**१२९.२५.** योग्य वाटल्यास, ज्या मंडळीत ७५ पेक्षा कमी सभासद आहेत अशा मंडळ्यांमध्ये एस.डी.एम.आय. मंडळ म्हणून काम करणे. (१४५)

**१२९.२६.** मंडळीच्या एखाद्या सभासदा विरुद्ध केलेल्या लेखी आरोपांचा निर्णय लागला नसेल, तर त्यासाठी पाच सभासदांची चौकशी समिती नेमणे. (६०५)

**१२९.२७.** पाळकाने नावे सुचविल्यानुसार आणि प्रांताध्यक्षाची लेखी मान्यता घेऊन स्थानिक मंडळी सुचवेल त्याप्रमाणे पगारी सहाय्यक नेमणे. (१५१, १५९-१५९.१, २११.१३)

**१२९.२८.** प्रांताध्यक्षांनी दरवर्षी लेखी मान्यता दिल्यास, स्थानिक सेवक किंवा सनदी सेवक यांची विनावेतन सहाय्यक पाळक म्हणून निवड करणे. (११५.६)

**१२९.२९.** मंडळीमध्ये दीर्घकालीन योजना समिती नेमणे. पाळक या समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असेल.

**१२९.३०.** स्थानिक मंडळीमध्ये विशेष अधिकाराच्या जागेवर जे लोक नेमलेले असतील त्यांनी आपल्या विश्वासाच्या पदाचा व अधिकार पदाचा दुरुपयोग करू नये म्हणून विशेष योजना स्वीकारून त्याची अंमलबजावणी करणे. आपल्या स्थानिक मंडळीच्या अनन्य परिस्थितीचा विचार करूनच प्रत्येक मंडळीने ही योजना आखावी व स्वीकारावी.

**१३०.** जागतिक सुर्वाता प्रसार व प्रांतिक-सेवा-निधी उभारण्यासाठी प्रमुखाध्यक्ष मंडळ व प्रमुख मंडळ यांनी स्वीकारलेली योजना, स्थानिक पंचमंडळ व पाळक यांनी आपल्या मंडळीमध्ये राबवावी. जमा झालेला निधी नियमीतपणे प्रमुख खजिनदार व प्रांतिक खजिनदार यांच्याकडे अनुक्रमे पाठवावा. (३१७.१०, ३३५.७)

**१३१. कारभारीपणाचा अर्थ.** (कलम ३२-३२.५ पहावे)

**१३२.** नवीन स्थापन झालेल्या मंडळीमध्ये, नियमीतपणे एस.डी.एम.आय. मंडळ निवडले जाई पर्यंत, पंचमंडळच एस.डी.एम.आय. मंडळाचे काम पाहतील. (१४५)

**१३२.१.** नवीन स्थापन झालेल्या मंडळीमध्ये जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व (एस.डी.एम.आय) मंडळाच्या अध्यक्षाची निवड केव्हा करावी हे मंडळीचे पाळक व पंचमंडळ हे ठरवितील. (१२९.२५, १४५, १४६)

**१३३.** एखाद्या सभासदाचे नाव ‘निष्क्रिय’ म्हणून जाहीर केल्यापासून पुढे दोन वर्षाचा काळ गेल्यानंतर पंचमंडळ त्या सभासदाचे नाव सभासदांच्या यादीतून काढून टाकेल. (१०९-१०९.४, ११२.३)

**१३४.** स्थानिक पातळीवर दिलेल्या कोणाही व्यक्तीची सनद पंचमंडळाला काही काळासाठी स्थगित किंवा रद्द करता येईल.

**१३५. मंडळीचा चिटणीस.** पंचमंडळाच्या चिटणिसाची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील:

**१३५.१.** मंडळीच्या कामकाजाच्या सर्व बैठकीचे व पंचमंडळाच्या सर्व कामकाजाच्या बैठकीचे अहवाल अचूकपणे नोंदवून ठेवणे व ते नीट विश्वासूरीतीने जपून ठेवणे तसेच आपल्या पदास अनुसरून इतर सर्व कामे पार पाडणे. बैठकीसाठी आवश्यक असणारी सभासद संख्या आहे की नाही हे दाखविण्यासाठी बैठकीत मतदान करणाऱ्या सर्व सभासदांची नोंद उपस्थित किंवा अनुपस्थित अशी करणे आवश्यक आहे. (१२०.१, १२९.१९)

**१३५.२.** सभासदांच्या आकडेवारीसहित स्थानिक मंडळीच्या प्रमुख कार्याचा अहवाल स्थानिक मंडळीच्या वार्षिक सभेत सादर करणे. (११३.९)

**१३५.३.** स्थानिक मंडळी संबंधातील सर्व अधिकृत कागदपत्रे, नोंदवह्या, कोर्टकचेरीची कागदपत्रे, खरेदीखते, खत पत्रे, विमापत्रे, कर्जासंबंधीची कागदपत्रे, मंडळीच्या सभासदांची यादी, ऐतिहासिक नोंदी, पंचमंडळाच्या बैठकांचे अहवाल, कायदेशीर दस्तऐवज, मंडळीच्या संघटन-नोंदणीची कागदपत्रे, हे सर्व कागदपत्रे पूर्ण विश्वासाने, जबाबदारीने सांभाळून ते स्थानिक मंडळीच्या जागेत मजबूत, अग्निरोधक पोलादी कपाटात सुरक्षित ठेवणे किंवा योग्य वाटल्यास व शक्य असल्यास असे कागदपत्रे स्थानिक बँकांच्या सुरक्षित कक्षामध्ये किंवा त्यासारख्या इतर संस्थेत सुरक्षित ठेवणे. मंडळीचे पाळक व खजिनदार यांनाही ही कागदपत्रे उपलब्ध असतील. ही कागदपत्रे मंडळीच्या चिटणीसाने त्याच्या पदावर येणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीकडे ताबडतोब सोपवून दिली पाहिजे.

**१३५.४.** मंडळीची वार्षिक सभा किंवा विशेष सभा याचा चिटणीस म्हणून काम करणे. वार्षिक व खास बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त व इतर कागदपत्रे यांचा रक्षक म्हणून काम करणे. (११३.६)

**१३५.५.** पाळकाला पाचारण करण्यासाठी घेतलेले मतदान तसेच मंडळी व पाळक संबंध पुढे चालू ठेवावे किंवा नाही यासाठीचे मतदान याचा लेखी अहवाल प्रांताध्यक्षाला एक आठवड्याच्या आत पाठविणे.

**१३५.६.** स्थानिक मंडळीला पाळक नसेल तेव्हा मंडळीच्या कामकाजाच्या सर्व सभा तसेच पंचमंडळाच्या बैठका यांच्या कामकाजाच्या अहवालाची एक प्रत अशी बैठक झाल्यावर तीन दिवसाच्या आत प्रांताध्यक्षाकडे पाठविणे.

**१३५.७.** स्थावर मिळकतीचे अभिहस्तांतर खरेदी-विक्री, गहाण पत्र, गहाण सोडविण्याचे कागद, करारनामे आणि बंधारण पुस्तकामध्ये ज्यांची अन्य तऱ्हेने तरतूद केलेली नाही असे सर्व कायदेशीर कागदपत्रे - अशा सर्व कागदपत्रांवर पाळकाच्या बरोबरीने सही करणे. (१०२.३, १०३–१०४.२)

**१३६. मंडळीचा खजिनदार.** पंचमंडळाच्या खजिनदाराची कर्तव्ये खालीलप्रमाणे असतील:

**१३६.१.** ज्याच्या संबंधाने अन्य प्रकारे तरतूद केलेली नाही असे सर्व पैसे स्वीकारणे व ते पंच मंडळाच्या आदेशानुसार खर्च करणे. (१२९.२१)

**१३६.२.** दरमहा प्रांतिक निधींचे सर्व पैसे प्रांतिक खजिनदाराकडे आणि प्रमुख निधीचे पैसे प्रमुख खजिनदाराकडे उचित कार्यालयाच्या द्वारे किंवा इतर ज्या मार्गांची तरतूद करण्यात आलेली असेल त्याद्वारे पाठविणे. (५१६.९)

**१३६.३.** मिळालेल्या व खर्च झालेल्या सर्व पैशाचा हिशोब अचूकपणे जमाखर्चाच्या पुस्तकात लिहिणे. (१२९.२१)

**१३६.४.** पंचमंडळाला दरमहा आर्थिक अहवाल तपशीलवार सादर करणे. (१२९.२१)

**१३६.५.** मंडळीच्या कामकाजाच्या वार्षिक सभेमध्ये, वार्षिक आर्थिक अहवाल सादर करणे. (११३.९, १२९.२१)

**१३६.६.** खजिनदाराने आपले पद सोडतेवेळी त्याच्याकडे असलेली सर्व कागदपत्रे, जमाखर्च पुस्तके इ. पूर्णपणे पंच मंडळाकडे सादर करणे.

## L. स्थानिक मंडळीचे कारभारी

**१३७.** मंडळीच्या कारभाऱ्यांची संख्या तीन पेक्षा कमी किंवा तेरा (१३) पेक्षा जास्त असणार नाही. त्यांची निवड मंडळीच्या कामकाजाच्या वार्षिक किंवा विशेष सभेमध्ये मतपत्रिकाद्वारे झालेल्या मतदानाने, मंडळीच्या सभासदांमधून होईल. त्यांच्या सेवेचा अवधी मंडळीचे पुढील वर्ष व त्यांच्या जागी दुसऱ्याची निवड होऊन ते सेवेत रुजू होईपर्यंत असेल. (३३, ११३.७, ११३.११, १२७)

**१३८.** कारभाऱ्यांची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :

**१३८.१.** इतर प्रकारे तरतूद केलेली नसल्यास मंडळी वाढ समिती म्हणून कार्य करणे. ह्या समितीच्या जबाबदाऱ्यांमध्ये विस्तृत-विभाग सेवाकार्य, सुवार्ताप्रसार आणि सेवा विस्तार यासाठी कार्य करणे, तसेच नव्या मंडळ्यांना व मंडळीसमान गटांना प्रायोजित करणे ह्यांचा समावेश आहे. मंडळीचे पाळक या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतील.

**१३८.२.** गरजू व दीनदु:खीतांना सहाय्य व मदत देणे. प्रत्यक्ष सेवा करणे व सहाय्य करणे ही सर्वसामान्य नेत्यांची भूमिका पवित्र शास्त्रात स्पष्ट केलेली आहे. (रोम १२:६-८) यामुळे कारभाऱ्यांनी आपला वेळ आणि अध्यात्मिक दाने ही सहाय्य सेवा, व्यवस्थापन, उत्तेजन देणे, दयेची कार्ये, भेटी देणे यासाठी खर्च करावी.

**१३८.३.** पंचमंडळाला योग्य वाटल्यास कलम ११०-११०.८ नुसार स्थानिक मंडळीची सुवार्ता प्रसार व सभासदत्व समिती म्हणून काम करणे.

**१३८.४.** सर्व सभासदांना ख्रिस्ती सेवाकार्याची संधी उपलब्ध होईल, अशा रीतीने मंडळीची व्यवस्था करण्यात पाळकाला सहकार्य करणे. नजीकच्या परिसरातील इतर संस्कृतीच्या व वेगळी सामाजिक, आर्थिक, पार्श्वभूमी असलेल्या समाजसमूहांमध्ये सेवाकार्य स्थापन करण्याकडे विशेष लक्ष देणे.

**१३८.५.** ख्रिस्ती सामाजिक कृती व सेवा संस्था यांच्यामध्ये संपर्क दुवा म्हणून सेवा करणे.

**१३८.६.** स्थानिक मंडळीमध्ये जाहीर उपासना व ख्रिस्ती संगोपन या कामी पाळकाला सहाय्य करणे.

**१३८.७.** प्रभूभोजना साठी लागणारे पदार्थ पुरविणे व पाळकांनी विनंती केल्यास त्यांचे वितरण करण्यास मदत करणे. (२९.५, ५१५.४)

**१३८.९.** कारभाऱ्याचे रिक्त झालेले पद मंडळीच्या योग्यप्रकारे बोलावलेल्या कामकाजाच्या सभेमध्ये भरले जाईल. (११३.८)

**१४०.** सर्व कारभारी मिळून कारभारी मंडळ तयार होईल. मंडळाची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील. स्थानिक मंडळीमध्ये जीवन साधनांच्या ख्रिस्ती कारभारीपणाला पुरस्कृत करणे. पाळक व कारभारी सेवाकार्याचे कार्यालय यांच्या सहकार्याने हे करणे. (३२ -३२.५)

## M. स्थानिक मंडळीचे विश्वस्त

**१४१.** मंडळीच्या विश्वस्तांची संख्या तीन पेक्षा कमी व नऊ पेक्षा जास्त नको. स्थानिक मंडळीच्या सभासदांमधून त्यांची निवड होईल. मंडळीचे पुढील वर्ष संपेपर्यंत व त्यांच्या जागेवर दुसऱ्यांची निवड होऊन ते रुजू होईपर्यंत या विश्वस्तांची सेवा चालू राहील (३३, ११३.११, १२७)

**१४२.** मंडळीचे विश्‍वस्त निवडून देण्यासाठी जेव्हा मुलकी कायद्यानुसार निवडणुकीची विशिष्ट पद्धत स्वीकारणे भाग असेल, तेव्हा ती पद्धत काटेकोरपणे पाळली जाईल. (११३.४)

**१४२.१.** मुलकी कायद्याची निवडणुकीबाबत विशेष पद्धत पाळण्याची अपेक्षा नसेल तर विश्वस्तांची निवड मंडळीच्या कामकाजाच्या वार्षिक सभेत किंवा याच कामासाठी योग्य प्रकारे बोलावलेल्या सभेत मतपत्रिकाद्वारे होणाऱ्या मतदानाने होईल. (११३.७, ११३.११)

**१४३. विश्वस्तांची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत:**

**१४३.१.** जेथे स्थानिक मंडळी कायदेशीररित्या नोंदलेली नसेल किंवा जेथे मुलकी कायद्यान्वये आवश्यक असेल किंवा जेथे अन्य काही कारणांमुळे प्रांताध्यक्ष अथवा प्रांतिक सल्लागार मंडळाला योग्य वाटेल तेथे हे कलम १०२-१०४.४ मधील मार्गदर्शक तत्वे व निर्बंधांच्या अधीन राहून मंडळीच्या स्थावर व जंगम मालमत्तेची कागदपत्रे आपल्या ताब्यात ठेवतील. विश्वस्त ह्या नात्याने स्थानिक मंडळीच्या मालमत्तेची देखभाल करतील.

**१४३.२.** पंचमंडळाने अन्य प्रकारे तरतूद केली नसेल तेथे भौतिक सुविधा वाढविणे व आर्थिक नियोजन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

**१४४.** विश्वस्तांचे पद रिकामे झाले असेल तर स्थानिक मंडळीने, मंडळीच्या योग्य प्रकारे बोलावलेल्या कामकाजाच्या सभेत ते रिक्त पद भरावे. (११३.८)

## N. स्थानिक मंडळीचे जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ मंडळ (एस.डी.एम.आय.)

**१४५.** प्रत्येक स्थानिक मंडळी रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ मंडळ (एस. डी.एम.आय.) किंवा शिक्षण मंडळ हे पंचमंडळाचा एक भाग म्हणून मंडळीच्या वार्षिक सभेमध्ये स्थापन करील. मंडळीमध्ये ख्रिस्ती शिक्षणसेवा पुरविण्याची जबाबदारी ह्या मंडळावर राहील. ज्या मंडळींमध्ये ७५ पेक्षा कमी सभासद संख्या आहे तेथे ही जबाबदारी पंचमंडळ स्वीकारून पार पाडील. या मंडळाचे सभासद पुढील प्रमाणे असतील: जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाध्यक्ष, मंडळीचे पाळक, जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघाध्यक्ष, जागतिक नॅझरीन युवक संघाध्यक्ष, लेकरांचे सेवाकार्य-संचालक, प्रौढ सेवाकार्य संचालक आणि मंडळीच्या सभासदांमधून वार्षिक सभेमध्ये निवडून दिलेल्या तीन ते नऊ सभासद. हे सर्व सभासद स्थिर दोन वर्षाच्या कालावधीकरिता आणि त्यांच्या कामावर इतरांची निवड होऊन ते कार्यभार संभाळेपर्यंत आपली सेवा करत राहू शकतील. निवडून दिलेल्या सभासदाचे पद रिक्त झाल्यास मंडळीच्या कामकाजाची सभा योग्यप्रकारे बोलावून ते रिक्त पद भरता येईल. एखाद्या मंडळीने पंचमंडळाचा भाग म्हणून शिक्षण समिती निवडलेली असेल तर त्यासाठी कारभारी व विश्वस्त यांच्यासाठी जी कमीत कमी संख्या बंधारण पुस्तकात ठरवून दिली आहे त्या तरतुदीचे पालन करावे. पदसिद्ध सेवकांपैकी काहीजण पंचमंडळाचे सभासद नसले, तरी ते सर्व या समितीचे सभासद राहतील.

आम्ही स्थानिक मंडळ्यांना असा निर्देश देतो की त्यांनी मंडळीकरिता असे अधिकारी निवडावेत की जे स्थानिक मंडळीचे सक्रिय सभासद आहेत, संपूर्ण पवित्रीकरणाचा अनुभव असल्याची जाहीर कबुली देतात, आणि ज्यांची जीवने पवित्र जीवन जगण्यास पाचारण करणाऱ्या देवाच्या कृपेची सार्वजनिक साक्ष बाळगतात; जे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सिध्दांत, कारभारपध्दती आणि परंपरांशी सुसंगत आहेत आणि जे स्थानिक मंडळीला उपस्थिती, सक्रिय सेवा, दशांश व दानार्पणांद्वारे विश्वासुरित्या साहाय्य करतात. मंडळीचे पदाधिकारी हे “राष्ट्रांमध्ये ख्रिस्तसादृष्य शिष्य तयार करणे” ह्या कार्यामध्ये सर्वस्वी सहभागी असावेत. (३३, १३७, १४१, १४६)

## स्थानिक मंडळीचे जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ मंडळ किंवा शिक्षण समितीची कर्तव्ये आणि अधिकार:

**१४५.१.** स्थानिक मंडळीमध्ये ख्रिस्त शिक्षण सेवाकार्याचे नियोजन करणे, संघटन करणे, पुरस्कार करणे व हे कार्य चालविणे. हे कार्य पाळकाच्या थेट देखरेखीखाली स्थानिक मंडळीचे जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली व स्थानिक पंचमंडळाच्या मार्गदर्शनाने करायचे आहे. हे कार्य प्रमुख मंडळाने स्थापित केलेली नॅझरीन संस्थेची धोरणे व मानदंड यांना अनुसरून करावयाचे आहे आणि जागतिक सेवा समिती आणि प्रौढ सेवा कार्यालय जागतिक नॅझरीन युवक संघ (एन. वाय. आय.), लेकरांचा सेवा संघ यांच्याद्वारे हे कार्य करावयाचे आहे. यामध्ये प्रौढ, युवक आणि लेकरे यावर आधारीत अभ्यासक्रम व कार्यक्रम सेवांचा समावेश आहे. रविवारची शास्त्रशिक्षण शाळा/पवित्र शास्त्राभ्यास/ लहान गट, आणि उपदेश सेवा मंडळीतील शास्त्र शिक्षण व सिद्धांत यांचा गाभा पुरवितात. बालवाडी/शाळा (जन्मापासून सेकंडरी स्कुल पर्यंत), आणि कॅरव्हॅन, सुट्टीतील शास्त्र शिक्षण शाळा, अविवाहित व्यक्तीसाठी चालविलेली सेवाकार्य या सारख्या वार्षिक आणि विशेष सेवा व प्रशिक्षणं, अशी संधी पुरवितात की त्याद्वारे पवित्र शास्त्रोक्त सिद्धांत जगल्या जातात आणि मंडळीच्या जीवनाशी एकरूप होतात. (५१६.१५)

**१४५.२.** मंडळीच्या बाहेर असणाऱ्या अशा जास्तीत जास्त लोकांपर्यंत ख्रिस्तासाठी व मंडळीसाठी पोहोचणे, त्यांना सहभागीतेत आणणे, देवाचे वचन प्रभावीपणे शिकविणे व त्यांच्या तारणाची काळजी घेणे, ख्रिस्ती विश्वासाची सिद्धांत कलमे शिकविणे, ख्रिस्तासमान शील, वृत्ती व सवयी बनवण्यास सहाय्य करणे, ख्रिस्ती गृहांची स्थापना करणे,

विश्वासणाऱ्यांना मंडळीचे सभासदत्व मिळण्यास शिकवून तयार करणे तसेच त्यांना यथायोग्य ख्रिस्ती सेवाकार्यासाठी सिद्ध करणे.

**१४५.३.** विविध शिक्षण सेवांसाठी अभ्यासक्रम निश्चित करून ठरविणे. पवित्र शास्त्राच्या अभ्यासासाठी व सिद्धांताच्या विवेचनासाठी नेहमी चर्च ऑफ दी नॅझरीन मंडळीने तयार केलेले साहित्यच आधारभूत म्हणून उपयोगात आणणे.

**१४५.४.** एस.डी.एम.आय.च्या नियमांना अनुसरून स्थानिक मंडळीसाठी जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघासाठी (एस.डी.एम.आय.) पूर्ण योजना आखून ती पार पाडणे. (८१२)

**१४५.५.** जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघासाठी (एस.डी. एम.आय.) अध्यक्ष निवडण्याकरिता पाळकाच्या संमतीने एक किंवा अधिक व्यक्तींची नावे सुचविणे व ती नावे मंडळीच्या वार्षिक सभेमध्ये सुचविणे. ही नावे एका बैठकीत निश्चित केली जातील व त्या बैठकीत सध्या पदावर असलेले अध्यक्ष उपस्थित नसतील.

**१४५.६.** लेकरांच्या सेवाकार्याचा संचालक व प्रौढांच्या सेवाकार्याचा संचालक यांची नावे पाळकाच्या मान्यतेने पंचमंडळाला सुचविणे.

**१४५.७.** लेकरांच्या सेवाकार्याचा संचालक आणि प्रौढांच्या कार्याचा संचालक यांनी पाळक व जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाचा (एस.डी.एम. आय.) अध्यक्ष यांच्या मान्यतेने सूचित केलेल्या नावांमधून लेकरांची सेवाकार्य समिती व प्रौढांची सेवाकार्य समिती निवडून देणे.

**१४५.८.** सर्व वयोगटासाठीच्या रविवारची शास्त्रशिक्षण शाळा/शास्त्राभ्यास/लहान गटांसाठी पर्यवेक्षक, शिक्षक व अधिकारी यांची निवड करणे. ज्यांची निवड करायची आहे ते सर्व विश्वास व्यक्त करणारे ख्रिस्ती असावेत, त्यांचे जीवन, आचरण हे आदर्श असून चर्च ऑफ द नॅझरीनचे सिद्धांत व शासनपद्धती यांच्याशी पूर्णपणे सुसंगत असावे. त्यांची नावे जागतिक नॅझरीन युवक संघाध्यक्ष, लेकरांचे सेवाकार्य संचालक व प्रौढांचे सेवाकार्य संचालक यांनी सुचविलेली असावीत आणि या नामसूचनेला पाळक व जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाचे (एस.डी.एम.आय.) अध्यक्ष यांची मान्यता असावी.

**१४५.९.** सामान्य सभासदांसाठी निरंतर प्रशिक्षण योजना राबविण्यासाठी स्थानिक संचालकाची निवड करणे. सदर संचालक, जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व

शिष्यत्व संघाच्या मंडळातील (एस.डी.एम.आय.) सेवक (शिक्षक इत्यादी) आणि मंडळीचे सर्व सभासद यांच्यासाठी नियमीतपणे प्रशिक्षण कार्यक्रम राबवून, त्यावर देखरेख करण्याचे काम करेल. जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ मंडळाला (एस.डी.एम.आय.) वाटल्यास या संचालकाला आपल्या मंडळाचे पदसिध्द सभासद म्हणून घेऊ शकतात.

**१४५.१०.** जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाच्या(एस.डी.एम. आय.) नियमीत बैठका घेणे. एस.डी.एम.आय. मंडळाच्या कार्याच्या वर्षारंभीच एक बैठक घेऊन त्यात चिटणीस व इतर आवश्यक पदाधिकारी यांची निवड करून संघटीत होणे. एस.डी.एम.आय. मंडळाचे व स्थानिक मंडळाचे कार्यवर्ष सारखेच असेल. पाळक व जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाचे अध्यक्ष यांना विशेष बैठका बोलवता येतील.

**१४६. जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाध्यक्ष.**
मंडळीच्या कामकाजाच्या वार्षिक सभेत हजर असलेल्या सभासदांनी मतपत्रिकेद्वारे केलेल्या मतदानाद्वारे बहुमताने जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाध्यक्ष निवडला जाईल. अध्यक्ष म्हणून निवडून द्यावयाची व्यक्ती स्थानिक मंडळीची पूर्ण सभासद असली पाहिजे. त्याच्या सेवेचा काळ एक वर्ष व त्याच्या जागी निवडून आलेली दुसरी व्यक्ती कामावर रुजू होईपर्यंत असेल. जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ मंडळ पाळकाच्या संमतीने सध्याचे अध्यक्ष पुन्हा निवडले जावेत असे सुचवित असतील तर 'होय-नाही' पद्धतीने मतदान घ्यावे. सदर अध्यक्षाचे पद मध्येच रिकामे झाले तर स्थानिक मंडळीने रीतसर बोलावलेल्या कामकाजाच्या सभेत ते भरावे. नवीन निवडलेला अध्यक्ष हा येणाऱ्या प्रांतिक परिषदेचा, पंचमंडळाचा व जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ मंडळाचा पदसिध्द सभासद असेल.

आम्ही स्थानिक मंडळ्यांना असा निर्देश देतो की त्यांनी मंडळीकरिता असे अधिकारी निवडावेत की जे स्थानिक मंडळीचे सक्रिय सभासद आहेत, संपूर्ण पवित्रीकरणाचा अनुभव असल्याची जाहीर कबुली देतात, आणि ज्यांचे जीवन पवित्र जीवन जगण्यास पाचारण करणाऱ्या देवाच्या कृपेची सार्वजनिक साक्ष बाळगतात; जे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सिध्दांत, कारभारपध्दती आणि परंपरांशी सुसंगत आहेत, आणि जे स्थानिक मंडळीला उपस्थिती, सक्रिय सेवा, दशांश व दानार्पणांद्वारे विश्वासुरित्या

साहाय्य करतात. मंडळीचे पदाधिकारी हे "राष्ट्रांमध्ये ख्रिस्तसादृष्य शिष्य तयार करणे" ह्या कार्यामध्ये सर्वस्वी सहभागी असावेत. (३३, ११३.११, १२७, १४५, १४५.५, २०१)

**जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाध्यक्षाची कर्तव्ये व अधिकार** खालीलप्रमाणे असतील:

**१४६.१.** स्थानिक मंडळीमधील जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ (एस.डी.एम.आय.) यावर कार्यकारी देखरेख ठेवणे.

**१४६.२.** जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ शाळेच्या उपनियमांस अनुसरून जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ शाळेचा कारभार चालवणे. (८१२)

**१४६.३.** पटसंख्या, उपस्थिती आणि नेतृत्व प्रशिक्षण यांत वाढ व्हावी म्हणून योग्य त्या कार्यक्रमांचा पुरस्कार करणे.

**१४६.४.** जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ (एस.डी.एम.आय.) मंडळाच्या किंवा पंचमंडळाच्या शिक्षण समितीच्या नियमीत सभा अध्यक्ष म्हणून चालवणे; आणि जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ (एस.डी. एम.आय.) मंडळाला त्यांची कर्तव्ये पूर्ण करण्याकरिता पुढाकाराने चालवणे.

**१४६.५.** जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ (एस.डी.एम.आय.) मंडळासाठी वार्षिक अर्थव्यवस्था (अंदाजपत्र) पंचमंडळाला सादर करणे.

**१४६.६.** पंचमंडळाकडे मासिक अहवाल सादर करणे व मंडळीच्या कामकाजाच्या वार्षिक सभेमध्ये लेखी अहवाल सादर करणे.

**१४७. लेकरांचे सेवाकार्य/प्रौढांचे सेवाकार्य समित्या आणि संचालक.** जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ (एस.डी.एम.आय.) शाळांचे काम - लेकरं, युवक व प्रौढ असे वयोगटानुसार करणे योग्य व सोयीचे आहे. प्रत्येक वयोगटासाठी एक एक समिती असावी. ही समिती आपआपल्या वयोगटातील कार्ययोजना करण्यास व ती पार पाडण्यास जबाबदार असेल. या समितीमध्ये वयोगट-संचालक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा/पवित्रशास्त्राभ्यास/लहान गट यांचे व त्या वयोगटासाठी मंडळीने नेमलेल्या इतर सेवाकार्यातील प्रतिनिधी असतील. वयोगट-संचालक अध्यक्ष यांच्याशी सहकार्य करून त्या त्या वयोगटासाठी कामाची योजना करणे व ती योजना अंमलात आणण्याची तरतूद करणे हे या समितीचे काम राहील. वयोगट समितीच्या सर्व कार्याला

समितीचे संचालक आणि जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ मंडळ यांची मान्यता असणे जरुरीचे आहे.

## वयोगट-संचालक ह्यांची कर्तव्ये येणेप्रमाणे आहेत:

**१४७.१.** त्यांच्याकडे सोपवलेल्या वयोगट-समितीचे नेतृत्व करणे: त्या वयोगटामधील व्यक्तींसाठी जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ शाळेचे कार्य पूर्णत्वाने संघटित करून, उत्तेजन देऊन समन्वयाने चालवणे.

**१४७.२.** जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ (एस.डी.एम.आय.) मंडळाच्या सहकार्याने रविवार शास्त्र शिक्षण शाळेच्या उचित विभागाचे नेतृत्व करणे, तसेच या विभागामध्ये लेकरं, युवक किंवा प्रौढ यांची स्थानिक मंडळीत पटसंख्या व उपस्थिती वाढत राहावी म्हणून आवश्यक त्या कार्यक्रमांचा पुरस्कार करणे.

**१४७.३.** तो किंवा ती ज्या वयोगटाच्या संचालक आहेत त्या वयोगटासाठी, रविवारची शास्त्रशिक्षण शाळा/बालवाडी/शाळा (जन्मापासून ते सेंकडरी स्कुलपर्यंत), वार्षिक आणि विविध सेवाकार्ये, सुवार्ताप्रसार आणि इतर सहभागीतांचे अतिरिक्त कार्यक्रम आखून ते पार पाडणे.

**१४७.४.** त्याच्या किंवा तिच्या वयोगटाकडे सोपवून दिलेल्या विविध सेवाकार्यासाठी कार्यकर्त्यांची नावे जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ मंडळाकडे सूचित करणे, यांमध्ये रविवारची शास्त्रशिक्षण शाळा/पवित्रशास्त्राभ्यास/लहान गट यांचे पर्यवेक्षक, शिक्षक व अधिकारी ह्यांच्या नावांचाही समावेश असेल. यामध्ये जागतिक नॅझरीन युवक संघ (एन.वाय.आय.) अपवाद असेल, ते युवकांकरिताच्या रविवारची शास्त्रशिक्षण शाळा/पवित्रशास्त्राभ्यास/लहान गट यांचे पर्यवेक्षक, शिक्षक व अधिकारी ह्यांची नावे सुचवील. या नामनिर्देशित व्यक्ती पाळक आणि जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाध्यक्ष यांचेकडून मान्य होणे जरुरीचे आहे. (३३)

**१४७.५.** पूरक अभ्यासक्रमाचा उपयोग करण्यापूर्वी त्याला जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ (एस.डी.एम.आय.) मंडळाकडून मान्यता घेणे.

**१४७.६.** जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ (एस.डी.एम.आय.) मंडळ आणि सामान्यांसाठी निरंतर प्रशिक्षणयोजना संचालक ह्यांच्या सहकार्याने वयोगट कार्यकर्त्यांसाठी नेतृत्व प्रशिक्षण देण्याची तरतूद करणे.

**१४७.७.** जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ (एस.डी.एम.आय.) मंडळ आणि/किंवा पंचमंडळ ह्यांचेकडे वार्षिक अर्थव्यवस्थेसाठी विनंती सादर करणे आणि अशा अर्थव्यवस्थेला मान्यता मिळाल्यानुसार पैसे खर्च करणे.

**१४७.८.** त्याच्या किंवा तिच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक मंडळीमधील वयोगट विभागामध्ये चालू असणाऱ्या विविध सेवाकार्याचे सर्व अहवाल स्वीकारणे. शिष्यत्व सेवाकार्याचा (रविवारची शास्त्रशिक्षण शाळा/विस्तारीत सेवाकार्य जाबाबदाऱ्या/शिष्यत्व/पवित्र शास्त्राभ्यास) यासंबंधीचा मासिक अहवाल जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाध्यक्ष ह्यांचेकडे पाठवणे.

**१४७.९.** स्थानिक मंडळीमधील जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाच्या एकंदर कार्यामध्ये समन्वय असावा यासाठी त्याच्या किंवा तिच्या वयोगटातील कार्यक्रमांची त्रैमासिक योजना जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघ (एस.डी.एम.आय.) मंडळाकडे पाठवणे.

**१४८. लेकरांची सेवाकार्यसमिती.** स्थानिक मंडळीमध्ये लेकरांसाठी, जन्मल्या पासून ते बारा वर्षांपर्यंत जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाच्या संपूर्ण सेवाकार्याची योजना आखण्याची जबाबदारी या समितीकडे आहे. या समितीमध्ये पुढीलप्रमाणे सभासद असतील: रविवारची शास्त्रशिक्षण शाळा/शास्त्राभ्यास/लहान गट यांचा एक तरी प्रतिनिधी आणि स्थानिक मंडळीमध्ये ज्यांची तरतूद केली आहे अशा लेकरांच्या इतर सेवाकार्य समित्यांचे संचालक, जसे की: लेकरांसाठी उपासना, कॅराव्हॅन, सुटीतील शास्त्रशिक्षण शाळा, पवित्र शास्त्र प्रश्नस्पर्धा, ख्रिस्तप्रसार कार्य, शिशुवर्ग आणि आवश्यकतेनुसार इतर. स्थानिक मंडळीमध्ये गरजेनुसार व उपलब्ध नेतृत्वाच्या साहाय्याने लेकरांसाठी जेवढ्या सेवाकार्याची तरतूद केलेली असेल, तेवढ्या प्रमाणात या समितीच्या सभासदांची संख्या कमी अधिक असेल.

**लेकरांच्या सेवाकार्याचे संचालक ह्यांची कर्तव्ये** पुढीलप्रमाणे असतील:

**१४८.१.** कलम १४७.१-१४७.९ नुसार सर्व वयोगट संचालकांना नेमून दिलेली कर्तव्ये पूर्ण करणे.

**१४८.२.** स्थानिक मंडळीमधील जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्तासंघाच्या (एन.एम.आय.) कार्यकारी समितीच्या सहकार्याने मुलांच्या ख्रिस्तप्रचार संस्थेचा संचालक नेमणे. अशी नेमलेली व्यक्ती जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्तासंघाच्या (एन.एम.आय.) कार्यकारी

समिती आणि लेकरांची कार्यसमिती या दोहोंची सभासद होते. या पदासाठी सुचवलेल्या व्यक्तीला पाळक आणि जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व (एस.डी.एम.आय.) संघाध्यक्ष ह्यांची मान्यता असणे आवश्यक आहे.

**१४९. प्रौढ सेवाकार्य समिती.** स्थानिक मंडळीमध्ये प्रौढांसाठी, जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व संघाच्या (एस.डी.एम.आय.) संपूर्ण सेवाकार्याची योजना आखण्याची जबाबदारी या समितीकडे आहे. या समितीमध्ये पुढीलप्रमाणे सभासद असतील: रविवारची शास्त्रशिक्षण शाळा/शास्त्राभ्यास/लहान गट यांचा एक तरी प्रतिनिधी आणि स्थानिक मंडळीमध्ये ज्यांची तरतूद केली आहे अशा लेकरांच्या इतर सेवाकार्य समित्यांचे संचालक, जसे की: विवाह आणि कौटुंबिक जीवन, वरिष्ठ प्रौढ सेवाकार्य, अविवाहितांसाठी प्रौढ सेवाकार्य, सामान्य सभासदांकरिता सेवाकार्य, स्त्रीयांकरिता सेवाकार्य, पुरूषांकरिता सेवाकार्य आणि आवश्यकतेनुसार इतर. स्थानिक मंडळीमध्ये गरजेनुसार व उपलब्ध नेतृत्वाच्या साहाय्याने प्रौढांसाठी जेवढ्या सेवाकार्याची तरतूद केलेली असेल, तेवढ्या प्रमाणात या समितीच्या सभासदांची संख्या कमी अधिक असेल.

**प्रौढांच्या सेवाकार्याचे संचालक ह्यांची कर्तव्ये** पुढीलप्रमाणे असतील:

**१४९.१.** कलम १४७.१-१४७.९ नुसार सर्व वयोगट संचालकांना नेमून दिलेली कर्तव्ये पूर्ण करणे.

## O. स्थानिक मंडळीतील जागतिक नॅझरीन युवकसंघ (एन.वाय.आय.)

**१५०.** स्थानिक मंडळीमध्ये नॅझरीन युवक सेवाकार्य हे जागतिक नॅझरीन युवकसंघाच्या (एन.वाय.आय.) विद्यामाने आयोजीत केले जाते. स्थानिक गटांची स्थापना एन.वाय.आय.च्या घटनेनुसार आणि स्थानिक पंचमंडळाच्या अधिकाराने केली जाते.

**१५०.१.** स्थानिक जागतिक नॅझरीन युवकसंघ (एन.वाय.आय.) हा एन.वाय.आय. च्या स्थानिक युवकसंघ योजनेनुसार स्वत:ला संघटीत करेल (८१०.१००-८१०.१११). या योजनेचा स्वीकार स्थानिक युवक संघाच्या गरजांना (८१०.१०३ बघा) प्रतिसाद म्हणून आणि एन.वाय.आय. ची घटना आणि चर्च ऑफ दी नॅझरीनच्या बंधारणपुस्तकाशी सुसंगत असा करता येईल.

## P. स्थानिक मंडळीतील बालवाडी/शाळा (जन्मापासून सेंकडरी पर्यंत)

**१५१.** प्रांतिक सल्लागारमंडळ आणि प्रांताध्यक्ष यांच्याकडून मान्यता घेतल्यावर स्थानिक पंचमंडळाने (मंडळांनी) नॅझरीन बालवाडी/शाळा (जन्मापासून सेंकडरी पर्यंत) काढण्यास हरकत नाही. ह्याकरिता त्यांना लेकरांचे सेवाकार्य/ रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवाकार्याचे आंतरराष्ट्रीय कार्यालयाने प्रस्थापित केलेल्या मानदंडांचे पालन करावे लागेल. शाळेचे संचालक व संचालक मंडळ हे पंचमंडळाला जबाबदार राहील आणि त्यांचेकडे वार्षिक अहवाल सादर करील. (१२९.१८, २११.१३-२११.१४, २२५.१४, ५१६.१५, ५१७)

**१५१.१. शाळा बंद करणे.** स्थानिक मंडळीला असे लक्षात आले की बालवाडी/शाळा (जन्मापासून सेंकडरी पर्यंत) व तिचे सर्व व्यवहार बंद करणे आवश्यक आहे तर ते तसे प्रांताध्यक्ष व प्रांतिक सल्लागार मंडळाशी संपर्क साधून व वार्षिक आर्थिक अहवाल सादर केल्यावरच करू शकतील.

## Q. स्थानिक मंडळीतील जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्तासंघ

**१५२.** पंचमंडळाने तसा अधिकार दिल्यानंतर जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्तासंघाची (एन. एम.आय.) स्थानिक संघटना कोणत्याही वयोगटामध्ये स्थापन करता येईल. जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्तासंघ अधिवेशनाने आणि प्रमुख मंडळाच्या जागतिक सेवाकार्य समितीने मान्यता दिलेल्या ख्रिस्तवार्तासंघाच्या (एन.एम.आय.) घटनेनुसार या संघटना स्थापन कराव्यात. (८११)

**१५२.१.** स्थानिक जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्तासंघ (एन.एम.आय.) स्थानिक मंडळीचा एक घटक असेल व पाळक आणि पंचमंडळ ह्यांच्या देखरेखीखाली व मार्गदर्शनाने कार्य करील. (५१६)

**१५२.२.** स्थानिक जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता (एन.एम.आय.) संघाच्या अध्यक्षपदासाठी नावे सुचवण्यासाठी पाळक एक समिती नेमतील. या समितीमध्ये ख्रिस्तवार्तासंघाचे तीन ते सात सभासद असतील. पाळक या समितीचे अध्यक्ष राहतील. ही समिती अध्यक्षपदासाठी एक अगर एकापेक्षा जास्त नावे सुचवील. ह्या नावांना पंचमंडळाची मान्यता प्राप्त होणे आवश्यक आहे. जे क्रियाशील सभासद प्रत्यक्ष उपस्थित राहून मतदान करतील त्यांच्या मतपत्रिकेद्वारे घेतलेल्या बहुमताने अध्यक्षांची निवड

होईल. ख्रिस्तवार्तासंघाचे सहसभासद ह्यामध्ये मतदान करू शकणार नाही. अध्यक्ष ज्या मंडळीच्या संघाची सेवा करीत असेल त्या मंडळीचा सभासद असला पाहिजे. तो पंचमंडळाचा पदसिद्ध सभासद असेल (किंवा ज्या मंडळ्यांमध्ये अध्यक्षपद पाळकांच्या पत्नीकडे आहे तेथे उपाध्यक्ष हे अध्यक्षाऐवजी पंचमंडळावर काम करू शकतील), तसेच त्याच्या/तिच्या पदग्रहणवर्षाच्या अगदी आधी भरलेल्या प्रांतिक परिषदेचा सभासद राहील. अध्यक्ष स्थानिक मंडळीच्या वार्षिक सभेमध्ये अहवाल सादर करतील. (११३.९, ११४, १२३, १२७, २०१)

**१५३.** नॅझरीन मंडळीच्या प्रमुख कार्यासाठी स्थानिक जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता (एन.एम.आय.) संघाने उभारलेले सर्व निधी जागतिक सुवार्ताप्रसार निधी म्हणून वापरला जाईल. यामध्ये दहा टक्के समितीने मान्यता दिलेले सेवाकार्याचे विशेष प्रकल्प ह्यांचा समावेश असणार नाही.

**१५३.१.** जागतिक सुवार्ताप्रसार निधी पूर्णत: देण्याबाबतचा प्राथमिक विचारानंतर, स्थानिक मंडळ्यांना असे प्रोत्साहन देण्यात येते की त्यांनी जागतिक सेवाकार्याला मान्यताप्राप्त विशेष प्रकल्पांच्याद्वारे साहाय्य करावे.

**१५४.** प्रमुख कार्याच्या साहाय्यासाठी पुढील प्रकारे निधी उभारता येईल:

**१५४.१.** जागतिक सुवार्ताप्रसार निधी आणि प्रमुख कार्य यांच्यासाठीच नेमलेली दानार्पणे व देणग्या.

**१५४.२.** इस्टर आणि उपकारस्तुती दान अशा प्रसंगी विशेष गोळा करण्यात आलेली दानार्पणे.

**१५४.३.** वरील निधीपैकी एकही पैसा स्थानिक, प्रांतिक खर्चासाठी अथवा धर्मदाय उद्देशांकरिता वापरला जाणार नाही.

## R. अर्थसाहाय्याची याचना करण्याला प्रतिबंध

**१५५.** कोणतीही स्थानिक मंडळी, तिचे अधिकारी किंवा सभासद ह्यांनी किंवा ह्यांपैकी कोणीही दुसऱ्या स्थानिक मंडळ्या, त्यांचे अधिकारी, सभासद ह्यांच्याकडे आपल्या स्थानिक मंडळीच्या गरजा भागवण्यासाठी किंवा ज्यामध्ये त्यांना रस आहे अशा सेवाकार्यासाठी पैसा मागणे कायदेशीर असणार नाही. तथापि असे अर्थसाहाय्याची मागणी करणारा ज्या प्रांतिक परिषदेच्या विभागांत असेल त्याच विभागातील स्थानिक

मंडळ्या व मंडळ्यांचे सभासद यांच्याकडे त्याला अर्थसाहाय्य मागता येईल. मात्र अशा विनंतीला प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागारमंडळ ह्यांनी लेखी मान्यता दिलेली असावी.

**१५६.** चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळीच्या ज्या सभासदांना प्रमुख मंडळ अथवा प्रमुख मंडळाच्या एखाद्या समितीने अधिकार दिलेला नसेल असे सभासद स्थानिक मंडळ्यांच्या उपासकसमूहांकडे अथवा अशा मंडळ्यांच्या सभासदांकडे जागतिक सुवार्ताप्रसार निधी व्यतिरिक्त ख्रिस्ती सेवाकार्य व तत्सम कार्यासाठी पैशांची मागणी करू शकणार नाहीत.

## S. मंडळीच्या नावाचा उपयोग

**१५७.** चर्च ऑफ दी नॅझरीन हे नाव, कोणतीही स्थानिक मंडळी अगर चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळीशी कोणत्याही प्रकारे संलग्न असलेली एखादी संस्था यांचे नाव, किंवा या नावातील एखादा भाग चर्च ऑफ दी नॅझरीनच्या कोणत्याही सभासदांनी अगर तिच्या एका अथवा अधिक सभासदांनी वापरण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच कोणतीही संस्था, भागीदारी, संघटना समूह किंवा इतर कोणताही गट यांनी किंवा यांपैकी कोणीही कोणत्याही कामासाठी (व्यापारी, सामाजिक, शैक्षणिक, परोपकारी अथवा इतर कोणत्याही प्रकारच्या) वापरण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. या प्रकारे नावाचा उपयोग करावयाचा असेल, तर त्यासाठी चर्च ऑफ दी नॅझरीनच्या प्रमुख मंडळाची व प्रमुखाध्यक्षमंडळाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तथापि चर्च ऑफ दी नॅझरीनच्या अधिकृत बंधारण पुस्तकानुसार अधिकृत कर्तव्य करण्यास या प्रतिबंधाचा बांध असणार नाही.

## T. मंडळीने पुरस्कृत केलेल्या संस्था

**१५८.** कोणतीही स्थानिक मंडळी, स्थानिक पंचमंडळ, प्रांतिक संघटना, प्रांतिक मंडळ या किंवा यांपैकी कोणाचेही दोन किंवा दोन पेक्षा अधिक सभासद वैयक्तिक अथवा इतर प्रकारे स्वतःहून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीतीने कोणत्याही संघटनेची, मंडळाची, भागीदारीची, समूहाची अथवा इतर गटाची स्थापना करणार नाहीत अगर अशांमध्ये सभासदत्व स्वीकारणार नाहीत. ज्या संस्था व्यापारी, सामाजिक, शैक्षणिक, परोपकारी अथवा इतर कोणत्याही प्रकारचे कार्य करण्यास पुढाकार घेतात, अशा कार्यास उत्तेजन, पुरस्कार देऊन अगर इतर कोणत्याही प्रकारे आपले हेतूपूर्तीसाठी काम करतात व ज्यांमध्ये चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सभासदांना सभासदत्वासाठी आवाहन केले जाते अथवा भावी

सहभागीदार, ग्राहक, भाडेकरू, ग्राहक सभासद, म्हणून आवाहन केले असेल अशा कोणत्याही संस्थेत चर्च ऑफ दी नॅझरीनचे सभासद भाग घेणार नाहीत. तसेच नासोरी येशूच्या मंडळीच्या सभासदांकडून अथवा त्यांच्या हितासाठी, सेवेसाठी प्रामुख्याने अथवा सर्वस्वी चालवलेल्या, पुरस्कारलेल्या अशा कोणत्याही कार्ययोजनेमध्ये, मग ती योजना व्यापारी, सामाजिक, शैक्षणिक, परोपकारी अगर इतर कोणतीही असो, चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळीचे सभासद भाग घेणार नाहीत; तथापि अशा कोणत्याही कार्यात सहभागी व्हावयाचे असेल, तर त्यासाठी प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागारमंडळ यांची स्पष्ट लेखी पूर्वपरवानगी घेणे अत्यंत जरुरीचे आहे.

## U. स्थानिक मंडळीमधील पगारी साहायक सेवक

**१५९.** मंडळीमध्ये पूर्णवेळ वा अर्धवेळ अशा काही महत्त्वाच्या सामान्य सेवेसाठी स्वतःला तयार करण्याचे पाचारण आपणाला झाले आहे, असे काही व्यक्तींना वाटेल. मंडळीला अशा सामान्य कार्यकर्त्यांचे स्थान मान्य आहे. तथापि ही सेवासंस्था मूलतः स्व-इच्छेने करावयाची असून देवाची व इतरांची सेवा आपआपल्या कुवतीप्रमाणे करणे हे प्रत्येक सभासदाचे कर्तव्य व अधिकार आहे. मंडळीमध्ये अधिक कार्यक्षमता यावी, सर्व कामे व्यवस्थित, वेळेवर व्हावीत यासाठी स्थानिक मंडळी तिची कोणतीही दुय्यम शाखा, आणि/किंवा स्थानिक उपासक समूहाच्या संलग्न संस्था- मग त्या पाळकीय संबंधातील अथवा सामान्य सभासद संबंधातील असोत- अशा कोठेही पगारी साहायक नेमणे जरुरीचे होते, तेव्हा त्याचा परिणाम मंडळीचे सर्व सभासद करीत असलेल्या विनामूल्य सेवेवर होऊ नये. तसेच मंडळीच्या आर्थिक आवक व बजेट भरण्याची जबाबदारी यांवरही विपरीत परिणाम होणार नाही याकडे आवर्जून प्रथम लक्ष दिले पाहिजे. तथापि विशेष बाबींत अपवाद करावा यासाठी प्रांताध्यक्ष व प्रांतिक सल्लागारमंडळ यांचेकडे यासंबंधात विनंती करता येईल (१२९.२७).

**१५९.१.** सर्व स्थानिक साहायक जे स्थानिक मंडळीच्या संदर्भात वैशिष्ट्यपूर्ण सेवा पुरवितात, मग ते पगारी असोत वा बिनपगारी असोत, जेव्हां ते मंडळीमध्ये व्यावसायिक सेवा पुरविण्यासाठी संबंध प्रस्थापित करतात त्या सर्वांची निवड, पाळकांनी नावे सुचवल्यावरून पंचमंडळाकडून होईल. ह्यामध्ये बालवाडी/शाळा (जन्मापासून सेकंडरीपर्यंत) संचालकही आले. या सर्व नामनिर्देशनांना प्रांताध्यक्षाकडून लेखी मान्यता

मिळणे जरुरीचे आहे. प्रांताध्यक्षांकडे अशी विनंती केल्यापासून या संबंधातील आपला निर्णय ते पंधरा दिवसांचे आत कळवतील. (१५९.४, २११.१३)

**१५९.२.** अशा साहायक मदतनिसांची सेवा एक वर्षापेक्षा अधिक काळासाठी असणार नाही आणि पाळकांची शिफारस, प्रांताध्यक्षांची पूर्व लेखी अनुमती व पंचमंडळाचे अनुकूल मत एवढ्या बाबींची पूर्णता झाल्यास त्याची सेवा पुढे नव्याने चालू ठेवता येईल. अशा मदतनिसांची वार्षिक परिक्षण करण्याची जबाबदारी पाळकाची असेल. परिक्षणाचा परिणाम म्हणून पाळक पंचमंडळाच्या सम्मतीने मदतनिसांचा विकास किंवा त्याच्या सेवाकार्य वर्णनाचे नुतनीकरण करण्याची शिफारस करू शकतात. सेवेचा काळ पूर्ण होण्यापूर्वीच अशा मदतनिसांना बडतर्फ करायचे असेल, तर त्यासाठी पाळकांची शिफारस, प्रांताध्यक्षांची मंजुरी आणि पंचमंडळाचे बहुमत या बाबी आवश्यक आहेत. बडतर्फी किंवा सेवाकार्याचे नुतनीकरण न करण्याबाबतची नोटिस त्यांच्या सेवाकार्य संपविण्याच्या तीस दिवस आधी दिलेली असावी. (१२९.२७)

**१५९.३.** अशा मदतनिसांचे काम पाळक ठरवतील व तेच त्यांच्यावर देखरेख ठेवतील. मदतनिसांनी स्थानिक मंडळीमध्ये आपल्या कामाला आरंभ केल्याच्या तीस दिवसांचे आत त्यांनी कोणती कामे करावयाची (सेवाकार्य वर्णन) त्याची माहिती त्यांना स्पष्टपणे लेखी देण्यात येईल.

**१५९.४.** मंडळीचा कोणताही पगारी सेवक पंचमंडळावर निवडून जाण्यास पात्र असणार नाही. पंचमंडळाचा एखादा सभासद मंडळीचा पगारी सेवक होईल, तर तो वा ती पंचमंडळाचा सभासद राहणार नाही.

**१५९.५.** पाळकीय बदलाच्या कालावधीमध्ये स्थानिक मंडळीचे स्थैर्य, एकता आणि सेवाकार्य सुरळीत सुरू राहणे महत्वाचे आहे. ह्याकरिता, प्रांताध्यक्ष (किंवा त्यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी) हे खालील पार्याय लागू करण्याकरिता स्थानिक पंचमंडळासोबत काम करतील: (अ) बदलाच्या कालावधीकरिता मंडळीला असलेले मदतनिसांपैकी काही किंवा सर्व ह्यांना कामावर राहू देणे; (ब) ते नवीन पाळकाला त्यांची इच्छा असल्यास स्वत:ची नवीन मदतनिसांची चमु विकसित करण्यास स्वातंत्र्य देतील; आणि (क) पंचमंडळाला व प्रांताध्यक्षांना बदलणाऱ्या मदतनिसांना वैयक्तिक आणि व्यावसायिक व्यवस्था लावण्यासाठी आवश्यक वेळ देण्यास परवानगी देतील. प्रथम, पाळकांनी राजीनामा दिला अगर त्यांची सेवा समाप्त झाली तर त्या वेळी स्थानिक मंडळीचे सर्व

सेवक-कर्मचारी आपआपल्या पदांचे राजीनामे देतील. दुसरे, यांपैकी काही अगर सर्वच सेवक-कर्मचाऱ्यांची सेवा पुढेही चालू ठेवण्यात विनंती पंचमंडळ प्रांताध्यक्षांना करू शकेल. ह्या व्यवस्थेला प्रांताध्यक्षांनी मान्यता दिल्यास ती नवीन पाळक आपल्या कामावर रूजू झाल्यापासून पुढे नव्वद दिवस पर्यंत किंवा नवीन आलेल्या पाळकांनी, कलम १५९ अनुसार, त्यांची नवीन सेवक कर्मचाऱ्यांची नावे येत्या वर्षभरासाठी सुचवेपर्यंत असेल. बालवाडी/शाळांचे (जन्मापासून सेकंडरीपर्यंत) संचालकही आपला राजीनामा देतील आणि नवे पाळक आपल्या कामावर रूजू होतील त्या शालेय वर्षाच्या अखेरीस त्यांचा राजीनामा कार्यवाहीत येईल. कोणत्याही शाखेचे किंवा/व संलग्न संस्थेचे प्रमुख कार्यकारी अधिकारी नवे पाळक रुजू होतील त्या वर्षीच्या त्यांच्या कराराच्या अखेरीस ते आपला राजीनामा देतील. नव्याने पदग्रहण करणाऱ्या पाळकांना योग्य वाटल्यास पूर्वीच्याच सेवकांची सेवा चालू ठेवावी अशी शिफारस करण्याचा अधिकार आहे.

**१५९.६.** पाळकीय बदल घडेल तेव्हा कलम १५९.५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सेवक-कर्मचाऱ्यांवर होणारे परिणाम सेवक-कर्मचारी, पंचमंडळ व मंडळी ह्यांना कळवण्याची जबाबदारी प्रांताध्यक्षांची आहे. (२११.१३)

**१५९.७.** कलम १००.२ अन्वये एखाद्या उपासकसमूहाला स्थानिक मंडळी म्हणून कार्य करण्याची मान्यता असेल तर तिच्या पाळकाला मंडळीचा कर्मचारी समजले जाणार नाही.

**१५९.८.** पगारी कर्मचारी म्हणून काम करणारी कोणीही व्यक्ती ती जेथे सभासद आहे, त्या मंडळीचा पाळक म्हणून पाचारण होण्यास अपात्र आहे. मात्र अशाला पाचारण करायचेच असेल, तर त्यासाठी प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागारमंडळाची मान्यता घेणे जरुरीचे आहे. (११५, १२९.२, २११.१०, २२५.१६)

## II. प्रांतिक प्रशासन

## A. प्रांताच्या हद्दी व नाव

**२००.** प्रमुख परिषद ही सर्व मंडळ्यांच्या सभासदत्वाला प्रांतामध्ये संगठीत करेल.

प्रांत हा परस्परांवर अवलंबून असलेल्या स्थानिक मंडळ्यांचा बनलेला असतो, आणि त्या मंडळ्यांमधील परस्पर साहाय्य, संसाधनांचे आपसात वाटप आणि सहकार्य ह्या द्वारे प्रत्येक स्थानिक मंडळींचे ध्येय सुकर करण्यासाठी स्थापित केलेला असतो.

प्रांताची हद्द आणि नाव हे प्रमुख सीमा समितीने घोषित केल्या प्रमाणे आणि जी प्रांतिक परिषद/दा समाविष्ट आहे तिच्या बहुसंख्य मतदानाद्वारे मंजूर झाल्याप्रमाणे आणि शेवटी अख्त्यारी प्रमुख अध्यक्ष किंवा प्रमुख अध्यक्षांच्या मान्यतेप्रमाणे असतील.

जेव्हां एकापेक्षा जास्त शैक्षणिक विभागांमधील प्रांतांचा एका प्रांतात विलीन होण्याचा विचार असेल तेव्हां तो नवीन प्रांत कुठल्या विभागामध्ये राहील ह्याबात प्रमुख सिमा समिती, अख्त्यारी प्रमुख अध्यंक्षाशी सल्लामसलत करून निर्णय घेईल.

## २००.१. नवीन प्रांताची निर्मिती

चर्च ऑफ दी नॅझरीन मध्ये खालील प्रमाणे नवीन प्रांताची निर्मिती केली जाऊ शकते:

१. एका प्रांताचे दोन किंवा अधिक प्रांतांमध्ये विभाजन (प्रांतिक परिषदेत दोन तृतियांश मते आवश्यक आहे).

२. दोन किंवा अधिक प्रांतांचे संयोजन करून त्यामधून एक किंवा अधिक नवीन प्रांतांची वेगळी जुळवणी तयार केली जाऊ शकते.

३. ज्या श्रेत्रामध्ये कोणत्याही प्रांताचे कार्य नाही अशा क्षेत्रात नवीन प्रांत तयार करणे.

४. दोन किंवा अधिक प्रांतांचे विलिनिकरण करणे; किंवा

५. अख्त्यारी प्रमुख अध्यक्षांना नवीन प्रांताची स्थापना करण्याबाबत शिफारस करणे. एक किंवा अधिक प्रांताध्यक्ष आणि त्यांची प्रांतिक सलागार मंडळ/ळे, राष्ट्रीय समिती/त्या, अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष आणि प्रमुखाध्यक्ष मंडळाच्या मान्यतेने हे प्रकरण प्रांतिक परिषदे कडे मंजूरी साठी व मतदानासाठी पाठवू शकतात. (२४, २००, २००.४)

**२००.२.** चर्च ऑफ द नॅझरीनचे नवीन कार्यक्षेत्र म्हणून काम सुरू होऊ शकते आणि त्याचे रूपांतर एका नवीन प्रांत व प्रांताच्या सीमा स्थापन होण्यामध्ये होऊ शकते. फेज ३ चे प्रांत खालील नमुण्यांनुसार शक्य तितक्या लवक उदयास येऊ शकतात.

**१. फेज १.** योजनाबध्द विकास व सुवार्ता प्रसाराच्या मार्गदर्शक तत्वांनुसार जेव्हां एखाद्या नवीन क्षेत्रात प्रवेश करण्याची संधी सादर केली जाते, तेव्हा फेज १ प्रांताची नियुक्ती केली जाऊ शकेल. ह्या करिता विभागिय संचालक, विभागिय सल्लागार समिती मार्फत प्रांत किंवा प्रायोजक प्रांताध्यक्ष आणि/किंवा प्रांतिक सल्लागार मंडळ हे अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष आणि प्रमुखाध्यक्ष ह्यांच्याकडे अंतिम मंजुरीसाठी विनंती सादर करू शकतात.

फेज १ च्या प्रांताध्यक्षाच्या नियुक्तीकरिता विभागिय संचालक हे जागतिक सेवा संचालकांशी सल्लामसलत करून नियुक्त करण्याचा अधिकार असणाऱ्या अख्त्यारी प्रमुखाध्यक्षाकडे शिफारस करू शकतील. फेज १ प्रांताला विकासासाठी उपलब्ध असलेल्या साधनांविषयी विभाग/रिजन मार्गदर्शन करेल. ज्या ठिकाणी प्रायोजक प्रांत आहेत तिथे अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष हे प्रायोजक प्रांताच्या/तांच्या प्रांताध्यक्ष/क्षांशी आणि सल्लागार मंडळ/ळे यांच्याशी सल्लामसलत प्रांताध्यक्षाची नेमणूक करतील.

ज्या वेळेस क्षेत्रीय योजना संचालक आणि विभागिय संचालकांच्या मते एखादा प्रांत आर्थिक, नैतिक किंवा इतर संकटकालात आहे किंवा ह्या संकटामुळे प्रांताच्या स्थैर्यावर आणि भविष्यावर गंभिर परिणाम होणार असेल तेव्हां अखत्यारी प्रमुख अध्यक्षांच्या मान्यतेने आणि जागतिक सेवा संचालकांशी सल्लामसलत करून प्रांत संकटात आहे असे घोषित केला जाऊ शकते. अखत्यारी प्रमुख अध्यक्षांच्या मान्यतेने विभागिय संचालक हे पुढील नियमीत नियोजित प्रांतिक परीषद होईपर्यंत प्रांताच्या व्यवस्थापनासाठी आणि सर्व विद्यमान मंडळांच्या बदल्यात अंतरिम मंडळाची नेमणूक करू शकतात.

**२. फेज २.** स्थापित मंडळ्यांची आणि दिक्षित सेवकांची पुरेशी संख्या व पायाभूत सुविधांची उचित परिपक्वता असणारा प्रांत फेज २ प्रांत म्हणून घोषित केल्या जावा अशी शिफारस करण्यास अस्तित्वात असेल तर तो प्रांत फेज २ म्हणून नियुक्त केला जाऊ शकतो.

अशी नियुक्ती अख्त्यारी प्रमुख अध्यक्षांनी जागतिक सेवा संचालक, विभागिय संचालक आणि प्रांताध्यक्षाच्या नेमणुकीत सामिल असलेल्या इतर व्यक्ती व मंडळांशी सल्लामसलत करून शिफारस केल्यावर प्रमुखाध्यक्ष मंडळ करील. प्रांताध्यक्ष यांची निवड किंवा नेमणूक केली जाईल.

प्रमाणित मार्गदर्शक तत्त्वांमध्ये फेज २ म्हणून नियुक्ती करिता, किमान १० स्थापित मंडळ्या, ५०० पूर्ण सभासद, ५ दिक्षित सेवक आणि किमान ५० % प्रांताचे प्रशासन खर्च प्रांतिक सेवा निधी मधून उभारला जात असणे आवश्यक आहे. या निकषांना अपवाद म्हणून प्रांतिक सल्लागार मंडळ किंवा राष्ट्रीय मंडळ अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांना विनंती करू शकतात.

ज्या वेळेस क्षेत्रिय योजना संचालक आणि विभागिय संचालकांच्या मते एखादा प्रांत आर्थिक, नैतिक किंवा इतर संकटकालात आहे किंवा ह्या संकटामुळे प्रांताच्या

स्थैर्यावर आणि भविष्यावर गंभिर परिणाम होणार असेल तेव्हां अखत्यारी प्रमुख अध्यक्षांच्या मान्यतेने आणि जागतिक सेवा संचालकांशी सल्लामसलत करून प्रांत संकटात आहे असे घोषित केल्या जाऊ शकते. अखत्यारी प्रमुख अध्यक्षांच्या मान्यतेने विभागिय संचालक हे पुढील नियमीत नियोजित प्रांतिक परीषद होईपर्यंत प्रांताच्या व्यवस्थापनासाठी आणि सर्व विद्यमान मंडळांच्या बदल्यात अंतरिम मंडळाची नेमणूक करू शकतात.

**३. फेज ३.** स्थापित मंडळ्यांची आणि दिक्षित सेवकांची सभासदांची पुरेशी संख्या असल्याची खात्री दर्शविणारा प्रांत फेज ३ प्रांत म्हणून घोषित केल्या जाऊ शकेल. नेतृत्व, पायाभूत सुविधा, आर्थिकदृष्ट्या जबाबदार आणि सैद्धांतिक एकात्मता ह्या प्रत्यक्षात असणे आवश्यक आहे. फेज ३ मधील प्रांत हे ओझे वाहण्यास सक्षम असावा आणि आंतरराष्ट्रीय मंडळीच्या जागतिक व्याप्तिमध्ये महान आज्ञेचे (ग्रेट कमीशनची) आव्हानांमध्ये सहभागी होणारा असावा.

असली घोषणा प्रमुखाध्यक्ष मंडळ करेल. त्याकरिता अखत्यारी प्रमुखाध्यक्षांनी जागतिक सेवा संचालक, विभागिय संचालक आणि प्रांताध्यक्षांच्या नियुक्तीमध्ये समाविष्ट असलेल्या इतर व्यक्ती व मंडळे ह्यांच्याशी चर्चा करून शिफारस केलेली असावी. प्रांताध्यक्षांची निवड बंधारण पुस्तकातील तरतुदींनुसार केल्या जाईल.

प्रमाणित मार्गदर्शकतत्त्वांमध्ये फेज २ म्हणून नियुक्ती करिता, किमान २० स्थापित मंडळ्या, १००० पूर्ण सभासद, १० दिक्षित सेवक असणे आवश्यक आहे.

या निकषांना अपवाद म्हणून प्रांतिक सल्लागार मंडळ किंवा राष्ट्रीय मंडळ अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांना विनंती करू शकतात.

फेज ३ प्रांत हा व्यवस्थापनाच्या दृष्टिकोणातून १००% स्वयंपोषित असणे आवश्यक आहे.

फेज ३ प्रांत हा सन्माननिय विभागाचा अविभाज्य भाग आहे. विभागिय संचालक असलेल्या विभागामध्ये, अखत्यारी प्रमुख अध्यक्ष, प्रांताशी संवाद साधने व देखरेख करण्यासाठी विभागिय संचालकांच्या मदतीची व्यवस्था करू शकतात.

ज्या वेळेस क्षेत्रिय योजना संचालक आणि विभागिय संचालकांच्या मते एखादा प्रांत आर्थिक, नैतिक किंवा इतर संकटकालात आहे किंवा ह्या संकटामुळे प्रांताच्या स्थैर्यावर आणि भविष्यावर गंभिर परिणाम होणार असेल तेव्हां अखत्यारी प्रमुख अध्यक्षांच्या मान्यतेने आणि जागतिक सेवा संचालकांशी सल्लामसलत करून प्रांत

संकटात आहे असे घोषित केल्या जाऊ शकते. अखत्यारी प्रमुख अध्यक्ष, प्रमुख अध्यक्ष मंडळाच्या मान्यतेने पुढील पैकी एक किंवा अधिक कारवाई करू शकतात:-

१. प्रांताध्यक्षांना काढून टाकणे.

२. पुढील नियमीत नियोजित प्रांतिक परिषद होईपर्यंत सर्व विद्यमान मंडळांच्या ऐवजी प्रांताच्या व्यवस्थापनासाठी अंतरिम मंडळाची नेमणूक करणे.

३. प्रांताला स्वास्थदायी आणि उद्देशाप्रती परिणामकारक असे पुनर्वसित करण्यासाठी आवश्यक तेव्हां विशेष हस्तक्षेप करणे. (२००.१, २०५.१२, २०६.२, २०९.१, ३०७.९, ३२२)

**२००.३. प्रांताची विभागणी किंवा प्रांताच्या सीमा बदलांचा निकष** - विभागिय कार्यालयाने विकसित केलेला प्रांत विकास किंवा प्रांत हद्दबदल प्रस्ताव, राष्ट्रीय मंडळ किंवा प्रांतिक सल्लागार मंडळ कार्य अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांकडे सादर करू शकतात. खालील योजनेचा विचार केला जाऊ शकतो:

१. प्रस्तावित नवीन प्रांत किंवा हद्दीकृत प्रांता मध्ये अशी लोकसंख्या केंद्र असावीत की जे नवीन प्रांताची निर्मिती किंवा प्रांताच्या नवीन हद्दी निश्चित करणे सिद्ध करतात.

२. प्रांतातील काम सुलभ करण्यासाठी दळवळण व परिवहनाची साधने उपलब्ध आहेत.

३. प्रांताच्या कार्यासाठी पुरेसे परिपक्व दिक्षित पाळक आणि ले पुढारी उपलब्ध आहेत.

४. जिथे शक्य असेल तिथे, प्रायोजक प्रांताकडे प्रांतिक सेवाकार्याकरिता पुरेसे आर्थिक उत्पन्न, पुरेसे सभासद आणि स्थापित मंडळ्या असाव्यात जेणेकरून ते प्रांताचे फेज ३ च्या अवस्थेचा प्रतिपाळ करू शकतील.

**२००.४. विलीनीकरण** - फेज ३ मधील दोन किंवा अधिक प्रांत आपापल्या प्रांतिक परषदेत दोन तृतीयांश अनुकूल मतानुसार विलीन केले जाऊ शकतात. विलीनीकरणाची शिफारस संबंधित प्रांतिक सल्लागार मंडळांनी केली असेल, (आवश्यक तिथे राष्ट्रीय मंडळ/ळे) आणि त्यात सहभागी असलेल्या प्रांतांच्या कार्य क्षेत्रातील अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांनी लेखी मान्यता दिलेली असेल, तर असे विलीनीकरण होईल.

विलीनीकरण आणि त्या संबंधित सर्व महत्वाच्या बाबींबद्दल अंतिम निर्णय विलीनीकरणाच्या प्रक्रियेत समाविष्ट असणाऱ्या प्रांतिक परिषदां आणि अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांद्वारे ठरविलेल्या वेळी व ठिकाणी घेण्यात येईल.

अशा प्रकारे तयार झालेला प्रांत संबंधित प्रांतांची मालमत्ता आणि जबाबदाऱ्या नवीन प्रांतात एकत्र करेल.

पहिल्या आणि दुसऱ्या फेजमधील प्रांतांचे विलीनीकरण परिच्छेद २००.२ मध्ये नमूद केलेल्या नवीन प्रांत स्थापनेच्या तरतुदी नुसार केले जाऊ शकते. (२००.१)

**२००.५.** जर सहभागी असणारी एक किंवा सर्व प्रांतिक परीषदा कार्य करण्यास अपयशी ठरल्या, किंवा अनेक प्रांतिक परिषदांमध्ये असहमती असेल तर, ह्याबाबत निर्णय घेण्याकरिता प्रभावित प्रांतांच्या दोन-तृतीयांश प्रांतिक सल्लागार मंडळांनी विनंती केल्यास, पुढील प्रमुख परिषदेकडे शिफारस सादर केली जाऊ शकते.

**२००.६.** प्रांताध्यक्ष हे खालील बाबींमध्ये सहाय्य करण्यासाठी प्रादेशिक मिशन संचालक किंवा साहाय्यकांचा उपयोग करू शकतात:

१. संबंधित प्रदेशात किंवा मिशन क्षेत्राच्या पाळकांमध्ये समुदाय आणि मैत्रीची भावना तयार करणे;

२. ख्रिस्ताकरिता प्रोत्साहन देऊन सेवा कार्याचा विकास, मंडळी वाढ, सुवार्ता प्रसार, नवीन मंडळ्यांची स्थापना आणि पुनर्सुरूवात करण्यासाठी योजना तयार करणे.

३. प्रांत अधीक्षक व प्रांतिक सल्लागार मंडळाच्या वतीने विशिष्ट कार्ये पार पाडणे आणि,

४. स्थानिक मंडळी आणि प्रांत यांच्यामध्ये दळणवळणाचा दुवा म्हणून सेवा पुरविणे.

## B. सभासदत्व आणि प्रांतिक परिषदेची वेळ

**२०१. सभासदत्व** - प्रांतिक परिषदेचे सभासद पुढील प्रमाणे असतील: सर्व नियुक्त केलेले दिक्षित सेवक; सर्व नियुक्त साहाय्यक सेवक; सर्व नियुक्त सनदी सेवक; सर्व सेवानिवृत्त नियुक्त सेवक; प्रांतिक सचिव; प्रांतिक कोषाध्यक्ष; प्रांतिक परिषदेला अहवाल देणारे सर्व प्रांतिक स्थायी समित्यांचे अध्यक्ष; प्रांतातील स्थानिक मंडळीचे सभासदत्व

असणारे चर्च ऑफ द नॅझरीनच्या उच्च शिक्षण संस्थांचे कोणतेही ले अध्यक्ष; जागतिक शाब्बाथ शाळा व शिष्यत्व सेवेचे प्रांतिक अध्यक्ष (एस. डी. एम. आय.); जागतिक वयोगट सेवाकार्याचे प्रांतिक संचालक (मुले आणि प्रौढ); प्रांतिक एस. डी. एम. आय. चे कार्यकारी मंडळ; जागतिक नॅझरीन युवक संघाचे प्रांतिक अध्यक्ष (एन. वाय. आय.); जागतिक ख्रिस्तवार्ता संघाचे प्रांतिक अध्यक्ष (एन. एम. आय.); प्रत्येक मंडळीच्या जागतिक शाब्बाथ शाळा व शिष्यत्व सेवा संघाच्या कार्यकारी मंडळाचे (एस. डी. एम. आय.) नवनिर्वाचित अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष; प्रत्येक स्थानिक मंडळीच्या जागतिक युवक संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष (एन. वाय. आय.); प्रत्येक स्थानिक मंडळीच्या जागतिक ख्रिस्तवार्ता संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष; किंवा एखादा निवडलेला पर्यायी व्यक्ती प्रांतिक परिषद मधील एन. एम. आय, एन. वाय. आय, आणि एस. डी. एम. आय. संस्थांचे प्रतिनिधित्व करू शकतो; सेवाकार्यात नियुक्त केलेल्या भूमिकेत सेवा करणारे; प्रांतिक सल्लागार मंडळाचे ले सदस्य; प्रांताच्या स्थानिक मंडळीमध्ये सभासदत्व असणारे सक्रिय ले मिशनरी; प्रांताच्या स्थानिक मंडळीमध्ये सभासदत्व असणारे असे सर्व सेवानिवृत्त ले मिशनरी जे सेवानिवृत्तीच्या वेळी सक्रिय मिशनरी होते; आणि प्रांतिक परिषदेच्या अख्त्यारितील प्रत्येक स्थानिक मंडळी आणि मंडळी सारख्या गटाचे ले प्रतिनिधी. (२४, ११३.१४-११३.१५, १४६, १५२.२, २०१.१-२०१.२, २१९.२, २२२.२, २२४.४, २४२.२, २४४.२, ५०५-५२८.१, ५३२.८, ५३३-५३३.४, ५३४-५३४.३, ५३५-५३५.१, ५३६-५३६.२, ५३८.९)

**२०१.१.** ज्या प्रांताचे मंडळ्यांमधील पूर्ण सभासद ५००० पेक्षा कमी आहे त्यांच्या स्थानिक मंडळ्या आणि मंडळी सारखे गट पुढील प्रमाणे प्रांतिक परीषदेत प्रतिनिधित्वासाठी पात्र असतील. ५० किंवा त्याहून कमी पूर्ण सभासद असणाऱ्या प्रत्येक स्थानिक मंडळी किंवा मंडळी सारख्या गटाकरिता दोन प्रतिनिधी आणि त्यापुढील प्रत्येक ५० पूर्ण सभासदांसाठी एक प्रतिनिधी आणि त्या नंतरच्या पूर्ण ५० सभासदांचा शेवटच्या प्रमुख भागासाठी अतिरिक्त एक प्रतिनिधी. (२४, ११३.१४-११३.१५, २०१)

**२०१.२.** ज्या प्रांताचे मंडळ्यांमधील पूर्ण सभासद ५००० पेक्षा जास्त आहे त्यांच्या स्थानिक मंडळ्या आणि मंडळी सारखे गट पुढील प्रमाणे प्रांतिक परीषदेत प्रतिनिधित्वासाठी पात्र असतील. ५० किंवा त्याहून कमी पूर्ण सभासद असणाऱ्या प्रत्येक स्थानिक मंडळी किंवा मंडळी सारख्या गटाकरिता एक प्रतिनिधी आणि त्यापुढील प्रत्येक ५० पूर्ण

सभासदांसाठी एक प्रतिनिधी आणि त्या नंतरच्या पूर्ण ५० सभासदांचा शेवटच्या प्रमुख भागासाठी अतिरिक्त एक प्रतिनिधी. (२४, ११३.१४-११३.१५, २०१)

**२०२. वेळ.** प्रांतिक परिषद दरवर्षी अख्त्यारी प्रमुख अध्यक्षांनी नियुक्त केलेल्या वेळेस आणि प्रांतिक सल्लागार मंडळाने निश्चित केलेल्या जागेवर किंवा प्रांताध्यक्षांनी व्यवस्था केलेल्या ठिकाणी आयोजित केली जाते.

**२०३. नामसूचक समिती.** प्रांतिक परिषद भरण्याअगोदर प्रांताध्यक्षाने सल्लागार मंडळाशी सल्लामसलत करून प्रांतिक परिषदेत काम करण्यासाठी नामसूचक समिती नेमावी. ही समिती प्रांतिक परिषद भरण्याचे अगोदरच नेहमीच्या समित्यांसाठी व अधिकारपदांसाठी नावांची सुचना तयार करून ठेवील. (२१५.२)

**२०४.** सर्व प्रांतिक घटकांना इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा उपयोग करून भेटण्यास परवानगी असेल. प्रांतिक सल्लागार मंडळ मतदान पध्दतीस मान्यता येईल. आवश्यक सर्व संभाषण आणि मतदान इलेक्ट्रॉनिक पध्दतीने केले जाऊ शकेल.

## C. प्रांतिक परिषदेचे कामकाज

**२०५. कामकाजाचे नियम:** लागू होणारा कायदा, संस्थापनेचे नियम, बंधारण पुस्तकातील शासनाचे नियम, यांना अनुसरून चर्च ऑफ दी नॅझरीनच्या स्थानिक, प्रांतिक व जागतिक सभासदांच्या सभा व कामकाज, आणि समित्या व संस्थांचे नियमन व नियंत्रण हे *संसदीय प्रक्रियेकरिता रॉबर्ट्स रुल्स ऑफ ऑर्डर (नवीन प्रत)* या नुसार चालेल. (३४)

## २०५.१.प्रांतिक परिषदेचे कामकाज येणे प्रमाणे होईल:

**२०५.२.** प्रांताध्यक्षांचा, नव्याने स्थापित केलेल्या मंडळ्यांसह प्रांतिक सेवाकार्याचा सारांश देणे व वार्षिक अहवाल ऐकणे आणि स्वीकारणे.

**२०५.३.** पाळक किंवा नियुक्त सुवार्तिक म्हणून सेवा करीत असलेल्या सर्व दिक्षित व सनदी सेवकांचे अहवाल ऐकणे आणि स्वीकारणे आणि दिक्षित, सेवक आणि सेविका यांच्या चालचलनाचा विचार करणे. तसेच ज्यांना सर्व प्रकारच्या सेवेसाठी परिच्छेद ५०५-५२८.२ नुसार प्रांतिक प्रमाणपत्रे प्राप्त असणाऱ्या इतर सर्व प्रत्यक्ष सेवेत नसलेले दिक्षित, सेवक, सेविका, आणि सनदी सेवक यांच्या तोंडी अहवालाऐवजी चिटणिसांकडे

दाखल झालेले लिखीत अहवाल प्रांतिक परिषदेच्या ठरावाने स्वीकारणे. (५२१,५३२.८, ५३८.९)

**२०५.४.** काळजीपूर्वक परीक्षा घेऊन पंचमंडळ किंवा प्रांतिक सल्लागार मंडळ ह्यांनी शिफारस केलेल्या व्यक्तींना सनदी सेवक म्हणून सनदपत्रे देणे. मात्र अशा व्यक्तींना सेवेसाठी पाचारण झाले आहे याचा निर्णय प्रथम होणे आवश्यक आहे. तसेच प्रांतिक परवानामंडळ किंवा प्रांतिक सेवा मंडळाच्या अनुकूल शिफारशीवरून अशा सनदपत्रांचे नवीनीकरण करून देणे. (१२९.१४, ५३१.५, ५३२.१, ५३२.३)

**२०५.५.** काळजीपूर्वक परीक्षा घेऊन पंचमंडळाने शिफारस केलेल्या व्यक्तींना सनदी सेविका म्हणून सनदपत्रे देणे. मात्र अशा व्यक्तींना सेवेसाठी पाचारण झाले आहे याचा निर्णय, प्रांतिक परवानामंडळ किंवा प्रांतिक सेवा मंडळाच्या अनुकूल शिफारशीने होणे आवश्यक आहे. (१२९.१५)

**२०५.६** दिक्षित वर्गासाठी किंवा सेवकवर्गासाठी आवश्यक पात्रता पूर्ण केलेल्या व्यक्तींना प्रांतिक परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवा मंडळाच्या अनुकूल शिफारशीनुसार निवडून देणे. (५३३.३, ५३४.३)

**२०५.७** चर्च ऑफ दी नॅझरीन मध्ये इतर संस्थांमधून आलेल्या व्यक्तींचे सेवकवर्गातील स्थान व त्यांची लायकीपत्रे मान्य करणे. अशा व्यक्तींबाबत प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवा मंडळाच्या अनुकूल शिफारशीवरून त्यांना चर्च ऑफ दी नॅझरीन मध्ये पद देणे योग्य असून त्यांची ठायी आवश्यक ती गुणवत्ता आहे हे याचा निर्णय पूर्वीच केलेला असावा. (५३२.२, ५३५-५३५.२)

**२०६.८.** दुसऱ्या प्रांतामधून बदलून आलेल्या सेवकीय प्रमाणपत्रे असणाऱ्या व्यक्ती, सेवक वर्गाचे सदस्य आणि ज्यांना सेवकीय भुमिकेवर नियुक्त करण्यात आलेले आहे, आणि ज्यांच्या मध्यावधी बदल्या प्रांतिक सल्लागार मंडळाने मान्य केलेल्या आहेत आणि प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवा मंडळाच्या अनुकूल शिफारशीवरून ज्यांना प्रांतिक परिषदेचे सभासदत्व देणे योग्य असून त्यांच्या ठायी आवश्यक ती गुणवत्ता आहे असा निर्णय पूर्वीच केलेला आहे, अशांचा स्वीकार करणे. (२३१.९-२३१.१०, ५०५, ५०८-५११.१, ५३७-५३७.२)

**२०५.९.** सेवक वर्गाचे सदस्य, सेवकीय भुमिकेवर नियुक्त करण्यात आलेले सेवक आणि ज्यांच्या मध्यावधी बदल्या प्रांतिक सल्लागार मंडळाने मान्य केलेल्या आहेत आणि

प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवा मंडळाने त्यांच्या इतर प्रांतामध्ये बदली घेऊन जाण्याच्या इच्छेला अनुकूल शिफारस दिलेली आहे, अशांना बदली पत्र प्रदान करणे. (५०५, ५०८ - ५११.१, २३१.९ - २३१.१०, ५३७ - ५३७.१)

**२०५.१०.** प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवा मंडळाच्या अनुकूल शिफारशीवरून परिच्छेद ५०५-५२८.२ मधील परिभाषेनुसार ज्या व्यक्ती सेवाकार्याकरिता पात्र आहेत अशांची एका वर्षासाठी नियुक्ती किंवा नोंदणी करणे.

**२०५.११.** मतपत्रिकेद्वारे दोन तृतीयांश अनुकूल मतदानाद्वारे एका दिक्षिताला प्रांताध्यक्षपदावर निवडून देणे. प्रांताध्यक्षपदावर निवडून आलेली व्यक्ती, त्याच्या/तिच्या निवडणुकीनंतर येणाऱ्या दुसऱ्या प्रांतिक परिषदेच्या अंतिम तहकूबीनंतर ३० दिवसां पर्यंत आणि या पदावर दुसऱ्या व्यक्तीची निवड किंवा नियुक्ती होऊन तो/ती रूजू होईपर्यंत सेवारत राहील. प्रांताध्यक्षाच्या पुनर्निवडीची प्रक्रिया "होय" किंवा "नाही" अशा मतपत्रिकेद्वारे केलेल्या मतदानाने होईल. शिस्तभंगाच्या कारणास्तव ज्या दीक्षिताने आपले दीक्षापत्र परत केले आहे, अशाला या पदावर निवडून देण्यास पात्र मानले जाणार नाही. कोणत्याही प्रांताध्यक्षाची त्याच्या/तिच्या वयाच्या सत्तराव्या वाढदिवसानंतर या पदावर निवड किंवा नियुक्ती करता येणार नाही.

**२०५.१२.** फेज २ किंवा फेज ३ मधील प्रांताच्या प्रांताध्यक्षाने दोन प्रांतिक परिषद वर्षे सेवा केल्यानंतर त्याची निवड प्रांतिक परिषद पुढील चार वर्षांच्या कालावधीकरिता करू शकेल. ह्या करिता अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांची मान्यता असणे आवश्यक आहे. ह्या पदाच्या वाढीव कालावधीकरिता निवडणूक प्रक्रिया ही मतपत्रिकेद्वारे दोन तृतीयांश अनुकूल "होय" किंवा "नाही" मतदान अशी असेल. (२००.२)

**२०५.१३.** तथापि ही प्रमुख अध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार समिती यांना असे वाटले की, प्रांताध्यक्षांना दिलेली मुदतवाढ या मुदतीचे चालू वर्ष संपल्यानंतर पुढे चालू ठेवू नये, तर या क्षेत्रात अधिकारारूढ असलेले प्रमुख अध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार समिती यांना आदेश देऊन हा प्रश्न मतदान निर्णयासाठी प्रांतिक परिषदेकडे पाठवता येईल. हा प्रश्न पुढीलप्रमाणे रचलेला असेल:

*"सध्याच्या प्रांतिक परिषदेची मुदत संपल्यानंतरही सध्याच्या प्रांताध्यक्षांना सेवेत ठेवावे किंवा ठेवू नये?"* प्रांतिक परिषदेने मतदान घेऊन दोन तृतीयांश एवढ्या बहुमताने

प्रांताध्यक्ष यांची सेवा पुढे चालू ठेवावी असे ठरवले, तर जणूकाही मतदान झालेच नाही अशाप्रकारे त्यांचे हे पद पुढे चालू राहील.

तथापि, प्रांतिक परिषदेने अशाप्रकारे मतदान घेऊन प्रांत अध्यक्षांचे पद पुढे चालू ठेवले नाही, तर त्या प्रांतिक परिषदेच्या तहकुबिनंतरच्या ३०-१८० दिवसांमध्ये त्या प्रांताध्यक्षाच्या पदाची मुदत अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांनी प्रांतिक सल्लागार समितीशी सल्लामसलत करून निश्चित केलेल्या तारखेस संपुष्टात येईल. (२०६.२, २०८, २३९)

**२०५.१४.** प्रांतिक सल्लागार मंडळावर तीनपर्यंत दिक्षित सेवक व तीनपर्यंत सामान्य सभासद मतपत्रिकेवरील मतदानाने निवडून देणे. त्यांच्या सेवेचा काळ प्रांतिक परिषदेने निश्चित केल्याप्रमाणे चार वर्षांपेक्षा अधिक मुदतीचा असणार नाही, आणि त्या पदावर दुसऱ्यांची निवड होऊन ते पात्र व रूजू होईपर्यंत चालू राहील.

तथापि, प्रांताची एकूण सभासदसंख्या ५००० सभासदांपेक्षा जास्त असल्यास, प्रांतिक परिषद पुढील प्रत्येक २५०० सदस्यांसाठी आणि अखेरच्या २५००च्या निम्म्याहून अधिक सभासदांसाठी प्रत्येकी आणखी एक नियुक्त केलेला दीक्षित व आणखी एक सामान्य सभासद निवडू शकेल. (२२४)

**२०५.१५. प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ:** प्रांतिक सेवकीय परवाना मंडळाची निवड करणे ज्यामध्ये पाचपेक्षा कमी नियुक्त दीक्षीत सेवक नसतील आणि त्यापैकी एक प्रांताध्यक्ष आणि एक प्रांतिक चिटणीस, ते दीक्षित असल्यास, असतील. या मंडळाची सेवा चार वर्षे एवढ्या काळासाठी आणि त्यांच्या कामावर दुसऱ्यांची निवड होऊन ते पात्र व रूजू होईपर्यंत चालू राहील. प्रांतिक चिटणीस जर सामान्य सभासद असेल तर, तो मंडळाचा गैर-मतदान सदस्य म्हणून काम करेल. या मंडळाची प्रांतिक परिषदेच्या अगोदर बैठक होईल व त्यामध्ये या मंडळाच्या अधिकार कक्षेत येणाऱ्या सर्व बाबींचा विचार होईल. प्रांतिक परिषद भरण्यापूर्वी हे मंडळ आपले काम शक्यतो पूर्ण करील. (२२९-२३१.१०)

**२०५.१६. प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ:** प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळाची निवड करणे. ह्यामध्ये पांच किंवा अधिक दीक्षित सेवक असतील. त्यांची सेवा चार वर्षांपर्यंत आणि आणि त्यांच्या कामावर दुसऱ्यांची निवड होऊन ते पात्र व रूजू होईपर्यंत चालू राहील. (२३२)

**२०५.१७. प्रांतिक सेवकीय मंडळ:** दीक्षीत वर्गातील सेवेसाठी उमेदवार तयार करण्याच्या प्रयत्नांना मदत करण्यासाठी आणि सेवकांना पाळकीय विकासाच्या संधी प्रदान करून साहाय्य करण्यासाठी, प्रांतिक परिषद, प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ आणि प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळ ह्या दोनही मंडळांवर, प्रांतिक सेवकीय मंडळ म्हणून सेवा देण्यासाठी आवश्यक अशी सभासदांची एकूण संख्या निवडू शकते. ते निवडलेले सेवक सभासद चार वर्षाकरिता सेवा देतील.

प्रांतिक सेवकीय मंडळ, त्या मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून प्रांताध्यक्षांसोबत, प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ आणि प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळाची सर्व कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी प्रांतिक सेवकीय मंडळाचे आयोजन करू शकेल. (२१६, २२९-२३४.४)

**२०५.१८.** परिच्छेद २३६ मधील तरतुदींनुसार प्रांतिक मंडळी-मालमत्ता मंडळाची निवड करणे. (२०६.१)

**२०५.१९. प्रांतिक परिषदेला योग्य वाटेल तसे खालीलपैकी एक किंवा दोन्हीं निवडणे:**

१. प्रांताध्यक्षांसह कमीत कमी सहा सभासदांचे प्रांतिक सुवार्ताप्रसार मंडळ,

२. प्रांतिक सुवार्ताप्रसार संचालक.

निवड झालेल्या व्यक्तीची सेवा ही प्रांतिक परिषदेच्या शेवटल्या तहकूबीपर्यंत आणि त्यांच्या कामावर दुसऱ्यांची निवड होऊन ते पात्र व रूजू होईपर्यंत चालू राहील. (२०६.१, २१५)

**२०५.२०.** परिच्छेद २४१ मध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार प्रांतिक शाब्बाथशाळा व शिष्यत्व मंडळ निवडणे. हे मंडळ त्यांचे उत्तराधिकारी निवडून पात्र होईपर्यंत सेवा करतील. (२०६.१, २१५)

**२०५.२१.** प्रांतिक परिषदीय अर्थसमिती निवडून देणे. यामध्ये सामान्य सभासद व सेवक ह्यांचे समान प्रतिनिधी राहतील. प्रांतिक परिषदेने ठरविल्यानुसार त्यांच्या सेवेचा कार्यकाळ चार वर्षापेक्षा जास्त असणार नाही, आणि त्यांचे उत्तराधिकारी निवडून येईपर्यंत आणि पात्र होईपर्यंत ते कार्य करीत राहतील. प्रांताध्यक्ष व प्रांतिक खजिनदार हे या समितीचे पदसिद्ध सदस्य असतील. (२३८-२३८.३)

**२०५.२२.** प्रांतिक न्यायमंडळाची निवड करणे. ह्यामध्ये तीन नियुक्त दीक्षित सेवक, प्रांताध्यक्ष आणि दोन सामान्य सभासद असा पाच व्यक्तींचा समावेश असावा. निवड

झालेल्या व्यक्तींची सेवा ही चार वर्षांपेक्षा अधिक असणार नाही, आणि त्यांचे उत्तराधिकारी निवडून येऊन पात्र होईपर्यंत राहील. (६१०)

**२०५.२३.** प्रमुख परिषदेच्या १६ महिन्यांच्या आत किंवा ज्या ठिकाणी प्रवाशी व्हिसा किंवा इतर असामान्य तयारी गरजेची आहे त्या ठिकाणी २४ महिन्यांच्या आत सर्व सामान्य प्रतिनिधिंची व एका सेवकीय प्रतिनिधिची निवड करणे. प्रांताध्यक्ष हे एक सेवकीय प्रतिनिधी असतील. प्रत्येक फेज ३ मधील प्रांताला प्रमुख परिषदेस समान संख्येत सेवकीय व सामान्य प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार आहे. प्रमुख परिषदेच्या वेळी प्रांताध्यक्ष हे सेवकीय प्रतिनिधींपैकी एक असतील आणि उर्वरीत सेवकीय प्रतिनिधी हे दिक्षीत सेवक असतील. जर काही कारणास्तव प्रांताध्यक्ष उपस्थित राहण्यास असमर्थ असल्यास, किंवा प्रांताध्यक्षांचे पद रिक्त असेल आणि नवीन प्रांताध्यक्षांची नियुक्ती अजून झालेली नसेल, तर निवडून दिलेली पर्यायी व्यक्ती प्रांताध्यक्षांच्या जागी बसविता येऊ शकेल. नामसुचक समिती, सामान्य व सेवकीय अशा दोन्ही वर्गांतून जेवढे प्रतिनिधी पाठविणे रास्त आहे, त्यांच्या संखेच्या सहापट एवढी नावे असलेली मतपत्रिका सादर करील. ह्या नामनिर्देशित यादी मधून, निवडून द्यावयाच्या संख्येच्या तीनपटच नावे मतपत्रिकेवर ठेवता येतील. मग परिच्छेद ३०१.१-३०१.३ मधील तरतूदींनुसार परवानगी दिलेल्या प्रतिनिधी आणि त्यांचे पर्यायी यांची निवडणूक होईल. प्रत्येक प्रांतिक परिषद प्रतिनिधींच्या संख्येच्या दुप्पटीपेक्षा जास्त होणार नाहीत एवढेच पर्याय प्रतिनिधी निवडू शकते. ज्या ठिकाणी प्रवासी व्हिसा प्राप्त करण्याबाबत समस्याप्रधान परिस्थिती आहे, त्याठिकाणी प्रांतिक परिषद अतिरिक्त पर्यायी निवडण्यासाठी प्रांतिक सल्लागार मंडळास अधिकार देऊ शकते. निवडून आलेल्या प्रतिनिधींनी प्रमुख परिषदेच्या आरंभापासून ते अखेरपर्यंत सर्वच सभांना न चुकता, विश्वासूपणे उपस्थित राहावे अशी अपेक्षा आहे. यात ईश्वरी इच्छेने आडकाठी आल्यास तो अपवाद समजावा. (२५-२५.२, ३०१.१-३०१-३, ३०३, ३३२.१)

**२०५.२४.** परिषदेला योग्य वाटल्यास तिच्या अख्त्यारीतील स्थानिक मंडळीमध्ये सहसभासद करून घेण्याची पध्दत चालू करणे. (तथापि सहसभासद हे प्रतिनिधी होण्यासाठी पूर्ण सभासद म्हणून गणले जाणार नाहीत.) (१०८)

**२०५.२५.** दर वर्षी प्रांतिक खजिनदाराच्या सर्व जमाखर्चाची पुस्तके, पावत्या वगैरेंची हिशेबतपासणी करून घेण्याची तरतूद करणे. ही हिशेबतपासणी देशाच्या किंवा राज्याच्या लागू असलेल्या कायद्यान्वये अपेक्षित किमान मानदंडानुसार, किंवा इतर मान्यताप्राप्त

व्यावसायिक हिशेबतपासणीच्या मानदंडानुसार असावी. हे कार्य प्रांतिक हिशेबतपासणी समिती, स्वतंत्र हिशेबतपासणी समिती (चार्टर्ड अकाऊंटंट), अथवा प्रांतिक सल्लागार मंडळाने निवडलेल्या इतर योग्यता पात्र व्यक्तींनी करावी. (२२५.२४)

**२०५.२६.** प्रांतिक चिटणिसांच्या मार्फत प्रमुख परिषदेपुढे मागील चार वर्षांच्या कामकाजाचा पूर्ण अहवाल सादर करणे. ही अहवालाची प्रत छोट्या पुस्तिकेप्रमाणे चांगली नीट बांधनी केलेली असावी. (२०७.३-२०७.४, २२०.७)

**२०५.२७.** प्रांतिक सेवकीय परवाना मंडळाच्या किंवा प्रांतिक सेवकीय मंडळाच्या शिफारशीवरून एखाद्या सेवकाला सेवानिवृत्तवर्गात घालणे. सेवावर्गातील कुठलाही बदल प्रदान करण्यासाठी प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ आणि प्रांतिक सेवकीय मंडळाच्या शिफारशीवरून प्रांतिक परिषदेने मान्यता दिलेली असणे आवश्यक आहे. (२३१.८, ५३६)

**२०५.२८.** प्रांतिक परिषदेच्या हद्दीतील चर्च ऑफ नॅझरीनच्या संपूर्ण कार्याचा विचार करणे आणि त्याची काळजी वाहणे.

**२०५.२९.** आपल्या कार्यक्षेत्रातील ज्या कामाची इतर कोणत्याही प्रकारे तरतूद केलेली नाही असे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या आत्मा व पध्दती यांना अनुसरून असलेले इतर कोणतेही कार्य करणे.

**२०६. प्रांतिक परिषदेसंबंधिचे इतर नियम:** जिथे मुलकी कायद्यांची मान्यता आहे तिथे प्रांतिक परिषद ही प्रांतिक सल्लागार मंडळाला संघटित संस्था म्हणून स्वत:ची नोंदणी करून घेण्याचा अधिकार देईल. वरील तरतूदींनुसार प्रांतिक सल्लागार मंडळाला स्वत:च्या ठरावाने पुढील कामे करण्याचा अधिकार राहील. संघटित संस्थेच्या हेतूस सोयीचे आहे किंवा आवश्यक आहे म्हणून स्थावर, जंगम, वैयक्तिक अशी कोणत्याही प्रकारची मालमत्ता विकत घेणे, मालकीची ठेवणे, विकणे, अदलाबदल करणे, गहाण ठेवणे, विश्वस्त म्हणून दस्तऐवज करणे, तारण लावून देणे, भाड्याने देणे, ताबा देणे हे करणे. (२२५.६)

**२०६.१.** बंधारण पुस्तकामध्ये स्पष्ट निर्देशाने वेगळी तरतूद केली नसेल, तर प्रांतिक मंडळे व समित्या यांवर सेवक आणि सामान्य सभासदांची संख्या समान असेल.

**२०६.२.** फेज १ व फेज २ श्रेणीतील प्रांताच्या प्रांताध्यक्षांची निवड ही परिच्छेद २००.२ मधील तरतूदींनुसार केली जाईल. २ ऱ्या फेजमधील प्रांत हा फेज २ मध्ये असण्यासाठी आवश्यक पात्रतांची पूर्ती करीपर्यंत फेज १ च्या स्थितीस परत येऊ शकतो.

**२०६.३.** एखाद्या प्रांतिक परिषदेच्या सभाध्यक्षपदी असणाऱ्या अधिकाऱ्याला प्रांतिक परिषदेचे कामकाज चालविणे अशक्य आहे असे वाटले आणि त्यांनी परिषद पुढे ढकलली, रद्द केली किंवा परिषद तहकूब केली, तर त्या विभागातील अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष, प्रमुख अध्यक्ष मंडळाच्या सल्लामसलतीने, प्रांतिक परिषद तहकूब होण्यापूर्वी ज्यांची निवड झालेली नव्हती अशा सर्व प्रांतिक अधिकाऱ्यांची कामकाज करण्यासाठी एक वर्षाकरिता नेमणूक करतील.

## D. प्रांतिक परिषदेच्या कामकाजाचा अहवाल

**२०७.** "परिषदीय अहवाल" हे प्रांतिक परिषदेच्या नियमीत कामकाजाचे नोंदणीपुस्तक आहे.

**२०७.१.** हा अहवाल प्रमुख चिटनिसांच्या कार्यालयाने परवानगी दिलेल्या स्वरुपातच तयार केला पाहिजे. या अहवालाच्या कागदी प्रती स्थानिक पातळीवर छापल्या जाऊ शकतील.

**२०७.२.** कामकाजाची वेगवेगळी बाब वेगळ्या परिच्छेदात नोंदलेली असेल.

**२०७.३.** प्रमुख परिषद या कामकाज-अहवालाची तपासणी करणार म्हणून ती व्यवस्थित लिहून तपासून ठेवावी. (२०५.२६, २२०.७)

**२०७.४.** चार चार वर्षाच्या प्रत्येक काळासाठी कामकाजाचा अधिकृत अहवाल वेगळी कायमस्वरूपी बांधणी करून जतन करावा. याची एक प्रत प्रांतिक परिषदेच्या दप्तरामध्ये जतन करून ठेवण्यात येईल व अशीच दुसरी एक प्रत प्रमुख परिषदेच्या दप्तरामध्ये जतन करून ठेवण्यात येईल. (२२०.५, २२०.७)

**२०७.५.** प्रमुख चिटणीसांनी प्रमुख अध्यक्षांच्या मंडळाबरोबर सल्लामसलत करून ठेवलेल्या विषयक्रमानुसारच या अहवालातील नोंदी शक्यतो लावलेल्या असाव्यात. प्रांतिक परिषद भरण्यापूर्वी या विषयक्रमाची एक प्रत प्रांतिक चिटणीसाकडे पाठविली जाईल.

**२०७.६.** या कामकाज अहवालामध्ये स्थानिक मंडळ्यांवर नेमलेल्या पाळकांची नावनिशीवर यादी असावी. एवढेच केवळ नव्हे, तर प्रांतिक परिषदेचे सेवकीय व सामान्य सभासद नियमीत किंवा विशेष कामामध्ये गुंतलेले आहेत, जे प्रांतावर कोणत्यातरी सेवेत आहेत अशांचीही नावे लिहावीत. म्हणजे त्या विभागासाठी सेवानिवृत्ती व लाभकार्याची

जबाबदारी असलेल्या सेवानिवृत्ती मंडळाकडे लाभासाठी त्यांनी अर्ज केल्यास त्यांचा विचार करणे सोयीचे होईल. (११५)

## E. प्रांताध्यक्ष

**२०८.** प्रांतिक परिषदेमध्ये प्रांताध्यक्ष पदासाठी निवडलेल्या प्रांताध्यक्षांच्या कामकाजाचा कार्यकाळ, प्रांतिक परिषदेच्या तहकूबीनंतर ३० दिवसांनी सुरू होईल. प्रांतिक परिषदेने निवडून दिलेल्या प्रांताध्यक्षाची सेवा ही दोन पूर्ण वर्ष चालेल आणि त्यानंतर येणाऱ्या पुढील प्रांतिक परिषदेच्या तहकूबीनंतर ३० दिवसांनी समाप्त होईल. या नमूद केलेल्या प्रांतिक परिषदेमध्ये, प्रांताध्यक्ष पुन्हा निवडून येऊ शकतात किंवा एखादा उत्तराधिकारी निवडला जाईल किंवा नेमला जाईल किंवा पात्र होऊ शकेल. अख्त्यारी प्रमुख अध्यक्षांनी नेमणूक केलेल्या प्रांताध्यक्षांच्या कामकाजाची सुरुवात त्यांच्या नियुक्तीच्या वेळी सुरू होईल. त्यामध्ये नेमणूक झालेल्या मंडळी-वर्षाच्या उर्वरीत कालावधीचा समावेश होईल आणि पुढील दोन मंडळी-वर्षांपर्यंत राहील. प्रांताध्यक्षाची सेवा ही दोन पूर्ण वर्ष चालेल आणि त्यानंतर येणाऱ्या पुढील प्रांतिक परिषदेच्या तहकूबीनंतर ३० दिवसांनी समाप्त होईल. या नमूद केलेल्या प्रांतिक परिषदेमध्ये, प्रांताध्यक्ष पुन्हा निवडून येऊ शकतात किंवा एखादा उत्तराधिकारी निवडला जाईल किंवा नेमला जाईल किंवा पात्र होऊ शकेल. प्रांतिक परिषदेच्या कार्यालयात प्रांतिक सल्लागार मंडळाच्या व अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांच्या मान्यतेशिवाय कर्मचारी म्हणून कार्यरत असणारा कोणताही वडील प्रांताध्यक्ष पदावर निवडण्यासाठी किंवा नेमणूक करण्यास पात्र ठरणार नाही, (परिच्छेद ११५ शी सुसंगत) (२०५.११-२०५.१३)

**२०९.** प्रांतिक परिषदेच्या अधिवेशनांच्या मध्यंतरी जर प्रांताध्यक्षाची जागा कोणत्याही कारणाने खाली झाली तर प्रमुख अध्यक्ष सर्व मिळून अगर त्यांपैकी कोणीही एकजण हे रिक्त पद प्रांतिक सल्लागार समिती (DAC)शी सल्लामसलत करून भरील. सल्लामसलतीकरिता समितीला एकत्रितपणे विचारात घेण्याकरिता नावे सादर करण्यासाठी आमंत्रण समाविष्ट असेल, त्यामध्ये अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांनी पुढे आणलेल्या नावांचाही समावेश असेल. (२३९, ३०७.७)

**२०९.१.** फेज १ व फेज २ मधील प्रांताच्या प्रांताध्यक्षांचे कामकाजाचे पद हे त्या क्षेत्रातील अधिकारारूढ असलेल्या प्रमुख अध्यक्ष यांचे सूचनेनुसार एखाद्या कारणाने रिक्त घोषित केले जाऊ शकते. फेज ३ मधील प्रांताचे प्रांताध्यक्षांचे कामकाजाचे पद हे

प्रांतिक सल्लागार समिती (DAC)च्या दोन तृतीयांश मतानुसार रिक्त घोषित केले जाऊ शकते. (२३९, ३२१)

**२०९.२.** एखाद्या पदावर असणाऱ्या प्रांताध्यक्षांची तात्पुरती असमर्थता असल्यास, त्या क्षेत्रातील अधिकारारूढ असलेले प्रमुखाध्यक्ष प्रांतिक सल्लागार मंडळाशी सल्लामसलत करून संयुक्तपणे हंगामी प्रांताध्यक्ष म्हणून काम करण्यासाठी पात्र वडील नियुक्त करू शकतील. एखाद्या प्रांताध्यक्षांच्या असमर्थतेचा प्रश्न त्या क्षेत्रातील अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार मंडळ निश्चित करेल. (३०७.८)

**२०९.३.** एखाद्या प्रांताध्यक्षांनी राजीनामा दिल्यास किंवा त्यांची सेवा संपुष्टात आणल्यास, प्रांतिक कार्यालयातील कर्मचारी, मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा दुय्यम किंवा आणि प्रांताच्या सलग्न संस्था, पगारी व बिनपगारी, जसे की सहाय्यक प्रांताध्यक्ष आणि कार्यालय सचिव, यांनी प्रांताध्यक्षांच्या कामकाजाच्या अंतिम तारखेसह राजीनामे सादर करावेत. तथापि, एक किंवा अधिक कर्मचारी सदस्य त्या क्षेत्रातील अधिकारारूढ असलेले प्रमुखाध्यक्षांच्या आणि प्रांतिक सल्लागार मंडळाच्या लेखी मंजुरीसह राहू शकतात. परंतु नवीन प्रांताध्यक्षांनी कार्यभार ग्रहण करण्याच्या तारखेपेक्षा अधिक काळ नाही. (२४५.३)

**२०९.४.** प्रांतिक सल्लागार मंडळाशी सल्लामसलत केल्यानंतर आणि त्या क्षेत्रातील अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांच्या मंजुरीनंतर, नवीन निवडून आलेल्या किंवा नियुक्त प्रांताध्यक्षांना पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याकरिता शिफारस करण्याचा मान मिळेल. (२४५.३)

**२१०.** प्रांताध्यक्षांची भूमिका ही खालील गोष्टी करून प्रांतातील पाळक व मंडळ्यावर देखरेख ठेवणे व आध्यात्मिक नेतृत्व प्रदान करणे आहेः

- प्रार्थना आणि पवित्र शास्त्राशी एकनिष्ठ जीवनाचा आदर्श नमूना बनणे.
- प्रांताच्या पाळकांमध्ये पवित्र शास्त्रोक्त पाळकीय ईश्वरपरिज्ञान व रिवाजांचा पुरस्कार करणे.
- संपूर्ण प्रांतात वेस्लीप्रणीत पवित्रतेच्या ईश्वरपरिज्ञानाचा व रिवाजांचा पुरस्कार करणे.
- संपूर्ण प्रांतात सुवार्ताप्रसाराच्या आणि मंडळी रोपणाच्या दृष्टांताला बिंबवणे.
- प्रांतातील मंडळ्यांना संस्थात्मक स्वास्थ्याप्रत नेण्यासाठी साधने पुरविणे.

## २११. प्रांताध्यक्षाची कर्तव्ये येणेप्रमाणे:

**२११.१.** त्या क्षेत्रातील अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांच्या मान्यतेच्या अधीन राहून प्रांतातील किंवा तिच्या हद्दीतील स्थानिक मंडळ्यांची स्थापना, पुर्नस्थापना करणे, त्यांना मान्यता देणे व त्यांच्यावर देखरेख करणे. (१००, ५३८.१५)

**२११.२.** प्रांतातील किंवा तिच्या हद्दीतील स्थानिक मंडळ्यांसाठी गरजेनुसार उपलब्ध असणे आणि आवश्यकतेनुसार मंडळीच्या पंच मंडळाला भेट देऊन, आध्यात्मिक, आर्थिक आणि पाळकीय सेवेच्या बाबींविषयी सल्लामसलत करणे व प्रांताध्यक्ष म्हणून योग्य वाटेल तो उपयुक्त सल्ला आणि सहाय्य देणे.

**२११.३.** जर प्रांताध्यक्षाच्या असे निदर्शनास आले की, एखादी मंडळी अशा अस्वास्थदायी, खालावलेल्या परिस्थितीमध्ये आहे की ती चालू राहिल्यास तिच्या कार्यक्षमतेस व उद्देशानुसार परिणामकारकतेस धोका निर्माण होवू शकतो, तर परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी प्रांताध्यक्ष मंडळीच्या पाळकाशी किंवा पाळक व मंडळीच्या पंच मंडळाशी संपर्क साधू शकतात. ज्या कारणांस्तव मंडळीच्या उद्देशाच्या परिणामकारकतेस धोका असणारी परिस्थिती निर्माण झाली त्यांचे निर्मूलन करण्यासाठी पाळक किंवा मंडळीच्या पंचमंडळाबरोबर मिळून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

जर प्रांताध्यक्षांनी मंडळीच्या पाळकाबरोबर आणि/किंवा मंडळीच्या पंच मंडळ ह्या दोघांसोबत काम केल्यावर असा निष्कर्ष काढला की पुढील हस्तक्षेप आवश्यक आहे तेव्हां ते, प्रांतिक सल्लागार मंडळाच्या मान्यतेने, परिस्थितिला हाताळण्याकरिता योग्य ती कारवाई करू शकतात. ह्या प्रक्रियेत खालील बाबी समाविष्ट असू शकते, परंतु त्या इतक्यापुरत्याच मर्यादित नाही:

१. पाळकास काढून टाकणे;
२. पंचमंडळ विघटीत करणे;
३. मंडळीचे स्वास्थ आणि उद्दीष्टाची परिणामकारकता पुनर्स्थापित करण्यासाठी आवश्यक अशा विशेष हस्तक्षेपांची सुरूवात करणे.

स्थापित स्थानिक मंडळीची मालमत्ता परिच्छेद १०६.५ नुसार मंडळीला निष्क्रिय घोषित केली नसल्यास किंवा परिच्छेद १०६.१ नुसार मंडळी विघटीत केली नसल्यास संघटित मंडळीच्या नियंत्रणाखाली राहील. केलेल्या कारवाईविषयी त्या क्षेत्रातील अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांना ३० दिवसांच्या आत सूचित केले जाईल.

**२११.४.** प्रांताध्यक्षांच्या मते जेव्हां, परिच्छेद १२६.१ नुसार संकटात आहे असे घोषित केलेल्या मंडळीने परिस्थिती सुधारण्याकरिता ठरवून दिलेल्या पायऱ्या पूर्ण केल्यावर आणि सामान्य परिस्थितीत पुन्हा मंडळीची सेवा सुरू करण्यास तयार झाल्यावर, प्रांतिक सल्लागार मंडळाच्या बहुमताने स्थानिक मंडळीला संकटातून मुक्त असे घोषित केले जाऊ शकते. ह्याबाबत प्रांताध्यक्ष त्या क्षेत्रातील अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांना ३० दिवसांच्या आत सूचित करतील.

**२११.५.** परिच्छेद १२३-१२३.७ मधील तरतुदीनुसार प्रत्येक स्थानिक मंडळीच्या पंचमंडळासोबत मंडळी व पाळक संबंधाची नियमीत पुनरावलोकन सभा ठरवून ती चालविणे. प्रांताध्यक्ष या नियमीत मंडळी व पाळक संबंध पुनरावलोकनसभेच्या वार्षिक नोंदी प्रांतिक सल्लागार मंडळ व अख्त्यारी प्रमुखाध्यक्षाला सादर करतील.

**२११.६.** प्रांतिक परिषदेच्या हद्दीत असणाऱ्या सर्व चर्च ऑफ दी नॅझरिनच्या मंडळी समान सेवाकार्य केंद्रांवर विशेष देखरेख ठेवणे.

**२११.७.** प्रांतिक चिटणिसाची जागा रिक्त झाल्यास ती भरून काढण्याकरिता प्रांतिक सल्लागार मंडळाला नाव सुचविणे. (२१९.१)

**२११.८.** प्रांतिक खजीनदाराची जागा रिक्त झाल्यास ती भरून काढण्याकरिता प्रांतिक सल्लागार मंडळाला नाव सुचविणे. (२२१.१)

**२११.९.** प्रांतिक संस्था पाळकपण संचालकाची नियुक्ती करून विशेष संस्थापाळकपण सेवेमार्फत पवित्रता आधारीत सुवार्ता प्रसाराचा पुरस्कार विस्तार करणे. (२४०)

**२११.१०.** स्थानिक मंडळीवर पाळकपण करण्याकरिता दिक्षिताचे किंवा सनदी सेवकाचे सुचविलेल्या नावाबद्दल मंडळीच्या पंचांशी विचारविनिमय करून परिच्छेद ११५ नुसार प्रांतिक सल्लागार मंडळाच्या अतिरिक्त मंजुरीसह आणि ते नाव मान्य किंवा अमान्य करणे. (१२९.२, १५९.८, २२५.१६)

**२११.११.** मंडळी व पाळक नातेसंबंधाचे पुनरावलोकन करण्याबाबत पंच मंडळाने केलेल्या विनंती वरून ९० दिवसांच्या आत मंडळी व पाळक संबंध पुढे चालू ठेवण्याबाबत विशेष मंडळी व पाळक संबंध पुनरावलोकनसभा भरविणे. (१२५)

**२११.१२.** ज्या स्थानिक मंडळीवर दिक्षित पाळक नाही त्या मंडळीच्या पंचमंडळाकडे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळीतील कोणत्याही सभासदाने स्थानिक सेवकाची सनद

मागितल्यास, किंवा सनदीचे नुतनीकरण करण्याची विनंती केल्यास, ती मान्य किंवा अमान्य करणे. (५३१.१-५३१.३)

**२११.१३.** स्थानिक मंडळीचे पाळक आणि स्थानिक पंच मंडळ यांनी पुढील कार्यासाठी नेमणूक व्हावी म्हणून सुचवलेली नावे लेखी स्वरूपात मान्य किंवा अमान्य करणे. ही सेवाकार्ये येणेप्रमाणे: पगारी किंवा बिनपगारी साहायक पाळक किंवा स्थानिक साहायक, मुले, युवक, संगित प्रौढ, बालविकास/शाळा (जन्मापासून ते माध्यमिक) यांचे ख्रिस्ती शिक्षण सेवक किंवा संचालक. प्रांताध्यक्षाने पगारी कर्मचारी नियुक्त करण्याबाबत मान्यता देणे किंवा नाकारण्याच्या निर्णयाचे प्राथमिक मानदंड म्हणजे मंडळीची स्थानिक, प्रांतिक, प्रमुख कर्त्यव्यांचे पालन करण्याची इच्छा व क्षमता हे आहेत. साहाय्यक पाळकाची पारख करून शोधण्याची जबाबदारी पाळकाची आहे. तथापि, सुचविलेले नाव नाकारण्याचा अधिकार प्रांताध्यक्षांना असेल. (१२९.२७, १५९-१५९.८)

**२११.१४.** प्रांतिक सल्लागार मंडळाच्या संमतीने स्थानिक मंडळ्यांच्या ख्रिस्ती बालसंगोपन/शाळा (जन्मापासून ते माध्यमिक) सेवा चालविण्याच्या विनंतीस मंजूरी देणे किंवा नाकारणे. (१५१, २२५.१४, ५१७)

**२११.१५.** प्रांतिक सल्लागार मंडळाच्या चिटणीसाबरोबर प्रांतातील सर्व कायदेशीर कागदपत्रांची पूर्ती करून स्वाक्षरी करणे.

**२११.१६.** प्रांतिक सल्लागार मंडळाकडे प्रांतामध्ये काम करण्याकरिता पगारी सहाय्यकांची नावे सुचविणे आणि त्यांच्यावर देखरेख करणे. (२४५)

**२११.१७.** परिच्छेद ११७ नुसार पाळकांची नेमणूक करणे.

**२११.१८.** प्रांताध्यक्ष हे प्रांतिक सल्लागार मंडळाच्या मंजुरीने खालील नियुक्त्या करू शकतील: पंच मंडळातील सभासद (कारभारी, विश्वस्त), जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा आणि शिष्यत्व सेवा (एस डी एम आय) मंडळाचे अध्यक्ष आणि मंडळीतील इतर अधिकारी (चिटणीस, खजिनदार). ह्या नियुक्त्या खालील परिस्थितिमध्ये केल्या जाऊ शकतील: मंडळीची स्थापना होवून ५ वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला असेल, तर, किंवा मागील वर्षाच्या मंडळीच्या वार्षिक सभेत ३५ पेक्षा कमी मतदान करणारे सभासद असतील, किंवा मंडळीला प्रांताकडून नियमीतपणे आर्थिक मदत मिळत असेल, किंवा मंडळी संकटात आहे असे घोषित केले असेल तर. अशा मंडळाची एकूण सदस्य संख्या तीनपेक्षा कमी असू नये. (११७, १२६)

**२११.१९.** परिच्छेद ६०६.-६०६.३ नुसार त्याच्या प्रांतिक परिषदेतील सेवकावर लेखी आरोप-प्रत्यारोपांची चौकशी करण्यास लावणे.

**२११.२०.** सेवकीय गैरवर्तनाच्या परिस्थितींमध्ये प्रांतिक सल्लागार मंडळाशी सल्लामसलत करुन त्या सेवकाचे पती/पत्नी, कुटूंब, मंडळी आणि समाज यांना वेळेवर व सोडवणूकीत्मक प्रतिसाद देण्यासाठी योग्य पाळक वर्ग व सामान्य सभासदांची पुर्वावस्था प्राप्त करणारी एक चमू नियुक्त करणे. जेव्हां अशा परिस्थिती उद्भवतात तेव्हां प्रांतध्यक्षांनी शक्य तितक्या लवकर आणि प्रांतिक योजनेनुसार एक पुर्वावस्था प्राप्ति पथक तैनात करावे. (२२५.५, ५४०.१)

**२११.२१.** प्रांताध्यक्ष परिच्छेद ५१०.४ नुसार पदस्थ सुवार्ताप्रसारकाशी सल्लामसलत करुन स्व:मुल्यमापन आणि पुनरावलोकन वेळ ठरवून करून घेतील.

**२११.२२.** प्रत्येक स्थानिक मंडळीला तिचे वैयक्तिक प्रमुख, प्रांतिक आणि शैक्षणिक निधींची उद्दीष्टे साध्य करण्यासाठी प्रांतातील अधिकारी वर्गासमवेत प्रोत्साहित करणे.

**२१२.** पाळकपदाची जागा रिक्त झाल्यास प्रांताध्यक्ष हे मंडळीच्या पंचांच्या अनुमतीने हंगामी पाळकाला नेमून येणाऱ्या प्रांतिक परिषदेपर्यंत ती जागा भरून काढू शकेल. अशा रीतीने नियुक्त हंगामी पाळकाची सेवा मंडळीच्या पंचांना व स्थानिक मंडळीला समाधानकारक नसेल तर प्रांताध्यक्ष त्याची नियुक्त रद्द करू शकेल. (१२९.५, ५२४, ५३१.६)

**२१२.१.** पाळकपदाची जागा रिक्त झाल्यास प्रांताध्यक्ष हे मंडळीच्या पंचांच्या व प्रांतिक सल्लागार मंडळाच्या अनुमतीने हंगामी पाळकाची नेमणूक करून ती जागा कायमस्वरूपी पाळकाला पाचारण होईपर्यंत भरून काढू शकेल. अशा हंगामी नेमलेल्या पाळकाच्या सेवेचा कार्यकाळ पंचमंडळाशी सल्लामसलत करून वाढविण्याचा अधिकार प्रांताध्यक्षांना आहे. हंगामी पाळकाला पाळकाच्या सर्व जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा अधीकार असेल. हंगामी पाळक हा नियुक्त मंडळीच्या प्रांताचाच सदस्य असल्यास त्याला मंडळीच्या वतीने प्रांतिक परिषदेमध्ये प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहाता येईल.

अशा नियुक्त केलेल्या हंगामी पाळकाने सदैव प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार मंडळाच्या अधीन असणे आवश्यक आहे. हंगामी पाळकाची नियुक्ती पंच मंडळाशी सल्लामसलत करून रद्द करण्याचा अधिकार प्रांताध्यक्षांना आहे. (५२६)

**२१३.** आपल्या प्रांतिक परिषदेच्या हद्दीतील असलेल्या स्थानिक मंडळीमध्यें पाळक किंवा हंगामी पाळक नसेल तेव्हां त्या मंडळीत पाळकाची सर्व कामे करण्याचा अधिकार प्रांताध्यक्षाला आहे. (५१४)

**२१३.१.** प्रांताध्यक्ष स्थानिक मंडळीच्या वार्षिक किंवा विशेष सभांचे अध्यक्ष असू शकतील किंवा अशा कर्तव्यासाठी सहायकाची नेमणूक करू शकतील.

**२१४.** जर कुठल्याही कारणास्तव त्या क्षेत्रातील अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष प्रांतिक परिषदेत हजर राहू शकले नाही किंवा स्वत:ऐवजी हजर राहाण्यास दुसऱ्या कोणाची नेमणूक करू शकले नाही, तर प्रांताध्यक्ष प्रांतिक परिषदेच्या कामकाजाला सुरूवात करू शकतील, आणि प्रांतिक परिषद दुसरी व्यवस्था करीपर्यंत ते अध्यक्षस्थानी राहतील. (३०७.५)

**२१५.** प्रांताध्यक्ष खालील समित्यांमध्ये रिक्त पदे भरू शकतात:

१. प्रांतिक परिषद वित्त समिती;

२. प्रांतिक परिषद लेखा परीक्षण समिती;

३. प्रांतिक सेवकीय मंडळ (प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ);

४. प्रांतिक सुवार्ताप्रसार मंडळ किंवा प्रांतिक सुवार्ताप्रसार मंडळ संचालक;

५. प्रांतिक मालमत्ता मंडळ;

६. प्रांतिक जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा आणि शिष्यत्व सेवा मंडळ (एस डी एम आय);

७. प्रांतिक न्यायमंडळ;

८. इतर प्रांतिक मंडळे आणि स्थायी समित्या जिथे बंधारण पुस्तकामध्ये किंवा परिषदेच्या कारवाईद्वारे अशी तरतूद केलेली नाही. (२०५.२१, २०५.२५, २२९.१, २३२.१, २३५, २३६, २४१, ६१०)

**२१५.१.** प्रांताध्यक्ष अशा सर्व प्रांतिक मंडळांचे आणि स्थायी समित्यांची अध्यक्ष, सचिव आणि सदस्यांची नेमणूक करू शकतात जिथे बंधारण पुस्तकामध्ये किंवा परिषदेच्या कारवाईद्वारे तरतूद केलेली नाही.

**२१५.२.** प्रांताध्यक्ष, प्रांतिक सल्लागार मंडळासोबत सल्लामसलत करून प्रांतिक नामसूचक समितीची नेमणूक नेहमीच्या समित्या व अधिकारपदांसाठी नावांची सुची प्रांतिक परिषदेच्या आधीच तयार करण्याकरिता करू शकतात. (२०३)

**२१६.** प्रांताध्यक्ष हे प्रांतिक सल्लागार मंडळ, प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवा मंडळाचे अधिकारपरत्वे पदसिद्ध अध्यक्ष राहतील. (२२४.२, २३०.१)

**२१६.१.** प्रांताध्यक्ष ते सेवा करीत असलेल्या प्रांतावरील सर्व निवडलेल्या व स्थायी मंडळे व समित्यांचे सदस्य असतील. (२०५.२०-२०५.२१, २३७, २४१, ८१०, ८११)

**२१७.** प्रांतिक सल्लागार मंडळाने बहुमताने अधिकार देऊन निर्देशित केल्याखेरीज प्रांताध्यक्ष प्रांतावर आर्थिक बोजा करणे, पैसे मोजणे किंवा निधी वितरीत करणे ही कामे करू शकणार नाही. असा ठराव झाल्यास तो प्रांतिक सल्लागार मंडळ ठराव पुस्तकात योग्यरित्या नोंदविला जाणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रांताध्यक्ष किंवा त्याचा किंवा तिचा निकटतम कुटूंबसदस्य प्रांतिक सल्लागार मंडळाच्या स्पष्टपणे परिभाषित आणि लेखी अंतर्गत नियंत्रण मान्यतेशिवाय प्रांताच्या आर्थिक खाते किंवा मालमत्ता हाताळण्यास प्रतिबंधित आहे. निकटतम कुटूंबसदस्यांमध्ये जीवनसाथी, लेकरं, बंधू-भगिणी, किंवा आई-वडील समाविष्ट आहेत. (२१८, २२२-२२३.२)

**२१८.** प्रांताध्यक्षांच्या सर्व कार्यालयीन कृती प्रांतिक परिषदेद्वारे पुनरावलोकन व पुनपरीक्षणास पात्र आहेत व अपिलास पात्र आहेत.

**२१८.१.** प्रांताध्यक्षांनी पाळकीय सेवा व्यवस्थांबाबत आणि त्यांच्या प्रांताध्यक्षीय कामकाजासंबंधी, अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष आणि प्रमुखाध्यक्ष मंडळाच्या सल्ल्याला नेहमी आदर दाखवतील.

## प्रांतिक चिटणीस

**२१९.** प्रांतिक सल्लागार मंडळाने निवडून दिलेल्या प्रांतिक चिटणिसाची सेवा एक ते तीन वर्षे त्याच्या कामावर दुसऱ्याची निवड होऊन तो रूजू होईपर्यंत, चालू राहील. (२२५.२२)

**२१९.१.** प्रांतिक परिषदेच्या अधिवेशनांच्या दरम्यानच्या काळात प्रांतिक चिटणिसाने कोणत्याही कारणाने सेवा करण्याचे थांबविले तर त्याच्या जागी प्रांतिक सल्लागार मंडळ प्रांताध्यक्षांनी सुचविलेल्या व्यक्तीची निवड करील. (२११.७)

**२१९.२.** प्रांतिक चिटणिस हा प्रांतिक परिषदेचा अधिकारपरत्वें सभासद राहील. (२०१)

**२२०.** प्रांतिक चिटणिसाची कर्तव्यें येणेप्रमाणे:

**२२०.१.** प्रांतिक परिषदेचे सर्व कार्यवृत्त अचूकरित्या नोंदून ठेवणे आणि त्याचे विश्वासूपणे जतन करणे.

**२२०.२.** प्रांताची सर्व आकडेवारी माहिती अचूकपणे नोंदून ठेवणे आणि ती जपून ठेवणे.

**२२०.३.** सर्व आकडेवारी तक्ते अधिकृत कामकाजकीर्द पुस्तकात प्रकाशित होण्यापूर्वी प्रमुख चिटणिसाकडे तपासणिकरिता पाठविणे. (३२६.६)

**२२०.४.** प्रांतिक परिषदेच्या सर्व कागदपत्रांचा रखवालदार असणे, आणि आपल्या जागी निवडून येणाऱ्या पुढील व्यक्तीच्या स्वाधीन ते ताबडतोब करणे.

**२२०.५.** प्रत्येक चार वर्षांच्या काळातील संपूर्ण कामकाजाची अहवाल प्रत नीट मजबूत बांधणी करून घेणे. (२०७.४)

**२२०.६.** प्रत्येक प्रांतिक परिषदेच्या कामकाजकीर्दीच्या पुरेश्या छापील प्रति जागतिक सेवा केंद्राकडे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या प्रमुख अधिकाऱ्यांना वितरीत करण्याकरिता पाठविणे.

**२२०.७.** प्रांतिक परिषदेच्या वतीने मागील चार वर्षांची अधिकृत कामकाजकीर्द प्रमुख परिषदेला जतन करण्यास व दाखल करण्यास सादर करणे. (२०५.२६,२०७.३-२०७.४)

**२२०.८.** आपल्या अधिकारक्षेत्रात येणारी अशी इतर सर्व सर्व कामे करणे.

**२२०.९.** वर्षभरात आपल्याकडे येणाऱ्या कामकाजाच्या सर्व बाबी योग्य परिषदिय समितीकडे किंवा स्थायी मंडळाकडे पाठविणे.

**२२१.** प्रांतिक परिषद निवडील तितके मदतनीस प्रांतिक चिटणिसाला असू शकतील.

## प्रांतिक खजीनदार

**२२२.** प्रांतिक सल्लागार मंडळाने निवडून दिलेल्या प्रांतिक खजीनदाराची सेवा एक ते तीन वर्षे आणि त्याच्या कामावर दुसऱ्याची निवड होऊन तो रूजू होइपर्यंत चालू राहील. (२२५.२१)

**२२२.१.** प्रांतिक परिषदांच्या दरम्यानच्या काळात प्रांतिक खजिनदाराने कोणत्याही कारणाने सेवा करण्याचे थांबविल्यास त्याच्या ऐवजी प्रांतिक सल्लागार मंडळ प्रांताध्यक्षांनी सुचविलेल्या व्यक्तीची नेमणूक करू शकेल. (२११.८)

**२२२.२.** प्रांतिक खजीनदार हा प्रांतिक परिषदेचा अधिकारपरत्वें सभासद राहील. (२०१)

**२२३.** प्रांतिक खजीनदाराची कर्तव्यें येणेप्रमाणे:

**२२३.१.** प्रमुख परिषद किंवा प्रांतिक परिषद किंवा, प्रांतिक सल्लागार मंडळाने ठरवून दिल्याप्रमाणे, किंवा चर्च ऑफ दी नॅझरीनच्या गरजांनुसार, आपल्या प्रांतामधून येणारे सर्व पैसे स्वीकारणे व प्रांतिक परिषदेच्या आणि/किंवा प्रांतिक सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनानुसार आणि धोरणांनुसार ते वितरीत करणे.

**२२३.२.** प्राप्त झालेल्या व वितरीत केलेल्या सर्व पैशांची अचूक नोंद ठेवणे व प्रांतिक सल्लागार मंडळाला वितरीत करणासाठी प्रांताध्यक्षांना मासिक अहवाल सादर करणे आणि प्रांतिक परिषदेला वार्षिक अहवाल सादर करणे. तो प्रांतिक परिषदेला जबाबदार राहील.

## प्रांतिक सल्लागार मंडळ

**२२४.** प्रांतिक सल्लागार मंडळामध्ये प्रांताध्यक्ष अधिकारपरत्वें असतील त्याचप्रमाणे तीन दिक्षित व तीन सामान्य सभासद राहातील. त्यांची निवड प्रांतिक परिषद मतपत्रिकेद्वारे करील. त्यांची कारकीर्द एक वर्ष किंवा जास्तीत जास्त चार वर्षांपर्यंतच असेल व त्यानंतर येणाऱ्या प्रांतिक परिषदेच्या अंतिम तहकुबीपर्यंत, आणि त्यांच्या जागेवर दुसऱ्यांची निवड होऊन ते रूजू होईपर्यंत चालू राहील. तथापि, दरवर्षी मंडळातील सदस्यांचा काही हिस्सा निवडून त्यांच्या सेवेचा कालावधी विस्तारल्या जाऊ शकेल.

जेव्हां प्रांताची एकूण सभासद संख्या ५००० सभासदांपेक्षा जास्त झाल्यास, प्रांत त्यापुढील प्रत्येक २५०० सदस्यांसाठी किंवा २५०० च्या निम्म्याहून अधिक भागासाठी आणखी एक दिक्षित सेवक व आणखी एक सामान्य सभासद निवडू शकेल. (२०५.१४)

**२२४.१.** प्रांतिक सल्लगार मंडळावरील एखादे सदस्यपद रिक्त झाल्यास मंडळाचे उर्वरीत सदस्य ते भरतील.

**२२४.२.** प्रांताध्यक्ष हा प्रांतिक सल्लागार मंडळाचा अधिकारपरत्वें पदसिद्ध अध्यक्ष राहील.

**२२४.३.** प्रांतिक सल्लगार मंडळ, हे मंडळाच्या सदस्यांमधून एकाची चिटणीस म्हणून निवड करतील. चिटणीस मंडळाच्या सर्व ठरावांची काळजीपूर्वक नोंद घेईल आणि त्याच्या जागी निवडून आलेल्या नवीन व्यक्तीला हस्तांतरीत करेल.

**२२४.४.** प्रांतिक सल्लागार मंडळाचे सामान्य सभासद हे प्रांतिक परिषदेचे, प्रांतिक जागतिक रविवारशास्त्र शिक्षण शाळा व शिष्यत्व मंडळ (एस डी एम आय) अधिवेशन, प्रांतिक ख्रिस्तवार्ता संघ मंडळ (एन एम आय) अधिवेशन, आणि प्रांतिक जागतिक युवकसंघ मंडळ (एन वाय आय) अधिवेशनाचे अधिकारपरत्वे सदस्य राहतील. (२०१,२२४)

**२२५. प्रांतिक सल्लागार मंडळाची कर्तव्यें पुढील प्रमाणे आहेत:**

**२२५.१.** परिच्छेद ११४.१ मधील तरतुदीनुसार आकडेवारीवर्षाच्या आरंभाची व अखेरची तारीख ठरविणे.

**२२५.२.** प्रांतिक परिषदेच्या हद्दीत असणाऱ्या सेवक व स्थानिक मंडळ्यां यांची प्रांताध्यक्षाला माहिती देणे व त्याच्याशी विचारविनिमय करणे. (११५.६, ५१९)

**२२५.३.** एखादा दिक्षित सेवक किंवा सनदी सेवक यांच्याविरूध्द दोषारोप दाखल झाल्यास तीन किंवा त्यापेक्षा जास्त दिक्षित सेवक आणि कमीत कमी दोन सामान्य सदस्यांची चौकशी समिती नेमणे. (६०६-६०६.३)

**२२५.४.** एखादा दिक्षित सेवक किंवा सनदी सेवक यांच्याविरूध्द दोषारोप दाखल झाल्यास न्यायमंडळ निवडणे (६०६.५-६०६.६)

**२२५.५.** गैरवर्तन केलेल्या सेवकाच्या पाळकवर्गातील सदस्यांना, कुटूंब सदस्यांना आणि जी मंडळी समाविष्ट असेल तिला समयोचित, कनवाळू आणि विषयाबाबत माहितीत्मक प्रतिसाद पुरविणारी अशी लेखी, सर्वसमावेशक योजना विकसीत करणे जी अशा प्रयत्नांना मार्गदर्शन करणाऱ्या बंधारण पुस्तकाच्या निर्देशांशी सुसंगत असेल आणि त्या योजनेचे दरवर्षी पुनरावलोकन करणे. (५३८.२०, ५३९-५३९.१३)

**२२५.६.** मुलकी कायदा परवानगी देत असेल आणि जेव्हा प्रांतिक परिषद अधिकार देते तेव्हां संघटीत संस्था म्हणून स्वत:ची कायदेशीर नोंदणी करून घेणे. वरील तरतुदीनुसार संघटीत संस्था म्हणून नोंदणी केल्यावर प्रांतिक सल्लागार मंडळाला त्यांच्या स्वतःच्या ठरावाने पुढील कार्ये करण्याचा अधिकार असेल: संघटीत संस्थेच्या उद्देशाला आवश्यक किंवा सोईस्कर असेल त्याप्रमाणे कोणतीही स्थावर, जंगम मालमत्ता खरेदी करणे, मालकीची करून घेणे, विक्री करणे, तिची अदलाबदली करणे, गहाण ठेवणे, विश्वस्त म्हणून तिच्यासंबंधी दस्तऐवज करणे, तारण म्हणून देणे, भाड्याने देणे, आणि ताबा देणे. प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार मंडळाचे चिटणीस किंवा प्रांतिक सल्लागार मंडळाने

(मग ते नोंदणी झालेले असो किंवा नसो) अधिकार दिलेल्या दुसऱ्या व्यक्ती प्रांतिक सल्लागार मंडळाच्या स्थावर, जंगम मिळतीचे ताबेपत्र, गहाणपत्रे, गहाण सोडवणे, करारनामे व इतर कायदेशीर दस्तऐवज यांवर स्वाक्षऱ्या करतील. (२०६)

**२२५.७.** जेव्हा प्रांतिक सल्लागार मंडळ स्वत:ची संघटीत संस्था म्हणून नोंदणी करून घेते तेव्हां संस्थेची उद्दीष्टे, नियमावली किंवा समान कायद्यात्मक दस्तऐवज अशी तरतूद करून देईल की संस्थेचे संचलन चर्च ऑफ दी नॅझरीनच्या बंधारण पुस्तकातील तरतुदींनुसार चालेल. त्यामध्ये अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांद्वारे शिफारस केलेली अशी तरतूद समाविष्ट असेल की, नोंदणीकृत संस्था विघटीत करण्यात आली किंवा असली संस्था चर्च ऑफ दी नॅझरीनला सोडून जाण्याचा प्रयत्न करीत असेल तर चर्च ऑफ दी नॅझरीनची मालमत्ता अशा संस्थेकडे वळविली जाणार नाही. एकदा अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांच्या शिफारसीवरून प्रमुखाध्यक्ष मंडळाने नोंदणी करण्याकरिता संस्थेला मान्यता दिल्यानंतर, प्रस्तावित संस्थेची घटणा प्रमुख चिटणीसाच्या कार्यालयाकडे पुनरावलोकन व दाखल करण्यासाठी पाठविली जाईल आणि त्यामध्ये परिच्छेद १०२.४ प्रमाणे तरतुदींचा समावेश असेल. (२२५.६)

**२२५.८.** जिथे मुलकी कायदा अशा संघटीत संस्थेच्या नोंदणीला परवानगी देत नाही, तिथे प्रांतिक परिषद प्रांतिक सल्लागार मंडळाला प्रांतिक विश्वस्त मंडळ म्हणून निवडू शकते व मंडळाला स्वतःच्या ठरावाने पुढील कार्ये करण्याचा अधिकार देऊ शकते: प्रांतामध्ये कार्य करण्याच्या उद्देशाला आवश्यक किंवा सोईस्कर असेल त्याप्रमाणे कोणतीही स्थावर, जंगम मालमत्ता खरेदी करणे, मालकीची करून घेणे, विक्री करणे, तिची अदलाबदली करणे, गहाण ठेवणे, विश्वस्त म्हणून तिच्यासंबंधी दस्तऐवज करणे, तारण म्हणून देणे, भाड्याने देणे आणि ताबा देणे. (१०२.६, १०६.२, २२५.६)

**२२५.९.** ज्या विभागामध्ये स्थानिक मंडळीला संघटीत संस्था म्हणून नोंदणी करून घेणे शक्य असेल तिथे प्रांतिक सल्लागार मंडळ त्या विभागासाठी उपयुक्त संस्था नोंदणीचे नमुना प्रपत्र सक्षम कायदेशीर सल्ल्यानुसार पुरवील. ह्या संस्था नोंदणी नमुन्यामध्ये परिच्छेद १०२-१०२.५ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींचा नेहमी समावेश असेल.

**२२५.१०.** प्रांताध्यक्षांना प्रांतावरील सर्व विभाग, मंडळे व समित्यांवरील त्यांच्या देखरेखीअंतर्गत त्यांच्या सल्लागाराच्या क्षमतेमध्ये काम करणे.

**२२५.११.** प्रांताध्यक्षाच्या स्वास्थदायी कारकिर्दीला व त्यांच्या खंबिर आध्यात्मिक जीवनास प्रोत्साहन देण्याकरिता, प्रांतिक सल्लागार मंडळाने, अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांशी सल्लामसलत करुन प्रांताध्यक्षांना प्रत्येक सातव्या वर्षाच्या सेवेच्या दरम्यान किंवा त्यानंतर सबॅटिकल रजा द्यावी. या रजे दरम्यान, प्रांताध्यक्षांचा पगार आणि फायदे संपूर्णपणे सुरू राहतील. प्रांताध्यक्ष प्रांतिक सल्लागार मंडळासमवेत सबॅटिकल रजेबाबत एक प्रस्ताव तयार करतील व त्यामध्ये रजेचा कालावधी, वैयक्तिक विकासाची योजना आणि सबॅटिकल रजे दरम्यानच्या कालावधीत आवश्यक कर्तव्याची काळजी घेण्याची योजना समाविष्ट असेल.

**२२५.१२** प्रांतिक केंद्र निर्मितीकरिताच्या योजनेचा प्रस्ताव प्रमुखाध्यक्षांच्या मंडळाला सादर करणे. अशी योजना अंमलात आणण्यापूर्वी प्रमुखाध्यक्ष मंडळाची लेखी मंजुरी प्राप्त करणे आवश्यक आहे. (३१९)

**२२५.१३.** पाळक म्हणून काम करणाऱ्या सनदी सेवकाला प्राथमिक परवाना प्रदान करण्याबाबत किंवा सनदीचे नुतनीकरण करण्याची शिफारस करणे. (५३२.५)

**२२५.१४.** ख्रिस्ती बालसंगोपन केंद्र/शाळा (जन्मापासून ते माध्यमिक पर्यंत) सेवा चालू करण्याबाबत मंडळीकडून आलेल्या विनंत्यांना मान्यता देणे किंवा नाकारणे. प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार मंडळाच्या निर्णयावरुन प्रांतिक ख्रिस्ती बालसंगोपन केंद्र/शाळा (जन्मापासून ते माध्यमिक पर्यंत) समिती स्थापन केली जाऊ शकते. ह्या समितीचे काम पुढीलप्रमाणे असेल: स्थानिक मंडळीमध्ये बालसंगोपन केंद्र/शाळे (जन्मापासून ते माध्यमिक पर्यंत) मध्ये लागू करण्याजोगे धोरण, प्रक्रिया आणि तत्त्वज्ञानाची शिफारस करणे आणि अशा बालसंगोपन केंद्र/ शाळा (जन्मापासून ते माध्यमिक पर्यंत) स्थापन करून, त्याला पाठींबा देणे आणि त्याची देखरेख करण्यासाठी मदत करणे. (१५१, २११.१४, ५१७)

**२२५.१५.** विभागामध्ये प्रस्थापित मार्गदर्शक सूचनांनुसार दयार्थ सेवा केंद्रांना (सी एम सी) दरवर्षी मान्यता देणे. परंतु प्रांताने मंजूर केलेली दयार्थ सेवा केंद्रेच परिच्छेद १५३.१ नुसार योगदानाच्या उद्देशाने "विशेष सेवाकार्य मंजूर" म्हणून पात्र ठरतील.

**२२५.१६.** स्थानिक मंडळीच्या पंचमंडळाकडून त्यांच्याच मंडळीचा सभासद असलेला किंवा त्यांच्याच मंडळीवर पगारी किंवा बिनपगारी सहाय्यक म्हणून सेवारत असलेल्या एखाद्या दिक्षीताची किंवा सनदी सेवकाची (दिक्षीत होण्याच्या अभ्यास करीत आहे)

स्थानिक मंडळीवर पाळक म्हणून नियुक्ती करण्याबाबतची विनंती मान्य करणे किंवा ती नाकारणे. हा निर्णय प्रांताध्यक्षांशी सल्लामसलत करून घेण्यात येईल. (११५, १२९.२, १५९.८, २११.१०)

**२२५.१७.** चर्च ऑफ नॅझरीनच्या निर्देशानुसार नसलेले स्वतंत्र उपक्रम नियमीतपणे राबविण्याबाबत किंवा स्वतंत्र सेवाकार्य किंवा अनधिकृत मंडळीचे उपक्रम राबविण्याबाबत, किंवा स्वतंत्र मंडळीच्या किंवा इतर धार्मिक गटाच्या किंवा पंथाच्या कार्यकारी सदस्यांशी जुळून राहाण्याबाबत पाळक वर्गाच्या एखाद्या सदस्याने केलेल्या विनंतीस मान्यता देणे किंवा नाकारणे. अशा कोणत्याही विनंतिची मंजुरी दरवर्षी प्राप्त करणे आवश्यक असेल. (५२८, ५३८.१३)

**२२५.१८.** प्रांताने सेवेत नेमलेल्या कोणत्याही पगारी सहाय्यकांची निवड करणे किंवा त्याला बडतर्फ करणे. (२४५-२४५.१)

**२२५.१९.** प्रांतिक परिषदांदरम्यान प्रांताध्यक्षांशी सल्लामसलत करून, अधिकारयुक्त अर्थसमीती ह्या नात्याने आवश्यकतेनुसार कार्यरत अर्थसंकल्पाचे समायोजन करणे आणि त्याचा अहवाल प्रांतिक परिषदेला सादर करणे. (२२३.१)

**२२५.२०.** प्रांतिक परिषदेच्या सर्व स्थावर, जंगम, व्यक्तीगत मालमेतेचे त्या मालमत्तेमधील हक्कांसह आणि चर्च ऑफ नॅझरीन शिवाय इतर कोणत्याही वैयक्तिक किंवा संस्थेकडे वापराकडे वळविल्या जाण्यापासून रक्षण करणे. (१०२.४, १०६.५, २०६)

**२२५.२१.** प्रांतिक खजिनदाराची निवड एक ते तीन वर्षांकरिता आणि त्याच्या कामावर दुसऱ्याची निवड होऊन तो रूजू होइपर्यंतच्या सेवेसाठी करणे. (२२२)

**२२५.२२.** प्रांतिक चिटणीसाची निवड एक ते तीन वर्षांकरिता आणि त्याच्या कामावर दुसऱ्याची निवड होऊन तो रूजू होइपर्यंतच्या सेवेसाठी करणे. (२१९)

**२२५.२३.** परिच्छेद १०६.२ मधील तरतुदीनुसार जंगम मालमत्तेचा मालकीहक्क हस्तांतरीत करण्याच्या उद्देशाने चर्च ऑफ नॅझरीनपासून कोणत्याही स्थानिक मंडळीचे वेगळे होणे किंवा वेगळे होण्याच्या प्रयत्नाला प्रमाणित करणे.

**२२५.२४.** आवश्यक असल्यास, परिच्छेद २०५.२५ मधील तरतुदीनुसार पुढील प्रांतिक परिषद तहकूब होईपर्यंत कार्य करण्यासाठी प्रांतिक हिशेब तपासणी समितीची निवड करणे. (२०५.२५)

**२२५.२५.** प्रांतिक परिषदेला वार्षिक अहवाल सादर करणे, आणि बोलावलेल्या सर्व बैठकींच्या संख्येसह मंडळाच्या कामकाजाचा सारांश सांगणारा अहवाल देणे.

**२२६.** पाळकवर्गाचा सदस्य, ख्रिस्ती शिक्षण सेवक, अथवा सेविका आपले सदस्यत्व ज्या प्रांतिक परिषदेमध्ये आहे तेथून दुसऱ्या प्रांतिक परिषदेत, प्रांतिक परिषद भरण्यापूर्वी बदलविण्याची इच्छा दर्शवितात तर अशांच्या सदस्यत्वाचे बदलीपत्र प्रांतिक सल्लागार मंडळ देऊ शकेल. ज्या प्रांतिक सल्लागारमंडळाचे नावे हे बदलीपत्र दिले असेल ते त्याचा स्वीकार करून ज्या प्रांतात ते स्वीकारले आहेत, तेथील सभासदत्वाचे पूर्ण हक्क व अधिकार बदलून आलेल्या व्यक्तींना बहाल करील. सल्लागारमंडळाने केलेल्या अशा बदल्यांना अंतिम मान्यता देण्याचा अधिकार जेथे बदली दिली आहे त्या प्रांतिक परिषदेला असेल.

अशा प्रकारच्या बदल्या मान्य होण्यासाठी प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवा मंडळाची अनुकूल शिफारस असणे आवश्यक आहे. (२०५.८-२०५.९, २३१.९-२३१.१०, ५०८, ५११, ५३७-५३७.२)

**२२६.१.** प्रांतिक परिषदेतील एखाद्या सदस्याने दुसऱ्या पंथाच्या मंडळीला जाऊन मिळण्याची इच्छा व्यक्त करणारी विनंती केल्यास प्रांतिक सल्लागार मंडळ त्या सदस्याला शिफारसपत्र देऊ शकते. (८१५)

**२२७.** मंडळीच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असेल तेव्हा, प्रांताध्यक्षाच्या अनुमतीने प्रांतिक सल्लागार मंडळ सनदी सेविकेची सनद तात्पुरती स्थगित करू शकेल. मात्र तत्पूर्वी ज्या स्थानिक मंडळीची ती सनदी सेविका सभासद असेल त्या मंडळीच्या पंचांशी विचारविनिमय झाल्यावर आणि तिचे म्हणणे योग्य तऱ्हेने ऐकून घेतल्यावर हे केले जाईल.

**२२८.** प्रांतिक परिषदीय अधिवेशनांच्या दरम्यान जर दुसऱ्या एखाद्या पंथाचा एखादा सनदी किंवा दिक्षित सेवक चर्च ऑफ दी नॅझरीन शी जुळण्यास आपली लायकीपत्रे सादर करीत असेल तर त्याच्या लायकी पत्रांचे परिक्षण प्रांतिक सल्लागार मंडळ करेल. प्रांतिक सल्लागार मंडळाने अनुकूल शिफारस केली असली तरच अशा अर्जदाराचा स्थानिक मंडळीच्या सभासदवर्गात स्वीकार करता येईल. (५२०, ५३२.२, ५३५)

## प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ

**२२९.** प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ हे कमीतकमी पाच नियुक्त दिक्षित सेवकांचे बनलेले असेल. त्यापैकी दोघे म्हणजे एक प्रांताध्यक्ष आणि एक प्रांतिक चिटणीस दिक्षित असल्यास. प्रांतिक चिटणीस सामान्य सभासद असल्यास ते मंडळामध्ये गैर-मतदार सभासद म्हणून असतील. निवडलेले सभासद चार वर्षांपर्यंत आणि त्यांच्या कामावर दुसऱ्यांची निवड होऊन ते कामावर रूजू होईपर्यंत चालू राहील. तथापि, मंडळाच्या सभासदांचा एक हिस्सा दर वर्षी निवडून त्यांच्या सेवाकार्य काळाला कायम ठेवण्याची व्यवस्था करता येईल. (२०५.१५)

**२२९.१.** प्रांतिक परिषदांच्या दरम्यानच्या काळात सेवकीय परवानामंडळावर एखादे पद रिक्त झाले, तर प्रांताध्यक्ष त्यावर नेमणूक करून ते पद भरतील. (२२५)

**२३०.** प्रांतिक सेवकीय परवाना मंडळाची निवडणूक झाल्याबरोबर, प्रांताध्यक्ष कामकाजाची व्यवस्था लावण्याकरिता मंडळाची बैठक बोलावतील. ही व्यवस्था पुढीलप्रमाणे असेल:

**२३०.१.** प्रांताध्यक्ष हे प्रांतिक सेवकीय परवाना मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष असतील. तथापि, त्याच्या किंवा तिच्या विनंतीनुसार मंडळ पुढील प्रांतिक परिषदेच्या शेवटल्या तहकूबीपर्यंत अशा संबंधात काम करण्यासाठी एखादा कार्यकारी अध्यक्ष निवडू शकेल. (२१६)

**२३०.२.** हे मंडळ आपल्या सभासदांमधून एक कायम चिटणीस निवडून नेमील. तो प्रांतिक परिषदेच्या खर्चाची सर्व कागदपत्ले, नोंदणी, जपवणूक करेल. ही सर्व कागदपत्ले प्रांतिक परिषदेच्या मालकीची असतील. मंडळाच्या कामकाजाचा सर्व अहवाल चिटणीस काळजीपूर्वक, अचूकपणे नोंदून लिहून ठेवतील व मंडळाच्या कामाकाजा संबंधीच्या इतर कागदपत्लांबरोबरच हा अहवालही विश्वासूपणे जतन करून ठेवतील आणि आपल्या जागेवर निवडून येणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीकडे हे सर्व कागदपत्ल ताबडतोब सुपूर्द करील.

**२३१. प्रांतिक सेवकीय परवाना मंडळाची कामे पुढील प्रमाणे असतील:**

**२३१.१.** दिक्षित वर्ग, सहाय्यक सेवक वर्ग, आणि प्रांतिक सनदी सेवक म्हणून निवड होण्यासाठी प्रांतिक परिषदेला योग्य प्रकारे सादर केलेल्या सेवकांचे काळजीपूर्वक परीक्षण करणे आणि त्यांचे मूल्यांकन करणे.

**२३१.२.** सेवाकार्याच्या कुठल्याही भुमिकेसाठी प्रमाणपत्र मिळवू इच्छिणाऱ्या सर्व व्यक्तींची परीक्षा घेऊन त्यांचे मूल्यमापन करणे, यांमध्ये स्थानिक मंडळींच्या पलीकडील सेवांसाठी मान्यता मिळविण्यास इच्छुक सामान्य आणि सेवकीय सभासदांचा आणि बंधारण पुस्तकात तरतूद केलेल्या इतर विशेष संबंधांचा समावेश आहे.

**२३१.३.** आपणांला सेवेसाठी पाचारण झाले आहे असे वाटणाऱ्या प्रत्येक उमेदवाराची काळजीपूर्वक चौकशी करणे आणि पुढील बाबींसंबंधाने योग्य त्या प्रकारे पारख करणे: त्याचा किंवा तिचा वैयक्तिक तारणाचा अनुभव, पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याने त्याला किंवा तिला आलेला संपूर्ण पवित्रीकरणाचा अनुभव, पवित्र शास्त्रातील विश्वास-सिद्धांतांचे ज्ञान, या सर्व विश्वास-सिद्धांतांचा, ख्रिस्ती चारित्र्य आणि ख्रिस्ती वर्तणूकीचा करार, मंडळीची शासनपद्धती ह्यांचा पूर्ण स्वीकार, कृपादाने, देणग्या, बौद्धिक, नैतिक आणि आध्यात्मिक पात्रता, आणि ज्या सेवेसाठी पाचारण झाले त्यास आवश्यक असणारी सर्वसाधारण शारीरिक क्षमता ह्यांचे पुरावे.

**२३१.४.** उमेदवाराने विनंती अर्ज केलेल्या सेवेत तो तत्पर आहे की नाही आणि त्याच्या जीवनामध्ये वर्तणूकीची अशी एखादी वहिवाट आहे का की जी पुढे चालू राहिल्यास ती त्याच्या सेवेशी विसंगत होईल हे ओळखण्यासाठी प्रत्येक उमेदवाराचे काळजीपूर्वक परिक्षण करणे.

**२३१.५.** एखाद्या स्थानिक उपदेशकाची हंगामी पाळक म्हणून नेमणूक केली असेल, तर अशा नेमणुकीनंतर भरणाऱ्या प्रांतिक परिषदेच्या नंतर त्याची किंवा तिची सेवा पुढे चालू ठेवावी किंवा नाही यासंबंधात मान्यता देण्यासाठी फेरविचार करणे. (५३१.६)

**२३१.६.** एखाद्या दीक्षित सेवकाने प्रांतिक परिषदेला लागोपाठ दोन वर्षे स्वतःचा अहवाल सादर केला नसेल, तर त्याच्या कारणाची चौकशी आणि पुनरावलोकन करणे आणि दीक्षित किंवा सेवक यांच्या प्रकाशित नावांच्या यादीमध्ये त्याचे नाव नोंदणे पुढे चालू ठेवायचे किंवा नाही त्याविषयी प्रांतिक परिषदेकडे शिफारस करणे.

**२३१.७.** एखाद्या दीक्षित सेवकाने योग्य रित्या परवानगी न घेता दुसऱ्या कुठल्याही मंडळीमध्ये सभासदत्व नोंदविले आहे किंवा तो किंवा ती दुसऱ्या पंथाच्या सेवेशी किंवा गटाशी जुळले आहे किंवा स्वतंत्र कार्यामध्ये सहभागी झालेले आहे असे दर्शविणाऱ्या अहवालांचे परिक्षण करून त्याचे किंवा तिचे नांव सेवकांच्या यादीत ठेवावे की नाही ह्या संबंधी प्रांतिक परिषदेला शिफारस करणे. (११२, ५३८.१३)

**२३१.८.** एखाद्या सेवकाने वय आणि शारीरिक दुर्बलतेच्या कारणास्तव सक्रिय सेवेतून सेवनिवृत्ती प्रदान करण्यात यावी अशी विनंती केल्यास त्याला सेवानिवृत्त वर्गात घालण्यात यावे अशी शिफारस प्रांतिक परिषदेला करणे. (२०५.२७, ५३६)

**२३१.९.** प्रांतिक सल्लागार मंडळाने मंजूर केलेल्या तात्पुरत्या बदल्यांसह प्रांतातील अन्य प्रांतात बदलीसाठी सेवकवर्गाचे सभासद आणि सेवाकार्याच्या भूमिकेचा परवाना प्राप्त असलेल्यांची शिफारस प्रांतिक परिषदेला करणे. (२०५.९, ५३७-५३७.२)

**२३१.१०.** प्रांतिक सल्लागार मंडळाने मंजूर केलेल्या तात्पुरत्या बदल्यांसह अन्य प्रांतातून आपल्या प्रांतात बदलीसाठी सेवकपदाची लायकीपत्रे असणाऱ्या व्यक्ती, सेवकवर्गाचे सभासद आणि सेवाकार्याच्या भूमिकेचा परवाना प्राप्त असलेल्यांची शिफारस प्रांतिक परिषदेला करणे. (२०५.८, ५३७-५३७.२)

## प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ

**२३२.** प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळामध्ये पाच किंवा अधिक नियुक्त दिक्षीत सेवक असतील. हे सर्व प्रांतिक परिषदेने निवडून दिलेले असतील व त्यांचा सेवाकार्यकाळ चार वर्षांपर्यंत आणि त्यांच्या जागेवर दुसऱ्यांची निवड होऊन ते आपल्या कामावर रूजू होईपर्यंत चालू राहील. तथापि सर्वांची निवडणूक करण्याऐवजी प्रतिवर्षी मंडळातील काही सभासदांची निवड करून त्यांची सेवा कायम राहाण्याची व्यवस्था करता येईल. (२०५.१६)

**२३२.१.** प्रांतिक परिषदीय अधिवेशनांच्या दरम्यान जर प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळामध्ये जागा रिक्त झाल्यास तर प्रांताध्यक्ष त्यावर नेमणूक करून त्या भरतील. (२१५)

**२३३.** ज्या प्रांतिक परिषदेमध्ये मंडळाची निवडणूक झालेली आहे तिचा कार्यकाळ संपण्या अगोदर, प्रांताध्यक्ष किंवा प्रांतिक चिटणीस हे प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळामधील सर्व सभासदांची बैठक बोलावतील आणि मंडळाची संस्थापना व खालीलप्रमाणे कामकाज ठरवतील:

**२३३.१.** मंडळ सदस्यांमधून अध्यक्ष निवडेल. मंडळ सदस्यांमधून एका नियुक्त दिक्षीताची चिटणीस म्हणून निवडणूक करतील. चिटणीस इतर सदस्यांसमवेत दिक्षेकरिता मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाद्वारे उमेदवारांची तपासणी करणे आणि त्यांची

प्रगती साधण्याची जबाबदारी पूर्ण करतील. ते सर्व विद्यार्थ्यांच्या कायम नोंदी जतन करून ठेवतील. (२३३.५, ५२९.१-५२९.३)

**२३३.२.** सेवकीय तयारीकरिता प्रमाणित अभ्यासक्रमामध्ये नाव नोंदविलेल्या सर्व उमेदवारांवर देखरेख करण्याची जबाबदारी मंडळाचे अध्यक्ष हे मंडळातील इतर सदस्यांना देऊ शकतील. ह्याबाबत परस्पर वेगळी व्यवस्था केलेली नसेल तर अशी नेमणूक मंडळाच्या सदस्याच्या कार्यकाळात उमेदवार अभ्यासक्रमामध्ये सक्रियपणे नोंदलेला राहिल्यास चालू राहील.

**२३३.३.** काही आकस्मिक कारणांनी प्रतिबंध झाला नाही तर, अध्यक्ष मंडळाच्या सर्व सभांना उपस्थित राहतील. ते दरवर्षी या मंडळाच्या कामावर देखरेख ठेवतील. जर काही आवश्यक कारणांस्तव अध्यक्ष अनुपस्थित राहिले असेल तर चिटणीसांनी त्यांचे किंवा तिचे कामकाज तात्पुरते करावे.

**२३३.४.** प्रांतिक चिटणीस प्रांतिक परिषदेच्या खर्चावर सेवकीय अभ्यासक्रमाचे नोंद पुस्तक पुरवतील. हे नोंद पुस्तक प्रांतिक परिषदेची मालमत्ता असेल, आणि दीक्षेबाबतच्या साधनपुस्तिकेतील निर्देशांनुसार त्याचा उपयोग केला जाईल.

**२३३.५.** प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळाचे अन्य सदस्य विश्वासाने मंडळाच्या सभांना उपस्थित राहतील आणि तेथील सर्व उमेदवारांवर पुढील बाबींद्वारे देखरेख करतील; (१) प्रोत्साहन देणे, सल्ला आणि मार्गदर्शन देणे; आणि (२) दिक्षीत वर्गाचा सदस्य या नात्याने उमेदवारांची नैतिक जबाबदारीबाबत स्व:जीवनाच्या उदाहरणाद्वारे व संभाषणांद्वारे, विशेषत: दिक्षित वर्गाचा सदस्य लैंगिक गैरवर्तन कसे टाळू शकतो यावर विशेष जोर देऊन, प्रशिक्षण देतील. (२३३.१)

**२३३.६.** नॅझरीन विद्यालय/ विद्यापिठ किंवा ईश्वरविज्ञान विद्यालयामधून प्रमाणित अभ्यासक्रम पूर्ण करीत असलेल्या उमेदवार विद्यार्थ्यांना सर्वतोपरी उत्तेजन, साहाय्य व मार्गदर्शन करण्याकरिता हे मंडळ प्रांताध्यक्ष आणि जागतिक दिक्षित सेवक विकास मंडळाशी अभ्यासक्रम सल्लागार समितीच्या (COSAC) माध्यमातून सहकार्य करेल.

**२३४.** प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळ हे सनदी सेवक किंवा प्रमाणित अभ्यासक्रम पूर्ण करीत असलेल्या इतर उमेदवारांना मदत करण्याच्या उद्देशाने विशेष वर्ग किंवा शिबिरांची स्थापना करू शकेल, आणि प्रांताने मंजूर केलेला निधी असल्यास, सर्व पुस्तके मध्यवर्ती ग्रंथालये स्थापन करून उपलब्ध करून देईल.

**२३४.१.** प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व सचिव यांना प्रांताध्यक्षाशी सल्लामासलत करून सेवकीय शिक्षणाच्या प्रमाणित अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांची नावे नोंदविण्याचा अधिकार आहे. (२३३.१-२३३,२, ५२९.१-५२९.३)

**२३४.२.** प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळ दीक्षेबाबतच्या साधनपुस्तिकेमधील निर्देशांनुसार आपली जबाबदारी पार पाडेल.

**२३४.३.** प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळ प्रत्येक उमेदवाराच्या शैक्षणिक प्रगती संबंधी सर्व अहवाल  प्रांतिक परवाणा मंडळाला अशा वेळेवर सादर करेल की त्या मंडळाला त्यावर आवश्यक ती प्रक्रिया प्रांतिक परिषदेच्या आधीच पूर्ण करता येईल. प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळ उमेदवारांना प्रमाणित अभ्यासक्रमामध्ये ठेवण्यास, त्यांची बढती करण्यास किंवा अभ्यासक्रमाकरिता प्रमाणपत्र बहाल करण्याबाबत प्रांतिक परिषदेला शिफारस करू शकेल. असे ठेवणे, बढती करणे किंवा प्रमाणपत्र बहाल करणे हे अभ्यासक्रम सल्लागार समिती (COSAC) च्या माध्यमाने जागतिक सेवकीय विकास कार्यालयाने पुरविलेल्या निर्देशांनुसार असेल.

**२३४.४.** प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळ हे प्रांतातील दिक्षित सेवक व इतर कर्मचारी सेवकांच्या आजीवन शिक्षणाच्या पुरस्कारासाठी जबाबदार राहील. हे ते प्रांताध्यक्षांच्या सर्वसाधारण मार्गदर्शनाखाली सेवकीय तयारीकरिता मान्यताप्राप्त नॅझरीन शिक्षण संस्था आणि अभ्यासक्रम सल्लागार समिती (COSAC) च्या माध्यमाने जागतिक सेवकीय विकास कार्यालयाच्या सहकार्याने करतील. आजीवन शिक्षणामध्ये, दिक्षीत वर्गाचा सदस्य या नात्याने उमेदवारांची नैतिक जबाबदारी आणि विशेषत: दिक्षित वर्गाचा सदस्य लैंगिक गैरवर्तन कसे टाळू शकतो, ह्या बाबी समाविष्ट असतील.

## प्रांतिक सुवार्ताप्रसार मंडळ किंवा प्रांतिक सुवार्ताप्रसार मंडळ संचालक

**२३५.** प्रांतिक परिषदे प्रांतिक सुवार्ताप्रसार मंडळ किंवा प्रांतिक सुवार्ताप्रसार मंडळ संचालक यांची निवड करेल. मंडळावर निवडून आलेल्यांचा सेवाकार्यकाळ येणाऱ्या प्रांतिक परिषदेच्या शेवटच्या तहकुबीपर्यंत, आणि त्यांच्या जागी दुसऱ्यांची निवड होऊन ते रूजू होईपर्यंत चालू राहील. (२०५.१९)

**२३५.१.** प्रांताध्यक्षांच्या सहकार्याने, प्रांतिक सुवार्ताप्रसार मंडळ किंवा प्रांतिक सुवार्ताप्रसार मंडळाचे संचालक यांच्या सहकार्याने पवित्रतेच्या सुवार्तेबाबत असणाऱ्या

आवश्यकतेस प्रोत्साहन आणि बढावा देतील. हे कार्य ते प्रशिक्षणाच्या संधी पुरवून, मेळावे आणि सभा भरवून, स्थानिक मंडळ्यांनी देवाने पाचारलेल्या सुवार्तिकांसोबत संजीवनाच्या सभा भरविण्याच्या गरजेवर जोर देऊन, आणि इतर सर्व उपलब्ध साधनांद्वारे करण्याचा प्रयत्न करतील. हे करण्यामागे त्यांचा उद्देश, स्थानिक मंडळीच्या कामकाजामध्ये येशू ख्रिस्ताच्या महान आज्ञेला प्राधान्य देण्यास, प्रांताला प्रभावित करणे हा असेल.

## प्रांतिक मंडळी मालमत्ता मंडळ

**२३६.** प्रांतिक मंडळी मालमत्ता मंडळ हे प्रांताध्यक्ष पदसिद्ध व कमीत कमी दोन नियुक्त सेवक व दोन सामान्य सभासद अशांचे बनलेले असेल. या सभासदांची निवड प्रांतिक परिषदेला करता येईल. त्यांच्या सेवेचा कार्यकाळ चार वर्षे व त्यांच्या जागेवर दुसऱ्यांची निवड होऊन ते रुजू होईपर्यंत असेल. प्रांतिक परिषदेने अनुकूल मत दिल्यास प्रांतिक सल्लागार मंडळ हेच प्रांतिक मंडळी मालमत्ता मंडळ म्हणून काम करू शकेल.

**२३७. प्रांतिक मंडळी मालमत्ता मंडळाची कर्तव्य खालीलप्रमाणे आहेत:**

**२३७.१.** परिषदीय प्रांताच्या हद्दीमध्ये ख्रिस्ती मंदिरे व संलग्न इमारती बांधण्याचे कामास चालना देणे. हे कार्य प्रांतिक सल्लागार मंडळाच्या सहकार्याने करावयाचे आहे.

**२३७.२.** स्थानिक मंडळीचे स्थावर जंगम मालमत्तेची मालकी पत्राचे दस्तऐवज तपासून पाहणे ते सुरक्षित सांभाळून ठेवणे.

**२३७.३** स्थावर मालमत्ता विकत घेणे किंवा विक्री करणे, ख्रिस्ती मंदिरे किंवा पाळक निवास बांधणे यासंबंधात स्थानिक मंडळ्यांकडून आलेल्या प्रस्तावांचा विचार करून या प्रस्तावांसंबंधात त्यांना मार्गदर्शन करणे. (१०३-१०४)

**२३७.४.** ख्रिस्त मंदिर उभारणीची योजना आणि तत्संबंधी स्थावर मालमत्ता खरेदी करण्याकरिता किंवा इमारत बांधण्याकरिता कर्ज काढण्यासंबंधी स्थानिक मंडळ्यांनी सादर केलेले प्रस्तावांचा प्रांताध्यक्षांसोबत विचारविनिमय करून मान्य किंवा अमान्य करणे. प्रांतिक मंडळी मालमत्ता मंडळ सर्वसाधारणपणे कर्ज काढण्याच्या प्रस्तावांना पुढील मार्गदर्शक तत्त्वास पात्र राहून मान्यता देईल ही मार्गदर्शक तत्वे खालील प्रमाणे आहेत:

१. कर्जभार वाढवण्याचा प्रस्ताव सादर करणाऱ्या स्थानिक मंडळीने अशा प्रस्तावाच्या दिनांकापूर्वीची दोन वर्षे आपल्या सर्व आर्थिक देयकांचा पूर्ण भरणा केलेला असावा.

२. मागील तीन वर्षाच्या काळात प्रतिवर्षी सर्व कामांसाठी सरासरीने जेवढा पैसा उभारला असेल त्यांच्या तीन पटीहून जास्त कर्ज काढण्याचा प्रस्ताव नसावा.

३. प्रस्तावित नवीनीकरण किंवा बांधकाम या विषयीचे सर्व तपशील मंडळी मालमत्ता मंडळाकडून मान्य झालेले असावेत.

४. घ्यावयाच्या एकंदर कर्जाची रक्कम व ते कर्ज परतफेड करण्याच्या अटी यामुळे मंडळीच्या अध्यात्मिक जीवनावर विपरीत परिणाम होता कामा नये.

या मार्गदर्शक अटी पूर्ण न करणारे प्रस्ताव असतील, तर ते प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार मंडळ यांच्या स्पष्ट मान्यते वरूनच प्रांतिक मंडळी मालमत्ता मंडळ मान्य करू शकेल.

**२३७.५** ह्या व्यतिरिक्त स्थानिक मंडळीच्या मालमत्तेसंबंधी जे काही प्रांतिक परिषद मार्गदर्शन करील त्याप्रमाणे करणे.

## प्रांतिक परिषदीय अर्थ समिती

**२३८. प्रांतिक परिषदीय अर्थसमितीची कर्तव्ये खालील प्रमाणे आहेत:**

**२३८.१.** प्रांतिक परिषदेच्या अधिवेशनापूर्वी या समितीची बैठक बोलावणे आणि सर्व आर्थिक विभाजन व तिची स्थानिक मंडळ्यांमध्ये वाटणी यासंबंधात प्रांतिक परिषदेला शिफारस करणे.

**२३८.२.** ह्या व्यतिरिक्त प्रांतिक अर्थव्यवस्थे संबंधात प्रांतिक परिषदेने दिलेल्या निर्देशांनुसार सर्व कामे करणे.

**२३८.३.** सर्व स्विकृत आर्थिक विभागणीकरिता वापरलेली पध्दती आणि आधार निधी निश्चित करण्याकरिता लागू केलेली टक्केवारी प्रांतिक अहवालामध्ये प्रकाशित करणे

## प्रांतिक सल्लागार समिती

**२३९.** प्रांतिक सल्लागार समिती ही प्रांतिक सल्लागार मंडळ, प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा आणि शिष्यत्व सेवा मंडळाचे संचालक, प्रांतिक ख्रिस्तवार्ता संघाचे संचालक, प्रांतिक युवक संघाचे संचालक, प्रांतिक चिटणीस आणि प्रांतिक खजिनदार यांची मिळून बनलेली असेल. प्रांतिक सल्लागार समिती आवश्यक तेव्हां भेटेल व तिचे अध्यक्ष हे प्रांताध्यक्ष किंवा अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष किंवा त्यांनी/तिने नियुक्त केलेली एखादी व्यक्ती हे राहतील.

## प्रांतिक उपाध्याय/चॅप्लैन्सी संचालक

**२४०** प्रांताध्यक्ष हे प्रांतिक उपाध्याय/चॅप्लैन्सी संचालकाची नियुक्ती करतील. प्रांतिक उपाध्याय/चॅप्लैन्सी मंडळाचे संचालक प्रांताध्यक्षांच्या सहकार्याने उपाध्याय/चॅप्लैन्सी विशेष सेवाकार्या द्वारे पवित्रतेच्या सुवार्ताप्रसाराचा पुरस्कार करून चालना देण्याचा प्रयत्न करतील. प्रांतिक उपाध्याय/चॅप्लैन्सी संचालक औद्योगिक, शिक्षण संस्थात्मक, प्रांगणे आणि लष्करी संधींद्वारे सुवार्ताप्रसाराच्या कार्याला प्रोत्साहन आणि साहाय्य देतील. संचालक हे नॅझरिन सैनिकांकडे व इतर लष्करी सैनिक जे लष्करी जागांवर आहे त्यांच्याकडे विशेष लक्ष देतील. लष्करी तळांजवळ असलेल्या पाळकांची नियुक्ती व साहाय्य करून सैनिक व त्यांच्या कुटुंबियांना ख्रिस्तासाठी प्रभावित करण्याचा व ते देशाची सेवा करीत असतांना त्यांना आपल्या मंडळीशी जोडण्याचा उद्देश साध्य करणे. (२११.९)

## प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळ

**२४१. प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाची (SDMI) रचना पुढीलप्रमाणे असेल:**

प्रांताध्यक्ष, प्रांतिक ख्रिस्तवार्ता संघाध्यक्ष, प्रांतिक युवक संघाध्यक्ष आणि प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाचे अध्यक्ष ह्या सर्वांची मिळून कार्यकारी समिती राहील; याशिवाय आणखी कमीत-कमी तीन सभासद असतील. हे अधिकचे सभासद प्रांतिक परिषद किंवा प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाचे संमेलन निवडून देईल. त्यांची क्रमशा निवडणूक होईल. त्यांच्या सेवेचा कार्यकाळ स्थीर तीन वर्षे व त्यांच्या जागेवर दुसऱ्यांची निवड होऊन ते रुजू होईपर्यंत चालू राहील. प्रांतिक रविवार शास्त्रशिक्षण शाळा सेवा व शिष्यत्व मंडळ प्रथम

स्थापन होईल तेव्हा सुचविलेल्या सहा व्यक्तीं मधून हे तीन अधिक सभासद निवडून द्यावे. त्यापैकी एक सभासद तीन वर्षांसाठी, एक सभासद दोन वर्षांसाठी, आणि उरलेला एक सभासद एका वर्षासाठी निवडून द्यावा. तथापि प्रांतातील एकूण सभासदांची संख्या पाच हजारपेक्षा अधिक होईल तेव्हा सुचविलेली नावांची व निवडावयाचे सभासद संख्या ही दुप्पट होऊ शकेल, आणि शक्य असेल तेव्हा तेव्हा मंडळाच्या दहा सभासदांपैकी चार सभासद तरी सामान्य सभासद वर्गातील असावेत. प्रांतिक परिषदांच्या दरम्यानच्या काळात प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळात रिक्त झालेल्या पदांवर प्रांताध्यक्ष योग्य त्या व्यक्तींची नेमणूक करतील. (२१५)

**२४१.१. प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाची कर्तव्य खालीलप्रमाणे आहेत:**

मंडळाची निवड झाल्यानंतर लगेच एका आठवड्याच्या आत बैठक बोलावून चिटणीस, खजिनदार, प्रांतिक प्रौढ सेवाकार्य संचालक, प्रांतिक बालक सेवाकार्य संचालक, प्रांतिक आजीवन सामान्य सभासद प्रशिक्षण सेवाकार्य संचालक यांची निवड करून संघटित होणे. वरील सर्व संचालक प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाचे (SDMI) पदसिद्ध सभासद राहतील. मंडळाची कार्यकारी समिती आवश्यकतेनुसार सभासदत्वासाठी इतर प्रांतिक संचालकांची नावे सुचवतील व त्यांची निवडणूक मंडळाकडून होईल.

**२४१.२.** प्रांतांमध्ये चालू असलेल्या प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाच्या (SDMI) सर्व कामांवर देखरेख ठेवणे.

**२४१.३.** बालक सेवाकार्य समिती निवडून देणे. बालक सेवाकार्याचा प्रांतिक संचालक या समितीचा अध्यक्ष असेल. या समितीचे सभासद पुढील प्रांतिक संचालक असतील: संचालक- मुला-मुलींची शिबिरे, संचालक - कॅराव्हॅन, संचालक - सुट्टीतील शास्त्रशिक्षण शाळा; संचालक - पवित्र शास्त्र प्रश्न मंच, संचालक - बालकांची मंडळी; संचालक - शिशुवर्ग यादी आणि आवश्यकतेप्रमाणे इतर.

**टीप:** बालक सेवाकार्‍य आणा प्‍रौढ सेवाकार्‍या वषियी अधकि माहतीसाठी एस डी एम आय हस्‍तपुस्‍तका बघावी.

**२४१.४.** प्रौढ सेवाकार्य समिती निवडून देणे. प्रौढ सेवाकार्याचा प्रांतिक संचालक या समितीचा अध्यक्ष असेल. या समितीचे इतर सभासद पुढे नमूद केलेल्या सेवाकार्याचे

प्रांतिक संचालक असतील: विवाह व कौटुंबिक जीवन, वरिष्ठ प्रौढ सेवाकार्य, अविवाहित प्रौढ सेवाकार्य, सामान्य सभासदांचे अध्यात्मिक शिबिर, लहान गट पवित्र शास्त्र अभ्यास, स्त्री सेवाकार्य, पुरुष सेवाकार्य आणि आवश्यकतेनुसार इतर जण.

**२४१.५.** प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाचे (SDMI) वार्षिक अधिवेशन आयोजित करणे.

**२४१.६.** प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाचे (SDMI) सभासद व अध्यक्ष यांची निवडणूक प्रांतिक परिषदेमध्ये व्हावी की प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाच्या (SDMI) संमेलनामध्ये व्हावी हे प्रांताध्यक्षांशी सल्लामसलत करून निश्चित करणे.

**२४१.७.** स्थानिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाच्या (SDMI) अध्यक्षांना आणि प्रांतिक वयोगट सेवाकार्य संचालक/प्रांतिक युवक संघ संचालकांना प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाच्या (SDMI) प्रांतिक सम्मेलनामध्ये संधी मिळेल त्याप्रमाणे सहभागी होण्यास प्रोत्साहन देणे.

**२४१.८.** प्रांताला प्रदेशांमध्ये विभागणे करणे आणि प्रादेशिक अध्यक्ष नेमणे. हे प्रादेशिक अध्यक्ष प्रांतामध्ये प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाचे (SDMI) कार्य पुढे नेण्यास मंडळाला मार्गदर्शन करून सहाय्य करतील.

**२४१.९** प्रांतिक किंवा प्रादेशिक स्तरावर आजीवन सामान्य सभासद प्रशिक्षण वर्गांची योजना करून ती लागू करणे.

**२४१.१०** प्रांतिक व स्थानिक SDMI कार्याच्या संबंधात हितार्थ माहिती संचयन करण्यास चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेड च्या जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळ (SDMI) कार्यालयाला सहाय्य पुरविणे.

**२४१.११.** प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाचे (SDMI) वार्षिक अर्थ व्यवस्था निश्चित करण्याबाबत प्रांतिक परिषदीय अर्थ समितीला शिफारस करणे.

**२४१.१२.** प्रांतिक सामान्य सभासदांचे शिबीर भरवण्यास जबाबदार असणे. प्रौढ सेवाकार्याचे प्रांतिक अध्यक्ष हे प्रांतिक सामान्य सभासद शिबिर समितीचे पदसिद्ध सभासद असतील.

**२४१.१३.** प्रांतिक परिषदेला सादर करावयाचा, मंडळाच्या अध्यक्षांचा अहवाल मान्य करणे.

**२४१.१४.** प्रांताध्यक्ष किंवा प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाचे (SDMI) अध्यक्ष यांना योग्य वाटेल तेवढ्या वेळेस मंडळाच्या बैठका घेऊन मंडळाच्या जबाबदाऱ्यांची योजना आखणे व त्या परिणामकारकरित्या पार पाडणे.

**२४२. प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाचे (SDMI) अध्यक्ष.**

प्रांतिक नामसुचक समितीने सुचविलेल्या दोन अथवा अधिक नावांमधून एका व्यक्तीला प्रांतिक परिषद अथवा SDMI प्रांतिक संमेलन प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाचे (SDMI) अध्यक्ष म्हणून एक किंवा दोन वर्षांसाठी निवडून देईल. प्रांताध्यक्ष यांच्या अनुमतीने, प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाने (SDMI) तशी शिफारस केल्यास सध्या पदावर असलेल्या अध्यक्षांची “होय” किंवा “नाही” अशा अनुकूल मतदानाने फेरनिवडणूक करता येईल. प्रांतिक परिषदांच्या दरम्यानच्या काळात अध्यक्षांचे रिक्त झालेले पद परिच्छेद २१५ मधील तरतुदींनुसार भरता येईल. (२४१.६)

**प्रांतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाच्या (SDMI) अध्यक्षांची कर्तव्य व अधिकार खालील प्रमाणे आहेत:**

**२४१.१.** प्रांतातील रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाचे (SDMI) खालील बाबींची पूर्ती करून जबाबदारीने पुढारीपण करणे.

१. विद्यार्थी संख्या व उपस्थिती वाढवण्यासाठी योग्य त्या योजना आखणे.

२. बाल सेवाकार्य आणि प्रौढ सेवाकार्या संबंधाने असणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे समन्वय साधणे.

३. नॅझरीन युवक संघा (NYI) बरोबर सहकार्याने काम करून युवकांची रविवारची शास्त्रशिक्षण शाळा/ पवित्र शास्त्र अभ्यास आणि लहान गट यांच्यामध्ये समन्वय साधने.

**२४२.२.** प्रांतिक परिषद आणि रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाचे (SDMI) पदसिद्ध सभासद असणे.

**२४२.३.** वार्षिक परिषदीय अहवालामध्ये समाविष्ट करण्याकरिता रविवारची शास्त्रशिक्षण शाळा व शिष्यत्व सेवा मंडळाचा (SDMI) लेखी अहवाल तयार करणे.

## प्रांतिक नॅझरीन युवक संघ

**२४३.** नॅझरीन युवक संघ (NYI), NYI घोषणापत्र ह्या अंतर्गत आणि प्रांताध्यक्ष, प्रांतिक सल्लागार मंडळ व प्रांतिक परिषदेच्या अधिकारामध्ये प्रांतावरील नॅझरीन युवक सेवाकार्य संघटीत केले जाते. प्रांतिक नॅझरीन युवक संघ हा प्रांतामधील स्थानिक मंडळ्यांच्या नॅझरीन युवक संघांचा आणि सभासदांचा मिळून बनलेला असेल.

**२४३.२.** प्रांतिक नॅझरीन युवक संघ हा प्रांतिक नॅझरीन युवक संघ सेवाकार्याच्या योजनेनुसार स्वतःला संघटीत करील. नॅझरीन युवक संघाचे घोषणापत्र व चर्च ऑफ दी नॅझरीनचे बंधारण पुस्तकाशी सुसंगत असणाऱ्या प्रांतिक युवक संघ सेवाकार्याच्या आवश्यकतांना (८१०.२०३ बघा) प्रतिसाद म्हणून या योजनेचा स्वीकार केला जाऊ शकेल (८१०.२००-८१०.२१९).

## प्रांतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघ

**२४४.** प्रांताच्या हद्दीमधील सर्व स्थानिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघ मिळून प्रांतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघ (NMI) बनेल. प्रांतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघ प्रांतिक सेवाकार्यामध्ये जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघाचे प्रतिनिधित्व करेल. (८११)

**२४४.१.** प्रांतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघाचे कामकाज जागतिक ख्रिस्तवार्ता संघाच्या सम्मेलनानाने आणि प्रमुख मंडळाच्या जागतिक सेवाकार्य समितीने मान्यता दिलेल्या NMI च्या घटणेनुसार चालेल. प्रांतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघ प्रांताध्यक्ष, प्रांतिक सल्लागार मंडळ, प्रांतिक परिषद आणि प्रांतिक ख्रिस्तवार्ता संघ समिती यांच्या अधीन राहील. (८११)

**२४४.२.** प्रांतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघाचे अध्यक्ष हे विनावेतन सेवा करतील आणि ते प्रांतिक परिषदेचे पदसिद्ध सभासद असतील. (२०१)

## प्रांतिक पगारी सहाय्यक

**२४५.** प्रांताचे व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होण्याकरिता जेव्हां पगारी सहाय्यकांची आवश्यकता निर्माण होते तेव्हां अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांच्या लेखी परवानगीने प्रांताध्यक्ष

तसल्या सामान्य सभासदांपैकी किंवा सेवकवर्गापैकी व्यक्तींच्या नांवाची शिफारस करू शकतात. त्यांची निवडणूक प्रांतिक सल्लागार मंडळ करेल. अशा सहाय्यकांची नोकरी एका वर्षापेक्षा अधिक काळ असणार नाही, तथापि प्रांताध्यक्षांच्या शिफारशीने व सल्लागार मंडळाच्या बहुमताने तिचे नुतनीकरण करता येईल. (२११.१६)

**२४५.१.** असल्या सहाय्यकांना त्यांच्या नोकरीची मुदत भरण्यापूर्वी प्रांताध्यक्षांची शिफारस आणि प्रांतिक सल्लागार मंडळाचे बहुमत या आधारे बडतर्फ करता येईल. (२२५.१६)

**२४५.२.** अशा प्रांतिक सहाय्यकांची कर्तव्ये व सेवा प्रांताध्यक्ष ठरवतील व तेच त्यांच्या कामावर देखरेख ठेवतील.

**२४५.३.** प्रांताध्यक्षांनी राजिनामा दिल्यास किंवा त्यांना बडतर्फ केल्यास, पगारी सहाय्यक सेवकांची सेवा समाप्त झाले असे समजण्यात येईल. अर्थात कामगारविषयक स्थानिक कायद्यांमध्ये याहून वेगळी तरतूद असेल, तर तिचे पालन करण्यात येईल. तथापि, एक किंवा अधिक कर्मचारी अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांच्या व प्रांतिक सल्लागार मंडळाच्या लेखी परवानगीने कार्यरत राहू शकेल परंतु नवीन प्रांताध्यक्षांनी सेवेवर रूजू होण्याच्या तारखे नंतर नाही. (२०९.३-२०९.४)

**२४५.४.** प्रांतिक पगारी सेवकाची नौकरी त्याला दुसऱ्या प्रांतावर निवडून किंवा नियुक्तीद्वारे प्रांतिक सचिव किंवा प्रांतिक खजिनदार म्हणून सेवा करण्यावर रोख लावत नाही. पगारी सहाय्यक हा प्रांतिक सल्लागार मंडळावर सेवा करण्यास पात्र नाही.

## प्रांताचे विघटन

**२४६.** एखादा प्रांत यापुढे प्रांत राहू नये असे प्रमुखाध्यक्षांच्या मंडळाला निर्विवादपणे वाटल्यास त्यांच्या शिफारशीवरून आणि चर्च ऑफ दी नॅझरीनच्या प्रमुख मंडळाने दोन तृतियांश बहुमताने अनुकूलता दर्शविल्यास तशी औपचारीक घोषणा करून प्रांताचे विघटन करता येईल. (२००)

**२४६.१.** एखाद्या प्रांताचे अधिकृतपणे विघटन झाल्यास तेथे अस्तित्वात असणारी मंडळीची कोणतीही स्थावर, जंगम मालमत्ता कोणत्याही प्रकाराने दुसऱ्या कोणत्याही कारणी लावू नये, तर ती मिळकत चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेडच्या ताब्यामध्ये चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सर्वसाधारण उपयोगासाठी; प्रमुख परिषदेच्या मार्गदर्शनाने आणि

या विघटीत प्रांतासाठी सदर मिळकत धारण करणारे विश्वस्त किंवा सदर मिळकत धारण करण्यासाठी निर्माण केलेली मंडळे प्रमुख मंडळाने नियुक्त केलेल्या प्रतिनिधिच्या आदेशाने व मार्गदर्शनाने सदर मिळकतिची विक्री करतील किंवा तिची विल्हेवाट लावतील व येणारा पैसा सदर प्रतिनिधीच्या हवाले करतील. (१०६.२, १०६.५, २२५.६)

## III. प्रमुख शासन

### A. प्रमुख परिषदेची कार्ये व शासन

**३००.** प्रमुख परिषद ही चर्चच्या घटनेतील तरतुदींच्या अधीन असलेली चर्च ऑफ दी नॅझरीनची सर्वोच्च सिद्धांत बनवणारी, कायद्याची रचना करणारी आणि निवड अधिकार असणारी परिषद आहे. (२५-२५.८)

**३००.१.** प्रमुख परिषदेचे सर्व कामकाज हे प्रमुखाध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली चालेल. (२५.५, ३०७.३)

**३००.२.** प्रमुख परिषद अधिकाऱ्यांची निवड करेल आणि कामकाज चालविण्यासाठी संघटीत होईल. (२५.६)

**३००.३. कामकाजाचे नियम.** लागू कायद्याच्या अधीन राहून, बंधारण पुस्तकामधील संस्थेचे नियम व शासनाचे उपनियम, चर्च ऑफ दी नॅझरीनच्या स्थानिक मंडळी, प्रांत आणि प्रमुख यांच्या आणि संस्थेच्या समित्यांच्या सभा व कामकाज हे सांसदिय प्रक्रियेकरिता *रॉबर्ट्स रूल्स ऑफ ऑर्डर न्युली रिवाईज्ड (लेटेस्ट एडिशन)* च्या नियमांनुसार केले जाईल. (३४)

## B. प्रमुख परिषदेचे सभासदत्व

**३०१**. प्रमुख परिषदेचे सभासदत्व खालील प्रमाणे असेल:

प्रत्येक फेज ३ प्रांतातील सेवकीय व समान्य प्रतिनिधी समान संख्येमध्ये, ह्यामधील प्रांताध्यक्ष हे नियुक्त दिक्षित सेवकीय प्रतिनिधिंपैकी एक असतील, उर्वरीत नियुक्त सेवकीय प्रतिनिधी आणि सामान्य प्रतिनिधी हे प्रांतिक परिषदेने निवडलेले असतील; सर्व मानद व निवृत्त प्रमुखाध्यक्ष; सर्व प्रमुखाध्यक्ष; जागतिक ख्रिस्तवार्ता संघाध्यक्ष; जागतिक युवक संघ समितीचे अध्यक्ष; प्रमुख मंडळाच्या सल्लाला अहवाल सादर करणारे व जागतिक जबाबदारी असलेले चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेड चे सर्व अधिकारी व संचालक; प्रत्येक विभागातील विभागिय आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ शाळांच्या

अध्यक्षांपैकी अर्धे मतदान करणारे सभासद असतील, दुसरे अर्धे हे मतदान न करू शकणारे सभासद असतील, ह्यांच्या संख्या व निवडीची प्रक्रिया ही आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाद्वारे निश्चित केलेली असेल; आणि प्रत्येक विभागामधून प्रमुख मंडळाद्वारे नियुक्त एक असा मिशनरी प्रतिनिधी ज्याची निवड त्या विभागात प्रमुख मंडळाद्वारे नियुक्तीनुसार सेवारत असणाऱ्या मिशनऱ्यांद्वारे केलेली असेल. अशा निवडणुकीच्या अनुपस्थितीत मिशनरी प्रतिनिधीची निवड जागतिक मिशन समिती करेल.

**३०१.१.** प्रत्येक फेज ३ प्रांत प्रमुख परिषदेला पुढीलप्रमाणे प्रतिनिधी पाठविण्यास पात्र आहे: प्रथम ६,००० किंवा त्यापेक्षा कमी पूर्ण सभासदांकरिता दोन नियुक्त दिक्षित प्रतिनिधी व दोन सामान्य प्रतिनिधी, त्या पुढील ४००० पूर्ण सभासदांकरिता आणि त्यापुढील प्रत्येक ५००० पूर्ण सभासदांकरिता एक नियुक्त दिक्षित प्रतिनिधी व एक सामान्य प्रतिनिधी. "नियुक्त दिक्षित सेवक" ह्या वर्गामध्ये दिक्षित व डिकन ह्या दोहोंचाही समावेश असेल. (खालील तक्ता बघा.)

| **पूर्ण सभासद संख्या** | **प्रतिनिधींची संख्या** |
|---|---|
| ०-६,०००: | ४ (२ सामान्य, २ सेवक) |
| ६,००१-१०,०००: | ६ (३ सामान्य, ३ सेवक) |
| १०,००१-१५,०००: | ८ (४ सामान्य, ४ सेवक) |
| १५,००१-२०,०००: | १० (५ सामान्य, ५ सेवक) |
| २०,००१-२५,०००: | १२ (६ सामान्य, ६ सेवक) |
| २५,००१-३०,०००: | १४ (७ सामान्य, ७ सेवक) |
| ३०,००१-३५,०००: | १६ (८ सामान्य, ८ सेवक) |
| ३५,००१-४०,०००: | १८ (९ सामान्य, ९ सेवक) |

(४०,००० सभासदांच्या वरील प्रत्येक ५,००० सभासदांकरिता १ अतिरिक्त सामान्य प्रतिनिधी आणि १ अतिरिक्त सेवक प्रतिनिधी)

**३०१.२.** प्रत्येक फेज २ प्रांत एक नियुक्त दिक्षित प्रतिनिधी आणि एक सामान्य प्रतिनिधी प्रमुख परिषदेला पाठविण्यास पात्र असेल. प्रांताध्यक्ष हे नियुक्त दिक्षित प्रतिनिधी असतील. प्रत्येक प्रतिनिधीसाठी पर्यायी प्रतिनिधीची निवड केली जाईल.

**३०१.३.** फेज १ प्रांत प्रमुख परिषदेला एक मतदान न करणाऱ्या प्रतिनिधी पाठविण्यास पात्र असेल. त्याच प्रांतावर सभासदत्व असणारे प्रांताध्यक्ष हे ते प्रतिनिधी असतील. प्रांताध्यक्ष त्याच प्रांताचे सभासद नसल्यास त्याच प्रांतामध्ये सभासद असणारा प्रतिनिधी निवडण्यात येईल.

**३०१.४.** प्रमुख परिषदेमध्ये प्रांताचे प्रतिनिधित्व करण्याकरिता निवडून आलेला नियुक्त दिक्षित प्रतिनिधी प्रमुख परिषद सुरू होण्याआधी जर दुसऱ्या प्रांतामध्ये नियुक्त दिक्षित सेवक म्हणून गेला किंवा त्याने चर्च ऑफ दी नॅझरीन मधील त्याची सक्रिय नियुक्त सेवा सोडली तर निवडून देणाऱ्या प्रांताचे प्रतिनिधित्व करण्याचा त्याचा हक्क खारिज होईल. ज्या सेवकाला प्रांताद्वारे अधिकृत निवृत्ती प्रदान करण्यात आलेली आहे तो प्रमुख परिषदेकरिता प्रतिनिधी म्हणून जाण्यास अपात्र आहे.

**३०१.५.** प्रमुख परिषदेमध्ये प्रांताचे प्रतिनिधित्व करण्याकरिता निवडून आलेला सामान्य प्रतिनिधी प्रमुख परिषद सुरू होण्याआधी त्या प्रांतातील मंडळीचे सभासदत्व सोडून जर दुसऱ्या प्रांतामधील मंडळीचा सभासद बनला तर निवडून देणाऱ्या प्रांताचे प्रतिनिधित्व करण्याचा त्याचा हक्क खारिज होईल.

## C. प्रमुख परिषदेची वेळ व ठिकाण

**३०२.** प्रमुख परिषद प्रत्येक चौथ्या वर्षी जून महिन्यात भरेल, परिषदेची वेळ व जागा ही सर्व प्रमुखाध्यक्ष आणि त्यांच्या संख्येइतक्या, प्रमुखाध्यक्ष मंडळाने निवडलेल्या, व्यक्तींचे मिळून बनलेल्या प्रमुख परिषद आयोगाद्वारे निश्चित केलेली असेल. आणीबाणीच्या प्रसंगी प्रमुख परिषद आयोगाला प्रमुख परिषदेची वेळ वा जागा बदलण्याचा अधिकार असेल.

**३०२.१.** प्रमुखाध्यक्ष मंडळ हे प्रमुख मंडळाच्या कार्यकारी समितीशी सल्लामसलत करून योग्य तेव्हां प्रमुख परिषदेकरिता समानांतर जागा निवडू शकतील. समानांतर जागांवरून केलेले मतदान हे प्रमुख जागेवरून प्रतिनिधिंनी केलेल्या मदतानासोबत अधिकृत मानण्यात येईल.

**३०२.२.** प्रमुख परिषदेचा प्रारंभ भक्तिपर आणि प्रेरणादाई सभेद्वारे होईल. कामकाज व इतर प्रेरणादायी सभांच्या अंमलबजावणीकरिता व्यवस्था पुरविण्यात येईल. प्रमुख परिषद तहकूब करण्याची वेळ निश्चित करेल. (२५.३)

## D. प्रमुख परिषदेची विशेष सत्रे

**३०३.** आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये प्रमुखाध्यक्ष मंडळ किंवा त्यातील बहुसंख्य ह्यांना सर्व प्रांताध्यक्षांच्या दोन तृतीयांश लेखी अनुमतीने, प्रमुख परिषदेचे विशेष सत्र बोलाविण्याचा अधिकार असेल. सर्व प्रमुखाध्यक्ष आणि प्रमुखाध्यक्ष मंडळाने निवडलेल्या आयोगाद्वारे ह्या सत्राची वेळ व जागा निश्चित केली जाईल.

**३०३.१.** प्रमुख परिषदेच्या विशेष सत्रा संदर्भात, ह्या आधीच्या शेवटल्या प्रमुख परिषदेचे प्रतिनिधी आणि उपप्रतिनिधी, किंवा त्यांच्या जागी निवडलेले आणि पात्र झालेले प्रतिनिधी हे विशेष प्रमुख परिषदेच्या सत्राचे प्रतिनिधी आणि उपप्रतिनिधी म्हणून काम करतील.

## E. प्रमुख परिषद व्यवस्था समिती

**३०४.** प्रमुख सचिव, प्रमुख कोषाध्यक्ष आणि प्रमुख परिषद सुरू होण्याच्या किमान एक वर्ष आधी प्रमुखाध्यक्ष मंडळाने नियुक्त केलेले तीन लोक ह्यांची मिळून प्रमुख परिषद समितीची तयार होईल.

**३०४.१.** प्रमुख परिषद व्यवस्था समितीला सर्व आवश्यक तपशीलांची व्यवस्था करण्याचा आणि प्रमुख परिषदेसंबंधी करारबध्द होण्याचा अधिकार असेल.

**३०४.२.** सर्व प्रमुखाध्यक्षांसह प्रमुख परिषद समिती ही प्रमुख परिषदेकरिता सर्वांचे हित; प्रभूभोजन सभा; आणि सर्व धार्मिक सभा; ह्यावर जोर देणाऱ्या कार्यक्रमाची आखणी करेल. हे सर्व प्रमुख परिषदेच्या मान्यतेच्या अधीन असेल.

## F. प्रमुख परिषदेचे कामकाज

**३०५.** चर्च ऑफ दी नॅझरीनच्या घटनेतील परिच्छेद २५:८ नुसार प्रमुख परिषदेचे कामकाज खालील प्रमाणे असेल:

**३०५.१.** संदर्भ समितीमार्फत, ठराव, शिफारशी आणि आयोगांद्वारे अमलबजावणी करावयाचे कायदे आणि विशेष समित्यांचे अहवाल व इतर कागदपत्रे ही स्थायी किंवा परिषदेच्या विशेष कायदा समित्यांकडे किंवा विभागिय गटांकडे प्रमुख परिषदेला सादर करण्याआधी विचारविमर्ष करण्याकरिता निर्देशित करणे. संदर्भ समिती विशिष्ट विभाग किंवा विभांगांनाच प्रभावित करणारे कायदे प्रमुख परिषदेला आलेल्या त्याच विभागातील

प्रतिनिधिंच्या विभागिय गटाकडे कृती करिता सादर करू शकेल. बंधारण पुस्तकावर परिणाम करणाऱ्या बदलांबाबत केवळ संपूर्ण प्रमुख परिषदच कृती करेल.

**३०५.२.** उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सभासदांच्या दोन-तृतीयांश मताद्वारे सहा प्रमुखाध्यक्ष निवडणे. ते येणाऱ्या पुढील प्रमुख परिषदेच्या अंतिम तहकूबीनंतर ३० दिवसांपर्यंत आणि त्यांच्या जागी दुसरे निवडून येऊन रूजू होईपर्यंत पदाधिकारी असतील.

a. प्रथम, सध्या सेवारत असणाऱ्या प्रमुखाध्यक्षांकरिता “होय” किंवा “नाही” अशी मतपत्रिका असेल.

b. सध्या सेवारत असणाऱ्या प्रमुखाध्यक्षांकरिता मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उर्वरीत रिक्त जागा, निवडणूका पूर्ण होईपर्यंत मतपत्रीकांचे वाटप करून, भरल्या जातील.

जर या तरतुदीनुसार एखाद्या अपात्र व्यक्तीस पहिल्या मतपत्रिकेवर मते मिळाली तर त्या व्यक्तीचे नाव निवडणुकीच्या मतपत्रिकेतून काढून टाकले जाईल आणि पहिल्या मतपत्रिकेच्या अहवालात असे विधान समाविष्ट असेल: “एक किंवा अधिक नावे पदाकरिता अपात्र असल्यामुळे काढून टाकण्यात आली आहेत.”

दिक्षित वर्गातील कुठल्याही सेवकाने शिस्तीच्या कारणास्तव त्याची किंवा तिची प्रमाणपत्रे प्रत्यर्पित केली असतील तर तो किंवा ती प्रमुखाध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी अपात्र राहील. वयाची ३५ वर्षे पूर्ण न झालेली किंवा ६८ व्या वर्षात पोहोंचलेली व्यक्ती प्रमुखाध्यक्ष पदाकरिता निवडता येणार नाही. (२५.४, ३०७.१६, ९००)

**३०५.३.** प्रमुखाध्यक्ष विकलांग झाले असतील किंवा त्यांना निवृत्तीची अवस्था प्रदान केलेली असेल तर उपयुक्त वेळी त्यांची इमेरिटस ह्या सन्मानासाठी निवड करणे. ह्यावरून असे गृहित धरल्या जाते की इमेरिटस ची अवस्था ही जीवनभराच्या कार्यकाळासाठी आहे. (३१४.१)

**३०५.४.** ज्या प्रमुखाध्यक्षाने स्वत:ला निवृत्त अवस्थेमध्ये घालण्याची विनंती केलेली असेल, किंवा प्रमुख परिषदेच्या नजरेत जे शारीरिकरित्या विकलांग बनल्याच्या कारणाने अपात्र बनलेले आहेत, किंवा असली कुठलिही अपात्रता की ज्यामुळे त्या व्यक्तीला प्रमुखाध्यक्षपदाच्या कामाला उचित काळजी पुरविता येणार नाही; आणि प्रमुखाध्यक्षाने कमीतकमी एक पूर्ण कार्यकाळ प्रमुखाध्यक्षपदावर सेवा केलेली आहे अशा प्रमुखाध्यक्षांना निवृत्त अवस्थेमध्ये घालणे. जर प्रमुख परिषदांच्या दरम्यानच्या काळात प्रमुखाध्यक्षाने

निवृत्त अवस्था प्रदान करण्याची विनंती केली तर नियमीत सत्रामध्ये असलेल्या प्रमुख मंडळाला प्रमुखाध्यक्ष मंडळाच्या शिफारसीवरून ती विनंती मान्य करता येईल. (३१४.१)

**३०५.५.** प्रत्येक सेवानिवृत्त प्रमुखाध्यक्षांकरिता योग्य निवृत्तीवेतन निश्चित करणे.

**३०५.६.** परिच्छेद ३३२.१-३३३.४ नुसार प्रमुख मंडळाची निवड करणे. त्यांचा कार्यकाळ पुढील प्रमुख परिषदेच्या अंतिम तहकूबीपर्यंत आणि त्यांचे उत्तराधिकारी निवडून येऊन पात्र होईपर्यंत असेल. (३३१, ९०१)

**३०५.७.** प्रमुख न्याय मंडळाची निवड करणे. ह्यामध्ये पाच नियुक्त दिक्षित सेवक असतील आणि त्यांचा कार्यकाळ पुढील प्रमुख परिषदेच्या अंतिम तहकूबीपर्यंत आणि त्यांचे उत्तराधिकारी निवडून येऊन पात्र होईपर्यंत असेल. मंडळाचे अध्यक्ष व सचिव यांची निवड प्रमुखाध्यक्ष मंडळ करेल. (२५.७, ६११, ९०२)

**३०५.८.** पवित्र शास्त्राशी सुसंगत अशा सर्व बाबी करणे जेणेकरून चर्च ऑफ दी नॅझरीनचे सर्वसामान्य हित आणि ख्रिस्ताच्या पवित्र उद्देशाकरिता, मंडळीच्या घटनेच्या अधीन राहून, शहाणपण हुकूम चालवेल. (२५.८)

## G. प्रमुखाध्यक्ष

**३०६.** प्रमुखाध्यक्षांची भुमिका ही खालील गोष्टींद्वारे प्रेषितीय आणि दृष्टांतपूर्ण आध्यात्मिक पुढारीपण पुरविण्याची आहे:

- चर्च ऑफ दी नॅझरीनचे मिशन स्पष्टरित्या व्यक्त करणे
- दृष्टांत सादर करणे
- सेवक वर्गाच्या सभासदांच्या दिक्षा करणे
- ईश्वरविज्ञानात्मक एकनिष्ठतेचा प्रसार करणे, आणि
- प्रमुख मंडळीला अख्त्यारी व सर्वसामान्य प्रशासनात्मक देखरेख पुरविणे.

**३०७.** प्रमुखाध्यक्षांची कर्तव्ये व अधिकार खालीलप्रमाणे आहेतः

**३०७.१.** प्रमुख परिषदेने स्वीकारलेल्या कायदा व नियमांच्या अधीन राहून चर्च ऑफ दी नॅझरीनची देखरेख करणे.

**३०७.२.** प्रमुख परिषदेचे पदसिध्द सभासद म्हणून काम करणे. (३०१)

**३०७.३.** प्रमुख परिषद आणि चर्च ऑफ दी नॅझरीनच्या प्रमुख मंडळाच्या सभांचे अध्यक्षपद भुषविणे. (३००.१, ३३५.३)

**३०७.४.** ज्यांची दिक्षित वर्गाकरिता व डिकन वर्गाकरिता निवडणूक झालेली आहे अशांची दिक्षा करण्याचा किंवा इतरांना दिक्षा करण्याकरिता नियुक्त करण्याचा स्वेच्छाधीन अधिकार बाळगणे. (३२०, ५३८.५-५३८.६)

**३०७.५.** प्रमुखाध्यक्ष मंडळाने आखलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक प्रांतिक परिषदेचे अध्यक्षपद भुषविणे. प्रमुखाध्यक्ष एखाद्या दिक्षित सेवकाला परिषदेचे अध्यक्षपद भुषविण्यास नियुक्त करू शकतात. (२०२, २१४)

**३०७.६.** प्रांतिक परिषदेचे अध्यक्षपद भुषवित असलेले प्रमुखाध्यक्ष, प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार मंडळ हे स्थानिक मंडळीच्या प्रतिनिधिंच्या सहमतीने ज्या मंडळ्यांनी अजून पाळकांना सेवेकरिता आमंत्रण दिलेले नाही अशा मंडळ्यांकरिता पाळकांची नियुक्ती करू शकतात. (२१८.१)

**३०७.७.** प्रांतिक परिषदांच्या दरम्यान ज्या प्रांतिक परिषदांवर प्रांताध्यक्षांचे पद रिक्त झालेले आहे त्यावर प्रमुखाध्यक्ष हे प्रांतिक सल्लागार समितीशी सल्लामसलत करून प्रांताध्यक्षांची नियुक्ती करू शकतात. परिच्छेद २०८ नुसार त्या प्रांतावरील दिक्षितांसहीत, दिक्षित वर्गातील सर्व दिक्षित विचारात घेण्यास पात्र आहेत. (२०९, २३९)

**३०७.८.** सध्या पदावर कार्यरत असलेल्या प्रांताध्यक्षाच्या तात्पुरत्या असमर्थतेच्या प्रसंगी अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष हे प्रांतिक सल्लागार समितीशी सल्लामसलत करून पात्र दिक्षित सेवकाला हंगामी प्रांताध्यक्ष म्हणून नियुक्त करू शकतात. प्रांताध्यक्षाच्या असमर्थतेचा प्रश्न अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार मंडळ निश्चित करेल. (२०९.२)

**३०७.९.** अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष हे एखाद्या फेज ३ प्रांताला तो संकटात आहे असे घोषित करण्याबाबत प्रमुखाध्यक्ष मंडळाला शिफारस करु शकतात. (२००.२, ३२२)

**३०७.१०.** अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष हे स्थानिक मंडळीच्या वार्षिक किंवा विशेष सभेचे अध्यक्षपद भुषवू शकतात किंवा तसे करण्यास एखाद्या प्रतिनिधिची नियुक्ती करू शकतात. (११३.५)

**३०७.११.** कुठलेही प्रमुखाध्यक्ष हे प्रमुखाध्यक्ष मंडळ सोडून चर्च ऑफ दी नॅझरीनच्या इतर कुठल्याच मंडळाचे मतदान करणारे सभासद असू शकत नाही, एखाद्या मंडळाच्या नियमावलीत तसली तरतूद केलेली असल्यास तो अपवाद असेल. (३०७.१२)

**३०७.१२**. प्रमुखाध्यक्ष म्हणून सेवा करतांना ते चर्चचे इतर कोणतेही प्रमुखपद धारण करू शकत नाहीत. (३०७.११)

**३०७.१३.** प्रमुखाध्यक्षांच्या सर्व अधिकृत कृती प्रमुख परिषदेच्या परिक्षणाच्या आणि पुनरीक्षणाच्या अधीन असतील.

**३०७.१४.** प्रमुखाध्यक्षाची कोणतीही अधिकृत कृती प्रमुखाध्यक्ष मंडळाच्या उर्वरीत सदस्यांच्या सर्वसंमत मताद्वारे रद्द केली जाऊ शकते.

**३०७.१५.** प्रमुखाध्यक्ष मंडळाच्या उर्वरीत सभासदांच्या सर्वसंमत मताने आणि प्रमुख मंडळाच्या दोन-तृतियांश मतांच्या साथीने एखाद्या प्रमुखाध्यक्षाचे पद रिक्त घोषित केल्या जाऊ शकते.

**३०७.१६.** प्रमुख परिषदेद्वारे निवडलेले प्रमुखाध्यक्ष पुढील प्रमुख परिषदेच्या अंतिम तहकूबीनंतर ३० दिवस आणि त्यांचे उत्तराधिकारी निवडून येऊन पात्र होईपर्यंत कार्यरत राहातील. (३०५.२)

## H. प्रमुखाध्यक्ष इमेरिती आणि सेवानिवृत्त

**३१४.** सर्व इमेरिती आणि सेवानिवृत्त प्रमुखाध्यक्ष हे प्रमुख परिषदेचे सदस्य असतील. (३०१)

**३१४.१.** ज्या प्रमुखाध्यक्षाला सेवानिवृत्त अवस्थेत घातलेले असेल, किंवा इमेरिती हे मानाचे मत दिलेले असेल ते प्रमुखाध्यक्ष मंडळाचा सदस्य असू शकत नाहीत. तथापि, एखादा सक्रिय प्रमुखाध्यक्ष आजारपण, रूग्नालयात भरती किंवा इतर अपरिहार्य आपत्कालीन परिस्थितीमुळे असमर्थ होऊन आपल्या कामाकरिता उपस्थित राहू शकत नाही, तेव्हा प्रमुखाध्यक्ष मंडळाला एखाद्या सेवानिवृत्त प्रमुखाध्यक्षाला हंगामी कार्य करण्यासाठी पाचारण करण्याचा अधिकार आहे. (३०५.३-३०५.५, ९००.१)

## I. प्रमुखाध्यक्ष मंडळ

**३१५.** सर्व प्रमुखाध्यक्ष स्वत:ला मंडळ स्वरूपात संघटीत करतील आणि आखणी करून आपल्या सदस्यांना त्यांच्या कार्याची वाटणी करून देतील, त्या कार्यावर त्यांना विशेष अधिकार असतील.

**३१६.** पदाची रिक्तता. प्रमुख परिषदांच्या दरम्यानच्या काळात, प्रमुखाध्यक्ष मंडळामध्ये एखादी जागा रिक्त झाल्यास, रिक्त जागा भरण्यासाठी निवडणूक बोलावण्याच्या प्रश्नावर प्रमुखाध्यक्ष मंडळाद्वारे निर्णय घेतला जाईल. मंडळाचा निर्णय प्राप्त झाल्यावर प्रमुख सचिव हे प्रमुख मंडळाच्या सर्व सदस्यांना त्याबाबत कळवतील. जेव्हां निवडणूक बोलावली जाईल तेव्हां प्रमुख मंडळाचे सदस्य चर्च ऑफ दी नॅझरीनच्या एका दिक्षिताला, दोन-तृतियांश मताने रिक्त जागा भरण्याकरिता आणि प्रमुखाध्यक्षाच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याकरिता निवडून देतील. निवडून आलेले प्रमुखाध्यक्ष पुढील प्रमुख परिषदेच्या अंतिम तहकुबीनंतर ३० दिवसपर्यंत आणि त्यांचा उत्तराधिकारी निवडून येऊन पात्र होईपर्यंत कार्यरत राहातील. (२५.४, ३०५.२)

**३१६.१.** प्रमुख सचिव मतपत्रिकेचा निकाल प्रमुखाध्यक्ष मंडळाला कळवितील व मंडळ मतपत्रिकेचा निकाल जाहीर करेल.

**३१७.** प्रमुखाध्यक्ष मंडळाची कर्तव्ये खालीलप्रमाणे असतील:

**३१७.१.** जागतिक चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सर्व प्रांत, संस्था आणि सेवांकरिता पुढारीपण आणि ईश्वरविज्ञानाकडे विशेष लक्ष देऊन प्रमुख मंडळीला देखरेख, मार्गदर्शन आणि प्रेरणा पुरविणे.

**३१७.२.** जागतिक मिशन संचालक, संबंधित राष्ट्रीय प्रशासकीय संचालक आणि/किंवा विभागिय संचालक यांच्याशी सल्लामसलत करून, भौगोलिक भागांच्या जबाबदाऱ्यांमध्ये बदल करण्याची शिफारस करणे. ही प्रमुख मंडळाच्या मान्यतेच्या अधीन राहील.

**३१७.३.** मंडळीच्या धोरणांविषयी आणि योजनांसंदर्भात प्राथमिक अधिकार बाळगून प्रमुख मंडळ, त्याच्या समित्या आणि चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सर्व मंडळांना इतर प्रकरणांबाबत सल्ला प्रदान करणे. प्रमुखाध्यक्ष मंडळ त्याला उचित वाटणाऱ्या बाबींची शिफारस प्रमुख मंडळ व समित्यांना करेल. प्रमुखाध्यक्ष मंडळ हे जागतिक मिशन समितीने मिशनऱ्यांच्या नियुक्तीबद्दल प्रमुख मंडळाला केलेल्या नावांच्या सुचनेला मान्यता देईल किंवा नाकारेल.

**३१७.४.** प्रमुख सचिव आणि प्रमुख कोषाध्यक्ष निवडण्याकरिता एक किंवा अधिक नावे प्रमुख मंडळाकडे नेण्यासाठी नामसुचक समिती म्हणून प्रमुख मंडळाच्या कार्यकारी समितीसमवेत एकत्र काम करणे.

**३१७.५.** प्रमुख सचिव, प्रमुख कोषाध्यक्ष किंवा खाते संचालक यांचे कार्यालय दोन-तृतियांश मताने रिक्त घोषित करणे.

**३१७.६.** प्रमुख परिषदांच्या दरम्यानच्या कालावधीत प्रमुख न्याय मंडळाच्या सदस्यत्वामध्ये रिक्त झालेले पद भरून काढणे आणि न्याय मंडळाचे अध्यक्ष व सचिव निवडून देणे. (३०५.७, ६१२, ९०२)

**३१७.७.** प्रमुख परिषदांच्या दरम्यानच्या कालावधीत विशेष आयोग व समित्यांच्या सदस्यत्वामध्ये रिक्त झालेले पद भरून काढणे.

**३१७.८.** आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाशी सलग्न असलेल्या उच्च शिक्षण संस्थांचे सल्लागार म्हणून काम करण्यासाठी प्रमुखाध्यक्षांची नेमणूक करणे. (९०५)

**३१७.९.** जागतिक सेवक विकास यांच्या संयुक्त विद्यमाने, सामान्य किंवा सनदी सेवकाच्या भूमिकेत सेवा देणाऱ्या सेवा देणाऱ्यांकरिता सेवकीय अभ्यासक्रमाची आयोजित करणे. (५२९-५३०)

**३१७.१०.** जागतिक मिशन हितसंबंधांची जीवनरेखा असलेल्या जागतिक सुवार्ताप्रसार निधिची योजना करणे, तिचे जतन करणे आणि पुरस्कार करणे. प्रमुखाध्यक्ष मंडळ आणि प्रमुख मंडळाला स्थानिक मंडळ्यांकरिता जागतिक सुवार्ताप्रसार निधिची उद्दीष्टे आणि जबाबदाऱ्या स्थापित करण्याचा अधिकृत अधिकार आहे. (३२.५, १३०, ३३५.७)

**३१७.११.** आवश्यकतेनुसार एखाद्या माजी दिक्षिताला किंवा डिकनला त्यांच्या प्रमाणपत्रांचा परतावा लेखी स्वरूपात मंजूर करणे. (५३९.११, ५४०.८, ५४०.१२)

**३१८.** प्रमुखाध्यक्ष मंडळाला चर्च ऑफ दी नॅझरीनच्या कायद्याचे आणि सिध्दांतांचे अर्थविवरण करण्याचा, बंधारण पुस्तकाचा अर्थ आणि तरतुदी लागू करण्याचा अधिकार आहे. हे प्रमुख परिषदेला केलेल्या अपिलाच्या अधीन राहील.

**३१९.** प्रमुखाध्यक्ष मंडळ प्रांतिक सेवा केंद्रांच्या योजनांना मंजुरी देण्याबाबत विचार करेल. प्रमुखाध्यक्ष मंडळाद्वारे लेखी मंजुरी प्राप्त होईपर्यंत योजनांवर अमल करता येणार नाही. (२२५.१२)

**३२०.** घटस्फोटीत व्यक्तींच्या दिक्षेबाबत प्रमुखाध्यक्ष मंडळाला स्वेच्छा निर्णयाचा अधिकार असेल. (३०७.४, ५३३.३, ५३४.३)

**३२१.** अख्त्यारी प्रमुखाध्यक्षाच्या शिफारशीनुसार प्रमुखाध्यक्ष मंडळ कोणत्याही फेज २ किंवा फेज १ प्रांताच्या प्रांताध्यक्षाचे पद आणि प्रांतिक सल्लागार समितीच्या दोन-तृतियांश मताने कोणत्याही फेज ३ प्रांताच्या प्रांताध्यक्षाचे पद रिक्त झाल्याचे घोषित करू शकतात. (२०९.१, २३९)

**३२२.** प्रमुखाध्यक्ष मंडळ फेज ३ प्रांत संकटात आहे असे घोषित करण्यास मान्यता देऊ शकेल. (२००.२, ३०७.९)

**३२३.** प्रत्येक प्रमुख परिषदेनंतर चर्च ऑफ दी नॅझरीनच्या बंधारण पुस्तकाची सुधारीत आवृत्ती, प्रमुखाध्यक्ष मंडळाने अधिकृत प्रकाशनाची तारीख जाहीर केल्यापासून, सर्व योग्य भाषांमध्ये परिणामकारक ठरेल.

**३२४.** प्रमुखाध्यक्ष मंडळाला चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सेवेकरिता, इतर काही तरतूद केलेली नसल्यास, प्रमुख मंडळीच्या व्यवस्थेशी सुसंगत आणि मंडळीच्या घटणेच्या अधीन राहून काहीही करण्याचा अधिकार असेल.

## J. प्रमुख सचिव

**३२५.** प्रमुख मंडळाच्या नियमावलीच्या तरतुदीनुसार, प्रमुख मंडळाने निवडलेला प्रमुख सचिव पुढील प्रमुख परिषदेच्या अंतिम तहकूबीपर्यंत आणि त्याचा उत्तराधिकारी निवडून येऊन पात्र होईपर्यंत, किंवा परिच्छेद ७१७.५ नुसार बडतर्फ केल्या जाईपर्यंत कार्य करेल. (९००.२)

**३२५.१.** प्रमुख सचिव हे प्रमुख परिषदेचे पदसिध्द सदस्य असतील. (३०१)

**३२५.२.** प्रमुख मंडळाच्या सत्रांच्या दरम्यानच्या कालावधीत प्रमुख सचिवाचे पद रिक्त झाल्यास, परिच्छेद ३१७.४ नुसार नामसुचना झाल्यावर प्रमुख मंडळ ते पद भरू शकेल.

**३२५.३.** प्रमुख सचिव हे प्रमुखाध्यक्ष मंडळ व प्रमुख मंडळाशी सुसंगत राहातील.

**३२६. प्रमुख सचिवाची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेतः**

**३२६.१.** चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेड, प्रमुख मंडळ आणि प्रमुख परिषदेचे पदसिध्द सचिव म्हणून कार्य करणे आणि त्यांच्या सभांच्या नोंदी नमुद करून त्यांचे जतन करून ठेवणे. (३३१.२)

**३२६.२.** चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सामान्य आकडेवारीची नोंद करून तिचे जतन करून ठेवणे.

**३२६.३.** प्रमुख परिषदेच्या मालकीचे सर्व दस्तऐवज जतन करून ठेवणे आणि आपल्या उत्तराधिकाऱ्याला हस्तांतरीत करणे.

**३२६.४.** प्रमुख न्याय मंडळाचे सर्व कायमस्वरूपी दस्तऐवज आणि निर्णयांचे जतन करून ठेवणे. (६१४)

**३२६.५.** सेवकांचे दाखल केलेले, समर्पित केलेले, बडतर्फ केलेले आणि राजिनामा दिलेल्या प्रमाणपत्रांची तालिका तयार करून जतन करून ठेवणे आणि ज्या अनुक्रमाने सादर करणाऱ्या प्रांताने ते सादर केले होते त्याच अनुक्रमाने ते हस्तांतरीत करणे. (५३९-५३९.३, ५३९.८)

**३२६.६.** प्रांतिक आकडेवारीचे तक्ते तपासणे. (२२०.३)

**३२६.७.** प्रांतिक सनद प्राप्त झालेल्या व्यक्तींची नोंद ठेवणे.

**३२६.८.** प्रमुख परिषदेच्या सत्रांच्या कामाकाजाचे कार्यवृत्त प्रतिनिधींना उपलब्ध करून देणे.

**३२६.९.** बंधारण पुस्तकाची नवीनतम आवृत्ती उपलब्ध करून देणे.

**३२६.१०.** सचिवाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी इतर आवश्यक असलेल्या गोष्टींची विश्वासूपणे पूर्ती करणे.

**३२७.** प्रमुख सचिव प्रमुख मंडळीचे सर्व कायदेशीर दस्तऐवज विश्वासूरित्या सांभाळून ठेवतील.

**३२७.१.** चर्च ऑफ दी नॅझरीनच्या उदय आणि विकासाशी संबंधीत ऐतिहासिक माहिती जमा करण्याचा अधिकार प्रमुख सचिवांना असून ते त्यांचे रक्षकही आहेत.

**३२७.२.** परिच्छेद ९१३ नुसार प्रमुख सचिव हे ऐतिहासिक स्थाने आणि आणि खुणा ह्यांची नोंदवही ठेवतील.

**३२८.** प्रमुख अध्यक्षांच्यासह मिळून प्रमुख सचिव हे प्रमुख परिषद सुरू होण्याआधी पुढील बाबी तयार करतील: आवश्यक प्रपत्रे, त्याचप्रमाणे पुनरीक्षणाकरिता कामकाजाचे नियम "बंधारण पुस्तक" चा संक्षेप, आणि प्रमुख परिषदेचे कामकाज गतिशीलरित्या

होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या इतर बाबी. ह्या कार्याकरिता झालेल्या खर्चाची तरतूद प्रमुख परिषद खर्च निधीतून केली जाईल.

**३२८.१.** प्रमुख परिषद निवडेल तितके सहाय्यक प्रमुख सचिवास असू शकतात, किंवा प्रमुख परिषदेच्या सत्रांदरम्यानच्या काळात प्रमुखाध्यक्ष मंडळ सहाय्यकांची नियुक्ती करू शकतात.

## K. प्रमुख कोषाध्यक्ष

**३२९.** प्रमुख मंडळाच्या नियमावलीच्या तरतुदीनुसार, प्रमुख मंडळाने निवडलेला प्रमुख कोषाध्यक्ष पुढील प्रमुख परिषदेच्या अंतिम तहकुबीपर्यंत आणि त्याचा उत्तराधिकारी निवडून येऊन पात्र होईपर्यंत, किंवा परिच्छेद ७१७.५ नुसार बडतर्फ केल्या जाईपर्यंत कार्य करेल. (९००.३)

**३२९.१.** प्रमुख कोषाध्यक्ष हे प्रमुख परिषदेचे पदसिध्द सदस्य असतील. (३०१)

**३२९.२.** प्रमुख कोषाध्यक्ष हे जागतिक सेवा केंद्राच्या आर्थिक कार्यालयाचे अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष, प्रमुखाध्यक्ष मंडळ आणि प्रमुख मंडळाशी सुसंगत राहातील.

**३३०.** प्रमुख कोषाध्यक्षांची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेतः

**३३०.१.** चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सामान्य हितसंबंधातील निधींचे रक्षक असणे.

**३३०.२.** खालील समित्या व शाखांचे निधी स्वीकारणे व त्याचे वाटप करणे:

जागतिक व्यवस्थापन आणि अर्थ समिती, जागतिक शिक्षण व सेवक विकास समिती, जागतिक मिशन समिती, आणि प्रमुख मंडळाचे किंवा त्याच्या पुढील शाखा; प्रमुखाध्यक्ष मंडळ निधी; सामान्य आपात निधी; प्रमुख परिषद खर्च निधी; सामान्य हितकारी मंडळी निधी; जागतिक युवक संघ आंतरराष्ट्रीयचे निधी; जागतिक ख्रिस्तवार्ता संघ आंतरराष्ट्रीयचे निधी. (३३१.३)

**३३०.३.** प्रमुख मंडळाच्या निर्देशानुसार विश्वासार्ह जमानत कंपनीला कर्तव्यपूर्तीचे हमीपत्र देणे.

**३३०.४.** ज्या मंडळ व शाखांच्या निधींचे ते रक्षक आहेत त्यांना अहवाल सादर करणे.

**३३०.५.** प्रमुख मंडळाला चर्च ऑफ दी नॅझरीनचा, गुंतवणूकींसह वार्षिक आर्थिक अहवाल सादर करणे. (३३५.१२)

**३३०.६.** स्थावर मालमत्तेमध्ये गुंतविलेल्या वार्षिकी निधींना योग्य विमापत्रांद्वारे सुरक्षित करणे आणि अशा विमापत्रांच्या स्खलना विरूध्द तरतूद करणे.

## L. प्रमुख मंडळ

**३३१.** चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेड ही एक ना-नफा संस्था असून ती यु एस ए च्या मिसुरी राज्याच्या कायद्यांतर्गत नोंदणीकृत आहे. परिच्छेद ३३२.१-३३३.५ मध्ये तरतूद केल्या नुसार सुचविलेल्या नावांमधून प्रमुख परिषदेने मतपत्रिकेद्वारे निवडलेल्या सभासदांचे मिळून प्रमुख मंडळ तयार होते. प्रमुख मंडळावर मंडळीच्या विभागाचा प्रतिनिधी म्हणून निवडून येण्यासाठी ती व्यक्ती त्या विभागामध्ये वास्तव्यास असणारी आणि त्या विभागातील स्थानिक मंडळीची सभासद असली पाहिजे. (३०५.६, ३३४)

**३३१.१.** चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेडचा कुठलाही पगारी कर्मचारी किंवा चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेड द्वारे अनुदान प्राप्त करणाऱ्या शिक्षण संस्थेचा पगारी कर्मचारी, आणि प्रमुख मंडळीकडून कार्यकारी निधी प्राप्त करणाऱ्या प्रांत किंवा इतर सलग्न संस्थांचा कुठलाही व्यक्ती हा प्रमुख मंडळावर निवडून येण्यास आणि प्रमुख मंडळाचा सभासद बणून राहाण्यास अपात्र आहे.

**३३१.२.** प्रमुख सचिव हे चर्च ऑफ नॅझरीन इन्कार्पोरेटेड चे आणि प्रमुख मंडळाचे पदसिध्द सचिव असतील.

**३३१.३.** प्रमुख कोषाध्यक्ष हे चर्च ऑफ नॅझरीन इन्कार्पोरेटेड चे आणि प्रमुख मंडळाचे आणि त्याचप्रमाणे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या विविध शाखांचे सुध्दा पदसिध्द कोषाध्यक्ष असतील.

**३३२.** प्रमुख मंडळासाठी खालील तरतुदीनुसार नावे सुचविली जातील:

**३३२.१.** प्रमुख परिषदेकरिता प्रतिनिधी निवडून आल्यानंतर प्रत्येक फेज ३ प्रांतातील प्रतिनिधी हे एकत्र भेटतील आणि प्रमुख मंडळावर निवडून देण्यासाठी खालील पध्दतीने उमेदवारांची नावे सुचवितील. प्रत्येक फेज ३ प्रांत दोन नियुक्त दिक्षित सेवकांची व दोन सामान्य सभासदांची नावे सादर करतील. सुचविण्याकरिता नावांची निवड करतांना सुचविणाऱ्या प्रांतांची बहुसांस्कृतिक रचना विचारात घ्यावी. विभागिय सल्लागार समिती असणाऱ्या विभांगांकरिता, अशा उमेदवारांची नावे प्रथम राष्ट्रीय मंडळाकडे आणि नंतर विभागिय सल्लागार समितीकडे पाठविण्यात यावीत. ते कदाचित मतदान करणाऱ्या

मंडळाकरिता सुचविलेल्या नावांची संख्या तीन पर्यंत कमी करतील, आणि ह्यानंतर ती नावे त्वरीत प्रमुख सचिवाच्या कार्यालयाकडे पाठविण्यात येतील जेणेकरून ती नावे प्रमुख परिषदेच्या प्रत्येक विभागातील प्रतिनिधींसमोर मतपत्रिकेवर सादर करण्यात यावीत. (२०५.२३)

**३३२.२.** या उमेदवारांच्या यादीतून, प्रत्येक विभागातील प्रमुख परिषदेचे प्रतिनिधी हे प्रमुख परिषदेला खालीलप्रमाणे नावे सुचवितील:

१००,००० किंवा त्याहून कमी पूर्ण सभासद संख्या असलेला प्रत्येक विभाग एका नियुक्त दिक्षित सेवकाचे व एका सामान्य सभासदाचे नाव सुचवेल; ज्या प्रत्येक विभागामध्ये १००,००० पेक्षा जास्त आणि २००,००० पर्यंत पूर्ण सभासद संख्या असेल ते दोन नियुक्त दिक्षित सेवकांचे, एका प्रांताध्यक्षाचे आणि एका पाळकाचे किंवा सुवार्तिकाचे आणि दोन सामान्य सभासदांचे नाव सुचवितील; त्याचप्रमाणे खालील तरतुदींनुसार २००,००० पेक्षा जास्त सभासद असणाऱ्या विभागांना एका अतिरिक्त सामान्य सभासदाचे व अतिरिक्त नियुक्त दिक्षित सेवकाचे नाव सुचविता येईल:

ज्या विभागाची सभासदांची संख्या २००,००० पूर्ण सभासदांपेक्षा जास्त आहे त्यांच्याकरिता एक नियुक्त दिक्षित सेवक जो पाळक किंवा सुवार्तिक असेल, आणि दुसरा प्रांताध्यक्ष असेल, तिसरा नियुक्त दिक्षित सेवक ह्यापैकी कुठल्याही वर्गाचा असू शकतो. कोणत्याही प्रांताला प्रमुख मंडळावर दोन पेक्षा जास्त सभासदांचा हक्क असणार नाही आणि कोणत्याही विभागाला सहा पेक्षा जास्त सभासदांचा (संस्थात्मक प्रतिनिधी आणि जागतिक ख्रिस्तवार्ता संघ (एन एम आय) आणि जागतिक युवक संघ (एन वाय आय चे सभासद ह्याला अपवाद असतील) हक्क असणार नाही. जेव्हा एखाद्या प्रांतातील दोन पेक्षा जास्त उमेदवारांना इतर प्रांतातील किंवा विभागातील उमेदवारांपेक्षा जास्त मते मिळतात, तेव्हा दुसऱ्या प्रांतातील पुढील सर्वोच्च मत प्राप्त होणाऱ्यांची नावे ही विभागाकडून निवडण्यात येतील.

प्रत्येक विभागातील सामान्य सभासदे, पाळक किंवा सुवार्तिक, आणि/किंवा प्रांताध्यक्ष ज्यांना त्यांच्या वर्गवारीमध्ये सर्वोच्च मत्ते प्राप्त होतील त्यांची नावे बहुमताने प्रमुख परिषदेकरिता सुचविण्यात येतील. मतदारांची संख्या जास्त असेल. मोठ्या विभागांच्या संदर्भात जिथे सहा सभासद निवडावयाचे आहेत, तिथे पुढील सर्वोच्च मत प्राप्त करणारे सामान्य सभासद आणि दिक्षित सेवक ह्यांची नावे अतिरिक्त उमेदवार म्हणून सुचविण्यात येतील.

जर विभागिय सल्लागार समितीने असे ठरविले की बहुतांश निवडलेल्या प्रतिनिधींना प्रमुख परिषदेला उपस्थित राहाण्यास प्रतिबंध होणार आहे, तर प्रमुख परिषद भरण्याच्या सहा महिने आधीपर्यंतच्या कालावधीमध्ये पोस्ट किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून विभागिय मंडळाचे मतदान आयोजित केले जाऊ शकते. प्रमुख मंडळाकरिता ह्या पोस्टल किंवा इलेक्ट्रॉनिक नामांकनाची विशिष्ट प्रक्रिया ही विभागिय सल्लागार समिती सुचवेल आणि अंमलबजावणीपूर्वी प्रमुख सचिवाच्या कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर केली जाईल. (३०५.६, ९०१)

**३३२.३.** आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ (आय बी ओ ई) हे प्रमुख परिषदेला शैक्षणिक संस्थांमधील चार व्यक्ती, म्हणजे दोन नियुक्त दिक्षित सेवक आणि दोन सामान्य सभासद अशी नावे सुचवेल. प्रमुख परिषद एक नियुक्त दिक्षित सेवक आणि एक सामान्य सभासद प्रमुख मंडळाकरिता निवडेल. (३३१.१)

**३३२.४.** आंतरराष्ट्रीय नॅझरीन युवक संघाची जागतिक समिती नवीन निवडून आलेल्या जागतिक एन वाय आय समितीच्या अध्यक्षाचे नाव प्रमुख परिषदेला सुचवेल. नवीन निवडून आलेले जागतिक एन वाय आय समितीचे अध्यक्ष जर प्रमुख मंडळावर काम करू शकत नसतील तर जागतिक एन वाय आय समिती ही जागतिक एन वाय आय समितीच्या एका सभासदाचे नाव सुचवू शकेल. (३४३.४)

**३३२.५.** आंतरराष्ट्रीय नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघाची जागतिक समिती नवीन निवडून आलेल्या जागतिक एन एम आय समितीच्या अध्यक्षाचे नाव प्रमुख परिषदेला सुचवेल. प्रमुख परिषद एक प्रतिनिधी प्रमुख मंडळासाठी निवडेल. (३४४.३)

**३३२.६.** आंतरराष्ट्रीय रविवारीय शास्त्रशिक्षण शाळा आणि शिष्यत्व सेवा (एस डी एम आय) चे विभागिय समन्वयक आणि जागतिक एस डी एम आय चे संचालक एका व्यक्तीचे नाव प्रमुख परिषदेला सुचवितील. प्रमुख परिषद एक प्रतिनिधी प्रमुख मंडळासाठी निवडेल.

**३३३. प्रमुख मंडळाकरिता निवडणुका खालील तरतुदीप्रमाणे होतील:**

**३३३.१.** विविध विभागांनी सुचविलेला प्रत्येक सभासद हा प्रमुख परिषदेद्वारे “होय” अशा मतपत्रिकेच्या बहुमताने निवडला जाईल.

**३३३.२.** आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाने सादर केलेल्या नावांपैकी, प्रमुख परिषद दोन जनांची निवड करेल, त्यापैकी एक नियुक्त दिक्षित सेवक आणि एक सामान्य सभासद असेल.

**३३३.३.** आंतरराष्ट्रीय नॅझरीन युवक संघाच्या जागतिक समितीने सादर केलेले नाव प्रमुख परिषद "होय" अशा मतपत्रिकेच्या बहुमताने निवडेल. (३४३.४, ९०३)

**३३३.४.** आंतरराष्ट्रीय ख्रिस्तवार्ता संघाच्या जागतिक समितीने सादर केलेले नाव प्रमुख परिषद "होय" अशा मतपत्रिकेच्या बहुमताने निवडेल. (३४३.४, ९०४)

**३३३.५.** विभागिय एस डी एम आय समन्वयकांनी आणि जागतिक एस डी एम आय संचालकाने सादर केलेले नाव प्रमुख परिषद "होय" अशा मतपत्रिकेच्या बहुमताने निवडेल. (३३२.६)

**३३४.** प्रमुख मंडळाचे सभासद पुढील प्रमुख परिषदेची अंतिम तहकूब होईपर्यंत आणि त्यांचे उत्तराधिकारी निवडून येउन पात्र होईपर्यंत कार्यभार सांभाळतील. ज्या वेळी प्रमुख मंडळाचा सभासद त्याच्या मंडळीचे सभासदत्व किंवा त्याचे वास्तव्याचे ठिकाण तो प्रतिनिधित्व करीत असलेल्या विभागातून बदलतो, किंवा एखादा सेवक सभासद ज्या सेवेच्या जबाबदारी करिता तो निवडून आलेला आहे ती बदलतो, किंवा एखाद्या सेवक सभासदाची नियुक्ती रद्द केली जाते, किंवा ले सभासद विनंती करून प्रांतिक सनद स्वीकारतो, तेव्हां त्याचे/तिचे सभासदत्व त्वरीत रद्द होते. रिक्त झालेली जागा तातडीने भरल्या जाईल. (३३१)

**३३४.१.** प्रमुख मंडळाच्या सभासदत्वामध्ये जागा रिक्त झाल्यास व त्यामुळे त्याच्या समित्यांच्या सभासदत्वामध्ये जागा रिक्त झाल्यास त्या जागा प्रमुखाध्यक्ष मंडळाद्वारे नामांकने देऊन भरल्या जातील. प्रमुख मंडळ प्रमुख सचिवाकडे दोन पात्र नावे सादर करतील. ही दोन नावे विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विभागाच्या प्रांतातील प्रांतिक सल्लागार मंडळामध्ये पद रिक्त झाले आहे त्यांच्या प्रांतामधून असतील व ते बहुमताने एकाची निवड करतील. फेज २ व फेज ३ च्या प्रांतांना प्रत्येकी एक मतास पात्र आहेत. शैक्षणिक प्रतिनिधित्वाकरिता एकाची बहुमताने निवड करण्यासाठी प्रमुख मंडळाकडे नामांकने सादर करण्यात येतील. एन वाय आय च्या प्रतिनिधित्वाकरिता एकाची बहुमताने निवड करण्यासाठी एन वाय आयच्या जागतिक समितीकडे नामांकने सादर करण्यात येतील. एन एम आय च्या प्रतिनिधित्वाकरिता एकाची बहुमताने निवड

करण्यासाठी अख्त्यारी प्रमुखाध्यक्षाशी सल्लामसलत करून व प्रमुखाध्यक्ष मंडळाच्या परवानगीने एन एम आय च्या जागतिक समितीकडे नामांकने सादर करण्यात येतील. एस डी एम आय च्या प्रतिनिधित्वाकरिता एकाची बहुमताने निवड करण्यासाठी प्रमुख मंडळाकडे नामांकने सादर करण्यात येतील. (३३२.३-३३२.६)

**३३५. प्रमुख मंडळाची कर्तव्ये.** प्रमुख मंडळ हे चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेड चे संचालक मंडळ म्हणून कार्य करेल व मंडळाला गैर-मंडळीत्मक धोरणे व योजनांसंबधी प्राथमिक अधिकार असेल. प्रमुख मंडळ सर्व राष्ट्रीय, विभागीय, प्रांतिक व स्थानिक मंडळांना चर्च ऑफ दी नॅझरीनच्या उद्दिष्टाची पूर्ती करण्यास प्रोत्साहन देऊन त्याच्या पूर्तीची अपेक्षा करेल. चर्च ऑफ दी नॅझरीनचे उद्दिष्ट आहे वेस्लीय परंपरेनुसार राष्ट्रांमध्ये ख्रिस्तसादृष्य शिष्य बनवून ख्रिस्ती पवित्रतेचा प्रचार करणे. त्याच प्रमाणे मंडळ हे जागतिक मंडळीची प्रत्येक विभाग व राष्ट्रामध्ये प्रगती होण्याची सुविधा करेल. प्रमुख मंडळ, प्रमुख परिषदेने दिलेल्या निर्देशांच्या अधीन राहून चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेडच्या सर्व समित्यांच्या आर्थिक व भौतिक बाबींचा पुरस्कार करेल. घटक समित्यांच्या योजना व उपक्रमांमध्ये समन्वय साधने, परस्पर संबंध जुळवने आणि एकीकरण करणे जेणेकरून चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेडच्या सर्व उपक्रमामध्ये व उपक्रमांद्वारे एकीकृत धोरण प्रस्थापित केल्या जाईल. चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेडच्या सर्व शाखांच्या व संबंधित संस्थांच्या आर्थिक खात्यांची लेखापरीक्षा करण्याचे निर्देश देण्याचा प्रमुख मंडळाला अधिकार असेल. त्याचप्रमाणे मंडळ चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेडच्या व त्याशी कायद्यान्वये संबंधीत संस्थांच्या कामकाज व व्यवस्थापकीय बाबींना निर्देश देईल. ह्या सर्व शाखा व संस्था प्रमुख मंडळाच्या सल्ला व शिफारसींचा यथायोग्य विचार करतील.

**३३५.१.** प्रमुख मंडळाकडे खरेदी करणे, मालक होणे, ताब्यात ठेवणे, व्यवस्थापन करणे, गहाण ठेवणे, विक्री करणे, हवाली करणे किंवा बक्षीस करणे, किंवा अन्यथा विकलेली, विकण्यास काढलेली, मृत्युपत्राने दान केलेली, अनुदान दिलेली किंवा अन्यथा चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेडच्या हवाले केलेली स्थावर आणि वैयक्तिक मालमत्ता संपादन करणे, बोजाग्रस्त करणे, किंवा त्याची विल्हेवाट लावण्याचे अधिकार असतील. हे सर्व प्रमुख मंडळ कायदेशीर कारणास्तव विश्वासाने करेल आणि चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेडच्या कायदेशीर उद्देशांकरिता कर्ज घेणे आणि कर्ज देण्यामध्ये सुध्दा तोच विश्वास बजावेल.

**३३५.२.** परिच्छेद ३६१ आणि ३०५.२ नुसार प्रमुखाध्यक्ष मंडळामध्ये रिक्त झालेली जागा प्रमुख मंडळ भरेल.

**३३५.३.** प्रमुख मंडळ प्रमुख परिषदेच्या अंतिम तहकूबी पूर्वी किंवा तहकूब झाल्याबरोबर त्वरीत बैठक घेऊन संघटीत होतील आणि संस्थेच्या नियमावलीनुसार अपेक्षीत समित्यांची व त्यांचे अधिकारी आणि समित्यांचे सभासद चतुर्वर्षाकरिता आणि त्यांचे उत्तराधिकारी निवडून येऊन पात्र होईपर्यंतच्या कालावधीकरिता निवडून देतील. प्रमुखाध्यक्ष हे प्रमुख मंडळाच्या बैठकीचे अध्यक्ष असतील.

**३३५.४. बैठका.** प्रमुख परिषदांच्या दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रमुख मंडळाची बैठक सत्रांमध्ये कमीतकमी तीन वेळेस होईल. प्रमुख मंडळाच्या नियमावलीमध्ये नमूद केलेल्या वेळी व ठिकाणी किंवा प्रमुख मंडळाच्या नियमीत किंवा विशेष सभेमध्ये प्रमुख मंडळाच्या व त्याच्या समित्यांच्या सर्वोच्च हितास पूरक अशा सर्वानुमते स्वीकारलेल्या वेळ, तारीख व ठिकाणी ह्या बैठका होतील.

**३३५.५.** प्रमुख मंडळाची विशेष सभा प्रमुखाध्यक्ष मंडळ, अध्यक्ष किंवा सचिव हे बोलावू शकतील.

**३३५.६. जागतिक सुवार्ताप्रसार निधी.** चर्च ऑफ दी नॅझरीनची प्रत्येक स्थानिक मंडळी ही, "राष्ट्रांमध्ये ख्रिस्तसादृष्य शिष्य बनविणे..." ह्या जागतिक प्रयत्नांचा भाग आहे. चर्च ऑफ दी नॅझरीन जागतिक सुवार्ताप्रसार निधीचा उपयोग प्रमुख उद्दीष्ट व त्याशी संबंधीत उपक्रमांच्या साहाय्यासाठी, त्याचा प्रतिपाळ करण्यासाठी आणि त्याच्या प्रचारासाठी करू शकेल. प्रमुख मंडळीचे वार्षिक अर्थसंकल्प हे प्रमुख मंडळीच्या शाखा व संस्थांद्वारे पुरविलेल्या माहिती सहीत प्रस्तावित योगदान आणि प्रमुख कोषाध्यक्षांच्या आर्थिक विधानांवर विचार करून ठरविल्या जाईल. जागतिक सुवार्ता प्रसार निधी मधून प्रत्येक शाखा व निधींना किती रक्कम वाटप केली जावी ह्याबद्दलचा निर्णय प्रमुख मंडळ वेळो वेळी करेल. जेव्हा अशा वाटपांवर सहमती दर्शविली जाते, तेव्हा प्रमुख मंडळाने अंतिम मान्यता देण्यापूर्वी ते प्रमुखाध्यक्ष मंडळाकडे विचार करण्यासाठी, सल्ले देण्यासाठी किंवा सुधारणा करण्यासाठी सादर केले जातील.

**३३५.७.** स्थानिक मंडळ्यांना जागतिक सुवार्ताप्रसार निधीचे आर्थिक उद्दीष्ट व जबाबदाऱ्या प्रस्थापित करण्याकरिता प्रमुख मंडळ आणि प्रमुखाध्यक्ष मंडळाला अधिकार व परवानगी आहे. (१३०, ३१७.१०)

**३३५.८.** कोणत्याही शाखा किंवा निधीने विनंती केलेली रक्कम वाढविणे किंवा कमी करण्याचा अधिकार प्रमुख मंडळाला असेल. प्रमुख परिषदेने स्वीकारलेल्या आर्थिक बाबी प्रमुख मंडळाकडे पाठवल्या जातील. प्रमुख मंडळाला वर्तमान आर्थिक परिस्थितीनुसार प्रमुख मंडळीच्या एकूण आर्थिक बांधिलकीशी सुसंगतता राखून मंडळीच्या कुठल्याही संस्थेचे किंवा शाखेचे वाटप योग्य प्रमाणात समायोजित करण्याचा अधिकार असेल.

**३३५.९.** नॅझरीन थियॉलॉजिकल सेमिनरी (यूएसए) आणि नॅझरीन बायबल कॉलेज (यूएसए) द्वारे जागतिक सुवार्ताप्रसार निधींमधून केलेल्या मागण्यांना निधीच्या उपलब्धतेच्या प्रकाशात जसे उचीत वाटेल तसे प्रमुख मंडळ मान्यता देईल.

**३३५.१०.** प्रमुख मंडळ हे प्रमुख परिषदांच्या दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रमुखाध्यक्षांचे पगार व त्याशी संबंधीत लाभ ह्यांचे वार्षिक पुनरावलोकन करून त्यामध्ये योग्य प्रमाणात समायोजन करेल.

**३३५.११. अहवाल.** प्रमुख मंडळ, त्याच्या नियमीत बैठकीमध्ये विभागांच्या मागील वर्षाच्या कामकाजाचा सविस्तर अहवाल, आर्थिक अहवालासह प्राप्त करेल. प्रत्येक विभाग पुढील वर्षासाठी प्रस्तावित खर्चाचे अंदाजपत्रक देखील सादर करेल.

**३३५.१२.** मागील वर्षात प्रमुख कोषाध्यक्ष ज्या सर्व निधींचा रक्षक होता/होती त्याचा जमा-खर्चाचा सविस्तर अहवाल प्रतिवर्षी प्रमुख मंडळाकडे सादर करेल. त्यामध्ये संस्थेचे निधी आणि गुंतवणूकी व चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेडच्या शाखांच्या अर्थसंकल्पात समाविष्ट नसलेल्या पुढील वर्षाच्या प्रस्तावित निधींच्या खर्चाचे सविस्तर विधान समाविष्ट असेल. प्रमुख कोषाध्यक्ष त्याच्या कार्यालयीन कर्तव्यांची विश्वासुरित्या पूर्ती करण्यास प्रमुख मंडळाला जबाबदार राहील. (३३०.५)

**३३५.१३.** प्रमुख मंडळ प्रमुख परिषदेच्या अंतिम तहकूबी पूर्वी किंवा तहकूब झाल्याबरोबर त्वरीत बैठक घेऊन प्रमुख मंडळाच्या नियमावलीत दिलेल्या तरतूदीनुसार प्रमुख सचिव आणि प्रमुख कोषाध्यक्षाची निवड करतील आणि ते आपले पदभार पुढील प्रमुख परिषदेच्या तहकूबीपर्यंत आणि त्यांचे उत्तराधिकारी निवडून येऊन पात्र होईपर्यंत सांभाळतील.

**३३५.१४.** युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका ह्या विभागांचे प्रतिनिधित्व करणारे प्रमुख मंडळाचे सभासद, निवृत्ती आणि लाभ यूएसए या मंडळाची निवड करतील. हे मंडळ

युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकेच्या प्रत्येक विभागाचे प्रतिनिधित्व करणारा एक सभासद आणि एक जादा सभासद मिळून बनलेले असेल. निवृत्ती आणि लाभ यूएसए या मंडळाच्या नियमावलीत दिलेल्या तरतूदीनुसार प्रमुखाध्यक्ष मंडळ नामांकने सादर करील. ( ३३७).

**३३५.१५.** प्रत्येक प्रमुख परिषदेनंतर प्रमुख मंडळ नॅझरीन पब्लिशींग हाऊस मंडळाची निवड करेल आणि ते मंडळ पुढील प्रमुख परिषदेच्या तहकूबीपर्यंत आणि त्यांचे उत्तराधिकारी निवडून येऊन पात्र होईपर्यंत सेवा करेल.

**३३५.१६.** प्रमुख मंडळाच्या कार्यसूचीमधील एखादी बाब केवळ एखाद्या विशिष्ट विभागावर/राष्ट्रावर परिणामकारक असल्यास, ती बाब प्रमुख मंडळाच्या कार्यकारी समितीच्या व प्रमुखाध्यक्ष मंडळाच्या मान्यतेनंतर परिणाम होणाऱ्या विभागाच्या/राष्ट्राच्या प्रमुख मंडळ सभासदांच्या सभेकडे सादर करण्यात येईल.

**३३५.१७.** प्रमुख परिषदेने किंवा प्रमुख मंडळाने अधिकृत केलेल्या कुठल्याही आयोग किंवा समितीचा संबंध प्रमुख मंडळ एखाद्या शाखेशी (शाखांशी) किंवा संपूर्ण मंडळाशी लावून त्यांना काम, जबाबदारी आणि खर्च नियुक्त करू शकेल.

**३३५.१८. शाखा संचालक.** प्रमुख मंडळ चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेड च्या शाखांच्या संचालकांची निवड प्रमुख मंडळाच्या नियमावलीत आणि प्रमुख मंडळाच्या धोरण पुस्तिकेमध्ये तरतूद केलेल्या प्रक्रियांनुसार करेल. निवडून आलेले संचालक पदावरून निलंबीत केल्याचा अपवाद वगळता पुढील प्रमुख परिषदेच्या अंतिम तहकूबीपर्यंत आणि त्यांचे उत्तराधिकारी निवडून येईपर्यंत सेवा करतील. (३१७.५)

**३३५.१९.** शाखांच्या संचालकांचे नामांकन खालील प्रक्रियेनुसार केले जाईल: एखादा विद्यमान संचालक असल्यास, नामसुचक समिती "होय" किंवा "नाही" मताची शिफारस करू शकते किंवा एकापेक्षा अधिक नावे सादर करू शकते. या पदांसाठी सक्षम उमेदवारांचा शोध प्रमुख मंडळाच्या नियमावलीमधील तरतूदीनुसार शोध समितीद्वारे घेण्यात येईल. ही समिती दोन किंवा अधिक नावे नामसुचक समितीकडे त्यांच्या शिफारशीला पाठिंबा देण्यास समर्थनीय युक्तिवादासह आणेल.

नामसुचक समिती सहा प्रमुखाध्यक्ष आणि लाभार्थी समितीद्वारे कर्मचारी समिती यांची बनलेली असेल व ती समिती प्रमुख मंडळाच्या नियमावलीत केलेल्या तरतूदीनुसार निवड करण्याकरिता प्रमुख मंडळाकडे एक किंवा अधिक नावे सादर करील.

**३३५.२०. अधिकारी वर्गाचे पगार**. प्रमुख मंडळ “कामगिरी मूल्यांकन” दस्त आणि वेतन व्यवस्थापन कार्यक्रम स्थापन करेल. ह्यामध्ये शाखा संचालक, सेवा संचालक ह्यांचा समावेश असेल आणि हा कार्यक्रम अशा वेतन रचनेची तरतूद करेल की जी जबाबदारी आणि गुणवत्ता ह्या दोन्ही बाबी ओळखू शकेल. प्रमुख मंडळ त्यांनी निवडून अधिकृत केलेल्या शाखांच्या संचालकांचे व इतर अधिकाऱ्यांचे पगारांचे दर वर्षी पुनरावलोकन करेल व मान्यता देईल.

**३३५.२१.** प्रमुख परिषदांच्या दरम्यान परिच्छेद ३३५.१३ आणि ३३५.१८ मध्ये नमुद पदे रिक्त झाल्यास किंवा प्रमुख परिषद, प्रमुख मंडळ किंवा त्यांच्या निवडलेल्या समित्यांनी निर्माण केलेली पदे परिच्छेद ३१७.४ मधील प्रमुख मंडळाच्या नियमावलीमधील तरतूदीनुसार प्रमुख मंडळ भरू शकेल.

**३३६.** परिच्छेद ३३५.१३ आणि ३३५.१८ मध्ये नमूद केलेले सर्व अधिकारी आणि कोणत्याही संचालक, आणि चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेड द्वारा नियुक्त कोणताही संस्था प्रमुख ह्यांची निवृत्ती त्यांच्या ७० व्या वाढदिवसानंतर होणाऱ्या प्रमुख मंडळाच्या बैठकीच्या वेळी होईल. जेथे रिक्त जागा आहेत, त्या बंधारण पुस्तकात नमुद प्रक्रियेनुसार भरल्या जातील.

## M. निवृत्ती वेतन योजना

**३३७.** निवृत्ती वेतन मंडळ किंवा त्याशी समतुल्य मंडळ असेल जे प्रत्येक मंडळीशी संबंधित निवृत्ती वेतन योजनेसाठी विश्वासार्ह जबाबदारी बाळगेल. गरजेनुसार निवृत्ती वेतन योजना ही संस्थात्मक, प्रांत, बहुप्रांत, राष्ट्र, विभाग, बहुविभाग स्तरावर लागू करता येईल. (३३५.१४)

**३३७.१.** प्रमुख मंडळ हे जगभरातील निवृत्ती वेतन योजनेस पुरक अशी सुचिवलेली मार्गदर्शक तत्वे स्थापन करून त्यांचा प्रतिपाळ करेल. प्रमुख मंडळ हे निवृत्ती वेतन योजनेमध्ये घट किंवा अवमुल्यन न होण्याची हमी देत नाही. कुठल्याही निवृत्ती वेतन योजनेमधून एखाद्या व्यक्तीला देय झालेली रक्कम देण्याची हमी प्रमुख मंडळ देत नाही, तसेच निवृत्ती वेतन योजनेमध्ये निधीच्या अपुऱ्या तरतुदीकरिता देखील प्रमुख मंडळ जबाबदार राहाणार नाही (३२.५).

**३३७.२.** सर्व निवृत्ती वेतन योजना निवृत्ती वेतन आणि लाभ आंतरराष्ट्रीय च्या माध्यमातून विनंती केलेल्या प्रकार आणि स्वरूपात प्रमुख मंडळाला वार्षिक अहवाल सादर करतील. (३२.५)

## N. चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेडच्या सहाय्यक संस्था

**३३८.** चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेडच्या सहाय्यक संस्था पुढील तत्त्वानुसार संघटित आणि शासित केल्या जातीलः

a. एकमेव सदस्य

i. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका मध्ये सर्व नोंदणीकृत संस्थांपैकी एकमेव सभासद संस्था ही "चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेड ही असेल."

b. संचालक मंडळाचे सभासद

i. संघटन- प्रत्येक संस्था त्यांची गरज व उद्देशानुसार योग्य प्रमाणात संचालकांची संख्या निश्चित करेल. किमान अपेक्षा खालील प्रमाणे आहेत:

1. प्रमुखाध्यक्ष मंडळाचा एक संचालक हा पदसिध्द सभासद असेल.

2. चर्च ऑफ दी नॅझरीनचा एक वरिष्ठ कर्मचारी हा प्रमुखाध्यक्ष मंडळाने नियुक्त केलेला असेल.

ii. सर्व संचालकांचे नामांकन प्रमुखाध्यक्ष मंडळाने संस्थेच्या इतर संचालकांशी सल्लामसलत करून केलेले असेल.

iii. एकमेव सभासद संस्थेच्या वतीने कार्यरत असलेल्या प्रमुखाध्यक्ष मंडळाने सर्व संचालकांची निवड केलेली असावी.

iv. बडतर्फी: एकमेव सभासद संस्थेच्या वतीने कार्यरत असलेल्या प्रमुखाध्यक्ष मंडळ त्यांच्या मताने कुठल्याही संचालकाला कुठल्याही वेळी त्या कारणास्तव बोलाविलेल्या विशेष सभेमध्ये बडतर्फ करू शकेल.

c. अधिकारी व कार्यकारी: अधिकाऱ्यांची संख्या व शिर्षके ही प्रत्येक संस्थेच्या नियमावलीनुसार प्रत्येक संस्था निश्चित करू शकेल.

d. संस्थेच्या बैठका:

   i. एकमेव सभासद संस्थेच्या बैठका ह्या वेळो वेळी एकमेव सभासद (चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेड) द्वारे ठरविलेल्या तारीख व ठिकाणी होतील.

   ii. संचालकांच्या सभा संस्थेच्या निर्णयाने होतील.

e. संस्थेचे कार्यकारी अधिकारी: सहाय्यक संस्थेच्या नियमावलीनुसार निवडले आणि काढले जातात.

f. कामकाजाचे वर्षः सर्व सहाय्यक संस्थां ह्या चर्च ऑफ दी नॅझरीन इन्कार्पोरेटेडच्या कामाकाजाचेच वर्ष हे आपल्या कामाकाजाचे वर्ष म्हणून स्वीकारतील.

g. विघटनः संस्थेचे विघटन झाल्यानंतर त्याची सर्व मालमत्ता एकमेव सदस्याच्या नावे केली जाईल.

h. संस्थेची कलमे आणि नियमावली:

   i. सहाय्यक संस्था ही एकमेव सभासदाच्या प्रमुख मंडळाच्या दोन-तृतियांश मताने प्रस्थापित करता येईल. संस्थेची कलमे आणि नियमावली ही एकमेव सभासदाच्या प्रमुख मंडळाच्या मान्यतेच्या अधीन असेल.

   ii. संस्थेच्या संचालक मंडळाच्या दोन-तृतियांश मताने सुधारनांचा प्रस्ताव केला जाऊ शकेल आणि ते एकमेव सभासदाच्या प्रमुख मंडळाच्या मान्यतेच्या अधीन असेल.

## O. नॅझरीन पब्लिशिंग हाऊस

**३३९.** नॅझरीन पब्लिशिंग हाऊसचा उद्देश हा चर्च ऑफ दी नॅझरीनच्या आणि मंडळीच्या उद्देशाशी सुसंगत असणाऱ्या इतर ख्रिस्ती बाजारपेठांच्या हितार्थ सामग्री प्रकाशीत किंवा अन्यथा सामग्रीचे निर्माण, व्यापार आणि व्यवस्थापन करणे हा आहे. चर्च ऑफ दी नॅझरीन व त्याशी सलग्न संस्थांद्वारे उपयोगात अणल्या जाणाऱ्या प्रसार साधनांचे संरक्षण व व्यवस्थापन व्हावे म्हणून चर्च ऑफ दी नॅझरीन हे नॅझरीन पब्लिशिंग हाऊस ला ह्या प्राथमीक जबाबदाऱ्या सोपविते.

## P. प्रमुख ख्रिस्ती कृती समिती

**३४०.** प्रमुख परिषदेनंतर प्रमुखाध्यक्ष मंडळ प्रमुख ख्रिस्ती कृती समितीची नेमणूक करील, समितीचे एक सभासद प्रमुख सचिव असतील आणि ते समितीच्या कामाकाजाचा अहवाल प्रमुख मंडळाला सादर करतील. सुपरिटेंडंट्स बोर्ड एक प्रमुख क्रिश्चियन ॲक्शन कमीटीची नेमणूक करेल, त्यातील एक सरचिटणीस असेल, जो समितीच्या कार्याचा अहवाल प्रमुख मंडळला देईल.

## प्रमुख ख्रिस्ती कृती समितीची कर्तव्ये खालील प्रमाणे आहेतः

**३४०.१.** मद्य, तंबाखू, अंमली पदार्थ, जुगार आणि इतर प्रचलीत नैतिक आणि सामाजिक समस्यांबाबत बांधणीत्मक माहिती मंडळीच्या सिध्दांताशी सुसंगत अशी विकसीत करणे, आणि चर्च ऑफ दी नॅझरीनच्या दळणवळण प्रणालीद्वारे त्याचा प्रसार करणे.

**३४०.२.** विवाह आणि ख्रिस्ती गृहाच्या पवित्रतेवर जोर देणे आणि घटस्फोटाच्या समस्या आणि वाईटावर प्रकाश टाकणे. विशेष करून, समितीने विवाहाबाबतच्या पवित्र शास्त्रोक्त योजनेवर केवळ मृत्यूद्वारे खंडित होणारा आजीवन करार म्हणून जोर द्यावा.

**३४०.३.** नागरी आणि सामाजिक नीतिमत्वासाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये लोकांना पुढारीपणाच्या पदांवर सेवा करण्यास प्रोत्साहित करणे.

**३४०.४.** लोकांना देवाचा दिवस पाळणे, गुप्त शपथ बध्द आदेश, ख्रिस्ती नैतिकतेला विध्वंसक असणाऱ्या करमणूकी आणि इतर जगिकता ह्या बाबत जागृत करणे. (२९.१)

**३४०.५.** प्रत्येक प्रांताला ख्रिस्ती कृती समितीची स्थापना करण्यास साहाय्य व प्रोत्साहन देणे आणि प्रत्येक प्रांतिक समितीला प्रचलित नैतिक समस्यांबाबत माहिती प्रत्येक स्थानिक मंडळीपर्यंत पोहोंचविण्याकरिता पुरवून देणे.

**३४०.६.** राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महत्त्व असलेल्या नैतिक समस्यांवर लक्ष ठेऊन पवित्र शास्त्रोक्त दृष्टिकोण प्रदान करणे.

## Q. ईश्वर पाचारीत सुवार्तिक हित समिती

**३४१.** ईश्वर पाचारीत सुवार्तिक हित समिती गठीत करण्यात यावी आणि संजीवन संचालक त्याचे पदसिध्द अध्यक्ष राहातील, समितीचे इतर सभासद चार नियुक्त

सुवार्तिक आणि एक पाळक असतील. यूएसए/कॅनडा कार्यालय संचालक हे संजीवन संचालकाशी सल्लामसलत करून समितीकरिता नावांची यादी प्रमुखाध्यक्ष मंडळाकडे मान्यता व नियुक्ती करिता सादर करतील. समिती किंवा समितीचे प्रतिनिधी हे संबंधीत प्रांतिक परिषदेने "नियुक्त सुवार्तिक" पदाकरिता शिफारस केलेल्या अधिकृत सुवार्तिकाची वैयक्तिक मुलाखत घेतील. ही समिती चर्च ऑफ दी नॅझरीनमधील प्रवासी सुवार्ताप्राराच्या अवस्थेचे सुध्दा पुनरावलोकन करतील आणि संजीवन व सुवार्तिक ह्या दोहोंबाबत प्रमुख मंडळाच्या उचित समितीला शिफारस करतील. प्रमुखाध्यक्ष मंडळ यूएसए/कॅनडा कार्यालय संचालकांनी संजीवन संचालकाशी सल्लामसलत करून शिफारस केलेल्या नावांमधून रिक्त झालेल्या जागा भरेल. (३१७.७, ५१०.३)

## R. आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समिती

**३४२.** प्रमुख परिषदेनंतर जागतिक सेवक विकास संचालक हे विभागिय शिक्षण संचालकाशी सल्लामसलत करून आंतरराष्ट्रीय अभ्याक्रम सल्लागार समितीवर काम करण्यासाठी नावांची यादी सादर करेल. नावांमध्ये पाळकीय, व्यवस्थापकीय, शैक्षणिक आणि सामान्य प्रतिनिधी असू शकतील. ह्या समितीच्या सभासदांनी प्रामुख्याने जागतिक मंडळीचे प्रतिनिधीत्व करावे. प्रमुखाध्यक्ष मंडळ आंतरराष्ट्रीय अभ्याक्रम सल्लागार समितीची चार वर्षाकरिता सेवा करण्यास नियुक्ती करेल.

आंतरराष्ट्रीय अभ्याक्रम सल्लागार समितीची बैठक जागतिक सेवक विकास संचालकांनी ठरविलेल्या ठिकाणी प्रत्येक दोन वर्षातून कमीत कमी एकदा तरी भरेल. (५२९१-५२९.२,५२९.५)

## S. जागतिक युवक संघ आंतरराष्ट्रीय

**३४३.** नॅझरीन युवक सेवा जागतिक स्तरावर एन वाय आय, एन वाय आय घोषणापत्र यांच्या विद्यमाने आणि एन वाय आय व प्रमुख मंडळाकरिता अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांच्या अधिकाराने संघटीत होते. जागतिक एन वाय आय चे संघटन हे जगभरातील एन वाय आयचे सभासद, स्थानिक गट आणि प्रांतिक संस्था यांचे मिळून बनते. प्रमुख परिषदेने मान्य केलेल्या एन वाय आय जागतिक सेवा योजना आणि एन वाय आय घोषणापत्रा द्वारे जागतिक एन वाय आय चे शासन चालते.

**३४३.१.** प्रमुखाध्यक्ष मंडळाने जागतिक एन वाय आय समितीशी चर्चा करून ठरविलेल्या वेळी एन वाय आय चे जागतिक अधिवेशन दर चार वर्षांनी भरेल. हे चातुर्वार्षिक अधिवेशन एन वाय आय च्या जागतिक सेवा योजनेत निर्दिष्ट संभासदांचे मिळून होईल (८१०).

**३४३.२.** हे अधिवेशन जागतिक एन वाय आय च्या अध्यक्षाची निवड करेल. जागतिक एन वाय आय च्या उपाध्यक्षांची निवड जागतिक एन वाय आय समिती प्रमुख परिषदेच्या वेळी होणाऱ्या पहिल्या सभेमध्ये किंवा परिषदेनंतर होणाऱ्या सभेमध्ये करतील. जागतिक एन वाय आय समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष हे समितीचे पदसिध्द सभासद राहातील व बिन पगारी सेवा करतील.

**३४३.३.** जागतिक एन वाय आय समिती ही तिचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि जागतिक एन वाय आय सेवा योजनेद्वारे निर्दिष्ट प्रत्येक विभागातील प्रतिनिधींची मिळून बनेल. एन वाय आय चे संचालक हे समितीचे पदसिध्द सभासद म्हणून सेवा करतील. जागतिक सेवा समिती आणि एन वाय आय च्या अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांच्या द्वारे समिती प्रमुख मंडळाला जबाबदार राहील. समिती एन वाय आय घोषणापत्र आणि एन वाय आय जागतिक सेवा योजनेच्या अधिकारात चालेल. जागतिक एन वाय आय समितीचे सभासद हे पुढील प्रमुख परिषदेच्या तहकुबी पर्यंत आणि त्यांचे उत्तराधिकारी निवडून येऊन पात्र होईपर्यंत कार्यभार सांभाळतील (८१०).

**३४३.४.** चर्च ऑफ दी नॅझरीनच्या प्रमुख मंडळावर जागतिक एन वाय आय चे प्रतिनिधित्व असेल. जागतिक एन वाय आय समितीने केलेल्या नामांकनांमधून प्रमुख परिषदेने निवडलेले जागतिक एन वाय आय चे अध्यक्ष हे ते प्रतिनिधित्व करतील (३३२.४, ३३३.३).

३४३.५. जागतिक एन वाय आय समितीचे अध्यक्ष हे त्यांच्या कार्यकाळाच्या शेवटी जागतिक एन वाय चे प्रांतिक परिषदेमध्ये प्रतिनिधित्व करतील (३०१).

## T. ख्रिस्तवार्ता संघ आंतरराष्ट्रीयची जागतिक समिती (एन एम आय)

**३४४.** जागतिक एन एम आय समिती ही समितीचे अध्यक्ष, जागतिक संचालक आणि एन एम आय च्या घटनेनुसार विहीत व निवडलेल्या सदस्यांची बनलेली असेल.

**३४४.१.** जागतिक एन एम आय समिती एन एम आय घटनेद्वारे शासित असेल. जागतिक समिती प्रमुख मंडळाच्या जागतिक सेवा समितीला अहवाल देईल. (८११)

**३४४.२. एन एम आय च्या जागतिक संचालकांचे नामांकन व निवडणूक.** जागतिक एन एम आय कार्यकारी समिती आणि अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष जागतिक एन एम आय संचालकपदासाठी सक्षम उमेदवार ओळखण्यासाठी शोध समिती गठीत करतील. दोन पर्यंत सक्षम उमेदवारांची नावे प्रमुख मंडळाच्या जागतिक सेवा समितीकडे सादर करण्यात येतील. प्रमुख मंडळाची जागतिक सेवा समिती आणि अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष सादर केलेल्या नावांचा विचार करतील आणि निवडणुकीकरिता प्रमुख मंडळाच्या जागतिक सेवा समितीकडे दोन नावे मंजूर करतील.

जागतिक एन एम आय संचालक हे जागतिक एन एम आय समितीचे पदसिध्द सभासद व प्रमुख मंडळाचे कर्मचारी असतील.

**३४४.३.** जागतिक एन एम आय समितीद्वारे प्रांतिक परिषदेला केलेल्या नामांकनांमधून निवडलेला एक सभासद जागतिक एन एम आय चे प्रतिनिधित्व प्रमुख मंडळामध्ये करेल. (३३२.५, ३३३.४)

**३४४.४.** प्रमुख परिषदेच्या नियमीत सभेच्या पूर्वी एन एम आय च्या जागतिक समितीच्या निर्देशानुसार चातुर्वार्षिक अधिवेशन होईल. हे अधिवेशन घटनेशी सुसंगत असे जागतिक एन एम आय च्या समितीची निवड करेल. अधिवेशन जागतिक अध्यक्षाची निवड करतील आणि ते जागतिक एन एम आय समितीचे पदसिध्द सभासद असतील. (८११)

## U. राष्ट्रीय मंडळ

**३४५.** एखाद्या राष्ट्रामध्ये मंडळीची सेवा आणि योजना सुकर करण्यासाठी आवश्यक असेल तेव्हां प्रमुखाध्यक्ष मंडळाच्या शिफारसीवरून राष्ट्रीय मंडळाची निर्मिती करता येईल. विभागिय संचालक आणि संबंधीत राष्ट्रामध्ये फेज ३ प्रांत असल्यास त्या प्रांताच्या सल्लागार मंडळांकरवी विभागीय योजनेच्या पूर्तीस्तव मंडळीच्या वतीने कृती करण्याचा अधिकार दिलेला असेल. हा अधिकार त्या विभागामधील अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष आणि राष्ट्रातील प्रांतांशी सल्लामसलत करून दिला जाईल. जेव्हां विभागातील अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांशी सल्लामसलत केल्यावर विभागीय संचालकांना आवश्यक वाटेल तेव्हां राष्ट्रीय मंडळ हे त्या राष्ट्रातील चर्च ऑफ दी नॅझरीनचे नोंदणीकृत कायदेशीर अधिकारी

असू शकेल. जेव्हां सेवेच्या पूर्तीकरिता किंवा कायदेशीर अपेक्षेनुसार राष्ट्रीय मंडळाची गरज वाटणार नाही तेव्हां प्रमुखाध्यक्ष मंडळ राष्ट्रीय मंडळाचे विघटन करू शकेल.

प्रत्येक राष्ट्रीय मंडळाचे सभासदत्व आणि रचना प्रमुखाध्यक्ष मंडळाने मंजूर केलेल्या पद्धतीने केले जाईल.

राष्ट्रीय मंडळ संस्थेच्या नियमावलीची प्रत त्वरीत प्रमुख सचिवांकडे दाखल केली जाईल.

ह्या नियमावलीत कोणतेही बदल झाल्यास ते त्वरीत प्रमुख सचिवाकडे दाखल करून हे लेख सद्यकालीन ठेवण्यात येतील. मंडळीच्या सेवा आणि योजनेला सुकर करण्याकरिता राष्ट्रीय मंडळाने करावयाचे कामकाज विभागीय संचालकांशी सल्लामसलत करून केलेले असेल. राष्ट्रीय मंडळाच्या विशेष सभांचे कार्यवृत्त हे प्रमुख सचिवांनी पुनरावलोकन करून प्रमुख मंडळाने योग्य असा शेरा देण्यापूर्वी विभागीय सल्लागार समितीद्वारे परिक्षण केलेले असेल. (३२.५)

## V. विभाग

**३४६. मूळ आणि उद्दीष्ट.** जगभरातील मंडळीच्या झालेल्या वाढीचे अनेक भौगोलिक क्षेत्रांमध्ये प्रस्थापित प्रांतांचे गट विकसीत झाले आहेत त्यांना विभाग म्हणून ओळखले जाते. चर्च ऑफ नॅझरीनच्या प्रमुख शासन नियमाच्या अधीन राहून आणि प्रादेशिक व सांस्कृतिक ओळख असणाऱ्या प्रांतांच्या गटाला प्रमुख मंडळाच्या व प्रमुखाध्यक्ष मंडळाच्या कृतीने व मान्यतेने प्रशासकीय विभाग म्हणून प्रस्थापित केले जाऊ शकते.

**३४६.१. विभागिय धोरण.** संघटनेप्रती असिमित दृष्टिकोन बाळगून, प्रमुखाध्यक्ष मंडळ विभागीय सल्लागार समिती सोबत सल्लामसलत करून प्रशासकीय विभागांची रचना करू शकतात. हे करतांना त्या विभागाच्या विशिष्ट गरजा, संभाव्य समस्या, विद्यमान वास्तविकता आणि त्यांच्या जागतिक भौगोलिक क्षेत्रातील वैविध्यपूर्ण सांस्कृतिक आणि शैक्षणिक पार्श्वभूमी लक्षात घेतली जाईल. अशा परिस्थितीत, प्रमुखाध्यक्ष मंडळ एक असे धोरण स्थापित करेल की जे विश्वास कलमे, पवित्रतेच्या सिद्धांताचे व जीवनशैलीचे विश्वासू अनुकरण आणि व्यापक मिशनरी पोहोच प्रयत्नांचे समर्थन या बाबींबाबत अपरिवर्तनीय वचनबद्धतेचा स्वीकार करते.

**३४६.२. कर्तव्ये. विभागाची प्रमुख कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेतः**

१. नवीन भौगोलिक प्रदेश, प्रांत, आणि संस्थांद्वारे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मिशनची अंमलबजावणी करणे.

२. महान आज्ञेची पूर्ती करण्यासाठी विभागिय जागरूकता, सहभागीता आणि योजना विकसीत करणे, त्याचप्रमाणे प्रार्थना, योजना आणि प्रेरणा यासाठी प्रांत व संस्थात्मक प्रतिनिधींना वेळोवेळी एकत्र आणणे;

३. प्रमुख मंडळावर निवडून देण्याकरिता प्रमुख परिषद आणि प्रमुख अधिवेशनाला व्यक्तींचे नामांकन करणे.

४. बंधारण पुस्तकातील तरतुदींशी सुसंगतरित्या शाळा आणि महाविद्यालये किंवा इतर संस्था स्थापित करणे आणि त्यांची देखभाल करणे;

५. धोरणानुसार (३४६.३) विभागातील मिशनरी उमेदवारांचे परिक्षण करून नियुक्त करण्यास अधिकृत असणे;

६. विभागीय सल्लागार समितीच्या बैठका आणि विभागीय परिषदांचे नियोजन करणे;

७. परिच्छेद ३४५ आणि ३४६.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय मंडळ सुलभ करणे.

**३४६.३. विभागीय सल्लागार समिती (आर ए सी).** एखाद्या विभागात विभागीय सल्लागार समिती असू शकते. तिची जबाबदारी पुढील प्रमाणे असेल: विभागीय संचालकांना त्या विभागासाठी धोरण विकासात मदत करणे, प्रमुख सचिवाच्या कार्यालयाकडे जाण्यापूर्वी राष्ट्रीय मंडळाच्या अहवालास मंजुरी किंवा नामंजूरीचे परिक्षण आणि शिफारस करणे, मिशनरी उमेदवारांची मुलाखत घेऊन जागतिक नियुक्तीकरिता प्रमुख मंडळाकडे शिफारस करणे, विभागीय संचालक, क्षेत्रीय योजना संचालक आणि सेवा संचालकांकडून अहवालांचा स्वीकार करणे.

विशिष्ट विभागाच्या गरजा, विकास व अपेक्षांनुसार आर ए सी ला आकार देण्याकरिता आर ए सी चे सभासदत्व लवचिक असेल. विभागीय संचालक हे आर ए सी च्या सभासद संख्येची शिफारस जागतिक मिशन संचालकांना आणि अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांना मंजुरीकरिता करतील. पदसिध्द सभासद पुढील प्रमाणे असतील: विभागाचे अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष, जागतिक मिशन संचालक, आणि विभागीय संचालक जे मंडळाचे अध्यक्ष देखील असतील. जागतिक मिशनला जबाबदार असणाऱ्या व्यक्ती ह्या आर ए सी च्या निवडणुकीकरिता पात्र उमेदवार असणार नाहीत किंबहूना ते वक्ते

असू शकतील. प्रमुख परिषदेमध्ये आर ए सी च्या सभासदांची निवड विभागीय सभा मतपत्रिकेद्वारे करेल. दोन प्रमुख परिषदांदरम्यान रिक्त झालेली जागा आर ए सी भरून काढेल.

विभागीय संचालक हे आर ए सी सोबत सल्लामसलत करून विभागीय परिषद किंवा प्रादेशिक सुवार्ताप्रसार परिषदेचे आयोजन करू शकतात. (३२.२)

**३४६.४. विभागीय संचालक.** विभाग, प्रमुखाध्यक्ष मंडळाने जागतिक सेवा संचालकांशी सल्लामसलत करून व प्रमुख मंडळाच्या सहमतीने, विभागीय संचालकाची निवड करू शकतो. हे विभागीय संचालक चर्च ऑफ दी नॅझरीनच्या धोरण व व्यवहारांशी सुसंगत राहून विभागातील प्रांत, मंडळ्या आणि संस्थांना चर्च ऑफ दी नॅझरीनच्या उद्दीष्टांची, योजनांची व कार्यक्रमांची पूर्ती करण्याकरिता पुढारीपण देतील.

विभागीय संचालकांची पुन: निवड करण्याआधी, जागतिक सेवा संचालक आणि अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष हे विभागीय सल्लागार समितीशी सल्लामसलत करून पुन:परीक्षण करतील. सकारात्मक पुन:परीक्षण हे पुन: निवडी करिता शिफारशीला समर्थन असे गृहीत धरता येईल.

प्रत्येक विभागीय संचालक हे प्रशासकीय दृष्टीने जागतिक सेवा आणि प्रमुख मंडळाला जबाबदार राहतील व अख्त्यारी बाबींबद्दल प्रमुखाध्यक्ष मंडळाला जबाबदार राहतील.

**३४६.५. क्षेत्रीय योजना संचालक.** जेव्हा आवश्यक वाटेल तेव्हा विभागीय संचालक हे विभागामध्ये श्रेत्रीय संरचना प्रस्थापित करू शकतील आणि जागतिक सेवा धोरण व प्रक्रियांनुसार जागतिक मिशन सेवा संचालकाकडे क्षेत्रीय योजना संचालकांच्या नियुक्तीची शिफारस करू शकतील. क्षेत्रीय योजना संचालक हे विभागीय संचालकांना जबाबदार राहतील.

**३४६.६. विभागीय अभ्यासक्रम सल्लागार समिती.** विभागीय अभ्यासक्रम सल्लागार समिती ही विभागीय शिक्षण समन्वयक जे की समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतील, त्या व्यतिरिक्त विभागीय संचालकांशी सल्लामसलत करून निवडलेले प्रतिनिधी ह्यांची मिळून बनलेली असेल. समितीचे सभासद हे विभागाकरिता सेवकीय शिक्षणामध्ये स्वारस्य बाळगणाऱ्या सर्व पक्षांचे प्रतिनिधित्व करणारे असावेत (उदा. पाळक, व्यवस्थापक, शिक्षक, आणि सामान्य सभासद वर्ग)

**३४६.७. विभागीय अभ्यासक्रम सल्लागार समितीची कर्तव्ये.** विभागीय अभ्यासक्रम सल्लागार समितीची प्रमुख कर्तव्ये खालील प्रमाणे असतील:

१. दिक्षेबाबत विभागीय संसाधनपुस्तिका विकसीत करणे. ह्यामध्ये दिक्षेकरिता किमान शैक्षणिक मानदंडांची रूपरेषा दिलेली असेल. दिक्षेबाबतच्या साधनपुस्तिकेमध्ये बंधारण पुस्तकामध्ये प्रस्थापित केलेले व दिक्षेकरिता विकासात्मक मानदंडांचे आंतरराष्ट्रीय साधनपुस्तक ह्यामध्ये विस्तृत केलेल्या किमान मानदंडांचे परावर्तन होणे आवश्यक आहे.

२. विभागाच्या सेवकीय प्रशिक्षण कार्यक्रमांकरिता मान्यता प्रक्रिया विकसीत करणे, हे कार्यक्रम विभागीय अभ्यासक्रम सल्लागार समिती व आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समितीच्या किमान मानदंडांची पूर्ती करते ह्याची खात्री करून घेणे.

३. सेवकीय प्रशिक्षण कार्यक्रमांच्या मानदंडांचे अर्थविवरण करण्याकरिता विभागीय शैक्षणिक प्रदात्यांशी सहकार्य करणे.

४. विभागीय साधनपुस्तिका आणि आंतरराष्ट्रीय साधनपुस्तिकेतील मानदंडांच्या अनुपालनाकरिता सादर केलेल्या सेवकीय प्रशिक्षण कार्यक्रमांचे पुन:परीक्षण करणे.

५. आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समितीने स्वीकार करून मान्यता द्यावी ह्याकरिता विभागीय सेवकीय प्रशिक्षण कार्यक्रमांचे समर्थन करणे.

# भाग ५ वा

# उच्च शिक्षण

**मंडळी आणि महाविद्यालय/विद्यापिठ**
**जागतिक नॅझरीन शिक्षण संघ**
**आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ**

## १. मंडळी आणि महाविद्यालय/विद्यापिठ

**४००.** चर्च ऑफ दी नॅझरीन त्याच्या स्थापनेपासून उच्च शिक्षणासाठी वचनबध्द आहे. चर्च ऑफ दी नॅझरीन महाविद्यालय/विद्यापिठांना विद्यार्थी, प्रशासकीय आणि प्राध्यापकांचे नेतृत्व आणि आर्थिक व आध्यात्मिक पाठबळ प्रदान करते. महाविद्यालय/विद्यापिठ मंडळीच्या तरूणांना आणि अनेक प्रौढांना शिक्षित करते, आध्यात्मिक परिपक्वतेप्रती त्यांना मार्गदर्शन करते, मंडळीला समृध्द करते आणि ख्रिस्ताचे विचारी व प्रीती करणारे सेवक जगामध्ये पाठविते. मंडळीचे महाविद्यालय/विद्यापिठ, हे स्थानिक मंडळी नसतानाही मंडळीचा अविभाज्य भाग आहे; हा मंडळीचा एक आर्विभाव आहे.

चर्च ऑफ दी नॅझरीन मानवी जीवनाची मुल्ये आणि प्रतिष्ठा आणि असे वातावरण प्रदान करण्याची आवश्यकता यावर विश्वास ठेवते की, ज्यामध्ये लोकांना आध्यात्मिक, बौध्दिक, आणि शारीरिकदृष्ट्या मुक्त आणि समृध्द केले जाऊ शकते, "पवित्र केलेले,

स्वामीला उपयोगी पडणारे, आणि प्रत्येक चांगल्या कामास तयार केलेले” (२ तीमथ्य २:२१). स्थानिक मंडळीच्या क्रियाकलापांचे प्राथमिक कार्य आणि पारंपारिक अभिव्यक्ती म्हणजे सुवार्ताप्रसार, धार्मिक शिक्षण, दयार्थ सेवा आणि आराधना सेवा ह्या मंडळीची देवावरील प्रीती आणि लोकांबद्दलची काळजी ह्यांचे उदाहरण व्यक्त करते.

स्थानिक मंडळीच्या स्तरावर, मानवी विकासाच्या विविध टप्प्यांवरील तरूण आणि प्रौढांचे ख्रिस्ती शिक्षण हे सुवार्तेची परिणामकारकता तीव्र करते. मंडळी त्यांच्या उद्दिष्टांमध्ये आणि कार्यामध्ये बालसंगोपन/शाळा असे जन्मापासून ते माध्यमिक पर्यंतचे कोणत्याही अथवा सर्व स्तरांवर शालेय शैक्षणिक कार्यक्रम समाविष्ट करु शकतात. मंडळीच्या प्रमुख स्तरावर, उच्च शिक्षणासाठी किंवा सेवकीय तयारीसाठी शिक्षणसंस्था पुरविण्याची ऐतिहासिक प्रथा कायम ठेवली जाईल. जिथे जिथे अशा संस्था चालविल्या जातील, त्या प्रमुख परिषदेने स्थापित केलेल्या आणि बंधारण पुस्तकाव्दारे व्यक्त केलेल्या चर्च ऑफ नॅझरीनचे तत्वज्ञान आणि ईश्वरविज्ञान ह्यांच्या चौकटीत कार्य करतील.

**४००.१. शैक्षणिक सेवाकार्याचे निवेदन**. चर्च ऑफ नॅझरीनमध्ये शिक्षण हे वेस्लीप्रणीत आणि पवित्रीकरणाच्या चळवळीच्या पवित्रशास्त्रोक्त आणि ईश्वरविज्ञानात्मक वचनबध्दतेमध्ये मुळावलेले आहे, आणि चर्च ऑफ दी नॅझरीनच्या घोषित केलेल्या सेवाकार्यास जबाबदार आहे, आणि जे ह्या शिक्षणाला स्वीकारून, त्यामध्ये संगोपन पावून मंडळी व जगाला सातत्यपूर्ण व सुसंगत सामाजिक व वैयक्तिक जीवनाबाबतची ख्रिस्ती समज ही सेवा म्हणून व्यक्त करू इच्छिणाऱ्यांना मार्गदर्शन करण्याचे ध्येय बाळगते. याव्यतिरिक्त, अशा उच्च शिक्षण संस्था अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्याचा, शिक्षणाची गुणवत्ता प्रदान करण्याचा आणि विद्वत्ता संपादनाचा पुरावा सादर करण्याचा प्रयत्न करतील की ज्याव्दारे पदवीधर जो पेशा आणि सेवाकार्य निवडतील त्यामध्ये प्रभावीपणे कार्य करण्यासाठी त्यांना पर्याप्त प्रमाणात तयार करेल.

**४००.२.** पदवी प्रदान करणाऱ्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या शिफारशीनुसार प्रमुख परीषदेची अधिकृत परवानगी प्राप्त करणे आवश्यक आहे.

विद्यमान संस्थाच्या विकासासाठी किंवा त्यांच्या स्थितीमध्ये बदल करण्यासाठी आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या शिफारशीनुसार प्रमुख मंडळामार्फत अधिकृत परवानगी देण्यात येईल.

कोणतीही स्थानिक मंडळी किंवा मंडळ्यांचे समुह अथवा स्थानिक मंडळीचे किंवा मंडळ्यांच्या समुहाचे प्रतिनिधीत्व करणारे लोक मंडळीच्या वतीने आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या शिफारशी विना उच्च माध्यमिक अथवा सेवकीय प्रशिक्षण संस्था स्थापन अथवा प्रायोजित करु शकत नाही.

## २. जागतिक नॅझरीन शिक्षण संघ

**४०१.** जागतिक नॅझरीन शिक्षण संघ असेल व त्याचे सभासद पुढील प्रमाणे असतील: चर्च ऑफ नॅझरीनच्या प्रत्येक आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाअंतर्गत असणाऱ्या चर्च ऑफ दी नॅझरीनच्या शिक्षण संस्थांचे अध्यक्ष, प्राचार्य, मुख्य अधिकारी किंवा संचालक (किंवा त्याचे/तिचे नियुक्त प्रतिनिधी), विभागीय शिक्षण समन्वयक, शिक्षण आयुक्त, जागतिक मिशनकार्य संचालक, आणि आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाकरिता अख्त्यारी प्रमुख अध्यक्ष यांचा समावेश असेल.

## ३. आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ

**४०२.** आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ हे चर्च ऑफ नॅझरीन मध्ये शैक्षणिक संस्थासाठी प्रमुख मंडळीचे समर्थक असेल. हे मंडळ बारा सदस्यांचे बनलेले असेलः प्रमुख मंडळाने निवडलेले आठ, तसेच पुढील पदसिध्द सदस्य: प्रमुख मंडळावरील दोन शिक्षण प्रतिनिधी, जागतिक मिशनकार्य संचालक, जागतिक सेवकीय विकास संचालक आणि शिक्षण आयुक्त. पुढील सभासदांची मिळून बनलेली नामसुचक समिती: शिक्षण आयुक्त, जागतिक मिशनकार्य संचालक, प्रमुख मंडळावरील दोन शिक्षण प्रतिनिधी आणि आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या कार्यक्षेत्रातील/अख्त्यारी प्रमुख अध्यक्ष, आणि प्रमुखाध्यक्ष मंडळाने मंजूर करून नामांकीत केलेले सभासद जागतिक मिशनकार्य मंडळ प्रमुख मंडळाला निवडणुकीसाठी सादर करतील.

संपूर्ण मंडळीमधून मंडळाच्या प्रतिनिधीत्वाची खात्री करून घेण्याचा प्रयत्न करीत असतांना नामसुचक समिती खालीलप्रमाणे उमेदवारांची नावे दाखल करतीलः एक विभागीय शिक्षण समन्वयक; तीन सामान्य सभासद; जिथे शिक्षण समन्वयक असलेली कोणतीही व्यक्ती नामांकित केलेली नाही तिथे जागतिक मिशनकार्य विभागामधून दोन नियुक्त दीक्षीत सेवक; दोन “अतिरिक्त” नामांकित व्यक्ती. प्रत्येक विभागाचा प्रतिनिधी

असेपर्यंत कोणत्याही जागतिक मिशनकार्य विभागामधून आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळावर एकापेक्षा जास्त निवडून आलेला सदस्य नसेल.

संपूर्ण नामांकन आणि निवडणूक प्रक्रियेदरम्यान, आंतर-सांस्कृतिक दृष्टीकोन असणाऱ्या आणि/किंवा प्रशिक्षक म्हणून अनुभव असणाऱ्या व्यक्तींच्या निवडीकडे लक्ष दिले जाईल.

## आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाची कार्येः

**४०२.१.** संस्था त्यांच्या संबंधित अशा संचालक मंडळांच्या कायदेशीर नियंत्रणाखाली आहेत की ज्या संचालक मंडळांची घटना आणि नियम त्यांच्या संबंधित संस्थेच्या उद्दिष्टांशी आणि चर्च ऑफ दी नॅझरीनच्या बंधारण पुस्तकाने सूचित केलेल्या मार्गदर्शक तत्वांशी सुसंगत आहेत, ह्याची खात्री करून घेणे.

**४०२.२.** नॅझरीन संस्थांच्या संचालक मंडळांचे सदस्य हे चर्च ऑफ दी नॅझरीन मंडळीचे चांगल्या स्थितीत सभासद आहेत याची खात्री करुन घ्यावी. ते चर्च ऑफ दी नॅझरीनच्या विश्वास कलमांशी व संपूर्ण पवित्रीकरणाच्या सिध्दांताशी आणि बंधारण पुस्तकामध्ये नमुद केलेल्याप्रमाणे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सदूपयोगाशी पूर्णपणे सहमत असतील. शक्यतो, उच्च शिक्षण नियंत्रण मंडळांच्या सभासदांमध्ये दीक्षीत आणि सामान्य सभासदांची संख्या समान असावी.

**४०२.३.** शैक्षणिक हेतूसाठी योगदान दिलेल्या भेटवस्तू, मृत्युपत्रित देणगी, अनुदाने, अशाप्रकारचे निधी स्वीकारणे आणि प्रमुख मंडळाने स्वीकारलेल्या धोरणा नुसार प्रत्येक शैक्षणिक संस्थांना या निधीतून वितरण करण्याची शिफारस दरवर्षी करणे. आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाकडे त्यांचे शैक्षणिक मानके, संघटनेची योजना आणि वित्तीय अहवाल दाखल केल्याशिवाय संस्थांना नियमीत अर्थ साहाय्य मिळणार नाही.

**४०२.४.** सर्व आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या संस्थांचा पुढील माहितीचा सारांश देणारा वार्षिक अहवाल शिक्षण आयुक्ताकडून स्वीकारून त्याबाबत योग्य ती कार्यवाही करणे: (१) वार्षिक सांख्यिकी अहवाल, (२) वार्षिक लेखापरीक्षण अहवाल, आणि (३) चालू वर्षाचा वित्तिय अर्थसंकल्प.

**४०२.५.** जरी आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाची भुमिका संस्थांकरिता सल्लागार अशी असली तरी प्रमुखाध्यक्ष मंडळाला आणि प्रमुख मंडळाला संस्थांची शिफारस करून पाठींबा देणे आणि समर्थन प्रदान करणे.

**४०२.६.** संस्था आणि मंडळी यांच्यात असलेले संबंध बळकट करण्यासाठी नॅझरीन शैक्षणिक संस्थांशी संबंधित प्रकरणांबाबत मंडळीची सेवा करणे.

**४०२.७.** त्यांच्या कामकाजाचा अहवाल आणि शिफारसी प्रमुख मंडळाच्या योग्य समितीकडे सादर करणे.

**४०३.** सर्व संस्थात्मक घटना आणि नियमांमध्ये मालमत्तेचे विघटन आणि विल्हेवाट लावण्याविषयी असे सुचविणारे नियम समाविष्ट असणे आवश्यक आहे की, विघटीत मालमत्तेचे हस्तांरण चर्च ऑफ दी नॅझरीनला शैक्षणिक सेवेसाठी वापरण्याकरिता करण्यात येईल.

# भाग ६वा

# पाळकीय सेवाकार्य आणि ख्रिस्ती सेवाकार्य

**सेवकाचे पाचारण व पात्रता**
**सेवेचे प्रवर्ग**
**सेवाकार्याची भुमिका**
**सेवकीय प्रशिक्षण**
**अधिकार प्रमाणपत्रे आणि सेवेसंबंधी नियम**

## १. सेवकाचे पाचारण व पात्रता

**टीप :** बंधारण पुस्तक संपादन समितीने, परीच्छेद ५०० च्या सुरूवातीच्या शब्दांची वैधता मान्य करून वैशिष्ट्य प्रतिबिंबित करणारी भाषा वापरण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि, बंधारण पुस्तकाच्या या भागाच्या स्वरूपामुळे “सेवक” किंवा “पाळक” ह्या संज्ञा सामान्यतः अशा व्यक्तींना संबोधण्याकरिता वापरलेल्या आहेत की जे दीक्षीत, सनदी सेवक, किंवा विशेष सेवेकरिता नियुक्त असल्याची अधिकार प्रमाणपत्र धारक आहेत.

**५००.** चर्च ऑफ दी नॅझरीन असे मान्य करते की, सर्व विश्वासणारे हे सर्व लोकांची सेवा करण्यासाठी पाचारलेले आहेत.

आम्ही या गोष्टीचीही पुष्टी देतो की प्रभू येशू ख्रिस्ताने जसे आपल्या बारा प्रेषितांना निवडून सेवेसाठी नियुक्त केले त्याप्रमाणेच तो काही पुरुष व स्त्रियांना विशिष्ट आणि सार्वजनिक सेवाकार्यासाठी पाचारण करतो. जेव्हा पवित्र आत्म्याने प्रकाशित झालेली मंडळी, अशा दिव्य पाचारणास ओळखते तेव्हा मंडळी त्या व्यक्तीस आजीवन सेवाकार्यात प्रवेश घेण्यास सर्मथन देते आणि मदत करते.

**५०१. स्त्री-सेवेचे ईश्वरविज्ञान.** चर्च ऑफ दी नॅझरीन देवाने स्त्रीयांना दिलेल्या आध्यात्मिक दानांचा उपयोग मंडळीमध्ये करण्याच्या अधिकाराचे सर्मथन करते आणि स्त्रीयांना चर्च ऑफ दी नॅझरीन मध्ये दीक्षीत आणि सहाय्यक सेवक या दोन्ही सेवाकार्यासहित पुढारीपणाच्या पदांवर निवडून येणे आणि नियुक्त केल्या जाणे ह्या त्यांच्या ऐतिहासिक अधिकाराला मान्यता देते.

ख्रिस्ताच्या खंडणी भरुन केलेल्या कार्याचा उद्देश म्हणजे देवाच्या निर्मितिला पतनाच्या शापातून मुक्त करणे. जे "ख्रिस्ताच्या" ठायीं आहेत ते नवी उत्पत्ती आहेत (१ करींथ. ५:१७). या पापविमोचनकारी समाजात कोणत्याही व्यक्तीला त्याची सामाजिक स्थिती, वंश किंवा लिंगाच्या आधारे निकृष्ट मानले जाऊ नये (गलती. ३:२६-२८). पौलाने तीमथ्याला (१ तीमथ्य २:११-१२) आणि करिंथ येथील मंडळीला (१ करींथ १४:३३-३४) दिलेल्या सुचनेमुळे निर्मित उघड विरोधाभासास कबूल करून, आमचा असा विश्वास आहे की या परिच्छेदांचा अर्थ स्त्रीयांच्या सेवाकार्य भुमिकांवर मर्यादा लादने असा केल्यास पवित्र शास्त्रांतील इतर परिच्छेद जे स्त्रीयांच्या आध्यात्मिक पुढारीपणाच्या भुमिकांची शिफारस करतात त्यांच्याशी विसंगत असा गंभीर संघर्ष प्रस्तुत केला जातो (योएल २:२८-२९, प्रेषित २:१७-१८, २१:८-९, रोम १६:१, ३, ७, फिलीप्पै ४:२-३) आणि वेस्लीप्रणित पवित्रतेच्या परंपरेच्या आत्म्याचे आणि रिवाजांचे उल्लंघन केले जाते. शेवटी, हे संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये नमूद केलेल्या देवाच्या चारित्र्याशी विशेषतः येशू ख्रिस्ताच्या व्यक्तीमत्वामध्ये प्रकट केलेल्या चारित्र्याशी विसंगत आहे.

**५०२. दीक्षेचे ईश्वरविज्ञान.** सर्व विश्वासणाऱ्यांचे वैश्विक याजकपण आणि सेवाकार्य ह्याबाबत पवित्रशास्त्रोक्त सिध्दांतांना मान्यता देतांना, दीक्षा ही असा पवित्रशास्त्रोक्त विश्वास प्रतिबिंबीत करते की, देव काही पुरुष व स्त्रियांना पाचारण करून त्यांना मंडळीतील सेवाकार्याचे पुढारीपण प्रदान करतो. दीक्षा ही मंडळीचे मान्यता देण्याचे

आणि अधिकृत करण्याचे असे कार्य आहे की, ज्या द्वारे ती देवाने एखाद्याला सेवकीय पुढारीपणाकरिता शुभवर्तमान व येशू ख्रिस्ताची मंडळी ह्याचे कारभारी व घोषणाकर्ते म्हणून केलेल्या पाचारणाला ओळखते व त्याची खात्री करते. परिणामी, दीक्षा ही वैश्विक मंडळीला आणि मोठ्या प्रमाणात जगाला साक्ष देते की हा उमेदवार पवित्रतेचे जीवन दर्शवितो, सार्वजनिक सेवेसाठी आवश्यक दाने आणि कृपा धारण करतो, आणि त्याला ज्ञानाची विशेषतः देवाच्या वचनाची तहान आहे आणि त्याच्यामध्ये योग्य सिध्दांत विदित करण्याची क्षमता आहे.

(प्रेषित १३:१-३; २०:२८; रोम १:१-२; १ तीमथ्य ४:११-१६; ५:२२, २ तीमथ्य १:६-७)

**५०२.१.** चर्च ऑफ दी नॅझरीन मंडळी बऱ्याच अंशी तिच्या सेवकांची आध्यात्मिक पात्रता, त्यांचे चारित्र्य आणि जीवनशैली यावर अवलंबून आहे. (५३८.१७)

**५०२.२.** चर्च ऑफ दी नॅझरीनमध्ये ख्रिस्ताच्या शुभवर्तमानचा सेवक हा आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताव्दारे देवाबरोबर शांती झालेला असावा, आणि पवित्र आत्म्याने भरल्याने किंवा पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याव्दारे संपूर्ण पवित्रीकरण झालेला असावा. त्या सेवकाला नाश पावत असणाऱ्या अविश्वासणाऱ्यांप्रती सखोल प्रीती असली पाहिजे, आणि तारण जाहीर करण्यासाठी त्याला देवाचे पाचारण असणे आवश्यक आहे.

**५०२.३.** ख्रिस्ताचा सेवक हा मंडळीसाठी देवाच्या सामर्थ्याने पुढील बाबतीत कित्ता असला पाहिजे: वक्तशीरपणा, विवेक, परिश्रम, प्रामाणिकपणा, शुध्दता, समजुतदारपणा, सहनशीलता, दयाळूपणा, प्रीती आणि सत्य (२ करिंथ. ६:६-७).

**५०२.४.** ख्रिस्ताच्या सेवकास पुढील बाबींच्या अत्यावश्यकतेची गंभीर जाणीव असली पाहिजे: विश्वासणाऱ्यांचे पूर्णतेप्रत जाणे आणि दैनंदिन वास्तविक जीवनात त्यांच्या अंगी ख्रिस्ती गुण विकसित होणे, जेणेकरून त्यांची “प्रीती ज्ञानाने व सर्व प्रकारच्या विवेकाने उत्तरोत्तर अतिशय वाढावी” (फिलिप्पै. १:९). जो व्यक्ती चर्च ऑफ दी नॅझरीनमध्ये सेवा करु इच्छितो त्याला तारण आणि ख्रिस्ती नीतितत्वे या दोहोंचेही भरपूर कौतुक असले पाहिजे.

**५०२.५.** ख्रिस्ताच्या सेवकाने भावी सेवकांना सदुपदेशन करण्याच्या संधीस प्रतिसाद द्यावा आणि सेवेच्या पाचारणाला पुष्टी द्यावी.

**५०२.६.** ख्रिस्ती सेवकाच्या ठायी सेवकार्याकरिता उपयुक्त दाने व गुण असणे आवश्यक आहे. त्याला किंवा तिला ज्ञानासाठी विशेषतः देवाच्या वचनासाठी तहान असावी, विवेकभाव शुध्द असावा, उत्तम समजुतदारपणा असावा, तसेच पवित्र शास्त्रामध्ये प्रकट केलेल्या तारणाच्या योजनेसंबंधीचे दृष्टीकोण स्पष्ट असावेत. त्याच्या किंवा तिच्या सेवेव्दारे पवित्रजन प्रशिक्षित झाले पाहिजे आणि पापी जनांचा पालट झाला पाहिजे. चर्च ऑफ दी नॅझरीन मंडळीमध्ये ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाचा सेवक प्रार्थनेबाबत आदर्श असला पाहिजे.

## II. सेवाकार्याचे प्रवर्ग

## A. सामान्य सभासदाचे सेवाकार्य

**५०३.** सर्व ख्रिस्ती व्यक्तींनी स्वतःला ख्रिस्ताचे सेवक मानले पाहिजे आणि त्यांच्या सेवेच्या योग्य प्रकाराबद्दल देवाची इच्छा जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. (५००)

**५०३.१.** चर्च ऑफ दी नॅझरीन सामान्य सभासदांच्या सेवाकार्यास मान्यता देते आणि सामान्य सभासद मंडळीमध्ये विविध प्रकारची सेवा करु शकेल या गोष्टीला देखील पुष्टी देते (इफीस ४:११-१२). मंडळीने खालील सेवेच्या भुमिकांना मान्यता दिली आहे ज्यात प्रांतिक परिषद सामान्य सभासदांना सेवेसाठी नियुक्त करु शकतेः पाळक, सुवार्तिक, ख्रिस्तप्रचारक (मिशनरी), शिक्षक, व्यवस्थापक, उपाध्याय (चॅपलेन), आणि विशेष सेवा. सर्वसाधारणत: या प्रवर्गातील सेवेसाठी पात्र असण्याकरिता ले प्रशिक्षण पूर्ण केलेले असणे आवश्यक किंवा अपेक्षित असते. (६०५.३)

**५०३.२. सामान्य सेवक.** चर्च ऑफ दी नॅझरीनच्या कोणत्याही सामान्य सभासदाला, मंडळीरोपक, दुव्यवसायी पाळक, शिक्षक, सामान्य सुवार्तिक, सामान्य गायक सुवार्तिक, कारभारी सेवक, मंडळी कर्मचारी सेवक आणि/ किंवा मंडळीच्या वतीने दुसरी कोणतीही विशेष सेवा यांपैकी कोणतीही सेवा करण्यासाठी पाचारण झाले आहे असे वाटणाऱ्या, परंतु अद्यापि दीक्षीत सेवक होण्यास खास पाचारण झालेले नाही असे वाटणाऱ्या सामान्य सभासदाने, ले सेवक प्रमाणपत्र प्राप्तिकरिता मान्यताप्राप्त अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे.

**५०३.३.** स्थानिक पंचमंडळ, पाळकाच्या शिफारशीवरुन प्रथमतः सामान्य सेवकाचे पुढील बाबतींत परीक्षण करून त्याच्या/तिच्या ठायी तारणाचा वैयक्तिक अनुभव,

मंडळीच्या सेवाकार्यात परिणामकारी सक्रीय सहभाग आणि मंडळीच्या कामकाजासंबंधीचे ज्ञान आहे याची खातरी करुन घेईल व मान्यता देईल.

**५०३.४.** स्थानिक पंचमंडळ, सामान्य सेवक म्हणून कार्य करणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला पाळक आणि पंचमंडळाचे चिटणीस यांच्या स्वाक्षरीने एक प्रमाणपत्र प्रदान करेल.

**५०३.५.** जर सामान्य सेवकाने आजीवन ले प्रशिक्षणाने आखलेल्या ले सेवक शैक्षणिक कार्यक्रमातील कमीत कमी दोन विषय पूर्ण केलेले असतील, तर पाळकाच्या शिफारशीवरुन पंचमंडळ प्रतिवर्षी ले सेवक प्रमाणपत्राचे नुतनीकरण करुन देऊ शकेल. सामान्य सेवक प्रतिवर्षी पंचमंडळाकडे आपला अहवाल सादर करेल.

**५०३.६.** प्रांतिक नियुक्तीखाली मंडळीरोपक, हंगामी पाळक, दुव्यवसायी पाळक, या आणि/किंवा इतर विशेष सेवा करणाऱ्या सामान्य सेवकाने मानत्याप्राप्त अभ्यासक्रम यशस्वी रीतीने पूर्ण केल्यानंतर, त्याला/तिला प्रांतिक सल्लागार मंडळाकडून ले सेवक प्रमाणपत्र देता येईल. त्यावर प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार मंडळाचे चिटणीस हे स्वाक्षरी करतील. ह्या ले सेवक प्रमाणपत्राचे प्रांताध्यक्षांच्या शिफारशीने प्रांतिक सल्लागार मंडळ प्रतिवर्षी नुतनीकरण करुन देऊ शकेल.

**५०३.७.** सामान्य सेवक/सेविका ज्या स्थानिक मंडळीचे सभासद असेल त्या मंडळीच्या क्षेत्रा बाहेर सेवा करीत असेल, तर तो/ती नेमणूक व देखरेख या संबंधात प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार मंडळ यांच्या अधीन राहील; तसेच तो/ती त्यांच्याकडे प्रतिवर्षी अहवाल सादर करील. प्रांतिक सेवा नेमणूक समाप्त झाल्यावर प्रमाणपत्र नुतनीकरण आणि अहवाल सादर करणे या बाबी सामान्य सेवक/ सेविका जेथे सभासद आहे त्या स्थानिक मंडळीकडे सोपवण्यात येतील.

**५०३.८.** सामान्य सेवकाने ले प्रशिक्षणाद्वारे मान्यताप्राप्त अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, त्याने/तिने निवडलेल्या सेवेसंबंधी उपयुक्त असा विशेष अभ्यासक्रम ले सेवक आजीवन प्रशिक्षण कार्यालयाच्या माध्यमातून पूर्ण करण्यास आरंभ करावा.

**५०३.९.** सामान्य सेवक बाप्तिस्मा व प्रभुभोजन हे संस्कारविधी चालविण्यास पात्र असणार नाही, आणि विवाह लावण्याचे काम करणार नाही.

## B. पाळकीय सेवाकार्य.

**५०४.** उपदेश सेवेचा दीक्षित हा एकच प्रवर्ग चर्च ऑफ दी नॅझरीन मान्य करते. त्याचप्रमाणे सेवक प्रवर्गाचे सभासद मंडळीमध्ये विविध क्षमतेमध्ये सेवा करू शकतात हेही मान्य करते. (इफीस ४:११-१२). चर्च ऑफ दी नॅझरीन अशी मान्यता देते की, प्रांतिक परिषद दीक्षित सेवक, सहाय्यक सेवक (डिकन) यांना आणि परिस्थितीनुसार सनदी सेवक यांना पुढील प्रवर्गानुसार नियुक्त करू शकते: पाळक, सुवार्तिक, ख्रिस्तप्रचारक (मिशनरी), शिक्षक, व्यवस्थापक, चॅपलेन आणि विशेष सेवा. या प्रवर्गातील सेवक "नियुक्त सेवक" असे गणले जाण्याकरिता सेवकीय प्रशिक्षण आणि दीक्षा होणे सर्वसाधारणपणे आवश्यक किंवा अपेक्षीत आहे. सेवेच्या प्रत्येक प्रवर्गासाठी मार्गदर्शक तत्वे *दीक्षेबाबतची साधनपुस्तिका* ह्यामध्ये नमूद केलेली आहेत. त्यांच्या आधारे नियुक्त सेवक म्हणून गणले जाण्याकरिता आवश्यक पात्रता समजण्यास प्रांतिक मंडळांना साहाय्य होईल. केवळ नियुक्त सेवकच प्रांतिक परिषदेचे मतदान करणारे सभासद असतील.

**५०४.१** विशिष्ट कार्यासाठी नियुक्त झालेल्या सर्व व्यक्तींनी त्यांची नियुक्ती करणाऱ्या प्रांतिक परिषदेला प्रत्येक वर्षी आपला अहवाल सादर करावा.

**५०४.२** विशिष्ट कार्यासाठी नियुक्त झालेल्या सर्व व्यक्ती त्यांची नियुक्ती करणाऱ्या प्रांताकडे आपल्या सेवेच्या भूमिकेसंबंधी एक प्रमाणपत्र प्रतिवर्षी विनंती करून मागून घेतील. या प्रमाणपत्रावर प्रांताध्यक्ष व प्रांतिक चिटणीस यांची स्वाक्षरी असेल.

**५०४.३** सेवेच्या विशिष्ट भूमिकेसाठी नियुक्ती झालेल्या व्यक्तींना मान्यवर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या शिफारशीने विकलांग वर्गात ठेवले असेल तर त्यांची नोंद *"नियुक्त विकलांग"* अशी करावी.

## III. सेवेच्या भूमिका

**५०५. सेवकार्याच्या भूमिका खालीलप्रमाणे आहेत:**

**५०६. व्यवस्थापक.**

व्यवस्थापक हा दीक्षित अथवा साहाय्यक सेवक (डिकन) असून तो एकतर प्रमुख अधिकारी म्हणून प्रमुख परिषदेने निवडलेला असतो किंवा तो प्रमुख मंडळींमध्ये सेवा करण्याकरिता सेवक प्रवर्गामधून निवडलेला किंवा नियुक्त केलेला असतो. व्यवस्थापक

हा प्रांतिक परिषदेने प्रांताध्यक्ष म्हणून निवडलेला दीक्षित किंवा प्रांतामध्ये त्याच्या किंवा तिच्या प्राथमिक सेवेच्या कामाकरिता सेवकीय प्रवर्गाच्या सभासदांमधून निवडलेला किंवा नियुक्त केलेला सुध्दा असू शकेल. अशी व्यक्ती ही नियुक्त सेवक असेल.

**५०७. उपाध्याय (चॅपलेन)**.

चॅपलेन हा असा दीक्षित सेवक आहे की ज्याला लष्कर, संस्था किंवा औद्योगिक क्षेत्रात चॅपलेनची विशिष्ट सेवा करण्याबाबत दैवी पाचारणाची खात्री आहे असे वाटते. ज्यांना चॅपलेन पदाची सेवा करण्याची इच्छा आहे त्यांना त्यांच्या प्रांताध्यक्षाकडून मंजूरी आवश्यक आहे. जे दीक्षित सेवक चॅपलेन म्हणून सेवा करीत आहेत त्याचे/तिचे प्राथमिक काम हे नियुक्त सेवक म्हणून असेल आणि त्याने/तिने प्रांतिक परिषदेला प्रतिवर्षी आपला अहवाल सादर करावा आणि प्रांतिक सल्लागार मंडळाच्या आणि प्रांताध्यक्ष्यांच्या सल्ल्याचा योग्य तो आदर करावा. चॅपलेन हा/ही अधिकृतरित्या स्थापन झालेल्या चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळीशी सल्लामसलत करून चर्च ऑफ दी नॅझरीन मंडळीमध्ये सहभागीता सभासदांचा स्वीकार करू शकतो/शकते, बंधारण पुस्तकाशी सुसंगत संस्कारविधी चालवू शकतो/ते, पाळकीय काळजी पुरवू शकतो/ते, दुखि:तांचे सांत्वन करणे, प्रोत्साहन देणे आणि निषेध करणे आणि पापी लोकांचा पालट करण्यासाठी सर्व मार्गांनी प्रयत्न करणे, विश्वासणाऱ्यांचे पवित्रीकरण आणि देवाच्या लोकांची अतिपवित्र विश्वासात वाढ होण्याकरिता श्रम करणे ही सर्व सेवेची कार्ये पार पाडू शकतो. (५१९, ५३८.९, ५३८.१३)

**५०८. सेविका (डिकनेस).**

जी स्त्री चर्च ऑफ दी नॅझरीनची सभासद असून जिला देव आपणांस पुढील सेवाकार्ये करण्यास पाचारण करीत असल्याची खात्री आहे असे वाटते: आजारी व गरजवंतांची सेवा करणे, दुःखितांचे सांत्वन करणे आणि ख्रिस्ती परोपकाराची इतर सेवाकार्ये करणे आणि जिने आपल्या आचरणांद्वारे क्षमता, कृपा व उपयुक्तता यांचे प्रमाण पटवले आहे, आणि जी वर्ष १९८५ पूर्वीपासून सनदप्राप्त किंवा समर्पित सेविका (डिकनेस) म्हणून सेवा करीत होती ती त्याच पदावर पुढेही कार्यरत राहील. तथापि ज्या स्त्रियांना उपदेश करण्याच्या सेवेव्यतिरिक्त पूर्णवेळ सेवेसाठी पाचारण झाले आहे, त्या सेविका वर्गात (डिकनेस) दीक्षा होण्यासाठी आवश्यक त्या सर्व पात्रतांची पूर्तता करतील. दयार्थ सेवांसाठी अधिकार प्रमाणपत्र मिळावे अशी इच्छा बाळगणाऱ्या स्त्रियांनी सामान्य (ले)

सेवकांसाठी आवश्यक त्या सर्व पात्रतांची पूर्तता करण्याकडे लक्ष द्यावे. (११३.९, ५०३.२-५०३.९)

**५०९. शिक्षक.** शिक्षक हा दीक्षित, सेवक, सनदी सेवक किंवा सामान्य सभासद म्हणून चर्च ऑफ दी नॅझरीनच्या एखाद्या शिक्षण संस्थेत व्यवस्थापकीय कर्मचारी अथवा शिक्षक ह्या नात्याने सेवा करण्यास नोकरीवर ठेवलेला व्यक्ती असेल. प्रांत अशा व्यक्तीला प्रांतातील सेवाकार्याकरिता शिक्षक म्हणून नियुक्त करू शकेल.

**५१०. सुवार्तिक.** सुवार्तिक म्हणजे असा दीक्षित किंवा सनदी सेवक/सेविका आहे जो/जी प्रवास करून सुवार्ता संदेश देण्याचे कार्य करण्यास समर्पित आहे आणि मंडळीने त्याला/तिला संजीवन व प्रभू येशू ख्रिस्ताचे शुभवर्तमानाचा प्रसार करण्यास अधिकार दिलेला आहे. चर्च ऑफ दी नॅझरीन फिरता सुवार्ताप्रसार करण्याच्या तीन पातळ्या मान्य आहेत आणि ज्यावर प्रांतिक परिषदेला सेवकांची नियुक्ती करता येईल. त्या पातळ्या अशा: नोंदणीकृत सुवार्तिक, नियुक्त सुवार्तिक आणि पदावधित किंवा विशिष्ट कार्यकाळाकरिता नियुक्त सुवार्तिक. जो/जी सुवार्तिक आपल्या मंडळीबाहेर आपले प्रमुख कर्तव्य म्हणून पूर्ण वेळ सुवार्ताप्रसार कार्याला देतो/देते आणि जो/जी कोणत्याही खात्याशी किंवा संस्थेशी सेवानिवृत्ती संबंध ठेवीत नाही असा/अशी सुवार्तिक नियुक्त सेवक असेल.

**५१०.१.** नोंदणीकृत सुवार्तिक हा असा दीक्षित सेवक किंवा प्रांतिक सनदी सेवक आहे की, ज्याने/जिने सुवार्ताप्रसारकार्य हीच आपली प्रमुख सेवा असेल अशी इच्छा दर्शविली आहे. अशी नोंदणी एक वर्षाच्या काळासाठी असेल. या नोंदणीचे नुतनीकरण हे पुढील प्रांतिक परिषदांमध्ये त्याच्या/तिच्या मागील वर्षातील सुवार्ताप्रसार कार्याची गुणवत्ता आणि प्रमाण या दोन्हींचा आढावा घेऊन करण्यात येईल.

**५१०.२.** नियुक्त सुवार्तिक हा दिक्षित असून त्याने नोंदणीकृत सुवार्तिकासाठी असलेल्या सर्व आवश्यक पात्रतांची पूर्तता दोन पूर्ण वर्षे केलेली असेल. ही नियुक्ती एका वर्षासाठी असेल आणि पुढील परिषदा आवश्यक त्या सर्व पात्रता सातत्याने पूर्ण करण्याऱ्या सेवकाच्या नियुक्तीचे नुतनीकरण करू शकतील.

**५१०.३.** पदावधित सुवार्तिक किंवा विशिष्ट कार्यकाळाकरिता नियुक्त सुवार्तिक हा असा दीक्षित किंवा सनदी सेवक आहे की, ज्याने नियुक्त सुवार्तिकासाठी आवश्यक सर्व पात्रता ह्या पदावधित सुवार्तिक पदासाठी अर्ज करण्यापूर्वीपासून पूर्ण आणि सलग चार

वर्षेचा काळ पूर्ण केलेल्या असतील आणि प्रांतिक सेवकीय परवाना मंडळाने किंवा प्रांतिक सेवा मंडळाने त्याची/तिची शिफारस केलेली असेल आणि प्रमुखाध्यक्ष मंडळाने आणि देव-पाचारीत सुवार्तिक हितैषी समितीने मान्यता दिलेली असेल. पदावधित सुवार्तिकाने नियुक्त सुवार्तिकांच्या आवश्यक पात्रतांची पूर्तता करण्याचे थांबवेपर्यंत किंवा त्याला/तिला सेवानिवृत्तीचा दर्जा दिल्या जाईपर्यंत त्याच्या सेवेची भुमिका चालू राहील. (२३१.२, ५३६)

**५१०.४.** मंडळी आणि पाळकीय संबंध ह्यांच्या पुन:परीक्षनासारखेच पदावधित भुमिकेकरिता नियुक्तीनंतर नियमीत स्व-मूल्यांकन आणि पुन:परीक्षण सुवार्तिक आणि प्रांताध्यक्षांनी मिळून कमीत कमी प्रत्येक चार वर्षांनी करणे आवश्यक आहे. सुवार्तिकाशी सल्लामसलत करून या पुन:परीक्षण सभेचे आयोजन व पूर्ती करण्याची जबाबदारी प्रांताध्यक्षाची असेल. ह्या सभेची पूर्ती झाल्यानंतर तिच्या परिणामांचा अहवाल देव पाचारीत सुवार्तिक हितैषी समितीकडे पात्रता आवश्यकतेचे मूल्यांकन आणि निरंतर मंजुरीसाठी पाठविला जाईल. (२११.२१)

**५१०.५.** एखादा दीक्षित अगर सनदी सेवक मंडळी अगर मंडळीच्या कोणत्याही विभागाशी सेवानिवृत्ती संबंध ठेवून असेल आणि आपण संजीवन सभा अथवा सुवार्ताप्रसार सभा यांच्याद्वारे सेवकीय कार्य करावे अशी इच्छा व्यक्त करत असेल तर त्याला “निवृत्त सुवार्ताप्रसार सेवा” असे प्रमाणपत्र देता येईल. हे प्रमाणपत्र प्रांताध्यक्षांच्या शिफारशीने प्रांतिक परिषदेचे मतदान घेऊन एका वर्षासाठी देता देईल आणि सदर प्रमाणपत्राचे नुतनीकरण पुढील प्रांतिक परिषदांमध्ये परिषदेपूर्वीच्या वर्षात प्रत्यक्ष सुवार्ताप्रसार कार्याचा आढावा घेऊन करता येईल.

**५१०.६.** दोन प्रांतिक परिषदांच्या दरम्यानच्या काळात, आपण सुवार्ताप्रसार कार्यक्षेत्रात जावे असे एखाद्या दीक्षिताला किंवा सनदी सेवकाला वाटले, तर प्रांताध्यक्षांच्या शिफारशीने, जागतिक सेवकीय विकास प्रमुख कार्यालय त्याला मान्यता देऊ शकेल. त्याची नोंदणी करणे व त्याला नियुक्त करणे हे प्रांताध्यक्षांच्या शिफारशीने, प्रांतिक परिषद मतदानाने ठरवील.

**५१०.७.** सुवार्तिकांच्या भूमिका प्रमाणित करण्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे आणि कार्यपद्धती दीक्षेबाबतच्या सेवकीय साधनपुस्तिके मध्ये नमूद केल्या आहेत.

**५११. ख्रिस्ती शिक्षण सेवक.** स्थानिक मंडळीच्या ख्रिस्ती शिक्षण कार्यक्रमामध्ये सेवकीय क्षमतेमध्ये सेवारत असलेल्या सेवक वर्गातील सभासदाला ख्रिस्ती शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती देता येईल.

**५११.१.** १९८५ पूर्वीच्या वर्षामध्ये ज्या व्यक्तीला ख्रिस्ती शिक्षणसेवक म्हणून सनद किंवा नियुक्ती दिली होती ती आपली सेवा चांगल्या योग्यतेनुसार सुरू ठेऊ शकेल. तथापि, ज्यांना ख्रिस्ती शिक्षणसेवक म्हणून भूमिका बजावण्यास आरंभ करावयाचा आहे, अशांनी सहाय्यक सेवक (डिकन) म्हणून दीक्षा होण्यासाठी, आवश्यक पात्रता पूर्ण करणे आवश्यक आहे. कारण या सेवेसाठी सेवकांची दीक्षा होणे हेच अधिकार प्रमाणपत्र असेल.

**५१२. संगीत सेवक.** चर्च ऑफ दी नॅझरीनच्या ज्या सभासदाला संगीत सेवेसाठी पाचारण झाले आहे असे वाटते त्याला प्रांतिक परिषद एका वर्षासाठी संगीत सेवक म्हणून नियुक्त करू शकेल. मात्र अशा व्यक्तीने पुढील अटींची पूर्तता केलेली असावी:

१. तो/ती ज्या स्थानिक मंडळीचा सभासद आहेत त्या मंडळीच्या पंचमंडळाने ह्या सेवेसाठी त्याची/तिची शिफारस केलेली असावी;

२. त्याने/तिने सद्गुण, देणग्या आणि उपयुक्तता यांचे प्रमाण पटवलेले असावे.

३. त्याला/तिला संगीतसेवेचा कमीत कमी एक वर्षाचा अनुभव असावा.

४. त्याने/तिने मान्यताप्राप्त शिक्षकाकडे कमीतकमी एक वर्ष कंठसंगीताचा अभ्यास केलेला असावा, तसेच संगीतसेवकांसाठी नेमलेला किंवा तत्सम अभ्यासक्रम तो/ती करीत असावा किंवा सदर अभ्यासक्रम त्याने/तिने पूर्ण केलेला असावा.

५. संगीत सेवक म्हणून तो/ती नियमीत कार्यरत असावा/वी.

६. ज्या प्रांतिक परिषदेच्या हद्दीमद्धे त्याचे/तिचे मंडळीचे सभासदत्व आहे त्या प्रांतिक परिषदेच्या मार्गदर्शनाखाली सदर व्यक्तीचे बौद्धिक, आध्यात्मिक क्षमता आणि अशा कामासाठी आवश्यक ती सर्वसामान्य तंदुरुस्ती याबाबतीत काळजीपूर्वक परीक्षण केलेले असावे. (२०५.१००)

**५१२.१.** ज्या व्यक्ती या सेवेला आपले आद्य कर्तव्य आणि व्यवसाय मानून आपला पूर्ण वेळ देतात आणि ज्यांना सेवकीय अधिकार प्रमाणपत्र प्राप्त आहे अशांनाच नियुक्त सेवक असे मानण्यात येईल.

**५१३. ख्रिस्तप्रचारक (मिशनरी).** ख्रिस्तप्रचारक (मिशनरी) सेवकवर्गाचा सभासद किंवा सामान्य सभासद असून जागतिक सेवाकार्य विभागाच्या देखरेखीखाली सेवा करतो. नियुक्त केलेला आणि अधिकार प्रमाणपत्र असणाऱ्या ख्रिस्तप्रचारकाला नियुक्त सेवक असे मानण्यात येईल.

**५१४. पाळक.** पाळक हा दिक्षित सेवक किंवा सनदी सेवक आहे की जो देवाच्या व त्याच्या लोकांच्या पाचरणास अनुसरून स्थानिक मंडळीची देखभाल करतो. स्थानिक मंडळीची जबाबदारी सांभाळणारा पाळ्क नियुक्त सेवक आहे असे मानण्यात येईल. (११५, २१३, ५३३.४)

**५१५.** पाळकाची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत:

**५१५.१.** प्रार्थना करणे.

**५१५.२.** वचनाची घोषणा करणे.

**५१५.३.** सेवकार्याच्या कामासाठी संतांना सुसज्ज करणे.

**५१५.४.** बाप्तिस्मा आणि प्रभूभोजनाचे विधी चालवणे. प्रभूभोजनाचा विधी हा प्रत्येक तीन महिन्यातून एकदा तरी चालवावा. या कृपेच्या साधनाचा उत्सव होईल तितक्या जास्त वेळेस साजरा करण्यासाठी पाळकांना प्रोत्साहित केले जाते. ज्या सनदी सेवकाने परिच्छेद ५३२.७ मधील तरतुदींचे पालन केलेले नसेल, ते हा विधी चालविण्याकरिता दीक्षित सेवकाची व्यवस्था करतील. स्थानिक सनदी सेवक बाप्तिस्म्याचा किंवा प्रभूभोजनाचा विधी चालविण्यास पात्र नाहीत. जे सभासद आजाराने किंवा विशिष्ट कारणांनी घरातच राहातात त्यांना मंडळीतील मुख्य पाळकांच्या देखरेखीखाली प्रभुभोजन देणाबाबत तरतूद केल्या जावी. (५३१.७, ७००)

**५१५.५.** आजारी व गरजू व्यक्तींची पाळ्कीय भेट घेऊन काळजी पुरविणे.

**५१५.६.** शोकग्रसतांचे सांत्वन करणे.

**५१५.७.** सहनशीलतेने बोध करून सुधारणूक, दोष लावणे आणि प्रोत्साहन देणे.

**५१५.८.** पाप्यांचा पालट, पालट झालेल्यांचे पूर्ण पवित्रीकरण आणि देवाच्या लोकांची पवित्रतेमध्ये वाढ ह्याकरिता झटणे. (१९).

**५१५.९.** पवित्र विवाह विधी चालविण्यासंबंधी आवश्यक ती काळजी घेणे. पाळक त्यांच्या स्वत:च्या वैवाहिक जीवनाच्या अवस्थेकडे काळजीपूर्वक लक्ष देण्याद्वारे,

संप्रेषणाच्या सर्व प्रकारांद्वारे, इतरांना सेवा पुरविण्याद्वारे आणि विवाहपूर्व समुपदेशन व विवाह विधी चालविण्याद्वारे ख्रिस्ती विवाहाचे पावित्र्य जाहीर करतील. (५३८.१९)

**५१५.१०.** लोकांना ख्रिस्ती सेवाकार्याबद्दल वाटत असलेल्या पाचरणाचे संगोपन करणे आणि अशा व्यक्तींचे सदुपदेशन करून त्यांना सेवेची योग्य तयारी करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

**५१५.११.** आजीवन शिक्षणाच्या कार्यक्रमाबाबत देव आणि मंडळीच्या अपेक्षांची पूर्ती करणे. (५३८.१८)

**५१५.१२.** वर्षानुवर्षाच्या सेवाकार्याद्वारे स्वत:च्या पाचरणाचे संगोपन करणे, स्वतःच्या आत्म्यास समृद्ध करणाऱ्या वैयक्तिक भक्तीमय जीवनाचा प्रतिपाळ करणे, आणि विवाहित असल्यास वैवाहिक नात्यातील प्रामाणिकता आणि चैतन्य राखणे.

**५१६. पाळकाची प्रशासकीय कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेतः**

**५१६.१.** परिच्छेद १०७ आणि १०७.१ नुसार व्यक्तींना स्थानिक मंडळीचे सदस्य म्हणून स्वीकारणे.

**५१६.२.** स्थानिक मंडळीतील सर्व कार्यविभागांवर देखरेख ठेवणे.

**५१६.३.** परिच्छेद १४५.८. च्या अनुषंगाने रविवारची शास्त्रशिक्षण शाळा/ पवित्र शास्त्र अभ्यास/लहान गटातील शिक्षकांची नियुक्ती करणे.

**५१६.४.** दरवर्षी चर्च ऑफ दी नॅझरीनच्या बंधारण पुस्तकातील १-२१, २८-३३ परिच्छेदांमध्ये नमुद असलेली घटना आणि ख्रिस्ती आचरणाचा करार हे दोन्ही मंडळीच्या सभासदांना वाचून दाखविणे किंवा बंधारण पुस्तकातील ह्या भागाच्या छापील प्रती मंडळीच्या सभासदांना दरवर्षी वितरीत करणे. (११४)

**५१६.५.** स्थानिक मंडळीच्या सर्व विभागांचे आकडेवारीचे अहवाल तयार करण्याच्या कामावर देखरेख ठेवणे आणि सदर अहवाल प्रांतिक सचिवांच्या द्वारे प्रांतिक परिषदेकडे तत्परतेने सादर करणे. (११४.१)

**५१६.६.** मंडळीच्या वाढीबाबत प्रांताने व प्रमुख मंडळीने ठरविलेली प्रसारात्मक ध्येये व कार्यक्रमांशी सुसंगत असे स्थानिक मंडळीतील सुवार्ताप्रसार, शिक्षण, भक्ती आणि विस्तार योजना या कार्यक्रमांचे नेतृत्व करणे.

**५१६.७.** मंडळीच्या कामकाजाच्या वार्षिक सभेमध्ये अहवाल सादर करणे. सदर अहवालात स्थानिक मंडळीचा दर्जा व तिचे विभाग यासंबंधातील अहवाल समाविष्ट असावा तसेच मंडळीच्या विभागांबाबत अभ्यास आणि/किंवा कार्यवाहीच्या भावी गरजांची रूपरेषा सादर करणे.

**५१६.८.** मंडळीच्या एखाद्या सभासदाविरुद्ध कोणी आरोपपत्र दाखल केले असल्यास तीन व्यक्तींची चौकशी समिती नेमणे. (६०५)

**५१६.९.** स्थानिक ख्रिस्तवार्ता संघाद्वारे उभारलेला जागतिक सुवार्ताप्रसार निधी, प्रमुख खजिनदाराकडे त्वरीत पाठवणे तसेच सर्व प्रांतिक सेवाकार्य निधी प्रांतिक खजिनदाराकडे त्वरीत पाठवण्याची खबरदारी घेणे. (१३६.२)

**५१६.१०.** स्थानिक मंडळीकरिता पगारी कर्मचाऱ्यांची नावे पंच मंडळाला सुचविणे आणि सदर कार्यावर देखरेख ठेवणे. (१५९.१-१५९.३)

**५१६.११.** मंडळीच्या सचिवांबरोबर स्थावर मिळकतीचे ताबापत्र, गहाणखत, गहाण सोडवणे, करारनामे आणि बंधारण पुस्तकांमध्ये ज्याविषयी तरतूद केलेली नाही अशी सर्व कायदेशीर दस्तऐवज यावर स्वाक्षरी करणे. (१०२.३,१०३-१०४.३)

**५१६.१२.** स्थानिक मंडळीचा किंवा तिचा एखाद्या विभागाचा कोणी सभासद अथवा मित्र आपला मुक्काम हलवून त्याच प्रांतिक परिषदेच्या हद्दीतील दुसऱ्या भागात वसतीसाठी जाईल आणि पूर्वीच्या स्थानिक मंडळीशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवणे त्याला कठीण असेल तर त्या सभासदाचे, मित्राचे नाव व पत्ता नजीकच्या मंडळीच्या पाळकांना कळवणे.

**५१६.१३.** चर्च ऑफ दी नॅझरीनने स्थानिक मंडळीला दिलेल्या ध्येयानुसार जागतिक सुवार्ताप्रसार निधी, प्रांतिक सेवाकार्य निधी, आणि विभागिय किंवा राष्ट्रीय मंडळांनी प्रस्थापित केलेले कुठलेही आर्थिक ध्येय निधी पंचमंडळाच्या सहकार्याने उभारणे. (३२.२, १३०, १५३)

**५१६.१४.** एखाद्या सभासदाने विनंती केल्यावरून पाळक त्याला मंडळी सभासदत्वाचे बदलीपत्र, शिफारसपत्र किंवा सभासदत्व परिमोचन पत्र देतील. (१११-१११.१, ११२.२, ८१५-८१८).

**५१६.१५.** पाळक हे स्थानिक मंडळीचे पदसिद्ध अध्यक्ष, पंचमंडळाचे अध्यक्ष, आणि ते सेवारत असलेल्या स्थानिक मंडळीच्या इतर सर्व निवडलेल्या व स्थायी मंडळांचे व

समित्यांचे सभासद असतील. पाळकाला स्थानिक मंडळीची सर्व कागदपत्रे बघण्याचा अधिकार असेल. (१२७, १४५, १५०, १५१, १५२.१)

**५१७.** पाळकांना स्थानिक मंडळीतील सर्व विभागप्रमुख आणि कोणत्याही नॅझरीन बालसंगोपन/शाळा (जन्मापासून तर माध्यमिक पर्यंत) संस्थेचे प्रमुख यांचे नामनिर्देशन करण्याचा हक्क राहील.

**५१८.** पाळक अथवा त्याच्या तत्काळ कुटुंबातील इतर कोणतेही सदस्य स्थानिक मंडळीवर आर्थिक बोजा निर्माण करणे, पैसे खर्च करणे, पैसे मोजणे किंवा मंडळीच्या आर्थिक खात्यांची अप्रतिबंधीत हाताळणी ह्या बाबी करणार नाहीत. तथापि पंच मंडळ व मंडळीची सभा ही बहुमताने ह्याकरिता अपवादाची मागणी प्रांतिक सल्लागार मंडळ व प्रांताध्यक्षांकडे करू शकतात. जर प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार मंडळाने बहुमताने हा अपवाद मान्य केला तर प्रांताध्यक्ष हे पंच मंडळाच्या सचिवाला तशी लेखी मान्यता प्रदान करतील. सचिव त्यासंबंधी मंडळीच्या अहवालात रीतसर नोंदणी करतील. तत्काळ कुटुंबामध्ये जोडीदार, मुले, भावंडे किंवा आई-वडील यांचा समावेश असेल. (१२९.१, १२९.२१-१२९.२२)

**५१९.** पाळकांनी नेहमीच प्रांताध्यक्ष व प्रांतिक सल्लागार मंडळ यांनी संयुक्तपणे दिलेल्या सल्याचा आदर करावा. (२२५.२, ५३८.२)

**५२०.** प्रांतिक परिषदांच्या दरम्यानच्या काळात दुसऱ्या संस्थेची अधिकार प्रमाणपत्रे सादर करून स्थानिक मंडळींमध्ये सभासदत्व मिळण्यासाठी एखाद्या दीक्षित किंवा सनदी सेवकाने विनंती अर्ज केला तर प्रांतिक सल्लागार मंडळाकडून यासंबंधात अनुकूल शिफारस मिळाल्याशिवाय पाळक अशा अर्जदाराचा स्वीकार करणार नाही. (१०७,२२८)

**५२१.** पाळकीय अधिकारपदाची कर्तव्ये पार पाडण्याच्या संबंधात पाळक प्रांतिक परिषदेला जबाबदार राहतील. तसेच तो/ती प्रतिवर्षी या परिषदेला आपला अहवाल सादर करतील आणि आपल्या वैयक्तिक ख्रिस्ती अनुभवाची साक्ष थोडक्यात देईल. (२०५.३, ५३२.८, ५३८.९)

**५२२.** पाळक जेथे पाळकीय सेवा करीत असेल त्याच मंडळीचा आपोआप सभासद होईल, मात्र त्याच्या/तिच्या देखरेखीखाली एकापेक्षा अधिक मंडळ्या असतील, तर तो/ती त्यापैकी आपल्या पसंतीच्या मंडळीचा सभासद होईल. ( ५३८.८)

**५२३. पाळकीय सेवेमध्ये** पाळक, किंवा सहाय्यक पाळकांची योग्य प्रशासकिय, सनद प्रदानकारी आणि मान्यता देणाऱ्या मंडळांद्वारे स्वीकारून मान्य करण्यात आलेल्या विशेष सेवाक्षेत्रांमधील सेवा समाविष्ट आहे. सेवकवर्गातील पाळक मंडळीच्या संदर्भात ह्या सेवेच्या कुठल्याही स्तरांवरील सेवेस पाचारण झालेला असल्यास त्याला नियुक्त सेवक मानण्यात येईल.

**५२४. हंगामी पाळक.** प्रांताध्यक्षांना हंगामी पाळक नेमण्याचा अधिकार असेल. हंगामी पाळक पुढील नियमांच्या आधीन राहून सेवा करील:

१. हंगामी पाळक हा चर्च ऑफ दी नॅझरीनमध्ये कुठलीतरी नियुक्त सेवा करणारा सेवक वर्गाचा सभासद किंवा सनदी सेवक किंवा सामान्य सेवक, दुसऱ्या संस्थेतून बदलून येण्याची प्रक्रिया चालू असलेला सेवक किंवा दुसऱ्या संस्थेचा सेवक यापैकी कोणीही असेल.

२. उपदेश करणे आणि अध्यात्मिक सेवा पुरवणे यांसाठी हंगामी पाळकांची तात्पुरती नेमणूक करण्यात येईल आणि त्याला इतर कोणत्या आधाराने प्राप्त अधिकार नसेल तर त्याला संस्कार विधी चालविण्याचा अथवा विवाह विधी संपन्न करण्याचा अधिकार मिळणार नाही. तसेच त्याला/तिला चर्च ऑफ दी नॅझरीनच्या प्रांताध्यक्षांनी मंडळीमध्ये अधिकार दिलेला असल्याशिवाय तो/ती मंडळीचा वार्षिक अहवाल सादर करणे या व्यतिरिक्त पाळकाचे कोणतेही व्यवस्थापकीय काम करणार नाही.

३. हंगामी पाळक ज्या मंडळीत सेवा करीत असेल त्या मंडळीत त्याचे सभासदत्व आपोआप बदलून येणार नाही.

४. हंगामी पाळक इतर कुठल्या हक्काने असल्याशिवाय प्रांतिक परिषदेचा मतदानाचा हक्क नसलेला सभासद असेल.

५. हंगामी पाळकाला कोणत्याही वेळी काढून टाकण्याचा, त्याच्या जागी दुसऱ्याला नेमण्याचा अधिकार प्रांताध्यक्षांना आहे.

**५२५. मूळ-मंडळी सलग्नित पाळक.** एखादा दीक्षित अथवा सनदी सेवक मूळ-मंडळी सलग्नित मंडळीचे नेतृत्व करीत असेल तर तो नियुक्त सेवक असेल आणि प्रांत त्याला मूळ-मंडळी सलग्नित पाळक म्हणून नियुक्त करू शकेल.

**५२६. अंतरिम पाळक.** एखाद्या दीक्षित पाळकाला प्रांतिक परिषद प्रांताध्यक्षांच्या आणि प्रांतिक सल्लागार मंडळाच्या शिफारसीने प्रांतिक अंतरिम नियुक्त पाळक म्हणून मान्यता

देऊ शकते आणि प्रांताध्यक्ष आणि स्थानिक मंडळीच्या पंचमंडळाने पाचारण केल्यावर तो/ती त्या मंडळीवर अंतरिम सेवा करू शकतो/ते. (२१२.२)

**५२७. गायक सुवार्तिक.** गायक सुवार्तिक हा चर्च ऑफ दी नॅझरीनचा असा सभासद असेल जो संगीताच्या द्वारे सुवार्ताप्रसार सेवा करण्याकरिता आपल्या वेळेचा बहुतांश भाग देण्याचा हेतू व्यक्त करतो. जो गायक सुवार्तिक सेवकीय अधिकार प्रमाणपत्र धारण करतो आणि सुवार्ताप्रसार हे ज्याचे प्रमुख सेवाकार्य आहे, आणि जो मंडळी किंवा मंडळीच्या कोणत्याही विभागाशी किंवा संस्थेशी सेवानिवृत्ती संबंध जोपासत नाही तो नियुक्त सेवक असेल.

**५२७.१.** गायक सुवार्तिकाच्या भुमिकांबाबत प्रमाणपत्र प्रदान करण्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे आणि प्रक्रिया *दीक्षेसंबंधीच्या साधनपुस्तिकेत* नमुद केलेल्या आहेत.

**५२८. विशेष सेवा.** सेवेत सक्रिय असलेला सेवकवर्गाचा सभासद इतर प्रकारे तरतूद केली नसेल आणि प्रांतिक परिषदेने असल्या सेवेला मान्यता दिलेली असेल तर विशेष सेवेवर नियुक्त केल्या जाऊ शकेल. प्रांत त्याची नोंद नियुक्त सेवक म्हणून करील. ज्या व्यक्तीला विशेष सेवेसाठी नेमलेले आहे त्याने/तिने चर्च ऑफ दी नॅझरीनशी संबंध टिकवून ठेवणे आवश्यक असून त्याने/तिने प्रांतिक सल्लागार मंडळ, प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ आणि प्रांतिक सेवा मंडळाकडे चर्च ऑफ दी नॅझरीनशी टिकवून ठेवलेल्या संबंधाच्या स्वरूपाचा अहवाल प्रतिवर्षी सादर करणे आवश्यक आहे.

**५२८.१.** सेवक या नात्याने मंडळीशी संबंधीत संस्थेत अधिकारी म्हणून मंडळीची सेवा करणाऱ्या सेवक वर्गाच्या सभासदाला किंवा त्याच्या/तिच्या प्रांतिक सल्लागार मंडळ आणि प्रांतिक परिषदेने त्याचे/तिचे यथार्थ मूल्यमापन करून शिक्षण संस्थेत, सुवार्ताप्रसारात्मक संस्थेत किंवा संस्थेशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या मिशनरी संस्थेत सेवा करण्याची मान्यता दिली असेल, तर परिच्छेद ५३८.१३ च्या अधीन असलेल्या विशेष सेवेवर त्याची नियुक्ती केली जाऊ शकेल.

**५२८.२.** सेवक वर्गाचा एखादा सभासद अल्प कालावधीकरिता एकापेक्षा अधिक सेवांवर नियुक्त असेल किंवा रजेवर असेल तर त्या दरम्यानच्या कालावधीत अशा सभासदाला प्रांतिक सल्लागार मंडळाद्वारे प्रांताध्यक्षांच्या शिफारसीनुसार विशेष सेवेवर नियुक्त केले जाऊ शकते.

# प्रकरण ४थे

# सेवकवर्गाचे शिक्षण

## A. दिक्षित सेवाकार्यासाठी शैक्षणिक पाया

**५२९.** सेवकीय प्रशिक्षण हे देवपाचारीत आणि सुवार्ताप्रसाराची संधी असलेल्या क्षेत्रांमध्ये पवित्रतेच्या संदेशाचा प्रसार आणि विस्तार करण्यामध्ये महत्वाची सेवा करणाऱ्या सेवकांना प्रशिक्षित करण्यासाठी योजिलेले आहे. ख्रिस्ताने आपल्या मंडळीला मत्तय २८:१९-२० मध्ये दिलेल्या महान आज्ञेवर आधारीत "राष्ट्रांमध्ये ख्रिस्त सादृश्य शिष्य बनविणे" ह्या आमच्या सेवाकार्याचे ध्येय स्पष्टपणे समजून घेण्याचे महत्त्व आम्ही ओळखतो. बहुतांश तयारी ही प्रामुख्याने ईश्वरविज्ञानात्मक आणि पवित्रशास्त्रोक्त स्वरूपाची असून, चर्च ऑफ दी नॅझरीनमध्ये सेवाकार्यासाठी दीक्षेप्रती नेणारी आहे. प्रांतिक सेवाकीय अभ्यास मंडळ प्रत्येक विद्यार्थ्याच्या अभ्यासक्रमातील अवस्था निश्चित करून त्याच्या किंवा तिच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाच्या प्रगतीचे मूल्यांकन करेल.

**५२९.१.** चर्च ऑफ दी नॅझरीन जगभरामध्ये विविध प्रकारच्या शैक्षणिक संस्था आणि अभ्यासक्रम प्रदान करते. सेवेकरिता शैक्षणिक पाया प्रदान करण्यासाठी काही जागतिक क्षेत्रांची संसाधने एकापेक्षा जास्त अभ्यासक्रम विकसित करण्याची परवानगी देतात. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या जागतिक विभागामध्ये त्याच्या किंवा तिच्या मंडळीद्वारे प्रदान केलेल्या योग्य त्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाचा लाभ घ्यावा अशी अपेक्षा आहे. जेव्हा शक्य नसेल तेव्हा, देवाकडून पाचारण झालेल्या प्रत्येक व्यक्तीला मंडळीतील सेवाकार्याकरिता तयार करण्यासाठी मंडळीने वितरण प्रणालीत हवी तितकी लवचिकता वापरावी. विद्यार्थ्यांनी प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळाद्वारे निर्देशित आणि पर्यवेक्षित किंवा नॅझरीन उच्च शिक्षण संस्थेने विकसित आणि वितरीत केलेल्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाचा उपयोग करावा. मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाच्या प्रत्येक अभिव्यक्तीमध्ये दिक्षेकरिता *विकासात्मक मानदंडांची आंतरराष्ट्रीय हस्तपुस्तिका* आणि *दिक्षेबाबत विभागिय हस्तपुस्तिका* ह्यामध्ये नमूद केलेल्या सामान्य मानकांचा समावेश केला पाहिजे.

**५२९.२.** जेव्हा एखादा सनदी सेवक मान्यताप्राप्त अभ्यासक्रम समाधानकारक रीतीने पूर्ण करेल तेव्हा शिक्षण प्रदात्याने सनदी सेवकाला अभ्यासक्रम पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र प्रदान करावे. मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातून पदवीधर होण्यासाठी प्रांतिक

परिषदेला शिफारस करण्यासाठी जबाबदार असलेल्या प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळाला सनदी सेवकाने आपले अभ्यासक्रम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र सादर करावे.

**५२९.३. सेवकीय पूर्वतयारीसाठी प्रमुख अभ्यासक्रम विभाग.**

जरी अनेकदा अभ्यासक्रमाबाबत केवळ शैक्षणिक कार्यक्रम आणि पाठ्यक्रमाचा मजकूर म्हणून विचार केला जात असला तरी ही संकल्पना फार मोठी आहे. संपूर्ण अभ्यासक्रम तयार करण्यासाठी प्रशिक्षकाची पात्रता, विद्यार्थ्यांचे आणि प्रशिक्षकाचे नातेसंबंध, वातावरण आणि विद्यार्थ्यांचे भूतकाळातील अनुभव हे अभ्यासक्रमाच्या मजकूरासह सामील होतात. तथापि, सेवकीय पूर्वतयारीच्या अभ्यासक्रमात सेवाकार्याला शैक्षणिक पाया पुरविणाऱ्या किमान विषयांचा संच समाविष्ट असेल. सांस्कृतिक फरक आणि विविध साधनांसाठी अभ्यासक्रमाच्या रचनेमध्ये भिन्न तपशील आवश्यक असेल. तथापि दीक्षित सेवाकार्यासाठी शैक्षणिक पाया पुरविणारे सर्व कार्यक्रम जे जागतिक सेवक विकास मंडळाद्वारे मान्यताप्राप्त करू इच्छितात त्यांनी आपल्या कार्यक्रमांमध्ये आशय, कार्यक्षमता, चारित्र्य आणि संदर्भ या गोष्टींकडे काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे. या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाचा उद्देश असा आहे की त्यामध्ये या चारही घटकांचा कमी-अधिक प्रमाणात समावेश असेल आणि याद्वारे सेवकांना जागतिक प्रमुखाध्यक्षांच्या मंडळाद्वारे सहमती दर्शविलेल्या चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मिशन विधानाची पूर्ती करण्यास मदत होईल.

मिशन विधान खालील प्रमाणे आहे:

चर्च ऑफ दी नॅझरीनचे मिशन हे "राष्ट्रांमध्ये ख्रिस्त सादृश्य शिष्य बनविणे" हे आहे.

"चर्च ऑफ दी नॅझरीनचा मुख्य उद्देश हा पवित्र शास्त्रामध्ये सांगितल्यानुसार ख्रिस्ती पवित्रतेचे जतन व प्रसार करून देवाच्या राज्याची वाढ करणे हा आहे." "चर्च ऑफ द नॅझरीनची महत्वाची उद्दिष्टे म्हणजे पवित्र ख्रिस्ती सहभागीता, पाप्यांचा पालट, विश्वासणाऱ्यांचे संपूर्ण पवित्रीकरण, त्यांची पवित्रतेमध्ये उभारणी आणि नवीन करारातील आरंभीच्या मंडळींमध्ये दिसून आलेला साधेपणा व आध्यात्मिक सामर्थ्य प्रकट करणे आणि हे प्रत्येक प्राणी मात्राला सुवार्तेच्या घोषणेसह करणे." (१९)

मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाचे वर्णन खालील वर्गांमध्ये केले आहे:

- **आशय** — जुन्या आणि नवीन करारातील मजकूर, ख्रिस्ती विश्वासाचे ईश्वरविज्ञान, आणि मंडळीचा इतिहास आणि मिशन ह्या सर्व बाबींचे ज्ञान सेवेसाठी आवश्यक आहेत. पवित्र शास्त्राच्या अर्थविवरणाचे ज्ञान,

पवित्रीकरणाचा सिद्धांत आणि आपले वेस्लीप्रणित अनन्यत्व आणि चर्च ऑफ दी नॅझरीनचा इतिहास व शासनव्यवस्था या विषयांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश असणे आवश्यक आहे.

- **कार्यक्षमता**— तोंडी आणि लेखी संप्रेषण, व्यवस्थापन आणि पुढारीपण, वित्त आणि विश्लेषणात्मक विचार ह्यां सर्वातील कौशल्य हे देखील सेवाकार्यासाठी आवश्यक आहे. या क्षेत्रातील सामान्य शिक्षणाबरोबरच उपदेश, पाळकीय संगोपन आणि समुपदेशन, पवित्र शास्त्राचे विवरण, उपासना, प्रभावी सुवार्ताप्रसार, जीवनावश्यक संसाधनाचे पवित्रशास्त्रोक्त कारभारीपण, ख्रिस्ती शिक्षण आणि मंडळीचे प्रशासन ह्या क्षेत्रांमध्ये सुध्दा कौशल्य पुरविणाऱ्या विषयांचा समावेश करणे अत्यावश्यक आहे. मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातून पदवी प्राप्त करण्यासाठी शैक्षणिक प्रदाता आणि स्थानिक मंडळीची भागीदारी आवश्यक आहे ज्यायोगे त्यांनी विद्यार्थ्यांना सेवेची कार्ये आणि कार्यक्षमता विकसित करण्यासाठी मार्गदर्शन करावे.
- **चारित्र्य**— चारित्र्य, नीतितत्वे, आध्यात्मिकता आणि वैयक्तिक व कौटुंबिक नातेसंबंध ह्या मध्ये वैयक्तिक वाढ हे सेवेसाठी अत्यावश्यक आहेत. ख्रिस्ती नीतिशास्त्र, आध्यात्मिक जडणघडण, मानव विकास, सेवकाचे व्यक्तीमत्व, विवाह आणि कौटुबिक गतिशीलता ह्या क्षेत्रांना संबोधित करणारे विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करणे आवश्यक आहे.
- **संदर्भ**— सेवकाने मंडळी ज्या संस्कृतीत सेवारत आहे त्या संस्कृतीचे ऐतिहासिक आणि समकालीन संदर्भ हे दोन्ही समजून घेऊन तेथील सामाजिक वातावरण आणि जागतिक दृष्टिकोन ह्यांचा अर्थ लावणे आवश्यक आहे. मानववंशशास्त्र आणि समाजशास्त्र, आंतर-सांस्कृतिक संप्रेषण, ख्रिस्ती सेवाकार्य आणि सामाजिक अभ्यास यासंबंधीत विषयांचा सुध्दा अभ्यासक्रमामध्ये समावेश करणे गरजेचे आहे.

**५२९.४.** नॅझरिनेतर शाळांमध्ये किंवा नॅझरिनेतर शिक्षण प्रदात्यांच्या कृपाछत्रामध्ये दीक्षित सेवाकार्याच्या पूर्वतयारीचे मूल्यमापन प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळाने, विभागिय भाषा समूहाने विकसित केलेल्या दीक्षेबाबतच्या हस्तपुस्तिकेमध्ये नमूद केलेल्या अभ्यासविषयक पात्रतांच्या अनुरूप करावे.

**५२९.५.** सर्व अभ्यासक्रम, शिक्षणाविषयी आवश्यक बाबी, आणि कार्यालयीन प्रशासकीय नियम हे जागतिक सेवकीय विकास मंडळाच्या सहकार्याने विभागिय किंवा भाषा गटाने विकसित केलेल्या विभागिय दीक्षेबाबतच्या साधनपुस्तिकेमध्ये नमूद केलेले असावेत. आवश्यक त्या सुधारणांसह या विभागिय साधनपुस्तिकेला आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समितीकडून समर्थन मिळणे आवश्यक आहे आणि जागतिक सेवकीय विकास मंडळ, प्रमुख मंडळ, आणि प्रमुखाध्यक्ष मंडळ यांच्याद्वारे मान्यता मिळणे आवश्यक आहे. ही साधनपुस्तिका बंधारण पुस्तकाच्या आणि जागतिक सेवकीय विकास मंडळाच्या आणि आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समितीद्वारे प्रकाशित केलेल्या दीक्षेकरिता विकासात्मक मानदंडांबाबत आंतरराष्ट्रीय साधनपुस्तिकेच्या अनुपालनात राहील. आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समिती ही प्रमुखाध्यक्ष मंडळाद्वारे नियुक्त केली जाईल.

**५२९.६.** एकदा सेवकाने सेवा कार्यासाठी असलेला मान्यताप्राप्त अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, ते किंवा ती देवाने त्यांना पाचारण केलेल्या सेवाकार्यामध्ये विकास साधण्यासाठी आजीवन शिक्षण पद्धती चालू ठेवतील. प्रत्येक वर्षी कमीत कमी २०(वीस) आजीवन शिक्षण तास किंवा विभागिय/ भाषा गटाद्वारे निर्धारीत केलेल्या आणि त्यांच्या विभागिय दीक्षेबाबतच्या साधनपुस्तिकेमध्ये नमूद केलेल्या अभ्यासक्रमाच्या समतुल्य आजीवन शिक्षण तास पूर्ण करणे अपेक्षित आहे. सर्व नियुक्त आणि अनियुक्त दीक्षित आणि सनदी सेवक हे त्यांच्या आजीवन शिक्षण कार्यक्रमाच्या प्रगतीचा अहवाल हा प्रांतिक परिषदेला त्यांच्या वार्षिक अहवालाचा एक भाग म्हणून सादर करतील. त्याच्या किंवा तिच्या आजीवन शिक्षणाबाबतच्या अद्यावत अहवालाचा उपयोग मंडळी व पाळक नातेसंबंधाच्या पुन:परिक्षण प्रक्रियेमध्ये आणि पाळकीय सेवेला पाचारण करण्याच्या प्रक्रियेत केला जाईल. दीक्षेबाबत विभागीय साधनपुस्तिकेमध्ये त्या विभाग/भाषा गटासाठी स्वीकरणे आणि अहवाल प्रक्रियेचा तपशील असेल.

**५२९.७.** सलग दोन वर्षाहून अधिक आजीवन शिक्षणाची अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरल्यास, दीक्षित सेवकाने प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळाला त्यांच्या नियमीत बैठकीच्या वेळी भेट देणे आवश्यक राहील. प्रांतिक सेवकीय मंडळ हे सेवकाला आवश्यक आजीवन शिक्षण तास पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन करेल. (११५, १२३, ५१५.११, ५३८.१८)

## B. दीक्षित सेवाच्या शैक्षणिक पायाचे सांस्कृतिक अनुकूलन

**५३०.** जगभरातील सांस्कृतिक संदर्भाच्या विविधतांमुळे सर्व जागतिक क्षेत्रांसाठी उपयुक्त एकच अभ्यासक्रम तयार करणे अशक्य आहे. जगातील प्रत्येक विभाग हा सेवाकार्याकरिता शैक्षणिक पाया पुरविण्यासाठी विशिष्ट आवश्यक अभ्यासक्रम विकसित करून त्याद्वारे त्या जागतिक क्षेत्रांची संसाधने आणि अपेक्षा प्रतिबिंबीत होतील अशाप्रकारे प्रदान करेल. विभागाद्वारे विकसित केलेला अभ्यासक्रम राबवण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम समिती, प्रमुख मंडळ, आणि प्रमुखाध्यक्ष मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. जागतिक विभागांमध्ये सुद्धा सांस्कृतिक अपेक्षांचे आणि संसाधनांचे विविध प्रकार आहेत. परिणामी सेवाकार्याच्या शैक्षणिक पायासाठी विभागिय तरतुदी सांस्कृतिक संवेदनशीलता आणि लवचिकता दर्शविल आणि त्याचे प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळाद्वारे मार्गदर्शन व पर्यवेक्षण केले जाईल. प्रत्येक विभागाच्या सेवाकार्याला शैक्षणिक पाया पुरवणाऱ्या कार्यक्रमाच्या सांस्कृतिक अनुकूलनाला जागतिक सेवक विकास आणि आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समिती हे विभागिय शिक्षण समन्वयकाशी सल्लामसलत करून मान्यता देतील. (५२९.५)

**५३०.१.** दीक्षित आणि सेवक (डीकन) म्हणून किंवा सेवाकार्याचे विविध विभाग आणि भूमिकांसाठी प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता आवश्यक पूर्तीच्या प्रक्रियांचा समावेश असलेला मान्यताप्राप्त अभ्यासक्रम दीक्षेबाबतच्या विभागिय साधनपुस्तिकेमध्ये सापडेल.

**५३०.२.** सर्व मान्यताप्राप्त अभ्यासक्रम हा दीक्षेबाबतच्या विभागिय साधनपुस्तिकेद्वारे शासित केला जाईल. (५२९.२-५२९.३, ५२९.५)

# प्रकरण ५ वे अधिकार प्रमाणपत्रे व सेवेसंबंधी नियम

## A. स्थानिक सेवक

**५३१.** स्थानिक सेवक चर्च ऑफ दी नॅझरीनचा सामान्य सभासद असून स्थानिक पंचमंडळाने त्याला सेवेसाठी सनद दिलेली असेल. पाळकांच्या मार्गदर्शनाने आणि उपलब्ध संधीनुसार त्याच्या अंगी असणारी सेवकीय कृपादाने व उपयुक्तता यांचे प्रात्यक्षिक, कारणी लागणे आणि विकास साधने यांची तरतूद केली जाईल. तो किंवा ती आजीवन शिक्षणाच्या प्रक्रियेत प्रवेश करीत आहे.

**५३१.१.** सुवार्तेची घोषणा करण्यासाठी किंवा मंडळीच्याद्वारे जीवनभर सेवा करण्यासाठी देवाने आपणाला पाचारण केले आहे असे वाटणाऱ्या चर्च ऑफ दी नॅझरीनच्या कोणत्याही सभासदाला स्थानिक सनद एक वर्षाकरिता देता येईल. ही सनद दीक्षित पाळक असलेल्या स्थानिक मंडळीचे पंचमंडळ पाळकांच्या शिफारसीने देऊ शकेल. किंवा ज्या स्थानिक मंडळी मध्ये दीक्षित पाळक नसेल तेथे सनद देण्याविषयी पाळकांनी केलेली शिफारस प्रांताध्यक्षांनी मान्य केली तर तेथील पंचमंडळ अशी सनद देईल. परंतु त्या अगोदर उमेदवाराची पुढील बाबी संबंधाने परीक्षा घेतली पाहिजे:

त्याचा किंवा तिचा तारणाचा अनुभव, पवित्र शास्त्रातील सिद्धांतांचे ज्ञान आणि मंडळीचे शासन, तसेच त्याने किंवा तिने आपली कृपा, दाने व उपयुक्तता यासंबंधाने प्रमाण पटवून दिलेले असावे. तो किंवा ती स्थानिक मंडळीद्वारे केलेल्या पार्श्वभूमी परिक्षणास सामोरे जातील. स्थानिक सेवक स्थानिक मंडळीच्या वार्षिक कामकाजाच्या बैठकीमध्ये आपला अहवाल सादर करेल. (११३.९, १२९.१२, २११.१२)

**५३१.२.** पंचमंडळ प्रत्येक स्थानिक सेवकाला पाळक आणि पंचमंडळाचे चिटणीस यांच्या स्वाक्षरीने सनद देईल. एखाद्या मंडळीवर प्रांतिक सनद नसलेला सेवक पाठविला असेल तर त्या व्यक्तीला प्रांताध्यक्षांच्या शिफारसीने प्रांतिक सल्लागार मंडळ स्थानिक सनद देईल किंवा अशा सनदीचे नुतनीकरण करून देईल. (२११.१२, २२५.१३)

**५३१.३.** दीक्षित पाळक असणाऱ्या स्थानिक मंडळीच्या पाळकांच्या शिफारशीवरून पंचमंडळ स्थानिक सेवकाच्या सनदीचे नुतनीकरण करून देईल. परंतु ज्या स्थानिक मंडळीवर दीक्षित पाळक नसतील तेथे सनदीच्या नूतनीकरणासाठी पाळकांनी केलेल्या शिफारशीला प्रांताध्यक्षांनी दिलेल्या मान्यतेनुसार पंचमंडळ सनदीचे नुतनीकरण करून देईल. (१२९.१२, २११.१२)

**५३१.४.** स्थानिक सेवक प्रांतिक सेवकीय शिक्षण मंडळाच्या मार्गदर्शनाखाली सेवकांसाठी नेमलेला अभ्यासक्रम पूर्ण करतील. स्थानिक सेवकाने मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातील कमीत कमी दोन विषय पूर्ण केलेले नसतील तर दोन वर्षानंतर प्रांताध्यक्षांच्या लेखी अनुमतीशिवाय त्यांच्या सनदीचे नुतनीकरण करता येणार नाही.

**५३१.५.** एखाद्या स्थानिक सेवकाने कमीत कमी एक संपूर्ण वर्ष सेवा केली असेल आणि आवश्यक अभ्यासक्रम पूर्ण करून तो परीक्षा उत्तीर्ण झाला असेल तर पंच मंडळ त्याला प्रांतिक सेवकाची सनद देण्याबाबत प्रांतिक परिषदेला शिफारस करू शकेल. परंतु प्रांतिक

परिषदेने ती प्रदान करण्यास नकार दिला तर तो किंवा ती आपली पूर्वीची सेवा पुढे चालू ठेवील. (१२९.१२, ५२९, ५३२.१)

**५३१.६.** स्थानिक सेवकाची हंगामी पाळक म्हणून नेमणूक केली असेल व त्या नेमणुकी नंतरच्या प्रांतिक परिषदेच्या समाप्तीनंतर तो किंवा ती हंगामी सेवा पुढेही सुरू ठेवत असेल तर त्याला किंवा तिला प्रांतिक सेवकीय परवाना मंडळाची किंवा प्रांतिक सेवा मंडळाची मान्यता मिळणे आवश्यक आहे. (२१२, २३१.५, ५२४)

**५३१.७.** स्थानिक सेवकाला बाप्तिस्मा आणि प्रभूभोजनाचा संस्कार हे विधी चालविण्यास अपात्र राहील. त्याचप्रमाणे तो किंवा ती विवाहविधी संपन्न करणार नाही. (५३२.७)

## B. सनदी सेवक

**५३२.** सनदी सेवकाला सेवेसाठी झालेले पाचारण व त्याची दाने ही औपचारिकरित्या मान्य करून त्याला किंवा तिला प्रांतिक परिषदेने सेवकीय सनद प्रदान केलेली असते. या प्रांतिक सनद त्याला किंवा तिला स्थानिक सेवकापेक्षा मोठे सेवेचे क्षेत्र, आणि अधिक हक्क व जबाबदाऱ्यांचा अधिकार देऊन नेमणूक प्रदान करते. सर्वसाधारणत: दीक्षित किंवा सेवक (डिकन) म्हणून दीक्षा होण्याप्रती हे पाऊल असते. प्रांतिक सेवकीय सनदीमध्ये व्यक्तीची दीक्षित किंवा सेवक (डिकन) म्हणून दीक्षेप्रती तयारी करत आहे किंवा प्रांतिक सनद ही दीक्षेप्रती तयारी म्हणून नाही हे दर्शविणाऱ्या विधानाचा समावेश असावा. (५३२.७)

**५३२.१** आपणाला देवाने जीवनभर सेवाकार्यासाठी पाचारण केले आहे असे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या जे सभासद स्वीकारतात त्यांना प्रांतिक परिषद सेवक म्हणून सनद देऊ शकेल. तथापि त्यासाठी पुढील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे:

१. त्यांनी स्थानिक सेवकाची सनद पूर्ण एक वर्षभर धारण केलेली असावी,

२. सेवकांसाठी असलेल्या पहिल्या वर्षाचा अभ्यासक्रमातील एक चतुर्थांश भाग पूर्ण केलेला असावा आणि चर्च ऑफ दी नॅझरीनच्या बंधारण पुस्तक व इतिहास, आणि पवित्रीकरणाचा सिध्दांत ह्या प्रती कृतज्ञता व त्याचे आकलन आणि लागूकरण ह्या प्रती आणि घटना, बंधारण पुस्तकाचे लागूकरण ह्या बाबतचे पुरावे मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातील संबंधीत भाग यशस्वीरित्या पूर्ण करून दिलेले असावे.

३. ज्या स्थानिक मंडळी मध्ये ते सभासद आहेत तेथील पंच मंडळाने अशा सेवेसाठी त्यांची शिफारस केलेली असावी. सेवकाची सनद मिळण्यासाठी विनंती अर्ज काळजीपूर्वक पूर्ण भरून तो या शिफारस पत्राला जोडलेला असावा.

४. त्यांनी आपली कृपा, दाने व उपयुक्तता याविषयीचे प्रमाण पटविलेले असावे.

५. ते ज्या प्रांतिक परिषदेच्या हद्दीतील मंडळीचे सभासद असतील त्या परिषदेच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे अशा सेवाकार्यासाठी आध्यात्मिक, बौद्धिक, व इतर पात्रता आणि प्रांतिक सल्लागार मंडळाने ठरविल्याप्रमाणे पार्श्वभूमीचे परिक्षण केलेले असावे.

६. प्रांतिक सनद व दीक्षा प्राप्त करण्याकरिता उमेदवारांसाठी नेमलेला अभ्यासक्रम आम्ही त्वरीत सुरू करू असे अभिवचन त्यांनी दिलेले असावे.

७. एखाद्या प्रांतिक परिषदेने त्यांना अपात्र ठरवले असल्यास त्यांना जेथे अपात्र ठरवले तेथील प्रांतिक सल्लागार मंडळाने व प्रांताध्यक्षांनी लेखी खुलासा करून ती अपात्रता रद्द केलेली असावी. त्याचप्रमाणे त्यांचे वैवाहिक संबंध त्यांना प्रांतिक सनद मिळण्यात किंवा त्यांची दीक्षा होण्याकरिता अपात्र करीत नसावेत; आणि

८. जर त्यांचा पूर्वी घटस्फोट झालेला असेल तर प्रांतिक सेवकीय परवाना मंडळाची किंवा प्रांतिक सेवकीय मंडळाची शिफारस साहाय्यक कागदपत्रांसह प्रमुखाध्यक्ष मंडळाकडे केलेली असावी, ज्यायोगे सनद प्राप्त करण्याकरिता असणारे अडखळण दूर होईल.

सेवकाने चर्च ऑफ दी नॅझरीनमध्ये मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाशी समतुल्य एक चतुर्थांश भाग पूर्ण केलेला असावा. प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवा मंडळ या अटीला अपवाद करू शकेल. परंतु तसे करण्यासाठी संबंधित उमेदवार स्थापित मंडळीवर पाळक असावा, मान्यताप्राप्त अभ्यासक्रमासाठी त्यांनी आपले नाव नोंदवलेले असावे, आणि आपल्या सनदीचे नुतनीकरण करून घेण्यासाठी उमेदवाराने दरवर्षी बंधारण पुस्तकानुसार अपेक्षीत किमान अभ्यास पूर्ण करणे आवश्यक आहे, आणि या अपवादाला प्रांताध्यक्षांनी अनुमती दिलेली असावी.

एखाद्या व्यक्तीच्या पार्श्वभूमी परिक्षणादरम्यान तारण होण्या अगोदरच्या जीवनात गुन्हेगारी गैरवर्तन दिसून आल्यास, प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवा

मंडळाने त्या वास्तविकतेचा अर्थ त्या सेवकाला अधिकारप्रमाणपत्र युक्त सेवेतून आपोआप वगळण्यात यावे असा लावू नये. परिच्छेद ५४०.९ मधील तरतूद ह्याला अपवाद राहील. (१२९.१४,२०७.६, ५३१.५)

**५३२.२.** सुवार्ताप्रसारकीय मतानुसारी इतर संस्थेतील सनदी सेवक चर्च ऑफ दी नॅझरीनमध्ये सामील होऊ इच्छित असल्यास त्यांना प्रांतिक परिषदेद्वारे सेवकीय सनद देता येईल. मात्र त्यासाठी ते पूर्वी सभासद होते त्या संस्थेकडून त्यांना प्राप्त झालेली अधिकार प्रमाणपत्रे त्यांनी सादर केली पाहिजे. याखेरीज त्यांनी पुढील अटी सुध्दा पूर्ण केल्या पाहिजे:

१. चर्च ऑफ द नॅझरीनने स्थानिक सेवकांसाठी नेमलेल्या अभ्यासक्रमातील एक चतुर्थांश भागाशी समतुल्य अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा आणि चर्च ऑफ दी नॅझरीनचे बंधारण पुस्तक व इतिहास आणि पवित्रीकरणाचा सिध्दांत ह्या प्रती कृतज्ञता व त्याचे आकलन आणि लागूकरण ह्या बाबतचे पुरावे, मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातील संबंधीत भाग यशस्वीरित्या पूर्ण करून दिलेले असावे.

२. ते चर्च ऑफ दी नॅझरीनच्या ज्या स्थानिक मंडळीमध्ये सभासद आहेत तेथील पंच मंडळाने त्यांची शिफारस केलेली असावी;

३. त्यांनी कृपा, देणग्या व उपयुक्तता यांचे प्रमाण पटवलेले असावे;

४. प्रांतिक परिषदेच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे अशा सेवाकार्यासाठी आध्यात्मिक, बौद्धिक, व इतर पात्रता ह्याबाबत परिक्षण केलेले असावे;

५. सनदी सेवक व दिक्षा होण्यासाठी उमेदवारांकरिता नेमलेला अभ्यासक्रम आपण त्वरीत सुरू करून पूर्ण करण्याचे त्यांनी वचन दिलेले असावे;

६. एखाद्या प्रांतिक परिषदेने किंवा त्याच्या समतुल्य परिषदेने त्यांना अपात्र ठरवले असल्यास, त्यांना जेथे अपात्र ठरविले होते तेथील प्रांताध्यक्षांनी किंवा त्यांच्या समतुल्य अधिकाऱ्याने आणि प्रांतिक सल्लागार मंडळाने किंवा त्यांच्या समतुल्य मंडळाने लेखी खुलासा करून ती अपात्रता रद्द केलेली असावी. त्याचप्रमाणे त्यांना प्रांतिक सनद मिळण्यात त्यांच्या वैवाहिक संबंधाची कोणत्याही प्रकारे आडकाठी येत नसावी; आणि

७. जर त्यांचा पूर्वी घटस्फोट झालेला असेल तर प्रांतिक सेवकीय परवाना मंडळाची किंवा प्रांतिक सेवकीय मंडळाची शिफारस साहाय्यक

कागदपत्रांसह प्रमुखाध्यक्ष मंडळाकडे केलेली असावी, ज्यायोगे सनद प्राप्त करण्याकरिता असणारे अडखळण दूर होईल. (५३१.१)

**५३२.३.** आगामी प्रांतिक परिषद संपताच सेवकाची सनदही समाप्त होईल. ती प्रांतिक परिषद मतदानाद्वारे सनदीचे नुतनीकरण करून देऊ शकेल. त्यासाठी अटी येणे प्रमाणे आहेत:

१. सनदीचे नुतनीकरण करून मागणाऱ्या उमेदवाराने सेवकाची सनद मिळण्यासाठीचा विनंती अर्ज काळजीपूर्वक भरून प्रांतिक परिषदेकडे सादर केलेला असावा. आणि

२. उमेदवाराने त्या वर्षासाठी नेमलेल्या मानत्याप्राप्त अभ्यासक्रमातील किमान दोन विषयांचा अभ्यास पूर्ण केलेला असावा. आणि

३. उमेदवार जेथे सभासद आहे त्या स्थानिक मंडळीच्या पंच मंडळाने, पाळकांच्या नामनिर्देशानुसार त्याच्या किंवा तिच्या सनदीचे नुतनीकरण करून द्यावे अशी शिफारस केलेली असावी.

तथापि नेमून दिलेल्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाच्या परीक्षेत तो/ती उत्तीर्ण झाले नसल्यास त्याबाबत योग्य तो लेखी खुलासा सादर केल्यानंतरच प्रांतिक परिषद सदर सनदीचे नुतनीकरण करून देऊ शकेल. मात्र असा खुलासा प्रांतिक परवाना मंडळाला किंवा प्रांतिक सेवा मंडळाला समाधानकारक वाटणारा असावा व तो परिषदेच्या अध्यक्ष स्थानी असलेल्या प्रमुखाध्यक्षांनी मान्य केलेला असावा. प्रांतिक परिषद काही कारणास्तव आणि परिषदीय विवेकास्तव सेवकाच्या सनदीचे नुतनीकरण करून देण्याच्या विरोधात मतदान करू शकेल.

जे सनदी सेवक नेमून दिलेला मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाद्वारे पदवीधर झालेले आहेत, आणि ज्यांना प्रांतिक परिषदेने सेवानिवृत्त संबंधात ठेवले आहे, त्यांची सनद प्रांतिक सल्लागार मंडळाच्या शिफारशीवरून प्रांतिक सनदी सेवकाचा अर्ज भरल्याशिवाय नुतनीकरण करून दिली जाईल. (२०५.४)

**५३२.४.** दीक्षा होण्यास पात्र ठरण्यासाठी उमेदवारांनी त्यांना पहिली प्रांतिक सनद प्राप्त केल्यापासून दहा वर्षाच्या आत सर्व मान्यताप्राप्त अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केलेला असावा. याला काही असाधारण परिस्थितीमुळे अपवाद प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ

किंवा प्रांतिक सेवा मंडळ प्रदान करू शकेल अर्थात त्याला अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांची मान्यता असणे आवश्यक आहे.

एखादा सनदी सेवक जो दीक्षा प्राप्तीकरिता झटत नाही किंवा नेमलेल्या वेळेमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करण्यास अपयशी ठरल्यामुळे दीक्षेकरिता अपात्र ठरतो त्याला प्रांतिक सल्लागार मंडळ आणि प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवा मंडळ यांच्या शिफारशीवरून सेवकीय सनदीचे नुतनीकरण करून देता येईल. अशी शिफारस उमेदवाराने मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाची पदवी प्राप्त केलेली असल्यास किंवा मागील वर्षभरामध्ये मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाचे किमान दोन विषय पूर्ण केलेले असल्यास लागू होते.

**५३२.५.** जे सनदी सेवक पाळक म्हणून सेवा करीत असतील, त्यांच्या सेवकीय सनदीच्या नुतनीकरणाची शिफारस प्रांतिक सल्लागार मंडळ करेल. जे स्थानिक सनदी सेवक पाळक म्हणून सेवा करीत असतील, त्यांना सेवकीय सनद प्रदान करण्याची शिफारस प्रांतिक सल्लागार मंडळ करेल. (२२५.१३)

**५३२.६.** अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष प्रत्येक सनदी सेवकाला सेवकीय सनद प्रदान करतील व त्यावर अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष, प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक चिटणीस यांची स्वाक्षरी असेल.

**५३२.७.** सनदी सेवकांना देवाच्या वचनातून संदेश देण्याचा आणि/किंवा विविध सेवांकरिता त्यांच्या ठायी असणाऱ्या गुण व देणग्यांचा ख्रिस्ताच्या शरीराकरिता उपयोग करण्याचा अधिकार प्रदान केलेला असेल. ह्या व्यतिरिक्त ते ज्या प्रांताचे सेवकीय सभासद आहेत त्या प्रांताने मान्य केलेल्या नियुक्त सेवा करीत असतांना त्यांच्या मंडळ्यांमध्ये बाप्तिस्मा व प्रभू भोजनाचे विधी चालविण्याचा व जिथे राज्याचा कायदा प्रतिबंध करीत नसेल तिथे विवाह विधी चालविण्याचा त्यांना अधिकार असेल. ( ५११-५१२, ५१५, ५१५.४, ५२३, ५३२.८, ५३३-५३३.२, ५३४-५३४.२, ७००, ७०१, ७०५)

**५३२.८.** सर्व सनदी सेवक हे ते ज्या प्रांताच्या हद्दीतील मंडळीत त्यांचे सभासदत्व आहे त्याच प्रांतिक परिषदेमध्ये त्यांचे सभासद्त्व असेल आणि ते त्याच प्रांतिक परिषदेला प्रतिवर्षी आपला अहवाल सादर करतील. ते आपले अहवाल योग्य वार्षिक अहवाल पत्राद्वारे किंवा ते जर आपल्या सनदीचे नुतनीकरण करीत असतील तर प्रांतिक सेवकीय सनदीकरिता अर्जाद्वारे सादर करू शकतात. (२०१, २०५.३, ५२१)

**५३२.९** जर एखादा सनदी सेवक त्याच्या किंवा तिच्या प्रांतिक सल्लागार मंडळाच्या किंवा प्रमुखाध्यक्ष मंडळाच्या लेखी मान्यतेविना चर्च ऑफ दी नॅझरीन व्यतिरिक्त इतर मंडळींमध्ये किंवा संस्थेमध्ये विलीन झाला किंवा इतर ख्रिस्ती सेवेमध्ये सामील झाला तर त्याला चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सेवेतून व सभासदत्वातून त्वरीत निष्कासित केले जाईल. प्रांतिक परिषद आपल्या कामकाजाच्या अहवालात पुढील शेरा नोंदवेल: "**चर्च ऑफ दी नॅझरीन व्यतिरिक्त इतर मंडळीमध्ये, संस्थेमध्ये, किंवा सेवेमध्ये विलीन झाल्या कारणाने चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सेवा आणि सभासद्वातून निष्कासित केले.**" (१०७,११२)

## C. साहाय्यक सेवक (डिकन)

**५३३.** साहाय्यक सेवक (डिकन) व्यक्तीने देवाद्वारे ख्रिस्ती सेवेसाठी पाचारण, दाने, आणि उपयुक्तता ह्यांचे प्रमाण पटवून देऊन त्यामध्ये योग्य प्रशिक्षण आणि अनुभवाद्वारे विकास साधलेला असतो, त्याचप्रमाणे त्या व्यक्तीला प्रांतिक परिषदेने मतदानाद्वारे आणि गंभीर अशा दीक्षा विधी द्वारे ख्रिस्ती सेवेसाठी वेगळे केलेले असते आणि ख्रिस्ती सेवेची विशिष्ट सेवाकार्ये करण्याचा अधिकार तिला प्रदान केलेला असतो.

**५३३.१.** साहाय्यक सेवका (डिकन) ला उपदेश सेवा करण्याचे विशिष्ट पाचारण झालेले नसते. असे वेगळ्या पाचारणाचा अनुभव नसणाऱ्या व्यक्तींना देव आजीवन सेवेसाठी पाचारण करतो असे पवित्र शास्त्र आणि अनुभव यांच्या आधारे मंडळीला मान्य असून आणि मंडळीचा असाही विश्वास आहे की, अशा सेवेसाठी पाचारण असलेल्या व्यक्तींना मंडळीने ओळखून मान्यता दिली पाहिजे. अशा व्यक्तींनी आवश्यक पात्रतांची पूर्तता केली पाहिजे आणि मंडळीने प्रस्थापित केलेल्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपवून दिल्या पाहिजे. हा सेवेचा कायम वर्ग आहे.

**५३३.२.** डिकनने या वर्गासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रतांची पूर्तता केलेली असली पाहिजे, त्याने आपल्या ठायी असणाऱ्या योग्य देणग्या व कृपा प्रकट कराव्या, मंडळीने अशा व्यक्तींना ओळखून मान्यता दिलेली असली पाहिजे. डिकनला बाप्तिस्मा व प्रभुभोजन हे संस्कार चालविण्याचा, तसेच देशाच्या कायद्याची आडकाठी नसेल तर त्यांना विवाह विधी संपन्न करण्याचा आणि प्रसंगानुरूप उपासना चालविण्याचा आणि उपदेश करण्याचा अधिकार प्रदान केलेला असेल. आमचा प्रभू व मंडळी विविध संलग्न सेवाकार्याकरिता या व्यक्तीच्या ठायी असलेल्या देणग्यांचा व कृपांचा उपयोग करून

घेईल असे गृहित धरलेले आहे. ख्रिस्त शरीराचा सेवक म्हणून सेवा करीत असल्याचे प्रतिक म्हणून डिकन स्वत:च्या ठायी असणाऱ्या देणग्यांचा उपयोग संस्थात्मक मंडळीच्या सिमेबाहेरही करू शकेल. (५१५.४,५१५.९)

**५३३.३.** डिकन उमेदवार त्याच्या सेवेसाठी देवाने दिलेले पाचारण उघडपणे जाहीर करतो. अशा उमेदवाराकडे सध्या प्रांतिक सनद असते आणि त्याने सलग तीन वर्षाच्या कालावधीसाठी प्रांतिक सनद प्राप्त केलेली असते. त्याचप्रमाणे त्या उमेदवाराच्या प्रांतिक सनदीचे नुतनीकरण करून देण्यात यावी अशी ती व्यक्ती सभासद आहे त्या मंडळीच्या पंचमंडळाने किंवा प्रांतिक सल्लागार मंडळाने शिफारस केलेली असते. ह्या उपर उमदेवाराने:

१. सेवेसंबंधात मंडळीच्या पात्रतांची पूर्तता केलेली असते.

२. सनदी सेवक आणि डिकन वर्गात दीक्षा होण्याकरिता ठरवून दिलेला मान्यताप्राप्त अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला असतो, आणि

३. प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवाकार्य मंडळाने त्या व्यक्तीचा काळजीपूर्वक विचार करून प्रांतिक परिषदेकडे अनुकूल शिफारस केलेली असते.

अशा व्यक्तीला प्रांतिक परिषदेच्या दोन तृतीयांश मताने डिकन वर्गावर निवडून देता देईल. परंतु ती उमेदवार व्यक्ती सलग तीन वर्षांपासून नियुक्त सेवक म्हणून सेवारत असली पाहिजे आणि सध्या नियुक्त सेवाकार्य करीत असावी. अर्ध-वेळ सेवेच्या जबाबदारीबाबत, तिच्या स्थानिक मंडळीतील सेवाकार्यात सहभागी असण्याचा स्तरावर अवलंबून आणि त्यांची साक्ष व सेवेद्वारे इतर कुठल्याही कार्यापेक्षा त्यांचे सेवेच्या पाचारणालाच प्राधान्य आहे हे सिध्द झालेले असल्यास त्या व्यक्तीच्या सलग सेवाकार्याच्या वर्षांमध्ये विस्तार करणे आवश्यक असल्याचे गृहित धरणे आवश्यक आहे. ह्याउपर, प्रांतिक परिषदेने लागू केलेल्या अपात्रता ह्या प्रांताध्यक्ष आणि त्या प्रांताच्या प्रांतिक सल्लागार मंडळाने लेखी स्वरूपात रद्द केलेले असावे, आणि त्याचप्रमाणे त्या व्यक्तीचे वैवाहिक संबंध त्या व्यक्तीला दीक्षेकरिता अपात्र ठरवित नसले पाहिजे. (२०५.६,३२०, ५२९)

**५३३.४.** या प्रकारे सेवा करीत असताना देवाने आपणाला पूर्णवेळ उपदेश सेवाकार्यासाठी पाचारण केले आहे असे डिकन म्हणून दीक्षा झालेल्या व्यक्तीस वाटले तर त्याची/तिची

दीक्षित वर्गामध्ये दीक्षा करता येईल. मात्र यासाठी त्या व्यक्तीने या वर्गाकरिता आवश्यक असलेल्या सर्व पात्रतांची पूर्तता करून आपले डिकन अधिकार प्रमाणपत्र परत केले पाहिजे.

## D. दीक्षित सेवक

**५३४.** दीक्षित असा व्यक्ती असतो ज्याने देवाद्वारे ख्रिस्ती सेवेसाठी त्याचे पाचारण, दाने, आणि उपयुक्तता ह्यांचे प्रमाण पटवून देऊन त्यामध्ये योग्य प्रशिक्षण आणि अनुभवाद्वारे विकास साधलेला असतो, त्याचप्रमाणे त्या व्यक्तीला त्याच्या मंडळीने प्रांतिक परिषदेच्या मतदानाद्वारे आणि गंभीर अशा दीक्षा विधी द्वारे ख्रिस्ती सेवेसाठी वेगळे केलेले असते आणि ख्रिस्ती सेवेची विशिष्ट सेवाकार्ये करण्याचा अधिकार तिला प्रदान केलेला असतो.

**५३४.१** उपदेशसेवेसाठी आम्हाला दीक्षित सेवकाचाच वर्ग मान्य आहे. मंडळी मधील हा कायमचा वर्ग आहे. दीक्षित सेवकाने मंडळीमध्ये वचनाचा उपदेश करणे, बाप्तिस्मा व प्रभु भोजनाचे संस्कार चालविणे, विवाह विधी संपन्न करणे ह्या सेवांद्वारे उत्तम अधिकार चालवावा. त्याने मंडळीचा महान प्रमुख मस्तक येशू ख्रिस्त ह्याच्या नावाने आणि त्याच्या अधीन राहून ही सर्व कामे करणे अगत्याचे आहे. (३१, ५१४-५१५.३, ५१५.४, ५१५.९, ५३८.१५)

**५३४.२.** या अधिकृत सेवेसाठी ज्याला पाचारण झाले आहे त्याने देवाच्या वचनाचा कारभारी असावे आणि आपल्या पूर्ण शक्तिनिशी वचनाची घोषणा करण्यात आपले आयुष्य वेचावे अशी मंडळीची अपेक्षा आहे.

**५३४.३.** दीक्षित वर्गाचा उमेदवार त्याला सेवेसाठी देवाने दिलेले पाचारण उघडपणे जाहीर करतो. अशा उमेदवाराकडे सध्या प्रांतिक सनद असते आणि त्याने एका वेळी सलग तीन वर्षाच्या कालावधीसाठी प्रांतिक सनद प्राप्त केलेली असते. त्याचप्रमाणे त्या उमेदवाराच्या प्रांतिक सनदीचे नुतनीकरण करून देण्यात यावी अशी शिफारस ती व्यक्ती सभासद आहे त्या मंडळीच्या पंचमंडळाने किंवा प्रांतिक सल्लागार मंडळाने केलेली असते. ह्या उपर उमदेवाराने:

१. सेवेसंबंधात मंडळीच्या पात्रतांची पूर्तता केलेली असते.

२. सनदी सेवक आणि दीक्षित वर्गात दीक्षा होण्याकरिता ठरवून दिलेला मान्यताप्राप्त अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला असतो, आणि

३. प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवाकार्य मंडळाने त्या व्यक्तीचा काळजीपूर्वक विचार करून प्रांतिक परिषदेकडे अनुकूल शिफारस केलेली असते.

अशा व्यक्तीला प्रांतिक परिषदेच्या दोन तृतीयांश मताने दीक्षित वर्गांवर निवडून देता देईल. परंतु ती उमेदवार व्यक्ती सलग तीन वर्षांपासून नियुक्त सेवक म्हणून सेवारत असली पाहिजे आणि सध्या नियुक्त सेवाकार्य करीत असावी. अर्ध-वेळ सेवेच्या जबाबदारीबाबत, तिच्या स्थानिक मंडळीतील सेवाकार्यात सहभागी असण्याच्या स्तरावर अवलंबून आणि त्यांची साक्ष व सेवेद्वारे इतर कुठल्याही कार्यापेक्षा त्यांचे सेवेच्या पाचारणालाच प्राधान्य आहे हे सिध्द झालेले असल्यास त्या व्यक्तीच्या सलग सेवाकार्याच्या वर्षांमध्ये विस्तार करणे आवश्यक असल्याचे गृहित धरणे आवश्यक आहे. ह्याउपर, प्रांतिक परिषदेने लागू केलेल्या अपात्रता ह्या प्रांताध्यक्ष आणि त्या प्रांताच्या प्रांतिक सल्लागार मंडळाने लेखी स्वरूपात रद्द केलेले असावे, आणि त्याचप्रमाणे त्या व्यक्तीचे वैवाहिक संबंध त्या व्यक्तीला दीक्षेकरिता अपात्र ठरवित नसले पाहिजे. (२०५.६, ३२०, ५२९)

## E. अधिकार प्रमाणपत्रांना मान्यता देणे

**५३५.** इतर सुवर्ताप्रसारकी संस्थांमधून जे दीक्षित सेवक चर्च ऑफ दी नॅझरीन मंडळीमध्ये सामील होऊ इच्छितात, आणि त्या उद्देशाने आपली दीक्षा प्रमाणपत्रे सादर करतात त्यांच्या दीक्षेला प्रांतिक परिषदेकडून मान्यता देता येईल. मात्र अशी मान्यता देण्यापूर्वी प्रांतिक सेवकीय परवाना मंडळाने आणि प्रांतिक सेवाकार्य मंडळाने त्यांची वर्तणूक, वैयक्तिक अनुभव आणि विश्वास सिद्धांत या बाबतीत त्यांचे समाधानकारक परीक्षण केलेले असावे. त्याचप्रमाणे त्यांनी पुढील अटी पूर्ण केलेल्या असाव्यात:

१. उमेदवारांनी चर्च ऑफ दी नॅझरीनचे बंधारण पुस्तक व इतिहास आणि पवित्रीकरणाचा सिध्दांत ह्या बाबत आदर, आकलन आणि लागूकरणाचा पुरावा हा मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाचा संबंधीत भाग यशस्वीरित्या पूर्ण करण्याद्वारे दिलेला असावा;

२. उमेदवारांनी दीक्षा/मान्यता प्रश्नावली काळजीपूर्वकरित्या भरून प्रांतिक परिषदेकडे सादर केलेली असावी.

३. तसेच त्यांनी परिच्छेद ५३३-५३३.३ किंवा ५३४-५३४.३ मध्ये नमूद दीक्षेकरिता आवश्यक पात्रतांची पूर्तता केलेली असावी; आणि

४. ह्या उपर उमेदवार हा सध्या नियुक्त सेवक म्हणून सेवाकार्य करीत असावा. (२०५.७,२२८, ५२९, ५३२.२)

**५३५.१.** प्रमुखाध्यक्ष दीक्षित सेवकाला मान्यता प्रमाणपत्र देतील. त्यावर अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष, प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक चिटणीस ह्यांच्या स्वाक्षऱ्या असतील. (५३८.६)

**५३५.२.** दुसऱ्या मंडळी मधून आलेल्या सेवकाच्या अधिकार प्रमाणपत्राला मान्यता दिल्यानंतर सदर मंडळीने त्याला दिलेले अधिकार प्रमाणपत्राच्या समोरच्या किंवा मागच्या भागावर पुढील प्रमाणे लेखाचा शिक्का मारून किंवा लिहून सदर अधिकार प्रमाणपत्र त्या व्यक्तीला परत करण्यात येईल:

चर्च ऑफ दी नॅझरीनच्या ........................ प्रांतिक परिषदेने आज दिनांक.........माहे............,

(वर्ष ……......) रोजी ह्या अधिकार प्रमाणपत्राचा, नवे अधिकार प्रमाणपत्र प्रदान करण्याकरिता आधार म्हणून अधिस्वीकृत केले आहे.

.................

प्रमुखाध्यक्ष

.................

प्रांताध्यक्ष

.................

प्रांतिक चिटणीस

## F. सेवानिवृत्त सेवक

**५३६.** सेवानिवृत्त सेवक/सेविका अशी व्यक्ती आहे की जिला प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ आणि प्रांतिक सेवा मंडळ यांनी शिफारस देऊन ज्या प्रांतिक परिषदेत तिचे सेवकीय सभासदत्व आहे त्या परिषदेमध्ये तिला सेवानिवृत्त संबंधामध्ये ठेवलेले असते. त्यांच्या ह्या स्थितीमध्ये कोणताही बदल हा प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ आणि प्रांतिक सेवा मंडळ ह्यांच्या शिफारसीने, प्रांतिक परिषदेने मंजूर केलेला असणे आवश्यक आहे.

**५३६.१.** सेवानिवृत्ती मुळे सेवकांस सेवकीय कामे करण्यास प्रतिबंध होणार नाही किंवा त्यामुळे त्याचे प्रांतिक परिषदेतील सभासदत्व रद्द होणार नाही. जो सेवक साधारण निवृत्तीचे वय झाल्यावर किंवा निवृत्त संबंधाची विनंती करतांना नियुक्त सेवा करीत होता त्या सेवकाला "**निवृत्त नियुक्त**" अशा स्थितिमध्ये ठेवता येईल. "निवृत्त नियुक्त" सेवक हा प्रांतिक परिषदेचा सभासद आहे. तथापि वरील दोन्ही परिस्थितींमध्ये अनियुक्त अशा स्थितित असलेल्या सेवकाला "**निवृत्त अनियुक्त**" अशा संबंधामध्ये ठेवले जाईल. "निवृत्त अनियुक्त" सेवक हा प्रांतिक परिषदेचा सभासद नाही. (२०१, ५३८.९)

**५३६.२.** निवृत्त सेवकाने (नियुक्त किंवा अनियुक्त) प्रतिवर्षी आपला अहवाल प्रांतिक परिषदेला सादर करणे बंधनकारक राहील. जर एखादा निवृत्त सेवक त्याच्या नियंत्रणाबाहेर असणाऱ्या मर्यादांमुळे अहवाल सादर करू शकत नसतील तर अशांना प्रांतिक परिषद प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ आणि प्रांतिक सेवा मंडळाच्या शिफारसीने, "**सूट**" हा दर्जा देऊ शकेल, आणि अशा प्रकारे वार्षिक अहवाल सादरीकरणाच्या बंधनाची अखंड पूर्ती केली जाईल. (५३८.९)

## G. सेवकांच्या बदल्या

**५३७.** जेव्हां सेवकवर्गाचा एखादा सभासद दुसऱ्या प्रांतात बदलून जाऊ इच्छितो, तेव्हा ज्या प्रांतिक परिषदेत त्याचे/तिचे सेवकीय सभासदत्व असेल ती परिषद मतदान करून त्याला/तिला सेवकीय सभासदत्वाचे बदलीपत्र देईल. प्रांतिक परिषदांच्या दरम्यानच्या काळात प्रांतिक सल्लागार मंडळ असे बदलीपत्र देईल. प्रांतिक परिषद भरण्यापूर्वी च्या काळात ज्या प्रांतावर बदलून जाण्यासाठी ते बदली पत्र दिले आहे तेथील प्रांतिक सल्लागार मंडळ अशा बदली पत्राचा स्वीकार करून संबंधित सेवकाला प्रांतातील सभासदत्वाचे सर्व हक्क वा अधिकार पूर्णपणे बहाल करील. ह्या बदलीला स्वीकार करणाऱ्या प्रांताच्या प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ आणि प्रांतिक परिषद यांच्याकडून अंतिम मान्यता मिळणे अगत्याचे आहे. (२०५.८-२०५.९, २२६, २३१.९-२३१.१०)

**५३७.१.** सनदी सेवकांची बदली पुढील अटींची पूर्तता झाली तरच कायदेशीर असेल: सनदी सेवकांसाठी नेमलेल्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाची सविस्तर गुणपत्रिका ही बदलीपत्र प्रदान करणाऱ्या प्रांताच्या प्रांतिक परिषदेच्या प्रांतिक सेवकीय शिक्षण मंडळाच्या चिटणीसाने रीतसर प्रमाणित केलेली असावी व बदलीपत्र स्वीकारणाऱ्या प्रांतिक सेवकीय शिक्षण मंडळाच्या चिटणीसाकडे पाठविलेली असावी. जरुरीचे आहे.

बदली स्वीकारणाऱ्या प्रांताच्या प्रांतिक सेवकीय शिक्षण मंडळाचे चिटणीस बदली होऊन येणाऱ्या सनदी सेवकाची गुणपत्रिका मिळालेली आहे असे आपल्या प्रांतिक चिटणीसाला कळवतील. बदलीपत्र प्राप्त झालेल्या सेवक मान्यताप्राप्त अभ्यासक्रमात प्राप्त होणाऱ्या गुणांची माहिती बदली स्वीकारणाऱ्या प्रांताला कळवण्याचे काम नेटाने करेल. (२३३.१-२३३.२)

**५३७.२** बदलीपत्र स्वीकारणारी प्रांतिक परिषद बदलून आलेल्या व्यक्तीच्या सभासदत्वाचा स्वीकार झाला आहे असे बदलीपत्र देणाऱ्या प्रांतिक परिषदेला कळवेल. ज्या प्रांतिक परिषदेवर बदलीपत्र दिले आहे ती परिषद मतदान करून सदर बदलीचा स्वीकार करेपर्यंत असे बदलीपत्र दिलेली व्यक्ती बदलीपत्र देणाऱ्या परिषदेचीच सभासद राहील. ज्या प्रांतिक परिषदेमध्ये बदलून जाण्याकरिता सदर बदलीपत्र दिलेले असेल त्या बदलीपत्राच्या दिनांकानंतर स्वीकार करणाऱ्या प्रांताची होणारी प्रांतिक परिषद समाप्त होईपर्यंतच सदर बदलीपत्र कायदेशीर राहील. (२०५.८, २२६, २३१.१०)

## H. सर्वसामान्य नियम

**५३८.** चर्च ऑफ दी नॅझरीन मध्ये सेवारत सेवकांसाठी असलेल्या सर्वसामान्य नियमांशी संबंधीत संज्ञांच्या व्याख्या खालीलप्रमाणे आहेत:

**सेवक वर्गाचे सभासद** – दिक्षीत पाळक/वडील, डिकन/सेवक आणि सनदी सेवक (५३०,५३१,५३२)

**सामान्य सभासद** - चर्च ऑफ द नॅझरीनचे असे सभासद जे सेवक वर्गाचे सभासद नाहीत.

**सक्रीय** – नियुक्त केलेली भूमिका पूर्ण करणारे सेवक वर्गाचे सभासद.

**नियुक्त** – परिच्छेद ५०५-५२८ मध्ये नमूद केलेल्या भुमिकांपैकी एखाद्या भुमिकेत सक्रिय असणाऱ्या सेवकवर्गाच्या सभासदाची स्थिती.

**अनियुक्त** – परिच्छेदात ५०५-५२८ मध्ये नमूद केलेल्या एखाद्या भुमिकेत सध्या सक्रिय नसणारा परंतु लायक असणाऱ्या सेवकवर्गाच्या सभासदाची स्थिती.

**निवृत्त नियुक्त** - सेवानिवृत्तीच्या विनंतीच्या वेळी पुन:नियुक्त केलेल्या सेवानिवृत्त अशा सेवकवर्गाच्या सभासदाची स्थिती.

**निवृत्त अनियुक्त** - सेवानिवृत्तीच्या विनंतीच्या वेळी पुन:नियुक्त न केलेल्या सेवानिवृत्त अशा सेवकवर्गाच्या सभासदाची स्थिती.

**सेवकांची यादी** – प्रांतातील सनदी आणि दिक्षीत सेवक जे सेवकवर्गाचे सभासद ह्या नात्याने लायक आहेत व ज्यांनी आपली अधिकारप्रमाणपत्रे जमा केलेली नाहीत अशा सेवकांची प्रांतिक नोंदवही.

**लायक** – सेवकवर्गाचा असा सभासद ज्यावर निराकरण न झालेले आरोप प्रलंबित नाहीत आणि ज्यावर कुठलिही शिस्तीची कारवाई सुरू नाही अशा सभासदाची स्थिती.

**बडतर्फ** – ज्या सेवकवर्गाच्या सभासदाने आपले सेवकीय अधिकारप्रमाणपत्र प्रांताला परत केले आहे, राजीनामा दिला आहे, किंवा प्रत्यार्पित केले आहे, किंवा ज्याचे सेवकीय अधिकारप्रमाणपत्र निलंबित केले आहे किंवा रद्द केले आहे अशा सेवकवर्गाच्या सभासदांची नावे सेवकांच्या यादीमधून वगळण्याकरिता प्रांतिक परिषदेने केलेली कारवाई.

**शिस्तबध्द** – सेवकवर्गाचा असा सभासद ज्याचे सेवकवर्गाच्या सभासद असण्याचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्या पूर्णत: किंवा अंशत: शिस्तीची कारवाई करून काढून घेऊन त्याला मुक्त करण्यात आलेले आहे अशा सेवकाची स्थिती.

**निलंबन** – शिस्तभंगाच्या कारवाईची अशी श्रेणी ज्यामध्ये सेवकाने आपली अधिकारप्रमाणपत्रे प्रत्यार्पित करणे वगळता, त्याचे सेवकवर्गाचा सभासद असण्याचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्या काढून घेऊन त्याला पुन:नियुक्त करण्याच्या अटिंची पुर्तता होईपर्यंत तात्पुरते मुक्त करणे.

**निष्कासित** – सेवक वर्गातील ज्या सेवकाची सेवकीय अधिकारप्रमाणपत्रे परत घेण्यात आलेली आहेत व चर्च ऑफ द नॅझरीनच्या सभासदत्वातून काढून टाकण्यात आली त्या सदस्याची स्थिती.

**दफ्तर-दाखल अधिकारप्रमाणपत्रे** – अशा सेवकाच्या अधिकारप्रमाणपत्रांची स्थिती की जो लायक असूनही सेवेमध्ये असिक्रिय असल्याकारणाने ज्याने आपले अधिकारप्रमाणपत्रे प्रमुख चिटणीसांच्या दफ्तरी दाखल करून सेवक वर्गाचा सभासद असण्याचे सर्व हक्क, विशेषाधिकार व जबाबदाऱ्या सोडून दिल्या आहेत. आपले अधिकारप्रमाणपत्रे दफ्तर-दाखल करणारा सेवक हा सेवकवर्गाचा सभासद असतो आणि त्या सभासदत्वाचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्या ह्या परिच्छेद ५३९.१० नुसार पुन:प्रस्थापित केल्या जाऊ शकतील. (५३९, ५३९.१)

**प्रत्यार्पित अधिकारप्रमाणपत्रे** – अशा सेवकाच्या अधिकारप्रमाणपत्रांची स्थिती ज्याने गैरवर्तन, आरोप, कबुली, शिस्त मंडळाच्या कृतीच्या परिणाम, या किंवा सेवेतील

असक्रियपणा व्यतिरिक्त इतर स्वेच्छेच्या कारणास्तव सेवकवर्गाचा सभासद असण्याचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्या ह्या पासून मुक्त करण्यात आलेले आहे. ज्या व्यक्तीचे अधिकारप्रमाणपत्रे प्रत्यार्पित आहेत तो शिस्तीच्या कृतिअंतर्गत सेवकवर्गाचा सभासद आहे. अशा सेवकाची लायक म्हणून पुनर्स्थापना झाल्यावर आणि अधिकारप्रमाणपत्रे पुन्हा प्रदान केल्यावर त्याचे सेवक वर्गाचा सभासद असण्याचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्या ह्या पुन:प्रस्थापित केल्या जाऊ शकतील.

**अधिकारप्रमाणपत्राचा राजिनामा** - अशा सेवकाच्या अधिकारप्रमाणपत्रांची स्थिती ज्याने सेवकवर्गाचा सभासद असण्याचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्या सोडून देऊन मंडळीचा सामान्य सभासद होण्याचे निवडलेले आहे. जो सेवक वर्गातील सभासद लायक राहिलेला नाही त्याने प्रांतिक सल्लागार मंडळाच्या मंजुरीनंतर त्याच्या/तिच्या अधिकारप्रमाणपत्राचा राजीनामा देऊ शकेल. (५३९.१, ५३९.५)

**अधिकारप्रमाणपत्र रद्द** – सेवक वर्गातील असा सभासद ज्याला चर्च ऑफ द नॅझरीनच्या सेवाकार्यातून आणि सभासदत्वातून काढून टाकण्यात आले आहे त्याच्या अधिकारप्रमाणपत्राची स्थिती. ज्याचे अधिकारप्रमाणपत्र रद्द करण्यात आलेले आहे अशा सेवकाचे नाव सेवकांच्या यादीमधून काढून टाकण्यात येईल.

**अधिकारप्रमाणपत्र पुन्हा बहाल करणे** – ज्या सेवकाचे अधिकारप्रमाणपत्र दफ्तर-दाखल, निलंबित, प्रत्यार्पित, राजिनामा, किंवा रद्द केलेले होते, त्याला सेवकवर्गाच्या सभासदत्वाचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्या पुन्हा बहाल करण्याची कृती.

**पुनर्वसन** – एखादा सेवक जो स्वेच्छेने किंवा इतर कारणाने सेवक वर्गाचा सभासद असण्याच्या हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्यापासून मुक्त करण्यात आलेला होता त्याचे किंवा त्याच्या जोडीदाराचे आणि कुटुंबाचे स्वास्थ किंवा पूर्णत्व पुनर्वसीत करण्याची प्रक्रिया. तंदुरुस्तीच्या पुनर्प्राप्तीसाठी मदत करण्याची प्रक्रिया. हे पुनर्वसनाचे प्रयत्न एखाद्या सेवकास त्याची अधिकारप्रमाणपत्रे पुन्हा बहाल करणे योग्य आहे की अयोग्य हे ठरवण्याच्या प्रक्रियेपासून स्वतंत्रपणे केले जाणे आवश्यक आहे.

**पुनर्स्थापना** - ज्या सेवकाचे अधिकारप्रमाणपत्र दफ्तर-दाखल, निलंबित, प्रत्यार्पित, राजिनामा, किंवा रद्द केलेले होते, त्याला सेवकवर्गाच्या सभासदत्वाचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्या ह्या त्याने लायकीचे आणि सर्व आवश्यक मान्यता प्राप्त करण्याच्या अटीवर पुन्हा बहाल करणे.

**आरोपपत्र** - चर्च ऑफ द नॅझरीनचे सभासद असलेल्या कमीत कमी दोघांच्या स्वाक्षरीने चर्च ऑफ दी नॅझरीनच्या एखाद्या सभासदाच्या आचरणाविरुद्ध आरोप केलेले असे कागदापत्र ज्याद्वारे आरोप सिद्ध झाल्यास त्या सभासदावर बंधारण पुस्तकातील नियमांनुसार शिस्तीची कारवाई करता येईल.

**ज्ञान** - एखाद्याने स्वतःच्या ज्ञानेंद्रियांचा उपयोग करून शिकलेल्या तथ्यांची जाणीव.

**माहिती** - इतरांकडून प्राप्त केलेली वास्तविक माहिती.

**विश्वास** - ज्ञान आणि माहितीच्या आधारे चांगल्या विश्वासाने काढलेला निष्कर्ष.

**चौकशी समिती** - बंधारण पुस्तकातील नियमांनुसार कथित किंवा संशयास्पद गैरवर्तनाच्या संदर्भात माहिती गोळा करण्यासाठी नेमलेली समिती.

**दोषारोप** - चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सदस्याच्या वर्तनाचे विशेष वर्णन करणारा लेखी दस्तऐवज जे सिद्ध झाल्यास बंधारण पुस्तकातील नियमांनुसार शिस्तभंगाच्या कारवाईस आधारभूत असेल.

**५३८.१.** एखादा सेवक वर्गाचा सभासद त्याचे किंवा तिचे सेवकीय सभासदत्व जिथे आहे त्या परिषदीय प्रांताच्या प्रांतिक सल्लागार मंडळाच्या लेखी अनुमतीशिवाय किंवा प्रमुखाध्यक्ष मंडळाच्या लेखी अनुमतीशिवाय इतर धार्मिक संस्थेसोबत नियमीत स्वतंत्र मंडळीचे कार्यक्रम चालवित असेल तर तो सेवक शिस्तीच्या कारवाईस पात्र ठरेल. (५३८.१३, ६०६.१)

**५३८.२.** सेवक वर्गाच्या सभासदाने प्रांताध्यक्ष व प्रांतिक सल्लागार मंडळ यांनी संयुक्तरित्या केलेल्या मार्गदर्शनाचा नेहमी योग्य तो आदर करतील. (५१९)

**५३८.३.** सेवक वर्गाचा सभासद स्वत: अथवा त्यावर विसंबून असणाऱ्या कुटूंब सदस्याला आपल्या विकलांग किंवा वयोवृद्ध सेवकांच्या मदती करिता मंडळीद्वारे सुरू असलेल्या किंवा भविष्यात अंमलात येणाऱ्या कुठल्या योजना व निधी चा लाभ मिळण्यासाठी हक्क मागायचा असेल, तर त्याकरिता सदरहू सेवक प्रांतिक परिषदेच्या मान्यतेने नियमीत, पूर्णवेळ सक्रीय नियुक्त पाळक किंवा सुवार्तिक किंवा इतर मान्यताप्राप्त भुमिकेवर नियुक्त केलेला असणे अगत्याचे आहे. अर्धवेळ व प्रसंगोपात काम करणाऱ्या सेवकांना या नियमातील लाभ लागू होणार नाहीत.

**५३८.४.** जो सनदी सेवक चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळीवर पाळक किंवा सहाय्यक पाळक म्हणून नियुक्त केलेला असेल तो प्रांतिक परिषदेचा मतदान करू शकणारा सभासद होईल. (२०१)

**५३८.५.** दीक्षित वर्गाकरिता अगर डिकन वर्गाकरिता निवड झालेल्या उमेदवाराची दिक्षा अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांच्या मार्गदर्शनाअंतर्गत प्रमुख अध्यक्ष आणि दीक्षित सेवक आपले हात ठेवून योग्य धार्मिक विधीद्वारे करतील. (३०७.४)

**५३८.६.** अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष, दीक्षा झालेल्या व्यक्तीला प्रमुखाध्यक्ष, प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक चिटणीस ह्यांच्या स्वाक्षऱ्या असलेले दीक्षेचे प्रमाणपत्र प्रदान करतील. (५३५.१)

**५३८.७.** एखाद्या दीक्षिताचे अथवा डिकनचे दीक्षा पत्र गहाळ झाले, खराब झाले किंवा नाश पावले, तर प्रांतिक सल्लागार मंडळाच्या शिफारशीने त्याला दीक्षा पत्राची नक्कल देता येईल. अशी शिफारस थेट अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांकडे करण्यात येईल व त्यांची अनुमती मिळाल्यावर प्रमुख चिटणीस हे प्रमाणपत्राची नक्कल प्रदान करतील. अशा प्रमाणपत्राच्या मागील बाजूस मूळ दीक्षा पत्राचा क्रमांक व नक्कल असा शब्द लिहिलेला असेल. मूळच्या प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करणारे प्रमुखाध्यक्ष, प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक चिटणीस उपलब्ध नसतील तर अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष व दीक्षापत्राची मागणी करणाऱ्या प्रांताचे प्रांताध्यक्ष आणि चिटणीस हे सदर प्रमाणपत्रावर आपापली स्वाक्षरी करतील. सदर प्रमाणपत्राच्या मागील बाजूस पुढील लेख लिहावा किंवा छापावा व त्याखाली अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष, प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक चिटणीस यांनी आपापली स्वाक्षरी करावी. हा लेख असा:

## प्रमाणपत्र

(दीक्षा करणाऱ्या संस्थेचे नावा) ने, (दीक्षा झालेल्या व्यक्तीचे नाव) यांना दिनांक .........., माहे ......... इ. स. ............., रोजी प्रदान केलेल्या मूळ दीक्षापत्रा ऐवजी हे प्रमाणपत्र दिलेले आहे. वरील दिनांकाला त्यांची दीक्षा झाली होती आणि त्यांच्या मूळ दीक्षापत्रावर (प्रमुखाध्यक्ष), (प्रांताध्यक्ष) यांची, आणि (प्रांतिक सचिव) यांची स्वाक्षरी होती.

पूर्वीचे प्रमाणपत्र गहाळ झाले /खराब झाले/ नाश पावले.

........................... प्रमुख अध्यक्ष

............................... प्रांताध्यक्ष

............................... प्रांतिक चिटणीस

**५३८.८.** सर्व सेवक वर्गाचे सभासद (नियुक्त आणि अनियुक्त) हे स्थानिक चर्च ऑफ दी नॅझरीनचे सभासद असतील व मंडळीमध्ये ते नियमीतपणे उपस्थित राहतील, दंशमांश देतील आणि मंडळीच्या सेवकार्यात सक्रिय सहभाग घेतील. या आवश्यकतांना अपवाद केवळ प्रांतिक सल्लागार मंडळच मंजूर करू शकेल. सेवक वर्गातील कोणताही सभासद त्याचे अधिकारप्रमाणपत्र ज्या प्रांतावर आहे त्यामधील स्थानिक चर्च ऑफ द नॅझरीनमध्ये सभासदत्व बाळगत नसेल, आणि ज्याला कोणताही अपवाद मंजूर केलेला नाही तो प्रांतिक सल्लागार मंडळाद्वारे शिस्तीच्या करवाईस पात्र राहील. (५२२, ५३८.१०)

**५३८.९.** सर्व दीक्षित व डिकन हे ज्या प्रांतातील स्थानिक मंडळींचे सभासद असतील त्याच प्रांतिक परिषदेचे सेवकीय सभासद असतील व ते सदर परिषदेला प्रतिवर्षी आपला अहवाल सादर करतील. जर एखाद्या दीक्षिताने वा डिकनने लागोपाठ दोन वर्षे आपल्या प्रांतिक परिषदेकडे व्यक्तीशः अगर पत्रांद्वारे आपला अहवाल सादर केला नाही, आणि जर सदर प्रांतिक परिषदेने ठरविले तर त्याचे प्रांतिक परिषदेचे सभासदत्व संपुष्टात येईल. (२०१, २०५.३, ५२१, ५३६.१)

**५३८.१०** एखादा सेवक वर्गाचा सभासद तो सेवकीय सभासद असलेल्या प्रांतिक परिषदेच्या प्रांतिक सल्लागार मंडळाच्या परवानगिशिवाय, चर्च ऑफ दी नॅझरीन व्यतिरिक्त दुसऱ्या संस्थेशी किंवा मंडळीशी किंवा इतर ख्रिस्ती सेवेशी एक होऊन सभासद झाला तर त्याचे चर्च ऑफ दी नॅझरीन मधील सभासदत्व रद्द होईल. प्रांतिक परिषद आपल्या कामकाजाच्या अहवालामध्ये पुढील शेरा नोंदतील: "दुसऱ्या संस्थेमध्ये, मंडळीमध्ये, किंवा ख्रिस्ती सेवेमध्ये सामील झाल्याने चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सेवेतून व सभासदत्वातून कमी केले." (१०७, ११२)

**५३८.११.** एखाद्या सेवक वर्गाच्या सभासदाने चर्च ऑफ दी नॅझरीनच्या स्थानिक मंडळीतून आपले सभासदत्व काढून घेतल्यानंतर अथवा तो किंवा ती त्यांची लायकी गमावल्यामुळे त्यांना सभासदत्वातून निष्कासीत केले असल्यास, तो किंवा ती पुनः चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळीशी सलग्न होऊ इच्छित असेल, तर ज्या प्रांतातील स्थानिक मंडळीतून त्यांचे सभासदत्व निष्कासीत करण्यात आले होते किंवा त्यांनी काढून घेतले होते त्या प्रांताच्या प्रांतिक सल्लागार मंडळाच्या अनुमतीद्वारेच त्यांना तसे करता येईल.

प्रांतिक सल्लागार मंडळ पुढील अटींवर अनुमती देऊ शकेल: माजी सेवक हा चर्च ऑफ दी नॅझरीनच्या स्थानिक मंडळीचा एक सामान्य सदस्य बणून राहील किंवा अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष आणि प्रांताध्यक्ष यांच्या संमतीने अशा माजी सेवक किंवा सेविकेला, त्यांनी शिस्तीच्या अंतर्गत पुनर्वसन प्रक्रियेत सक्रियपणे आणि सातत्याने भाग घेण्यास होकार दिल्यास, सेवक वर्गाचा सभासद म्हणून स्वीकारता येईल. (५३९.६)

**५३८.१२.** एखाद्या दीक्षिताचे अथवा डिकनचे नाव प्रांतिक परिषदेच्या सेवकांच्या यादीतून काढून टाकले असेल, आणि त्यांनी आपले अधिकारप्रमाणपत्र दफ्तर-दाखल केलेली नसतील तर ज्या प्रांतिक परिषदेच्या सेवकांच्या यादीतून त्याचे/तिचे नाव काढून टाकले असेल, त्या प्रांतिक परिषदेची लेखी अनुमती घेतल्याशिवाय, अन्यथा दुसरी काही तरतूद केलेली असल्याशिवाय, अशा दीक्षित सेवाकाला अथवा डिकनला दुसऱ्या कुठल्याही प्रांतिक परिषदेत मान्यता देता येणार नाही. प्रांतिक सल्लागार मंडळ या दोन प्रांतिक परिषदे दरम्यान सेवकाच्या कार्यक्षेत्र हस्तांतरणाच्या विनंतीवर कार्य करू शकेल. ((५३८.११)

**५३८.१३.** कोणाही सेवक वर्गातील सभासदाला खालील बाबी करण्याकरिता प्रांतिक सल्लागार मंडळाची वार्षिक लेखी मान्यता असणे आवश्यक आहे:

- चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मार्गदर्शनात नसलेल्या मंडळीत स्वतंत्रपणे, नियमीतपणे कार्य करणे,
- स्वतंत्रपणे ख्रिस्तप्रसार केंद्र चालवणे; किंवा अनधिकृतपणे मंडळी संबंधी कामे करणे,
- चर्च ऑफ दी नॅझरीन व्यतिरिक्त स्वतंत्र मंडळी, धार्मिक गट किंवा ख्रिस्ती सेवा, किंवा संस्थेच्या कर्मचाऱ्यांशी जुळून राहाणे.

एखादा सेवक वर्गाचा सभासद उपरिनिर्दिष्ट अटींचे पालन करण्यास चुकला तर प्रांतिक सेवकीय परवाना मंडळाच्या, किंवा प्रांतिक सेवा मंडळाच्या संपूर्ण सभासदत्वाच्या दोन-तृतीयांश मताने केलेल्या शिफारशीवरून आणि प्रांतिक परिषदेच्या कृतीने त्याला किंवा तिला चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सभासदत्वातून व सेवेतून कमी करण्यात येईल. एखादे विशिष्ट काम "स्वतंत्र ख्रिस्तप्रचार केंद्र" आहे किंवा "मंडळीसंबंधीचे अनधिकृत कार्य" आहे याचा अंतिम निर्णय करण्याचा अधिकार सर्वस्वी प्रमुखाध्यक्ष मंडळाला आहे. (११२-११२.१, ५३२.९)

**५३८.१४.** सेवक वर्गाच्या सभासदाला स्वतंत्र मंडळीची कामे एकापेक्षा अधिक प्रांतांमध्ये करावयाचे असेल किंवा सदर सेवकाचे सेवकीय सभासदत्व जेथे आहे तो प्रांत वगळून इतर प्रांतांमध्ये करावयाचे असेल, तर अशा कामांना परवानगी देण्यापूर्वी प्रांतिक सल्लागार मंडळाने प्रमुखाध्यक्ष मंडळाची लेखी अनुमती मिळवणे आवश्यक आहे. अशी अनुमती मिळवण्यासाठी विनंती अर्ज आपल्या मंडळापुढे दाखल झाला आहे, ही गोष्ट प्रमुखाध्यक्ष मंडळ संबंधित प्रांतिक सल्लागार मंडळांना कळवेल.

**५३८.१५.** प्रांताध्यक्ष किंवा अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांनी अधिकार दिल्यास नियुक्त सेवकाला स्थानिक मंडळीची सुरूवात करता येईल. अशा स्थापनेसंबंधीचा अधिकृत अहवाल प्रांताध्यक्ष प्रमुख चिटणीसांच्या कार्यालयाला सादर करतील. (१००, २११.१)

**५३८.१६.** पाळक किंवा नियुक्त सेवक असणारी व्यक्ती प्रांतिक परिषदेची सभासद बनते. मात्र असा नियुक्त सेवक, परिच्छेद ५०५-५२८ मध्ये नमुद केलेल्या नियुक्त सेवकपदाच्या भुमिकांपैकी एक भुमिका सक्रियतेने आपली प्राथमिक सेवा म्हणून किंवा आपले आद्यकर्तव्य म्हणून निभावत असावा.

**५३८.१७.** सेवकाला समोपदेशन, सल्ला, किंवा आध्यात्मिक मार्गदर्शन करतांना व्यक्त केलेली माहिती शक्य असेल तेवढ्या गंभिर गोपनियतेत राखणे अगत्याचे असून सांगणाऱ्याच्या संमतिशिवाय, कायद्याद्वारे अपेक्षीत असल्याचा अपवाद वगळता, ती उघड करता येणार नाही. गुपित नेकीने विश्वासाने राखणे, हें चर्च ऑफ दी नॅझरीन मंडळीच्या प्रत्येक सेवकाचे कर्तव्य आहे.

जर अशा गोपनीयतेचा भंग होणारी परिस्थिती निर्माण झाली तर त्याबाबत सेवकाने शक्य असेल तेव्हा आणि शक्य तितक्या लवकर, खुलासा करावा:

१. जेव्हा त्याद्वारे स्वत:ला किंवा इतरांना हानी पोहोचण्याचा स्पष्ट आणि वर्तमानस्थितीत धोका असतो तेव्हा.

२. जेव्हा स्थानिक कायद्याच्या परिभाषेनुसार एखाद्या अल्पवयीन मुलावर/मुलीवर, अपंग व्यक्तीवर, वयोवृद्ध व्यक्तीवर किंवा अन्य असुरक्षित व्यक्तीवर अत्याचार किंवा दुर्लक्ष केल्याचा संशय असतो. अशा अहवालाची सत्यता निश्चित करणे किंवा अहवालाच्या संदर्भात चौकशी करण्याची जबाबदारी सूचित करणाऱ्या व्यक्तीची नाही, तर केवळ योग्य अधिकाऱ्यांना संशयाचा अहवाल सूचित करुन देण्याची आहे. अल्पवयीन व्यक्तीची व्याख्या १८ वर्षाखालील कोणतीही व्यक्ती अशी केली जाते,

एखाद्या राज्याच्या किंवा देशाच्या स्वत:च्या स्थानिक कायद्यानुसार व्यक्ती वयात येण्याचे वय ह्या पेक्षा नंतरचे ठरविलेले नसल्यास.

३. जेव्हा कायदेशीर प्रकरणांमध्ये पुरावा पुरविण्याचा कोर्टाचा आदेश असतो तेव्हां. सेवकांनी सत्रांमधील माहितीची किमान नोंद ठेवली पाहिजे ज्यात दिलेल्या प्रकटीकरणाच्या नोंदी आणि मिळालेल्या संमतिची नोंद आहे.

व्यावसायिक संपर्कामुळे प्राप्त ज्ञानाचा उपयोग शिक्षण, लेखन, धर्मोपदेश, किंवा इतर सार्वजनिक सादरीकरणांमध्ये, दोन्ही व्यक्तींची ओळख आणि प्रकटीकरणाच्या गोपनियतेच्या रक्षणार्थ पूर्णपणे केलेल्या उपाययोजनांनंतरच केला जाऊ शकतो.

जेव्हां अल्पवयीन व्यक्तीला समोपदेशन करतांना, जर सेवकास असे आढळून आले की अल्पवयीन व्यक्तीच्या कल्याणाला गंभीर धोका आहे, आणि तिच्या स्वास्थ व भल्यासाठी पालक किंवा कायदेशीर पालकांना गोपनीय माहिती कळविणे आवश्यक आहे, तर सेवक अल्पवयीन व्यक्तीच्या स्वास्थ व भल्याच्या रक्षणार्थ आवश्यक ती माहिती जाहीर करू शकेल.

**५३८.१८.** सर्व दीक्षित आणि डिकन ह्यांनी प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळामार्फत पुरविल्या जाणाऱ्या आजीवन शिक्षणाच्या २० तासांमध्ये दरवर्षी सामील होणे अपेक्षित आहे. (५२९.६)

**५३८.१९.** सेवक केवळ त्यांचाच विवाह लावू करू शकतात जे काळजीपूर्वक समुपदेशनाद्वारे पात्र झालेले आहेत आणि ज्यांच्या विवाहाला पवित्र शास्त्राचा आधार आहे.

पवित्र शास्त्र आधारीत विवाह हा केवळ अशा नात्यात अस्तित्वात आहे ज्या मध्ये एक पुरुष आणि एक स्त्री समाविष्ट आहे. (३१, ५१५.९)

**५३८.२०.** प्रत्येक प्रांताकडे अशी लेखी आणि सर्वांगिण योजना असली पाहिजे जिची ते दर वर्षी उजळणी करू शकतील आणि ही योजना गैरवर्तनुक करणाऱ्या सेवकाला, त्याच्या कुटुंबाच्या सदस्यांना आणि संबंधीत मंडळीला समयोचित, कळवळायुक्त आणि माहितीपूर्ण प्रतिसाद देण्याच्या कामी मार्गदर्शक अशी असावी. ही योजना बंधारण पुस्तकाच्या निर्देशांशी सुसंगत असावी आणि त्यामध्ये सेवकवर्गाच्या सभासदत्वाचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्या ह्यापासून वंचित होणाऱ्या सेवकाच्या स्थितीच्या बदलाबाबतची वास्तविकता आणि परिस्थितिंची नोंद घेण्याची व त्या नोंदींचा प्रतिपाळ करण्याची तरतूद प्रस्थापित करणे समाविष्ठ असावे. ह्या नोंदींमध्ये प्रश्नात असणाऱ्या

सेवकवर्गाच्या सेवकाची स्थिती आणि परिच्छेद ५४०.१ मधील तरतुदीनुसार पुनर्वसन चमूमध्ये नियुक्त व्यक्तींची नावे व तारखा ह्या संबंधी संपूर्ण पत्रव्यवहार आणि कार्यालयीन कृती समाविष्ठ असावी. (२२५.५)

## I. सेवकीय अधिकारप्रमाणपत्र दफ्तर-दाखल, निलंबन, राजिनामा, किंवा रद्द करणे

**५३९.** जे सेवक वर्गाचे सभासद लायक असून काही विशिष्ट कालावधीकरिता सेवाकार्यात असक्रिय आहेत आणि आपली अधिकारप्रमाणपत्र दप्तरी दाखल करू इच्छितात, अशा अधिकारप्रमाणपत्राचा  स्वीकार करून, जतन करण्याचा आणि सुरक्षित ठेवण्याचा अधिकृत अधिकार प्रमुख चिटणीसांना आहे. अधिकारप्रमाणपत्र दफ्तर-दाखल करतांना, सेवक ज्या प्रांतिक परिषदेमध्ये सदस्य आहे त्या परिषदेतील प्रांतिक सल्लागार मंडळाने प्रमुख चिटणीस यांना सूचित करणे आवश्यक आहे की, शिस्त टाळण्यासाठी हेतूने अधिकारप्रमाणपत्र दफ्तर-दाखल केल्या जात नाही आहे. अधिकारप्रमाणपत्र दफ्तर-दाखल केल्याने सेवक वर्गातील सेवकावर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई होण्यास प्रतिबंध होणार नाही. ज्या सेवक वर्गाच्या सभासदांनी आपली अधिकारप्रमाणपत्रे प्रमुख चिटणीसांकडे दाखल केली आहेत त्यांना ती पुन्हा प्राप्त करता येऊ शकतील. (५३९.१०)

**५३९.१.** जो सेवक लायक असून सेवानिवृत्त झालेला नाही आणि जो सलग चार किंवा त्यापेक्षा अधिक वर्षे काळासाठी अनियुक्त आहे तो यापुढे सेवक वर्गाचा सभासद म्हणून सहभाग घेत नाही असे मानले जाईल आणि त्याने किंवा तिने अधिकारप्रमाणपत्र दप्तरी दाखल करणे आवश्यक आहे. (५३९.१०)

**५३९.२.** एखादा सेवक आपली चर्च ऑफ द नॅझरीनच्या सेवक वर्गाचा सभासद म्हणून त्याची नियुक्त ख्रिस्ती सेवा सोडून, अन्य व्यवसाय-पाचारण स्वीकारतो तेव्हा त्याने किंवा तिने सेवक वर्गाचा सभास असण्याचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्या यांचा राजीनामा द्यावा. ज्या प्रांतिक परिषदेमध्ये तो किंवा ती आपली लायकी बाळगतात ती परिषद त्यांची अधिकारप्रमाणपत्रे स्वीकारून प्रमुख चिटणिसास सुपूर्द करते. प्रांतिक परिषदेच्या कामाकाजाच्या अहवालामध्ये त्याची नोंद, “त्याने किंवा तिने राजिनामा दिल्यामुळे, सेवकवर्गाच्या यादीमधून गाळले” अशी केली जाईल. जो सेवकवर्गाचा

सेवक अशा प्रमाणे राजिनामा देतो त्याने किंवा तिने आपले अधिकारप्रमाणपत्र परत करावे. (५३९.११)

**५३९.३.** जो सेवानिवृत्त न झालेला सेवक वर्गाचा सभासद सक्रिय सेवा सोडून पूर्णवेळ इतर जगिक नौकरी करू लागतो, तेव्हां दोन वर्षाच्या कालावधीनंतर प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ आणि प्रांतिक सेवा मंडळ त्या सेवकाला सेवक वर्गातील सभासदाचा राजीनामा देण्यास सांगेल आणि आपले अधिकारप्रमाणपत्र प्रमुख चिटणिसांच्या दफ्तरी दाखल करण्यास सांगेल. हा दोन वर्षांचा कालावधी सेवकाने सेवक वर्गाचा सभासद म्हणून सक्रिय सेवा थांबविल्यावर होणाऱ्या प्रांतिक परिषदेच्या तहकुबिनंतर त्वरीत सुरू होईल. प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ आणि प्रांतक सेवा मंडळ आपल्या कृतीचा अहवाल प्रांतिक परिषदेला देईल. सदर कृती सेवकाच्या शीलाबाबत पूर्वग्रहदुषीत नाही असे समजले जाईल.

**५३९.४.** एखाद्या सेवक वर्गाच्या सभासदाने आपला निवासाचा नोंदलेला पत्ता बदलला आणि प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ व प्रांतिक सेवा मंडळाला एक वर्षपर्यंत नवीन पत्ता पुरविला नाही, किंवा परिच्छेद ५३२.८ आणि ५३२.९ प्रमाणे अपेक्षित वार्षिक अहवाल सादर केला नाही तर त्याचे सेवक वर्गाच्या सभासदत्वाचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबादाऱ्यांपासून त्याला किंवा तिला निलंबित केले जाईल व त्याचे किंवा तिचे नाव सेवकवर्गाच्या यादीतून गाळण्यात येईल. अशा प्रकारे निलंबित करण्याची कृती ही प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ आणि प्रांतिक सेवा मंडळाची राहील.

**५३९.५.** एखाद्या सेवकवर्गाच्या सभासदाला स्थानिक मंडळीद्वारे प्रशंसा पत्र प्राप्त झाले असेल आणि आगामी प्रांतिक परिषदेच्या वेळेपर्यंत तो चर्च ऑफ दी नॅझरीनच्या दुसऱ्या मंडळीत सामील झाला नसेल, किंवा आपण चर्च ऑफ दी नॅझरीन मधून अंग काढून घेतले आहे असे लेखी जाहीर केले असेल, किंवा तो किंवा ती दुसऱ्या संस्थेत सभासद किंवा सेवक म्हणून सलग्न झाला असेल, किंवा त्याने किंवा तिने सेवकीय अधिकारप्रमाणपत्राचा राजिनामा दिलेला नसेल, तर प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ आणि प्रांतिक सेवा मंडळाच्या शिफारसीनुसार प्रांतिक परिषद त्याला किंवा तिला चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सेवेतून निष्कासीत करून सेवकवर्गाच्या यादीतून आणि स्थानिक मंडळीच्या सभासदत्वाच्या यादीतून त्याचे किंवा तिचे नाव वगळेल. (१११.१, ८१५)

**५३९.६.** जो सेवक वर्गाचा सभासद लायक राहिलेला नाही त्याने प्रांतिक सल्लागार मंडळाच्या संमतीनंतरच त्याच्या अधीकारप्रमाणपत्राचा राजीनामा द्यावा. (५४०)

**५३९.७.** एखाद्या सेवक वर्गाचा सभासदास परिच्छेद ५३९.५ आणि ५४०.१० नुसार किंवा ६०६-६०९ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईद्वारे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सेवेतून निष्कासित केल्या जाऊ शकते.

**५३९.८.** जेव्हा एखाद्या दीक्षित किंवा डिकन सेवकाला निष्कासित करण्यात येते तेव्हा त्याचे अधिकारप्रमाणपत्र प्रमुख चिटणीसाकडे, सेवकाला निष्कासित करण्याच्या वेळी तो किंवा ती ज्या प्रांतिक परिषदेचे सभासद होते त्या प्रांतिक परिषदेच्या आदेशापर्यंत सुरक्षितरित्या जतन करून ठेवण्यासाठी पाठवले जाईल. (३२६.५)

**५३९.९.** मंडळीमधील कामांबाबत निर्णय घेणारे पाळक, स्थानिक पंचमंडळे आणि इतर, ह्यांनी कुठल्याही लायक नसलेल्या सेवकवर्गाच्या सेवकाची सेवकीय भुमिका किंवा इतर विश्वासाचे किंवा अधिकाराचे पदी (उदा: आराधनेचे संचलन, रविवारचा शास्त्रशिक्षण शाळेचा वर्ग शिकविणे, किंवा पवित्र शास्त्र अभ्यास किंवा लहान गट चालविणे) त्यांची लायकी पुनर्वसित होईपर्यंत नेमणूक करू नये. अशा प्रतिबंधांना अपवादाकरिता ते सेवक त्यांचा सेवकवर्गाच्या सभासद असण्याचा हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्यांपासून मुक्त करण्यात आले त्यावेळी ज्या प्रांताचे सभासद होते त्या प्रांताच्या प्रांताध्यक्षांची आणि अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांची लेखी परवानगी आवश्यक आहे. (५४०.४)

**५३९.१०. दप्तर-दाखल केलेल्या अधिकारप्रमाणपत्राचे पुनर्वसन**

जेव्हां एखाद्या लायक दीक्षित अथवा डिकन सेवकाने आपले अधिकारप्रमाणपत्र दफ्तर-दाखल केले असतील, तर त्यानंतर केव्हाही ज्या प्रांतिक परिषदेमध्ये ती अधिकारप्रमाणपत्र दफ्तर-दाखल केलेली होती त्या प्रांतिक परिषदेच्या आदेशाने, तो किंवा ती लायक असेल तेव्हां, त्यांची अधिकारप्रमाणपत्र त्याला किंवा तिला परत करता येतील. ह्याकरिता प्रांताध्यक्ष आणि प्रांतिक सल्लागार मंडळाने अधिकारप्रमाण पत्र परत करावेत म्हणून शिफारस केलेली असणे आवश्यक आहे. दोन प्रांतिक परिषदां दरम्यान प्रांतिक सल्लागार मंडळ हे सेवकाचे दफ्तर-दाखल असलेले अधिकारप्रमाण पत्र परत देण्याकरिता मतदानाद्वारे मान्यता देऊ शकतात.

**५३९.११ राजीनामा दिलेल्या किंवा रद्द केलेल्या अधिकारप्रमाणपत्राचे पुनर्वसन**

एखाद्या दीक्षित अगर डिकन सेवकाने तो लायक सेवक असतांना आपल्या सेवकपदाचा राजीनामा दिला असेल, किंवा त्याचे अधिकारप्रमाण पत्र दुसऱ्या मंडळीशी, संस्थेशी, अथवा सेवेशी संलग्न झाल्यामुळे रद्द केले असेल, तर प्रांतिक परिषद त्याला किंवा तिला अधिकारप्रमाण पत्र परत करू शकेल. याकरिता पुढील गोष्टींची पूर्तता आवश्क आहे: दीक्षा/मान्यता प्रश्नावली सादर करणे, सेवकीय वचनांचे पुन्हा दृढकथन करणे, प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ आणि प्रांतिक सेवा मंडळाद्वारे सदर व्यक्तीचे परिक्षण होऊन अनुकूल शिफारस आणि प्रांताध्यक्ष व अख्त्यारी प्रमुखाध्यक्षांची पूर्व मान्यता. (५३९.२)

**५३९.१२.** ज्या मृत सेवकाचे अधिकारप्रमाण पत्र दफ्तर-दाखल केलेले होते आणि जो मृत्यूच्या वेळी लायक होता, त्याचे दीक्षा पत्र सेवकाच्या कुटुंबीयांना देता येईल. त्या करिता सदर कुटुंबाने प्रमुख चिटणिसाकडे लेखी विनंती केलेली असावी आणि ज्या प्रांतामध्ये त्यांचे अधिकारप्रमाण पत्र दफ्तर-दाखल केलेले होते त्या प्रांताच्या प्रांताध्यक्षांनी अनुमती दिलेली असणे आवश्यक आहे.

**५३९.१३. विभक्तता/घटस्फोट.** कोणाही सेवकाने स्वत:च्या विवाहातून घटस्फोट किंवा विवाहाची कायदेशीर समाप्ती/विभक्तता होण्याकरिता अर्ज केल्यापासून ४८ तासाच्या आत किंवा सेवकाने त्याच्या किंवा तिच्या जोडीदारापासून शारीरिकरित्या एकत्र न राहाण्याच्या हेतूने शारीरिकरित्या विभक्त झाल्यापासून ४८ तासाच्या आत सेवकाने: (a) प्रांताध्यक्षाशी संपर्क साधून केलेल्या कृतीबद्दल माहिती द्यावी; (b) सेवकाने प्रांताध्यक्ष व प्रांतिक सल्लागार मंडळाच्या सभासदाशी परस्पर मान्य वेळी आणि ठिकाणी भेटण्याचे मान्य करावे, किंवा भेटीची वेळ आणि ठिकाण परस्पर मान्य होत नसेल तर प्रांताध्यक्षाने ठरवून दिलेल्या वेळी व ठिकाणी भेटण्यास मान्य व्हावे, आणि (c) ("b" मध्ये ठरलेल्या भेटीमध्ये) केलेल्या कृतीबाबत परिस्थितीचे स्पष्टीकरण द्यावे, वैवाहिक कलहाचे स्पष्टीकरण द्यावे, आणि सेवकाला सेवकवर्गाचा लायक सभासद म्हणून कार्य करू देत राहाण्याबाबत पवित्र शास्त्रोक्त आधार सादर करावा. जर सेवकवर्गाचा सभासद वरील मुद्द्यांची पूर्ती करण्यात अपयशी ठरला तर असली अपूर्ती ही शिस्तिच्या कारवाईस कारण ठरेल. सर्व सेवक, सक्रिय, असक्रिय, सेवानिवृत्त, नियुक्त किंवा अनियुक्त हे वरील तरतूदीस पात्र असून त्यांनी प्रांताध्यक्ष व प्रांतिक सल्लागार मंडळाच्या सलग्न सल्ल्याला सन्मान दिला पाहिजे. कुठलाही सक्रिय किंवा नियुक्त सेवक, प्रांतिक सल्लागार मंडळाच्या होकारार्थी मताशिवाय सेवक वर्गाच्या कुठल्याही भुमिकेत सेवा सुरू ठेऊ शकत नाही.

## J. सेवक वर्गाच्या सभासदांची पुनर्स्थापना

**५४०.** चर्च ऑफ दी नॅझरीन तिच्या स्वत:च्या कोणत्याही सेवकाला, ज्याने आपले अधिकारप्रमाण पत्र स्वेच्छेने किंवा अन्यथा दफ्तर-दाखल केली आहेत, किंवा ज्या सेवकास अशोभनीय वर्तनामुळे सेवक वर्गाचा सभासद असण्याचे सर्व हक्क, विशेषाधिकार, आणि जबाबदाऱ्यांपासून मुक्त करण्यात आले आहे, अशांना देवाच्या सुटका आणि नूतनीकरण करणाऱ्या कृपेचे आरोग्य आणि आशा पुरविण्याची जबाबदारी ओळखते. चर्च ऑफ दी नॅझरीन सेवकाचे जोडीदार आणि कुटुंब, त्याची मंडळी आणि सेवकाचा समुदाय यांना देवाच्या प्रेमळ काळजीमध्ये आमंत्रण देण्याचे कर्तव्य देखील मान्य करते. या कारणामुळे सेवकाला लायक स्थितीत पुनर्वसित करण्याची प्रक्रिया दोन वेगळ्या चरणात आयोजित केली जाईल:

**१. पुनर्वसन** – सेवकाच्या गैरवर्तणुकीच्या तिव्रतेवर लक्ष केंद्रित न करता, त्याची किंवा तिची सेवकीय कार्यात परत येण्याची शक्यता, आणि त्याच्या किंवा तिच्यापर्यंत विस्तारीत केलेली कृपा देऊ केलेल्या मदती प्रती त्यांची स्वीकारणियता, सेवक, त्याचा जोडीदार व कुटूंब ह्यांच्या कल्याणाचे (आध्यात्मिक आणि इतर) पुनर्वसन करण्याप्रती प्रांताने परिच्छेद ५४०.१-५४०.७ नुसार अतिशय काळजीपूर्वक, प्रार्थनापूर्वक, आणि विश्वासाने पाठपुरावा करावा. असे पुनर्वसन हा या चरणातील एकमेव उद्देश आहे.

**२. पुनर्स्थापना** – सेवक, त्याचा जोडीदार व कुटूंब ह्यांच्या स्वास्थ व कल्याणाचे पुनर्वसनाचे प्रयत्न केल्यानंतर, सेवकाची लायक स्थितीमध्ये पुनर्स्थापना करून त्याचे अधिकारप्रमाण पत्र परत करण्याकरिता शिफारस करण्याची प्रक्रिया विचारात घेतली गेली पाहिजे. (५४०.६-५४०.१२)

**५४०.१. पुनर्वसन चमूची नेमणूक.**

जेव्हां एखाद्या सेवक वर्गाच्या सभासदाचे गैरवर्तन स्पष्ट होते, तेव्हां सेवक, त्याचा जोडीदार, कुटूंब, मंडळी, आणि त्याचा समाज ह्यांना योग्य आणि करूणामयी हस्तक्षेपाचा समयोचित प्रतिसाद महत्वपूर्ण आहे. अशा घडामोडी क्वचितच अपेक्षित असल्याने, पुनर्वसन सुकर करण्याच्या दृष्टीने पात्र व्यक्तींची, सेवक वर्गातील आणि सामान्य सभासदांमधून, आगाऊ निवड आणि तयारी करणे हा प्रांताच्या प्रतिसाद योजनेचा महत्वाचा घटक आहे. या व्यक्तींची नेमणूक प्रांताध्यक्षांच्या मार्फत प्रांतिक सल्लागार मंडळाशी सल्लामसलत करुन केली जावी. जेव्हां सेवकांच्या गैरवर्तणूकिची परिस्थिती

उद्भवते, तेव्हां पुनर्वसन चमू म्हणून कार्य करणाऱ्या या व्यक्तींना शक्य तितक्या लवकर आणि प्रांताच्या योजनेनुसार प्रांताध्यक्षांनी नियुक्त करावे. नियुक्त केलेल्या पुनर्वसन चमूमध्ये तीनपेक्षा कमी व्यक्ती नसाव्यात. (२११.२०,२२५.५, ५४०)

**५४०.२. पुनर्वसन चमूची कर्तव्ये.**

पुनर्वसन चमू, सेवक, त्याचा जोडीदार, आणि त्याच्या कुटुंबाचे आरोग्य आणि कल्याण ह्यांचे पुनर्वसन सुकर करण्यास जबाबदार आहे. सेवकाच्या सेवक वर्गाचा सभासद होण्याचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्यांची पुनर्स्थापना करण्याबाबत निर्णय घेण्याची जबाबदारी व अधिकार ह्या चमूला नाहीत. ह्यामध्ये परिस्थिती जशी परवानगी देईल तसे, पुनर्वसन चमूच्या कर्तव्यांमध्ये खालील गोष्टी समाविष्ट आहेत:

१. सेवक, त्याचा जोडीदार, आणि कुटुंबाला काळजी पुरविणे;

२. सेवक आणि त्याच्या जोडीदारास पुनर्वसन प्रक्रिया आणि तिचा उद्देश उद्दीष्ट याबद्दल स्पष्टीकरण प्रदान करणे;

३. ज्या परिस्थितीत सेवकीय गैरवर्तणूक स्पष्ट झालेली आहे, अशा ठिकाणी उद्भवणाऱ्या आर्थिक, गृहविषयक, वैद्यकिय, भावनिक, आध्यात्मिक, आणि इतर गरजा भागविण्याकरिता सेवक, प्रांत आणि त्यात समाविष्ट मंडळीच्या एकत्रीत प्रयत्नांद्वारे विकसित केल्या जाणाऱ्या योजनेचे संचलन करणे;

४. प्रांताने मंजूर केलेली योजना राबविणे, ह्यामध्ये पुनर्वसन चमूच्या सेवक, सेवकाचा जोडीदार आणि त्याचे कुटूंब ह्यांचे आरोग्य आणि कल्याणाच्या पुनर्वसनाकरिता सुरू असलेल्या प्रयत्नांच्या प्रगतिची स्थिती याबाबत नियमीतपणे अहवाल सादर करणे समाविष्ट आहे;

५. जेव्हा पुनर्वसन चमू आपले हे काम पूर्णत्वाप्रत पोहोंचत आहे किंवा अपेक्षेनुसार प्रगती करीत आहे असा निश्कर्ष काढते, तेव्हां सेवक व त्यांचा जोडीदार, प्रांताध्यक्ष व योग्य प्रांतिक मंडळीला तसे कळविणे.

६. सेवकाने सेवक वर्गाच्या सभासदत्वाचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्या पुनर्स्थापित करण्यासाठी अर्ज केल्यावर त्या सेवकाची लायक स्थितीत पुनर्स्थापना करण्याबाबत विचार करणे योग्य आहे किंवा नाही ह्या बाबत प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ किंवा प्रांतिक सेवा मंडळ किंवा

सेवकाच्या पुनर्स्थापनेचा विचार करण्यास नियुक्त केलेल्या समितीकडे आपली शिफारस सादर करणे. (५४०.८)

**५४०.३.** जेव्हां शिस्तभंगाची कारवाई सुरू असणारा सेवक पुनर्वसन प्रक्रियेस प्रतिसाद देत नसेल तेव्हां सेवकाच्या जोडीदाराचे आणि कुटुंबाचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न पुढे नेणे आणि ते करत असतांनाच सेवकाला पुनर्वसनाच्या प्रक्रियेमध्ये आणण्याचा किंवा परत आणण्याचा सक्रिय प्रयत्न करणे. पुनर्वसनाच्या प्रयत्नांचा आढावा घेतल्यानंतर आणि सेवकाचा जोडीदार आणि कुटुंबाच्या कल्याणाला योग्य महत्व देऊन प्रांताध्यक्ष पुनर्वसनाचे प्रयत्न निलंबित, समाप्त किंवा पुनर्निर्देशित करू शकतात.

सेवकाला शिस्तभंगाच्या कारवाईत घातल्यावर प्रांताने जर पुनर्वसन चमूची नेमणूक केली नाही किंवा नियुक्त केलेली पुनर्वसन चमू शिस्तभंग कारवाईच्या तारखेपासून १८० दिवसांच्या आत आपली जबाबदारी स्वीकारण्यास अपयशी ठरल्यास, शिस्तभंगाच्या कारवाईतील सेवक प्रमुखाध्यक्ष मंडळाकडे त्याच्या पुनर्वसनाचे प्रयत्न सुलभ करण्याची आणि त्यानंतरच्या अर्जावर योग्य ती कार्यवाही करण्याची आणि सेवकाच्या लायक स्थितिची आणि सेवक वर्गाच्या सभासदत्वाचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्यांची पुनर्स्थापना करण्याची जबाबदारी दुसऱ्या प्रांताला हस्तांतरीत करण्याची विनंती करू शकतात. जेव्हां प्रश्न चिन्ह असणाऱ्या सेवकाच्या लायक स्थितित पुनर्स्थापना करण्याच्या अर्जाला प्रतिसाद देण्यास प्रांत अपयशी ठरतो तेव्हां त्या सेवकाला सुध्दा वरील पर्याय उपलब्ध आहे. (५४०-५४०.२, ५४०.४-५४०.१२)

**५४०.४.** जो सेवक वर्गाचा सभासद लायक स्थितीत नाही त्याने मंडळीमध्ये कोणतेही भरवशाचे व अधिकाराचे पद ग्रहण करू नये किंवा उपासनेतही कोणतेच पद ग्रहण करू नये, जसे की: उपदेश करणे, आराधनेचे संचलन करणे, रविवारीय शास्त्रशिक्षण शाळेच्या वर्गात शिक्षण देणे, आणि पवित्र शास्त्र अभ्यास किंवा किंवा लहान गट चालविणे. सेवक हे अशा भूमिकांमध्ये किंवा नेमून दिलेल्या सेवकीय भूमिकेमध्ये तेव्हाच सेवा करू शकतील, जेव्हा प्रांताने नियुक्त केलेल्या पुनर्वसन चमू अनुकूल शिफारस देते आणि प्रांतिक सल्लागार मंडळ, प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ, प्रांतिक सेवा मंडळ, आणि प्रांताध्यक्ष आणि अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष त्याला मान्यता देतात. अनुकूल शिफारस हे निश्कर्ष दर्शविते की, सदर सेवक, तिचा जोडीदार आणि कुटुंबाने पुनर्वसन प्रक्रियेमध्ये पुरेशी प्रगती केली असून अशी हमी देता येते की सदर व्यक्तीला भरवशाच्या व अधिकाराच्या पदावर पुन्हा सेवा करण्याची परवानगी देता येऊ शकते. भरवशाच्या व

अधिकाराच्या पदावर सेवा करण्यास मान्यता ही निर्बंध किंवा निर्बंधांविना दिल्या जाऊ शकते आणि प्रांताध्यक्षांद्वारे पुनर्वसन चमुशी सल्लामसलत करून सद्द केल्या जाऊ शकते. (६०६.१-६०६.२, ६०६.५, ६०६.११-६०६.१२)

**५४०.५.** शिस्तभंगाची कारवाईत असणाऱ्या सेवकाने परिच्छेद ५४०.६ मध्ये प्रदान केलेल्या तरतुदीनुसार लायक स्थितीत पुनर्स्थापनेसाठी अर्ज केल्यावर, पुनर्वसन चमू प्रांताध्यक्षांना आणि योग्य त्या प्रांतिक मंडळाला किंवा नियुक्त समितीला शिफारस करू शकते की, परिच्छेद ५४०.८ च्या तरतुदीनुसार अर्जाचा विचार करण्यात यावा; किंवा सेवक पुन्हा अर्ज करण्यापूर्वी अतिरिक्त आणि निर्दिष्ट कालावधीसाठी पुनर्वसन प्रक्रिया ही सुरू ठेवण्यात यावी.

पुनर्वसन संघाने आपले प्रयत्न पूर्ण केल्यानंतरही शिस्तभंग कारवाईत असणाऱ्या सेवकाने लायक स्थितीत पुनर्स्थापना करण्यासाठी अर्ज केला नाही, तर पुढील कृती होईपर्यंत तो सेवक शिस्तभंग कारवाईच्या अधीन राहील: १) चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सभासदत्वातून आणि सेवेतून काढून निष्कासित करणे; किंवा २) सेवकाला त्याच्या किंवा तिच्या अधिकारप्रमाणपत्राचा राजीनामा देऊन मंडळीचा सामान्य सभासद होण्यासाठी मान्यता देणे. शिस्तभंग कारवाईच्या अधीन असलेल्या सेवकाने राजीनामा दिलेल्या परिस्थितीत जेव्हां पुनर्वसनाबाबत भरपूर आणि स्थिर पुरावा प्राप्त होतो, तेव्हा अशा प्रगतीला ओळखून ती साजरी करण्याबाबत योग्य ती काळजी घेतल्या गेली पाहिजे. (५३९.५, ५४०.१०)

**५४०.६. लायक स्थितीत पुनर्स्थापनेकरिता अर्ज.**

ज्याला सेवक वर्गाचा सभासद असण्याच्या हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्यापासून मुक्त केले आहे तो लायक स्थितीत पुनर्स्थापना होण्यासाठी आणि आपले अधिकारप्रमाणपत्र परत मिळण्याकरिता परिच्छेद ५४०.७ मधील अटींनुसार अर्ज करू शकतो. अशा प्रकारचा अर्ज पुढील नियोजित प्रांतिक परिषदेच्या किमान सहा महिन्यांपूर्वी प्रांताध्यक्षाकडे सादर करणे आवश्यक आहे आणि प्रांताने-मंजूर केलेल्या योजनेशी सुसंगत असणे आवश्यक आहे. प्रांताध्यक्ष ३० दिवसाच्या आत अर्ज स्वीकृतीची पोच-पावती देतील.

**५४०.७.** एखादा सेवक लायक स्थितीत पुनर्स्थापित होण्यासाठी आणि अधिकारप्रमाणपत्र परत मिळण्यासाठी अर्ज करू शकतो. मात्र सेवकाकरिता नियुक्त केलेल्या पुनर्वसन चमूने अशा अर्जाचे अनुकूलपणे समर्थन केले पाहिजे, सेवकाने चमूच्या देखरेखिखाली

कमीतकमी दोन वर्ष पुनर्वसन प्रक्रियेमध्ये सक्रियरित्या सहभाग घेतला आहे असे साक्षांकन दिले पाहिजे. ज्या सेवकाने, तिच्या किंवा त्याच्या मते अशा पुनर्वसन प्रक्रियेमध्ये कमीतकमी चार वर्षे सक्रियपणे आणि सातत्याने भाग घेण्याचा प्रयत्न केला असेल तो त्याच्या अर्जाला पुनर्वसन चमुच्या अनुकूल समर्थनाशिवाय लायक स्थितीत पुनर्स्थापित करण्यासाठी अर्ज करु शकेल.

जेव्हा शिस्तभंग कारवाईच्या अधीन असलेल्या सेवकाने प्रारंभापासून पुनर्वसन प्रक्रियेमध्ये सहभाग घेतला असेल, तेव्हा तो लायक स्थितीत पुनर्स्थापित होण्यासाठी अर्ज करण्यापूर्वी आवश्यक किमान वेळ हा त्याच्या पुनर्वसन चमूसोबतच्या पहिल्या अधिकृत बैठकीपासून सुरू होईल किंवा पुनर्वसन चमू त्या सेवकाकरिता नियुक्त केल्या जाण्याच्या तारखेपासून ६० दिवसानंतर सुरू होईल. एखाद्या सेवकाने पुनर्वसन प्रक्रियेत सहभाग पुढे ढकलला असेल किंवा व्यत्यय आणला असेल, तर अशा प्रकरणात पुनर्वसन चमूशी सल्लामसलत करुन प्रांताध्यक्ष सेवकाला लायक स्थितीत पुनर्स्थापित करण्यासाठी अर्ज करण्यापूर्वीचा आवश्यक किमान वेळ पूर्ण झाला आहे की नाही हे ठरवतील. (५३८, ५४०.३)

**५४०.८. लायक स्थितीत पुनर्स्थापनेकरिता अर्जास प्रतिसाद.**

प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ, किंवा प्रांतिक सेवा मंडळ, आणि प्रांताध्यक्षांनी या कामासाठी नियुक्त केलेली समीती सेवकास लायक स्थितीत पुनर्स्थापित करण्यासाठी केलेल्या कोणत्याही अर्जाचा विचार करतील आणि पुढील कामे करतील:

१. अर्ज स्वीकृतीसाठी सर्व अटी पूर्ण केल्या असून अर्ज अधिकृत असल्याची खात्री करून घेणे;

२. पुनर्वसन चमुच्या शिफारसीची विनंती करून त्याचे मुल्यमापन करणे;

३. लायक स्थितीत पुनर्स्थापित होऊ इच्छिणाऱ्या सेवकाची व इतर ज्या कुठल्या व्यक्तीची आवश्यक वाटते त्याची मुलाखत घेणे;

४. सेवकाच्या सेवक वर्गाचा सभासद असण्याचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्यांची पुनर्स्थापना आणि अधिकारप्रमाण पत्रे परत करावीत की नाही ह्या बाबत निर्णय घेणे.

जर अर्ज पुढील नियोजित प्रांतिक परिषदेच्या १८० दिवस अगोदर सादर केला गेला असेल तर, अशा अर्जाचा विचार पूर्ण केला जाईल आणि प्रांतिक परिषदेपूर्वी प्रांताध्यक्षाला शिफारस केली जाईल. एखाद्या सेवक वर्गाच्या सेवकाच्या लैंगिक

गैरवर्तनामुळे त्याचे अधिकारप्रमाण पत्र प्रत्यार्पित असेल आणि त्याला लायक स्थितीत पुनर्स्थापित करण्याच्या शिफारसी करिता प्रांतिक सल्लागार मंडळाच्या दोन-तृतीयांश मतांची मान्यता असणे आवश्यक असेल. सेवकाच्या लायक स्थितीत पुनर्स्थापित करण्याबाबतच्या सर्वात अलीकडील अर्जाच्या तारखेच्या एका वर्षाच्या आत ही शिफारस प्रमुखाध्यक्ष मंडळाकडे सादर करावी लागेल. या परिच्छेदात निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वेळेच्या चौकटीस अपवाद करण्यासाठी अख्त्यारी प्रमुखाध्यक्षाची पूर्व लेखी मान्यता असणे आवश्यक आहे. (५४०.२, ५४०.३, ५४०.६, ५४०.७, ५४०.१२)

**५४०.९.** अल्पवयीनांमध्ये लैंगिक गैरवर्तन केल्याबद्दल दोषी असलेल्या सेवकाला सेवक वर्गाचा सभासद म्हणून लायक स्थितीत पुनर्स्थापित करण्यात येऊ नये किंवा अधिकारप्रमाणपत्र बाळगण्याची परवानगी देऊ नये, अल्पवयीनांकरिता किंवा त्यांच्या मधील सेवेचे कोणतेही जबाबदारीचे पदावर कार्य करू देऊ नये, किंवा स्थानिक मंडळीच्या कोणत्याही नेतृत्वाच्या भूमिकेत निवडून किंवा नियुक्त करू नये. अल्पवयीनाची व्याख्या म्हणजे १८ वर्षाखालील कोणतीही व्यक्ती, एखाद्या राज्याच्या किंवा देशाच्या स्वत:च्या स्थानिक कायद्यानुसार व्यक्ती वयात येण्याचे वय ह्या पेक्षा नंतरचे ठरविलेले नसल्यास. (१२९.३०, ६००, ६०६.१-६०६.२, ६०६.५, ६०६.११-६०६.१२, ९१६)

**५४०.१०.** प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ, प्रांतिक सेवा मंडळ, किंवा त्यांची समीती सेवकास लायक स्थितीत पुनर्स्थापित करण्यासाठी परवानगी दिलेल्या वेळेत सादर केलेल्या अर्जाचा विचार करून, प्रांताध्यक्षांना व योग्य त्या प्रांतिक मंडळांना पुढीलपैकी कोणत्याही एका गोष्टीची शिफारस करू शकतातः

१. सेवकास लायक स्थितीत पुनर्स्थापित करावे आणि त्याचे किंवा तिचे अधिकारप्रमाणपत्र परत करण्यात यावे;

२. सेवकास लायक स्थितीत पुनर्स्थापित होण्याकरिता पुन्हा अर्ज करण्यापूर्वी विशिष्ट कालावधीसाठी पुनर्वसन प्रक्रियेत ठेवावे;

३. सेवकाच्या पुनर्वसनाचा कालावधी वाढविला जावा आणि पुनर्वसन योजनेत सुधारणा केली गेली जावी (जसे की सेवकाला देखरेखीखाली सेवा करू देणे, नवीन पुनर्वसन चमू नियुक्त करणे, किंवा वैयक्तिक, वैवाहिक किंवा कौटुंबिक समस्यांकडे लक्ष देणे);

४. सेवकाला पुढेही शिस्तभंग कारवाईच्या अधीन ठेवावे;

५. सेवकाला लायक स्थितीत पुनर्स्थापित करू नये, परंतु पुनर्वसनाचा पुरावा योग्यप्रकारे मान्य करावा आणि साजरा करावा, आणि सेवकाला अधिकारप्रमाणपत्राचा राजीनामा देण्यास परवानगी द्यावी;

६. सेवकाला चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सभासदत्वातून आणि सेवेतून निष्कासित करावे. (५३९.५, ५४०.७, ५४०.१२)

**५४०.११.** शिस्तभंग कारवाईच्या अधीन असलेल्या सेवकाने पुनर्स्थापनेसाठी केलेले दोन अर्ज नाकारले गेले असतील तर, प्रश्नचिन्ह असलेल्या सेवकाच्या पुनर्वसन आणि संभाव्य लायक स्थितीत पुनर्स्थापनेची जबाबदारी दुसऱ्या प्रांतात जेथे त्याच्या अर्जावर विचार केला जाऊ शकतो तिथे हस्तांतरीत करण्यासंदर्भात विनंती अर्जाला प्रमुखाध्यक्ष मंडळाद्वारे परवानगी दिल्या जाऊ शकते. जर लायक स्थितीत पुनर्स्थापित करण्यासाठी आणि सेवक वर्गाचा सभासद होण्याचे हक्क, विशेषाधिकार, आणि जबाबदाऱ्यांच्या पुनर्स्थापनेचा अर्ज तिसऱ्या वेळेस नाकारला गेला तर तो सेवक प्रांतिक सल्लागार मंडळाच्या मान्यतेनंतर सामान्य सभासद होऊ शकतो. (५३८.१३, ५३९.६)

**५४०.१२ सेवक वर्गाचा सभासद होण्याचे हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्यांच्या पुनर्स्थापना.** ज्या सेवक वर्गाच्या सभासदाने त्याची लायक स्थिती गमावली आहे आणि ज्याचे लायक स्थितीत पुनर्स्थापित करण्याच्या अर्जाचा परिणाम सेवक वर्गाचा सभासद होण्याचे हक्क, विशेषाधिकार, आणि जबाबदाऱ्यांच्या पुनर्स्थापित करण्याची शिफारस करण्यामध्ये झालेला आहे, त्यास केवळ खालील प्रक्रियेद्वारेच पुन्हा लायक स्थितीत पुनर्वसीत केले जाऊ शकते आणि त्याचे किंवा तिचे अधिकारप्रमाण पत्र परत दिले जाऊ शकतात:

१. प्रांताध्यक्षांची मान्यता;

२. प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ व प्रांतिक सेवा मंडळाची मान्यता;

३. प्रांतिक सल्लागार मंडळाची दोन-तृतीयांश मताने मान्यता;

४. प्रमुखाध्यक्ष मंडळाची मान्यता; आणि

५. ज्या प्रांतिक परिषदेमध्ये लायक स्थिती गमावली होती त्या प्रांतिक परिषदेची मान्यता. (६०६.१-६०६.२, ६०६.५, ६०६.११-६०६.१२)

# भाग ६वा

# न्यायदान व्यवस्था

संभाव्य दोषपूर्ण वर्तणूकीची चौकशी आणि मंडळीची शिस्त
संभाव्य गैरवर्तनाला प्रतिसाद
भरवशाच्या किंवा अधिकाराच्या पदावर असणाऱ्या व्यक्तीच्या गैरवर्तनास प्रतिसाद
सामान्य सभासदाला शिस्त लावणे
सेवकाला शिस्त लावणे
कार्यपद्धतीचे नियम
प्रांतिक न्यायमंडळ
प्रमुख न्यायमंडळ
विभागीय न्यायमंडळ
हक्कांची हमी

## I. संभाव्य दोषपूर्ण वर्तणूकीची चौकशी आणि मंडळीची शिस्त

**६००.** मंडळीच्या शिस्तीचे उद्देश हे मंडळीची एकात्मता राखणे, निरपराध्यांचे इजेपासून रक्षण, मंडळीच्या साक्षीच्या परिणामकारकतेचे रक्षण, निष्काळजी असणाऱ्यांना ताकीद देऊन सुधारणे, दोषी असणाऱ्यांना तारणाप्रत आणणे, दोषी असणाऱ्यांना सुधारणे, सुधारलेल्यांना परिणामकारक सेवेमध्ये पुनर्वसित करणे आणि मंडळीची प्रतिष्ठा व साधन संपत्तीचे संरक्षण करणे आहे. मंडळीचे जे सभासद ख्रिस्ती चारित्र्याच्या कराराचे किंवा ख्रिस्ती वर्तणुकीच्या कराराचे उल्लंघन करतात, किंवा जे स्वेच्छेने आणि सातत्याने त्यांच्या सभासदत्वाच्या वचनांचे उल्लंघन करतात, त्यांच्यावर त्यांच्या अपराधाच्या गंभीरतेनुसार विश्वासूपणे पण दयाबुद्धीने कार्यवाही करणे. जीवन व अंतःकरणाचे पवित्र्य हा नव्या कराराचा मानदंड असल्यामुळे, चर्च ऑफ दी नॅझरीन स्वच्छ सेवेवर जोर देते, आणि जे सेवकवर्गाचे सभासद ह्या नात्याने अधिकारप्रमाणपत्रे धारक आहेत त्यांनी जीवनात पवित्र व सिध्दांतात एकनिष्ठ असण्याची अपेक्षा करते. ह्याप्रमाणे शिस्तीचा उद्देश दंडात्मक किंवा परतफेडीत्मक नसून वरील उद्देश गाठणे हा आहे. मंडळीशी लायक आणि सातत्यपूर्ण नातेसंबंधांबाबत निर्णय घेणे हे सुध्दा शिस्तीच्या प्रक्रियेचे कार्य आहे.

## II. संभाव्य गैरवर्तनाला प्रतिसाद

**६०१.** एखादा सुजाण व्यक्ती विश्वासार्ह मानू शकेल अशी माहिती जेव्हां अधिकारयुक्त व्यक्तीला प्राप्त होते तेव्हां प्रतिसाद देणे योग्य ठरते. त्यात भर म्हणजे जेव्हां एखादा सुजाण व्यक्ती प्राप्त माहिती ही मंडळीकरिता किंवा गैरवर्तणूकीच्या संभाव्य बळीकरिता किंवा मंडळीतील भरवशाच्या व अधिकाराच्या पदावरील व्यक्तीच्या गैरवर्तणूकीद्वारे कुठल्याही व्यक्तीकरिता हाणीकारक आहे असा विश्वास बाळगतो, तेव्हां प्रतिसाद देणे उचित आहे.

**६०१.१.** जेव्हा एखादा सुजाण व्यक्ती विश्वासार्ह मानू शकेल अशी आणि मंडळीतील भरवशाच्या व अधिकाराच्या पदावरील व्यक्तीद्वारे मंडळीमध्ये गैरवर्तणूक घडत आहे अशी माहिती जेव्हां प्रतिसाद देण्याचा अधिकार नसलेल्या व्यक्तीला प्राप्त होते तेव्हां ती व्यक्ती जिला प्रतिसाद देण्याचा अधिकार आहे अशा मंडळीतील प्रतिनिधीला सद्यपरिस्थितिची माहिती देईल व प्रतिसाद द्यायला लावेल.

**६०१.२.** गैरवर्तणूकीत शामिल एक किंवा जास्त व्यक्तींच्या मंडळीतील प्रतिसाद देण्याचा अधिकार असणारी व्यक्ती ही त्याच्या मंडळीतील पदाद्वारे खालीलप्रमाणे निश्चित होते:

| शामिल व्यक्ती | *प्रतिसाद देण्याचा अधिकार असलेली व्यक्ती* |
|---|---|
| सदस्य नसलेले व्यक्ती | *स्थानिक मंडळीचा पाळक जिथे प्रश्नार्थक आचरण घडते* |
| सामान्य सभासद | *स्थानिक मंडळीचा पाळक जिथे सामान्य सभासद हा सभासद आहे* |
| सेवक वर्गाचा सभासद | *प्रांताध्यक्ष (प्रांतिक सल्लागार मंडळाच्या संयुक्त विद्यमाने) जिथे शामिल असलेला व्यक्ती हा सभासद किंवा स्थानिक मंडळीचा पाळक आहे आणि शामिल असलेला व्यक्ती तिथे कर्मचारी आहे.* |
| प्रांताध्यक्ष | *अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष* |
| विभागिय संचालक | *अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष* |
| क्षेत्र योजना समन्वयक | *अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष* |
| अन्यथा अपरिभाषित व्यक्ती | *प्रमुख चिटणीस* |

प्रतिसाद देण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तीने वेळोवेळी प्रांतिक, क्षेत्रिय, विभागिय आणि जागतिक स्तरांवरील पुढाऱ्यांना आरोपांविषयी सूचित केले पाहिजे. प्रतिसाद देण्याचा अधिकार असणारी व्यक्ती तथ्य शोधण्याकरिता किंवा प्रतिसाद देण्याकरिता इतरांची मदत घेऊ शकते.

**६०१.३.** जर कोणताही आरोप केला गेला नसेल तर, तेव्हा हानी रोखण्यासाठी किंवा पूर्वी झालेल्या हाणीचा प्रभाव कमी करण्याकरिता, कारवाई करण्याची गरज सुनिश्चित करण्यासाठी चौकशीची गरज असेल. ज्या परिस्थितीत सुजाण व्यक्तीला असा विश्वास असेल की हानी रोखण्यासाठी किंवा हानीचा प्रभाव कमी करण्यासाठी पुढील कारवाई करण्याची आवश्यकता नाही, त्या परिस्थितीत आरोप दाखल नसल्यास कोणतीही

चौकशी पुढे चालू राहणार नाही. चौकशी दरम्यान निदर्शनास आलेल्या गोष्टी आरोपांचे पायाभूत आधार होऊ शकतात.

## III. भरवशाच्या किंवा अधिकार पदावर असणाऱ्या व्यक्तीच्या गैरवर्तणूकीस प्रतिसाद

**६०२.** जेव्हा केव्हां प्रतिसाद देण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तीच्या निदर्शनास येते की, एखाद्या भरवशाच्या किंवा अधिकाराच्या पदावर असलेल्या व्यक्तीच्या गैरवर्तणूकीमुळे निष्पाप पक्षांना इजा पोहोंचलेली आहे तेव्हा मंडळीने योग्य प्रतिसाद द्यावा म्हणून कारवाई केली जाईल. योग्य प्रतिसाद हे बघण्याचा प्रयत्न करेल की गैरवर्तणूकीस बळी पडलेल्या व्यक्तींना अधिक हानी पोहोंचणार नाही, पिडित, आरोपी आणि गैरवर्तणूकीचा परिणाम झालेल्या इतर लोकांच्या गरजा भागविण्याचा प्रयत्न करेल. विशेषता: आरोपीच्या जोडीदाराची आणि त्याच्या कुटुंबाच्या गरजांसाठी विशेष काळजी दर्शविली पाहिजे. हा प्रतिसाद स्थानिक मंडळीच्या, प्रांताच्या आणि जागतिक मंडळीच्या जनसंपर्क, दायित्वापासून संरक्षण आणि मंडळीच्या अखंडतेचे संरक्षण यासंबंधीच्या गरजा भागविण्याचा प्रयत्न करेल.

जे मंडळीच्या वतीने प्रतिसाद देत आहेत त्यांनी हे लक्षात घ्यावे की ते काय बोलतात आणि काय करतात याचे मुलकी कायद्याअंतर्गत परिणाम होऊ शकतात. मंडळीचे प्रतिसाद देण्याचे कर्तव्य हे ख्रिस्ती काळजी आधारीत आहे. स्थानिक मंडळीकरिता पंचमंडळाच्या कृतिशिवाय आणि प्रांतामध्ये प्रांतिक सल्लागार मंडळाच्या कृतिशिवाय कोणालाही आर्थिक जबाबदारी स्वीकारण्याचा अधिकार नाही. जो कोणी कोणती कृती करणे योग्य आहे याबद्दल अनिश्चित असेल त्याने योग्य व्यावसायिकांकडून सल्ला घेण्याचा विचार केला पाहिजे.

**६०२.१.** प्रत्येक स्थानिक मंडळीमध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही संकटाला पंच मंडळाने प्रतिसाद देणे योग्य आहे; तथापि, हा प्रतिसाद पंच मंडळाची बैठकसभा होण्यापूर्वी देणे आवश्यक आहे. प्रत्येक स्थानिक मंडळीकडे आपत्कालीन प्रतिसाद योजना असणे सुज्ञतेचे आहे.

**६०२.२.** प्रत्येक प्रांतामध्ये कोणत्याही संकटाला उत्तर देण्याची प्राथमिक जबाबदारी प्रांतिक सल्लागार मंडळावर असते; तथापि, हा प्रतिसाद प्रांतिक सल्लागार मंडळाची बैठकसभा होण्यापूर्वी देणे आवश्यक आहे. एखाद्या प्रांताने आपत्कालीन प्रतिसाद

योजना स्वीकारणे हे सुज्ञतेचे आहे. या आपत्कालीन प्रतिसाद योजनेमध्ये समुपदेशक, समाज सेवक, जे संप्रेषणात प्रशिक्षित आणि लागूकरणीय कायद्याशी परिचित आहेत असे विशेष पात्रता असलेल्या लोकांची चमू प्रांतिक सल्लागार मंडळाद्वारे नेमली जाऊ शकते.

**६०३. मंडळीमधील समेट आणि संघर्ष निराकरण.** मतभेद हा जीवनाचा एक भाग आहे, अगदी मंडळीमध्ये देखील. तथापि, जेव्हा हे मतभेद मंडळीला विभाजित करणारे संघर्ष बनतात, किंवा मंडळीमधील सहभागीता विस्कळीत करतात, अनौपचारिक पारख प्रक्रिया ही निराकरणाची औपचारिक प्रक्रिया होण्या आधी येणे आवश्यक आहे. प्रक्रिया अनौपचारिक असो किंवा औपचारिक असो, मुख्य उद्दीष्ट हे संघर्षाचे निराकरण आणि समेट घडवून आणणे हे असणे आवश्यक आहे.

**६०३.१. अनौपचारिक प्रक्रिया:** जेव्हा मंडळीमध्ये संघर्ष उद्भवतो, तेव्हां सर्व लोकांबरोबर शांतीने राहण्याच्या इच्छेने योग्य पारख करण्याकरिता आणि सल्ल्या करिता वेळ घेणे आवश्यक आहे. या प्रकरणात सामील असलेल्या सर्व पक्षांनी हे प्रकरण परमेश्वराला प्रार्थनेत सादर करण्यास प्रोत्साहन देण्यात येते, आणि खरं तर संपूर्ण प्रक्रिया प्रार्थनेने आच्छादलेली असावी. संघर्षातील प्रत्येक व्यक्तीने समेटाची आशा बाळगून नम्रतेने एकमेकांशी संपर्क साधावा.

**६०३.२. औपचारिक प्रक्रिया:** ही प्रक्रिया अयशस्वी झाल्यास, समेटाच्या औपचारिक प्रक्रियेस सुरुवात करण्याचा निर्णय व्यक्ती घेऊ शकतात. ह्या प्रकरणाबाबत मंडळीमधील परिपक्व आणि निःपक्षपाती व्यक्तींच्या प्रतिनिधी गटाने मध्यस्थी केली पाहिजे. जर दोष निश्चित झाला तर हा गट परिच्छेद ६०४ मध्ये वर्णन केल्यानुसार योग्य कारवाईची शिफारस करू शकतो.

**६०४. शिस्तभंगाच्या कारवाईतील विषयांचे सहमतिने निराकरण.** बंधारण पुस्तकामध्ये वर्णन केलेल्या शिस्तभंग कारवाईच्या प्रक्रियेचा हेतू हा जेव्हां आरोपी त्याच्यावर लावलेल्या आरोपांच्या विरोधात लढत देत असेल तेव्हां गैरवर्तणूकीचे आरोपांचे निराकरण करण्याची योग्य प्रक्रिया प्रदान करणे हा आहे. बऱ्याच परिस्थितिंमध्ये शिस्तभंग प्रकरणाचे निराकरण सहमतीने करणे योग्य आहे. सहमतीने शिस्तभंग प्रकरणे सोडविण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन दिले आणि जेव्हा ते व्यावहार्य आहे तेव्हां त्याचा उपयोग केला जावा.

**६०४.१.** स्थानिक शिस्त मंडळाच्या कार्यक्षेत्रात असलेले कोणतेही प्रकरण हे पंच मंडळाने आणि प्रांताध्यक्षांनी मंजूर केल्यास आरोपी आणि मंडळीचे पाळक यांच्यामधील लेखी कराराद्वारे निकाली काढल्या जाऊ शकते. अशा कराराच्या अटी ह्या स्थानिक शिस्त मंडळाच्या कारवाईप्रमाणेच असतील.

**६०४.२** प्रांतिक शिस्त मंडळाच्या कार्यक्षेत्रात असलेले कोणतेही प्रकरण हे प्रांतिक सल्लागार मंडळाने आणि प्रमुखाध्यक्षांनी मंजूर केल्यास आरोपी आणि प्रांताध्यक्ष यांच्यामधील लेखी कराराद्वारे निकाली काढल्या जाऊ शकते. अशा कराराच्या अटी ह्या प्रांतिक शिस्त मंडळाच्या कारवाईप्रमाणेच असतील.

## IV. सामान्य सभासदावर शिस्तिची कारवाई

ख्रिस्तीपणास अशोभनीय असे कृत्य केल्याचा आरोप एखाद्या सामान्य सभासदावर केला असेल तर असे आरोप लेखी स्वरूपात सादर करावेत आणि त्यावर कमीत कमी सहा महिने सतत विश्वासू पणे उपस्थित असणाऱ्या दोन तरी सभासदांच्या स्वाक्षऱ्या असाव्यात. पाळकाने प्रांताध्यक्षाच्या अनुमतीने स्थानिक मंडळीच्या तीन सभासदांची चौकशी समिती नेमावी. सदर समिती चौकशीचा लेखी अहवाल सादर करेल. ह्या अहवाल समितीच्या निम्म्याहून अधिक सभासदांच्या स्वाक्षरीने पंच मंडळाकडे दाखल केला पाहिजे. या चौकशीनंतर आणि तिला अनुसरून स्थानिक मंडळीतील दोन लायक सभासदांनी आरोपी वर स्वतःच्या स्वाक्षरी निशी लेखी आरोप पंचमंडळाकडे दाखल करावेत. त्यानंतर पंच मंडळ प्रांताध्यक्षाच्या अनुमतीने पाच सभासदांचे स्थानिक शिस्तमंडळ नेमतील हे सभासद कोणत्याही प्रकारे पूर्वग्रहदूषित नसावेत आणि प्रकरण ऐकून रास्तपणे आणि नि:पक्षपातीपणे त्यासंबंधीचा निर्णय देण्यास सक्षम असावेत. जर प्रांताध्यक्षांच्या मते, मंडळीच्या आकारामुळे, आरोपांचे स्वरूप किंवा आरोपीच्या प्रभावाचे पद लक्षात घेता स्थानिक चर्चमधून पाच सदस्य निवडणे अव्यवहार्य अशक्य असेल तर, प्रांताध्यक्ष स्थानिक पाळकाशी सल्लामसलत केल्यानंतर त्याच प्रांतातील इतर मंडळ्यांमधील पाच सभासदांच्या शिस्त मंडळाची नेमणूक करतील. सदर शिस्तमंडळ शक्य तितक्या लवकर आरोप ऐकून घेतील आणि त्यात सामावलेल्या बाबी कोणत्या हे ठरवतील. साक्षीदारांच्या साक्षी आणि पुढे आलेला पुरावा यांचा विचार केल्यानंतर शिस्तमंडळ, सत्यतेच्या दृष्टीने जे यथार्थ त्यानुसार आरोपीला निर्दोष ठरवतील किंवा त्याला शिस्त लावतील. शिस्तीमध्ये

ताकीद देणे, निलंबन अगर स्थानिक मंडळीतील सभासदत्व रद्द करणे यांचा समावेश असेल. (५१६.८)

**६०५.१.** स्थानिक शिस्तमंडळाने दिलेल्या निर्णयावर आरोपी किंवा पंचमंडळ यांना ३० दिवसांचे आत प्रांतिक न्यायमंडळाकडे दाद मागता येईल.

**६०५.२.** स्थानिक शिस्तमंडळाने एखाद्या सामान्य सभासदाचे स्थानिक मंडळीतील सभासदत्व रद्द केले असेल तर अशा सभासदाला त्याच प्रांतातील चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळींमध्ये प्रांतिक सल्लागार मंडळाची मान्यता प्राप्त करून पुन्हा सामील होता येईल. अशी मान्यता दिली असेल तर सदर सभासदाला त्या स्थानिक मंडळीच्या सभासद वर्गामध्ये मंडळीच्या सभासदांचा स्वीकार करण्याचा नमुना अर्ज भरून घेऊन सामील करता येईल. (२१, २८-३३, ११२. १-११२.४, ७०४)

**६०५.३.** नेतृत्त्वात असलेल्या भूमिकांमध्ये सेवा देणाऱ्या सामान्य सभासदांकडून उच्च मानदंड अपेक्षित आहेत. जेव्हा गैरवर्तणूक होते तेव्हा त्याचा प्रभाव बहुतांश वेळी गंभीर असतो. अल्पवयीनांमध्ये लैंगिक गैरवर्तन केल्याबद्दल दोषी असलेल्या व्यक्तीस अल्पवयीनांसाठी असणाऱ्या सेवेच्या जबाबदारीचे कोणत्याही पदी सेवेची परवानगी देऊ नये, किंवा स्थानिक मंडळीमधील कोणत्याही पुढारीपणाच्या भूमिकेत निवडून किंवा नियुक्त करु नये. अल्पवयीन म्हणजे १८ वर्षाखालील कोणतीही व्यक्ती अशी व्याख्या आहे, एखाद्या राज्याच्या किंवा देशाच्या स्वतःच्या स्थानिक कायद्यानुसार व्यक्ती वयात येण्याचे वय ह्या पेक्षा नंतरचे ठरविलेले नसल्यास. (५०३.१)

## check

## V. सेवकावर शिस्तीची कारवाई

**६०६.** चर्च ऑफ दी नॅझरीनची शाश्वतता आणि परिणामकारकता मुख्यत्वे त्यांच्या सेवक वर्गाच्या सभासदांच्या आध्यात्मिक पात्रतेवर, चरित्रावर आणि त्यांच्या जीवनशैलीवर अवलंबून असते. सेवक वर्गाचे सेवक अभिषिक्त व्यक्ती ह्या नात्याने उच्च पाचरण आणि सेवाकार्य करण्याची आस धरतात, त्यांच्यावर मंडळीने आपला भरवसा टाकलेला असतो. ते आपल्या पाचारणाचा स्वीकार हे जाणून करतात की ज्यांची ते सेवा करतात ते लोक त्यांच्याकडून उच्च वैयक्तिक मानदंडाची अपेक्षा करतात. त्यांच्याकडून उच्च अपेक्षा बाळगल्यामुळे, सेवकवर्गाचा सभासद आणि त्याची सेवा गैरवर्तणूकीच्या आरोपाकरिता

विलक्षणपणे असुरक्षित आहे. म्हणून देवाच्या लोकांना शोभेल अशा पवित्र शास्त्रोक्त शहाणपण आणि परिपक्कता सामावलेल्या खालील प्रक्रियांचा वापर करणे सेवकांकरिता अनिवार्य आहे.

**६०६.१.** एखाद्या सेवकावर त्याने सेवक वर्गाच्या सेवकाला न शोभणारे वर्तन केले किंवा चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सिद्धांतांशी विसंगत असे सिद्धांत शिकवले असा आरोप असेल तर तो आरोप लेखी लिहून चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सद्य स्थितीत लायक असलेल्या कमीत कमीत दोन सभासदांच्या स्वाक्षरीने सादर करावा. लैंगिक गैरवर्तणूकीमध्ये शामिल असल्याची कबुली दिलेला कोणताही व्यक्ती अशा आरोपावर स्वाक्षरी करू शकत नाही. सदर लेखी आरोपपत्र आरोपीचे सेवकीय सभासदत्व ज्या प्रांतात आहे त्या प्रांताच्या प्रांताध्यक्षाकडे दाखल केले पाहिजे, प्रांताध्यक्ष ते आरोपपत्र प्रांतिक सल्लागार मंडळाकडे दाखल करतील. हे आरोपपत्र या खटल्याच्या एकंदर कागदपत्रांचा भाग बनेल.

प्रांतिक सल्लागार मंडळाने आरोपीला त्याच्याविरूध्द आरोपपत्र दाखल झाले आहे अशी लेखी सुचना शक्य तितक्या लवकर कुठल्याही वास्तविक सुचना देण्याच्या पध्दतीने द्यावी. जेव्हा वास्तविक सुचना देणे अव्यवहार्य असेल तेव्हां त्या वसतीश्रेत्रात कायदेशीर सुचना बजावण्याची जी पध्दत असेल त्या पध्दतीने सुचना देण्यात यावी. आरोपी आणि त्याचे किंवा तिचे वकिल यांना सदर आरोप तपासून पाहण्याची व विनंतीवरून आरोपांची लेखी प्रत मागणीद्वारे त्वरीत प्राप्त करण्याचा हक्क असेल. ( ५४०.४, ५४०.९, ५४०.१२)

**६०६.२.** सेवकवर्गाच्या सभासदाविरूध्द झालेल्या आरोपावरील व्यक्तीची स्वाक्षरी ही स्वाक्षरी करणाऱ्याद्वारे असे प्रमाणित करते की वाजवी चौकशी अंती स्वाक्षरीकर्त्याच्या ज्ञान, माहिती आणि विश्वासानुसार केलेला आरोप हा सत्यावर आधारीत आहे. (५४०.४, ५४०.१२)

**६०६.३.** प्रांताध्यक्षाकडे लेखी आरोप दाखल केला असेल आणि तो प्रांतिक सल्लागार मंडळाकडे सादर केलेला असेल तर, सल्लागार मंडळ तीन किंवा अधिक दीक्षितांची आणि कमीत कमी दोन ले सभासदांची चौकशी समिती नेमेल. ही समिती एकंदर वस्तुस्थिती आणि समाविष्ट परिस्थितिची तापसणी करून आपल्या निष्कर्षांचा लेखी अहवाल, निम्म्याहून अधिक समिती सभासदांच्या स्वाक्षरीने सादर करेल. समितीच्या अहवालाचा विचार केल्यानंतर आरोप ठेवण्यास काही आधार आहे असे आढळून आले तर आरोपपत्र लिहून तयार करण्यात येईल. त्यावर कोणत्याही दोन दीक्षित सेवकांची स्वाक्षरी असेल. प्रांतिक सल्लागार मंडळाने अरोपीला तशी लेखी सुचना शक्य तितक्या

लवकर कुठल्याही वास्तविक सुचना देण्याच्या पध्दतीने द्यावी. जेव्हा वास्तविक सुचना देणे अव्यवहार्य असेल तेव्हां त्या वसतिश्रेत्रात कायदेशीर सुचना बजावण्याची जी पध्दत असेल त्या पध्दतीने सुचना देण्यात यावी. आरोपी आणि त्याचे किंवा तिचे वकिल यांना सदर आरोप तपासून पाहण्याची व विनंतीवरून आरोपांची लेखी प्रत मागणीद्वारे त्वरीत प्राप्त करण्याचा हक्क असेल. वर नमूद केल्याप्रमाणे आरोपाची सूचना आरोपीला दिल्याशिवाय त्याने किंवा तिने आरोपांची उत्तरे द्यावी अशी मागणी करता येणार नाही. (२२५.३)

**६०६.४.** जर, चौकशीनंतर असे दिसून आले की सेवकाविरुध्द आरोप हा खऱ्या आधारावर नाही आणि वाईट भावनेने दाखल केला गेला आहे, तर ते आरोप पत्र ज्यांनी आरोप दाखल करण्यासाठी आरोपात स्वाक्षरी केली त्यांच्याविरूद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याकरिता आधारभूत होईल.

**६०६.५.** आरोपपत्र दाखल झाले तर हा खटला ऐकून त्यातील प्रश्न व मुद्दे यांची शहाणीशा करणे प्रांताकरिता योग्य आहे. त्याकरिता प्रांतिक सल्लागार मंडळ प्रांतातील पाच दीक्षित सेवकांची आणि कमीत कमी दोन सामान्य सभासदांचे प्रांतिक शिस्त मंडळ नेमेल. हे मंडळ मंडळीच्या नियमानुसार हा खटला ऐकतील व तो निकाली काढतील. दीक्षित सेवक अगर सनदी सेवक यांच्या चौकशीच्या वेळी कोणताही प्रांताध्यक्ष फिर्यादी अथवा सहाय्यक फिर्यादी म्हणून काम पाहणार नाही. सदर शिस्तमंडळाला नमूद केलेल्या आरोपांच्या संबंधात आरोपीला न्याय देऊन त्याला निर्दोष ठरवणे किंवा अपराधानुरूप शिस्त लावण्याचा अधिकार असेल. अशा प्रकारची शिस्त दोषी पक्षाचे तारण व त्यांचे पुनर्वसन होईल ह्या हेतूने पुरविलेली असते. ह्या शिस्तीमध्ये पश्चाताप करणे, कबुली देणे, नुकसान भरपाई करणे, निलंबन, अधिकार प्रमाणपत्र रद्द करणे, मंडळीच्या सेवेतून अगर सभासदत्वातून किंवा दोन्हीमधून निष्कासित करणे, खाजगी किंवा जाहीर ताकीद देणे किंवा परिवीक्षा कालावधीमध्ये योग्य वाटेल अशा म्हणजे शिस्तीची कारवाई निलंबीत करणे किंवा वेगळी शिस्त लावणे समावीष्ट आहे. (२२५.४, ५४०.४, ५४०.१२, ६०६.११-६०६.१२)

**६०६.६.** आरोपी किंवा प्रांतिक सल्लागार मंडळ यापैकी कोणी ही विनंती केल्यास वरील शिष्टमंडळ विभागीय शिष्टमंडळ म्हणून कार्य करेल. प्रत्येक प्रकरणामध्ये विभागिय मंडळाची नेमणूक, आरोपी सेवक ज्या ठिकाणी सभासद आहे त्या प्रांताचे अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष करतील.

**६०६.७.** अशी तरतूद केली गेली आहे की कोणत्याही परिस्थितीत ख्रिस्तप्रचारकाविरुद्ध फेज १ मधील प्रांत शिस्तभंगाची कारवाई करणार नाही.

**६०६.८.** शिस्त मंडळाचा निर्णय एकमताचा असेल, तो लेखी असेल व त्यावर सर्व सभासदांनी आपापली स्वाक्षरी केलेली असेल आणि त्यात प्रत्येक आरोप व त्याचा तपशील यासंबंधात "दोषी" अथवा "निर्दोषी" असा निर्णय नमूद केलेला असेल.

**६०६.९.** येथे तरतूद केल्याप्रमाणे शिस्त मंडळाकडून व्हावयाची अशी कोणतीही सुनावणी नेहमी जेथे आरोप दाखल झाला त्या प्रांताच्या हद्दी मध्येच आणि खटल्याची सुनावणी ऐकणाऱ्या मंडळाने नेमून दिलेल्या ठिकाणी होईल.

**६०६.१०.** कोणतीही सुनावणी व्हावयाची ती येथे पुढे तरतूद केलेल्या कार्य पद्धतींच्या नियमानुसारच होईल. (२२५.३-२२५.४, ५३२.९, ५३८.१३, ६०९)

**६०६.११.** एखाद्या सेवकावर सेवकास अशोभनीय कृत्य केल्याचा आरोप ठेवला गेला असेल व त्याने तो अपराध कबूल केला असेल किंवा आरोपाविना अपराध कबूल केला असेल तर परिच्छेद ६०६.५ मधील तरतुदीनुसार प्रांतिक सल्लागार मंडळ कोणतीही शिस्तीची कारवाई लागू करील. (५४०.४, ५४०.१२)

**६०६.१२.** एखाद्या सेवकावर सेवकास अशोभनीय कृत्य केल्याचा आरोप ठेवला गेला असेल व त्याने तो अपराध कबूल केला असेल किंवा शिस्तमंडळासमोर आणण्याआधी अपराध कबूल केला असेल तर परिच्छेद ६०६.५ मधील तरतुदीनुसार प्रांतिक सल्लागार मंडळ कोणतीही शिस्तीची कारवाई लागू करील. (५४०.४, ५४०.१२)

**६०७.** शिस्त मंडळाने निर्णय दिल्यानंतर आरोपी, प्रांतिक सल्लागार मंडळ अगर आरोपपत्रावर स्वाक्षरी करणारे यांना विभागिय न्याय मंडळाकडे दाद मागता येईल. असा निर्णय झाल्यानंतर ३० दिवसांचे आत दाद मागण्यासंबंधी चे काम सुरू होईल. न्याय मंडळ सदर खटल्या संबंधीचे सर्व कागदपत्र आणि त्यासंबंधात केलेल्या कारवाईच्या पायऱ्या यांचे बारकाईने पुनरावलोकन करेल. या चौकशीत कोणा व्यक्तीच्या हक्काप्रती पूर्वग्रहदूषित गंभीर चूक झाल्याचे न्याय मंडळाचे निदर्शनास आले तर ती चूक सुधारण्यासाठी न्यायमंडळ पूर्वीच्या कारवाईने व निर्णयाने ज्याच्यावर विपरीत परिणाम झाला आहे अशा व्यक्तीला दिलासा मिळेल अशा प्रकारे फेरसुनावणी चा आदेश देईल.

**६०८.** शिस्त मंडळाचा निर्णय आरोपी सेवकाला प्रतिकूल असेल आणि त्या निर्णयानुसार तो सेवेतून निलंबित होणार असेल किंवा त्याचे अधिकार प्रमाणपत्र रद्द होणार असेल तर

त्यानुसार सदर सेवक सर्व सेवकीय कामकाज ताबडतोब थांबवील, आणि त्याने तसे करण्याचे नाकारले तर तो आपला दाद मागण्याचा हक्क गमावील.

**६०८.१.** शिस्तमंडळाने दिलेल्या निर्णयानुसार अधिकार प्रमाणपत्र निलंबित करावे अगर रद्द करावे असे ठरल्यास आणि आरोपी सेवकाची दाद मागण्याची इच्छा असल्यास तो जेथे दाद मागवयाची आहे त्या न्यायमंडळाच्या चिटणीसांकडे विनंती अर्ज दाखल करेल. अर्जाची सुचना दाखल करण्याच्या वेळी सेवक या नात्याने लिखित अधिकार प्रमाणपत्र, आणि त्याचा दाद मागण्याचा हक्क या तरतुदीचे पालन करण्याच्या अटीवर अवलंबून आहे. अशा प्रकारची अधिकार प्रमाणपत्रे दप्तरी दाखल केल्यावर सदरहू चिटणीस ती खटल्याचा निकाल होईपर्यंत सुरक्षितपणे जतन करून ठेवतील. त्यानंतर न्यायमंडळाच्या आदेशानुसार ती प्रमुख चिटणीसांकडे पाठविली जातील किंवा सेवकाला परत दिली जातील.

**६०८.२.** संबंधित आरोपी अगर शिस्तमंडळ विभागीय न्यायमंडळाकडे दिलेल्या निर्णयाच्या आधारे प्रमुख न्यायमंडळाकडे दाद मागू शकतील. प्रमुख न्यायमंडळाकडे दाद मागण्या संबंधातील नियम व कार्यपद्धतींना अनुसरून अशी दाद मागता येईल.

## VI. कार्यपद्धतीचे नियम

**६०९.** प्रमुख न्यायमंडळाने शिस्तमंडळे आणि न्यायमंडळे यांच्यासमोर होणाऱ्या सर्व कामकाजाकरिता समान नियमन कार्यपद्धती स्वीकारावी. असे नियम स्वीकारून प्रकाशित झाल्यानंतर ते सर्व प्रकारच्या न्यायिक कार्यवाही संबंधात अंतिम प्रमाण असतील. "कार्यपद्धतीचे नियम" ही छापील पुस्तिका प्रमुख चिटणीस यांचेकडून मिळेल. प्रमुख न्यायमंडळाला अशा नियमांमध्ये कधीही बदल अगर दुरूस्त्या करता येतील व असे बदल स्वीकारून प्रकाशित झाले की ते सर्व प्रकरणांमध्ये प्रमाणभूत होऊन लागू होतील. त्यानंतर कोणत्याही कारवाईमध्ये उचलली गेलेली पावले अशा बदलांना किंवा दुरूस्त्यांना अनुसरून होईल. (६०६.१)

## VII. प्रांतिक न्यायमंडळ

**६१०.** प्रत्येक स्थापित प्रांतामध्ये एक प्रांतिक न्यायमंडळ असेल. त्यामध्ये हे परिच्छेद २०५.२२ अनुसार प्रांतिक परिषदेने निवडून दिलेले तीन नियुक्त दीक्षित सेवक आणि दोन सामान्य सभासद असतील आणि प्रांताध्यक्ष यांचा समावेश असेल. हे न्यायमंडळ

स्थानिक शिस्त मंडळाने दिलेल्या निर्णयांबाबत मंडळीच्या सभासदांनी दाद मागितलेली प्रकरणे ऐकेल. अशी कारवाई झाल्यानंतर किंवा दाद मागणाऱ्याला त्याची माहिती मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत दाद मागण्याची सुचना लेखी स्वरूपात सादर केली पाहिजे. ही सूचना प्रांतिक न्यायमंडळाकडे अगर सदर मंडळाच्या एखाद्या सभासदाकडे सादर केली पाहिजे. तसेच या सूचनेची एकेक प्रत स्थानिक मंडळीचे पाळक व संबंधित पंच मंडळाचे चिटणीस यांना दिली पाहिजे. (२०५.२२)

**६१०.१.** सामान्य सभासदावर शिस्तीची कारवाई करण्याकरिता नेमलेल्या शिस्तमंडळाने केलेल्या कृतीवर सामान्य सभासदांनी अथवा मंडळयांनी दाद मागितली तर ती ऐकून निर्णय देण्याचा अधिकार प्रांतिक न्यायमंडळाला असेल.

## VIII. प्रमुख न्यायमंडळ

**६११.** प्रमुख परिषद प्रत्येक आगामी चार-चार वर्षाच्या काळामध्ये सेवाकार्य करण्यासाठी पाच  नियुक्त दीक्षित सेवक प्रमुख न्यायमंडळाचे सभासद म्हणून निवडून देईल. न्याय मंडळाचे हे सभासद चार वर्षे आणि किंवा त्यांच्या जागी दुसऱ्यांची निवड होऊन ते कामावर रुजू होईपर्यंत सेवा करतील. या न्यायमंडळाला पुढील प्रमाणे अधिकार असतील:

**६११.१.** कोणत्याही प्रांतिक शिस्तमंडळाने आणि विभागीय न्यायमंडळाने दिलेले निर्णय अथवा केलेली कारवाई यासंबंधातील विनंत्या ऐकून त्यांचा निकाल करणे. अशा विनंत्यांना प्रमुख न्यायमंडळाने निर्णय दिलेला असेल तर तो अधिकृत व अंतिम ठरेल. (३०५.७)

**६१२.** प्रमुख परिषदेच्या अधिवेशनाच्या दरम्यान या काळात प्रमुख न्याय मंडळावर रिक्त पदे निर्माण झाली तर ती प्रमुखाध्यक्ष मंडळ नेमणूक करून भरून काढतील. (३१७.६)

**६१३.** प्रमुख न्याय मंडळाचे सभासद न्याय मंडळाचे अधिकृत कामकाज करीत असतील तेव्हा मंडळीच्या प्रमुख मंडळाच्या सभासदांना मिळतो तेवढाच दैनिक भत्ता व खर्च भत्ता त्यांनाही मिळेल व हा पैसा त्यांना प्रमुख खजिनदार कडून प्रदान करण्यात येईल.

**६१४.** प्रमुख न्याय मंडळाचे सर्व कागदपत्रांचे कायम दप्तर आणि निर्णय प्रमुख चिटणीसांचे ताब्यात राहील व ते हे सर्व दप्तर काळजीपूर्वक जतन करतील. (३२६.४)

## IX विभागीय न्याय मंडळ

**६१५.** प्रत्येक विभागासाठी एक-एक विभागीय न्यायमंडळ स्थापन केलेले असेल. प्रत्येक विभागीय न्यायमंडळामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक नियुक्त दीक्षित सेवक सभासद म्हणून राहतील. प्रत्येक प्रमुख परिषदेनंतर प्रमुखाध्यक्षांचे मंडळ त्यांना निवडून देईल. सभासदांची रिक्त पदे प्रमुखाध्यक्षांच्या मंडळाकडून भरण्यात येतील. मंडळीचे *बंधारण पुस्तक* आणि न्यायव्यवस्थेसंबंधीचे *बंधारण पुस्तक* या दोघांमध्येही विभागिय न्यायमंडळाचे कार्यपद्धतीचे नियम व प्रमुख न्यायमंडळाचे कार्यपद्धतीचे नियम सारखेच असतील. न्यायमंडळाकडे पाठविलेल्या विनंत्यासाठी पाच जणांचा गणपूर्ती आवश्यक आहे.

## X. हक्कांची हमी

**६१६.** एखादा आरोपी सेवक अगर सामान्य सभासद यांच्याविरुद्ध असलेल्या आरोपांची यथार्थ व निपक्षपातीपणे सुनावणी होण्याचा हक्क नाकारण्यात येणार नाही किंवा बेसुमार पुढे ढकलण्यात येणार नाही. निरपराध्यांची सुटका व्हावी आणि दोषी असणाऱ्यांना शिस्त लावण्यात यावी या हेतूने लेखी आरोपांची सुनावणी शक्यतो लवकर केली जाईल. प्रत्येक आरोपी तो दोषी म्हणून सिद्ध होत नाही तोपर्यंत निर्दोषी आहे असे समजण्यास पात्र राहील. प्रत्येक आरोप व त्याचा तपशील या संबंधात विनासंशय आणि नैतिकदृष्ट्या निश्चितपणे अपराध सिद्ध करण्याची जबाबदारी फिर्यादी पक्षांवर असेल.

**६१६.१.** एखाद्या सेवकासाठी खटला, न्यायप्रकरणे यांच्या नोंदी, चौकशीच्या वेळी साक्षीदारांनी दिलेल्या साक्षीची यथामूल नोंद यांच्या आधारे प्रमुख न्यायमंडळाकडे फेरसुनावणीसाठी दाद मागण्यासाठी प्रकरण तयार करणे यासाठी होणारा खर्च ज्या ठिकाणी प्रथम सुनावणी होऊन शिस्त लावण्याची कारवाई झाली त्या प्रांताने सोसावा. दाद मागणाऱ्या कोणाही सेवकाला आपल्या विनंतीच्या संबंधात तोंडी तसेच लेखी युक्तिवाद सादर करण्याचा अधिकार असेल, पण आरोपीला हा हक्क लेखी निवेदनाने सोडून देता येईल.

एखाद्या सामान्य सभासदासाठी खटला, न्यायप्रकरणे यांच्या नोंदी, चौकशीच्या वेळी साक्षीदारांनी दिलेल्या साक्षीची यथामूल नोंद यांच्या आधारे प्रांतिक न्यायमंडळाकडे फेरसुनावणीसाठी दाद मागण्यासाठी प्रकरण तयार करणे यासाठी होणारा खर्च प्रांताच्या ज्या स्थानिक मंडळीतून प्रथम सुनावणी होऊन शिस्त लावण्याची कारवाई झाली त्या

स्थानिक मंडळीने सोसावयाचा आहे. दाद मागणाऱ्या कोणाही सामान्य सभासदाला आपल्या विनंतीच्या संबंधात तोंडी तसेच लेखी युक्तिवाद सादर करण्याचा अधिकार असेल, पण आरोपीला हा हक्क लेखी निवेदनाने सोडून देता येईल.

**६१६.२.** एखाद्या सेवकाला दाद मागण्यासाठी सर्वोच्च न्यायालय म्हणजे प्रमुख न्यायमंडळ होय, आणि एखाद्या सामान्य सभासदाला दाद मागण्यासाठी सर्वोच्च न्यायालय म्हणजे प्रांतिक न्यायमंडळ होय.

**६१६.३.** एखादा सेवकावर अथवा सामान्य सभासदावर गैरवर्तन केल्याचा किंवा मंडळीच्या बंधारण पुस्तकातील कोणत्याही नियमांचा भंग केल्याचा आरोप असेल व त्या आरोपांची सुनावणी अजून व्हायची असेल तर त्याला किंवा तिला आपल्यावर दोषारोप करणाऱ्याला समोरासमोर भेटण्याचा व फिर्यादी पक्षाच्या साक्षीदारांची उलटतपासणी करण्याचा हक्क असेल.

**६०६.४.** एखाद्या साक्षीदाराने शिस्तमंडळासमोर शपथेवर किंवा गंभीरपणे प्रतिज्ञापूर्वक साक्ष दिलेली नसेल तर ती पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही व तिचा विचार केला जाणार नाही.

**६१६.५.** आपल्यावरील आरोपांचा जबाब देण्यासाठी शिस्तमंडळासमोर आणलेल्या सेवकाला किंवा सामान्य सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून स्वतःच्या पसंतीचा सल्लागार आणण्याचा नेहमी हक्क राहील. मात्र असा सल्लागार चर्च ऑफ दी नॅझरीनचा लायक सभासद असला पाहिजे. रीतसर स्थापन झालेल्या मंडळीच्या ज्या कोणा पूर्ण सभासदाविरुद्ध कोणतेच लेखी दोषारोप ठेवलेले नाहीत असा सभासद चांगल्या चालचलणूकीचा आहे असे मानण्यात येईल.

**६१६.६.** ज्या कृत्यासंबंधाने आरोप ठेवला आहे ते कृत्य आरोप ठेवला त्यापूर्वी पाच वर्षाहून अधिक काळ अगोदर घडलेले असेल, तर सेवक अगर सामान्य सभासद यांना त्याचा जाब द्यावा लागणार नाही आणि असा आरोप ठेवण्याअगोदरच्या पाच वर्षाहून अधिक एवढ्या काळात जे काही घडले असेल त्या संबंधातील कोणताही पुरावा कोणत्याही सुनावणीत विचारात घेतला जाणार नाही. परंतु अशा प्रकारच्या कृत्यामुळे पीडित व्यक्ती १८ वर्षाखालील असेल किंवा एखादा आरोप करण्यास किंवा दोषारोप दाखल करण्यास मानसिकदृष्ट्या सक्षम नसल्याचे आढळल्यास, अशा पाच वर्षांच्या कालावधीची मर्यादा, जोपर्यंत पीडित व्यक्ती वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत पोहचत नाही

किंवा मानसिकदृष्ट्या सक्षम होईपर्यंत सुरू अथवा लागू होणार नाही. अल्पवयीनांवर लैंगिक अत्याचार झालेला असल्यास कोणतीही वेळ मर्यादा लागू होणार नाही. अल्पवयीन व्यक्तीची व्याख्या १८ वर्षाखालील कोणतिही व्यक्ती अशी केली जाते, एखाद्या राज्याच्या किंवा देशाच्या स्वत:च्या स्थानिक कायद्यानुसार व्यक्ती वयात येण्याचे वय ह्या पेक्षा नंतरचे ठरविलेले नसल्यास.

एखाद्या सेवकाला सक्षम कार्यक्षेत्रातील न्यायालयाने अपराधाबद्दल दोषी ठरवले असल्यास, त्याने किंवा तिने आपली अधिकार प्रमाणपत्र प्रांताध्यक्षांकडे सोपवावे. अशा सेवकाच्या विनंतीनुसार आणि शिस्त मंडळाने यापूर्वी सहभाग घेतला नसेल तर, प्रांतिक सल्लागार मंडळ, दोषी ठरल्याच्या परिस्थितिची चौकशी करेल आणि योग्य वाटल्यास अधिकार प्रमाणपत्रे परत करेल.

**६१६.७.** एखादा सेवक अगर सामान्य सभासद यांना एकाच अपराधाकरिता दोनदा चौकशीला तोंड द्यावे लागणार नाही. तथापि शिस्तमंडळापुढे झालेल्या आरंभीच्या सुनावणीत काही दुरुस्त करण्याजोगी चूक झालेली आहे असे न्याय मंडळाला आढळले तर त्यासंबंधीच्या फेरसुनावणित अशा व्यक्तीला दोनदा चौकशीच्या फेऱ्यात अडकवले असे समजण्यात येणार नाही.

# भाग ८वा

# संस्कार आणि विधी

**सूचना:** बंधारण पुस्तकातील संस्कार आणि विधी ह्या विभागामधील कुठल्याही कलमामध्ये काही संपादन किंवा भर घालावयाची असल्यास प्रमुख परिषदेची कृती आवश्यक आहे.

**प्रभूभोजन विधी**
**विश्वासणाऱ्यांचा बाप्तिस्मा**
**शिशू किंवा बालकाचा बाप्तिस्मा**
**शिशू किंवा बालकाचा समर्पण विधी**
**मंडळीच्या सभासदांचा स्वीकार**
**विवाह**
**अंत्यविधी**
**मंडळीच्या अधिकाऱ्यांची प्रतिष्ठापना**
**स्थानिक मंडळीची स्थापना**
**मंडळीच्या वास्तूचे समर्पण**

## I. संस्कार

## ७००. प्रभुभोजन विधी

सुरूवातीला पाळकाने प्रभुभोजनाशी संबंधीत संदेश द्यावा व १ करिंथ ११:२३-२९; लूक २२:१४-२० किंवा इतर योग्य शास्त्रभाग वाचावेत. व त्यानंतर मंडळीला खालीलप्रमाणे आमंत्रण द्यावे.

प्रभुभोजनाचा संस्कार हा आमचा प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त ह्याने प्रस्थापित केला आहे. त्याद्वारे येशूचे जीवन, दु:खसहन, त्याचे त्यागमय मरण, पुनरूत्थान व त्याची पुन्हा येण्याची आशा ही घोषीत केल्या जातात. हा संस्कार तो पुन्हा येईपर्यंत त्याचे मरण आम्हाला दर्शविते.

प्रभुभोजन हे कृपेचे माध्यम असून त्यामध्ये ख्रिस्त आत्म्याच्या स्वरूपात उपस्थित असतो. त्याचा स्वीकार ख्रिस्ताच्या कार्याप्रती सन्मान व कृतज्ञतेने करावा. ज्यांनी खराखुरा पश्चाताप करून, आपली पापे सोडून दिलेली आहेत व आपल्या तारणासाठी ख्रिस्तावर विश्वास ठेवला आहे त्यांनाच ह्या भोजनामध्ये म्हणजे ख्रिस्ताचे मरण आणि पुनरूत्थान यात सहभागी होण्यास आमंत्रण आहे. आमचे जीवन व मरण यांचे नुतनीकरण होऊन आम्ही आत्म्यात एक व्हावे यासाठी आम्ही या भोजनात सहभागी होत आहोत.

मंडळीशी एक होऊन, आम्ही आमचा विश्वास व्यक्त करतो:

ख्रिस्त मरण पावला, ख्रिस्त उठविला गेला, ख्रिस्त पुन्हा येणार आहे, आणि म्हणून आम्ही प्रार्थना करतो:

पाळकाने पापकबुलीची प्रार्थना आणि विनंतीवजा प्रार्थना करावी व शेवटी समर्पणाची प्रार्थना करावी:

पवित्र देवा,

दीनांस सुवार्ता सांगण्यास, बंदिवानांस सुटकेची घोषणा करण्यास, ठेचलेल्यांस सोडविण्यास ज्याला तुझ्या आत्म्याने अभिषेक केला गेला, तो तुझा पुत्र येशू ख्रिस्त याच्या नावाने ह्या तुझ्या मेजाजवळ आलो आहोत. ख्रिस्ताने रोग्यांना बरे केले, भुकेल्यांना अन्न दिले, पाप्यांच्या बरोबर भोजन केले आणि पापक्षमेचा नवीन करार स्थापन केला. आम्ही त्याच्या पुन्हा येण्याच्या आशेमध्ये जगत आहोत.

ज्या रात्री प्रभू येशूला धरून देण्यात आले त्या रात्री त्याने भाकर घेतली, आभार मानून ती मोडली व शिष्यांना देऊन म्हटले, "हे माझे शरीर आहे, हे तुमच्यासाठी दिलेले आहे, माझ्या स्मरणार्थ हे करा."

मग भोजन झाल्यावर त्याने प्याला घेऊन आभार मानले, व आपल्या शिष्यांना देऊन म्हटले, " तुम्ही सर्व ह्यातून प्या. हे माझ्या (नव्या) कराराचे रक्त आहे. हे पापांची क्षमा होण्यासाठी पुष्कळांकरिता ओतले जात आहे. माझ्या स्मरणार्थ हे करा."

(मत्तय २६:२७-२९; लूक २२:२९)

आणि म्हणून ख्रिस्ताचे शरीर ह्या नात्याने तुझी स्तुती व आभारप्रदर्शन करण्यासाठी आम्ही ह्या ठिकाणी एकत्र झालो आहोत. आमच्यावर आणि तू दिलेल्या देणग्यांवर (भाकर व द्राक्षरस) तुझा पवित्र आत्मा ओत. तुझ्या आत्म्याच्या सामर्थ्याने त्यांना ख्रिस्ताचे शरीर व रक्त बनीव जेणेकरून आम्ही जगामध्ये ख्रिस्ताच्या रक्ताने मुक्त झालेले असे ख्रिस्ताचे शरीर बनू.

तुझ्या आत्माने आम्हाला ख्रिस्तामध्ये एक कर, परस्परांशी एक कर, तसेच सर्व जगातील ख्रिस्ताच्या सेवाकार्यामध्ये एक बनीव. ख्रिस्त विजयाने पुन्हा येईपर्यंत हे होऊ दे. पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांच्या नावाने आमेन.

आणि आता आमचा तारणारा ख्रिस्त याने शिकविल्यानुसार आम्ही म्हणतो, (सर्व मंडळी प्रभूने शिकविलेली प्रार्थना म्हणेल)

"हे आमच्या स्वर्गातील पित्या

तुझे नाम पवित्र मानले जावो.

तुझे राज्य येवो.

जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो

आमची रोजची भाकर

आज आम्हास दे,

आणि जसे आम्ही ऋण्यास ऋण सोडिले आहे,

तशी तू आमची ऋणे आम्हास सोड,

आणि आम्हास परिक्षेत आणू नको,

तर आम्हास वाईटापासून सोडीव,

कारण की राज्य, सामर्थ आणि गौरव सर्वकाळ तुझी आहेत, आमेन.

भाकर सेवन करण्याअगोदर पाळकाने म्हणावे,

“आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताचे शरीर तुमच्यासाठी देण्यात आले,

तो तुम्हाला विश्वासू व निर्दोष राखून सार्वकालिक जीवनात घेऊन जावो. ही भाकर खा आणि ख्रिस्त तुमच्यासाठी मरण पावला याची आठवण करा व कृतज्ञ व्हा.”

द्राक्षरस पिण्याआधी पाळकाने म्हणावे,

“आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताचे रक्त तुमच्यासाठी सांडले गेले. तो तुम्हाला विश्वासू व निर्दोष राखून सार्वकालिक जीवनात घेऊन जावो. हा प्याला घ्या आणि येशू ख्रिस्त तुमच्यासाठी मरण पावला याची आठवण करा व कृतज्ञ व्हा.”

प्रभुभोजनामध्ये सर्व सहभागी झाल्यावर पाळक उपकारस्तुतीची व समर्पणाची प्रार्थना करतील. (२९.५, ५१५.४, ५३२.७, ५३३.२, ५३४.१)

टिप: प्रभुभोजनासाठी न आंबविलेल्या द्राक्षरसाचा उपयोग करावा.

## ७०१. विश्वासणाऱ्यांचा बाप्तिस्मा

अति प्रियांनो,

ख्रिस्ती बाप्तिस्मा विश्वासाने ख्रिस्ताचे मरण व पुनरूत्थान ह्यात सहभागी होणे, आणि मंडळी, जी ख्रिस्ताचे शरीर आहे त्यात समाविष्ट होणे याचे प्रतिक आहे. बाप्तिस्मा हे एक कृपेचे साधन असून त्याद्वारे येशू ख्रिस्त हा प्रभू व तारणारा आहे अशी घोषणा केली जाते.

प्रेषित पौल म्हणतो की जितक्यांनी ख्रिस्त येशूमध्ये बाप्तिस्मा घेतला तितक्यांनी त्याच्या मरणात बाप्तिस्मा घेतला. आम्ही त्या बाप्तिस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो ह्यासाठी की ज्याप्रमाणे ख्रिस्त मेलेल्यातून उठविला गेला, त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनात चालावे. आपण जसे त्याच्या मरणाच्या प्रतिरूपाने त्याच्याशी संयुक्त झालो आहोत, तसेच आपण त्याच्या उठण्याच्या प्रतिरूपाने त्याच्याशी संयुक्त होऊ.

ख्रिस्ती विश्वास, ज्यामध्ये तुम्ही आता बाप्तिस्मा घ्यावयास आला आहात, तो प्रेषितांच्या मतांगिकारामध्ये व्यक्त केलेला असून, आम्ही तो कबुल करतो:

"सर्वसमर्थ देव जो पिता, आकाश व पृथ्वी यांचा उत्पन्नकर्ता, त्याजवर आम्ही विश्वास ठेवतो;"

"आणि त्याचा एकुलता एक पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभू, जो पवित्र आत्म्याच्या योगाने गर्भरूप झाला, कुमारी मरीयेच्या उदरी जन्मास आला, पंतय पिलाताच्या वेळी ज्याने दु:ख भोगीले, ज्याला वधस्तंभावर खिळले, जो मरण पावला व ज्याला पुरले, जो मृतलोकात उतरला व तिसऱ्या दिवशी मेलेल्यातून उठला, स्वर्गात चढला, आणि सर्वसमर्थ देव जो पिता याच्या उजवीकडे बसला आहे, तेथून जिवंतांचा व मेलेल्यांचा न्याय करायला जो येणार आहे, त्याजवर आम्ही विश्वास ठेवतो."

"पवित्र आत्मा, पवित्र सार्वत्रिक मंडळी, पवित्र जनांचा सहभागीपणा, पापांची क्षमा, देहाचे पुनरूत्थान, आणि सार्वकालिक जीवन यावर आम्ही विश्वास ठेवतो."

(बाप्तिस्मा घेणाऱ्याला उद्देशून पाळक म्हणतात)

प्रश्न: या विश्वासात तुम्ही बाप्तिस्मा घेणार काय?

उत्तर: होय.

प्रश्न: येशू ख्रिस्त तुमचा प्रभू व तारणारा आहे हे कबुल करून तो आताच तुमचे तारण करतो असा तुमचा विश्वास आहे काय?

उत्तर: हो, मी विश्वास ठेवतो.

प्रश्न: येशू ख्रिस्ताच्या मंडळीचा सभासद या नात्याने येथून पुढील आयुष्यात त्याला अनुसरून, देवावरील व शेजाऱ्यावरील कृपेत व प्रीतीत वाढाल काय?

उत्तर: देवाच्या साहाय्याने मी हे करीन.

बाप्तिस्मा घेणाऱ्याचे पूर्ण नाव घेऊन पाळक म्हणतात:

...............................................पिता, पुत्र व पवित्र आत्मा यांच्या नावाने मी तुझा/तुमचा बाप्तिस्मा करतो. आमेन.

(पाणी शिंपडून, पाणी ओतून किंवा बुडवून बाप्तिस्मा केल्या जाईल.)

## ७०२. शिशू किंवा बालकाचा बाप्तिस्मा

आईवडील/पालक लेकराला/लेकरांना पाळकासमोर सादर करतात.

पाळक म्हणतात:

प्रियांनो, बाप्तिस्मा कृपेच्या नव्या कराराचे चिन्ह व शिक्का आहे. देवाची नवीन जन्माची कृपा बाप्तिस्म्याद्वारे मिळते असे आम्ही म्हणत नाही. परंतु आमचा विश्वास असा आहे की ख्रिस्ती बाप्तिस्मा असे दर्शवितो की हे लहान मुल देवाच्या पुर्वापारच्या कृपेच्या आधारावर ख्रिस्ती विश्वास असणाऱ्या समाजामध्ये देवाकडून स्वीकारल्या जाते. त्यामध्ये लेकराची ख्रिस्तावरील विश्वासाची कबुली अपेक्षीत आहे.

(आईवडील/पालक यांना उद्देशून पाळक म्हणतात)

या बालकाला बाप्तिस्म्यासाठी येथे आणून तुम्ही तुमच्या ख्रिस्ती विश्वासाची साक्ष देत आहात. आपल्या आयुष्याच्या सुरूवातीच्या काळातच त्याने/तिने ख्रिस्ताला तारणारा म्हणून ओळखावे यासाठी मार्गदर्शन करा. तो/ती शिकण्याच्या वयात आल्यावर त्याला शिक्षण देण्याची जबाबदारी तुमची आहे. पवित्र वचनाचे शिक्षण देऊन त्याला/तिला पवित्र संस्काराचे महत्व व स्वरूप स्पष्ट करा; तो/ती बहकून जाऊ नये म्हणून त्याच्या शिक्षणाकडे लक्ष द्या, पवित्र मंदिराकडे त्याचे/तिचे पाय वळतील यासाठी मार्गदर्शन करा, दुष्ट संगती व सवयी यापासून दूर राहण्यासाठी त्याला/तिला योग्य मार्ग दाखवा, प्रभूपासून येणाऱ्या शिक्षणामध्ये त्याचे/तिचे संगोपन होईल यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करा.

प्रश्न: हे सर्व तुम्ही देवाच्या साहाय्याने करण्याचा प्रयत्न कराल काय? करणार असाल तर “होय मी करीन” असे म्हणा.

उत्तर: होय, हे मी करीन.

पाळक आईवडीलांना/पालकांना मुलाचे/मुलीचे पूर्ण नाव विचारतील व ते पूर्ण नाव उच्चारून खालीलप्रमाणे बाप्तिस्मा करतील.

(नाव)..........................................................पिता, पुत्र व पवित्र आत्मा याच्या नावात मी तुझा बाप्तिस्मा करतो. आमेन.

पाळक मंडळीला उद्देशून म्हणतील,

“या मुलाला/मुलीला ख्रिस्ती विश्वास असणाऱ्या समुदायामध्ये स्वीकारणे हे देखील बाप्तिस्म्याचा संस्कार आम्हाला दर्शवितो. मी मंडळीला विचारतो, आपल्या मुलाची/मुलीची जबाबदारी आईवडील/पालकांनी स्वीकारलेली आहे. ती जबाबदारी पूर्ण करण्यासाठी तुम्ही त्यांना मदत कराल काय? उत्तेजन द्याल काय? व या बालकाची आध्यात्मिक प्रौढतेप्रत वाढ होण्याकरिता तुम्ही मदत कराल काय?

मंडळी: होय, आम्ही ते करू.

पाळक खालील प्रकारची किंवा स्वत:च्या शब्दातील प्रार्थना करतील.

“हे स्वर्गिय पित्या, तू या मुलाला/मुलीला आपल्या प्रेमळ पंखाखाली घे, अशी आम्ही तुला विनंती करतो. तू त्याला/तिला स्वर्गिय कृपेमध्ये विपूलतेने समृध्द कर. बाल्यावस्थेतील धोक्यांपासून त्याला/तिला सुरक्षीत ठेव. दुष्टाई व मोह यापासून त्याला/तिला सोडीव, येशू ख्रिस्ताला तारक म्हणून स्वत: स्वीकारावे यासाठी मदत कर. देवाच्या व माणसाच्या कृपेत त्याने/तिने शरीराने व ज्ञानाने वाढावे म्हणून त्याला/तिला साहाय्य कर व त्यासाठी शेवटपर्यंत त्याचा/तिचा साहाय्यक हो. आईवडील/पालक ह्यांना सुध्दा प्रेमळ पंखाखाली घे जेणेकरून त्यांनी आपले आचार, विचार व बोलणे याद्वारे त्याला/तिला योग्य मार्गदर्शन करावे आणि तुझ्यासंबंधी व या बालकासंबंधीच्या जबाबदाऱ्या पूर्ण कराव्यात. आमेन.

## II. विधी

## ७०३. शिशू किंवा बालकांचे समर्पण

(आईवडील/पालक स्वत:ला शिशू किंवा बालकांसह सादर करतात)

पाळक म्हणतात:

“नंतर त्याने बाळकांवर हात ठेऊन प्रार्थना करावी म्हणून लोकांनी त्यांना त्याच्याकडे आणले; परंतु शिष्यांनी आणणाऱ्यांना दटावले. येशू म्हणाला, “बाळकांना माझ्याकडे येऊ द्या, त्यांना मनाई करू नका, कारण स्वर्गाचे राज्य त्यांच्यासारख्यांचेच आहे.” ” (मत्तय १९:१३-१४)

तुम्ही या मुलाला/मुलीला समर्पण करण्यासाठी येथे आणून आपल्या ख्रिस्ती विश्वासाची साक्ष देता, एवढेच केवळ नाही तर त्याला/तिला जीवनात आरंभीच देवाची ओळख व्हावी, त्याने/तिने आपल्या जीवनाद्वारे देवाचे आज्ञापालन करावे, आणि ख्रिस्ती म्हणून जगावे व मरावे अशी आपली इच्छा देखील व्यक्त करता. तसेच त्याने/तिने सार्वकालिक आशीर्वादात जावे हे देखील दर्शविता.

हा पवित्र उद्देश पूर्ण करण्यासाठी तुम्ही त्याला/तिला देवाचे भय धरण्याचे शिक्षण द्या, त्याच्या/तिच्या शिक्षणाकडे लक्ष द्या म्हणजे तो/ती बहकून जाणार नाही; त्याचे/तिचे कोवळे मन पवित्र वचनाकडे लागेल असे मार्गदर्शन करा; व त्याचे/तिचे पाय मंदिराकडे

वळतील आणि दुष्ट संगती व सवयी यापासून तो/ती दूर राहील असे शिक्षण द्या; तसेच त्याचे/तिचे प्रभूच्या शिक्षणात संगोपन होण्यासाठी तुम्ही सर्वकाही योग्य ते करा.

प्रश्न: देवाच्या साहाय्याने हे सर्व करण्याचा तुम्ही प्रयत्न कराल काय?

उत्तर: होय, आम्ही हे करू.

प्रश्न (मंडळीला उद्देशून): मी मंडळीला विचारतो, "या मुलाची/मुलीची जबाबदारी या आईवडीलांनी/पालकांनी स्वीकारलेली आहे. ती जबाबदारी पूर्ण करण्यासाठी त्यांना तुम्ही साहाय्य कराल काय? उत्तेजन द्याल काय? या मुलाची/मुलीची आध्यात्मिक उन्नतीकडे वाढ होण्यासाठी तुम्ही मदत कराल काय?"

उत्तर: होय, आम्ही ते करू.

पाळक: हे आमच्या स्वर्गिय प्रेमळ पित्या, ............................................ह्याचे/हीचे पिता, पुत्र व पवित्र आत्म्याच्या नावात आम्ही समर्पण करीत आहोत.

(या नंतर पाळक खालील प्रार्थना करतील किंवा स्वत:च्या शब्दात प्रार्थना करतील.)

"हे स्वर्गीय पित्या, तू या मुलाला/मुलीला आपल्या प्रेमळ पंखाखाली घे, अशी आम्ही तुला विनंती करतो. तू त्याला/तिला स्वर्गीय कृपेमध्ये समृध्द कर. बाल्यावस्थेतील धोक्यांपासून त्याला/तिला सोडीव. त्याने/तिने येशू ख्रिस्ताला तारक म्हणून स्वत: स्वीकारावे यासाठी मार्गदर्शन कर. देवाच्या व माणसाच्या कृपेत त्याने/तिने शरीराने व ज्ञानाने वाढावे म्हणून त्याला/तिला साहाय्य कर, व त्यासाठी शेवटपर्यंत त्याचा/तिचा साहाय्यक हो. आईवडील/पालक यांनाही तुझ्या प्रेमळ पंखाखाली घे जेणेकरून त्यांनी आपले आचार, विचार व बोलणे याद्वारे त्याला/तिला योग्य मार्गदर्शन करावे आणि तुझ्या संबंधी व या बालका संबंधीच्या जबाबदाऱ्या पूर्ण कराव्यात. आमेन."

## ७०४. मंडळीमध्ये सभासदांचा स्वीकार

मंडळीमध्ये सभासद होऊ इच्छिणाऱ्याने आपला ख्रिस्ती विश्वास व्यक्त करावा, तसेच नॅझरीन मंडळीचे सिध्दांत व व्यवहार यांचे शिक्षण त्याला दिले गेले असावे हे अपेक्षीत आहे. ते मंडळीपुढे येऊन उभे राहातील आणि पाळक त्यांना खालीलप्रमाणे संबोधतील:

"अती प्रियांनो: येशू ख्रिस्ताच्या मंडळीचे सभासद झाल्यावर मिळणारे विशेष हक्क व आशीर्वाद हे पवित्र व मौल्यवान आहेत. त्यामध्ये पवित्र सहभागीता, काळजी, सल्ला या बाबी येतात, ज्या देवाच्या कुटुंबाशिवाय इतरत्र मिळत नाहीत.

मंडळीचे पाळक आपल्या सभासदांची काळजी घेतात व त्यांना देवाच्या वचनाचे शिक्षण देऊन सामुहीक भक्तिसाठी प्रोत्साहीत करतात. भक्तीमधील सहकार्यामुळे अशी सहभागीता संपादीत केल्या जाते जी इतर कुठेही मिळणे शक्य नाही."

"मंडळीचे सिध्दांत व व्यवहार यांचे आपण पुन्हा एकदा खात्रीपूर्वक अवलोकन करून अनुमोदन देऊ या."

"देव एक असून, तो पिता, पुत्र व पवित्र आत्मा आहे असा आम्ही विश्वास ठेवतो.

मानवप्राणी पापात जन्मलेले आहेत; त्यामुळे ख्रिस्ताच्याद्वारे त्यांच्या पापांची क्षमा होणे, व पवित्र आत्म्याने नवीन जन्म होणे आवश्यक आहे. त्यानंतर अंत:करणाची शुध्दता किंवा संपूर्ण पवित्रीकरणाचा अनुभव येणे गरजेचे आहे. हे पवित्र आत्म्याच्या भरण्याने होते. कृपेच्या या प्रत्येक कार्याला पवित्र आत्मा साक्षी आहे. यावर आम्ही विश्वास ठेवतो.

आमचा प्रभू पुन्हा परत येईल, मरण पावलेले पुन्हा जिवंत होतील व शेवटचा न्याय होऊन काहींना पारितोषिक मिळेल, व काहींना शिक्षा होईल, यावर आम्ही विश्वास ठेवतो."

किंवा

(टिप: पाळक पुढील प्रकारचे विश्वास निवेदन वाचून दाखवू शकतात (परिच्छेद २०) व होणाऱ्या सभासदांकडून त्याचा स्वीकार झाल्याचे मान्य करून घेऊ शकतात.)

"चर्च ऑफ दी नॅझरीनचे विश्वास निवेदन पुढील प्रमाणे आहे, त्यावर आम्ही विश्वास ठेवतो."

"एकच देव-पिता, पुत्र व पवित्र आत्मा आहे.

संपूर्ण, ईश्वरी प्रेरणेने लिहीलेल्या जुन्या व नव्या करारातील शास्त्रलेखांमध्ये विश्वास व ख्रिस्ती आचरण यास आवश्यक ते सर्व सत्य सामावलेले आहे.

मनुष्य जन्मत:च पतित स्वभावाचा असून त्याचा कल सदोदीत दुष्ट कर्मे करण्याकडे असतो.

शेवटपर्यंत पश्चाताप न करणाऱ्यांना कोणतीच आशा उरत नाही. त्यांचा सार्वकालिक नाश होतो.

येशू ख्रिस्ताने केलेले प्रायश्चित्त सर्व मानवजातीसाठी आहे.

पश्चाताप करून प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्या कोणालाही नीतिमान ठरविण्यात येऊन, त्याचा नवा जन्म होतो व त्याची पापापासून सुटका होते.

नवा जन्म झाल्यानंतर विश्वासणाऱ्यांचे प्रभू येशू ख्रिस्तावरील विश्वासाने संपूर्ण पवित्रीकरण होते.

नवा जन्म व विश्वासणाऱ्यांचे संपूर्ण पवित्रीकरण यांना पवित्र आत्मा साक्षी आहे.

आमचा प्रभू परत येईल, मेलेले उठविले जातील, आणि अखेरचा न्यायनिवाडा होईल." (परिच्छेद २०:१-२०:८)

प्रश्न: या सत्यांवर तुमचा विश्वास आहे काय? असेल तर, "होय, माझा विश्वास आहे" असे म्हणा.

उत्तर: होय, माझा विश्वास आहे.

प्रश्न: प्रभू येशू ख्रिस्त हा तुमचा प्रभू व तारणारा आहे हे तुम्ही कबूल करता काय? तो आताच तुमचे तारण करतो असा तुमचा विश्वास आहे काय?

उत्तर: होय, माझा विश्वास आहे.

पाळक पुढील प्रश्न विचारतात:

"नॅझरीन मंडळीमध्ये सामिल व्हायचे आहे अशी इच्छा तुम्ही व्यक्त केली आहे. ख्रिस्ती चारित्र्याचा व वर्तणूकीच्या करारामध्ये सांगितल्याप्रमाणे, "तू आपला देव परमेश्वर यावर पूर्ण अंत:करणाने, पूर्ण जीवाने, पूर्ण मनाने व पूर्ण शक्तिने प्रीती कर, तसेच तू आपल्या शेजाऱ्यावर स्वत:सारखी प्रीती कर" याप्रमाणे करण्याचे वचन तुम्ही देता का? नॅझरीन मंडळीचे सिध्दांत, सहभागीता, व कार्य याद्वारे प्रकट केलेले देवाचे सेवाकार्य करण्याचे तुम्ही वचन देता का? नॅझरीन मंडळीच्या शिक्षण कार्याला तुम्ही मदत कराल काय? मंडळीच्या साक्षीला अधिक वाढविण्यासाठी, देवाच्या साहाय्याने या शिक्षण कार्यासाठी तुमचे ज्ञान व कार्य यात वाढ होण्यासाठी तुम्ही झटाल काय? कृपेच्या साधनांमध्ये सहभागी होऊन, आपल्या जवळील सर्व साधने मन:पूर्वक देवाला देऊन देवाचे गौरव होण्यासाठी आपल्या दैनंदीन जीवनात, नम्रतेने चालणे, सुभक्तीने संभाषण करणे व पवित्र सेवा करणे यासाठी तुम्ही प्रयत्न कराल काय? सर्व दुष्टाईपासून दूर राहून, पूर्ण पवित्रतेचे जीवन प्रभूच्या भयात जगण्यासाठी तुम्ही येशू ख्रिस्ताला अनुसरणार का?

उत्तर: होय, मी हे सर्व करीन.

(पाळक सभासद होऊ इच्छिणाऱ्यांना खालील शब्दांद्वारे मंडळीमध्ये स्वीकार करतात)

"चर्च ऑफ दी नॅझरीनमध्ये व या स्थानिक मंडळीच्या सहभागीतेमध्ये मंडळीतील सर्व लाभ व जबाबदाऱ्यांसहीत मी तुमचे स्वागत करतो. मंडळीचा महान प्रमुख तुम्हाला आशीर्वाद देवो, रक्षण करो आणि सर्व चांगली कार्ये विश्वासूरीतीने करण्यास तुम्हाला साहाय्य करो. तुमचे जीवन व साक्ष ही गरीबांची व जाचलेल्यांची सेवा करण्यासाठी व त्यांना ख्रिस्ताकडे आणण्यासाठी प्रभावी ठरो." आमेन.

## ७०५. विवाह विधी

जागतिक व अनेक संस्कृतीचा संदर्भ लक्षात घेऊन चर्च ऑफ दी नॅझरीन विवाहा संबंधात पुढील तत्व सूचित करते

- पती व पत्नी यांमधील समानता.
- ख्रिस्त व त्याची मंडळी यांच्यातील करारात्मक संबंध ख्रिस्ती विवाहात दिसून येतो.
- कायदेशीर व संस्कृतीशी जुळेल अशा भाषेचा उपयोग.

हा विधी एखाद्या देशातील कायदेशीर आवश्यक बाबींची जागा घेत नाही किंवा त्या रद्द करत नाही.

खाली दिलेला विधि एक साधन किंवा नमुना आहे.

कायद्यानुसार योग्यता लाभलेले व पाळकाचा योग्य सल्ला व मार्गदर्शन लाभलेले असा एक तरुण व तरुणी विवाह होण्यासाठी पुढे येतील व पाळकांसमोर उभे राहतील.

पाळक: अति प्रियांनी, (वराचे नाव)............................. व (वधूचे नाव)............................. यांना विवाहाने संयुक्त करण्यासाठी आम्ही देवासमोर व या साक्षीदारांसोबत एकत्र आलेलो आहोत. हा जीवनातील एक सन्माननिय अवस्था आहे. एदेन बागेतील निष्पाप स्थितीत देवाने विवाहाची स्थापना केली. ख्रिस्त व त्याची मंडळी यांच्यातील गुढ ऐक्याचे ते एक दर्शक आहे. ही पवित्र अवस्था ख्रिस्ताने काना येथील लग्नाला उपस्थित राहून साजरी केली आणि ती पवित्र केली. इब्री लोकांस पत्राचा लेखक यांनेही, सर्व लोकांमध्ये सन्मान्य, अशी या विवाह अवस्थेची प्रशंसा केली. म्हणून विवाह अवस्थेमध्ये कोणीही अविचाराने प्रवेश करू नये, तर देवाच्या भयात, आदराने, दक्ष राहून विवाह करावा.

या पवित्र अवस्थेत परस्पराशी संयुक्त होण्यासाठी हा पुरुष व ही स्त्री या ठिकाणी आलेली आहेत.

वधूवरांना उद्देशून पाळक म्हणतात:

(वराचे नाव)................................. व (वधूचे नाव).............................. मी तुम्हाला निक्षून सांगतो की देवाच्या सानिध्यात तुम्ही ह्या ठिकाणी उभे आहात. तुम्ही दोघांनी लक्षात घ्यावे की विवाहात संयुक्त होण्याची वचनबद्धता ही कायमस्वरूपी आहे. तुमचे वैवाहिक जीवन हे मरणाने तुमचा वियोग होईपर्यंत असावे ही देवाची इच्छा आहे. तुम्ही परस्परांना दिलेली अभिवचने जर मोडली नाही व देवाची इच्छा समजून घेऊन त्याप्रमाणे तुम्ही सर्व काही केले तर त्याच्या उपस्थितीने तुमचे आयुष्य आशीर्वादित होईल व तुमच्या घरात त्याच्या द्वारे येणाऱ्या शांतीचे वास्तव्य राहील.

पुरुषाला उद्देशून पाळक म्हणतात:

(पुरुषाचे नाव)................................ तुम्ही या स्त्रीचा पत्नी म्हणून स्वीकार करता का? विवाहाच्या पवित्र बंधनात देवाच्या नियमानुसार तुम्ही एकत्र राहाल काय? तुम्ही हिच्यावर प्रीती करून, हिचा मान राखून, हिला सुखसमाधान द्याल का? ही आजारी असेल तेव्हा, आणि चांगली बरी असेल तेव्हा हिची काळजी घ्याल का? तुम्ही दोघे हयात असेपर्यंत तुम्ही हिच्याशीच एकनिष्ठ राहाल का?

पुरुषाचे उत्तर: होय, मी असे करीन!

स्त्री ला उद्देशून पाळक म्हणतात:

(स्त्रीचे नाव).......................... तुम्ही या पुरुषाचा पती म्हणून स्वीकार करता का? विवाहाच्या पवित्र बंधनात देवाच्या नियमानुसार तुम्ही एकत्र राहाल का? तुम्ही या पुरुषावर प्रीती करून, ह्याचा मान राखून, त्याला सुखसमाधान द्याल का? हा आजारी असेल तेव्हा, आणि चांगला बरा असेल तेव्हा, याची काळजी घ्याल का? तुम्ही दोघे हयात असेपर्यंत तुम्ही याच्याशीच एकनिष्ठ राहाल काय?

स्त्री चे उत्तर: होय, मी असे करीन!

वधू व वर यांचे माता-पिता, कुटुंबातील सदस्य आणि देवाच्या कुटुंबातील सदस्यांना उद्देशून पाळक म्हणतात:

“या दोघांच्या अशा प्रकारे एकत्र येण्याला तुम्ही आशीर्वाद द्याल का?”

सर्व म्हणतील: होय, आम्ही आशीर्वाद देतो!

वधू आणि वर समोरासमोर उभे राहून परस्परांचा उजवा हात हाती घेतात व पाळकांनी म्हटल्यानुसार परस्परांना अभिवचने देतात.

पाळक बोलतात ते शब्द उच्चारून वर वधूला अभिवचने देतो.

(वधूचे नाव)............................. मी (वराचे नाव)................ तुझा आपल्या पुढील जीवनासाठी माझी पत्नी म्हणून स्वीकार करतो. मी तुझ्यावर प्रीती करीन आणि तुझी काळजी घेईन. चांगल्या दिवसात आणि वाईट दिवसात मी तुझ्याबरोबर राहीन. तू आजारी असशील तेव्हा आणि चांगली बरी असशील तेव्हा, मी तुझी काळजी घेईन. आपण गरीब असलो किंवा श्रीमंत असलो, तरी मी तुझ्यावर प्रीती करीन. मरणाने आपला वियोग होईपर्यंत मी देवाच्या नियमानुसार तुझ्याबरोबर राहीन. मी तुला देवासमोर गंभीरपणे असे अभिवचन देतो.

पाळक बोलतात ते शब्द उच्चारून वधू-वराला अभीवचने देते.

(वराचे नाव).................................. मी (वधूचे नाव)..................... तुम्हाला आपल्या पुढील जीवनासाठी माझा पती म्हणून स्वीकार करते. मी तुमच्यावर प्रीती करीन व तुमची काळजी घेईन. चांगल्या दिवसात आणि वाईट दिवसात मी तुमच्याबरोबर राहीन. तुम्ही आजारी असाल तेव्हा आणि चांगले बरे असाल तेव्हा मी तुमची काळजी घेईन. आपण गरीब असलो किंवा श्रीमंत असलो तरी मी तुमच्यावर प्रीती करेन. मरणाने आपला वियोग होईपर्यंत मी देवाच्या नियमानुसार तुमच्याबरोबर राहीन. मी तुम्हाला देवासमोर गंभीरपणे असे अभिवचन देते.

अंगठी घालण्याचा कार्यक्रम यावेळी करता येईल.

पाळक दोन्ही बाजूकडून अंगठ्या स्वीकारतील.

प्रथम वर वधूला अंगठी घालेल व पाळकांच्या पाठोपाठ पुढील शब्द बोलेल.

"ही अंगठी माझ्या प्रीतीचे दर्शक असून माझ्या विश्वासूपणाचे प्रामाणिक अभिवचन आहे."

नंतर वधू-वराला अंगठी घालेल व पाळकाच्या पाठोपाठ पुढील शब्द बोलेल.

"ही अंगठी माझ्या प्रीतीचे दर्शक असून माझ्या विश्वासूपणाचे प्रामाणिक अभिवचन आहे."

यानंतर वधू व वर दोघेही गुडघे टेकतील व पाळक पुढील प्रार्थना किंवा स्वतःच्या शब्दातील प्रार्थना करतील.

“हे सनातन देवा, सर्व विश्वाच्या उत्पन्नकर्त्या व रक्षणकर्त्या, आध्यात्मिक कृपा व सार्वकालिक जीवन देणाऱ्या, तू (वाराचे नाव).......................व (वधूचे नाव)......... ..................., या दोघांवर आपला आशीर्वाद पाठीव. त्यांना आम्हीही तुझ्या नावात आशीर्वाद देत आहोत की, जेणेकरून आज त्यांनी परस्परांना गंभीर रीतीने जी अभीवचने दिली आहेत, ती त्यांनी पाळावीत व त्या दोघांनी नेहमी शांतीने व प्रीतीने रहावे. ही विनंती आम्ही प्रभु येशू ख्रिस्ताच्या नावाने करतो. आमेन!”

वधू व वर एकमेकांसमोर उभे राहतात:

पाळक म्हणतात: या पुरुषाने व या स्त्रीने विवाहाच्या पवित्र बंधनाने संयुक्त होण्याचे कबूल केले आहे. देवासमोर व उपस्थित लोकांसमोर त्यांनी परस्परांना शपथपूर्वक अभीवचने दिली आहेत. यास्तव ही आता पिता, पुत्र व पवित्र आत्म्याच्या नावात, विवाहाने संयुक्त होऊन पती-पत्नी झालेली आहेत, असे मी जाहीर करतो. देवाने विवाहाने एकत्र जोडलेल्या या दोघांच्या मध्ये कोणाही व्यक्तीने कधीच येऊ नये.

पाळक पती-पत्नीला आता पुढील आशीर्वाद देतात:

“देव जो पिता, पुत्र व पवित्र आत्मा, तो तुम्हाला आशीर्वाद देवो. तो आपल्या कनवाळूपणाने तुमची काळजी घेवो, आणि आपल्या प्रीतीने व कृपेने तुमची जीवने परिपूर्ण करो. येशू ख्रिस्ताच्या प्रीतीमध्ये ह्या जीवनात तुम्ही असे एकत्र राहा की येणाऱ्या जगामध्ये तुम्हाला देवाचे सार्वकालिक जीवन प्राप्त होईल.”

पाळक शेवटी एक प्रार्थना करून शेवटचा आशीर्वाद देतील व विवाहाचा विधी समाप्त होईल.

(कलम ५३२.७, ५३३.२, ५३४.१,५३८.१९)

## ७०६. प्रेत क्रियेचा विधी

अति प्रियांनो, आज आपण येथे मरण पावलेल्या आपल्या प्रिय आप्ताच्या आणि मित्राच्या स्मृतीचा आदर करण्यासाठी येथे जमलो आहोत. आम्ही त्यांच्या कुटुंबाच्या मोठ्या दुःखात सहभागी आहोत व मनापासून आमची सहानुभूती व्यक्त करतो.

आम्ही देवाच्या वचनातून सांत्वनाचे शब्द ऐकू या:

येशूने म्हटले, “तुमचे अंत:करण अस्वस्थ होऊ नये. देवावर विश्वास ठेवा आणि माझ्यावरही विश्वास ठेवा. माझ्या पित्याच्या घरात राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत,

नसत्या तर मी तुम्हाला तसे सांगितले असते. मी तुम्हासाठी जागा तयार करावयास जातो आणि मी जाऊन तुम्हासाठी जागा तयार केली म्हणजे पुन्हा येऊन तुम्हाला आपल्याजवळ घेईन; यासाठी की जेथे मी आहे तेथे तुम्ही असावे." (योहान १४:१-३)

येशूने म्हटले, "पुनरुत्थान व जीवन मीच आहे; जो माझ्यावर विश्वास ठेवितो तो मेला असला तरीही जगेल आणि जिवंत असलेला प्रत्येकजण जो माझ्यावर विश्वास ठेवितो तो कधीही मरणार नाही." (योहान ११:२५-२६)

देवाचा धावा: (पाळकाने स्वतःच्या शब्दात किंवा पुढीलप्रमाणे प्रार्थना करावी)

"सर्वसमर्थ देवा, स्वर्गीय पित्या, आमच्या दुःखामध्ये आम्ही तुझ्याकडे येतो; आम्ही केवळ तुझ्यावरच अवलंबून आहोत. तू आमच्यावर प्रीती करतोस हे आम्हाला माहीत आहे. तुलाच मृत्यूच्या अंधकाराचा दिवसाच्या प्रकाशात पालट करता येतो. भावी काळात आमच्यासाठी तू जी योजना केली आहेस, त्याची आदराने व नम्रतेने वाट पाहण्यास आम्हाला सहाय्य कर. हे देवा तूच आमचा आश्रय आमचे सामर्थ्य असून संकटसमयी आम्हास साहाय्य करतो. तू आपली महान व विपुल दया आम्हास दे. ज्यांना आज मोठे दुःख झाले आहे, त्यांचे तुझ्या कृपेने सांत्वन कर. त्यांच्या खिन्न अंतःकरणाचे घाव बरे कर; त्यांची मने पुन्हा आनंदी कर. ही विनंती आम्ही आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने मागतो. आमेन. (यावेळेस एक भक्तिगीत किंवा विशेष गीत गावे)

पुढील शास्त्रभाग वाचण्यात येईल:

"आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादीत असो. जिवंत आशा प्राप्त होण्यासाठी आणि अविनाशी, निर्मळ व अक्षय वतन मिळण्यासाठी, त्याने आपल्या महादयेनुसार येशू ख्रिस्ताच्या मृतातून पुनरुत्थानाच्या द्वारे आपल्याला पुन्हा जन्म दिला; जे तारण शेवटच्या काळी प्रगट होण्यास सिद्ध आहे, ते प्राप्त व्हावे म्हणून जे तुम्ही देवाच्या शक्तिने विश्वासाच्या योगे रक्षिलेले आहा, त्या तुम्हासाठी ते वतन स्वर्गात राखून ठेवले आहे. त्याविषयी तुम्ही उल्हास करता, तरी तुम्ही आता थोडावेळ, भाग पडले तसे निरनिराळ्या परीक्षांमुळे दुःख सोसले, ह्यासाठी की नाशवंत सोन्याची परीक्षा अग्नीने करितात, त्या सोन्यापेक्षा मौल्यवान असे जे तुमचे विश्वासाच्या परीक्षेत उतरणे ते येशू ख्रिस्ताच्या प्रकट होण्याच्या वेळेस प्रशंसा, गौरव व मान ह्यास कारणीभूत व्हावे, त्याला पाहिले नसताही त्याच्यावर तुम्ही प्रीती करिता; आता तो दिसत नसता, त्याच्यावर विश्वास

ठेवता; त्या विश्वासाचे पर्यवसान जे आपल्या जिवांचे तारण ते उपभोगीत अनिर्वाच्य गौरवयुक्त आनंदाने उल्हासता." (१ पेत्र १:३-९)

(टिप: इतर शास्त्रभागही या ठिकाणी वाचू शकता - मत्तय ५:३-४,६,८; स्तोत्र २७:३-५,११,१३-१४; ४६:१-६, १०-११)

यानंतर संदेश होईल

त्यानंतर विशेष किंवा भक्ति गीत गायले जाईल

शेवटची प्रार्थना

## कबरे जवळ गेल्यानंतर

"मला ठाऊक आहे की माझा उद्धारक जिवंत आहे. तो अंती पृथ्वीवर उभा राहील, ही माझी त्वचा छिन्न भिन्न होऊन नष्ट झाली, तरी मी देवाला देहविरहित पाहिन. त्याला मी स्वतः पाहीन, अन्याचे नव्हे तर माझेच नेत्र त्याला पाहतील, माझा आत्मा झुरत आहे." (इयोब १९:२५-२७)

"पाहा, मी तुम्हाला एक रहस्य सांगतो; आपण सर्वच महानिद्रा घेणार नाही, तरी आपण सर्वजण बदलून जाऊ. क्षणात, निमिषांत शेवटला कर्णा वाजेल तेव्हा... मेलेले ते अविनाशी असे उठविले जातील आणि आपण बदलून जाऊ,.... कारण जे विनाशी त्याने अविनाशीपण परिधान केले आणि हे जे मर्त्य त्याने अमरत्व परिधान केले, असे जेव्हा होईल तेव्हा "मरण विजयात गिळले गेले आहे" असा जो शास्त्र लेख आहे तो पूर्ण होईल. "अरे मरणा, तुझा विजय कोठे? अरे मरणा, तुझी नांगी कोठे? मरणाची नांगी पाप आणि पापाचे बल नियमशास्त्र आहे; परंतु जो देव आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा द्वारे आपणाला जय देतो त्याची स्तुती असो. म्हणून माझ्या प्रिय बंधू-भगिनिंनो, प्रभूमध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत हे तुम्ही जाणून आहात; म्हणून तुम्ही स्थिर व अढळ व्हा आणि प्रभूच्या कामात सर्वदा अधिकाधिक तत्पर असा." (१ करिंथ १५:५१-५२, ५४-५८)

तेव्हा स्वर्गातून झालेली वाणी मी ऐकली; ती म्हणाली: लिही प्रभू मध्ये मरणारे आतापासून धन्य आहेत." "आत्मा म्हणतो, खरेच, आपल्या कष्टांपासून सुटून त्यांना विसावा मिळेल; त्यांची कृत्ये त्याच्या बरोबर जातात." (प्रकटीकरण १४:१३)

पाळक पुढील पैकी योग्य तो उतारा वाचतील.

## विश्वासणाऱ्यांसाठी किंवा ख्रिस्ती व्यक्तींसाठी

आमचा प्रिय व्यक्तीचा आत्मा अगोदरच जीवनदात्या देवाकडे परत गेला आहे म्हणून आमच्या प्रिय व्यक्तीचा देह आम्ही कबरे मध्ये ठेवत आहोत आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या द्वारे मिळणाऱ्या सार्वकालिक जीवनावर आमचा विश्वास आहे. जे मेलेले आहेत ते पुन्हा उठविले जातील असा आमचा विश्वास व मोठी आशा आम्हाला आहे. प्रभू येशू ख्रिस्त त्याच्या शरीरा सारखी गौरव शरीरे आम्हाला देईल हा आमचा विश्वास आहे. आम्ही लक्षात ठेवूया, "प्रभू मध्ये मरणारे आतापासून धन्य आहेत."

## अविश्वासणाऱ्या व्यक्तीसाठी

हे जग सोडून गेलेल्या व्यक्तीचा देह आम्ही या भूमीमध्ये ठेवण्यासाठी आलो आहोत. त्याचा/तिचा आत्मा आम्ही देवाकडे सोपवून देतो. आमचा दयावान देव यथार्थतेने न्याय करील असा आमचा विश्वास आहे. देवाच्या भयात व प्रीतीत जीवन जगण्याचा आपण पुन्हा निश्चय करूया, म्हणजे पुढे एक दिवस आपल्याला स्वर्गात सार्वकालिक जीवन प्राप्त होईल.

## बालकांसाठी

प्रभू येशू ख्रिस्तामध्ये पुनरुत्थान व सार्वकालिक जीवन आहे ही मोठी आशा व खात्री आम्हाला आहे. तर त्याच आशेने आता या बालकाचा देह आम्ही या कबरेत ठेवत आहोत. येशू या पृथ्वीवर होता तेव्हा त्याने लहान मुलांना आपल्या जवळ घेतले व आशीर्वाद देऊन म्हटले, "स्वर्गाचे राज्य यांच्यासारख्यांचेच आहे." म्हणून आम्ही म्हणतो, "प्रभू येशू या प्रिय बालकाला स्वतःकडे घेवो."

## प्रार्थना

आमच्या स्वर्गीय पित्या तू दयाळू आहेस या दुःखाच्या व शोकाच्या प्रसंगी आम्ही तुझ्याकडे पाहतो. ज्यांची अंत:करणे आज दु:खाने भरली आहेत, त्यांचे तू सांत्वन कर. तू त्यांच्याबरोबर राहा. भावी काळात त्यांना मार्ग दाखव. तुझ्यावर प्रिती करण्यास व तुझी सेवा करण्यास त्यांना सहाय्य कर, व पुढील काळात सार्वकालिक जीवन देण्याच्या तुझ्या अभिवाचनाचा अर्थ त्यांना समजू दे.

"आता शांतीच्या देवाने सर्वकाळच्या कराराच्या रक्ताने मेंढरांचा महान मेंढपाळ आपला प्रभू येशू ह्याला मेलेल्यातून पुन्हा परत आणले तो देव त्याला जे आवडते ते

आपणामध्ये येशू ख्रिस्ताच्या द्वारे करो व तो आपल्या इच्छेप्रमाणे करण्यास प्रत्येक चांगल्या कामासाठी सिद्ध करो. त्या येशू ख्रिस्ताला युगानुयुग गौरव असो. आमेन." (इब्री १३:२०-२१)

## ७०७. मंडळीच्या अधिकाऱ्यांची प्रतिष्ठापना

अनुरूप असे गीत गायल्यानंतर,

मंडळीचे सचिव ज्या सर्वांची प्रतिष्ठापना करायवयाची आहे त्या सर्व अधिकाऱ्यांची नावे आणि पद वाचतील. नावे वाचलेल्या सर्वांनी पुढे येऊन पाळकांसमोर उभे राहावे. करार पत्रक प्रत्येकाला देण्यात यावे.

पाळक म्हणतात:

देवाने आपली सेवा करण्याकरिता काही लोकांना पाचारण केले आहे हे जाणून येथे योग्य रीतीने निवड होऊन उभ्या असलेल्या प्रत्येक व्यक्तीची त्याच्या सेवेच्या पदावर प्रतिष्ठापना करण्यासाठी आम्ही येथे एकत्र झालेले आहोत.

या वेळी देवाचे वचन काय सांगते ते ऐकू या.

"म्हणून बंधूजनहो, मी देवाच्या करूणेमुळे तुम्हाला विनवितो की, तुम्ही आपली शरीरे जिवंत, पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून समर्पण करावी. ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे. देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे म्हणून या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या." (रोम. १२:१-२)

"तू सत्याचे वचन नीट सांगणारा, लाज वाटण्यास कसलेही कारण नसलेला, देवाच्या पसंतीस उतरलेला कामकरी असा स्वत:ला सादर करण्यास होईल तितके कर." (२ तीमथ्य २:१५)

"ख्रिस्ताचे वचन तुम्हाबरोबर विपूल राहो; परस्परांना सर्व ज्ञानाने शिकवण द्या व बोध करा; आपल्या अंतःकरणात देवाला स्तोत्रे, गीते व आध्यात्मिक गायने कृपेच्या प्रेरणेने गा." (कलसै ३:१६)

"ज्याला वचनाचे शिक्षण मिळाले आहे त्याने ते शिक्षण देणाऱ्याला सर्व चांगल्या पदार्थांचा वाटा द्यावा." (गलती ६:६)

पंच, सेवक व शिक्षक यांना उद्देशून पाळक म्हणतात:

या वेदीसमोर उभे असणारे तुम्ही, मंडळीचे सेवाकार्य, ख्रिस्तवार्ता संघ, तरूण संघ, रविवारीय शास्त्रशिक्षण शाळा शिष्यत्व कार्य या सर्व गोष्टींची काळजी घेणार आहात. आपल्या कार्याकडे प्रभूची सेवा करण्याची विशेष संधी ह्या नात्याने बघा, तुमच्या या प्रत्येक सेवेमध्ये तुम्हाला आनंद व आध्यात्मिक आशीर्वाद यांचा लाभ होवो.

मंडळीचे कार्य पुढे चालविणे आणि आत्म्यांची सार्वकालिकता आपल्या हाती असल्यामुळे तुमचे सेवाकार्य अतिशय महत्वाचे आहे पण ते सोपे नाही. ख्रिस्ती चारित्र्याचा विकास करणे ही तुमची जबाबदारी आहे आणि तारण न पावलेल्या लोकांना येशू ख्रिस्ताकडे आणणे हे तुमचे उद्दिष्ट आहे. देवाच्या गौरवासाठी त्याचे कार्य करण्यासाठी तोच तुम्हाला सामर्थ्य व शहाणपण देवो.

पाळक म्हणतात: तुम्हा प्रत्येकाला करार छापलेली पत्रिका देण्यात आलेली आहे. आपण सर्व ती एकत्र मिळून वाचू आणि ती आम्हा प्रत्येकाचे वैयक्तिक अभिवचन बनवू.

## कर्मचाऱ्यांचा करार

मंडळीच्या सभासदांनी विशिष्ट पदासाठी निवडून देऊन माझ्यावर जो विश्वास दर्शविला आहे, तो विचारात घेऊन मी पुढील करार करीत आहे:

चर्च ऑफ दी नॅझरीनचे आदर्श व मानदंड यांच्याशी सुसंगत असा ख्रिस्ती जीवनाचा उच्च मानदंड व कित्ता यांचा मी प्रतिपाळ करीन.

मी दररोज पवित्र शास्त्र वाचन व प्रार्थना ह्या करिता दररोज वेगळा वेळ निश्चित करून करून माझ्या वैयक्तिक ख्रिस्ती अनुभवाचे संगोपन करीन.

काही अपरिहार्य कारणाशिवाय मी नियमीत रविवारीय शास्त्रशिक्षण शाळा, रविवारच्या सकाळ व संध्याकाळच्या उपासना सभेला व आठवड्याच्या मध्यास असणाऱ्या उपासना सभेला उपस्थित राहीन.

मंडळीच्या ज्या समित्या व मंडळांचा मी सभासद आहे किंवा नेमला जाईन त्यांच्या सर्व योग्यरित्या बोलावलेल्या सभांना मी विश्वासूरित्या उपस्थित राहीन.

एखाद्या सभेला ठरलेल्या वेळी उपस्थित राहाणे शक्य नसेल किंवा माझी जबाबदारी पार पाडणे मला शक्य नसेल तर मी तसे माझ्या प्रमुखाला कळविन.

माझ्या सेवाकार्याची कर्तव्यपूर्ती करण्यात मदत व्हावी म्हणून चर्च ऑफ दी नॅझरीनची प्रकाशने, पुस्तके, व इतर वाङ्मय मी वाचत राहील.

मला स्वत:चा आणि माझ्या कौशल्यांचा विकास साधता यावा म्हणून संधी मिळेल तेव्हां सतत सुरू असणारे ले प्रशिक्षण घेण्यास मी तयार राहीन.

लोकांना येशू ख्रिस्ताकडे आणण्याकरिता इतरांच्या आध्यात्मिक कल्याणाप्रती सक्रिय रूची व्यक्त करीन आणि मंडळीमधील सर्व आध्यात्मिक सभांना नेहमी उपस्थित राहीन व साहाय्य करीन.

(हा करार वाचल्यानंतर पाळक प्रार्थना करतील व शक्य असल्यास समर्पणाचे एक गीत गायल्या जाईल. या नंतर पाळक पुढे उभे असलेल्या मंडळीच्या अधिकाऱ्यांना उद्देशून पुढील बोध करतील.)

या मंडळीने तुमच्यावर सोपविलेले जबाबदारीद्वारे या मंडळीचे काम पुढे नेण्याचे तुम्ही वचन दिले आहे. यास्तव ज्या ज्या पदासाठी तुमची निवड किंवा नियुक्ती झालेली आहे त्या त्या पदावर मी तुमची प्रतिष्ठापना करतो. आता तुम्ही या मंडळीच्या संस्थात्मक रचेनेचे व पुढारीपणाचे अत्यावश्यक भाग आहात. उदाहरणाद्वारे, उपदेशाद्वारे आणि तत्पर सेवेद्वारे देवाच्या द्राक्षमळ्यातील विश्वासू सेवक बना.

(या नंतर पाळक मंडळीला उभे राहण्यास सांगून पुढील बोध करतील.)

तुमच्या मंडळीच्या पुढाऱ्यांनी दिलेली करार वचने तुम्ही ऐकली आहेत. आता सर्व मंडळीला मी निक्षून सांगतो की आपल्या पुढाऱ्यांना सहकार्य करण्यात तुम्ही विश्वासू राहावे. त्यांच्यावरचे ओझे हे जड आहे. त्यासाठी त्यांना तुमच्या प्रार्थनांची व साहाय्याची गरज आहे. त्यांच्यासमोरील प्रश्न तुम्ही समजून घ्या व त्यांचे दिसणारे किंवा वाटणारे अपयश सहन करा. त्यांना त्यांच्या गरजेनुसार वेळोवेळी आनंदाने साहाय्य करा, जेणेकरून आमच्या मंडळीने एकत्र काम करून लोकांना येशूकडे आणणारे परिणामकारक पात्र बनावे.

(पाळकाने शेवटची प्रार्थना करावी किंवा सर्वांनी मिळून प्रभूने शिकविलेली प्रार्थना म्हणावी.)

## ७०८. स्थानिक मंडळीची स्थापना

प्रांताध्यक्ष (मंडळीला उद्देशून): ख्रिस्तातील सर्व प्रियांनो, आज या प्रभूच्या दिवशी आपण सर्वजण (मंडळीचे नांव..................................) या चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळीची अधिकृतरीतीने स्थापना करण्यासाठी एकत्र आलेलो आहोत. तुम्ही मंडळी आहातच परंतु आज चर्च ऑफ दी नॅझरीनची घटना व व्यवस्था याला अनुसरून स्थापित मंडळीचे हक्क, विशेषाधिकार व जबाबदाऱ्या तुम्ही स्वीकारणार असता ह्या मंडळीचे जीवन नवीन स्तरावर पोहोंचत आहे.

तुमचा दृष्टांत, तुमचा विश्वास, आणि तुमचे परिश्रमपूर्वक केलेले काम आणि सर्वांनी हातांमध्ये हात घेऊन, हृदयाशी हृदय जोडून या जगामध्ये देवराज्याचे प्रतिक म्हणून विश्वासणाऱ्यांचा समुह तुम्ही निर्माण केल्याबद्दल जागतिक नॅझरीन मंडळीच्या वतीने मी तुमची प्रशंसा करतो. या मंडळीच्या स्थापनेद्वारे आपण जागतिक नॅझरीन कुटुंबासोबत "राष्ट्रांमध्ये ख्रिस्तसादृष्य शिष्य तयार करणे" या आपल्या सामायिक उद्दिष्टाची पूर्ती करण्यात सहभागी होण्याचा हेतू घोषित करीत आहात.

हे सेवाकार्य करण्यासाठी आपली तीन मुलभूत मुल्ये आपल्याला मार्गदर्शन करतात:

**आम्ही ख्रिस्ती लोक आहोत:** ऐतिहासीक एेकत्वाच्या सिध्दांतावर विश्वास ठेवणाऱ्या इतर सर्व ख्रिस्ती लोकांसोबत आम्ही उभे असून त्या संबंधीचे विश्वास निवेदन व वेस्लिप्रणित पवित्रतेचा वारसा याला आम्ही पुष्टी देतो. पवित्र शास्त्र आम्हाला ख्रिस्त व तारणासाठी सर्व आवश्यक बाबी घोषित करते म्हणून ते आमच्याकरिता सत्याचे प्राथमीक स्रोत आहे.

**आम्ही पवित्रतेसाठी पाचारलेले लोक आहोत:** आमचा असा विश्वास आहे की देवाच्या कृपेद्वारे केवळ आमच्या पापांची क्षमाच नाही तर विश्वासाने आमचे अंत:करण सुध्दा धुतल्या जाते. पवित्र आत्म्याच्या या कृपायुक्त कार्यामुळे आमचे पवित्रीकरण होते व ख्रिस्तासारखे जीवन जगण्यास आम्हाला सामर्थ्य प्राप्त होते.

**आम्ही सेवाकार्य करणारे लोक आहोत:** देवराज्याचे उद्दिष्ट म्हणजे समेटाची सेवा करण्याकरिता देवाने आम्हाला पाचारलेले आहे असा आम्ही विश्वास ठेवतो. हे सेवाकार्य आम्ही शुभवर्तमान गाजविण्याद्वारे, दयेच्या व न्यायाच्या कृतींद्वारे, ख्रिस्ताच्या नमुन्यानुसार शिष्य तयार करण्याद्वारे करतो.

**प्रांताध्यक्ष (पाळकाला उद्देशून):** जे लोक या मंडळीचे अधिकृत सभासद होऊ इच्छितात त्यांना तुम्ही येथे सादर करता काय?

**पाळक प्रतिसाद देतात:** सन्माननिय प्रांताध्यक्ष (प्रांताध्यक्षाचे नाव) साहेब, तुमच्यासमोर मंडळीचे अधिकृत सभासद सादर करणे हा माझा सन्मान आहे. ख्रिस्तातील बंधू व भगिनी म्हणून मी या लोकांना तुमच्यापुढे सादर करतो. चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सामायीक उद्दिष्टाकरिता त्यांनी स्वत:ला समर्पित केलेले आहे. (पाळक प्रत्येकाचे नांव वाचतात किंवा कुटुंबांची नावे वाचतात)

**प्रांताध्यक्ष (सभासदांना उद्देशून):** बंधू-भगीणींनो सभासदत्वाची अभिवचने तुम्ही पुन्हा एकदा विदीत करा.

**प्रांताध्यक्ष:** येशू ख्रिस्ताला तुम्ही प्रभू व तारणारा म्हणून स्वीकारता काय? तो तुमचे आता तारण करतो असा तुमचा विश्वास आहे का?

**प्रतिसाद:** होय, मी विश्वास ठेवतो.

**प्रांताध्यक्ष:** चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सर्वमान्य विश्वासनिवेदनाची तुम्ही पुष्टी करता का?

**प्रतिसाद:** होय, मी करतो.

**प्रांताध्यक्ष:** ख्रिस्ती चारित्र्याचा व ख्रिस्ती वर्तणूकीच्या करारामध्ये नमुद केल्याप्रमाणे चर्च ऑफ दी नॅझरीनच्या मंडळीद्वारे सहभागीता आणि देवाचे कार्य करण्याचा आपण करार करता काय? नम्रतेने चालणे, सुभक्तीचे संभाषण, पवित्र सेवा, ऐपतीनुसार समर्पित होऊन देणे, सर्व कृपेच्या साधन असणाऱ्या संस्कार सभांना विश्वासूरीतीने हजर राहून सहभागी होणे, या द्वारे तुम्ही देवाचे गौरव कराल का? आणि सर्व वाईटापासून दूर राहून, प्रभूच्या भयामध्ये राहून, जीवनातील व अंत:करणाची परिपूर्ण पवित्रता याचा तुम्ही आस्थेने शोध घ्याल का?

**प्रतिसाद:** होय, मी तसे करीन.

**प्रांताध्यक्ष:** यास्तव, चर्च ऑफ दी नॅझरीनच्या (प्रांताचे नांव…....) चा प्रांताध्यक्ष म्हणून मला जो अधिकार प्राप्त झालेला आहे, त्यानुसार (मंडळीचे नांव…....) या चर्च ऑफ दी नॅझरीच्या मंडळीची अधिकृतरीतीने स्थापना झाली असे मी जाहीर करतो. चर्च ऑफ दी नॅझरीनच्या जागतिक मंडळ्यांच्या कुटुंबामध्ये तुमचे स्वागत आहे. सर्वकाही देवाच्या

इच्छेप्रमाणे करण्यासाठी त्याच्या कृपेने तो तुम्हास दररोज सर्व चांगल्या बाबींनिशी सिध्द करो आणि ख्रिस्ताची शांती तुम्हाबरोबर असो.

## ७०९. मंडळीच्या इमारतीचे समर्पण

**पाळक:** प्रभूच्या हाताने उत्कर्ष पावून, व त्याच्या कृपेने व सामर्थ्याने सक्षम होऊन, ह्या इमारतीला देवाच्या नावाच्या गौरवासाठी पूर्ण करून, त्याच्या राज्याच्या गौरवासाठी या इमारतीचे समर्पण करण्याकरिता, आम्ही येथे एकत्र झालो आहोत. आम्हाला प्रत्येक चांगली देणाऱ्या आमच्या देवापित्याचे आम्ही गौरव करतो.

देव जो आमचा पिता ज्याच्यापासून प्रत्येक चांगली व परिपूर्ण देणगी येते ह्याच्या गौरवार्थ; आमचा प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त ह्या सन्मानार्थ; आणि प्रकाश, जीवन व सामर्थ्य याचा स्रोत पवित्र आत्मा जो आम्हाला पवित्र करतो त्याच्या स्तुतिस्तव,

**मंडळी:** आम्ही ह्या इमारतीचे आनंदाने, उपकारस्तुतीने व नम्रतेने समर्पण करतो.

**पाळक:** या मंडळीची प्रीतीपूर्वक सेवा करणारे, आणि आम्ही उपभोगू शकणारा वारसा प्रस्थापित करणारे, आणि जे आता विजयी मंडळीचे भाग आहेत त्या सर्व लोकांची आम्ही या प्रसंगी आठवण करतो.

**मंडळी:** आम्ही कृतज्ञतापूर्वक ह्या इमारतीचे (मंदिर, शैक्षणिक इमारत, सहभागीतागृह) मंडप समर्पण करतो.

**पाळक:** प्रार्थना व गितांद्वारे आराधनेकरिता, देवाच्या वचनाचा उपदेश करण्याकरिता, पवित्र शास्त्रलेखांचे शिक्षण देण्याकरिता, आणि संतांच्या सहभागीतेकरिता,

**मंडळी:** आम्ही देवाच्या ह्या इमारतीचे गंभीरपणे समर्पण करतो.

**पाळक:** शोक करणाऱ्यांना सांत्वन प्राप्त व्हावे, दुबळ्यांना सामर्थ्य प्राप्त व्हावे, मोहात असलेल्यांना साहाय्य व्हावे, ह्या भिंतिंमध्ये येणाऱ्या सर्वांना आशा व धैर्य देण्याकरिता,

**मंडळी:** आम्ही ही प्रार्थनेची व सहभागीतेची इमारत समर्पण करतो.

**पाळक:** पापापासून तारण प्राप्तिची सुवार्ता सांगण्यासाठी, पवित्र शास्त्रोक्त पवित्रतेचा प्रसार करण्यासाठी, नीतिमत्वाचा बोध करण्यासाठी व आपल्या सहकाऱ्याच्या सेवेसाठी,

**मंडळी:** आम्ही ही इमारत सन्मानपूर्वक समर्पण करतो.

**सर्वांनी एकत्र म्हणावे:** देवासोबत श्रम करणारे या नात्याने आम्ही आता आमचे हात हातात मिळवून, अंत:करणे एकचित्त करून ज्या उच्च व पवित्र कारणांसाठी या मंदीराचे समर्पण केले आहे त्याकरिता स्वत:चे नव्याने समर्पण करतो. या इमारतीमध्ये आमचा प्रभू येशू ख्रिस्त याच्याद्वारे देवाच्या नावाचे गौरव होण्याकरिता, त्याच्या राज्याची वाढ होण्याकरिता आम्ही आमचे निष्ठायुक्त समर्पण, विश्वासू कारभारीपण व परिश्रमपूर्वक केलेली सेवा देवाला देण्याचे वचन देतो.

# भाग ९वा

# घोषणापत्र आणि सेवाकार्य योजना/ घटना/नियम

जागतिक नॅझरीन युवक संघ
जागतिक नॅझरीन ख्रिस्तवार्ता संघ
जागतिक रविवारची शास्त्रशिक्षण शाळा आणि शिष्यत्व सेवा
हा विभाग सध्या मराठी भाषेमध्ये उपलब्ध नाही. आपण हा विभाग इंग्रजीमध्ये *www.nazarene.org* इथे बघु शकता.

# भाग १०वा

# प्रपत्र

स्थानिक मंडळी

प्रांतिक परिषद

शुल्क आकारणीची बिले

## I. स्थानिक मंडळी

सूचना: स्थानिक चर्च आवश्यकतेनुसार खालील प्रपत्रे तयार करू आणि वापरु शकतात.

### ८१३. स्थानिक सेवकांची सनद

प्रमाणित करण्यात येते की................................................................ (सेवकाचे नाव)यांना चर्च ऑफ दी नॅझरीन मध्ये स्थानिक सेवक म्हणून पुढील एक वर्षा साठी सनद देण्यात येते आहे, कारण .............................. आत्मा व व्यवहार ख्रिस्ताच्या सुवार्तेशी सुसंगत आणि .............................. शिकवण ही मंडळीने स्वीकारून धारण केलेल्या पवित्र शास्त्रोक्त सिद्धांता नुसार आहेत.

चर्च ऑफ दी नॅझरीन -----------------------------पंच मंडळाच्या आदेशानुसार:

ठिकाण:

आज रोजी दिनांक:

अध्यक्ष:

चिटणीस:

## ८१४. प्रंतिक परिषदेला शिफारस

(हा अर्ज प्रांतिक सनदी सेवकांसाठी दरवर्षी भरायचा आहे)

(योग्य मंडळ निवडा)

☐ ---------------- (मंडळीचे नाव) चर्च ऑफ द नॅझरीनचे पंच मंडळ

☐ ---------------------------- (प्रांताचे नांव) चे प्रांतिक सल्लागार मंडळ (बंधारण पुस्तक २५५.१३)

(सेवेसाठी परवाना हवा असलेल्या सेवकाची नाव) -------------------------- यांची प्रांतिक सेवकीय परवाना मंडळास खालील अधिकार प्रमाणपत्र देण्यात यावे अशी शिफारस करते:

☐ **प्रांतिक सेवकीय सनद**

☐ **प्रांतिक सेवकीय सनदीचे नुतनीकरण**

☐ **डिकनच्या सनदीचे नुतनीकरण**

☐ **ख्रिस्ती शिक्षण संचालकाच्या सनदीचे नुतनीकरण**

**सेवकीय भुमिकेचे प्रमाणपत्र** (बंधारण पुस्तक ५०३-५२८)

☐ CED - **ख्रिस्ती शिक्षण सेवक** (स्थानिक मंडळीच्या शाळेद्वारे नोकरीस असलेले सेवक)

☐ EDU – **शिक्षण** (चर्च ऑफ दी नॅझरीनच्या संस्थेमध्ये शिक्षक किंवा व्यवस्थापकीय कर्मचारी म्हणून नोकरीस असलेले)

☐ EVR – **नोंदणीकृत सुवार्तिक** (सुवार्ताप्रसार हिच आपली प्राथमिक सेवा असे मान्य करून संजीवन व सुवार्तेला जगात पसरविण्यास प्रोत्साहन देणारा)

☐ GA – **प्रमुख कामगिरीवर असलेला मिशनरी** (प्रमुख मंडळातर्फे जागतिक सेवा समितीच्या माध्यमाने मंडळीची सेवा करण्यास नियुक्त केलेला)

 **GA – प्रमुख कामगिरीवर असलेला इतर** (प्रमुख मंडळीची सेवा करण्यास निवडलेला किंवा नोकरीवर असलेला)

 **PAS – पाळक**

 **PSV-FT – पूर्ण वेळ पाळकीय सेवा**

 **PSV-FT – अर्ध वेळ पाळकीय सेवा** (मंडळीशी जुळून योग्य नियामक, अनुज्ञापक आणि हमी देणाऱ्या संस्थेद्वारे मान्य केलेल्या विशेष सेवाक्षेत्रामध्ये पाळकीय सेवा करणारा, साहाय्यक पाळक)

 **SER – नोंदणीकृत संगित सेवक** (संगिताच्या द्वारे सुवार्तासेवेला आपली प्राथमिक सेवा समजून जीवनाचा बहुतांश वेळ वाहून दिलेला समर्पित सेवक)

 **SPC – आंतरसंस्थात्मक विशेष सेवा** (इतर कुठल्या पध्दतीने तरतूद केलेली नसतांना सल्लागार मंडळाने शिफारस करून प्रांतिक परिषदेने मान्य केलेली सक्रिय सेवेतील व्यक्ती. अशा नियुक्त व्यक्तीने चर्च ऑफ दी नॅझरीनशी संबंध जोपासून त्यांचे चर्च ऑफ दी नॅझरीनसोबत सुरू असणारे नातेसंबंधाचे स्वरूप दर वर्षी प्रांतिक सल्लागार मंडळाला लेखी सादर केले पाहिजे.)

 **STU - विद्यार्थी**

□ **U – अनियुक्त**

बंधारण पुस्तकाच्या परिच्छेद ५३३.३, ५३४.३ मध्ये नमूद केलेल्या दीक्षेसाठी किमान आवश्यकतेचे आणि पगारी किंवा बिनपगारी संबंधांना निश्चित स्वरूप देण्याच्या प्रक्रियेचे पुनरावलोकन करा. (१५९-१५९.३) हे उमेदवाराच्या सेवेचा इतिहास प्रस्थापित करण्यासाठी आणि त्याचा प्रतिपाळ करण्याकरिता महत्वाचे आहे.

जर येत्या वर्षाकरिता PSV-FT **पूर्ण वेळ पाळकीय सेवा** किंवा PSV-PT **अर्ध वेळ पाळकीय सेवेची** शिफारस केलेली असेल तर प्रांताध्यक्षाची लेखी मान्यता प्राप्त केलेली आहे का (१२९.२७; १५९-१५९.२)?

□ **होय** □ **नाही**

--------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------
-------------

जर वर नमुद STU – **विध्यार्थी** किंवा U – **अनियुक्त** या व्यतिरिक्त पद असेल तर उमेदवारासोबत अस्तित्वात असणारे औपचारीक संबंधाचे वर्णन, पंच मंडळ आणि प्रांताध्यक्ष यांनी मान्यता दिलेली आहे असे करा.

------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------
-----------

आम्ही असे प्रमाणित करतो की -------------------------------------------
---यांनी सदर विनंतीकरिता सर्व पात्रतांची पूर्ती केलेली आहे.

मंडळाच्या ---------------------- (तारीख) ह्या तारखेच्या मतदानाद्वारे, आणि प्रांताध्यक्षांच्या ------------------ (तारीख) ह्या तारखेच्या मंजूरी पत्राद्वारे.

अध्यक्ष --------------------------------

चिटणीस ------------------------------

**निर्देशित केले** ☐ **कळविले** ☐ **विन्यास** ------------------------------
-----------

टिप: कृपया व्यक्तीच्या सनदीकरिता शिफारस व सेवेच्या भुमिकेच्या प्रमाणपत्राची शिफारस दोन्ही चिन्हांकित करा.

## ८१५. निरवणी पत्र

हे पत्र असे प्रमाणित करते की ............................................... (सभासदाचे नाव) हे .................................................. (मंडळीचे नाव) चर्च ऑफ दी नॅझरीनचे सभासद असून ज्यांच्याकडे हे पत्र सादर केले जाईल त्यांच्या ख्रिस्ती विश्वासावर त्यांना सोपवून देण्यात येत आहे.

**पाळक:** --------------------------------

**तारीख:** --------------------------------

टिप: जेव्हां एखाद्याला निरवणी पत्र दिल्या जाते तेव्हां ते प्रमाणपत्र देणाऱ्या मंडळीतून त्यांचे सभासदत्व त्वरीत रद्द होते. (१११.१)

## ८१६. मुक्तता पत्र

हे पत्र असे प्रमाणित करते की ..............................................................(सदस्याचे नाव) आजपर्यंत ...............................(मंडळीचे नाव) चर्च ऑफ दी नॅझरीन येथील सभासद होते आणि त्यांच्या विनंतीनुसार त्यांना हे सभासद मुक्तता पत्र देण्यात आलेले आहे.

पाळक: -------------------------

तारीख: ------------------------

सुचना: - सभासद मुक्तता पत्र दिल्याबरोबर सभासदत्व तात्काळ संपुष्टात येते. (११२.२)

## ८१७. सभासदांचे बदलीपत्र

हे पत्र असे प्रमाणित करते की ........................................... (सदस्याचे नाव) हे ................................................ (मंडळीचे नाव) चर्च ऑफ दी नॅझरीन येथील सभासद आहेत.

त्यांच्या विनंतीनुसार त्यांची बदली .......................................................(मंडळी चे नांव) .......................................................(प्रांताचे नांव) प्रांतात करण्यात येत आहे.

स्वीकार करणाऱ्या स्थानिक मंडळीकडून या बदलीपत्राची पोचपावती मिळाल्यावर त्यांचे या स्थानिक मंडळीमधील सभासदत्व संपुष्टात येईल.

पाळक: --------------------------------------------

पत्ता: ----------------------------------------------

तारीख: --------------------------------------------

टिप: बदलीपत्र केवळ तीन महिने वैध राहील. (१११)

## ८१८. बदलीपत्राची पोचपावती

हे पत्र असे प्रमाणित करते की ................................................
(सभासदाचे नाव) यांचा
.........................................................................
(मंडळीचे नाव) या मंडळीने दिनांक..........................................या दिवशी मंडळीच्या सभासदवर्गामध्ये स्वीकार केलेला आहे.

पाळक: ----------------------------------------

पत्ता: -------------------------------------------

तारीख: ----------------------------------------

## II. प्रांतिक परिषद

**८१९.** प्रांताचे अधिकृत प्रपत्र प्रमुख चिटणीसाकडून मिळू शकतात. १७००१, प्रायरी स्टार पार्कवे, लेनेक्सा, के एस ६६२२०, यू एस ए

(17001 Prairie Star Parkway, Lenexa, KS 66220, USA)

## III. आकारणीची बिले

## विभाग १. मंडळीच्या सभासदाची चौकशी

## विभाग २. दीक्षित सेवाकाची चौकशी

## विभाग ३. सनदी सेवकाची चौकशी

**८२०.** आकारणीची बिले प्रमुख चिटणीसाकडून मिळू शकतात. १७००१, प्रायरी स्टार पार्कवे, लेनेक्सा, के एस ६६२२०, यू एस ए

(17001 Prairie Star Parkway, Lenexa, KS 66220, USA)

# भाग ११वा

# परिशिष्ट

**प्रमुख अधिकारी**
**प्रशासकिय मंडळे, समित्या आणि शैक्षणिक संस्था**
**प्रशासकिय धोरणे**
**वर्तमान नैतिक आणि सामाजिक समस्या**

## I. प्रमुख अधिकारी

### ९००. प्रमुखाध्यक्ष

युजिनिओ आर. डुआर्ते
डेव्हिड डब्ल्यू. ग्रेव्ह्स
डेव्हिड ए. ब्यूझिक
गुस्तावो ए. क्रॉकर
फिलिमाओ एम. चँबो
कार्ला डी. सनबर्ग

### ९००.१. प्रमुखाध्यक्ष, इमेरिती आणि सेवानिवृत्त

यूजीन एल. स्टोवे, इमेरिती
जेराल्ड डी. जॉन्सन, इमेरिती
डोनाल्ड डी. ओवेन्स, इमेरिती

जिम एल. बाँड, इमेरिती

डब्ल्यू. टालमेज जॉनसन, इमेरिती

जेम्स एच. डील, इमेरिती

पॉल जी. कनिंगहॅम, इमेरिती

नीना जी. गुंटर, इमेरिती

जेसी सी. मिडिंडॉर्फ, इमेरिती

जेरी डी. पोर्टर, इमेरिती

जे. के. वारिक, इमेरिती

## ९००.२. सरचिटणीस

डेव्हिड पी. विल्सन

## ९००.३. प्रमुख कोषाध्यक्ष

कीथ बी. कॉक्स

## चर्च ऑफ द नॅझरीन

जागतिक सेवा केंद्र
१७००१. प्रेयरी स्टार पार्कवे
लेनेक्सा, के एस ६६२२० यु एस ए.

## II. प्रशासकीय मंडळ, समित्या, शैक्षणिक संस्था

## ९०१. प्रमुख मंडळ

## मंडळीच्या विभागानुसार सभासद

| **सेवक** | **ले सभासद** |
|---|---|
| **आफ्रिका विभाग** | |
| आर्सेनिओ जेरेमियास मांजाते | सिबोंगीले गुमेडझे |
| सोलोमन एनडलोव्हू | बेंजामिन लांगा |

स्टॅनले उशे — अँजेला एम. परेरा बी.डी.व्ही. मोरेनो

**आशिया-पॅसिफिक विभाग**

काफोआ म्युरोर — लिओनिला डोमेने

मीन-ग्यू शिन — जोंग वोन ली

**कॅनडा विभाग**

डी. इयान फिट्झपॅट्रिक — डेव्हिड डब्ल्यू. फाल्क

**मध्य यूएसए विभाग**

रॉन ब्लेक — जुडी एच. ओव्हन्स

**पूर्व मध्य यूएसए विभाग**

डी. जेफ्री कुन्सेलमन — कार्सन कॅसलमॅन

**पूर्व यूएसए विभाग**

सॅम्युअल वासेल — लॅरी बोलिंगर

**युरेशिया विभाग**

संजय गवळी — डेव्हिड डे.

डेव्हिड मॉन्टगोमेरी — विनय गवळी

मेरी स्कार — क्रिस्टॉफ निक

**मेसोअमेरिका विभाग**

इलियास बेतानझोस — कारमेन एल. चेको डे अकोस्टा

वॉलिएर पियरे — अब्राहम फर्नांडिज गेमेझ

अँटनी सेंट लुईस — प्लिनियो ई. उरीझार गार्सिया

**उत्तर मध्य यूएसए विभाग**

जिम बाँड — लॅरी मॅकइन्टर

**उत्तर पश्चिम यूएसए विभाग**

रँडल जे. क्रॅकर — जोएल के. पीअर्सल

**दक्षिण अमेरिका विभाग**

एडल्बर्टो हॅरेरा कुएलो

फर्नांडो ऑलिव्हिरा

अमादेऊ टेईक्झेईरा

टेरी सी. रोलँड

लॅरी डी. डेनिस

ड्वाइट एम. गुंटर दुसरा

रॉन बेनिफील

जॉन बोलिंग

**नॅझरीन मिशन इंटरनॅशनल (NMI)**

फिलिप वेदरिल

**नॅझरेन युथ इंटरनॅशनल (NYI)**

अडिएल टेईक्झेईरा

**संडेस्कूल अँड डिसायपलशीप मिनिस्ट्रिज इंटरनॅशनल (एस डी एम आय)**

मिलॉन पटवारी

गॅल्डीना एरेइस

जेकब रिवेरा मदिना

इमर्सन नताल

**दक्षिण मध्य यूएसए विभाग**

शेरिल क्रॉऊच

**दक्षिणपूर्व यूएसए विभाग**

मायकेल टी. जॉन्सन

डेनिस मूर

**दक्षिण पश्चिम यूएसए विभाग**

डॅनियल स्पाईट

**शिक्षण**

बॉब ब्रॉवर

## ९०२. प्रमुख न्याय मंडळ

हंस-गुन्टर मोहन, अध्यक्ष

जेनिन मेटकॅल्फ, सचिव

डी. इयान फिट्झपॅट्रिक

डोना विल्सन

ब्रायन पॉवेल

## ९०३. ग्लोबल कौन्सिल ऑफ नॅझरीन युथ इंटरनॅशनल

गॅरी हार्टके, नॅझरीन युथ इंटरनॅशनल, संचालक

डिएल टेईक्झेईरा, समिती अध्यक्ष

रोनाल्ड मिलर, आफ्रिका

जेनरी सुयात डी गोडॉय, आशिया-पॅसिफिक

डिएगो लोपेझ, यूरेशिया

मिल्टन गे, मेसोअमेरिका

ख्रिस्टियानो माल्टा, दक्षिण अमेरिका

जस्टीन पिकार्ड, यूएसए / कॅनडा

## १०४. ग्लोबल कौन्सिल ऑफ नॅझरीन मिशन इंटरनॅशनल

लोला ब्रिकी, ग्लोबल डायरेक्टर

फिलिप वेदरिल, अध्यक्ष

डेव्हिड डे कोकर, आफ्रिका विभाग

पॉलिन शेपार्ड, आशिया-पॅसिफिक विभाग

पेनी उरे, कॅनडा विभाग

कार्ला लोव्हेट, मध्य यूएसए विभाग

कॅथी पेले, पूर्व मध्य यूएसए विभाग

शेरॉन केसलर, पूर्व यूएसए प्रांत

कॅथी टेरंट, यूरेशिया विभाग

ब्लान्का कॅम्पोस, मेसोआमेरिका विभाग

रोंडा सोड्स, उत्तर मध्य यूएसए विभाग

डेब्रा व्होलकर, वायव्य यूएसए विभाग

अँटोनियो कार्लोस, दक्षिण अमेरिका विभाग

मेरी रूनियन, दक्षिण मध्य यूएसए विभाग

टेरेसा हॉज, दक्षिणपूर्व यूएसए विभाग

मार्था लंडक्विस्ट, नैऋत्य यूएसए विभाग

व्हर्न वॉर्ड, ग्लोबल मिशन संचालक

अख्त्यारी प्रमुखाध्यक्ष (सल्लागार)

## १०५. नॅझरीन उच्च शिक्षण संस्था

## जागतिक नॅझरीन शिक्षण संघ

### *आफ्रिका विभाग*

आफ्रिका नॅझरीन विद्यापीठ
    नैरोबी, केनिया - पूर्व आफ्रिकेमध्ये सेवा
नॅझरीन बायबल कॉलेज ऑफ ईस्ट आफ्रिका
    नैरोबी, केनिया - पूर्व क्षेत्रामध्ये सेवा
नॅझरीन थियॉलॉजिकल कॉलेज
    हनीड्यू, दक्षिण आफ्रिका - दक्षिण क्षेत्रामध्ये सेवा
नॅझरीन थिओलॉजिकल कॉलेज ऑफ सेंट्रल आफ्रिका
    मलावी, मध्य आफ्रिका - दक्षिण पूर्व क्षेत्रामध्ये सेवा
नॅझरीन थियॉलॉजिकल इन्स्टिट्युट
    मध्य आणि पश्चिम क्षेत्रामध्ये सेवा
सेमिनरीओ नॅझरेनो डी कॅबो वर्डे
    सॅन्टियागो, केप वर्डे
सेमिनरीओ नॅझरेनो एम् मोझॅम्बिक
    मापुटो, मोझांबिक - लुसोफोन क्षेत्रामध्ये सेवा
साऊथ आफ्रिका नॅझरीन युनिव्हर्सिटी
    मंझिनी, स्वाझिलँड - दक्षिण आफ्रिकेमध्ये सेवाकार्य

### *आशिया-पॅसिफिक विभाग*

आशिया-पॅसिफिक नॅझरीन थियॉलॉजिकल सेमिनरी
    रिझाल, फिलीपिन्स
इंडोनेशिया नॅझरीन थियॉलॉजिकल कॉलेज
    योग्यकार्ता, इंडोनेशिया
जपान नॅझरीन थियॉलॉजिकल सेमिनरी

टोकियो, जपान
कोरिया नॅझरीन युनिव्हर्सिटी
चूंग नाम, कोरिया
मेलानेशिया नॅझरीन बायबल कॉलेज
माउंट हेगेन, पापुआ न्यू गिनी
मेलेनेशिया नॅझरीन टिचर्स कॉलेज
माउंट हेगेन, पापुआ न्यू गिनी
नॅझरीन कॉलेज ऑफ नर्सिंग
माउंट हेगेन, पापुआ न्यू गिनी
नॅझरीन थियॉलॉजिकल कॉलेज
थॉर्नलँड्स, क्विन्सलँड, ऑस्ट्रेलिया
फिलिपिन नॅझरीन बायबल कॉलेज
बागुओ सिटी, फिलीपिन्स
साऊथ पॅसिफिक नॅझरीन थियॉलॉजिकल कॉलेज
सुवा, फिजी
साऊथ इस्ट एशिया नॅझरीन बायबल कॉलेज
बँकॉक, थायलंड
तैवान नॅझरीन थियॉलॉजिकल कॉलेज
पिटोऊ, तैवान
विसायन नॅझरीन बायबल कॉलेज
सिबू सिटी, फिलिपिन्स

## *युरेशिया विभाग*

इस्टर्न मेडिटेरिनियन नॅझरीन बायबल कॉलेज
कारक, जॉर्डन - पूर्व भूमध्य क्षेत्रामध्ये सेवा
युरोपियन नॅझरीन कॉलेज
युरोप आणि युरेशिया क्षेत्रामध्ये सेवाकार्य
नॅझरीन नर्सेस ट्रेनिंग कॉलेज
वाशिम, महाराष्ट्र, भारत
नॅझरीन थिओलॉजिकल कॉलेज - मँचेस्टर

मँचेस्टर, इंग्लंड
साऊथ एशिया नॅझरीन बायबल कॉलेज
बंगलोर, भारत - भारत आणि दक्षिण आशिया मध्ये सेवाकार्य

## *मेसोअमेरिका विभाग*

कॅरिबियन नॅझरीन कॉलेज
सांताक्रूझ, त्रिनिदाद इंग्रजी - डच आणि फ्रेंच अँटिल्स मध्ये सेवाकार्य
इन्स्टिट्युटो बिब्लिको नाझारिनो
कोबान, अल्ता वेरापाझ, ग्वाटेमाला - उत्तर ग्वाटेमाला मध्ये सेवाकार्य
सेमिनॅर थिओलॉजिक नाझरीन डी हैती
पेशन-विले, हैटी - हैटी देशामध्ये सेवाकार्य
सेमिनारियो नाझारिनो डे लास अमेरिकस
सॅन होसे, कोस्टा रिका - लॅटिन अमेरिका आणि सेंट्रल क्षेत्रामध्ये सेवाकार्य
सेमिनारियो नाझारिनो डोमिनिकानो
सँटो डोमिंगो, डोमिनिकन रिपब्लिक - डोमिनिकन रिपब्लिक देशामध्ये सेवाकार्य
सेमिनारियो नाझारिनो मेक्सिकानो
मेक्सिको सिटी डी.एफ., मेक्सिको उत्तर व दक्षिण क्षेत्रामध्ये सेवाकार्य
सेमिनारिओ टेओलॉजिको नाझारिनो
ग्वाटेमाला सिटी, ग्वाटेमाला मध्य अमेरिका क्षेत्रामध्ये सेवाकार्य
सेमिनारिओ टेओलॉजिको नाझारिनो क्यूबानो
ला लिसा, ला हबाना, क्युबा - क्युबा देशामध्ये सेवाकार्य

## *दक्षिण अमेरिका विभाग*

फसुलदादे नाझारिना डो ब्राझील
साओ पाउलो, ब्राझील - ब्राझील देशामध्ये सेवाकार्य
सेमिनारियो बिब्लिको नाझारिनो चिली
सॅन्टियागो, चिली – चिली देशामध्ये सेवाकार्य
सेमिनारियो नाझारिनो बोलिव्हियानो
ला पाझ, बोलिव्हिया - बोलिव्हिया देशामध्ये सेवाकार्य
सेमिनारिओ टेओलॉजिको नाझारिनो डेल कोनो सूर
बुएनोस ऐरेस, अर्जेटिना - अर्जेटिना दक्षिण कोन क्षेत्रामध्ये सेवाकार्य

सेमिनारिओ टेओलॉजिको नाझारिनो डेल पेरी
चिकलायो, पेरू – पेरू देशामध्ये सेवाकार्य
सेमिनरीओ टेओलॉजिको नाझारिनो डो ब्राझील
साओ पाउलो, ब्राझील - ब्राझील देशामध्ये सेवाकार्य
सेमिनारियो टेओलॉजिको नाझारिनो सुदामेरिकानो
क्विटो, इक्काडोर - उत्तर अन्डेयन क्षेत्रामध्ये सेवाकार्य

## *यूएसए / कॅनडा विभाग*

अम्ब्रोज युनिव्हर्सिटी कॉलेज
कॅलगरी, अल्बर्टा, कॅनडा
ईस्टर्न नॅझरीन कॉलेज
क्विन्सी, मॅसेच्युसेट्स, यूएसए
मिड अमेरीका नॅझरीन युनिव्हर्सिटी
ओलाथे, कॅन्सस, यूएसए
माउंट व्हर्नन नॅझरीन युनिव्हर्सिटी
माउंट व्हर्नन, ओहायो, यूएसए
नॅझरीन बायबल कॉलेज
लेनेक्सा, कॅन्सस, यूएसए
नॅझरीन थियॉलॉजिकल सेमिनरी
कॅन्सस सिटी, मिसुरी, यूएसए
नॉर्थवेस्ट नॅझरीन युनिव्हर्सिटी
नांपा, आयडाहो, यूएसए
ऑलिव्हेट नॅझरीन युनिव्हर्सिटी
बॉरबॉन्नेइस, इलिनॉय, यूएसए
पॉइंट लोमा नॅझरीन युनिव्हर्सिटी
सॅन डिएगो, कॅलिफोर्निया, यूएसए
सदर्न नॅझरीन युनिव्हर्सिटी
बेथानी, ओक्लाहोमा, यूएसए
ट्रेवेका नॅझरीन युनिव्हर्सिटी
नॅशविल, टेनेसी, यूएसए

## III. व्यवस्थापन विषयक धोरणे

**९०६. वर्षासने:** वर्षासन देणगीदाराच्या देणग्या, देणाऱ्या मृत्युमुळे रीतसर कायद्याने प्रमुख मंडळ व संस्थेच्या मालकीच्या होईपर्यंत त्यांचा उपयोग करण्यास त्यांना प्रतिबंध करण्यात आला आहे. असे निधी देशाचे कायदे व न्याय मंडळ साधारणत: विश्वस्त निधी म्हणून मान्य करतात, अशा निधिंमध्ये सदर देणग्यांचे पैसे विचारपूर्वकरित्या गुंतवावेत. (२०१७)

**९०७. कर्ज.** कोणतिही संस्था धर्मदाय प्रतिज्ञापत्रांना कर्ज हमी म्हणून तारण ठेऊ शकणार नाही. (२०१७)

## ९०८. बायबल सोसायट्या.

**१. मान्य केलेल्या बायबल सोसायट्या:** पवित्र शास्त्र हे देवाचे लिखित प्रगटीकरण आहे ह्यावर चर्च ऑफ दी नॅझरीन विशेष जोर देते, आणि येशू ख्रिस्तासाठी नवे अनुयायी मिळविण्याचे ते प्राथमिक साधन आहे असा विश्वास बाळगते. तसेच पवित्र शास्त्राच्या अधिक प्रती उपलब्ध होण्याची वाढती गरज असल्यामुळे असे ठरविण्यात येते की:

प्रथम, जगभरातील युनायटेड बायबल सोसायट्यांचे जे काम सुरू आहे आहे त्याबद्दल प्रमुख परिषदेने मनःपूर्वक मान्यता व सहानुभूती व्यक्त करावी.

दुसरे, जागतिक पवित्र शास्त्र रविवार पाळण्यात यावा अशी मान्यता देतो. पवित्र शास्त्र रविवारी, ख्रिस्ती लोकांनी स्वत:च्या जीवनामध्ये पवित्र शास्त्राला अत्यावश्यक स्थान द्यावे ह्याकडे त्यांचे लक्ष वेधले जावे.

**२. बायबल सोसायट्यांकरिता विशेष दान:** असे ठरविण्यात येते की, चर्च ऑफ दी नॅझरीनने प्रतिवर्षी डिसेंबर महिन्यातील दुसरा रविवार पवित्र शास्त्र रविवार म्हणून नेमून द्यावा, आणि त्या दिवशी या महत्वाच्या विषयावर सादरीकरण करून आपल्या देशातील बायबल सोसायटीकरिता दान जमा करावे. निवडलेली बायबल सोसायटी ही जागतिक युनायटेड बायबल सोसायट्यांच्या सहभागीतेची (सलग्न किंवा पूर्ण) सदस्य असावी, तसे नसेल तर प्रांताने ठरविल्यानुसार बायबल सोसायटी असावी. हे दान जमविण्यासाठी आमच्या सर्व मंडळांनी सक्रिय सहभाग घ्यावा यासाठी विशेष प्रयत्न करावेत. आपल्या देशातील बायबल सोसायटीला दान कसे पाठवावे याबाबत सर्व मंडळ्यांनी प्रांतिक कार्यालयाशी संपर्क साधून मार्गदर्शन प्राप्त करावे. (२०१७)

**९०९. बंधारण पुस्तकाचे संपादन करणे.** असे ठरविण्यात येते की, प्रमुखाध्यक्ष मंडळाने बंधारण पुस्तक संपादन समितीची नेमणूक करून, बंधारण पुस्तकामध्ये बदल करण्याच्या संदर्भात एकोणतिसाव्या प्रमुखपरिषदेच्या कार्यवाहीच्या नोंदिंमध्ये परस्पर विरोधी विधाने दिसून आल्यास, त्यांना सुसंगत करण्याचा अधिकार द्यावा; त्याचप्रमाणे ह्या समितीला वर्तमान बंधारण पुस्तकाच्या लेखांमध्ये संपादकीय फेरबदल करून अर्थ न बदलता भाषेमध्ये दुरूस्ती करण्याचा अधिकार द्यावा; तसेच नव्याने स्वीकृत केलेल्या मजकुरातही अर्थ न बदलता संपादकीय बदल करण्याचा अधिकार द्यावा.

बंधारण पुस्तक संपादक समितीला आणखी असा अधिकार देण्यात येतो की तिने संभ्रामक शब्द किंवा अभिव्यक्तींऐवजी समजणारे शब्द किंवा अभिव्यक्ती निवडावेत. तसेच एकोणतिसाव्या प्रमुख परिषदेने केलेल्या ठरावांशी सुसंगत होतील असे फेरबदल बंधारण पुस्तकातील परिच्छेद, भाग किंवा इतर विभाग यांचे क्रमांकाच्या बाबतीत करावेत, तसेच एकोणतिसाव्या प्रमुख परिषदेने केलेल्या ठरावांशी सुसंगत बंधारण पुस्तकाची सूची तयार करावी.

असेही ठरविण्यात येते की या बंधारण पुस्तकाच्या सर्व भाषांतर कार्यावर या समितीने देखरेख करावी. (२०१७)

**९१०. बंधारण पुस्तक परिशिष्ट आढावा.** परिशिष्टाच्या भाग III व IV मध्ये (कलम ९०६-९३३) कोणतीही बाब तीन चतुर्वर्ष (१२ वर्षे) इतका काळ पुनर्विचार न करता तशीच राहिली तर ती बाब संदर्भ समितीने प्रमुख परिषदेच्या योग्य समितीकडे निर्देशित करून प्रमुख परिषदेपुढे प्रस्ताव म्हणून विचारार्थ सादर करावी. (२०१३)

**९११. समित्यांचा कार्यकाळ.** कोणत्याही कारणासाठी निर्माण केलेली विशेष समिती, काही वेगळी तरतूद केली नसेल, तर पुढील प्रमुख परिषदेच्या वेळी बरखास्त होईल. (२०१७)

## ९१२. प्रमुख परिषदेचे कामकाज.

(२०१७ प्रमुख परिषदेच्या कामकाजाचे नियम)

## ठराव आणि अर्ज

**नियम १४. प्रमुख परिषदेला ठराव सादर करणे.** प्रांतिक परिषदा, प्रांतिक परिषदेद्वारे अधिकारयुक्त समिती, विभागिय समित्या, प्रमुख मंडळ किंवा त्यांचा कुठलाही

मान्यताप्राप्त विभाग, प्रमुख मंडळीचे अधिकृत मंडळे किंवा आयोग, जागतिक नॅझरीन मिशन इंटरनॅशनलचे अधिवेशन, किंवा प्रमुख परिषदेच्या पाच किंवा अधिक सभासद, हे खालील नियमांशी सुसंगत ठराव किंवा अर्ज प्रमुख परिषदेला विचार करण्याकरिता सादर करू शकतात:

1. प्रमुख चिटणिसाने प्रदान केलेल्या अधिकृत प्रपत्रावरच ठराव किंवा अर्ज छापिल किंवा टंकलिखित स्वरूपात असावा.
2. सादर केलेल्या प्रत्येक ठराव किंवा अर्जामध्ये विषय आणि सादर करणाऱ्या व्यक्तींची किंवा गटाचे नाव समाविष्ट असावे.
3. ज्या प्रत्येक ठरावावर कृती करण्याकरिता खर्च अपेक्षित आहे त्या ठरावामध्ये कृती पूर्ण करण्याकरिता अंदाजे खर्ज समाविष्ट असावा.
4. बंधारण पुस्तकामध्ये बदल करण्याबाबतचा प्रस्ताव लिखित असावा आणि त्यामध्ये बंधारण पुस्तकाचा जो परिच्छेद व भाग प्रभावित होणार आहे तो, आणि प्रस्ताव मान्य झाल्यास बदलाचा मजकूर समाविष्ट असावा.
5. ते सर्व प्रमुख चिटणीसाकडे परिषद सुरू होण्याआधी येणाऱ्या डिसेंबर महिण्याच्या ०१ तारखेच्या आत सादर केले जावे, जेणे करून नियम २४ आणि परिच्छेद ३०५.१ नुसार त्याला योग्य क्रमांक देऊन संदर्भ समितीकडे विचारार्थ सादर करता येईल.
6. बंधारणपुस्तकाव्यतिरिक्त ठराव असल्यास त्यामध्ये कायदा अधिनियमीत करण्याची जबाबदारी कुठल्या संस्थेकडे आहे हे नमुद केलेले असावे.

**नियम १५. विलंबित संदर्भाकरिता ठराव आणि अर्ज.** ठराव, अर्ज, आणि इतर बाबी ह्या कायदा समितीकडे सादर करण्याकरिता प्रमुख चिटणिसाकडे जुन ०१ तारखेच्या आत सादर केल्या जाऊ शकतात. प्रमुख परिषदेआधी होऊ घातलेल्या जागतिक अधिवेशनांद्वारे सादर केलेल्या ठरावांवर विचारात घेण्याकरिता प्रक्रिया केली जाईल.

**नियम १६. बंधारण पुस्तकातील बदल.** प्रमुख परिषदेने स्वीकारलेले ठराव हे बंधारण पुस्तकाच्या इतर तरतुदिंशी सुसंगत करण्याकरिता बंधारण पुस्तक संपादन समितीकडे सादर करण्यात येतील.

**९१३. ऐतिहासिक स्थळे व सिमाचिन्हे.** प्रांतिक व विभागिय परिषदा त्यांच्या सिमांमध्ये ऐतिहासिक महत्व असणाऱ्या स्थळांना ऐतिहासीक स्थळे म्हणून निर्देशित करू शकतात. एखाद्या स्थळाला ऐतिहासिक स्थळ म्हणून निर्देशित करण्याकरिता ऐतिहासिकरित्या

महत्वपूर्णता प्राप्त होण्यासाठी ५० वर्षांचा काळ लोटलेला असावा. ऐतिहासिक स्थळ म्हणून निर्देशित करण्याकरिता मुळ इमारती किंवा बांधकामे अस्तित्वात असणे आवश्यक नाही. नवीन ऐतिहासिक स्थळ म्हणून निर्देशित झालेल्या स्थळाचे ऐतिहासिक महत्व, स्थळाची माहिती आणि स्वीकारलेली कृती ह्यांचा अहवाल प्रांतिक चिटणीस हे प्रमुख चिटणिसाकडे सादर करतील.

प्रांतिक आणि विभागिय परिषदा प्रमुख परिषदेला संपूर्ण चर्च ऑफ दी नॅझरीनकरिता महत्वपूर्ण म्हणून ऐतिहासिक स्थळांना निर्देशित करण्याकरिता विनंती करू शकतात. नामांकनांना प्रमुख परिषदेची मान्यता मिळण्याआधी प्रमुखाध्यक्ष मंडळ किंवा नामांकनाच्या परिक्षणार्थ नियुक्त समिती ही नामांकनांशी सहमत होणे आवश्यक आहे.

प्रमुख चिटणिसाने ऐतिहासिक स्थळे व सिमाचिन्हांचे पुस्तक जतन करावे आणि योग्यरित्या त्याचे प्रकाशन करावे (परिच्छेद ३२७.२). (२००९)

## IV. वर्तमान नैतिक आणि सामाजिक समस्या

**९१४. अवयवदान.** चर्च ऑफ दी नॅझरीन वैयक्तिकरित्या आक्षेप नसलेल्या आपल्या सभासदांना, वैद्यकिय इच्छापत्र व विश्वस्त व्यवस्थे द्वारे देणगीदार/प्राप्तकर्त्यांना शारीरिक अवयवदानास साहाय्य करण्यास प्रोत्साहित करते.

पुढे, आम्ही अवयव प्राप्त करण्यास पात्र व्यक्तींना नैतिक आणि निष्पक्षरित्या वितरणाचे आवाहन करतो. (२०१३)

**९१५. भेदभाव.** चर्च ऑफ दी नॅझरीन सर्व वंशातील लोकांकरिता ख्रिस्ती करूणा ऐतिहासिक भुमिकेचा पुनरुच्चार करते. आमचा असा विश्वास आहे की देव सर्व लोकांचा निर्माणकर्ता आहे आणि एकाच रक्ताचे सर्व लोक निर्मिलेले आहेत.

आमचा असा विश्वास आहे की व्यक्तीच्या वंश, रंग, लिंग किंवा पंथाव्यतिरक्त त्याला कायद्यासमोर मतदानाच्या हक्कासहित समानता असावी, शैक्षणिक संधींमध्ये आणि सार्वजनिक सुविधांमध्ये समान प्रवेश, प्रत्येकाच्या क्षमतांनुसार समान संधी, आणि कोणत्याही नोकरी किंवा आर्थिक भेदभावापासून मुक्त अशी उत्पन्न कमावण्याची समान संधी मिळाली पाहिजे.

वांशिक समज आणि सुसंवाद वाढविण्यासाठी शिक्षणाचे कार्यक्रम सर्वत्र सुरू ठेवण्यासाठी आणि बळकट करण्यासाठी आम्ही आमच्या मंडळ्यांना प्रेरणा देतो.

आम्हाला असेही वाटते की इब्री १२:१-१४ च्या पवित्र शास्त्रोक्त बोधाने आमच्या लोकांच्या कृतींचे मार्गदर्शन करावे. आम्ही असे आर्जवितो की मंडळी व संपूर्ण समाजाच्या जीवनामध्ये सर्वांचा सहभाग असावा हे ख्रिस्ती उद्दिष्ट गाठण्याची पहिली पायरी म्हणून, चर्च ऑफ दी नॅझरीनच्या प्रत्येक सभासदाने त्याच्या इतरांप्रतिची वृत्ती व कृतींचे नम्रतेने परिक्षण करावे.

अंत:करण व जीवनाची पवित्रता हे योग्य जीवन जगण्याचा आधार आहे ह्या आमच्या विश्वासावर आम्ही पुन्हा जोर देतो. आमचा असा विश्वास आहे की, जेव्हा लोकांची अंत:करणे येशू ख्रिस्ताला संपूर्ण समर्पणाद्वारे बदलतील तेव्हां वांशिक व लैंगिक गटांमध्ये ख्रिस्ती औदार्य प्रस्थापित होईल, त्याचप्रमाणे ख्रिस्तित्वाचे खरे मर्म हे देवावर पूर्ण अंत:करणाने, पूर्ण जिवाने, पूर्ण मनाने व पूर्ण शक्तीने प्रीती करण्यामध्ये आणि आपल्या शेजाऱ्यावर स्वत:सारखी प्रीती करण्यामध्ये आहे.

कुठल्याही प्रकारचा जातिय किंवा मानववंशविषयक बेपर्वाई, अपवर्जन, दमन, जुलूम हे देवाविरूध्द व सह मानवप्राण्याविरूध्द पाप असल्यामुळे आम्ही त्याचा त्याग करतो. आम्ही जगभरातील प्रत्येक प्रकारच्या वंशविद्वेशाच्या वारशाबद्दल शोक व्यक्त करतो आणि आम्ही त्या वारशाला पश्चात्ताप, सलोखा आणि पवित्र शास्त्रोक्त न्याय ह्या द्वारे तोंड देण्याचा प्रयत्न करतो. भूतकाळ आणि वर्तमानकाळात वंशविद्वेशाच्या पापात उघडपणे किंवा छुप्यारीतीने सामील असलेल्या प्रत्येक वर्तनाबाबत पश्चात्ताप करण्याचा मार्ग शोधतो; आणि कबुलीमध्ये आणि शोकामध्ये आम्ही क्षमा आणि समेट शोधतो.

पुढे, आम्ही हे कबूल करतो की जातीय आणि वांशिक अपमान आणि दडपशाहीसाठी जबाबदार असलेल्या वैयक्तिक, संस्थात्मक आणि संरचनात्मक पूर्वग्रहांविरूध्द लढा देण्यासाठी उभे राहण्याकरिता मानवी संघर्षाशिवाय समेट नाही. आम्ही सर्वत्र असलेल्या नॅझरीनांना, पूर्वग्रहांची कृत्ये व संरचना ओळखून ती नष्ट करण्यासाठी, व क्षमा आणि समेटाच्या प्रसंगांना सुलभ करण्यासाठी, आणि उपेक्षितांच्या सबलीकरणासाठी कृती करण्यास आवाहन करतो. (२०१)

**९१६. अशक्त व्यक्तींचे शोषण.** चर्च ऑफ दी नॅझरीन कोणत्याही वयोगटाच्या किंवा लिंगाच्या व्यक्तीच्या शोषणाचा निषेध करते आणि आपल्या प्रकाशनांद्वारे आणि योग्य शैक्षणिक माहिती पुरविण्याद्वारे ह्याविषयी जनजागृती वाढवते.

चर्च ऑफ दी नॅझरीन आपल्या ऐतिहासिक धोरणाबाबत पुनर्पुष्टी करते की मंडळीमध्ये अधिकाराच्या स्थानी असणाऱ्या व्यक्ती कुठल्याही लैंगिक गैरवर्तन आणि

कुठल्याही स्वरूपातील अशक्त व्यक्तींच्या शोषणामध्ये सामिल होऊ शकत नाही. लोकांना अधिकाराच्या व भरवशाच्या पदांवर नियुक्त करतांना चर्च ऑफ दी नॅझरीन असे गृहित धरते की गतायुष्यातील वर्तणूक ही साधारणत: भविष्यातील वर्तणूकिबाबत विश्वासार्ह दर्शक आहे. जे लोक गतायुष्यामध्ये लैंगिक गैरवर्तणूक आणि अशक्तांच्या शोषणामध्ये सामिल होते अशांना भरवशाच्या व अधिकाराच्या पदी नेमण्यापासून रोखते. भविष्यात्मक गैरवर्तणूकीला रोखण्यासाठी आवश्यक पाऊले उचलली गेली असतील तर बेगळी बाब आहे. दोषी व्यक्तीद्वारे खेदाची अभिव्यक्ती ही भविष्यातील संभाव्य गैरवर्तणूकीवर मात करण्यास पुरेसे म्हणून तो पर्यंत ग्राह्य धरण्यात येणार नाही जो पर्यंत खेदाच्या अभिव्यक्तीला दृष्य वर्तणूकिच्या बदलाची पुरेश्या काळापर्यंत जोड लाभत नाही. गैरवर्तणूकिची पुनरावृत्ती होणार नाही ह्याच्या खात्रीचे ते दर्शक आहे. (२००९)

**९१७. गरीबांची जबाबदारी.** चर्च ऑफ दी नॅझरीनचा असा विश्वास आहे की येशूने आपल्या शिष्यांना या जगाच्या गरिबांशी खास नातेसंबंध जोडण्याची आज्ञा दिली; ख्रिस्ताच्या मंडळीने, प्रथम, स्वत:ला साधे ठेवावे आणि उधळपट्टीवर जोर देण्यापासून मुक्त ठेवावे; आणि दुसरे म्हणजे, मंडळीने स्वतःला गरिबांची काळजी, आहार, वस्त्र आणि निवारा पुरविण्यास वाहून घ्यावे. संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये आणि येशूच्या जीवन आणि उदाहरणामध्ये देव गरीब, शोषित आणि समाजातील जे स्वतःसाठी बोलू शकत नाहीत अशांशी जोडतो आणि त्यांना मदत करतो. तशाच प्रकारे, आम्हाला देखील, आमच्या सुविधांच्या स्थानातून धर्मदाय मदत करण्यासाठी नव्हे तर स्वत: गरीबांशी जोडण्याकरिता आणि त्यांच्याशी एकात्मतेसाठी पाचारण्यात आलेले आहे. आम्हाकडे गरिबांना अशी करूणामयी सेवा देण्याची जबाबदारी आहे की ज्यामध्ये धर्मदाय कृतींसह गरिबांना संधी, समानता आणि न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करणेसुध्दा समाविष्ट आहे. आमचा पुढे असा विश्वास आहे की प्रीतीद्वारे कार्य करणारा विश्वास जोपासणाऱ्या प्रत्येक विश्वासणाऱ्याच्या जीवनाचे अत्यावश्यक अंग म्हणजे गरिबांची ख्रिस्ती जबाबदारी वाहणे आहे.

शेवटी, आम्हाला समजते की ख्रिस्ती पवित्रता गरिबांची जबाबदारी वाहण्याच्या सेवेपासून अविभाज्य असून त्यामध्ये पवित्रता ख्रिस्ती व्यक्तीला स्वत:च्या वैयक्तिक परिपूर्णतेच्या पलीकडे जाऊन अधिक न्याय्य आणि उचित समाज आणि जग निर्माण करण्यास भाग पाडते. पवित्रता, आपल्या जगातील लोकांच्या आर्थिक गरजांपासून

विश्वासणाऱ्यांना दूर ठेवण्याऐवजी अशा प्रकारच्या गरजांची पूर्तता करण्याच्या सेवेत आपली साधने लावण्यासाठी आणि इतरांच्या गरजेनुसार आपल्या इच्छा समायोजित करण्यास प्रवृत्त करते. (२०१३)

(निर्गम २:११; अनुवाद १५:७; स्तोत्र ४१:१; ८२:३; नीतिसूत्रे १९:१७; २१:१३; २२:९; यिर्मया २२:१६; मत्तय १९:२१; लूक १२:३३; प्रेषितांची कृत्ये २०:३५; २ करिंथ ९:६; गलती २:१०)

**११८. लिंग समावेशक भाषा**. चर्च ऑफ दी नॅझरीन मंडळी व्यक्तींच्या संदर्भात लिंग समावेशी भाषेच्या वापराची पुष्टी करते आणि प्रोत्साहित करते. परिच्छेद ५०१ मध्ये व्यक्त केल्याप्रमाणे बंधारण पुस्तकासह प्रकाशने आणि सार्वजनिक भाषा ही लिंग समानतेप्रती कटिबध्दता परावर्तित करणारी असावी. भाषेतील बदल कोणत्याही पवित्र शास्त्र वचनांना किंवा देवाच्या संदर्भाला लागू होणार नाहीत. (२००९)

**११९. मंडळी आणि मानवी स्वातंत्र्य**. आमचा महान ख्रिस्ती वारसा समजून घेतला जावा त्याचे रक्षण व्हावे ह्या काळजीतून, आम्ही आमच्या लोकांना याची आठवण करून देतो की राजकीय आणि धार्मिक स्वातंत्र्य ह्या बाबी देवाची निर्मिती ह्या नात्याने मानवजातीचा सन्मान ही पवित्र शास्त्रोक्त संकल्पना आणि प्रत्येकाच्या वैयक्तिक सदसद्विवेकाची पवित्रता ह्यावर अवलंबून आहे. आम्ही आमच्या लोकांना या पवित्र शास्त्रोक्त संकल्पनांच्या समर्थनार्थ उचित अशा कृतींमध्ये सहभागी होण्यास आणि या मौल्यवान स्वातंत्र्यास असलेल्या धोक्यांविरूध्द नेहमी जागृक राहण्यास प्रोत्साहित करतो.

हे स्वातंत्र्य सतत धोक्यात येत असते, म्हणूनच आम्ही या तत्त्वांवर विश्वास ठेवणाऱ्या आणि आपली सार्वजनिक न्यासाची जबाबदारी पूर्ण करीत असतांना केवळ देवालाच आणि त्यांना निवडून देणाऱ्या जनतेला उत्तर देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तींनाच सार्वजनिक पदांवर निवडून द्यावे असे आवाहन करतो. याशिवाय, कुठल्याही धार्मिक पक्षांद्वारे विशेष मुभा मिळवून या तत्त्वांवर केल्या जाणाऱ्या कोणत्याही हल्ल्याचा आम्ही प्रतिकार करतो. आणि आम्ही राजकीय किंवा सामाजिक निर्बंधाद्वारे अशा स्वातंत्र्य नाकारल्या गेलेल्या आपल्या बंधू-भगिनींसोबत एक असे उभे ठाकतो.

आमचा असा विश्वास आहे की मंडळीची भूमिका भविष्यसंदेषात्मक असून लोकांना सतत ह्याचे स्मरण करून देण्याची आहे की, “धार्मिकता राष्ट्राला उन्नत करते” (नीतिसूत्रे १४:३४). (२०१७)

**१२०. मानवी स्वातंत्र्याची पुष्टी आणि घोषणा**. नॅझरीन मंडळी म्हणून, आम्ही पवित्रतेचे, संपूर्णतेचे आणि पुनर्वसनकारी जीवन जगण्याच्या दिव्य पाचारणाला ग्रहण करतो जेथे सर्व गोष्टी आणि सर्व लोक देवाशी समेट पावतात. प्रत्युत्तरादाखल, पवित्र आत्मा उपेक्षित, उत्पीडित, भग्न आणि दु:खात असणाऱ्यांना स्वातंत्र्य प्रदान करतो, अन्यायाच्या ठिकाणी न्याय आणतो, आणि पापामुळे निर्माण होणाऱ्या स्वार्थी प्रभावांना प्रतिबंधीत करतो. हे सर्व बाबी पवित्र आत्मा ह्या सर्व बाबींचे पुनर्वसन देवाच्या राज्यामध्ये होईपर्यंत करतो.

आमच्या वेस्लीय-पवित्रतेचा वारसा आणि चारित्र्यानुरूप, आम्ही आधुनिक गुलामगिरीचे अरिष्ट, बेकायदेशीर किंवा सक्तिचे श्रम, आणि मानव आणि मानवीय शरीरांच्या तस्करीचा विरोध करतो.

आणि या पुष्टीस अनुसरून, आम्ही असा ठराव करतो आंतरराष्ट्रीय नॅझरीन चर्चचे सभासद व मंडळ्या खालील बाबी करतील:

१. पवित्र लोक म्हणून, आमच्या न्यायाच्या मागे चालण्यामध्ये, आपल्या भूतकाळातील कोणत्याही अन्यायांबद्दल पश्चात्ताप करण्यास, आपल्या वर्तमानात सुधारणा करण्यास आणि न्याय्य भविष्य घडविण्यास आम्हाला पाचारण करण्यात आले आहे हे ओळखणे;

२. जे इतरांवर अत्याचार करतात त्यांना जबाबदार धरणे;

३. बेकायदेशीर किंवा सक्तिच्या श्रम, अवयव तस्करी आणि लैंगिक गुलामगिरीत अडकलेल्या (आणि ह्यासोबतच इतर कोणत्याही उदयोन्मुख परंतु आम्हास अद्यापी ज्ञात नसलेले अत्याचार) लोकांना करूणामयी काळजी पुरविण्यामध्ये सामावलेले असणे.

४. उत्पिडितांचे रडणे सक्रियतेने ऐकून ते इतरांना ऐकवणे;

५. अन्याय निषेध करून आणि अन्यायाच्या कारणांविरूध्द नम्रतेने कार्य करणे;

६. एकत्रितरित्या स्वातंत्र्याच्या दिशेने वाढण्याच्या आड येणाऱ्या बाबींविरूध्द आमच्या बंधू-भगिणींसोबत एकात्मतेने कार्य करणे; आणि

७. असुरक्षित लोकांसोबत मुक्ती, पुनर्वसन, उपचार आणि स्वातंत्र्य ह्या दैवी व्यवहारांद्वारे उभे ठाकणे. (१ योहान ३:८ ).

आमचा वेस्लीय-पवित्र ख्रिस्ती वारसा आणि पवित्रतेकरता पाचारण ह्यावर आधारीत, आम्ही पुढील बाबींची पुष्टी करतोः

१. न्याय, समेट आणि स्वातंत्र्याचा ध्यास धरणे हे देवाच्या पवित्रतेच्या केंद्रस्थानी आहे व ते लोकांमध्ये व्यक्त होते असा आमचा विश्वास आहे. आम्ही स्वत:ला व आमच्या मंडळीची साधनांना सर्व प्रकारची गुलामी, तस्करी आणि उत्पिडन ह्यांच्या निर्मूलनासाठी आणि हेतुपुरस्सर कार्यप्रणाली, संभाषणे आणि आशादायी पर्याय प्रदान करणाऱ्या क्रियांमध्ये भाग घेण्यास समर्पित आहोत.

२. आम्ही असे आवाहन करतो की आमच्या मंडळ्यांनी देवाच्या पवित्र प्रीतीच्या प्रेरणेला देवाचे राज्य अधिक दृष्य करण्याच्या कामाद्वारे विश्वासू प्रतिसाद द्यावा. आम्ही वाईट यंत्रणा आणि व्यक्तींच्या आर्थिक, राजकिय व स्वार्थी अत्याचारांद्वारे उत्पिडित, बंदीस्त, तस्करीत, आणि अत्याचारीत लोकांचे रडणे ऐकणाऱ्या पवित्र देवाला विचार, शब्द व कृतिंद्वारे विश्वासू साक्षी होण्यास पाचारलेले आहोत. देव आम्हाला नम्रतेने, करूणेने आणि न्यायाने प्रतिसाद देण्यास पाचारतो.

३. आम्ही कबूल करतो की न्यायाने वागण्यामध्ये आमच्या अवतिभोवती असणाऱ्यांना करूणामयी काळजी पुरविणे आणि अन्यायाला उघड करून ज्या शक्तींद्वारे ते घडते त्याचा निषेध करणे समाविष्ट आहे. न्यायाने वागणे आणि आवडीने दया करणे ह्यामुळे देवाच्या लोकांना अनेकदा राज्यकर्त्या शक्ति व सत्तांसोबत संघर्षात टाकलेले आहे. हा न्याय आम्हाला समान वागणूक, इतरांच्या वैविध्याला सहन करणे, आणि शोषित व शोषकाच्या केवळ भुमिकांना उलटवणे ह्या पलीकडे पाचारतो. येशूच्या उदाहरणानुसार, आम्ही न्यायासाठी पाचारलेले आहोत म्हणजे आम्ही इतरांकरिता स्वत:ला देऊन टाकण्यास तयार आहोत.

४. आम्ही ह्याची पुष्टी करतो की ख्रिस्ती न्याय वैयक्तिक व सार्वजनिक कबुली, पश्चाताप, आणि पापक्षमा ह्या आवश्यक पायऱ्यांप्रति गंभिर समर्पण अपेक्षिते.

५. आम्ही कबूल करतो की जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये न्याय्य व आशापूर्ण व्यवहारांची आम्ही वकिली करावी. ख्रिस्ताची करूणामयी आशा आणि सर्व लोकांप्रती प्रीती परावर्तित करतांना आम्ही अमानवीय परिस्थिती आणणाऱ्या परिस्थितिंशी स्वत:ला एक करतो. ज्यांचे ऐकल्या जात नाही अशांसाठी आम्ही बोलू आणि सुटका, पुनर्वसन, उपचार व स्वातंत्र्य प्रदान करणाऱ्या व्यवहारांना सादर करण्याद्वारे आम्ही असुरक्षितांसोबत उभे राहू.

६. आम्ही कबूल करतो की शोषण व अन्यायाला आशावादी पर्यायाचे प्रतिनिधित्व करण्यारे लोक बनण्यास आम्हाला पाचारण केलेले आहे. आम्हाला पवित्र देवाचे परावर्तन पवित्र जीवनाद्वारे करण्यास पाचारलेले असून त्यात आम्ही लोक, परिस्थिती, यंत्रणा आणि राष्ट्रांना हेतू व कृतितला न्याय प्रदान करतो. आम्ही कदाचीत सर्व दु:ख संपूष्टात आणू शकणार नाही परंतु ख्रिस्ताचे शरीर ह्या नात्याने आम्ही देवाचे पावित्र्य उपचारात्मक स्वरूपात सर्व गोष्टिंचे पुनर्वसन करणाऱ्या उध्दार योजनेकडे आणण्यास बांधलेले आहोत.

७. आम्ही असे कबुल करतो की, सलग्न प्रणाली म्हणून आम्ही सखोल विचार केला पाहिजे, सर्वांगिणरित्या कार्य केले पाहिजे, स्थानिक व जागतिकरित्या समाविष्ट असलो पाहिजे. जटिल प्रश्न आधुनिक गुलामगिरिला चालवितात; म्हणून एकापेक्षा जास्त उपाय स्वीकारले पाहिजे.

ख्रिस्ती समाजात आपण जे कोणी आहोत त्याच्या रचनेतून नैसर्गिकरित्या आपण जे करतो त्यातून हे निष्पन्न होईल.

म्हणून आम्ही प्रतिज्ञा करतोः

१. वैयक्तिक आणि एकत्रितरित्या, व्यक्ती व संस्था ह्या नात्याने, आमच्या वेस्लीय-पवित्रतेच्या ओळखीशी सुसंगत असे कार्य करून, करूणायुक्त सेवा करणे आणि शोषक यंत्रणांना भविष्यसंदेष्ट्यात्मक आवाहन करणे;

२. परिणामकारक, शहाण्या, आणि स्थिर कृतिंना सहाय्य करणे, प्रोत्साहन देणे, संसाधने पुरविणे, योजना करणे आणि त्यामध्ये समाविष्ट होणे;

३. ख्रिस्त ज्याच्या केंद्रस्थानी आहे, पवित्र आत्म्याचे सामर्थ्य ज्याच्या आशेची चळवळ आहे असा आराधक समाज म्हणून श्रम करणे.

४. सखोल विचार करून, अपेक्षेने प्रार्थना करणे आणि धैर्याने वागणे.

यासाठी देवाचे राज्य "जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही" येईपर्यंत आम्ही जगतो आणि परिश्रम करतो. (२०१७)

**९२१. लेकरं आणि तरुणांचे मूल्य.** पवित्र शास्त्र प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला आज्ञा देते की, "मुक्यांच्या वतीने, आसन्नमरण झालेल्यांच्या वतीने आपले तोंड उघड" (नीतिसूत्रे ३१:८). शेमा (अनुवाद ६:४-७; ११:१९) आपल्या लेकरांना देवाची कृपा कळविण्याचा सल्ला देते. स्तोत्र ७८:४ असे घोषित करते की, "त्या गोष्टी आम्ही त्यांच्या वंशजांपासून

गुप्त ठेवणार नाही; तर परमेश्वराची स्तुत्य कृत्ये, त्याचा पराक्रम आणि त्याने केलेली अद्भुत कृत्ये पुढच्या पिढीला सांगू." येशू, लूक १८:१६ मध्ये याची पुष्टी करतो, "बालकांना माझ्याजवळ येऊ द्या, त्यांना मनाई करू नका; कारण देवाचे राज्य त्यांच्यासारख्यांचेच आहे."

या पवित्र शास्त्रोक्त दृष्टीकोनाला प्रतिसाद म्हणून, चर्च ऑफ दी नॅझरीन हे मान्य करते की लेकरं देवासाठी महत्त्वाची आहेत आणि देवाच्या राज्यात त्यांना प्राधान्य आहे. आम्ही असा विश्वास ठेवतो की देवाने आम्हाला सर्व लेकरांकडे लक्ष देणे, त्यांना प्रेम देणे, त्यांचे पालनपोषण करणे, त्यांचे संरक्षण, समर्थन व मार्गदर्शन करणे आणि लेकरं ह्या नात्याने त्यांची वकिली करण्याचे निर्देश दिले आहेत. देवाची योजना आहे की आम्ही लेकरांना तारण आणि कृपेच्या वाढीच्या जीवनाशी परिचित करावे. तारण, पवित्रता आणि शिष्यत्व हे लेकरांच्या जीवनात शक्य आणि अत्यावश्यक आहेत. आम्ही कबुल करतो की लेकरं हे शेवट साधण्याचे माध्यम नसून ख्रिस्ताच्या शरीरामध्ये पूर्ण सहभागी आहेत. लेकरं हे प्रतिक्षेत नव्हे तर प्रशिक्षणात असणारे शिष्य आहेत.

अशा प्रकारे, प्रत्येक स्थानिक मंडळीमधील लेकरं आणि त्यांचे कुटुंबिय हे सर्वांगिण आणि परिवर्तनकारी सेवेचे प्राधाण्य आहेत, त्याचे पुरावे खालील प्रमाणे आहेत:

- पूर्ण लेकरास परिणामकारी आणि सबळ करणारी सेवा प्रदान करणे — शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक आणि आध्यात्मिक;
- लेकरांवर परिणाम करणाऱ्या वर्तमान सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर ख्रिस्ती भुमिका स्पष्ट करून सादर करणे;
- लेकरांना मिशन आणि विश्वासणाऱ्यांच्या समाजाची जी सेवा आहे त्याच्या केंद्रबिंदूशी जोडणे;
- लेकरांचे शिष्यत्व करणे आणि त्यांना इतरांना शिष्य बनविण्याचेचे प्रशिक्षण देणे;
- पालकांना त्यांच्या लेकरांच्या आध्यात्मिक जडणघडणीचे पालनपोषण करण्यासाठी सुसज्ज करणे.

मंडळीच्या शैक्षणिक संस्था (ईश्वरविज्ञान शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि उच्च ईश्वरविज्ञान प्रशिक्षण केंद्रे) विद्यार्थ्यांना पुढारीपणासाठी तयार करतात, त्याचप्रमाणे लेकरांचे मूल्य समजावून सांगण्याचे उद्दीष्ट आणि दृष्टांत पार पाडण्याची महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात. ते स्थानिक मंडळी आणि कुटुंबांशी जुळून सेवकवर्गाच्या व सामान्य वर्गाच्या सभासदांना पुढील पिढीची लेकरं व तरूणांना पवित्र शास्त्र व ईश्वरविज्ञान साक्षर

असे उभे करण्याच्या जबाबदारीमध्ये सामील होतात, आणि सुवार्ताप्रसार, शिष्यत्व आणि त्यांच्या समाजाचे परिवर्तन साधण्यात येणाऱ्या ज्ञात व अज्ञात आवाहनांना तोंड देण्यास तयार करण्याच्या जबाबदारीमध्ये सुध्दा सामील होतात. चर्च ऑफ दी नॅझरीन अशा आंतरपिढीत्मक विश्वासाच्या समाजाचा दृष्टांत बघते की जिथे तरूण आणि लेकरांचे मूल्य केले जाते आणि त्यांच्यावर प्रीती केली जाते, जिथे त्यांची सेवा केली जाते आणि मंडळीच्या कुटुंबामध्ये वैविध्यपूर्ण आणि व्यापक साधनांद्वारे आणि पध्दतिंद्वारे सामावून घेतले जाते, आणि जिथे त्यांच्या वयोमान, विकास, क्षमता आणि आध्यात्मिक दानांनुरूप इतरांची सेवा करण्याची संधी उपलब्ध आहे. (२००९)

**९२२. युद्ध आणि लष्करी सेवा.** चर्च ऑफ दी नॅझरीनचा असा विश्वास आहे की आदर्श जागतिक स्थिती ही शांतीची आहे आणि ख्रिस्ती मंडळीचे संपूर्ण कर्तव्य आहे की स्वतःच्या प्रभावाचा उपयोग अशा साधनांचा शोध करण्यासाठी करावा की जे जगातील राष्ट्रांना शांतीने जगण्यास आणि त्यांच्या सर्व माध्यमांना शांतीच्या संदेशाचा प्रसार करण्याच्या कामी समर्पित होण्यास समर्थ करतील. या मार्गाचा उपयोग करण्यासाठी प्रभाव वापरणे आवश्यक आहे जेणेकरुन पृथ्वीवरील राष्ट्रे शांतीत राहू शकतील आणि सर्व काही सुरळीत होईल.

तथापि, आम्हास ह्याची जाण आहे की आपण अशा जगामध्ये जगत आहोत जिथे वाईट शक्ति तत्वज्ञाने ही ह्या ख्रिस्ती आदर्शांच्या विरूध्द आहेत आणि अशा आंतरराष्ट्रीय आणीबाणीच्या परिस्थिती उद्भवू शकतात जिथे राष्ट्रांना त्यांची आदर्श, स्वातंत्र्य आणि अस्तित्व ह्यांचे रक्षण करण्यास्तव युध्द करावे लागेल.

अशाप्रकारे शांतीच्या कारणासाठी कटिबद्ध असताना, चर्च ऑफ दी नॅझरीन हे मान्य करते की ख्रिस्ती व्यक्तीची सर्वोच्च निष्ठा हा देवाप्रती आहे आणि म्हणून युद्धाच्या परिस्थितिमध्ये लष्करात भाग घेण्याबाबत सभासदांच्या विवेकाला बांधण्याचा प्रयत्न केला जात नाही. जरी नागरिकांचा असा विश्वास आहे की ख्रिश्चन ख्रिश्चनांना आणि ख्रिस्ती जीवनशैलीशी सुसंगत अशा सर्व प्रकारे आपल्या स्वतःच्या राष्ट्राची सेवा करण्यास बाध्य आहे. तरी चर्च ऑफ दी नॅझरीन असाही विश्वास बाळगते की ख्रिस्ती व्यक्तीने एक नागरीक ह्या नात्याने स्वत:च्या राष्ट्राला सेवा द्यावी आणि ती सर्व दृष्टीकोणातून ख्रिस्ती विश्वास आणि ख्रिस्ती जीवनशैलीशी सुसंगत असावी.

आम्ही हे देखील ओळखतो की ख्रिस्ती शिक्षण आणि पृथ्वीवर शांती असावी ह्या ख्रिस्ती इच्छेच्या अतिवृध्दीमुळे, आमच्या सभासदत्वामध्ये असे काही व्यक्ती आहेत

ज्यांना काही प्रकारच्या लष्करी सेवांबाबत प्रामाणिक आक्षेप आहे. त्यामुळे, चर्च ऑफ दी नॅझरीन आपल्या सभासदत्वातील प्रामाणिक आक्षेपकर्त्यांकरिता लष्करी सेवांसंबंधी त्याच सुटी व लाभ मिळण्याचा दावा करते की ज्या मान्यताप्राप्त गैरलढाऊ धार्मिक संस्थांच्या सभासदांना मिळतात.

चर्च ऑफ दी नॅझरीन तिच्या प्रमुख चिटणिसामार्फत एक नोंदवही जतन करेल ज्यामध्ये त्या व्यक्ती ज्या चर्च ऑफ दी नॅझरीनच्या सभासद असण्याचे पुरावे देतात ते आपल्या धारणांची नोंद प्रामाणिक आक्षेपकर्ते म्हणून करू शकतील.

**९२३. निर्मिती.** चर्च ऑफ दी नॅझरीन पवित्र शास्त्रातील निर्मितिच्या वृत्तांतावर विश्वास ठेवते ("प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली." - उत्पत्ति १:१) निर्मितिच्या स्वरूपाबाबत वैज्ञानिक स्पष्टीकरणांचे आम्ही स्वागत करतो परंतु अशा सर्व अर्थविवरणांचा विरोध करतो जे सृष्टीचे मुळ व मानवजातीच्या मुळाबाबत देवाला निर्माता म्हणून नाकारतात. (इब्री ११:३). (१, ५.१, ७) (२०१७)

> **९२४. निर्मितिची काळजी.** देवाच्या निर्मितीबाबत गंभिर सन्मान बाळगून आम्ही विश्वास ठेवतो की त्याचे कार्य जपण्यात मदत करणारे कारभारीपणाचे गुण प्रदर्शित करण्यासाठी आपण झटलो पाहिजे. आम्ही हेही मान्य करतो की. आपल्या सभोवतालची अखंडता टिकवून ठेवण्याची जबाबदारी आपल्याला देण्यात आलेली असून ती पूर्ण करण्याची वैयक्तिक आणि सामूहिक जबाबदारी आम्ही स्वीकारतो. (२००९) (उत्पत्ति २:१५; स्तोत्र ८:३-९; १९:१-४; १४८)

**९२५. पवित्र आत्म्याने बाप्तिस्म्याचा पुरावा.** चर्च ऑफ दी नॅझरीन असा विश्वास बाळगते की पवित्र आत्मा नवीन जन्माची आणि त्यानंतरच्या अंतःकरण शुद्ध करण्याच्या कार्याची किंवा संपूर्ण पवित्रीकरणाची साक्ष पवित्र आत्म्याने भरण्याद्वारे देतो.

आम्ही पुष्टी करतो की संपूर्ण पवित्रीकरणाचा किंवा पवित्र आत्म्याने भरल्या जाण्याचा पवित्र शास्त्रोक्त पुरावा म्हणजे प्रेषित १५:८-९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे विश्वासाने हृदयाचे मुळ पापापासून स्वच्छ केले जाणे आहे. प्रेषित १५:८-९ नुसार "आणि हृदये जाणणाऱ्या देवाने जसा आपल्याला तसा त्यांनाही पवित्र आत्मा देऊन त्यांच्याविषयी साक्ष दिली. त्याने त्यांची अंत:करणे विश्वासाने शुध्द करून त्यांच्यामध्ये व आपल्यामध्ये काही भेद ठेवला नाही." आणि हे शुद्धीकरण पवित्र जीवनात आत्म्याच्या फळाद्वारे प्रकट होते. "आत्म्याच्या द्वारे निष्पन्न होणारे फळ, प्रीती, आनंद, शांती, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता, इंद्रियदमन हे आहे, अशांविरुद्ध नियमशास्त्र नाही. जे

ख्रिस्त येशूचे आहेत त्यांनी विकार व वासना ह्यांच्यासह देहस्वभाव वधस्तंभावर खिळला आहे.” (गलती ५:२२-२४)

अशी पुष्टी करणे की कुठलाही शारीरिक पुरावा किंवा “प्रार्थनेची भाषा” हा पवित्र आत्म्याद्वारे बाप्तिस्म्याचा पुरावा आहे हे मंडळीच्या पवित्र शास्त्रोक्त आणि ऐतिहासीक भुमिकेशी विपरीत आहे. (२००९)

**९२६. अश्लील साहित्य.** अश्लील साहित्य ही एक अशी वाईट गोष्ट आहे जी समाजाच्या नैतिकतेला खीळ बसवत आहे. असली छापील आणि दृश्यमान सामग्री जी मानवजातीच्या सन्मानाला कमी करणारी आहे आणि विवाहाच्या पवित्रतेबाबत आणि लैंगिकतेच्या पूर्णत्वाबाबत पवित्र शास्त्रोक्त दृष्टिकोणाविरूध्द आहे, ती घृणास्पद आहे.

आमचा विश्वास आहे की आपण देवाच्या प्रतिमेमध्ये तयार केलेले असून, अश्लील साहित्य पुरुष, स्त्रिया आणि लेकरांचा सन्मान कमी करणारे, त्यांचे शोषण करणारे आणि त्यांच्यावर अत्याचार करणारे आहे. अश्लील साहित्य उद्योग हा लोभामुळे प्रवृत्त आहे, तो कौटुंबिक जीवनाचा शत्रू आहे, त्याने हिंसाचाराचे गुन्हे घडवून आणले आहेत, तो मनामध्ये विष कालवतो, आणि शरीराला भ्रष्ट करतो. देवाचा निर्माणकर्ता आणि सोडवणारा म्हणून सन्मान करण्यासाठी, आम्ही प्रत्येक कायदेशीर मार्गाने अश्लीलतेस सक्रिय विरोध दर्शविण्यास आणि या वाईट गोष्टींमध्ये सामील असलेल्यापर्यंत ख्रिस्ताकरिता पोहोचण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्याचा आग्रह करतो. (२००९)

**९२७. पेहरावाबाबत ख्रिस्ती विनयशीलता.** सार्वजनिक ठिकाणी पेहरावांबाबत वाढती विनयहीनता ओळखून आम्ही आपल्या लोकांना ख्रिस्ती विनयशीलतेची संकल्पना ही पवित्रतेची अभिव्यक्ती असल्याचे स्मरण करून देतो. आणि सार्वजनिक ठिकाणी ख्रिस्ती लोकांनी नेहमी विनयशीलता अंमलात आणावी असा आग्रह धरतो. (२०१७)

**९२८. निरोगीपणा.** पवित्र शास्त्र सर्व विश्वासणाऱ्यांना पवित्र आत्म्याच्या परिवर्तनकारी सामर्थ्याने स्वास्थ आणि निरोगीपणामध्ये संतूलन साधण्याचे आवाहन करते. खादाडपणा म्हणजे शरीर, समुदाय आणि आध्यात्मिक जीवनाचे नुकसान करण्यासाठी अन्न सेवनाची सवय आहे. एकीकडे स्थुलता अनुवंशिकतेमुळे, सांस्कृतिक निर्बंध किंवा शारीरिक मर्यादा यामुळे उद्भवू शकते, तर दुसरीकडे, खादाडपणा, देवाच्या चांगल्या सृष्टीचा नाश करणारी जीवनशैली प्रतिबिंबित करते: अन्न, साधनसंपत्ति आणि नातेसंबंध ज्या व्यक्ती आणि समाज ह्या दोन्हींचे नुकसान करतात. ख्रिस्ती कारभारीपणाचा सराव आपल्याला पवित्र आत्म्याचे मंदिर म्हणून शरीराचे आरोग्य आणि तंदुरुस्ती टिकवून ठेवण्यासाठी आणि

देवाने पुरविलेल्या सर्व साधनसंपत्ति आणि नातेसंबंधांशी संयमी जीवन जगण्यास पाचारण करते. (२००९)

(नीतिसूत्रे २३:१९-२१; मत्तय ११:१९; २३:२५; १ करिंथ ९:२७; गलती ५:२३; फिलिप्पै ३:१९; तीत १:८; २:१२; इब्री १२:१६; २ पेत्र १:६)

**९२९. मादक पदार्थांचा वापर.** चर्च ऑफ दी नॅझरीन मादक पदार्थाच्या वापरावर सामाजिक विकृती म्हणून सातत्याने आक्षेप नोंदविते. आम्ही मंडळीच्या सभासदांना सक्रिय आणि अत्यंत दृश्य भूमिका घेण्यास आणि मादक पदार्थांच्या वापरासंबंधी आणि अशा मादक पदार्थांच्या वापराची ख्रिस्ती अनुभव आणि पवित्र जीवनाशी विसंगती ह्याबाबत शिक्षण आणि पुनर्वसनात भाग घेण्यासाठी प्रोत्साहित करतो. (२०१३)

**९३०. मद्यापासून परावृत्त होणे.** चर्च ऑफ दी नॅझरीन सार्वजनिकपणे मद्य प्राशनापासून परावृत्त असण्यास समर्थन देते. आम्ही "मद्यपी संस्कृती" च्या सामाजिक स्वीकार्यतेच्या जाहिराती आणि प्रसार माध्यमांवरील जाहिरातीस प्रतिबंध करण्याद्वारे मद्यप्राशनापासून परावृत्तीस मदत करण्याकरिता नागरी, श्रमिक, व्यापारी, व्यावसायिक, सामाजिक, स्वयंसेवी आणि खाजगी संस्था आणि संघटनांना प्रोत्साहित करतो.

**९३१. तंबाखूचा वापर आणि जाहिरात.** चर्च ऑफ दी नॅझरीनने आपल्या लोकांना आरोग्यासाठी घातक आणि सामाजविघातक गोष्ट म्हणून तंबाखूच्या वापराविरूद्ध सतत बोलण्याचे आव्हान केले आहे. आमची ऐतिहासिक भूमिका देवाच्या वचनावर आधारीत असून त्यामध्ये आपल्याला पवित्र आत्म्याची मंदिरे म्हणून आपले शरीर राखण्याची सूचना देण्यात आली आहे (१ करिंथ ३:१६-१७; ६:१९-२०).

आमच्या सर्व स्वरूपातील तंबाखूच्या वापरास विरोध दर्शविणाऱ्या भूमिकेचे जगभरातील असंख्य सामाजिक, सरकारी आणि आरोग्य संस्थांनी नोंदविलेल्या वैद्यकीय पुराव्यांद्वारे जोरदार समर्थन केले आहे. त्यांनी हे दर्शविले आहे की हा आरोग्यासाठी एक मोठा धोका आहे आणि त्यांनी असे सिद्ध केले आहे की त्याचा उपयोग गंभीर आणि कायमस्वरुपी, सामान्य शारीरिक शरीरशास्त्रात बदल घडवून आणू शकतो.

आम्ही हे जाणतो की तंबाखू आणि त्याचे जुळे विघातक पेय म्हणजे मद्य ह्यांच्या जाहिरातींवर कोट्यावधी डॉलर्स खर्च केले जातात आणि त्याद्वारे आमचे तरुण लोक फार प्रभावित होत आहेत. आम्ही मासिके, जाहिरात फलके आणि रेडिओ, टेलिव्हिजन आणि अन्य माध्यमांवर तंबाखू आणि मद्यपानाच्या सर्व जाहिरातींच्या बंदीचे समर्थन करतो. (२०१३)

**१३२. एचआयव्ही/एड्स (ह्यूमन इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस/ अक्कायर्ड इम्यूनोडेफिशियन्सी सिंड्रोम).** १९८१ पासून, आमचे जग एचआयव्ही/एड्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सर्वात विनाशकारी आजाराने ग्रस्त आहे. एचआयव्ही/एड्स ग्रस्त व्यक्तींची सखोल गरज लक्षात घेता ख्रिस्ती करुणा आपल्याला एचआयव्ही/एड्सविषयी अचूक माहिती मिळविण्यास प्रवृत्त करते. ख्रिस्त आपल्याला जगाच्या कुठल्याही आणि प्रत्येक देशातील पीडितांबद्दल असलेले त्याचे प्रेम आणि त्याची काळजी व्यक्त करण्याचा मार्ग शोधण्यास भाग पाडेल. (२०१३)

**१३३. सामाजिक माध्यमांचा वापर.** सर्वात महत्त्वाचे म्हणजे आम्ही सामायिक केलेली सामग्री आदरयुक्त असावी. सर्व परस्पर नातेसंबंधांप्रमाणेच आमच्या सामाजिक माध्यमांचा मजकूर हा आम्ही ज्या पवित्रीकरण झालेल्या हृदयांसाठी झटतो त्याचे परावर्तन करणारा असावा. सेवक वर्ग व सामान्य सभासदांनी एकत्रितरित्या, त्यांच्या सामाजिक माध्यमांवरील क्रियाकलापांचा ख्रिस्ताच्या प्रतिमेवर, त्याच्या मंडळीवर, आणि त्याच्या समाजामधील मिशनवर कसा परिणाम होतो ह्याबाबत जागरूक असावे. आमचे क्रियाकलाप जीवन देणारे आणि पुष्टी करणारे असले पाहिजे व त्यांनी सर्व व्यक्तींचे उत्थान साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. (२०१७)

(नीतिसूत्रे १५:४,२८; १६:२४; उपदेशक ५:२-४; मत्तय १५:११; गलती ५:१३-१५; इफिस ४:२९; कलस्सै ४:६२; २ तीमथ्य २:१६; याकोब ३:१-१३)

# NOTES